# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०४/२०१९** **दिनांक ०६.०६.२०१९**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- दुपारी १२.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा गुरुवार दि.०६.०६.२०१९ रोजी शिर्डी येथील संस्थानचे साईनिवास अतिथीगृहामध्ये दुपारी १२.०० वाजता आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/६७१/२०१९, दि.२९.०५.२०१९ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते. त्यानुसार गुरुवार दि.०६.०६.२०१९ दुपारी १२.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष ०२. मा.ॲड मोहन मोतीराम जयकर, सदस्य
०३. मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य ०४ मा.सौ.योगिता अभय शेळके पाटील, सदस्या

मा.श्री.दी.म.मुगळीकर,भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत, समिती सदस्य मा.डॉ.राजेंद्र राजाबाली सिंह यांनी दुरध्वनीव्दारे कळविले होते, तसेच समिती सदस्य मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे यांनी दि.०६.०६.२०१९ रोजीचे पत्रान्वये तब्येत बरी नसल्याने उपस्थित राहु शकत नाही, असे कळविले होते, याची समितीने नोंद घेऊन त्यांना अनुपस्थित राहण्याची अनुमती दिली.

सभेस आवश्यक गणपुर्ती नसल्यामुळे विधी व न्याय विभागाकडील दि.१३ जुलै, २०१७ रोजीचे अधिनियम दुरुस्तीतील कलम ३ (क) पोटकलम (२) मधील तरतूदीनुसार तीस मिनीटाकरीता सभेचे कामकाज तहकुब करणेत येऊन, त्यानंतर दुपारी १२.३० वाजता सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

त्यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांनी विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु केली.

---

**विषय नं.०१** **दिनांक २६.०२.२०१९ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.१७३** **दिनांक २६.०२.२०१९ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करतांना खालील प्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या व त्यास मान्यता देण्यात आली.**

१) निर्णय क्र.१३१- यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान परिसरात साईभक्तांचे सोयीसाठी पादत्राणे गृह,क्लोकरुम,मोबाईल कॅमेरा क्लोकरुम,प्रसाद नॉव्हेल्टी, दुध व दुग्धजन्य पदार्थ, थंडपेय विक्री, जनरल स्टोअर इत्यादी व्यवसायासाठी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना वापरास दिलेल्या विविध १२ ठिकाणचे जागा/गाळे वापरास मुदतवाढ देण्यात येऊ नये, त्याऐवजी सदर १२ ठिकाणचे जागा/गाळयामध्ये प्रस्तावात नमुद केलेले व्यवसाय चालविण्यासाठी स्वयंसेवी संस्थाना पाचारण करण्यात यावे, असे ठरले.

(कार्यवाही- मालमत्ता विभाग)

**याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालकीचे उपरोक्त प्रस्तावातील परिशिष्ट "अ" मध्ये नमूद केलेल्या १२ ठिकाणच्या जागा/ गाळा त्यासमोर दर्शविलेल्या प्रयोजनासाठी मागील वर्षीच्या भाडेदरात १०% वाढ करुन व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन दि.१६/०४/२०१९ ते दि.१५/०३/२०२० या ११ महिन्यांचे कालावधीसाठीच्या वापरास मुदतवाढ देण्यास व त्याप्रमाणे भाडे करारनामा नोटराईज करुन घेण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

२)	निर्णय क्र.१३२-  यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील एकुण 267 नग मशीन्सचे आणि श्री साईनाथ रूग्णालयामधील एकुण 89 नग मशिन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करण्यास व त्यासाठी येणाऱ्या श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता रक्कम रू.१,०८,०८,४८१/-मात्र व श्री साईनाथ रूग्णालयाकरीता रक्कम रू.२९,०७,१४०/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.	(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

**याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील एकुण 267 नग मशीन्सचे आणि श्री साईनाथ रूग्णालयामधील एकुण 89 नग मशिन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करण्यास व त्यासाठी येणाऱ्या श्री साईबाबा हॉस्पिटल करीता रक्कम रू.१,०८,०८,४८१/-मात्र व श्री साईनाथ रूग्णालयाकरीता रक्कम रू.२८,२५,०४०/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

३)	निर्णय क्र.१०८-   यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.३१/०५/२०१४ ते दि.३१/१२/२०१८ अखेर सेवानिवृत्त झालेल्या १६२ कर्मचा-यांना सत्कारावेळी भेट देणेत आलेल्या वस्तुवर झालेल्या खर्चाची रक्कम रु.१,४२,२३६/-मात्रची नोंद घेण्यात येऊन त्यास मान्यता देण्यात आली.

श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव-२०१८ करीता शासनाकडून प्रतिनियुक्तीवर संस्थानमध्ये काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना संस्थानचे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांप्रमाणे चांदीचा शिक्का/नाणे (२० ग्रॅम वजनाचा), श्रींची मुर्ती, श्री साईसत्चरित्र, श्री साईराम प्रिंटेड शॉल इ. भेट म्हणून देण्यास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.तसेच यापुढे प्रतिवर्षी सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांनाही त्यांनी केलेली श्री साईबाबांची सेवा कायमस्वरुपी  स्मरणात राहावी याकरीता सत्कार कार्यक्रमाच्या वेळी त्यांनाही चांदीचा शिक्का/नाणे (२० ग्रॅम वजनाचा), श्रींची मुर्ती, श्री साईसत्चरित्र, श्री साईराम प्रिंटेड शॉल इ. भेट म्हणून देण्यास व याकामी येणा-या खर्चास अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

**याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.३१/०५/२०१४ ते दि.३१/१२/२०१८ अखेर सेवानिवृत्त झालेल्या १६२ कर्मचा-यांना सत्कारावेळी भेट देणेत आलेल्या वस्तुवर झालेल्या खर्चाची रक्कम रु.१,४२,२३६/-मात्रची नोंद घेण्यात येऊन त्यास मान्यता देण्यात आली.**

**सन-२०१८ पासुन शासनाकडून प्रतिनियुक्तीवर संस्थानमध्ये काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना संस्थानचे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांप्रमाणे चांदीचा शिक्का/नाणे (२० ग्रॅम वजनाचा), श्रींची मुर्ती, श्री साईसत्चरित्र, श्री साईराम प्रिंटेड शॉल इ. भेट म्हणून देण्यास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच यापुढे प्रतिवर्षी सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांनाही त्यांनी केलेली श्री साईबाबांची सेवा कायमस्वरुपी  स्मरणात राहावी याकरीता सत्कार कार्यक्रमाच्या वेळी त्यांनाही चांदीचा शिक्का/नाणे (२० ग्रॅम वजनाचा), श्रींची मुर्ती, श्री साईसत्चरित्र, श्री साईराम प्रिंटेड शॉल इ. भेट म्हणून देण्यास व याकामी येणा-या खर्चास अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

४)	निर्णय क्र.१५८-   मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ-औरंगाबाद येथे संस्थान विरुध्द सुरु असलेल्या केसेस चे कामकाज पाहणेसाठी सिनीअर कौन्सील पी.एम.शहा यांची नियुक्ती करण्यात यावी तसेच याकामी त्यांना आदा करावयाची फी ठरविण्याचे अधिकार समिती सदस्य ॲड मोहन जयकर यांना देण्यात यावे, असे ठरले.

मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थानचे विरुध्द चालू असलेल्या केसेस संदर्भात आढावा घेण्यासाठी समिती सदस्य ॲड मोहन जयकर यांना आवश्यकतेनुसार मुंबई ते औरंगाबाद जाणे-येणे असा विमान प्रवास व निवासव्यवस्था अनुज्ञेय करण्यास मान्यता देण्यात आली.

तसेच संस्थान विषयक सुरु असलेल्या सर्व कोर्ट केसेस बाबतचा विषय मा.स्थानिक उपसमिती सभेमध्ये घेण्यात येऊन संबधीत वकीलांना चर्चेसाठी बोलविण्यात यावे, तसेच प्रत्येक केसची माहिती वेळोवेळी मा.सदस्यांना देण्यात यावी, असे ठरले.

(कार्यवाही- विधी विभाग)

**याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ-औरंगाबाद येथे संस्थान विरुध्द सुरु असलेल्या केसेस चे कामकाज पाहणेसाठी सिनीअर कौन्सील पी.एम.शहा यांची नियुक्ती करण्यात यावी तसेच याकामी त्यांना आदा करावयाची फी ठरविण्याचे अधिकार समिती सदस्य ॲड मोहन जयकर यांना देण्यात यावे, असे ठरले.**

**मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थानचे विरुध्द चालू असलेल्या केसेस संदर्भात आढावा घेण्यासाठी समिती सदस्य ॲड मोहन जयकर यांना आवश्यकतेनुसार त्यांनी नमुद केलेले वकील यांचेसह मुंबई ते औरंगाबाद जाणे-येणे असा विमान प्रवास व निवासव्यवस्था अनुज्ञेय करण्यास मान्यता देण्यात आली.**

**तसेच संस्थान विषयक सुरु असलेल्या सर्व कोर्ट केसेस बाबतचा विषय मा.स्थानिक उपसमिती सभेमध्ये घेण्यात येऊन संबधीत वकीलांना चर्चेसाठी बोलविण्यात यावे, तसेच प्रत्येक केसची माहिती वेळोवेळी मा.सदस्यांना देण्यात यावी, असे ठरले.** **(कार्यवाही- विधी विभाग)**

---

५) निर्णय क्र.१६३- मौजे शिर्डी येथील मोफत सर्व्हे नं.१ (त्रिकोण) मधील १०१ दुकानदार हे आजचे व्यवस्थापन समितीचे सभेसमोर उपस्थित होते. त्यांनी सभेस अशी विनंती केली की, दर्शन रांगेच्या ले-आऊट मध्ये दक्षिण-पुर्व कोपऱ्यामध्ये १२७५ चौ.मी.ॲमेनिटी स्पेस दर्शविलेले असून त्यामध्ये इलेक्ट्रीकल सबस्टेशन व जनरेटर रुम दर्शविलेले आहे. सदर सबस्टेशन व जनरेटर रुम भूखंडाचे उत्तर हद्दीलगत सध्याचे बायोमेट्रीक पास काऊंटरचे समोर बांधण्यात यावे, त्यासाठी ॲमेनिटी स्पेस त्या ठिकाणी दर्शविणेत यावी. तसेच त्यासाठी ओपन स्पेस सध्याचे सुलभ शौचालय व साईनिवास अतिथीगृह यांचे मधील मोकळया जागेत व सध्याचे बायोमेट्रीक पास काऊंटरचे जागेवर अशा दोन ठिकाणी दर्शविण्यात यावे, तसेच सध्याचे मंजूर रेखांकनामध्ये दर्शविण्यात आलेल्या ॲमेनिटी स्पेसची जागा तसेच त्यालगच्या सर्व्हे नं.३/२ मधील संस्थानला भूसंपादनाने मिळालेली २०० चौ.मी. जागेसह विस्थापीत १०१ दुकानदारांसाठी दुकानगाळे बांधकामासाठी उपलब्ध करुन देण्यात यावी.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली, मौजे शिर्डी येथील मोफत सर्व्हे नं.१ (त्रिकोण) मधील १०१ दुकानदारांचे पुर्नवसन करण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली. याबाबत दि.२२.०२.२०१६ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाने मौजे शिर्डी येथील मोफत सर्व्हे नं.१ (त्रिकोण) बाबत दिलेल्या आदेशाचे समिती सदस्य मा.ॲड मोहन जयकर यांनी तातडीने अवलोकन करावे व सदर आदेशाबाबत ॲटर्नी जनरल तसेच विधी व न्याय विभाग यांचे मार्गदर्शन घ्यावे, तसेच एफ.एस.आय.बाबत नगररचना विभाग यांचे अभिप्रय घेऊन त्यानंतर प्रस्तुत प्रकरणी सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे पुढील सभेसमोर सादर करावा, असे ठरले.

(कार्यवाही- विधी विभाग/ मालमत्ता विभाग/ बांधकाम विभाग)

याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.

**मौजे शिर्डी येथील मोफत सर्व्हे नं.१ (त्रिकोण) मधील १०१ दुकानदार हे आजचे व्यवस्थापन समितीचे सभेसमोर उपस्थित होते. त्यांनी सभेस अशी विनंती केली की, दर्शन रांगेच्या ले-आऊट मध्ये दक्षिण-पुर्व कोपऱ्यामध्ये १२७५ चौ.मी.ॲमेनिटी स्पेस दर्शविलेले असून त्यामध्ये इलेक्ट्रीकल सबस्टेशन व जनरेटर रुम दर्शविलेले आहे. सदर सबस्टेशन व जनरेटर रुम भूखंडाचे उत्तर हद्दीलगत सध्याचे बायोमेट्रीक पास काऊंटरचे समोर बांधण्यात यावे, त्यासाठी ॲमेनिटी स्पेस त्या ठिकाणी दर्शविणेत यावी. तसेच त्यासाठी ओपन स्पेस सध्याचे सुलभ शौचालय व साईनिवास अतिथीगृह यांचे मधील मोकळया जागेत व सध्याचे बायोमेट्रीक पास काऊंटरचे जागेवर अशा दोन ठिकाणी दर्शविण्यात यावे, तसेच सध्याचे मंजूर रेखांकनामध्ये दर्शविण्यात आलेल्या ॲमेनिटी स्पेसची जागा तसेच त्यालगच्या सर्व्हे नं.३/२ मधील संस्थानला भूसंपादनाने मिळालेली २०० चौ.मी. जागेसह विस्थापीत १०१ दुकानदारांसाठी दुकानगाळे बांधकामासाठी उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**यावर सविस्तर चर्चा करण्यात आली, मौजे शिर्डी येथील मोफत सर्व्हे नं.१ (त्रिकोण) मधील १०१ दुकानदारांचे पुर्नवसन करण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली. याबाबत मा.उच्च न्यायालयातील रिट पिटीशन क्र.११९४९/२०१७ मध्ये दि. १३.१०.२०१७ रोजी पारित केलेल्या तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने SPL No.28596/2017 मध्ये दि.२५.०७.२०१८ रोजी दिलेल्या आदेशाचे अधिन राहून ३३ वर्षाच्या करारावर जागा देणेसाठी विधी व न्याय विभाग यांचे मान्यतेसाठी तातडीने प्रस्ताव पाठविण्यात यावा,असे ठरले.**

**(कार्यवाही- विधी विभाग/ मालमत्ता विभाग/ बांधकाम विभाग)**

---

६) निर्णय क्र.१६८- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम-२००४ मधील कलम २२(२) मध्ये “ व्यवस्थापन निधीत, शिल्लक रक्कम उपलब्ध असल्यास, ती विचारात घेऊन विश्वस्त व्यवस्थेच्या लगतपुर्व वर्षातील अंदाजे स्थूल वार्षिक उत्पन्नाच्या दहा टक्यांपेक्षा अधिक नसेल इतकी, समितीकडून निश्चित करण्यात येईल एवढी रक्कम, राज्य शासनाच्या मान्यतेने दरवर्षी या निधीमध्ये जमा करण्यात येईल. राज्य शासनास, आवश्यक वाटले तर, कोणत्याही वर्षात विश्वस्तव्यवस्था निधीतून कोणत्याही अतिरिक्त रक्कमा या निधीत जमा करण्याबद्दल कोणत्याही वेळी, निदेश देता येईल.” अशी तरतुद आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान अधिनियम २००४ पासून अमंलात आलेला आहे. त्यानंतर संस्थानमध्ये कंत्राटी पध्दतीने सेवेत असलेले १०५२ कर्मचारी माहे डिसेंबर-२००६ मध्ये संस्थान सेवेत कायम करण्यात आले आहे. शासनाने सन २००९ मध्ये २९०८ व वेळोवेळी १२ अशी एकुण २९२० कायम कर्मचाऱ्यांचा सुधारीत आकृतीबंध मंजूर केलेला आहे. संस्थानमधील हॉस्पिटल, शैक्षणिक संकुल, प्रसादालय, भक्तनिवास हे उपक्रम धर्मदाय व लोककल्याणकारी आहेत. त्यातुन संस्थानला अत्यल्प उत्पन्न मिळते. मात्र या ठिकाणी कामगारांचे वेतनावर मात्र नियमीत खर्च होत असतो. तसेच ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीची अंमलबजावणी १ जानेवारी,२०१६ पासून करावयाची असल्याने व्यवस्थापन निधीतून मोठया प्रमाणावर खर्च होणार आहे.भविष्यातही सदरचा खर्च दहा टक्के मर्यादेपेक्षा जास्त होणार आहे. त्यामुळे सदर खर्चाची मर्यादा दहा टक्के ऐवजी वीस टक्के करणेबाबत अधिनियमात तशी दुरुस्ती करणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा, असे ठरले.

**याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम-२००४ मधील कलम २२(२) मध्ये “ व्यवस्थापन निधीत, शिल्लक रक्कम उपलब्ध असल्यास, ती विचारात घेऊन विश्वस्त व्यवस्थेच्या लगतपुर्व वर्षातील अंदाजे स्थूल वार्षिक उत्पन्नाच्या दहा टक्यांपेक्षा अधिक नसेल इतकी, समितीकडून निश्चित करण्यात येईल एवढी रक्कम, राज्य शासनाच्या मान्यतेने दरवर्षी या निधीमध्ये जमा करण्यात येईल. राज्य शासनास, आवश्यक वाटले तर, कोणत्याही वर्षात विश्वस्तव्यवस्था निधीतून कोणत्याही अतिरिक्त रक्कमा या निधीत जमा करण्याबद्दल कोणत्याही वेळी, निदेश देता येईल.” अशी तरतुद आहे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान अधिनियम २००४ पासून अमंलात आलेला आहे. त्यानंतर संस्थानमध्ये कंत्राटी पध्दतीने सेवेत असलेले १०५२ कर्मचारी माहे डिसेंबर-२००६ मध्ये संस्थान सेवेत कायम करण्यात आले आहे. शासनाने सन २००९ मध्ये २९०८ व वेळोवेळी १२ अशी एकुण २९२० कायम कर्मचाऱ्यांचा सुधारीत आकृतीबंध मंजूर केलेला आहे. संस्थानमधील हॉस्पिटल, शैक्षणिक संकुल, प्रसादालय, भक्तनिवास हे उपक्रम धर्मदाय व लोककल्याणकारी आहेत. त्यातुन संस्थानला अत्यल्प उत्पन्न मिळते. मात्र या ठिकाणी कामगारांचे वेतनावर मात्र नियमीत खर्च होत असतो. तसेच ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीची अंमलबजावणी १ जानेवारी,२०१६ पासून करावयाची असल्याने व्यवस्थापन निधीतून मोठया प्रमाणावर खर्च होणार आहे.भविष्यातही सदरचा खर्च दहा टक्के मर्यादेपेक्षा जास्त होणार आहे. त्यामुळे सदर खर्चाची मर्यादा दहा टक्के ऐवजी तीस टक्के करणेबाबत अधिनियमात तशी दुरुस्ती करणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-लेखाशाखा / सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.०२** **दिनांक ०४.०३.२०१९ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.१७४** **दिनांक २६.०२.२०१९ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना निर्णयांना पुष्टी देण्यात आली.**

**१** **साईटेक प्रकल्प-२ अंतर्गत सर्व्हर व सॉफ्टवेअर तसेच ॲपल मॅकबुक खरेदी करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत निम्नतम दरधारक निविदाकार यांचेशी चर्चा होऊन पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

“साईटेक प्रकल्प-२” अंतर्गत कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेसाठी सर्व्हर व सॉफ्टवेअर तसेच अनुषंगिक कार्यवाहीकरीता ॲपल मॅकबुक खरेदी करणे कामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य/ वस्तूचा तपशिल. | "साईटेक प्रकल्प-२" अंतर्गत कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेसाठी सर्व्हर व सॉफ्टवेअर तसेच अनुषंगिक कार्यवाहीकरीता ॲपल मॅकबुक खरेदी करणे. |
| ०२ | मागणी | (see table below) |
| ०३ | ई-निविदा प्रसिद्धी | दि.१४.०१.२०१९ ते दि.१६.०२.२०१९ |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसुचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठविली जाते ? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट (sai.org.in) व पुरवठाधारकांना ई-मेलद्वारे. |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले ? | २० पुरवठाधारकांना ई-मेलद्वारे कळविले आहे. |
| ०६ | निविदा सुरू झालेची दिनांक व वेळ | दि.१४.०१.२०१९ सकाळी १०:०० वा.<br>तांत्रिक निविदा- दि.२२.०२.२०१९<br>व्यावसायीक निविदा- दि.०१.०३.२०१९ |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या | ०४ (चार) |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या | ०४ (चार) |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का ? | लागू नाही. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम अदा केली आहे का ? | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम भरलेली आहे. |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का? | लागू नाही. |
| १२ | निविदाकारांनी सादर केलेले दर – | |

मागणी (०२):

| S. N. | Description of work/Item | Qty |
|---|---|---|
| 01 | Blade Server Technical specification as per tender document Annexure B [A] | 06 |
| 02 | Blade Server Technical specification as per tender document Annexure B [B] | 04 |
| 03 | Blade Server Technical specification as per tender document Annexure B [C] | 01 |
| 04 | Blade Chassis Technical specification as per tender document Annexure B [D] | 01 |
| 05 | SAN storage Technical specification as per tender document Annexure B [E] | |
| 06 | SAN Switches Technical specification as per tender document Annexure B [F] | 02 |
| 07 | SAN Farm switches Technical specification as per tender document Annexure B [G] | 02 |
| 08 | Server Rack Technical specification as per tender document Annexure B [I] | 02 |
| 09 | Software Software details as per tender document Annexure B [H] Srno 1 to 4 | 01 |
| 10 | Apple MacBook Pro Technical specification as per tender document Annexure B [J] | 03 |
| 11 | Design Software for Apple Mac Bookpro Software details as per tender document Annexure B [K] Sr.no 1 to 4 | 01 |

निविदाकारांनी सादर केलेले दर (१२):

| अ.नं. | निविदाकाराचे नाव | सादर केलेले दर (प्रती नग रु.) | स्थिती |
|---|---|---|---|
| मुद्दा क्र.२ मागणी मध्ये नमुद अ.नं.०१ ते ०६, ०८ व ०९ यासाठी देऊ केलेले एकत्रीत दर. | | | |
| 01 | M/s Allied Digital Services Ltd. | 2,75,89,699 | L3 |
| 02 | M/s Cybernet it Pvt. Ltd., Pune | 2,39,12,994 | L1 |
| 03 | M/s Wysetek Systems Technologis | 2,64,14,540 | L2 |

| | | | |
|---|---|---|---|
| मुद्दा क्र.२ मागणी मध्ये नमुद अ.नं.०७ यासाठी देऊ केलेले दर. | | | |
| 01 | M/s Allied Digital Services Ltd. | 74,10,573 | L3 |
| 02 | M/s Gowra Bits & Bytes Pvt Ltd | 69,80,000 | L2 |
| 03 | M/s Wysetek Systems Technologis | 48,76,418 | L1 |
| मुद्दा क्र.२ मागणी मध्ये नमुद अ.नं.१० व ११ यासाठी देऊ केलेले एकत्रीत दर. | | | |
| 01 | M/s Allied Digital Services Ltd. | 14,13,974 | L2 |
| 02 | M/s Wysetek Systems Technologis | 11,77,617 | L1 |

| | | |
|---|---|---|
| १३ | यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर - निरंक | |
| १४ | मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल - निरंक | |
| १५ | सध्याची शिल्लक | निरंक |
| १६ | मागील खरेदी दर | निरंक |
| १७ | मागील पुरवठादार | निरंक |

१८ सध्याचे निम्नत्तम निविदाकाराने सादर केलेले दर

| Sr. No. | Specification of Material | Amount |
|---|---|---|
| 01 | मुद्दा क्र.२ मागणी मध्ये नमुद अ.नं.०१ ते ०६, ०८ व ०९ यासाठी देऊ केलेले एकत्रीत दर. | 2,39,12,994 |
| 02 | मुद्दा क्र.२ मागणी मध्ये नमुद अ.नं.०७ यासाठी देऊ केलेले दर. | 48,76,418 |
| 03 | मुद्दा क्र.२ मागणी मध्ये नमुद अ.नं.१० व ११ यासाठी देऊ केलेले एकत्रीत दर. | 11,77,617 |

१९ सध्याचे निम्नत्तम निविदाकाराचे नाव

| Sr. No. | Name of Bidder | Specification of Material |
|---|---|---|
| 01 | M/s Cybernet it Pvt. Ltd., Pune | मुद्दा क्र.२ मागणी मध्ये नमुद अ.नं.०१ ते ०६, ०८ व ०९ यासाठी देऊ केलेले एकत्रीत दर. |
| 02 | M/s Wysetek Systems Technologis | मुद्दा क्र.२ मागणी मध्ये नमुद अ.नं.०७ यासाठी देऊ केलेले दर. |
| 03 | | मुद्दा क्र.२ मागणी मध्ये नमुद अ.नं.१० व ११ यासाठी देऊ केलेले एकत्रीत दर. |

| | | |
|---|---|---|
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करणेत आला आहे का ? | होय |
| २१ | सदर खरेदीचा प्रकल्प खरेदी समितीसमोर सादर करणेत आल्यास उपस्थितांची नावे | मा.उपजिल्हाधिकारी सो., मा.मुख्यलेखाधिकारी तथा मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी सो., मा.प्रशासकीय अधिकारी सो., प्र.विभागप्रमुख, आयटी विभाग. |
| २२ | घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशील अंदाजे रक्कम रुपये ----प्रतिसेट मार्केट रेट रुपये ---- | |
| २३ | मागील खरेदी रु.-------------- निरंक   सध्याचे प्राप्त दर रु.----------------------   फरक रु.-----------   % ने कमी/जास्त रु.----------------- | |

२४. संक्षिप्त टिप:- "साईटेक प्रकल्प-२" अंतर्गत कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेसाठी सर्व्हर व सॉफ्टवेअर तसेच अनुषंगिक कार्यवाहीकरीता ॲपल मॅकबुक खरेदी करणेकामी प्रसिद्ध करणेत आलेल्या ई-निविदेमध्ये अ.नं.०१ ते ०९ व अ.नं.१० व ११ या साहित्यांसाठी एकत्रीत निम्तत्तम दरधारकांचा विचार करणेत येईल, असे नमुद करणेत आलेले होते. तसेच ई-निविदाप्रक्रियेअंतर्गत प्रसिद्ध करणेत आलेल्या शुद्धीपत्रकामध्ये अ.नं.०७ साठी स्वतंत्र निम्नत्तम दरधारकाचा विचार करणेत येईल, असे नमुद करणेत आलेले होते. सबब, प्राप्त झालेल्या दरांमधील अ.नं.०१ ते ०६ व ०८ ते ०९ यासाठी एकत्रीत व अ.नं.०७ तसेच अ.नं.१० + ११ यासाठी स्वतंत्र निम्तत्तम दरांचा विचार करावा लागणार आहे. त्यानुसार ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत प्राप्त झालेल्या दरामध्ये मुद्दा क्र.१२,१८ व १९ मध्ये नमुद केलेप्रमाणे मुद्दा क्र.०२ मधील अ.नं.०१ ते ०६, ०८ व ०९ या साहित्यांसाठी M/s Cybernet it Pvt. Ltd., Pune यांनी देऊ केलेल्या दराप्रमाणे येणारी एकत्रीत रक्कम रुपये

२,३९,१२,९९४/- हे निम्नत्तम आहेत. व अ.नं.०७ या साहित्यांसाठी M/s Wysetek Systems Technologis यांनी देऊ केलेले दर रक्कम रुपये ४८,७६,४१८/- हे निम्नत्तम आहेत. तसेच अ.नं.१० व ११ या साहित्यांसाठी M/s Wysetek Systems Technologis यांनी देऊ केलेल्या दराप्रमाणे येणारी एकत्रीत रक्कम रुपये ११,७७,६१७/- हे निम्तत्तम आहेत.

उपरोक्तप्रमाणे ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत प्राप्त झालेले निम्नत्तम दर व इकडील विभागाचे दि.०८ जानेवारी,२०१९ रोजीचे याकामी मंजुर टिपणीतील अंदाजीत दर यांचा तुलनात्मक तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| तपशिल | अंदाजे रक्कम | निम्नत्तम रक्कम | फरक | फरक % |
|---|---|---|---|---|
| अ.नं.०१ ते ०६ + ८ + ९ | २,२०,६८,००० | २,३९,१२,९९४ | १८,४४,९९४ | ८.३६ |
| अ.नं. ७ | २०,००,००० | ४८,७६,४१८ | २८,७६,४१८ | १४३.८२ |
| अ.नं.१० + ११ | १३,९९,८१५ | ११,७७,६१७ | -२,२२,१९८ | -१५.८७ |
| एकूण रुपये | २,५४,६७,८१५ | २,९९,६७,०२९ | ४४,९९,२१४ | १७.६७ |

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे मुद्दा क्र.०२ मधील अ.नं.०१ ते ०६, ०८ व ०९ या साहित्यांसाठी निम्नत्तम दरधारक निविदाकार M/s Cybernet it Pvt. Ltd., Pune यांना, व अ.नं.०७ तसेच अ.नं.१० व ११ या साहित्यांसाठी निम्नत्तम दरधारक निविदाकार M/s Wysetek Systems Technologis यांचेबरोबर चर्चा होऊन याकामी त्यांना पुरवठा आदेश देणेबाबत निर्णयार्थ सदरचा प्रस्ताव मा.स्थानिक उपसमितीचे सभेसमोर सविनय सादर.

उपरोक्त प्रस्तावातील अ.नं.७ San Farm Switches या साहित्यासाठी प्रस्तावात अंदाजीत एकुण रक्कम रु.२०,००,०००/- इतकी नमुद केलेली आहे. परंतु सदर साहित्यासाठी निम्नतम दर एकुण रक्कम ४८,७६,४१८/- आलेले आहे. मे.टीसीएस यांचे तंत्रज्ञ आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उपस्थित होते, उपसमितीने त्यांचेशी ई-निविदेतील वाढीव दराबाबत चर्चा केली असता त्यांनी खालील प्रमाणे स्पष्टीकरण दिले.

सदर साहित्यांची अंदाजीत रक्कम ठरवितांना या साहित्यासाठी एक वर्ष दुरुस्ती देखभाल (support) कालावधीत गृहीत धरण्यात आला होता. परंतु ई-निविदेमध्ये पाच वर्ष दुरुस्ती देखभाल (support) कालावधीची मागणी करण्यात आलेली आहे. सदर साहित्यांचे दर हे डॉलरच्या दरावर आधारीत असुन डॉलरच्या दरामध्ये झालेल्या वाढीमुळे सदर रकमेमध्ये वाढ झालेली आहे. याचबरोबर performance improvement चे दृष्टीने सदर साहित्य हे उच्च तांत्रिक क्षमतेचे मागविण्यात आलेले आहे. नमुद तांत्रिक तपशिलाचे अनुषंगाने सदर साहित्याचा दर हा सद्यस्थितीतील मार्केटमधील आहे. सदर साहित्याशिवाय अ.नं.१ ते ६ व अ.नं.८ व ९ हे साहित्य कार्यान्वीत करणे शक्य होणार नसल्याने सदर साहित्य खरेदी करणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगीतले.

प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक M/s Cybernet it Pvt. Ltd., Pune व M/s Wysetek Systems Technologis हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता M/s Cybernet it Pvt. Ltd.,Pune यांनी ई-निविदेतील नमुद दर रक्कम रु.२,३९,१२,९९४/- ऐवजी रक्कम रु.२,३२,००,०००/-मात्र दर देऊ केले.

तसेच M/s Wysetek Systems Technologis यांनी अ.नं.७ करीता ई-निविदेतील नमुद दर रक्कम रु.४८,७६,४१८/- ऐवजी रक्कम रु.४८,२६,०००/-मात्र दर देऊ केले.तसेच अ.नं.१० व ११ या साहित्यांसाठी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.

यावर सविस्तर चर्चा होऊन साईटेक प्रकल्प-२ अंतर्गत सर्व्हर व सॉफ्टवेअर तसेच ॲपल मॅकबुक खरेदी करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील उपरोक्त प्रस्तावात नमुद अ.नं.१ ते ६, अ.नं.०८ व ०९ या साहित्यांसाठीचे निम्नतम निविदाधारक M/s Cybernet it Pvt. Ltd.,Pune यांनी चर्चेअंती देऊ केलेले रक्कम रु.२,३२,००,०००/-मात्र अंतिम दर स्विकारणेत येऊन, तसेच M/s Wysetek Systems Technologis यांनी अ.नं.७ या साहित्याकरीता दिलेल्या दराबाबत मे.टीसीएस यांनी दिलेले स्पष्टीकरण विचारात घेण्यात येऊन M/s Wysetek Systems Technologis यांनी चर्चेअंती देऊ केलेले रक्कम रु.४८,२६,०००/- मात्र अंतिम दर व अ.नं.१० व ११ या साहित्यांकरीता रक्कम रु.११,७७,६१७/-मात्र दर स्विकारणेत येऊन, मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६.०२.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१६९ अन्वये त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग)

---

**२ सन २०१९ चे साईलिला व्दैमासिके मराठी, हिंन्दी-इंग्रजी छपाई करणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदेतील प्राप्त न्युनत्तम दर निश्चीती बाबत.**

श्री साईबाबा संस्थानचे प्रकाशने विभागामार्फत श्री साईलिला द्वैमासिकमराठी व हिंदी-इंग्रजी छपाई करून साईभक्तांना वितरीत करणेकामी विहित पध्दतीने दर मागणी करणेसाठी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रीया राबविणेत आलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी / छपाई करावयाचे साहित्य / वस्तूचा तपशिल | अ.नं.१२ मध्ये नमुद केलेप्रमाणे |
| ०२ | मागणी | अ.नं.१२ मध्ये नमुद केलेप्रमाणे |
| ०३ | ई-निविदा प्रसिध्दी | दि.०२.०२.२०१९ ते १२.०२.२०१९ |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसूचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते? | www.mahatenders.gov.in , संस्थान वेबसाईट व प्रेसधारकांना दुरध्वनीद्वारे |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले | -- |
| ०६ | निविदा सुरू झालेची दिनांक व वेळ | दि.०२.०२.२०१९<br>टेक्नीकल बीड- दि.२२.०२.२०१९<br>कमर्शियल बीड- दि.०१/०३/२०१९ |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या | ०५ |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या | ०५ |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | नमुने मागविलेले नाहीत. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम अदा केली आहे का | होय . |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का | नमुने मागविलेले नाहीत. |

१२ निविदाकारांनी सादर केलेले दर-

| अं.नं. | तपशिल | छपाई संख्या | मे.मधुरा प्रिन्ट प्रा.लि.अंबड, नाशिक | मे.मिरर प्रिंन्टर्स कोल्हापूर | मे.प्रिन्ट प्लस प्रा.लि.मुंबई | मे.सॅप प्रिन्ट सोलूशन प्रा.लि. मुंबई | मे.टॅको व्हिजन प्रा.लि., मुंबई |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईलिला द्वैमासिके – मराठी ३२ +४ = ३६ पाने ०४ अंक -२०१९ | ३०,००० | १६.०५ | २२.५० | १६.१५ | १९.६८ | १७.५० |
| ०२ | श्री साईलिला द्वैमासिके – हिंदी-इंग्रजी ३२ +४ = ३६ पाने ०४ अंक -२०१९ | ६२,००० | १४.७४ | १९.७५ | १५.५४ | १६.८० | १६.२५ |
| ०३ | श्री साईलिला द्वैमासिके – मराठी ६४ +४ = ६८ पाने ०१ अंक -२०१९ | ७,५०० | २७.५० | ३७.५० | २८.३० | ३५.१० | ३०.५५ |
| ०४ | श्री साईलिला द्वैमासिके – हिंदी-इंग्रजी ६४ +४ = ६८ पाने ०१ अंक -२०१९ | १५,५०० | २५.४८ | ३३.५० | २७.१९ | २९.७० | २८.४० |

१३ यापूर्वी केलेल्या खरेदीचा तपशिल आणि खरेदी दर-

| अ.नं. | वर्ष | परिमाण | दर प्रती नग रू. |
|---|---|---|---|
| अ.नं.२३ मध्ये नमूद केलेप्रमाणे. | | | |

१४ मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल-

| अ.नं. | वर्ष | खर्च परिमाण |
|---|---|---|
| -- | -- | ---- |

| | | |
|---|---|---|
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | ---- |
| १६ | मागील खरेदी दर | अ.नं.२३ मध्ये नमूद केलेप्रमाणे |
| १७ | मागील पुरवठादार | मे.टॅको व्हिजन प्रा.लि.मुंबई |
| १८ | सध्याचे न्युनत्तम निविदाकाराने सादर केलेले दर | वरील अ.नं.१२ प्रमाणे |
| १९ | सध्याचे न्युनत्तम निविदाकाराचे नांव | वरील अ.नं.१२ प्रमाणे |

| | | |
|---|---|---|
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का. | होय |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नांवे | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>मा.उप जिल्हाधिकारी,<br>मा.मुख्य लेखाधिकारी तथा उप कार्यकारी अधिकारी,<br>मा.प्रशासकीय अधिकारी,<br>प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग |
| २२ | घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशिल अंदाजे रू प्रती -/----. | |

२३

| अ.नं. | तपशिल | मागील वर्षीचे खरेदी दर | सध्याचे प्राप्त दर | फरक | % ने कमी/जास्त |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री साईलिला द्वैमासिके – मराठी ०४ अंक -२०१९ | १३.०४ | १६.०५ | ३.०१ | २३.०८ ने जास्त |
| | श्री साईलिला द्वैमासिके – हिंदी-इंग्रजी ०४ अंक - २०१९ | ११.६४ | १४.७४ | ३.१० | २६.६३ ने जास्त |
| | श्री साईलिला द्वैमासिके – मराठी ०४ अंक -२०१९ | २१.७७ | २७.५० | ५.७३ | २६.३२ ने जास्त |
| २ | श्री साईलिला द्वैमासिके – हिंदी-इंग्रजी ०४ अंक - २०१९ | २०.१५ | २५.४८ | ५.३३ | २६.४५ ने जास्त |

| | |
|---|---|
| २४ | सदर खरेदीसाठी विभागाने निश्चित केलेला अंदाजे खर्च रू..२६,९१,०००/- |

प्रस्ताव- प्राप्त असलेल्या पाच निविदाधारकापैंकी अ.नं.१२ मध्ये नमूद केलेप्रमाणे Item wise न्युनतम दर असलेल्या निविदाधारकांबरोबर चर्चा वाटाघाटी होणेस तसेच मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे आता ७० GSM ऐवजी ९० GSM ची छपाई करत असल्यामुळे साईलिला अंकाची दर्शनी मूल्य ( पूर्वीचे दर्शनी मूल्य रू.८/- ) निश्चित करणेसाठी सदर विषय मा.उपसमितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे.मथुरा प्रिन्ट प्रा.लि.अंबड, नाशिक हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता, त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१९ चे साईलिला व्दैमासिके मराठी, हिंन्दी-इंग्रजी छपाई करणेकामी निम्नतम निविदाधारक मे.मथुरा प्रिन्ट प्रा.लि.अंबड, नाशिक यांचे खालील प्रमाणे निम्नतम दर स्विकारणेत येऊन मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६.०२.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१६९ अन्वये त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

| अ.नं. | तपशिल | छपाई संख्या | दर |
|---|---|---|---|
| **०१** | **श्री साईलिला द्वैमासिके – मराठी<br>३२ +४ = ३६ पाने ०४ अंक -२०१९** | **३०,०००** | **१६.०५** |
| **०२** | **श्री साईलिला द्वैमासिके –हिंदी-इंग्रजी<br>३२ +४ = ३६ पाने ०४ अंक -२०१९** | **६२,०००** | **१४.७४** |
| **०३** | **श्री साईलिला द्वैमासिके – मराठी<br>६४ +४ = ६८ पाने ०१ अंक -२०१९** | **७,५००** | **२७.५०** |
| **०४** | **श्री साईलिला द्वैमासिके –हिंदी-इंग्रजी<br>६४ +४ = ६८ पाने ०१ अंक -२०१९** | **१५,५००** | **२५.४८** |

**(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

**३ श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे काम आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेबाबत.**

प्रस्ताविक- दि.०८ जानेवारी २०१९ रोजीच्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील आयत्या वेळेचा विषय क्र.१६ व निर्णय नं.३१ नुसार श्री साईबाबा हॉसिपटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये यांत्रिकीकरणासह स्वच्छता हाऊसकिपींग कामाकरीता केमिकल साहित्य/ सामुग्रीसह एक वर्ष कालावधीकरीता विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.२,७६,००,०००/-(अक्षरी - दोन कोटी शहात्तर लाख रु.मात्र)मात्रचे खर्चास मान्यता मिळून ई-निविदा मागविणेस मान्यता मिळालेली आहे.

उपरोक्त निर्णयानुसार सन २०१९-२० या एका वर्षाकरीता नविन ई-निवदा प्रक्रिया राबविणेकामी वर्तमानपत्रात ई-निविदा सुचना जाहिरात जनसंपर्क विभागामार्फत प्रसिध्द करणेत आली. तसेच महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in व संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन ई-निविदा अपलोड करणेत आली. ई-निविदा दाखल करण्यासाठी दि.३० जानेवारी २०१९ ते दि.१९ फेब्रुवारी २०१९ रोजी सायं.०५.०० वाजेपर्यंत मुदत ठेवण्यात आलेली होती. तसेच दि.०४ फेब्रुवारी २०१९ रोजी प्रि-बीड मिटींग घेण्यात आली.प्रि-बीड मिटींगमध्ये विविध निविदाधारकांनी उपस्थित केलेल्या शंकाबाबत दि.११ फेब्रुवारी २०१९ रोजी www.mahatenders.gov.inया संकेतस्थळावर निरसण करण्यात आले.

सदर ऑनलाईन ई-निविदा प्रक्रियेमध्ये मुदतीत ०३ निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या. ऑनलाईन प्राप्त झालेल्या ०३ निविदांचे तांत्रिक ई-निविदा दि.२२ फेब्रुवारी२०१९ रोजीच्या मा.खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडून घेण्यात आलेल्या आहेत. निविदाधारकांनी अपलोड केलेल्या कागदपत्रांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन लेखाशाखा विभागाकडून तपासून घेण्यात आलेला असून त्यामधील पात्र निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ.नं | निविदाधारकांचे नाव | मिळालेले गुण | पात्र/अपात्र |
|---|---|---|---|
| १ | मे.बि.व्ही.जी. इंडीया लि., पुणे | १०० | पात्र |
| २ | मे.स्पिक एन स्पॅन सर्व्हीसेस, मुंबई | ९५ | पात्र |
| ३ | फोकस फॅसीलीटी व सेक्युरीटी सर्व्हीसेस, मुंबई | ७० | पात्र |

उपरोक्त पात्र तीनही निविदाधारकांचे मा. उपसमिती सभेसमोर वाणिज्य बीड (Financial Bid) समक्ष उघडणेस मान्यता मिळून निम्नतम दरधारकाबरोबर चर्चा वाटाघाटी करुन निर्णय होणे कामीचा विषय मा. उपसमिती सभेसमोर सादर.

**श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे काम आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी प्राप्त झालेल्या तीन वाणिज्यीक ई-निविदा आजचे स्थानिक उपसमितीसमोर उघडण्यात आल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे-**

| अ. नं | निविदा धारकांचे नाव | GST वगळून वार्षिक दर | १८%GST | GST सह वार्षिक दर | स्थिती |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे.बि.व्ही.जी. इंडीया लि., पुणे | ३,२०,२८,०००/- | ५७,६५,०४०/- | ३,७७,९३,०४०/- | L3 |
| २ | मे.स्पिक एन स्पॅन सर्व्हीसेस, मुंबई | २,३५,२३,९३१/- | ४२,३४,३०८/- | २,७७,५८,२३९/- | L2 |
| ३ | फोकस फॅसीलीटी व सेक्युरीटी सर्व्हीसेस, मुंबई | १,९६,६१,५०८/- | ३५,३९,०७६/- | २,३२,००,५८४/- | L1 |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे काम आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक फोकस फॅसीलीटी व सिक्युरीटी सर्व्हीसेस, मुंबई यांचे निम्नतम दर रक्कम रु.२,३२,००,५८४/- मात्र स्विकारणेत येऊन मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६.०२.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१६९ अन्वये त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.०३** **श्री साईबाबा संस्थान विश्वसतव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार स्थानिक उपसमिती गठीत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, अधिनियम-२००४, (२००४, चा महा.१४) कलम ५, मधील पोटकलम (१) आणि त्यासोबत पोटकलम (२) अन्वये व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, (व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची नियुक्ती आणि प्रतिज्ञापत्राचे नमुने) नियम-२०१३, मधील तरतूदीनुसार राज्य शासनाच्या विधी व न्याय विभागाचे, दि.२८ जुलै, २०१६, रोजीचे अधिसूचनेनुसार, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती गठीत करणेत आलेली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे अधिनियम-२००४ मधील कलम १७, पोट-कलम (२), खंड (आय) आणि (जे) अन्वये व्यवस्थापन समिती, उपसमितीचे गठण करील, अशी तरतूद आहे. त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१६ ऑगष्ट,२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५६५ अन्वये खालील प्रमाणे मा.सदस्यांची स्थानिक उपसमिती गठीत करण्यात आलेली आहे.

(१) मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, अध्यक्ष, स्थानिक उपसमिती सभा
(२) मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य
(३) मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य
(४) मा.श्री.प्रताप सखाहारी भोसले, सदस्य
(५) मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य

तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९.०३.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२१९ अन्वये मा.सौ.योगिता अभय शेळकेपाटील यांचा व दि.०१.०६.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४०५ अन्वये मा.ॲड मोहन मोतीराम जयकर यांचा स्थानिक उपसमिती सदस्य म्हणून समावेश करण्यात आलेला आहे.

मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य यांनी दि.१०.०७.२०१७ रोजीचे पत्रान्वये सदस्य पदाचा राजीनामा दिलेला असुन सदर राजीनामा स्विकृत केला असल्याचे महाराष्ट्र शासन,विधी व न्याय विभाग यांनी क्र.सासंवि-१०१७/११३२/ प्र.क्र.१२१/का.१६, दि.१०.०७.२०१७ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

मा.श्री.प्रताप सखाहारी भोसले, सदस्य यांनी दि.१३.०८.२०१८ रोजीचे पत्रान्वये सदस्य पदाचा राजीनामा दिलेला असुन सदर राजीनामा स्विकृत केला असल्याचे महाराष्ट्र शासन,विधी व न्याय विभाग यांनी क्र.सासंवि-१०१८/८४ व्हीआयपी/ प्र.क्र.१३९/का.१६, दि.२५.०९.२०१८ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

तसेच मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष यांनी संस्थानचे उपाध्यक्ष पदाचा राजीनामा दिलेला असुन सदर राजीनामा स्विकृत केला असल्याचे महाराष्ट्र शासन,विधी व न्याय विभाग यांनी क्र.सासंवि-१०१६/ प्रक१४५/का.१६, दि.०७.०३.२०१९ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१६ ऑगष्ट,२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५६५ अन्वये गठीत करण्यात आलेल्या स्थानिक उपसमिती सभेचे अध्यक्ष मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, सदस्य मा.श्री.सचिन भागवत तांबे व मा.श्री.प्रताप सखाहारी भोसले यांनी पदाचा राजीनामा दिलेला असल्याने पुन्हा नव्याने मा.स्थानिक उपसमिती गठीत करणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१७५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम-२००४ मधील तरतूदी अन्वये खालीलप्रमाणे स्थानिक उपसमितीचे गठण करणेत आले.**

**स्थानिक उपसमिती सभा-**

**१. मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे, अध्यक्ष, स्थानिक उपसमिती सभा**
**२. मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य**
**३. मा.ॲड मोहन मोतीराम जयकर, सदस्य**
**४. मा.सौ.योगिता अभय शेळकेपाटील,सदस्या.**

**(कार्यवाही- सभाकामकाज विभाग)**

---

**विषय नं.०४** **आर्थिक वर्ष २००९-२०१० चे MVAT अपिल दाखल करण्यास व त्याकरीता देय होणारी १० टक्के व्हॅट कर रक्कम रु.७६,११,२९२/- भरण्यास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** विक्रीकर कार्यालय, अहमदनगर यांचेकडुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे आर्थिक वर्ष २००९-१० चे व्हॅट करनिर्धारण करण्यात येऊन दि.०३.०७.२०१८ रोजी रु.२२.८३ कोटी व्हॅट कर देय असलेबाबत आदेश आला आहे. सदर कर भरणेबाबत त्यांचेकडुन वेळोवेळी पत्रव्यवहार होत असुन

दि.२८.११.२०१८ रोजी १० दिवसांचे आत व्हॅटकराची रक्कम जमा करणे बाबत कळविले आहे. व्हॅट करातून सुट मिळणेबाबत आवश्यक ते प्रयत्न संस्थानकडुन करण्यात आले असुन अंतिमतः व्हॅट करातुन सुट मिळत नसलेबाबत स्पष्ट झाले आहे.

बाबत खालीलप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये प्रस्ताव संमत झाले आहेत.

१) मा.व्य.स.निर्णय क्र.२५०/दि.०४.०४.२०१८ अन्वये विक्रीकर विभागाच्या नोटीसीचे अवलोकन करण्यात येऊन त्याची नोंद घेण्यात आली. यासंदर्भात आवश्यक कायदेशिर कार्यवाही पुर्ण करण्यासाठी सध्याचे वकीलांव्यतिरिक्त इतर वकील व सनदी लेखापाल यांची कायदेतज्ञ समिती सदस्य अॅड.मोहन जयकर यांचे मार्गदर्शनाखाली आवश्यकतेनुसार नियुक्ती करणे व त्यासाठी येणा-या अनुषंगीक खर्चास मान्यता मिळाली आहे.

२) मा.व्य.स.निर्णय क्र.४७७/दि.२६.०७.२०१८ अन्वये व्हॅट बाबत सद्यस्थितीचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

३) मा.व्य.स.निर्णय क्र.७७६/दि.१३.१२.२०१८ अन्वये सद्यस्थितीचे अवलोकन करण्यात आले. त्यामध्ये मा.उपायुक्त, विक्रीकर विभाग यांचेकडे अपिल दाखल करणेबाबत विचाराधिन असल्याचे नमुद केले होते. यावर "व्हॅटकर कामकाजाबाबतचे सद्यस्थितीचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली."

४) मा.व्य.स.निर्णय क्र.५८/दि.३०.०१.२०१९ अन्वये, प्रस्तुत प्रकरणी विक्रीकर अधिकारी, अहमदनगर यांचेकडील सन २००९-१० चे व्हॅट करनिर्धारणा विरुद्ध मा.उच्च न्यायालय, मुंबई , खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका दाखल करण्यात आली आहे. त्यामुळे विक्रीकर अधिका-यांच्या उपरोक्त आदेशाविरुद्ध तुर्त अपिल दाखल करण्याची आवश्यकता नाही, असे समिती सदस्य मा.अॅड.मोहन जयकर यांनी सांगितले. यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणात तुर्त अपिल दाखल करु नये, असे ठरले.

तथापि, मा.विश्वस्त श्री.मोहन जयकर यांनी सदर बाबत सखोल माहिती घेऊन दि.११.०२.२०१९ रोजी MVATAppeal सह 1) Application for Condonation of Delay 2) Stay Application 3) Waiver Application 4) Relevant Forms मा.उपायुक्त, विक्रीकर विभाग, अहमदनगर व मा.सह आयुक्त, विक्रीकर विभाग, नाशिक यांचेकडे लवकरात लवकर दाखल करण्यास सुचविले आहे. त्यास अनुसरुन दि.१३.०२.२०१९ रोजी MVAT Appeal व अनुषंगीक आवश्यक अर्ज मा.उपायुक्त, विक्रीकर विभाग, अहमदनगर यांचेकडे दाखल करण्यात आले आहेत.

मा.उपायुक्त विक्रीकर विभाग, अहमदनगर यांनी Sr.No.DC/GST (Adm)/Part Payment/2018-19/B-1259 A.Nagar, Dtd.18.03.2019अन्वये व्हॅट अपिल दाखल करण्याकरीता मुळ व्हॅट कराच्या १०% रक्कम चलनाद्वारे भरल्यानंतर अपिल अर्ज दाखल होईल व त्यानंतर देय व्हॅट कराला स्थगिती येऊन अपिल कार्यवाही सुरु होईल असे कळविले आहे. त्यास अनुसरुन दि.२५.०३.२०१९ रोजी १०% रक्कम भरुन अपिल कार्यवाही सुरु करण्यास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव ठेवला होता. त्यावर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनीविषय मा.व्यवस्थापन समितीसमोर ठेवावा असे निर्देश दिले आहेत. तथापि, आचार संहितेमुळे मा.व्यवस्थापन समितीच्या सभेचे नियोजन नसल्याने दि.०१.०४.२०१९ रोजी मा.आयुक्त, राज्य कर, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना आचार संहिता संपताच येणा-या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत देय होणारी १०% रक्कम रु.७६,११,२९२/- भरण्यास मान्यता घेण्यात येऊन कार्यवाही करण्यात येईल. तोपर्यंत वसुलीबाबत कारवाई करु नये असे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वाक्षरीने अर्धशासकीय पत्राद्वारे दि.०५.०४.२०१९ रोजी कळविण्यात आले आहे.

तरी अपिलाबाबत खालीलप्रमाणे :-

१) आर्थिक वर्ष २००९-१० चे अपिल कार्यवाहीकरिता देय होणारी १०% व्हॅट कर रक्कम रु.७६,११,२९२/- चलनाद्वारे भरण्यास.

२) मा.व्य.स. निर्णय क्र.२५०/ दि.०४.०४.२०१८ अन्वये सनदी लेखापाल संस्थेचे नांव घेऊन त्यांना सदर कामकाज करणेकरिता नियुक्ती आदेश देणे.

३) तज्ञ कर सल्लागार, लेखापरिक्षण संस्था, विधिज्ञ यांना व्हॅट नोंदणी क्रमांक घेऊन नोंदणीकृत विक्रेता म्हणुन संस्थानची व्हॅट करनिर्धारणे करणे, देय व्हॅट कराकरिता नव्याने सुरु झालेली Amnesty Scheme मध्ये असलेल्या सवलती याबाबत सल्ला घेणे.

उपरोक्तप्रमाणे प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१७६** **विक्रीकर विभागाचे मा.अतिरिक्त आयुक्त, मा.सह आयुक्त व विक्रीकर अधिकारी हे आजचे व्यवस्थापन समितीसमोर उपस्थित होते. समितीने त्यांचेकडून शासनाने जाहिर केलेल्या Amnesty Scheme संबधी सविस्तर माहिती घेतली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरचा प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात येऊन समिती सदस्य मा.ॲड मोहन जयकर यांचे मार्गदर्शन घेऊन सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे पुढील सभेमध्ये सादर करावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- लेखाशाखा )**

---

**विषय नं.०५** **आर्थिक वर्ष २०१०-२०११ चे रक्कम रु.२१,००,२८,८८४/- व्हॅट करनिर्धारण आदेशाविरुध्द अपिल अर्ज दाखल करण्यास व त्याकरीता देय होणारी मुळ व्हॅट कराच्या १० टक्के रक्कम रु.७०,००,९६३/- भरण्यास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** विक्रीकर कार्यालय, अहमदनगर यांचेकडुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे आर्थिक वर्ष २०१०-११ चे व्हॅट करनिर्धारण करण्यात येऊन दि.२५.०३.२०१९ रोजी रु.२१,००,२८,८८४/- *(व्हॅट रु.७ कोटी + दंड व्याज रु.७ कोटी + दंड रु.७ कोटी)*व्हॅट कर नोटीस मिळालेपासुन ३० दिवसांचे आत जमा करणेबाबत आदेश झाला आहे. सदर नोटीस संस्थानला दि.२८.०३.२०१९ रोजी प्राप्त झाली आहे.

अशाचप्रकारे आर्थिक वर्ष २००९-१० चे व्हॅट करनिर्धारण करुन रु.२४ कोटी व्हॅट कर भरणेबाबत नोटीस प्राप्त झाली होती. मा.व्य.स. निर्णय क्र.२५०/दि.०४.०४.२०१८ अन्वये "सदर आदेशाची नोंद घेण्यात येऊन कायदेशीर कार्यवाही पुर्ण करण्यासाठी सध्याचे वकीलांव्यतिरिक्त इतर वकील व सनदी लेखापाल यांची कायदेतज्ञ समिती सदस्य मा.ॲड.मोहन जयकर यांचे मार्गदर्शनाखाली आवश्यकतेनुसार नियुक्ती करणे व त्यासाठी येणा-या अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात आली आहे." त्यास अनुसरुन मा.विश्वस्त श्री.जयकर यांचे मार्गदर्शनाने मे.जुन्नरकर ॲण्ड असोसिएटस्, मुंबई यांनी अपिल संबंधीत कागदपत्रांची पुर्तता करुन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वाक्षरीने दि.१३.०२.२०१९ रोजी मा.उपायुक्त, विक्रीकर विभाग, अहमदनगर व मा.सह आयुक्त, विक्रीकर विभाग, नाशिक यांचेकडे अपिल अर्ज दाखल केला आहे. अपिल कार्यवाही सुरु करण्याकरिता देय होणारी मुळ व्हॅट कराच्या १०% रक्कम रु.७६,११,२९२/- भरण्यास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०.०१.२०१९ रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता. यावर व्हॅट करनिर्धारणा विरुद्ध न्यायालयात रिट याचिका दाखल असल्यामुळे तुर्त अपिल दाखल करण्याची आवश्यकता नाही असा निर्णय संमत झाला होता. तथापि, तद्नंतर मा.विश्वस्त श्री.मोहन जयकर यांनी अपिल अर्ज दाखल करणेबाबत कळविल्यानंतर अपिल दाखल करण्यात आले असुन देय होणा-या १०% रक्कमेबाबत आचार संहिता लागु झाल्याने त्यानंतरच्या पहिल्या सभेत मान्यता घेण्यात येऊन कार्यवाही करण्यात येईल. तोपर्यंत व्हॅट कर वसुलीबाबत कार्यवाही करु नये असे अर्धशासकीय पत्र मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वाक्षरीने मा.आयुक्त, विक्रीकर विभाग, महाराष्ट्र राज्य यांना तयार केले आहे.

आर्थिक वर्ष २०१०-११ चे विक्रीकर विभाग, अहमदनगर यांनी व्हॅट करनिर्धारण करुन रु.२१,००,२८,८८४/- व्हॅट कर ३० दिवसांचे आत भरणेबाबत दि.२५.०३.२०१९ रोजी नोटीस दिली आहे. मा.विश्वस्त श्री.जयकर यांचे मार्गदर्शनाने संस्थान कर सल्लागार, विधिज्ञ, लेखापरिक्षक यांचेमार्फत विहीत पद्धतीने मा.उपायुक्त, विक्रीकर विभाग, अहमदनगर यांचेकडे अर्ज दाखल करण्यात येईल. अपिल अर्ज दाखल करण्याकरिता मुळ व्हॅट कराच्या १०% रक्कम रु.७०,००,९६३/- भरणे आवश्यक आहे. तथापि, आचार संहिता लागु असल्याने तुर्त मा.व्यवस्थापन समिती सभा होणार नाही व व्हॅट कर भरण्याची अंतिम मुदत दि.२७.०४.२०१९ रोजी संपणार आहे. बाबत खालीलप्रमाणे :-

१. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वाक्षरीने मा.आयुक्त, राज्य कर, महाराष्ट्र राज्य यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता मिळेपर्यंत व्हॅट कर वसुलीबाबत एकतर्फी कार्यवाही करु नये असे कळविण्यास.

२. आर्थिक वर्ष २०१०-११ चे विक्रीकर विभाग, अहमदनगर यांनी अनोंदीत विक्रेता म्हणुनव्हॅट करनिर्धारण करुन दि.२५.०३.२०१९ रोजी दिलेल्या नोटीसचे विरोधात मा.उपायुक्त, विक्रीकर विभाग, अहमदनगर यांचेकडे मागील वर्षाचे अपिल कार्यपद्धतीप्रमाणे अपिल अर्ज दाखल करणे.

३. अपिल कामकाज करण्याकरिता मा.विश्वस्त श्री.मोहन जयकर यांचेकडुन मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय क्र.२५०/दि.०४.०४.२०१८ अन्वये सनदी लेखापाल संस्थेचे नांव घेऊन त्यांना सदर कामकाज करणेकरिता नियुक्ती आदेश देणे.

४. व्हॅट नोंदणी क्रमांक घेऊन नोंदणीकृत विक्रेता म्हणुन व्हॅट करनिर्धारणे करणेबाबत म्हणजे विक्री व्यवहारांवर लागु होत असलेला व्हॅट कर संस्थानचे खरेदी व्यवहारांवर आदा करण्यात आलेल्या व्हॅट कराशी ताळमेळ घालुन देय होणारी व्हॅट कर रक्कम कमी होईल व विक्रीकर विभागाने नव्याने सुरु केलेल्या Amnesty Scheme मध्ये देय व्हॅट कर, त्यावरील व्याज व दंड यामध्ये सवलतीची तरतुद आहे. बाबत तज्ञ कर सल्लागार, विधिज्ञ यांचेकडे सदर बाबत लेखी स्वरुपात मार्गदर्शन मागवुन मा.सह आयुक्त, विक्रीकर विभाग, नाशिक यांचेकडे करनिर्धारणे करणेबाबत सल्ला घेणे.

तरी आर्थिक वर्ष २०१०-११ चे दि.२५.०३.२०१९ रोजीचे रु.२१,००,२८,८८४ /-व्हॅट कर सदर नोटीस मिळालेपासुन ३० दिवसांचे आत भरणेबाबत व व्हॅट करनिर्धारणांबाबत उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१७७ **विक्रीकर विभागाचे मा.अतिरिक्त आयुक्त, मा.सह आयुक्त व विक्रीकर अधिकारी हे आजचे व्यवस्थापन समितीसमोर उपस्थित होते. समितीने त्यांचेकडून शासनाने जाहिर केलेल्या Amnesty Scheme संबधी सविस्तर माहिती घेतली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरचा प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात येऊन समिती सदस्य मा.ॲड मोहन जयकर यांचे मार्गदर्शन घेऊन सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे पुढील सभेमध्ये सादर करावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.०६ आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये केलेल्या गुंतवणूकीचा अहवाल व आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये कमाल व्याजदर देणाऱ्या राष्ट्रीयकृत बँकामध्ये १ वर्षाच्या मुदतठेवीच्या स्वरुपात गुंतवणूकीस मान्यता मिळणेकामी सादर.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), अधिनियम २००४ कलम २०(३) अन्वये विश्वस्तव्यवस्था निधीच्या मालकीचा सर्व पैसाव इतर मौल्यवान वस्तू केवळ राष्ट्रीयीकृत बॅंकेत किंवा बॅंकामध्ये ठेव म्हणून ठेवण्यात येतील किंवा जमा करण्यात येतील किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम १९५० च्या कलम २ च्या खंड (१२) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे सार्वजनिक रोख्यामध्ये गुंतविण्यात येतील,अशी तरतूद आहे.

मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्रमांक ९५२ दिनांक०६.११.२०१४ अन्वये बचत खाते असलेल्या राष्ट्रीयकृत बॅंकांची आर्थिक स्थिती विचारात घेऊन, त्यांचेकडून, त्यांचेकडून व्याजदर मागवून, जास्तीत जास्त व्याजदर देणा-या बॅंकांकडे टप्प्याटप्प्याने गुंतवणूक करण्यास मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेऊन गुंतवणूक करावी व त्याचा वार्षिक अहवाल आर्थिक वर्षाच्या शेवटी मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर सादर करण्यात यावा, असा निर्णय संमत झाला आहे.

त्यास अनुसरुन राष्ट्रीयकृत बॅंकांची आर्थिक स्थिती पाहून केलेल्या गुंतवणूकीची मुदतपूर्ती झाल्यानंतर, उपलब्ध होणारा निधीव बचत खात्यामध्ये दैनंदिन खर्च वजा जाता उपलब्ध होणारी रक्कम यांची विहीत पद्धतीने संस्थानचे बचत खाते असलेल्या राष्ट्रीयकृत बॅंकांमध्ये मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने गुंतवणूक करण्यात आली आहे.

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात, म्हणजेच दिनांक ३१ मार्च २०१९ अखेर केलेल्या गुंतवणूकीचा अहवाल पुढीलप्रमाणे -

| अ.नं. | बॅंकेचे नाव | दि.३१ मार्च २०१९ अखेर असलेली गुंतवणूक |
|---|---|---|
| १ | आंध्रा बॅंक, शिर्डी | १,९७,३७,००,०००/- |
| २ | बॅंक ऑफ बडोदा, नाशिक | ९२,००,००,०००/- |
| ३ | सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया, शिर्डी | १८,३२,९३५/- |
| ४ | कॉर्पोरेशन बॅंक, शिर्डी | ६९,००,००,०००/- |
| ५ | देना बॅंक, शिर्डी | ४५,००,००,०००/- |
| ६ | इंडियन बॅंक, शिर्डी | ३५,००,००,०००/- |
| ७ | ओरिएंटल बॅंक ऑफ कॉमर्स, शिर्डी | २,८०,००,००,०००/- |
| ८ | पंजाब नॅशनल बॅंक, शिर्डी | २,३९,००,००,०००/- |
| ९ | स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शिर्डी | ५०,१५,००,०००/- |
| १० | सिंडीकेट बॅंक, शिर्डी | १,७४,००,००,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ११ | युनियन बँक ऑफ इंडिया, शिर्डी | १,८२,०७,००,०००/- |
| १२ | विजया बँक, शिर्डी | ८,७४,००,००,०००/- |
| | एकुण | २२,३७,७७,३२,९३५/- |

उपरोक्त तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये संस्थानचे बचत खाते असलेल्या राष्ट्रियकृत बँकाकडून व्याजदर मागवून उच्चतम दराने दिनांक ३१ मार्च २०१९ अखेर एकुण रक्कम रु.२२,३७,७७,३२,९३५/- मात्रची गुंतवणूक करण्यात आलेली आहे.

आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये केलेल्या गुंतवणूकीचा वार्षिक अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ व आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये मुदतपूर्ती होणा-या व बचत खात्यात दैनंदिन खर्च वजा जाता, गुंतवणूकीसाठी उपलब्ध होणा-या रकमेची, विहीत पद्धतीने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने राष्ट्रीयकृत बॅंकांकडून वेळोवेळी तुलनात्मक व्याजदर मागवून जी बॅंक जास्तीत जास्त व्याजदर देईल, त्या बॅंकेत गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी सविनय सादर.

निर्णय क्र.१७८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात संस्थानचे बचत खाते असलेल्या राष्ट्रियकृत बँकामध्ये दिनांक ३१ मार्च २०१९ अखेर करण्यात आलेली गुंतवणूक एकुण रक्कम रु.२२,३७,७७,३२,९३५/- मात्रचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली. तसेच आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये मुदतपूर्ती होणा-या व बचत खात्यात दैनंदिन खर्च वजा जाता, गुंतवणूकीसाठी उपलब्ध होणा-या रकमेची, विहीत पद्धतीने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने राष्ट्रीयकृत बँकाकडून वेळोवेळी तुलनात्मक व्याजदर मागवून जी बँक जास्तीत जास्त व्याजदर देईल, त्या बँकेत गुंतवणूक करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.०७ आयकर व जीएसटी कामकाजाकरीता विहीत पध्दतीने कर सल्लागार यांची नेमणूक करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानमध्ये दैनंदिन कामकाजाचा व्याप दिवसेंदिवस वाढत आहे. त्या अनुषंगाने आर्थिक व्यवहारात व कामकाजातही मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. तसेच आर्थिक व्यवहारांसंबंधीत केंद्र व राज्य शासनाकडुन वेळोवेळी विविध आर्थिक, आयकर, जीएसटीइ. विषयक कायदे पारित होतात.या कायद्यांतील अद्यायवत तरतुदींचा प्रभाव संस्थानचे दैनंदिन आर्थिक कामकाजावर पडत असतो. वैधानिक लेखापरिक्षणामध्ये आक्षेपांचे प्रमाण कमी होण्याच्या दृष्टीने व आर्थिक व्यवहारांत पारदर्शकता येऊन वेळीच त्यांच्यात सुधारणा करुन तात्काळ कार्यवाही करण्यासाठी व अंतर्गत नियंत्रण सक्षम राहण्याच्या दृष्टीने आयकर सल्लागार, जीएसटी कर सल्लागार यांच्या नेमणुका करण्यात येतात.

अशाप्रकारे मा.व्यवस्थापन समिती सभा निर्णय क्र.४६९/दि.१५.०६.२०१७ अन्वये मे.एस.जी.अंदाणी ॲन्ड कं. चार्टर्ड अकौंटंटस् अहमदनगर यांची वार्षिक रु.२,००,०००/- अधिक सेवाकर इतक्या फी वर आयकर सल्लागार म्हणुन दि.०१.०८.२०१७ ते दि.३१.०७.२०१८ व दि.०१.०८.२०१८ ते दि.३१.०७.२०१९ या कालावधी करिता मुदतवाढ देण्यात आली होती. तसेच मा.व्य.स.निर्णय क्र.२२५/दि.०४.०४.२०१८ अन्वये मे.एस.जी.अंदाणी ॲन्ड कं.चार्टर्ड अकौंटंटस् अहमदनगर यांची वार्षिक एकत्रित रु.३,००,०००/- फी वर दि.०१.०४.२०१८ ते दि.३१.०३.२०१९ या कालावधी करिता जीएसटी कर सल्लागार म्हणुन नियुक्ती करण्यात आली होती.

आदर्श आचारसंहिता लागु असल्याने नविन जीएसटी कर सल्लागार नेमणुकीची कार्यवाही स्थगित ठेवण्यात आल्यामुळे मा.कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने त्यांना पुढील तीन महिने कालावधीसाठी दि.०१.०४.२०१९ ते दि.३१.०६.२०१९ करिता मुदतवाढ देण्यात आली आहे. सदर कर सल्लागार यांची नेमणुकांची मुदत संपुष्टात येत असल्याने पुढील कालावधीकरिता तज्ञ कर सल्लागारांची नेमणुक अत्यंत आवश्यक आहे.

आयकर व जीएसटी विषयक कायद्याच्या तरतुदीनुसार लागु असलेल्या दराप्रमाणे पुरवठादारांच्या दैनंदिन देयकांमधून मुळातुन करकपात व जीएसटी कर कपात करणे, त्याची लेखापुस्तकांमध्ये अचुकपणे नोंद झालेबाबत तपासणी करणे व विहीत वेळेत शासकीय भरणा करणे आणि मासिक, त्रैमासिक, वार्षिक विवरणपत्रे दाखल करणे, सबंधीत संपुर्ण पुर्तता करणे. कोणत्याही प्रकारची तोषिश संस्थानला लागणार नाही यादृष्टीने आयकर व जीएसटी कर विषयक संपुर्ण कामकाज करणे बाबत वेळोवेळी मार्गदर्शन करणे इ. साठी आयकर व

जीएसटी कर सल्लागार यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. मागील कर सल्लागारांची मुदत संपुष्टात आल्याने पुढील कालावधीकरिता नियुक्ती करणेकामी विहीत पध्दतीने संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करुन व साधारणपणे रु. १०० कोटींचे वर वार्षिक उलाढाल असलेल्या संस्था/कंपन्यांचे कर विषयक कामकाज करण्याचा अनुभव असलेल्या लेखापरिक्षण संस्थांकडून दर मागविण्यात येऊन, पात्र लेखापरिक्षण संस्थां यांचे दरांचा तुलनात्मक तक्ता मा.व्यवस्थापन समिती समोर सादर करण्यात येऊन नियुक्तीबाबत निर्णय घेण्यात येईल.

प्रस्तावः- उपरोक्त प्रस्तावीत केल्याप्रमाणे संस्थानचे आयकर व जीएसटी विषयक संपुर्ण दैनंदिन कामकाज करणे व त्यासंबधीत वेळोवेळी मार्गदर्शन मिळणेकामी विहीत पध्दतीने आयकर व जीएसटी करिता कर सल्लागार म्हणुन नेमणुक करण्यास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.१७९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे आयकर व जीएसटी विषयक संपुर्ण दैनंदिन कामकाज करणे व त्यासंबधीत वेळोवेळी मार्गदर्शन मिळणेकामी विहीत पध्दतीने आयकर व जीएसटी करीता कर सल्लागार म्हणुन नेमणुक करणेकामी संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करुन व साधारणपणे रु.१०० कोटींचे वर वार्षिक उलाढाल असलेल्या संस्था/कंपन्यांचे कर विषयक कामकाज करण्याचा अनुभव असलेल्या लेखापरिक्षण संस्थांकडून दर मागविण्यास मान्यता देण्यात आली. तसेच पात्र लेखापरिक्षण संस्था यांचे दरांचा तुलनात्मक तक्ता मा.व्यवस्थापन समिती समोर सादर करण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.०८** **श्री साईभक्तांकडून संस्थानला देणगी रुपाने प्राप्त झालेल्या / जमा असलेल्या सोने वस्तु वितळवून उपलब्ध होणारे शुध्द सोने पासून साई प्रतिमा असलेली नाणीच्या संख्या निश्चीत करणे तसेच भारत सरकार टकसाळ यांचेकडून सोने वितळविणे व नाणी बनविण्याचे खर्चाचा सविस्तर तपशिल मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** (अ) मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १३ डिसेंबर,२०१८ चे सभेत निर्णय क्रमांक ७३३ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे –

संस्थानकडे दि.३१/३/२०१८ अखेर ४१६ किलो सोने वस्तू स्वरुपात उपलब्ध आहे. त्यापैकी साधारणत: १९६ किलो सोने श्रींना दैनंदिन वापरासाठी व गाभा-यात आहे. तसेच मौल्यवान हिरे असलेले दागिने १८ किलो असे एकूण २१४ किलो सोने वजा जाता साधारणत: २०० किलो वितळविण्या योग्य सोने उपलब्ध आहे. शासन निर्णय दि.३१/५/२००७ मधील कार्यपध्दतीनुसार वितळवून त्याचे शुध्द सोन्यामध्ये रुपांतर करण्यासाठी प्रथम शासनाची मान्यता घ्यावी. तसेच उपलब्ध सोने वितळवून प्राप्त होणा-या शुध्द सोन्यापैकी १०० किलो सोने केंद्र सरकारच्या सुवर्ण धनिकरण योजनेत ठेव स्वरुपात गुंतविणेस मान्यता देण्यात आली.त्याप्रमाणे मान्यतेसाठी प्रस्ताव शासनास सादर करावा,असे ठरले.

प्राप्त होणा-या शुध्द सोन्यापैकी उर्वरित शुध्द सोन्यातून भाविकांना प्रसादरुपाने खरेदी करणेसाठी 'श्रीं' ची प्रतिमा असलेले २.५ ग्रॅम, ५ ग्रॅम व १० ग्रॅम वजनाची नाणी भारत सरकारच्या टांकसाळीतून वेळोवेळी आवश्यकतेप्रमाणे तयार करुन घेण्यास व ती नाणी संस्थानच्या कापडकोठी विभागामार्फत साईभक्तांना विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली.सदर नाणी तयार करण्यासाठी येणा-या आवश्यक त्या खर्चास मान्यता घेण्यासाठी सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा,असे ठरले.

(ब) त्यास अनुसरुन,संस्थानकडे दि.३१/३/२०१८ अखेर उपलब्ध असलेले वितळविण्या योग्य सोनेदि.३१/५/२००७ रोजीच्या शासन निर्णय कार्यपध्दतीनुसार वितळवून, त्याचे शुध्द सोन्यामध्ये रुपांतर करण्यासाठी,तसेच प्राप्त होणा-या शुध्द सोन्यापैकी १०० किलो सोने केंद्र सरकारच्या सुवर्ण धनिकरण योजनेत ठेव स्वरुपात गुंतविणेबाबत व उर्वरीत शुध्द सोन्यातून भाविकांना विक्रीसाठी,'श्रीं' ची प्रतिमा असलेले २.५ ग्रॅम, ५ ग्रॅम व १० ग्रॅम वजनाची नाणी भारत सरकारच्या टांकसाळीतून वेळोवेळी आवश्यकतेप्रमाणे तयार करुन घेणेबाबतदि.२६/०१/२०१९ चे पत्राने,शासन मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविण्यात आला होता. तसेच वितळविण्या योग्य सोने वितळवून शुध्द स्वरुपातील सोने धातूच्या विटा व 'श्रीं' ची प्रतिमा असलेले २.५ ग्रॅम, ५ ग्रॅम व १० ग्रॅम वजनाची सोने नाणी तयार करुन घेणेकामी, भारत सरकार टाकसाळ,मुंबई यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले होते.

( क) महाराष्ट्र शासन,विधी व न्याय विभाग,यांनी दि.०४/०४/२०१९ चे पत्रान्वये, संस्थानला देणगी स्वरुपात प्राप्त सोन्यातून भाविकांना विक्रीसाठी "श्रीं "ची प्रतिमा असलेली २.५ ग्रॅम,५ ग्रॅम व १० ग्रॅम वजनाची किती नाणी बनविण्यात येणार आहेत. तसेच भारत सरकारचे टाकसाळीतून सोने वितळविण्याचा व नाणी बनविण्याचा

खर्चाचा व इतर खर्चभाराचा सविस्तर तपशिलाचे मागणी केलेली आहे. त्याअनुषंगाने सोने नाणीं बनविणेकामी मा. व्यवस्थापन समितीकडून वजननिहाय नाणी संख्या निश्चित करुण घेणे गरजेचे आहे.

तक्ता क्र.०१

दि.३१/०३/२०१९ अखेर संस्थानकडे पुढीलप्रमाणे सोने नाणी शिल्लक आहेत.

| अ.नं. | तपशिल | सोने नाणी वजन | शिल्लक सोने नाणी संख्या |
|---|---|---|---|
| १. | साईप्रतिमा असलेली सोने नाणी | ०२.५०० ग्रॅम | ०८ |
| २. | साईप्रतिमा असलेली सोने नाणी | ०५.००० ग्रॅम | १००८ |
| ३. | साईप्रतिमा असलेली सोने नाणी | १०.००० ग्रॅम | २०७० |

दिनांक ३१ मार्च, २०१८ अखेर संस्थानकडे वितळविणे योग्य सोने अंदाजे २०० किलोग्रॅम इतके आहे. त्यापासून साधारणपणे अंदाजे २० % घट धरल्यास अंदाजे १६० किलो शुध्द सोने उपलब्ध होईल. त्यापैकी १०० किलो शुध्द सोने सुवर्णधनिकरण योजनेत गुंतविणे असल्याने, उर्वरित अंदाजे ६० किलो शुध्द सोने विहीत वजनाची श्री साईप्रतिमा असलेली नाणी बनविणे कामी उपलब्ध होईल.

उपरोक्त नाणींपैकी २.५ ग्रॅम व ५ ग्रॅम वजनाचे पेंन्डेट्सची मोठया प्रमाणात मागणी आहे. १० ग्रॅम वजनाची नाणी मोठया प्रमाणात शिल्लक असल्याने सदर नाणी बनविण्याची आवश्यकता नाही. उपलब्ध होणा-या शुध्द सोने पासून खाली नमूद केलेप्रमाणे नाणी बनवून घेता येईल, असे नम्र मत आहे.

तक्ता क्र. ०२

| अ.नं. | तपशिल | सोने नाणी वजन | आवश्यक सोने नाणी संख्या | वजन किलोग्रॅम |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साईप्रतिमा असलेली सोनेपेंन्डेट्स | ०२.५०० ग्रॅम | १२००० | ३० |
| २. | श्री साईप्रतिमा असलेली सोनेपेंन्डेट्स | ०५.००० ग्रॅम | ६००० | ३० |

(इ) मा. विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासनयांनी दि.०४/०४/२०१९ चे पत्रान्वये,भारत सरकारचे टाकसाळीतून सोने वितळविण्याचा व नाणी बनविण्याचा खर्चाचा व इतर खर्च भाराचा सविस्तर तपशिल शासनास सादर करणेकामी, कळविलेले आहे. तसेच दिनांक ३१ मार्च, २०१८ अखेर संस्थानकडे वितळविणे योग्य सोने अंदाजे २०० किलोग्रॅम आहे.परंतुसोने अलंकार / वस्तू वितळवून उपलब्ध होणा-या शुध्द सोन्यापैकी १०० किलो सोने सरकारच्या सुवर्ण धनिकरण योजनेत ठेव स्वरुपात गुंतवविणेस व उर्वरित शुध्द सोन्यापासून उपरोक्त तक्ता क्र.०२ मध्ये नमूद केलेप्रमाणे नाणी बनविणेबाबत संख्या निश्चित करणेकामी, तसेच सोने वितळविण्याचा व नाणी बनविण्याचा खर्चाचा व इतर खर्चभाराचा सविस्तर तपशिल भारत सरकार टंकसाळ, मुंबई ( India Government Mint, Mumbai)यांचेकडून पुढे नमूद केलेल्या बाबींस अनुसरुन प्रस्ताव/ दरपत्रक मागविणेस मान्यता मिळणेकामी, सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर मान्यतेसाठी सादर करता येईल.

०१. IGM यांचे मुंबई स्थित रिफायनरीमध्ये सोने वितळविणेची दररोजची किती किलोग्रॅमची क्षमता आहे तसेच संस्थानमार्फत उपलब्ध होणारे उपरोक्त सोने एकाच टप्प्यातवितळविणे शक्य होईल कां ?

०२. IGM कडे अशी क्षमता नसलेस त्याबाबत काय पर्यायी व्यवस्था करता येईल ?

०३. सोने वितळविणेची कार्यपध्दती काय असेल ?

०४. सोने प्रथम वितळविणे (Melting) व त्यापासून शुध्द स्वरुपातील (Refining) सोनेच्या विटा (Biscuits) तयार करणेकामी प्रति किलोग्रॅम किती खर्च (शासकीय करांसह) येईल ?

०५. प्राप्त होणा-या शुध्द सोने पासून पेंन्डेट्स तयार करणेचे ठरलेस प्रति ग्रॅम / प्रति नाणी / किती मजुरी खर्च (Making / Labour Charges,etc.)येईल ?

०६. उपरोक्त कामी बिल आदायगीसह इतर अटी-शर्ती काय असतील ?

०७. दिलेले दर किती कालावधीसाठी बंधनकारक राहतील, त्याबाबतचा तपशिल.

प्रस्ताव:- मा. विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन,यांचेकडील दि.०४/०४/२०१९ पत्रास अनुसरुन, भारत सरकारचे टाकसाळीतून सोने वितळविणे, शुध्द सोन्यापासून वेगवेगळया वजनाची नाणी/पेंन्डेट्स बनविणे कामी संख्या निश्चित करणे तसेच सर्व बाबींसाठी येणा-या खर्चाचा व इतर खर्चभाराचा सविस्तर तपशिल शासनास सादर करणेकामी भारत सरकार टंकसाळ, मुंबई (India Government Mint, Mumbai) यांचेकडून उपरोक्त नमूद प्रमाणे प्रस्ताव/दरपत्रक मागविणेस, तसेच यासाठी येणा-या खर्चास मान्यता मिळणेकामी सदर प्रस्ताव

मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर करणेस व मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळालेनंतर शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.१८०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे भारत सरकार टांकसाळ, मुंबई यांचेकडून संस्थानचे सोने वितळून त्यापासून साईप्रतिमा असलेले २.५ ग्रॅम वजनाची सोने पेन्डेंट्स ६००० नग व नाणी ६००० नग व ५ ग्रॅम वजनाची सोने पेन्डेंट्स ३००० नग व नाणी ३००० नग तयार करुन घेण्यास भारत सरकार टांकसाळ, मुंबई यांचेकडून प्रस्तावातील मुद्दा क्र.(इ) मध्ये नमुद १ ते ७ मुद्यांची माहिती मागविण्यास व त्यानुसार येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चाचा सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.०९** **संस्थानला देणगी स्वरुपात प्राप्त होणाऱ्या सोने-चांदी वस्तु अलंकारांची तसेच मौल्यवान खडे (Precious Stone) मुल्यांकनकारांच्या मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ मधील, समितीची कर्तव्ये व अधिकार या शीर्षकाखाली कलम १७ (२) झ मध्ये, " सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील, अशा सर्व गोष्टी करील." असे नमूद केलेले आहे.

संस्थानला दक्षिणापेटीमध्ये व लेखाशाखेत समक्ष देगणी स्वरुपात येणा-या सोने-चांदीच्या वस्तु, अलंकार / मौल्यवान खडे यांची कस लावून तपासणी करुन बाजारभावाप्रमाणे किंमत निश्चित करणेकामी, तत्कालीन मा.त्रिसदस्यीय समितीचे दिनांक ०९ ऑक्टोबर,२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ९०५ अन्वये, विहित पद्धतीने वर्तमानपत्रात जाहिरात देऊन, सन २०१५-१६ करिता खाली नमूद केलेल्या अ.क्र.०१ व ०२ या शासनमान्यता प्राप्त मुल्यांकनकारांची दि.०१ एप्रिल २०१५ ते दि.३१ मार्च २०१६ अखेर (एक वर्ष) कालावधीकरीता नेमणूक करण्यात आली होती. सदर मुल्यांकनकारांची मुदत संपुष्टात आल्याने, पुढील सन २०१६-१७ करीता त्यांना दि.३० नोव्हेंबर, २०१६ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. ७९५ अन्वये, दि.०१ एप्रिल, २०१६ ते दि. ३१ मार्च २०१७ अखेरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

तसेच दि.२३/१०/२०१७ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.८७८ अन्वये, सन २०१७ -१८ या आर्थिक वर्षाकरीता त्यांना मुदत वाढ देण्यात आलेली आहे. मुल्यांकनकाराची नेमणुक व त्यांनी केलेल्या कामांची वर्षानिहाय माहीती पुढील प्रमाणे

१. खडे मुल्यांकनकारांची नेमणूक वर्तमानपत्रामध्ये विहित पद्धतीने जाहिरात देऊन तत्कालीन मा.त्रिसदस्यीय समितीचे मान्यतेने करणेत आलेली आहे / होती.

२. मुल्यांकनकारांनी त्यांचे नेमणुकीचे कालावधीत, सन २०१४-१५ या आर्थिक वर्षातील दि.०१ जून, २०१४ ते ३१ मार्च २०१५ या कालावधीतील प्राप्त (२०९) वस्तू/खडे मुल्यांकनाचे काम पूर्ण केलेले असून, त्यापोटी त्यांना प्रत्येकी रुपये १७,८७०/- मात्र असे एकूण रुपये ३५,७४०/- मात्र आदा करणेत आलेले आहेत.

३. मुल्यांकनकारांनी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षातील दि.०१ एप्रिल, २०१५ ते ३१ मार्च २०१६ या कालावधीतील प्राप्त (२२३) वस्तू/खडे मुल्यांकनाचे काम पूर्ण केलेले असून, त्यापोटी त्यांना प्रत्येकी रुपये १९,२३४/- मात्र असे एकूण रुपये ३८,४६८/- मात्र आदा करणेत आलेले आहेत.

४. मुल्यांकनकारांनी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील दि.०१ एप्रिल, २०१६ ते ३१ मार्च २०१७ या कालावधीतील प्राप्त १३२ (९९ नग) वस्तू/खडे मुल्यांकनाचे काम पूर्ण केलेले असून, त्यापोटी त्यांना प्रत्येकी रुपये ८,५३८/- मात्र असे एकूण रुपये १७,०७६/- मात्र आदा करणेत आलेले आहेत.

५. मुल्यांकनकारांनी सन २०१७ -१८ या आर्थिक वर्षातील दि.०१ एप्रिल, २०१७ ते ३१ मार्च २०१८ या कालावधीतील प्राप्त (९५ नग) वस्तू/खडे मुल्यांकनाचे काम पूर्ण केलेले असून, अदयाप बील प्राप्त झालेले नाही.

मुल्यांकनकाराकडून खडेवस्तु तपासणी करून त्यांनी बाजारभावाप्रमाणे निश्चित केलेल्या किंमतीच्या नोंदी त्या आर्थिक वर्षाच्या हिशोबात घेण्यात येतात.

दिनांक ०१/०४/२०१८ ते ३१/०३/२०१९ पर्यंतच्या कालावधीत ९१ खडे वस्तू प्राप्त झालेल्या असुन सन २०१८-१९ हे आर्थिक वर्ष नुकतेच संपलेले आहे. त्यामुळे सदर खडे वस्तूंचे नेहमीप्रमाणे मुल्यांकनकाराकडून तपासणी करुन किंमती ठरवुन घेणे गरजेचे आहे.

सोनी शिवलाल ब्रदर्स ज्वेलर्स, मुंबई, आणि श्री.नरेश एन मेहता व श्री.प्रदिपकुमार जे.जवेरी, मुंबई या दोन्ही मुल्यांकनकांराना पुर्वीच्याच अटी शर्तीवर सन २०१७-१८ या कालावधीत प्राप्त झालेले खडे तपासणीचे कामासाठी मुदतवाढ देण्यात आलेली असुन खडे तपासणीचे काम पुर्ण झालेले आहे.त्यांची नेमणुकीची मुदत दिनांक ३१ मार्च २०१८ अखेर संपुष्टात आल्याने संबधीतांना विचारणा केली असता सन २०१८-१९ या कालावधीत संस्थानला प्राप्त झालेल्या खडे वस्तु तपासणीचे कामकाज पुर्वीच्याच अटी शर्तीवर करण्यास तयार आहेत असे त्यांनी उपरोक्त संदर्भ क्र.०२ व ०३ अन्वये, कळविले आहे.

मागील वर्ष सन २०१७-१८ चे आदेशातील अटी शर्ती पुढील प्रमाणे होत्या.

१. आपली नियुक्ती दि.०१ एप्रिल,२०१७ ते दि.३१ मार्च,२०१९८ अखेर कालावधी करीता राहील. या कालावधीतमध्ये संस्थानला प्राप्त झालेल्या मौल्यवान खडयांची तपासणी शिर्डी येथील लेखाशाखा कार्यालयात येऊन करावी लागेल.

सदरील मुदतीनंतर आपली नेमणुक आपोआप संपुष्टात येईल. मुदत संपलेनंतर याकामी आपणास पुढील नेमणुकीकरीता हक्क सांगता येणार नाही.

२. आपणांस संस्थानला प्राप्त झालेल्या मौल्यवान खडे स्वच्छ करुन त्याची तपासणी करणे, खडयांची शुद्धता, वजन, बाजारभावाप्रमाणे किंमत यानुसार मुल्यांकन करणे, त्याची फोटोग्राफी करणे, तद्नंतर मुल्यांकनाचे फोटोसह प्रमाणपत्र स्वाक्षरी –शिक्यानिशी संस्थानला द्यावे लागेल. सदरचे काम आपणास विहीत वेळेत पुर्ण करावयाचे आहे.

३. मुल्यांकन करणे कामी लागणारे सर्व उपकरणे / साहीत्य आपण स्वखर्चाने शिर्डी येथे आणु मुल्यांकनाचे काम पुर्ण करावयाचे आहे. उपकरणे / साहीत्याची ने आण करणे जोखमी आपलेवर राहील.

४. माळ / हार,अंगठी व पेंडल इत्यादी दागिन्यांमध्ये एकापेक्षा जास्त खडे असल्यास त्याची गणना ०१ खडा (परिमाण) करणेत येईल.

५. मुल्यांकन करणेसाठी शिर्डी येथे आल्यावर आपली निवासाची ( जास्तीत जास्त ०३ खोल्या ) तसेच भोजन, दर्शन / आरती व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात येईल.

६. मुल्यांकनाचे शुल्क (मानधन) म्हणुन आपणास प्रति खडा रुपये ७५/- ( अक्षरी रुपये पंच्याहत्तर मात्र) अधिक लागु असलेला ( वस्तु व सेवा दर (GST) आदा करणेत येईल.

७. आपले देय मानधनातुन प्रचलित दराप्रमाणे शासकीय कर कपात करणेत येतील.

८. मुल्यांकनासंबधीत काही कायदेशीर बाबी अगर वादविवाद निर्माण झाल्यास तो निराकरण करण्याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहील. तसेच मुल्यांकनाबाबत काही न्यायालयीन वाद निर्माण झाल्यास त्याकामी आपणास न्यायालयात हजर राहावे लागेल.

९. मुल्यांकन / तपासणीचे कामकाज त्रैमासिक पद्धतीने अथवा संस्थान निश्चित करील त्यावेळेस पुर्ण करुन द्यावे लागेल.

१०. आपणास आदा करणेत येणा-या मानधनातुन ५% रक्कम संस्थानकडे अनामत खाती जमा करुन ठेवली जाईल. सदरची अनामत रक्कम कामकाज पुर्ण झाल्यानंतर / संस्थानने खात्री केलेनंतर यथावकाश परत करणेत येईल.

उपरोक्त मुल्यांकनकाराचे काम समाधानकारक असून सन २०१८-१९ या कालावधीकरीता त्यांची नेमणुक पुर्वीप्रमाणे उपरोक्त अटी शर्तीवर करता येईल, असे मत आहे.

प्रस्ताव:- सन-२०१८-१९ मध्ये दि.०१ एप्रिल, २०१८ ते ३१ मार्च २०१९ पर्यंतच्या कालावधीतील संस्थानला ९१ खडे वस्तु नग प्राप्त झालेले आहेत. सोने-चांदीच्या वस्तु अलंकार / मौल्यवान खडे यांची कस लावून तपासणी करुन बाजारभावाप्रमाणे किंमत निश्चित करणेकामी, शासनमान्यता प्राप्त मुल्यांकनकार मे.सोनी शिवलाल ब्रदर्स ज्वेलर्स, मुंबई, व श्री.नरेश एन.मेहता व श्री. प्रदिपकुमार जे. जवेरी, मुंबई यांचे काम अत्यंत समाधानकारक असून, ते सेवाभावी स्वरुपात सेवा देत असल्याने, तसेच ते घेत असलेले मानधन तुलनेने अत्यंत अल्प असल्याने, त्यांचेकडून पुर्वीच्याच अटी- शर्तीवर खडे स्वच्छ, पॉलिशींग, तपासणी, पॅकींग, फोटोग्राफी व प्रमाणपत्रे तसेच मुल्यांकन इ.चा समावेश करण्यात येऊन, प्रति खडा रुपये ७५/- + जीएसटी या मानधनावर त्यांची नेमणुक करता येईल व त्यांचेकडून सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील प्राप्त झालेल्या खडे वस्तु मुल्यांकन करुन घेता येईल तसेच त्यांची नेहमीप्रमाणे तपासणी कालावधीत साईनिवास अथिती गृह येथे निवास व्यवस्था व प्रसादालयामार्फत भोजन व्यवस्था मोफत करता येईल, तरी उपरोक्तप्रमाणे मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्तावावर निर्णय होणेकामी मा.व्यवस्थापन समितीच्या सभेचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१८१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील संस्थानला देणगी स्वरुपात प्राप्त होणाऱ्या सोने-चांदी वस्तु अलंकारांची तसेच मौल्यवान खडे यांची कस लावून तपासणी करुन बाजारभावाप्रमाणे किंमत निश्चित करणेकामी, शासनमान्यता प्राप्त मुल्यांकनकार मे.सोनी शिवलाल ब्रदर्स ज्वेलर्स, मुंबई, व श्री.नरेश एन.मेहता व श्री. प्रदिपकुमार जे.जवेरी, मुंबई यांची पुर्वीच्याच अटी-शर्तीवर खडे स्वच्छ, पॉलिशींग, तपासणी, पॅकींग, फोटोग्राफी व प्रमाणपत्रे तसेच मुल्यांकन इ.चा समावेश करण्यात येऊन, प्रति खडा रुपये ७५/-+जीएसटी या मानधनावर नेमणूक करण्यास तसेच तपासणी कालावधीत साईनिवास अथिती गृह येथे निवास व्यवस्था व प्रसादालयामार्फत भोजन व्यवस्था मोफत करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.१०** **श्री साई प्रसादालय इमारतीचे आतील व बाहेरील भागास रंगकाम करणेकामाचे दुसरे व अंतिम देयक रु.२,८६,३८९/- मात्र आदा करणेस मान्यता देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईप्रसादालय इमारतीचे आतील व बाहेरील भागास रंगकाम करण्याचे काम ठेकेदार डिसेंट डेकोरेटर्स, पुणे यांनी पुर्ण केले असून ठेकेदार यांनी सादर केलेल्या दुसरे व अंतिम बिलाची सविस्तर तपासणी करणेत आली आहे. ठेकेदार यांना अंतीम बिल अदा करणेकामी मा. व्यवस्थापन समितीची मान्यता मिळणेसाठी प्रस्तावतक्ता स्वरूपात खालीलप्रमाणेसादर करणेत येत आहे.

कामाचे नांव- श्री साई प्रसादालय इमारतीचे आतील व बाहेरील भागास रंगकाम करणे.

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | डिसेंट डेकोरेटर्स, पुणे |
| कार्यादेश क्रमांक व दिनांक | जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम/७००५/२०१८<br>दि.२९/०३/२०१८ |
| मंजूर निविदा रक्कम | **रु.६२,८३,१९६/-** |
| मा. व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र १४०(०५) दि.०७/०३/२०१८ |
| दुसरे व अंतिम बिलाची रक्कम (अ) | **रु.५३,३२,९७३/-** |
| आजपर्यंत अदा केलेली रक्कम (ब) | रु.५०,४६,५८४/- |
| निव्वळ देय्य रक्कम (अ-ब) | रु.२,८६,३८९/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु.९,५०,२२३/- कमी |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | दि.१०/०८/२०१८ |
| प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक | दि.०६/०८/२०१८ |

श्री साई प्रसादालय इमारतीचे आतील व बाहेरील भागास रंगकाम करण्याचे काम ठेकेदार डिसेंट डेकोरेटर्स, पुणे यांनी दि.०६/०८/२०१८ अखेर विहीत मुदतीत काम पूर्ण केले आहे. ठेकेदार यांनी दि.०३/१०/२०१८ रोजीचे पत्रान्वये दुसरे व अंतिम बिल सादर केले आहे. त्यानुसार सदरहू कामाची Gross Value of Work Done रु.५३,३२,९७३/- मात्र होत असुन या पुर्वी अदा केलेली रक्कम वजा जाता अंतिम बिलापोटी एकूण रक्कम रु.२,८६,३८९/- मात्र इतकी रक्कम देय आहे.

तरी साईप्रसादालय इमारतीचे आतील व बाहेरील भागास रंगकाम करणे कामाचे दुसरे व अंतिम देयक रक्कम रु.२,८६,३८९/- मात्र आदा करणेस निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालय इमारतीचे आतील व बाहेरील भागास रंगकाम करणेकामाचे एकुण बिलाची रक्कम रु.५३,३२,९७३/-मात्र मंजूर करण्यात येऊन त्यापैकी उर्वरीत शिल्लक देय रक्कम रु.२,८६,३८९/- मात्र सदर कामाचे ठेकेदार डिसेंट डेकोरेटर्स, पुणे यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.११** **साईनिवास अतिथीगृह इमारतीच्या डोमेचे पॉलीकार्बोनेट शिट बदलणे कामाचे ठेकेदार श्री. संकेत नानासाहेब नवले,कोपरगाव यांचे अंतिम देयक रक्कम रु.१,९७,७३०/-मात्र मंजूर होऊन उर्वरीत देय रक्कम आदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधिल तरतूद –

अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये "मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे " अशी तरतूद आहे.

प्रस्तावना–मध्यवर्ती भांडारगृह पहिल्या व दुस-या मजल्यावर सन्माननीय अतिथींचे निवासाकरीता सन २००१ साली साईनिवास इमारतीचे बांधकाम पूर्ण करणेत आलेले आहेत. सदर इमारतीचा वापर सन्माननीय अतिथींचे निवासाकरीता सुरु आहे. सदर इमारतीचे पहिल्या मजल्यावर मध्यभागी १०.५० X १०.५० मीटर या साईजमध्ये ओपन टु स्काय कोर्ट यार्ड असून सदर कोर्ट यार्डचे डोमचे छताकरीता पॉलीकार्बोनेट शिट बसविण्यात आले आहे. सदरहू शिट खराब झाल्याने याकामी ई –निविदा मागविण्यात येऊन निम्नतम दराचे ठेकेदार श्री संकेत नानासाहेब नवले, कोपरगाव यांना कार्यादेश देणेत आला होता. ठेकेदार यांनी सदरचे काम विहीत मुदतीत पूर्ण केले आहे. ठेकेदार यांनी सादर केलेल्या पहिले व अंतिम बीलाची सविस्तर तपासणी इकडील विभागामार्फत करणेत आली आहे. ठेकेदार यांना अंतिम बिल अदा करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेकरीता प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | कामाचे नाव | साईनिवास अतिथीगृह इमारतीच्या डोमचे पॉलीकार्बोनेट शिट बदलणे. |
| २ | ठेकेदाराचे नाव | श्री संकेत नानासाहेब नवले,कोपरगाव |
| ३ | मंजूर निविदा रक्कम | रु. २,००,७७२/- |
| ४ | काम बहाल करणेबाबत मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्र.व दि. | निर्णय क्रमांक ६१३ (०९) दि. ०५/१०/२०१८ |
| ५ | ठेकेदार यांना देण्यात आलेला कार्यादेश क्रं. व दिनांक | जा.नं. एसएसएसटी/बांधकाम/४३०६/२०१८, दि. २९/११/२०१८ |
| ६ | अंतिम बिलानुसार झालेल्या कामाची रक्कम | १,९७,७३०/- |
| ७ | यापुर्वी अदा केलेली रक्कम | १,४७,०००/- |
| ८ | उर्वरीत शिल्लक देय रक्कम | ५०,७३०/- |
| ९ | मंजूर निविदेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | ३०४२/- (१.५१५%) कमी |
| १० | करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मुदत | ०१ महिना – दि. ०४/०१/२०१९ पर्यंत |
| ११ | प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक | दि.१८/१२/२०१८ |

विभागाचा अभिप्रायः- ठेकेदार श्री संकेत नानासाहेब नवले, कोपरगाव यांनी साईनिवास अतिथीगृह इमारतीच्या डोमचे पॉलीकार्बोनेट शिट बदलण्याचे काम मुदतीत पूर्ण केले असून सदर कामाचे रक्कम रु.२,११,७६९.०० मात्र रकमेचे पहिले व अंतिम बिल सादर केले आहे. ठेकेदार यांनी सादर केलेल्या अंतिम बिलाची तपासणी केली असता प्रत्यक्ष झालेल्या मोजमापानुसार सदरहू बिलाची एकूण रक्कम रु. १,९७,७३०/- मात्र इतकी होते. त्यापैकी ठेकेदार यांना यापुर्वी अदा केलेली रक्कम रु. १,४७,०००/- मात्र वजा जाता रु.५०,७३०/-मात्र इतकी रक्कम निव्वळ देय होते.

प्रस्तावः- तरी ठेकेदार श्री संकेत नानासाहेब नवले, कोपरगाव यांचे साईनिवास अतिथीगृह इमारतीच्या डोमचे पॉलीकॉर्बोनेट शिट बदलणे कामाचे पहिले व अंतिम देयक रक्कम रु.१,९७,७३०/- मात्र मंजूर होऊन उर्वरीत निव्वळ देय रक्कम रु.५०,७३०/- मात्र अदा करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१८३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनिवास अतिथीगृह इमारतीच्या डोमचे पॉलीकार्बोनेट शिट बदलणे कामाचे बिलाची एकुण रक्कम रु.१,९७,७३०/- मात्र मंजूर करण्यात येऊन त्यापैकी उर्वरीत शिल्लक देय रक्कम रु.५०,७३०/- मात्र सदर कामाचे ठेकेदार श्री संकेत नानासाहेब नवले, कोपरगाव यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१२** **श्री साईबाबा मंदिर परिसरातील प्लोरींग नुतनीकरण (दुसरा टप्पा) करणेकामाचे ठेकेदार आर.के.सावंत, नाशिक यांचे ५ वे व अंतिम देयक रक्कम रु.२,६८,१७,३४७/- मात्र मंजुर करणेस व त्यापैकी उर्वरीत शिल्लक देय रक्कम रु.१४,०४,६६९/- मात्र आदा करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा मंदिर परीसरातील फ्लोअरींग नुतनीकरण (दुसरा टप्पा) करणेचे काम ठेकेदार आर. के. सावंत, नाशिक यांनी पूर्ण केले असून, ठेकेदार यांनी सादर केलेले ५ वे व अंतीम बीलाची सविस्तर तपासणी करणेत आलेली आहे.

प्रस्तावना:-

कामाचे नाव - श्री साईबाबा मंदिर परीसरातील फ्लोअरींग नुतनीकरण (दुसरा टप्पा) करणे.

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नाव | आर. के. सावंत, नाशिक. |
| कार्यादेश क्रमांक व दिनांक | जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम/२७५६/२०१७, दि.१९/०८/२०१७. |
| मंजूर निविदा रक्कम | रु.२,७५,००,०००/-. |
| मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय क्र.व दिनांक | निर्णय क्र.६६०, दि.२५/०७/२०१७. |
| ५ वे व अंतीम बिलानुसार झालेल्या कामाची किंमत | रु.२,६८,१७,३४७/- |
| आजपर्यंत अदा केलेली रक्कम | रु.२,५४,१२,६७८/-. |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु.४,६३,७३४/- कमी (१.६८६% कमी). |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | पाच महिने. (दि.२१/०८/२०१७ ते दि.२०/०१/२०१८). |
| मुदतवाढ दिनांक | दि.३१/०३/२०१८ अखेर. |
| प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याची दिनांक | दि.२८/०३/२०१८. |

ठेकेदार आर. के. सावंत, नाशिक यांनी दि.२८/०३/२०१८ अखेर सदरचे काम पूर्ण केलेले असून त्याबाबत काम पूर्णत्वाचा दाखला ठेकेदार यांना देणेत आलेला आहे. ठेकेदार यांनी दि.२३/०५/२०१८ रोजीच्या पत्रान्वये एकूण रक्कम रु.२,९०,६६,८०५/- मात्र इतक्या रकमेचे पाचवे व अंतीम देयक सादर केले आहे. ठेकेदार यांना प्रत्यक्ष झालेल्या कामाचे मोजमापानुसार अंतीम बिलापोटी एकूण रक्कम रु.२,६८,१७,३४७/-मात्र इतकी रक्कम देय होत असून त्यामधून मागील बीलाची रक्कम रु.२,५४,१२,६७८/- वजा करुन निव्वळ रक्कम रु.१४,०४,६६९/- देय होत आहे.

ठेकेदार आर. के. सावंत, नाशिक यांनी दि.२०/०४/२०१८, दि.१८/०६/२०१८ रोजीचे पत्रान्वये GST भरणा केलेबाबत GSTR-1 च्या प्रती संस्थानकडे सादर केलेल्या आहेत. तसेच अंतिम बीलापोटी अदा केलेल्या ॲडव्हान्स रकमेचा GST भरणा केलेबाबतचे कागदपत्रे सादर केलेले आहेत.

ठेकेदार यांनी या कामाची पी.एफ बाबतची सर्व पूर्तता केलेली आहे. याबाबत सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन १० अ यांचेकडून दि.१६/११/२०१७, दि.१३/०१/२०१८ व दि.०२/०५/२०१८ रोजीचे पत्राने कळविणेत आलेले आहे. तसेच अतिरिक्त कर्मचा-यांचा पी. एफ भरलेबाबत ठेकेदार यांनी दि.१२/०३/२०१९ रोजीचे पत्राने कळविले आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०७/०३/२०१८ चे सभेतील नि.क्र.१५७ अन्वये, ठेकेदार यांना सदर काम पूर्ण करणेसाठी माहे मार्च-२०१८ अखेरपर्यंत मुदतवाढ देणेत आली. सदर वाढीव मुदतीत ठेकेदार यांनी निविदेतील स्कोपमधील सर्व कामे पुर्ण केलेली आहेत.

प्रस्ताव:- तरी ठेकेदार आर. के. सावंत, नाशिक यांना श्री साईबाबा मंदिर परीसरातील फ्लोअरींग नुतनीकरण (दुसरा टप्पा) करणे कामाचे ५ वे व अंतिम देयक एकूण रक्कम रु.२,६८,१७,३४७/-मात्र मंजूर करणेस व त्यापैकी उर्वरीत शिल्लक देय रक्कम रु.१४,०४,६६९/- मात्र अदा करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.१८४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदिर परिसरातील प्लोरींग नुतनीकरण (दुसरा टप्पा) करणेकामाचे बिलाची एकुण रक्कम रु.२,६८,१७,३४७/-मात्र मंजूर करण्यात येऊन त्यापैकी उर्वरीत शिल्लक देय रक्कम रु.१४,०४,६६९/- मात्र सदर कामाचे ठेकेदार आर. के. सावंत, नाशिक यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१३** **मौजे निमगांव कोऱ्हाळे गट नं.८७,८८ मधील जागेत प्रसाद लाडू निर्मिती व्यवस्था इमारतीचे बांधकामासाठी अपेक्षित रु.२०,७३,५०,०००/- इतक्या सुधारीत अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता देणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधिल तरतूद – अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये " मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे " व खंड (घ) अन्वये "भक्तांना जेवण देणे आणि अन्नछत्र चालविणे " अशी तरतूद आहे.

मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय– मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१/०६/२०१८ रोजीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय क्र.२९८ संमत झालेला आहे.

"..यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगांव को-हाळे गट नं. ८७,८८ मधील जागेत प्रसाद लाडू निर्मिती युनीटकरीता इमारतीचे नियोजीत बांधकामासाठी आर्किटेक्ट सुशील देशमुख यांनी सादर केलेल्या सुधारीत नकाशांना व अंदाजपत्रकीय रु.१५,९९,३६,७१३/- मात्र खर्चास मान्यता देण्यात आली व सदरहु प्रकल्प हा मोठ्या खर्चाचा असल्याने मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेकडे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात यावा, तसेच शासन मान्यतेनंतर विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी, असे ठरले ."

प्रस्तावना– सदर प्रकल्पाचे आर्किटेक्ट सुशील देशमुख यांनी तयार केलेल्या नकाशामध्ये बुंदी सुकविणे व पॅकींग करणेसाठी तळमजल्यावर व पहील्या मजल्यावर प्रत्येकी ४५० चौ.मी.प्रमाणे एकूण ९०० चौ.मी. क्षेत्र कार्पेट एरीया दर्शविण्यात आले आहे. तथापी बुंदी पहिल्या मजल्यावर नेणे व पॅकींग केलेले लाडू / बुंदी प्रसाद पाकिटे तळमजल्यावर आणणे यासाठी लिफ्ट अथवा कन्व्हेअर बेल्टचे स्वरुपात व्यवस्था करावी लागेल. तळमजला व पहिल्या मजल्याची उंची प्रत्येकी ६.३० मीटर इतकी दर्शविलेली आहे. तळमजल्यावरील बेसन, चक्की व थर्मिक फ्ल्यूईड हिटींग सिस्टिम यांना मेटल शीट रुफींग असून त्यांची उंची ९ मीटर दर्शविलेली आहे.

बिल्ट-अप एरिया व युनिट वाईज एरिया यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

I) GROUND FLOOR :-

NET B/UP AREA = 2512.19 SQM
EXTRA HEIGHT AREA = 1256.09 SQM
----------------
TOTAL AREA (GF) = 3768.28 SQM

II) FIRST FLOOR :-

NET B/UP AREA = 1268.88 SQM
EXTRA HEIGHT AREA = 634.44 SQM
----------------
TOTAL AREA (FF) = 1903.32 SQM
**TOTAL B/UP AREA (I+II) = 5671.60 SQM**

UNITS WISE AREA

| SR.NO. | UNIT | CARPET AREA IN SQM. | BUILT UP AREA IN SQM. |
|---|---|---|---|
| 1 | COLD STORE | 93.25 | 103.19 |
| 2 | SUB STORE | 93.25 | 103.19 |
| 3 | ONLINE BESAN CHAKKI UNIT | 221.00 | 238.32 |
| 4 | FLOOR STORAGE | 62.00 | 70.23 |
| 5 | PLATFORM FOR THERMO FLUID HEATIN SYSTEM | 182.00 | 200.00 |
| 6 | BESAN MIXING AND CLEANING | 92.35 | 101.43 |
| 7 | LADDU KITCHEN | 390.00 | 430.00 |
| 8 | FREE BUNDI KITCHEN | 390.00 | 430.00 |
| 9 | DISTRIBUTION COUNTER | 60.00 | 65.84 |
| 10 | ADMIN. OFFICE | 54.00 | 63.52 |
| 11 | DRYING AND PACKING (LADDU) | 450.00 | 490.00 |
| 12 | DRYING AND PACKING (FREE BUNDI) | 450.00 | 490.00 |
| 13 | TIME OFFICE | 20.00 | 24.73 |
| 14 | CHANGING ROOM (MALE) | 20.00 | 24.73 |
| 15 | CHANGING ROOM (FEMALE) | 20.00 | 24.73 |

मौजे निमगांव को-हाळे गट नं. ८७,८८ पैकी मधिल प्रस्तावित रेखांकनाखालील २४००० चौ. मी. क्षेत्रावर नियोजित लाडू प्रसाद निर्मिती इमारत बांधकाम या वाणिज्यीक प्रयोजनार्थ सुधारीत रेखांकन मंजुरीसाठी

प्रस्ताव मा. उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग शिर्डी यांचेमार्फत सहायक संचालक, नगर रचना यांचे शिफारशीसाठी पाठविणेत आला असून सदरहू रेखांकन मंजूरीचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात आहे. सदरहू रेखांकन मंजुरी प्राप्त झाल्यानंतर बांधकाम नकाशे बांधकाम परवानगीसाठी सादर करता येतिल.

आर्किटेक्ट यांनी सदरहु प्रकल्पाचे बांधकामासाठी रक्कम रु.१५,९९,३६,७१३/- इतक्या अपेक्षीत खर्चाचे अंदाजपत्रक सादर केले होते. त्यास मा. व्यवस्थापन समितीचे दि.०१/०६/२०१८ रोजीचे सभेतील उपरोक्त निर्णय क्र. २९८ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदरचे अंदाजपत्रक सन २०१७-२०१८ चे एस.एस.आर दरानुसार तयार केलेले होते. दिनांक १९/०९/२०१८ पासून राज्य दर सुची सन २०१८-२०१९ ही संपूर्ण राज्यात लागू करण्यात आली आहे. सदरहू खर्चाचा प्रस्ताव विधी व न्याय विभाग यांचे प्रशासकिय मान्यतेसाठी सादर करावयाचा आहे. शासन स्तरावर या स्वरुपाचे प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे साक्षांकित करणेसाठी पाठविणेत येतात. त्यासाठी अंदाजपत्रक विहीत नमुन्यात प्रचलीत दरसूचीनुसार तयार करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने सदरहु अंदाजपत्रकातील राज्य दर सुची सन २०१८-२०१९ मधील बाबीं व्यतिरिक्त असलेल्या बाबींचे (Non - SSR Rates) दर महाराष्ट्रशासन सा.बां. विभाग शासन आदेश क्रमांक २०१७/प्र.क्रं.११/ नियोजन-३ मंत्रालय, मुंबई दि.११/०४/२०१७ अन्वये राज्य दर सुची बाहेरील बाबींचे दर मागविणेकरीता वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर दरपत्रक मागणी सूचना प्रसिध्द करुन दि.०७/१२/२०१८ अखेर दरपत्रके मागविण्यात आले होते. याकामी प्राप्त झालेली ०६ दरपत्रके उघडण्यात येऊन सदरहू दरपत्रकामधील निम्नतम दरानुसार आर्किटेक्ट यांनी सुधारीत अंदाजपत्रक तयार केले आहे.

आर्किटेक्ट यांनी सन २०१८-२०१९ चे विद्यमान ईएसएसआर दरांनुसार सविस्तर अंदाजपत्रक तयार केले असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| NAME OF WORK:- PPROPOSED CONSTRUCTION OF FOOD PROCESSING UNIT FOR PRODUCTION OF PRASAD LADU ON GAT NO.87- 88 AT NIMGAON KORAHALE, TAL-RAHATA, DIST-A.NAGAR | | |
|---|---|---|
| AS PER MAHARASHTRA STATE PWD S.S.R.PUBLISHED ON 19 SEPTEMBER 2018-19 | | |
| RECAPITULATION SHEET | | |
| SR.NO. | ITEMS | COST IN RS. |
| | PART-A | |
| 1 | COST OF CIVIL, WATER SUPPLY AND SANITARY WORK FOR PRASAD LADU MAIN BUILDING | 9,97,60,387.00 |
| 2 | COST OF COMPOUND WALL | 73,49,009.00 |
| 3 | COST OF R.C.C.PIPE STROM WATER GUTTER | 15,99,561.00 |
| 4 | COST OF EXTERNAL WATER SUPPLY CONNECTION AND BORE WELL | 7,55,374.00 |
| 5 | COST OF EXTERNAL DRAINAGE SYSTEM AND SEPTIC TANK | 8,35,840.00 |
| 6 | COST OF UNDER GROUND WATER TANK AND FIRE TANK | 21,47,208.00 |
| 7 | COST OF LANDSCAPIN AND GARDENING | 13,90,033.00 |
| 8 | COST OF RAIN WATER HARVESING PIT | 2,19,759.00 |
| 9 | COST OF CONCRETE ROAD AND PARKING | 1,33,84,469.00 |
| 10 | COST OF CULVERT | 5,73,051.00 |
| 11 | COST OF CIVIL WORK FOR ELECTRIC SUB STATION | 4,74,225.00 |
| 12 | COST OF MATERAIL QYALITY TESTING | 3,39,750.00 |
| 13 | COST OF ROYALTY CHARGES | 20,79,102.00 |
| 14 | TOTAL OF PART –A(SR.NO.1 TO SR.NO.13) | 13,09,07,768.00 |
| | PART – B | |
| 15 | COST OF INTERNAL AND EXTERNAL ELECTRIFICATION. | 82,09,804.00 |
| 16 | COST OF FIRE FIGHTING | 38,99,782.00 |
| 17 | TOTAL OF PART – B (SR NO.15 TO SR.NO.16) | 1,21,09,586.00 |
| | PART – C | |
| 18 | COST OF AIR COOLING AND EXHAUST SYSTEM | 1,06,99,986.00 |

| | | |
|---|---|---|
| 19 | TOTAL OF PART – C (SR NO.18) | 1,06,99,986.00 |
| | PART –D | |
| 20 | COST OF FURNITURE | 15,00,000.00 |
| 21 | TOTAL OF PART – D (SR.NO.20) | 15,00,000.00 |
| | PART – E | |
| 22 | COST OF ETP PLANT | 70,89,200.00 |
| 23 | TOTAL OF PART – E (SR NO.22) | 70,89,200.00 |
| 24 | NET TOTAL OF A+B+C+D+E(SR.NO.14+17+19+21+23) | 16,23,06,540.00 |
| | ADD 18% FOR GST ON (A+B+E) | -RS. 2,70,19,179.00 |
| | ADD 28% FOR GST ON (C+D) | - RS. 34,15,996.00 |
| | ADD 4% CONTINGENCIES ON NET TOTAL | - RS. 64,92,262.00 |
| | ADD 5% CENTAGE CHARGES ON NET TOTAL | - RS. 81,15,327.00 |
| | TOTAL - | - RS. 20,73,49,304.00 |
| | **TOTAL ESTIMATED COST (R/o) - Rs.20,73,50,000.00** | |

प्रस्ताव:- तरी वरील विषयांकीत प्रकल्पासाठी आर्किटेक्ट सुशिल देशमुख अॅण्ड असो., औरंगाबाद यांनी सादर केलेल्या सुधारीत अंदाजपत्रकानुसार येणा-या अपेक्षित रु.२०,७३,५०,०००/- (अक्षरी रुपये वीस कोटी त्र्याहत्तर लक्ष पन्नास हजार) मात्र इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता मिळणेस विनंती. तसेच सदरहू प्रकल्प हा मोठया खर्चाचा व पायाभूत स्वरुपाचा प्रकल्प असल्याने मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचे मान्यतेकरीता प्रस्ताव सादर करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.१८५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं.८७,८८ मधील जागेत प्रसाद लाडू निर्मिती व्यवस्था इमारतीचे बांधकामासाठी सदर प्रकल्पाचे आर्किटेक्ट सुशिल देशमुख अॅण्ड असो., औरंगाबाद यांनी सादर केलेल्या सुधारीत अंदाजपत्रकानुसार येणा-या अपेक्षित रु.२०,७३,५०,०००/- (अक्षरी रुपये वीस कोटी त्र्याहत्तर लक्ष पन्नास हजार) मात्र इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदरचा प्रस्ताव मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१४ साई आश्रम भक्तनिवासस्थान इमारतीचे अंतर्गत रंगकाम व दुरुस्ती कामाचे ठेकेदार अॅडमायरकॉन इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.मुंबई यांनी काम पुर्ण करण्यासाठी दि.३१.१०.२०१९ अखेर मुदतवाढ मिळणेविषयी केलेल्या विनंतीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद:-

अधिनियम कलम २१ (१) अन्वये, समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय:- मा.व्यवस्थापन समिती दि.०१/०६/२०१८ निर्णय क्र.३४८ (२७) अन्वये, साई आश्रम भक्तनिवास इमारतीचे अंतर्गत रंगकाम व दुरुस्ती करणेसाठी जा.नं.एसएसएसटी/ बांधकाम/१२६०/२०१८, दि.१३/०६/२०१८ चे आदेशान्वये ठेकेदार अॅडमायरकॉन इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., मुंबई यांची नेमणूक करणेत आलेली आहे.

प्रस्तावना:- मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३४८ (२७) अन्वये, साई आश्रम भक्तनिवास इमारतीचे अंतर्गत रंगकाम व दुरुस्ती करणेसाठी निम्नतम निविदाधारक अॅडमायरकॉन इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., मुंबई यांची एकूण रु.४,८२,८९,६५२/- मात्रची निम्नतम दराची ई-निविदा स्विकारणेत येऊन त्यांना जा.क्र.१२६०/२०१८, दि.१३/०६/२०१८ अन्वये कार्यादेश देणेत आलेला आहे. ठेकेदार यांनी दि.२७/०६/२०१८ पासून कामास सुरुवात केलेली असून सदरहू कामाचा तपशिल व सद्यस्थिती खालीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| कामाचे नाव | साई आश्रम भक्तनिवास इमारतीचे अंतर्गत रंगकाम व दुरुस्ती करणे. |
| ठेकेदार | ॲडमायरकॉन इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., मुंबई. |
| कार्यादेश | जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/१२६०/२०१८, दि.१३/०६/२०१८. |
| मंजूर निविदा रक्कम | रु.४,८२,८९,६५२/-. |
| करारनामा दिनांक | दि.२०/०६/२०१८. |
| काम सुरु करण्याचा दिनांक | दि.२७/०६/२०१८. |
| कामाचा कालावधी | ०८ महिने. |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याचा दिनांक | दि.२६/०२/२०१९. |
| कामाची सद्यस्थिती | ठेकेदार यांचेमार्फत H, I, J, K, L या इमारतींचे तसेच प्रशासकीय इमारत, प्रसादालय कक्षाचे व ओएटीचे काम पूर्ण करुन साई भक्तांसाठी वापरास देणेत आलेली आहे. तसेच सध्या F-इमारतीचे रंगकाम व अंतर्गत दुरुस्तीचे काम प्रगतीत आहेत.<br>सदर कामाअंतर्गत साई आश्रम भक्तनिवास येथील एकूण १२ निवासी इमारती (१५३६ खोल्या), प्रशासकीय इमारत, प्रसादालय कक्ष तसेच ओ.ए.टी चे कामाचा समावेश आहे.<br>ठेकेदार यांचेमार्फत साईटवर सध्या २४ पेंटर, ०३ मदतनीस, ०१ गवंडी, ०१ सुतार, ०१ मुकादम व ०१ अभियंता कार्यरत आहे. |

ठेकेदार यांनी दि.२२/०४/२०१९ रोजीचे पत्राने, उर्वरीत कामे पूर्ण करणेसाठी खालील मुद्दे व अडचणी नमूद करुन मुदतवाढ मिळणेची विनंती केलेली आहे.

| अं.क्र. | ठेकेदार यांनी नमूद केलेला मुद्दा | माहिती |
|---|---|---|
| 01. | After receiving the work order we had mobilized the site within 7 days. The first J-buildings 2nd and 3rd floor was partly handed over on 23rd June 2018 and the balance was handed over in another 30 days as rooms were occupied by devotees.<br>Accordingly the Internal Paint samples were approved in 1st and 2nd week of July-2018 and toilet tiles and other samples were approved in July / August - 2018. | ठेकेदार यांना J - इमारतीचा दुसरा व तिसरा मजला दि.२१/०६/२०१८ रोजी हस्तांतरीत करणेत आलेला आहे व उर्वरित तळमजला व पहिला मजला पुढील ३० दिवसांत उपलब्ध करुन देणेत आलेला आहे.<br>आतील रंगकामाचे शेडचे नमुने दि.०५/०७/२०१८ व दि.११/०७/२०१८ रोजी मान्य करणेत आलेले आहेत व टॉयलेट डॅडो टाईल्स नमूने माहे जुलै-२०१८ मध्ये मान्य करणेत आलेले आहे. तसेच डोमचे पॉलीकार्बोनेट शिट नमुने दि.०९/०८/२०१८ रोजी मान्य करण्यात आले आहे. |
| 02. | The matching tile sample approved for the toilet dado was ordered by us but as you are aware that the same was not available with the local dealers which required certian time to be delivered at the site, hampering the progress of work and lapse of time. This affected the other relevant acitivites and finishing could not be done. | याबाबत ठेकेदार यांनी पूर्वनियोजन करणे अपेक्षित आहे. |
| 03. | In the month of August, September and October other buildings were not available for the work due to the Samadhi Shatabdi Year festival due to which we were not able to work as per our planning and submitted bar chart. Most of the buildings were acquired by devotees. | श्री साईबाबा समाधी शताब्दी कालावधीत तसेच सदर काम सुरु झाल्यापासून, म्हणजेच जून-२०१८ पासूनचे कालावधीत साई आश्रम भक्तनिवास येथिल इमारती कायमच भरलेल्या होत्या व ऑनलाईन बुकींग झालेल्या होत्या. त्यामूळे याकाळात ठेकेदार यांना कामासाठी जादा इमारती / खोल्या उपलब्ध करून देता आलेल्या नाहीत.<br>माहे जून - २०१८ ते मार्च - २०१९ अखेर साईभक्तांना |

<table>
<tr><td></td><td></td><td>वाटप केलेल्या खोल्यांचे टक्केवारीचा तक्ता खालीलप्रमाणे आहे. (एकूण खोल्या संख्या - १५४०)
<table>
<tr><th>महिना</th><th>खोल्या वापर संख्या</th><th>टक्केवारी</th></tr>
<tr><td>जुन-२०१८</td><td>१४४०</td><td>९३.५३ %</td></tr>
<tr><td>जुलै-२०१८</td><td>१३८१</td><td>८९.६९ %</td></tr>
<tr><td>ऑगस्ट - २०१८</td><td>१४६२</td><td>९४.९८ %</td></tr>
<tr><td>सप्टेंबर -२०१८</td><td>१५०७</td><td>९७.९२ %</td></tr>
<tr><td>ऑक्टोबर - २०१८</td><td>१४१९</td><td>९२.१५ %</td></tr>
<tr><td>नोव्हेंबर - २०१८</td><td>१३९०</td><td>९०.२९ %</td></tr>
<tr><td>डिसेंबर - २०१८</td><td>१४८६</td><td>९६.५० %</td></tr>
<tr><td>जोनवारी - २०१९</td><td>१५१९</td><td>९८.६४ %</td></tr>
<tr><td>फेब्रुवारी - २०१९</td><td>१५०१</td><td>९७.५० %</td></tr>
<tr><td>मार्च - २०१९</td><td>१४७९</td><td>९५.८९ %</td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>04.</td><td>As per our various previous correspondences, you are aware the initial difficulties faced by us in procurement of PVC Door Shutters from the approved manufacturer M/s. Rajshri who has much lesser production capacity then our desire quantity to match our work schedule (Ref. Our letter dated 23.10.2018 Ref.AIPL/SSST/2k18/10/09.). It took almost 60 days to set the procedure and procure the material from vender. Now it has been reqularized.<br>All the material suppliers, vendors and manufacturers of the products specified in the contract documents has been appointed and regularised to supply the approved material to site within time frame.</td><td>टॉयलेट व बाथरूमकरीता नविन बसवायचे पी. व्ही. सी. दरवाजाचे स्पेशिफिकेशनमध्ये व मेक्समध्ये राजश्री व अॅक्यूसेल या कंपनीचे दरवाजे नमूद आहे. पैकी ठेकेदार यांनी राजश्री कंपनीचे पी.व्ही.सी. दरवाजाचा नमुना साईटवर आणला होता व तो मान्य करणेत आला. राजश्री कंपनीचे पी. व्ही. सी. दरवाजे संबंधीत कंपनीकडून वेळेत पुरवठा होत नसल्याने ठेकेदार यांनी निविदेत नमूद दुस-या कंपनीचे दरवाजाचे पर्यायाची तपासणी करणे आवश्यक होते. तथापी मान्य झालेल्या राजश्री कंपनीचे पी. व्ही. सी. दरवाजे संबंधीत कंपनीकडून वेळेत पुरवठा होत नसल्याने कामास काही प्रमाणात विलंब झालेला आहे. सध्या सदर पुरवठा सुरळीत चालू आहे.</td></tr>
<tr><td>05.</td><td>As per our Bar Chart submitted by us at the inception of the project we had considered work front availability simultaneously at 4 building to complete the project in stipulated period of 9 months. However we were allocated 1 building at a time which has lapsed the schedule time period.</td><td>श्री साईबाबा समाधी शताब्दी काळात भक्तांची सोय व निवासव्यवस्था विचारात घेता व ऑनलाईन बुकिंग विचारात घेता ठेकेदार यांना कामासाठी एकावेळी फक्त ०१ इमारत कामासाठी उपलब्ध करून दिलेली आहे.</td></tr>
<tr><td>06.</td><td>Looking at the past experience and the availability of the work front made to us we require another 6 months to compete the balance work. Furthur this time period can be reduced if we are allotted atleast 3 buildings simultaneously in future.<br>We understand your concerns and</td><td>येथून पुढे साई आश्रम भक्तनिवास विभागामार्फत ठेकेदारास वेळोवेळी आवश्यकतेनूसार किमान ०२ इमारती एकाच वेळेस कामासाठी उपलब्ध करणे गरजेचे आहे जेणेकरून काम लवकरात लवकर पूर्ण करणे शक्य होईल.</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | acknowledge the same for the early completion of the project. We have also understood the devotee's regular schedule and occupancy in the Bhaktniwas. Our all the efforts and support in terms of labour deployment, material etc. will be made available according to the work front provided by your goodselves. | |

कामासाठी इमारत उपलब्ध करुन दिलेची दिनांक व काम पूर्ण करून साईआश्रम विभागाचे ताब्यात दिल्याची दिनांक तपशिल –

| अं.क्र. | इमारत | कामासाठी इमारत/मजला उपलब्ध करुन दिलेचा दिनांक | | | | काम पूर्ण झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | तळमाळा (रुम नं.०१ ते ३२) | पहिलामाळा (रुम नं.३३ ते ६४) | दुसरा माळा (रुम नं.६५ ते ९६) | तिसरा माळा (रुम नं.९७ ते १२८) | |
| ०१ | J – बिल्डींग | दि.३०/०६/१८ | दि.२७/०६/१८ | दि.२३/०६/१८ | दि.२१/०६/१८ | दि.१८/१०/१८ |
| ०२. | K – बिल्डींग | दि.०२/०९/१८ | दि.०२/०९/१८ | दि.३०/०८/१८ | दि.३०/०८/१८ | दि.३०/१०/१८ |
| ०३. | L – बिल्डींग | दि.०७/१२/१८ | दि.०७/१२/१८ | दि.०५/१२/१८ | दि.०४/१२/१८ | दि.१७/०१/१९ |
| ०४. | H – बिल्डींग | दि.१२/०१/१९ (रुम नं.०१ ते ०८) दि.१७/०१/१९ (रुम नं.०९ ते ३२) | दि.१७/०१/१९ | दि.१७/०१/१९ | दि.१७/०१/१९ | दि.३१/०३/१९ |
| ०५. | I – बिल्डींग | दि.१४/०२/१९ | दि.१३/०२/१९ | दि.१३/०२/१९ | दि.१३/०२/१९ | दि.१३/०४/१९ रोजी ९६ रूम ताब्यात दिल्या व उर्वरीत ३२ रूम दि.२२/०४/१९ रोजी काम पूर्ण करून ताब्यात दिल्या आहेत. |
| ०६. | OAT & R – बिल्डींग | बुकींग काऊटर हॉल दि.३०/०९/१८ | भोजन गृह दि.२५/१०/१८ | | | दि.३०/१०/१८ |
| ०७. | F – बिल्डींग | दि.१५/०४/१९ | दि.१६/०४/१९ | दि.१८/०४/१९ | दि.१७/०४/१९ | काम प्रगतीत. |

सदर कामासाठी प्रामुख्याने खालील कारणांमुळे विलंब झालेला आहे.

१) टॉयलेट व बाथरूमकरीता नविन बसवायचे पी. व्ही. सी. दरवाजाचे स्पेशिफिकेशन व मेक्समध्ये नमूद असलेले राजश्री कंपनीचे पी. व्ही. सी. दरवाजे संबंधीत कंपनीकडून वेळेत उपलब्ध झाले नाही.

२) ठेकेदार यांनीही सदर कामासाठी पुरेसे मनुष्यबळ, पेंटर, सुतार, गवंडी इ. साईटवर लावलेले नसल्याने तसेच काही मटेरीअल वेळेवर साईटवर उपलब्ध न केल्याने कामास काही प्रमाणात विलंब झालेला आहे.

३) श्री साईबाबा समाधी शताब्दी कालावधीत तसेच सदर काम सुरु झाल्यापासून म्हणजेच जून-२०१८ पासूनचे कालावधीत साई आश्रम भक्तनिवास येथिल इमारती कायम भरलेल्या होत्या व ऑनलाईन बुकींग झालेल्या होत्या. माहे जून - २०१८ ते मार्च - २०१९ अखेर साईभक्तांना वाटप केलेल्या खोल्यांची सरासरी ९४.७०% अशी आहे. त्यामुळे या काळात ठेकेदार यांना कामासाठी जादा इमारती / खोल्या उपलब्ध करून देता आलेल्या नाहीत.

ठेकेदार यांचे पत्रातील वरील बाबींचे अवलोकन करता व सदर कामासाठी आलेल्या अडचणींचा विचार करता ठेकेदार यांना विहीत मुदतीमध्ये सदर काम पूर्ण करता आलेले नाही. ठेकेदार यांनी सदर काम पूर्ण

करणेसाठी वरील दि.२२/०४/२०१९ रोजीचे पत्रान्वये दि.३१/१०/२०१९ अखेरपर्यंत मूदतवाढ मिळणेची विनंती केलेली आहे.

सदर काम वेळेत पूर्ण करणेसाठी ठेकेदार यांना एकाच वेळी किमान ०२ इमारती कामासाठी उपलब्ध करणे गरजेचे आहे तसेच ठेकेदार यांनीही आवश्यकतेनुसार जादा मनुष्यबळ, पेंटर, सुतार, गवंडी इ. साईटवर कामासाठी लावणे गरजेचे आहे. तसेच आवश्यक मटेरीअल वेळेवर उपलब्ध करणे गरजेचे आहे.

प्रस्ताव:- तरी वरील बाबींचे अवलोकन करता ठेकेदार यांना काम पूर्ण करणेसाठी दि.३१/१०/२०१९ अखेर मूदतवाढ देणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१८६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साई आश्रम भक्तनिवासस्थान इमारतीचे अंतर्गत रंगकाम व दुरुस्तीचे काम पूर्ण करण्यासाठी ठेकेदार ॲडमायरकॉन इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.मुंबई यांना दि.३१.१०.२०१९ अखेर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१५** **सितानगर एम.एस.ई.बी.कॉर्नर ते मिलीटरी कॅम्प पर्यंतच्या रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करणे कामाचे अंतिम देयक रक्कम रु.४५,४०,९९९/- मात्र मंजुर होऊन त्यापैकी निव्वळ देय रक्कम रु.३,३७,८१२/- मात्र ठेकेदार यांना आदा करणेस मंजुरी देणेबाबत.**

**प्रस्ताव-** सितानगर एम.एस.ई.बी. कॉर्नर ते मिलीटरी कॅम्प पर्यंतच्या रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याचे काम ठेकेदार एस.के.येवले ॲन्ड कंपनी, संगमनेरयांनी पूर्ण केले असून ठेकेदार यांनी सादर केलेल्या दुसरे व अंतिम बिलाची सविस्तर तपासणी करणेत आली आहे. ठेकेदार यांना अंतीम बिल अदा करणेकामी मा. व्यवस्थापन समितीची मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव तक्ता स्वरूपात खालीलप्रमाणे सादर करणेत येत आहे.

कामाचे नांव- सितानगर एम.एस.ई.बी. कॉर्नर ते मिलीटरी कॅम्प पर्यंतच्या रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करणे. (Ch.0/000 to Ch.0/500) (विद्युतीकरणाचे कामासह)

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | एस.के.येवले ॲन्ड कंपनी, संगमनेर |
| कार्यादेश क्रमांक व दिनांक | जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम/२६२१/२०१८ दि.३०/०८/२०१८ |
| मंजूर निविदा रक्कम | **रु.४४,०७,९२५/-** |
| मा. व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र ४९०(०९) दि.२६/०७/२०१८ |
| दुसरे व अंतिम बिलाची रक्कम (अ) | **रु.४५,४०,९९९/-** |
| आजपर्यंत अदा केलेली रक्कम (ब) | रु.४२,०३,१८७/- |
| **निव्वळ देय्य रक्कम (अ-ब)** | **रु.३,३७,८१२/-** |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु.१,३३,०७४/- अधिक (३.०१९ % अधिक) |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | दि.१३/०१/२०१९ |
| प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक | दि.१३/०१/२०१९ |

सितानगर एम.एस.ई.बी. कॉर्नर ते मिलीटरी कॅम्प पर्यंतच्या रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याचे काम ठेकेदार एस.के.येवले ॲन्ड कंपनी, संगमनेरयांनी दि.१३/०१/२०१९ अखेर विहीत मुदतीत पूर्ण केले आहे. ठेकेदार यांनी दि.२८/०२/२०१९ रोजीचे पत्रान्वये सदर कामाचे दुसरे व अंतिम बिल सादर केले आहे. श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षा निमीत्त वाहतूकीचे नियोजन करणेसाठी तसेच प्रसादालयात येणाऱ्या भाविकांसाठी परतीचा मार्ग याच रस्त्याने असल्याने विषयांकित रस्ता ते गोदावरी उजवा तट कालवा चारी क्र.११ बंदीस्त करुन विकसीत केलेत्या रस्त्यापर्यंत जोडणा-या लांबीमध्ये W.B.M. केल्यामुळे सदरहू कामी मंजुर निवीदा रक्कमेपेक्षा रु.१,३३,०७४/- मात्र (३.०१९%) अधिक खर्च आलेला आहे. त्यानुसार सदरहू कामाची Gross Value of Work Done रु.४५,४०,९९९/- मात्र होत असून यापुर्वी अदा केलेली रक्कम वजा जाता अंतिम बिलापोटी निव्वळ रक्कम रु.**३,३७,८१२**/- मात्र इतकी रक्कम देय आहे.

प्रस्ताव:- तरी सितानगर एम.एस.ई.बी. कॉर्नर ते मिलीटरी कॅम्प पर्यंतच्या रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरणकरणे (Ch.0/000 to Ch.0/500) (विद्युतीकरणाचे कामासह)कामाचे दुसरे व अंतिम देयक रक्कम रु.४५,४०,९९९/- मात्र मंजुर होऊन त्यापैकी निव्वळ देय रक्कम रु.३,३७,८१२/- मात्र ठेकेदार यांना आदा करणेस निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१८७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सितानगर एम.एस.ई.बी.कॉर्नर ते मिलीटरी कॅम्प पर्यंतच्या रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करणे कामाचे बिलाची एकुण रक्कम रु.४५,४०,९९९/- मात्र मंजूर करण्यात येऊन त्यापैकी उर्वरीत शिल्लक देय रक्कम रु.३,३७,८१२/- मात्र सदर कामाचे ठेकेदार एस.के.येवले अॅन्ड कंपनी, संगमनेर यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१६** **श्री साई प्रसादालय मुख्य प्रसादभोजन हॉल, मुख्य किचन व बुंदी किचन मधील फ्लोरींग व डॅडोला सध्या असलेल्या व्हेट्रीफाईड टाईल्स/ट्रेमिक्स कॉक्रीट काढून सदर ठिकाणी नवीन ग्रेनाईट फ्लोरींग व डॅडो बसविणेकामाचे तिसरे व अंतिम देयक रु.१,६८,३८,११२/- मात्र मंजुर होऊन त्यापैकी निव्वळ देय रक्कम रु.४,४२,०४६/- मात्र ठेकेदार यांना आदा करणेस मंजुरी देणे.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालय मुख्य प्रसादभोजन हॉल, मुख्य किचन व बुंदी किचन मधिल फ्लोअरींग व डॅडोला सध्या असलेल्या व्हेट्रीफाईड टाईल्स / ट्रेमिक्स कॉक्रीट काढून सदर ठिकाणी नवीन ग्रेनाईट फ्लोअरींग व डॅडो बसविणेचे काम ठेकेदार आर. के. सावंत, नाशिकयांनी पुर्ण केले असून ठेकेदार यांनी सादर केलेल्या तिसरे व अंतिम बिलाची सविस्तर तपासणी करणेत आली आहे. ठेकेदार यांना अंतीम बिल अदा करणेकामी मा. व्यवस्थापन समितीची मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव तक्ता स्वरूपात खालीलप्रमाणे सादर करणेत येत आहे.

कामाचे नांव- श्रीसाई प्रसादालय मुख्य प्रसादभोजन हॉल, मुख्य किचन व बुंदी किचन मधिल फ्लोअरींग व डॅडोला सध्या असलेल्या व्हेट्रीफाईड टाईल्स / ट्रेमिक्स कॉक्रीट काढून सदर ठिकाणी नवीन ग्रेनाईट फ्लोअरींग व डॅडो बसविणे

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | आर. के. सावंत, नाशिक |
| कार्यादेश क्रमांक व दिनांक | जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम/४८८२/२०१७ दि.१५/१२/२०१७ |
| मंजूर निविदा रक्कम | **रु.१,८९,६२,२२३/-** |
| मा. व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र १००४(०२) दि.१४/११/२०१७ |
| तिसरे व अंतिम बिलाची रक्कम (अ) | **रु.१,६८,३८,११२/-** |
| आजपर्यंत अदा केलेली रक्कम (ब) | रु.१,६३,९६,०६६/- |
| **निव्वळ देय्य रक्कम (अ-ब)** | **रु.०४,४२,०४६/-** |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु.२१,२४,१११/- कमी |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | दि.०२/०८/२०१८ |
| मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेनुसार मिळालेली वाढीव मुदतवाढ | मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ रोजीचे सभेतील नि.क्र.४८ नुसार दि.१५/०३/२०१९ पर्यंत मुदतवाढ देणेत आली आहे. |
| प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक | दि.२५/०२/२०१९ |

श्री साई प्रसादालय मुख्य प्रसादभोजन हॉल, मुख्य किचन व बुंदी किचन मधिल फ्लोअरींग व डॅडोला सध्या असलेल्या व्हेट्रीफाईड टाईल्स / ट्रेमिक्स कॉक्रीट काढून सदर ठिकाणी नवीन ग्रेनाईट फ्लोअरींग व डॅडो बसविणेचे काम ठेकेदार आर. के. सावंत, नाशिक यांनी दि.२५/०२/२०१९ अखेर विहीत मुदतीत काम पूर्ण केले आहे. ठेकेदार यांनी दि.२९/०३/२०१९ रोजीचे पत्रान्वये तिसरे व अंतिम बिल सादर केले आहे. त्यानुसार सदरहू कामाची Gross Value of Work Done रु.१,६८,३८,११२/- मात्र होत असुन या पुर्वी अदा केलेली रक्कम वजा जाता अंतिम बिलापोटी एकूण रक्कम रु.४,४२,०४६/- मात्र इतकी रक्कम देय आहे.

तरी श्री साई प्रसादालय मुख्य प्रसादभोजन हॉल, मुख्य किचन व बुंदी किचन मधिल फ्लोअरींग व डॅडोला सध्या असलेल्या व्हेट्रीफाईड टाईल्स / ट्रेमिक्स कॉक्रीट काढून सदर ठिकाणी नवीन ग्रेनाईट फ्लोअरींग व डॅडो बसविणेकामाचे तिसरे व अंतिम देयक रक्कम **रु.४,४२,०४६/-** मात्र आदा करणेस निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१८८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालय मुख्य प्रसादभोजन हॉल, मुख्य किचन व बुंदी किचन मधील फ्लोरींग व डॅडोला सध्या असलेल्या व्हेट्रीफाईड टाईल्स/ट्रेमिक्स कॉक्रीट काढून सदर ठिकाणी नवीन ग्रेनाईट फ्लोरींग व डॅडो बसविणे कामाचे एकुण बिलाची रक्कम रु.१,६८,३८,११२/- मात्र मंजूर करण्यात येऊन त्यापैकी उर्वरीत शिल्लक देय रक्कम रु.४,४२,०४६/- मात्र सदर कामाचे ठेकेदार आर.के.सावंत, नाशिक यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१७ संस्थानचे साईगार्डन प्रकल्पातंर्गत मे.लेजर व्हिजन लि., हॉगकॉग यांना अदा केलेली रक्कम वसूल करणेसाठी श्री.नितीन जी.ठक्कर, सिनिअर काऊंसिल, मुंबई यांची मिडीएटर म्हणून नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मौजे निमागांव कोऱ्हाळे येथील संस्थानचे गट नं.१९८, १९९, २०० व २०१ मध्ये मा. व्यवस्थापन समितीचे दि.१७/०२/२००७ रोजीचे सभेत साईगार्डन करण्याचे ठरले होते. या प्रकल्पातंर्गत श्री साईबाबांच्या जिवनावर अधारीत लेजर शो तयार करणेसाठी लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांना US$५५,००,००० मात्रचा कार्यादेश देणेत आला होता. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचेशी झालेल्याकरारानुसार त्यांनी केलेल्या कामापोटी Payment Stages ०१ ते ०४ व ०७ ते ०८ करीता US$२१,४५,००० अदा करणेत आलेले आहे.

लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांनी त्यांचे दि.०५/११/२०१२, दि.१७/१२/२०१२ व दि.२६/०२/२०१३ रोजीचे पत्रान्वये करारनाम्यातील Payment Schedule ०५ व ०६ नुसार US$१५,४०,००० ची बिले सादर केलेली होती.याबाबत मा.त्रिसदस्य समितीचे दि.१५/०३/२०१४ रोजीचे सभेतील नि.क्र.१८२ अन्वये मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचे बिल अदा करणेकामी संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले होते. त्यानुसार संस्थानचे वकील श्री. संजय चौकीदार यांनी CAST/८७०८/२०१४ दि.२५/०७/२०१४ अन्वये मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात सिव्हिल ॲप्लिकेशन दाखल केले होते.

प्रस्तुत प्रकरणी मे. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांनी त्यांचे दि.०३/०३/२०१७ रोजीच्या (संस्थानकडे प्राप्त दि.२३/०३/२०१७) पत्रान्वये त्यांचेशी केलेले करारनाम्यातील अट क्र.२५ नुसार संस्थानला टर्मिनेशन नोटीस दिलेली होती. सदर नोटीसबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि.०४/०४/२०१८ रोजीचे सभेत मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांचे समवेत अर्बिट्रेशनची कार्यवाही करावी असा निर्णय झालेला आहे. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दि.१४/१२/२०१८ रोजीचे पत्रातील क्रं.०३ नुसार लेजन व्हिजन यांचेबरोबर झालेल्या करारनाम्यातील क्लॉज ३१ नुसार आर्बिट्रेशन करणेपुर्वी प्रथम Mediation साठी जाणे आवश्यक असल्याचे कळविले आहे. याबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला होता.

सदर सभेत निर्णय क्रं.४१ अन्वये, संस्थानचे साईगार्डन प्रकल्पासंबधी मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांनी दिलेल्या टर्मिनेशन नोटीसीस अनुसुरुन करारनाम्यातील तरतुदीप्रमाणे प्रथम मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांना मिडीएशनची नोटीस द्यावी, असे ठरले त्यासाठी राजस्थान उच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायाधीश मा.श्री.पळशीकर यांना मिडीएटर म्हणून प्रस्तावित करावे, असे समिती सदस्य मा.ॲड. मोहन जयकर यांनी सूचविले, त्यास समितीने मान्यता दिली. तसेच मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांनी मिडीएशनसाठी तयारी न दर्शविल्यास करारनाम्यातील तरतुदीप्रमाणे अर्बिट्रेशनची कार्यवाही करावी, असे ठरले आहे.

तथापी समिती सदस्य ॲड. मोहन जयकर यांनी संस्थानचे वतीने ॲड.जुन्नरकर ॲण्ड असोशिएटस, मुंबई यांचेमार्फत लेजन व्हिजन यांना दि. ११/०२/२०१९ रोजीचे पत्राने मिडीएशन करीता नोटीस दिलेली आहे. यामध्ये मिडीएटर म्हणून श्री नितिन जी ठक्कर, सिनिअर काऊंसिल, मुंबई यांची नेमणूक करणेबाबत कळविले आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे झालेली कार्यवाही माहिती व मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.१८९ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे साईगार्डन प्रकल्पासंबधी मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांनी दिलेल्या टर्मिनेशन नोटीसीस अनुसरुन करारनाम्यातील तरतुदीप्रमाणे मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांना संस्थानचे वतीने ॲड.जुन्नरकर ॲण्ड असोशिएटस, मुंबई यांचेमार्फत मिडीएशन करीता नोटीस देण्यात आलेली असुन त्याची नोंद घेण्यात आली. तसेच यासाठी निवृत्त मुख्य न्यायाधीश मा.श्री.पळशीकर यांचे ऐवजी निवृत्त मुख्य न्यायाधीश मा.श्री.ए.पी. कानडे यांची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१८ श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय इमारतीचे नांदुर्खी रस्त्यालगत संरक्षण भिंत बांधकाम ठेकेदार डी.बी.फोपसे, वैजापुर यांचे अंतिम बिल रु.८६,२९०/- मंजुर करुन आदा करणेस मान्यता देणे.**

**प्रस्ताव-** श्रीसाईनाथ माध्यमीक विद्यालयाचे इमारतीचे संरक्षणाचे दृष्टीने या रस्त्याचे बाजूने संरक्षक भिंत बांधणेबाबत दि.२५/०२/२०१७ रोजीचे पत्राने मा. नगराध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत तथा विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांनी विनंती केली होती. प्रथम प्राधान्यगटातील ११ रस्त्यांपैकी नांदुर्खी रस्ता (लांबी १८०० मी.) भूसंपादन व विकसन काम शिर्डी नगरपंचायतीने दिलेल्या डिमार्केशननुसार संस्थान निधीतून करणेत

आले आहे. सदर रस्त्याचे बाजूने रिटेनिंग वॉलचे दगडी बांधकाम करणेत आले आहे. यादगडी बांधकामातील पायावर संरक्षक भिंतीचे बांधकाम, त्यावर ०.९० मी. उंचीची चेनलिंक फेन्सिंग, एम. एस. गेट बसविणे वसिमेंट पेंटने भिंतीस रंगकाम करणे इ. कामांसाठी ठेकेदार डी. बी. फोपसे, वैजापूर यांना कार्यादेश देण्यात आला होता. ठेकेदार यांनी एकूण ६५ मी. पैकी सुमारे ४१ मी. लांबीतील बांधकाम व जाळीसाठी अॅगल्स मार्च २०१८ अखेर बसविले. उर्वरीत २४ मी. भागात रिटेनिंग वॉलचे दगडी बांधकामावर पुढील उर्वरीत भागात काम करणेस रस्त्याचे पश्चिमेकडील मालमत्ताधारक यांनी हरकत घेतल्याने त्यांचेसमवेत नगरपंचायत अधिकारी व पदाधिकारी यांचे उपस्थितीत वेळोवेळी चर्चा करून काम पुन:श्च सुरु करणेसाठी प्रयत्न करणेत आले. मात्र मालमत्ताधारक यांचे हरकतीमुळे ठेकेदार यांना काम पूर्ण करता आलेले नाही. त्यामुळे श्रीसाईनाथमाध्यमीकविद्यालयाने या भागात अॅगल्स व कलर कोटेड शिट वापरून कंपाउंड पूर्ण केलेले आहे. पुढील काम करता येत नसल्याने ठेकेदार यांनी झालेल्या कामाचे रु.८६,२९०/- रकमेचे पहिले व अंतिम बिल सादर केले आहे. या बिलाची तपासणी करणेत आली असुन ठेकेदार यांना सदर बिल अदा करणेस मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळणेकामी खालीलप्रमाणे तक्त्याचे स्वरुपात सादर करण्यात येत आहे.

कामाचे नांव- श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय इमारतीचे नांदुर्खी रस्त्यालगत संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे.

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | डी.बी.फोपसे, वैजापूर |
| कार्यादेश क्रमांक व दिनांक | एसएसएसटी/बांधकाम /६२५६/२०१८ दि.२१/०२/२०१८ |
| मंजूर निविदा रक्कम | रू.३,४९,३११/- |
| मा.व्यवस्थापन समिती निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र.७६(१०) दि.०२/०२/२०१८ |
| अंतिम बिलाची रक्कम | रु.८६,२९०/- |
| आजपर्यंत अदा केलेली रक्कम | -- |
| उर्वरीत शिल्लक देय रक्कम | रु.८६,२९०/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु.२,६३,०२१/-(कमी) |
| अंतिम बिलाचीउर्वरीत रक्कम | रु.८६,२९०/- |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | दि.०७/०५/२०१८ |

**प्रस्ताव-** ठेकेदार डी.बी.फोपसे, वैजापूर यांनी दि.३०/०३/२०१८ अखेर उपलब्ध भागात काम केले असुन ठेकेदार यांनी दि.१८/०८/२०१८ रोजीचे पत्रान्वये रु.८६,२९०/-मात्र इतक्या रकमेचे बील सादर केले आहे . ठेकेदार यांना प्रत्यक्ष झालेल्या कामाचे मोजमापानुसार अंतिम बिलापोटी एकूण रक्कम रु.८६,२९०/-मात्र इतकी रक्कम देय आहे .संरक्षक भिंतीचे राहीलेले काम पूर्ण करणेसाठी संस्थानचे मालमत्ता विभागामार्फत भुमिअभिलेख विभागाकडून मोजणी करुन घेण्यात येत आहे. त्यानंतर नव्याने निविदा मागवून काम करता येईल.

तरी ठेकेदार डी.बी.फोपसे, वैजापूर यांचे झालेले कामाचे पहिले व अंतिम बील रक्कम रु.८६,२९०/- अदा करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१९०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय इमारतीचे नांदुर्खी रस्त्यालगत संरक्षण भिंत बांधकाम करणे कामाचे एकुण बिलाची रक्कम रु.८६,२९०/-मात्र सदर कामाचे ठेकेदार डी.बी.फोपसे, वैजापूर यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१९** **शिर्डी येथील (NH-160) अहमदनगर मनमाड रस्ता सुशोभिकरण करणे कामाचे प्रकल्प सल्लागार आर्कोहम कंन्सल्टस् प्रा.लि.नोयडा यांनी सादर केलेल्या प्राथमिक आराखडे व अंदाजपत्रक रक्कम रु.३,२५,९६,२५०/- मात्रला मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः -

०१. अधिनियमाचे कलम १७ (१) नुसार राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व परंपरा प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कमी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील. ०२. अधिनियमाचे कलम २१ मधिल

पोट कलम (१क) अन्वये, विश्वस्तव्यवस्थेस राज्य शासनाच्या पूर्व मंजूरीने आणि राज्य शासनाकडून राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कमाल मर्यादेच्या आणि अशा अटी व शर्तींच्या अधिन राहून, भक्तांच्या सोयीसाठी बस वाहनतळ, रेल्वे स्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभुत सुविधा या सारख्या पायाभुत सुविधा पुरविणेसाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकिय विभागांना, शासकिय महामंडळांना, शासकिय कंपन्यांना किंवा शासकिय उपक्रमांना साहाय्यक अनुदान देता येईल अशी तरतूद आहे.

मा. व्यवस्थापन समितीचेसभेतील निर्णय:- मा. व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेत रु. ३,२५,२९,८२५/- खर्चाचा प्रस्ताव खालीलप्रमाणे सादर करणे आला होता.

अ) सदर रस्त्याची शहरातील लांबी कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प (सा. बां. विभाग), अहमदनगर यांचे अखत्यारीत असल्याने शासनामार्फत निधी उपलब्ध करून त्यांनी रस्ता विकसीत करणे.**अथवा**

ब) सदरहु रस्त्याकरीता शासनाकडून निधी उपलब्ध करणे शक्य नसल्यास संस्थानमार्फत निधी उपलब्ध करून देणे व जागतिक बॅंक प्रकल्प (सा. बां. विभाग), अहमदनगर यांनी रस्ता विकसीत करणे.**अथवा**

क) याकामी सल्लागाराची नेमणूक करून कार्यकारी अभियंता,जागतिक बॅंक प्रकल्प (सा. बां. विभाग), अहमदनगर यांची रस्ता विकसीत करणेसाठी ना-हरकत/परवानगी घेवून संस्थानकडून निधी उपलब्ध करून संस्थानमार्फत सदरहु काम करता येईल.

सदरहु प्रस्तावावरील निर्णय क्र.९७९ खालीलप्रमाणे आहे.

“..यावरसविस्तरचर्चाहोऊन, शिर्डी शहरातून जाणाऱ्या नगर मनमाड महामार्गावर लक्ष्मीनगर वसाहत ते साई आश्रमया भागातील दुभाजकामध्ये रेलिंग बसविणे, खराब झालेले पेव्हींग ब्लॉक्स बदलणे तसेच दुभाजक व कर्बस्टोन चे रंगकाम करणेकामी प्रस्तावातील क मध्ये नमूद केले प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली. तसेच शिर्डी शहरामधील इतरही चौकांचे सुशोभिकरण करणेकामी शिर्डी नगरपंचायतीकडून प्रस्ताव मागविणेत यावा, असे ठरले.”

उपरोक्त निर्णयानुसार इतर चौकाचे सुशोभिकरणबाबत लोकेशन प्लॅनसह प्राथमिक आराखडे व अंदाजपत्रके पाठविणेबाबत शिर्डी नगरपंचायतीस दि.१२/०३/२०१८ चे पत्राने कळविण्यात आले आहे. वरील कागदपत्रे अद्याप अप्राप्त आहेत.

प्रस्तावना:- मा. व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१८ रोजीचे सभेतील निर्णयानुसार आर्कोहम कन्सल्टस् प्रा. लि. नोयडायांना नेमणूकपत्र देणेत आले आहे. याकामी प्रकल्प सल्लागार यांनी दि.३१/१०/२०१८ (प्राप्त दि.१२/११/२०१८) रोजीचे पत्राने प्रकल्पाचे प्राथमिक आराखडयांबाबतची माहिती पुस्तिका पाठविली आहे. त्याबाबतचा संक्षिप्त तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

A. Scope of work –

a.Enhancing Network

i. Redefining street sections to allow easy traffic movement as well as pedestrian connectivity & facilities.

ii. Integrating the approaches connecting the main spine for seamless junction.

b. Creating a plaza

i. Expanding pedestrian zone along the road to accommodate pedestrian facilities like benches, bins, planets, light poles etc.

c. Creating a character-

i. Lighting- Marker lighting, Façade lighting.

ii. Furniture - benches, bins, Railings/Screens

iii. Signage – Way finding, Location, Information/Storytelling

iv. Installations- Sculpture, City maps

v. Visitor Facilities- Kiosks, Bus Shelters, Toilets

vi. Visitor Experience- Museum, Project mapping, Branding,

B. Estimated Cost.- Rs.44.27 Crores.

याकामी सल्लागार आर्कोहम कन्सल्टस् प्रा.लि. नोयडायांनी ढोबळमानाने रू.४४.२७ कोटी इतका अंदाजपत्रकीय खर्च कळविला होता. मात्र सदर कामासाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेतील निर्णयानुसार रु.३.२५ कोटी इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली असल्याने सल्लागार यांना इकडील

दि.१४/१२/२०१८ रोजीचे पत्राने रु.३.२५ कोटी खर्चाचा प्रस्ताव सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार सल्लागार यांनी दि.११/०३/२०१९ (प्राप्त दि.१९/०३/२०१९) चे पत्राने सुधारीत प्रस्ताव सादर केला आहे.त्याबाबतचा संक्षिप्त तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

A. Scope of work -

1. Enhancing Network

a. Redefining street sections to allow easy traffic movement as well as pedestrian connectivity & facilities.

2. Creating a plaza

a. Expanding pedestrian zone along the road at the entrance to the temple area accommodate pedestrian facilities like benches, bins, planets etc.

3. Creating a character-

i Furniture - benches, bins, Railings/Screens

ii Signage – Facility and Location, Information/Storytelling

iii Installations- Sculpture, City maps

a. B. Estimated Cost.- Rs.3,25,96,250/-.

C. उपरोक्त प्रस्तावातखालीलकामेसमाविष्ट आहेत.

| Sr. No. | Description | Unit | Length | Width/ Height | Quantity | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | FOOTPATH | | | | | | |
| | Dismantling of existing pavers (L.H.S) | Sqm | 1,600.00 | 2.00 | 3,200.00 | 110.00 | 3,52,000/- |
| | Dismantling of existing pavers (R.H.S) | Sqm | 1,600.00 | 2.00 | 3,200.00 | 110.00 | 3,52,000/- |
| | Removal of existing kerb (L.H.S | RM. | 1,600.00 | | 1,600.00 | 20.00 | 32,000/- |
| | Removal of existing kerb (R.H.S) | RM. | 1,600.00 | | 1,600.00 | 20.00 | 32,000/- |
| | Providing stone cobbles (mandir entrance) | Sqm | 130.00 | 6.50 | 845.00 | 2300.00 | 19,43,500/- |
| | Providing stone cobbles (typical L.H.S) | Sqm | 1470.00 | 2.00 | 2940.00 | 2300.00 | 67,62,000/- |
| | Providing stone cobbles (typical R.H.S) | Sqm | 1,600.00 | 2.00 | 3,200.00 | 2300.00 | 73,60,000 /- |
| | Providing stone kerbs (L.H.S) | RM. | 1,600.00 | | 1,600.00 | 550.00 | 8,80,000/- |
| | Providing stone kerbs (L.H.S) | RM. | 1,600.00 | | 1,600.00 | 550.00 | 8,80,000/- |
| | Total | | | | | | 1,85,93,500/- |
| 02 | MEDIANS | | | | | | |
| | Minor civil works | LS | | | | | 1,00,000/- |
| | Painting on existing kerbs(2 sides) | Sqm | 3200.00 | 0.30 | 3,200.00 | 150.00 | 4,80,000/- |
| | Total | | | | | | 5,80,000/- |
| 03 | CARRIAGWAY @ MANDIR ENTRANCE | | | | | | |
| | Dismantling of flexible pavement (L.H.S) | Cum | 130.00 | 17.00 x 0.25 | 552.50 | 1,400.00 | 7,73,500/- |
| | Dismantling of flexible pavement (R.H.S) | Cum | 130.00 | 17.00x 0.25 | 552.50 | 1,400.00 | 7,73,500/- |
| | Stone cobble @ mandir entrance (L.H.S) | Sqm | 130.00 | 17.00 | 2,210.00 | 2,500.00 | 55,25,000/- |
| | Stone cobble @ mandir entrance (R.H.S) | sqm | 130.00 | 17.00 | 2,210.00 | 2,500.00 | 55,25,000/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | TOTAL | | | | | | 1,10,50,000/- |
| 04 | RAILING WORKS @ MANDIR ENTRANCE | | | | | | |
| | Civil works(sub structure) for railing | kg | | | 1,950.00 | 90.00 | 1,75,500/- |
| | Civil works & finishing railings | RM | 130.00 | 1.00 | 130.00 | 150.00 | 19,500/- |
| | TOTAL | | | | | | 1,95,000/- |
| 05 | MISCELLENEOUS WORKS @ MANDIR ENTRANCE | | | | | | |
| | Providing location& facility signages | nos | | | 6.00 | 80,000.00 | 4,80,000/- |
| | Providing story signages | nos | | | 4.00 | 1,00,000.00 | 4,00,000/- |
| | Providing street furniture bench | nos | | | 4.00 | 20,000.00 | 80,000/- |
| | Providing street furniture bins | nos | | | 2.00 | 10,000.00 | 20,000/- |
| | Art work/sculpture | nos | | | 1.00 | 1,50,000.00 | 1,50,000/- |
| | TOTAL | | | | | | 11,30,000/- |
| 06 | LANDSCAPING | | | | | | |
| | Horticulture works (ground covers, shrubs, trees) | sqm | | | 698.50 | 1,500.00 | 10,47,750/- |
| | TOTAL | | | | | | 10,47,750/- |
| | **GRAND TOTAL** | | | | | | **3,25,96,250/-** |

सदरहु रस्ता जागतिक बँक प्रकल्प (सार्वजनिक बांधकाम विभाग) अहमदनगर यांचे अखत्यारीत असल्याने सदर सुशोभिकरणाचे काम करणेस त्यांची परवानगी घेणे आवश्यक राहील. तसेच उपरोक्त अंदाजपत्रकास सार्वजनिक बांधकाम विभागाची तांत्रिक मान्यता घ्यावी लागेल. त्यानंतरश्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदीनुसार राज्य शासनाचे विधी व न्याय विभगाची पूर्वमान्यता घ्यावी लागेल.

**प्रस्ताव** :- तरी शिर्डी शहरातील अहमदनगर मनमाड रस्ता सुशोभिकरण करणेकामी सल्लागार आर्कोहम कन्सल्टस् प्रा.लि. नोयडायांचे अंदाजपत्रकानुसार रु.३,२५,९६,२५०/-मात्र खर्चास मान्यता मिळणेस, सदरहु प्रकल्पाचे सविस्तर अंदाजपत्रक प्रचलित राज्य दरसुचीनुसार आर्किटेक्ट यांचेमार्फत तयार करून सार्वजनिक बांधकाम विभागाचे तांत्रिक मान्यतेसाठी तसेच राज्य शासनाचे विधी व न्याय विभागाचे मान्यतेसाठी सादर करणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती

**निर्णय क्र.१९१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी येथील (NH-160) अहमदनगर मनमाड रस्ता सुशोभिकरण करणे कामाचे प्रकल्प सल्लागार आर्कोहम कंन्सल्टंट प्रा.लि.नोयडा यांची नेमणूक रद्द करणेत यावी, शिर्डी येथील (NH-160) अहमदनगर मनमाड रस्ता सुशोभिकरण करणेकामी प्रथम डिझाईन प्रस्ताव मागविणेत यावेत, डिझाईन निश्चीत करुन त्यानुसार ई-निविदा मागविण्यात याव्यात, असे ठरले.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.२०** **शताब्दी सोहळयानिमित्त कोपरगाव कोल्हार रस्ता प्ररामा ०८ वर तात्पुरत्या स्वरुपात उभारणेत आलेल्या स्वागत कमानीचे बांधकामाबाबत अधिक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर यांचे दि.२१.०२.२१०९ रोजीचे पत्राबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः-

अधिनियमाचे कलम १७ (१) नुसार राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मीक विधी, पूजा-अर्चा समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे ही समितीची कर्तव्ये असतील, अशी तरतूद आहे.

मा.व्यवस्थापन समितीचा ठरावः- मा. व्यवस्थापन समितीचे दि.०५/१०/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६३१ अन्वये खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आलेला आहे.

" संस्थानमार्फत नगर-मनमाड हायवेवर देणगीदारामार्फत तात्पुरत्या स्वरुपात स्वागत कमानी तयार करण्याचे काम चालू आहे. सदर कमानी उभारणेकामी देणगीदाराने रक्कम न दिल्यास ती संस्थानमार्फत अदा करणेस मान्यता देण्यात आली, तसेच शक्य होईल तेवढी कामे संस्थानचे संबधीत विभागामार्फत करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच स्वागत कमानीचे ठिकाणी लाईटींग व फुलांची सजावट करण्यात यावी. "

प्रस्तावना-श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षा निमीत्त कोपरगाव-कोल्हार (प्र.रा.मा.८) यावर तात्पुरत्या स्वरुपात स्वागत कमानी उभारणीकरीता साईभक्त डॉ.सुमनजी, चेअरमन, साईधाम फौंडेशन, मुंबई यांनी त्यांचे दि.०४/०७/२०१८ रोजीचे व्हॉटस्अॅप व्दारे प्राप्त झालेल्या पत्राने देणगी दाखल स्वागत कमान उभारणे बाबत ईच्छा प्रदर्शीत केली होती. त्यानुसार त्यांना देणगीदाखल कमान उभारणीचे काम सुरु करणेसाठी दि.११/०७/२०१८ रोजीच्या पत्राने कळविणेत आले होते. साईधाम फौंडेशन, मुंबई यांचे मार्फत सदरहू कमानीचे कामातील सिव्हील व फॅब्रीकेशनचे काम अरिहंत इंजिनीअरींग वर्क्स, औरंगाबाद यांचेकडून करुन घेतले आहे व त्यावर एफ.आर.पी शिटमध्ये सजावट करण्याचे काम श्री.अमन विधाते व श्री.विलास महाडीक, मुंबई यांचेमार्फत करणेत आलेले आहे.

सदर स्वागत कमानीचे बांधकामाबाबत कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प (सा.बां) विभाग, अहमदनगर यांचे दि.०३/१२/२०१८ रोजीचे पत्राने, सदर कमानीस तात्पूरत्या स्वरुपात एक दिवसासाठी सुरक्षित असलेबाबतचे पत्र दिलेले असून सद्यस्थितीत श्री साईशताब्दी सोहळा समाप्त झालेला असल्याने सदरची कमान तातडीने काढून घेणेबाबत कळविले होते. दि.०३/१२/२०१८ रोजीचे पत्रास अनुसरुन, संस्थानकडून सदरची स्वागत कमान सेफ अॅन्ड स्टेबल असलेलेबाबत इंजिनिअर श्री.प्रदिप व्ही.मोटे, औरंगाबाद यांनी प्रमाणपत्र दिलेले आहे तसेच स्वागत कमान उभारणीसाठी त्यांचेकडील दि.२१/०६/२०१८ रोजीचे पत्रातील सर्व अटींची पूर्तता संस्थानने केली असल्याने सदर कमानीची प्रत्यक्ष पाहणी करुन सदरहू स्वागत कमान पुढील पाच वर्षासाठी ठेवणेसाठी मान्यता मिळणेसाठी दि.२२/१२/२०१८ रोजीचे पत्राने प्रस्ताव कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प (सा.बां) विभाग, अहमदनगर यांचेकडे सादर करणेत आला होता.

त्यानंतर कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प (सा.बां) विभाग, अहमदनगर यांनी दि.०७/०२/२०१९ रोजीचे पत्राने विषयांकित स्वागत कमान काढून घेणेबाबत कळविले आहे. तसेच आता, अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर यांनी दि.२१/०२/२०१९ रोजीचे पत्राने विषयांकित स्वागत कमान काढून घेणेबाबत खालील प्रमाणे कळविले आहे.

"...कोपरगाव-कोल्हार (प्र.रा.मा.८) रस्त्यावर स्वागत कमान उभारणेस या कार्यालयाने तात्पुरत्या स्वरुपाची परवानगी दिलेली होती. रस्ता सुरक्षेच्या दृष्टीने सदरची काम रस्त्यास अडथळाच ठरत असून खाजगी अभियंत्यांकडून जरी Stability Certificate दिले गेले असले, तरी प्रत्यक्ष झालेल्या कामाचा दर्जा व पहाणी केली असता या कमानीच्या Stability बाबत या कार्यालयास निश्चितच शंका आहे. आपणांस पुन्हा विनंती करण्यात येते की उपरोक्त बाबींचा साकल्याने विचार करता सदरची कमान काढणेच क्रमप्राप्त ठरते. त्यामुळे सदरहू स्वागत कमानीस पुढील पाच वर्षाकरीता मान्यता देण्याचा प्रश्नच उदभवत नाही. सद्यस्थितीत श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा समाप्त झालेला असल्याने व प्रत्यक्ष करण्यात आलेल्या कामाचा दर्जा, उंची, हवेचा दाब, बाजूस असलेल्या विद्युत तारा, मनमाड महामार्गावरुन होणारी प्रवाशांची वाहतूक इ. यांचा सखोल विचार करता सदरची कमान तातडीने काढून घेण्यात यावी जेणेकरुन सदर रस्त्यावरील प्रवाशांची जिवित व वित्तहानी होणार नाही. अशा प्रकारची घटना पुणे येथे काही दिवसांपूर्वी झाली होती. तरी याबाबत तात्काळ कार्यवाही न झाल्यास पुढील जबाबदारी सर्वस्वी आपलीच राहील." असे कळविले आहे.

स्ट्रक्चरल सल्लागार इंजिनिअर श्री.प्रदिप व्ही.मोटे, औरंगाबाद यांनी त्यांचे दि.१४/०३/२०१९ रोजीचे स्टॅबीलिटी सर्टिफिकेट मध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

The Structural work of the above proposal has been carried out as per my structural design changes has been made at site. As per site condition and guidance by fiber/design moulds installe and structural design of the said structure varies partially which was design on request by our client arihant engineering work for the purpose for which it is intended. Provided no damage externally should be done to the original R.C.C frame structure. (Fiber moulds are not calculated / included in my design)

विभागाचा अभिप्राय- स्वागत कमानीचे काम हे साईधाम फौंडेशन, मुंबई यांचेमार्फत देणगीदाखल करणेत येत होते. सदरची स्वागत कमान ही तात्पूरत्या कालावधीसाठी उभारणेबाबत त्यांना कळविणेत आले होते. त्यानुसार साईधाम फौंडेशन, मुंबई यांनी सिव्हील व फॅब्रीकेशनचे काम करणेसाठी ठेकेदाराची नेमणूक केलेली होती. त्यामुळे ठेकेदार यांनी प्रत्यक्षात केलेल्या स्वागत कमानीचे कामाबाबत अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर यांनी कामाचा दर्जा, उंची, हवेचा दाब, बाजूस असलेल्या विद्युत तारा, मनमाड महामार्गावरुन होणारी प्रवाशांची वाहतूक इ. यांचा सखोल विचार करता सदरची कमान तातडीने काढून घेणेबाबत सुचना दिलेल्या आहेत. तसेच कामानीचे सजावटीसाठी वापरणेत आलेले एफ.आ.पी शिट रस्त्याने जाणा-या वाहनांवर पडण्याची शक्यता नकारता येत नाही. त्यामुळे अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ यांच्या सुचना व स्ट्रक्चरल सल्लागार यांचे स्टॅबीलिटी सर्टिफिकेटमधील उपरोक्त बाबी विचारात घेता सदरहू स्वॅागत कमान काढून घेता येईल असे मत आहे.

प्रस्ताव- अधिक्षक अभियंता यांचे दि.२१/०२/२०१९ रोजीचे पत्राची जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांचेकडील प्रत संस्थानकडे पुढील योग्य त्या उचित कार्यवाहीसाठी पाठविणेत आलेली आहे. त्यावर तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी, बांधकाम विभागाने उचित कार्यवाही करावी, असे निर्देश दिलेले आहेत.

अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर यांचेकडील दि.२१/०२/२०१९ रोजीचे पत्रानुसार कोपरगाव-कोल्हार (प्र.रा.मा.८) या रस्त्यावर तात्पुरत्या स्वरुपात उभारणेत आलेली स्वागत कमान काढणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१९२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शताब्दी सोहळयानिमित्त कोपरगाव कोल्हार रस्ता प्ररामा ०८ वर तात्पुरत्या स्वरुपात उभारणेत आलेल्या स्वागत कमान बांधकामाचे तीन खाजगी सक्षम एजन्सी कडून structureal Stability ची तपासणी करुन प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे. व त्यानुसार स्वागत कमान आहे त्याच ठिकाणी राहू देणेबाबतचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठविणेत यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.२१** **संस्थानचे शैक्षणिक संकुलातील इमारतीनां बाहेरील बाजुने रंगकाम करणे कामाचे ठेकेदार मे.एस.व्ही.चंदन, मुंबई यांचे अंतिम देयक रक्कम रु.१६,४८,९१३/- मात्र मंजुर करणे व त्यापैकी उर्वरीत शिल्लक देय रक्कम रु.४,५७,७००/-मात्र आदा करणेस मंजुरी देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद:- अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल, अशी तरतूद आहे.

प्रस्तावना:- मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०९/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५५७ (६) अन्वये संस्थानचे शैक्षणिक संकुलातील इमारतींना बाहेरील बाजूने रंगकाम करणेकामी ठेकेदार मे.एस.व्ही.चंदन, मुंबई यांची निविदा स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेस मान्यता देणेत आलेली आहे. ठेकेदार यांनी दि.२५/०३/२०१९ रोजी सदर इमारतींचे बाहेरील रंगकाम पूर्ण केले असून झालेल्या कामाचे दुसरे व अंतिम बील सादर केले आहे. इकडील विभागामार्फत सदर बीलाची सविस्तर तपासणी करणेत आली असून सदर कामाचा व अंतिम बिलाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | कामाचे नाव | शैक्षणिक संकुलातील इमारतींना बाहेरील बाजूने रंगकाम करणे. |
| ०२ | ठेकेदाराचे नाव | मे.एस.व्ही.चंदन, मुंबई. |
| ०३ | मंजूर निविदा रक्कम | रु.१९,८७,६३२/- |
| ०४ | काम बहाल करणेबाबत मा.व्यवस्थापन समिती निर्णय क्र. व दिनांक | निर्णय क्र.५५७ (६) दि.०६/०९/२०१८. |
| ०५ | ठेकेदार यांना देणेत आलेला कार्यादेश क्रं व दिनांक | जा.नं.४३१७/२०१८ दि.३०/११/२०१८. |
| ०६ | अंतिम बीलानुसार झालेल्या कामाची रक्कम | रु.१६,३४,८२३/- |
| ०७ | यापूर्वी अदा केलेली रक्कम | रु.११,७७,१२३/- |

| | | |
|---|---|---|
| ०८ | उर्वरीत शिल्लक देय रक्कम | रु.४,५७,७००/- |
| ०९ | मंजूर निविदेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु.३,५२,८०९/- (१७.७५ % कमी) |
| १० | करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मुदत | दि.०५/०४/२०१९ अखेर. |
| ११ | प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याची दिनांक | दि.२५/०३/२०१९. |

विभागाचा अभिप्राय – ठेकेदार यांनी सदर काम विहीत मानकांनुसार समाधानकारक रित्या पूर्ण केलेले असल्याने त्यांचे अंतिम बील मंजूर करणेस हरकत नाही. ठेकेदार यांनी सादर केलेल्या अंतिम बिलाची तपासणी केली असता प्रत्यक्ष झालेल्या मोजमापानुसार सदरहू बिलाची एकूण रक्कम रु.१६,३४,८२३/- मात्र इतकी होते. म्हणजेच मंजूर निविदा रक्कमेपेक्षा रु.३,५२,८०९/- (१७.७५ % कमी) कमी खर्च झालेला आहे. शैक्षणिक संकुलाचे कम्पाऊंड भिंतीचे रंगकामाचा समावेश निविदेतील कामात होता. सदरहू कंम्पाऊंड भिंतीचे ब-याचशा भागातील रंगकाम विभागामार्फत खरेदी करणेत आलेल्या रंग मटेरीअलमधून करणेत आल्याने सदरची क्वॉटेंटी कमी झाल्याने खर्च कमी झालेला आहे.

प्रस्ताव:- तरी ठेकेदार मे.एस.व्ही.चंदन, मुंबई यांचे शैक्षणिक संकुलातील इमारतीचे बाहेरील रंगकामाचे दुसरे व अंतीम देयक रु.१६,३४,८२३/- मात्र मंजूर होऊन उर्वरीत निव्वळ देय रक्कम रु.४,५७,७००/- मात्र अदा करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१९३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे शैक्षणिक संकुलातील इमारतीनां बाहेरील बाजुने रंगकाम करणे कामाचे बिलाची एकुण रक्कम रु.१६,३४,८२३/- मात्र मंजूर करण्यात येऊन, त्यापैकी उर्वरीत शिल्लक देय रक्कम रु.४,५७,७००/- मात्र सदर कामाचे ठेकेदार मे.एस.व्ही.चंदन, मुंबई यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.२२** **श्री गुरुपोर्णिमा उत्सव-२०१९ साजरा करणेस व याकामी येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४-

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम २(ठ) अन्वये, श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण यांबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

प्रस्तावना:- उपरोक्त अधिनियमातील तरतुदी व पुर्वापार रुढी परंपरेनुसार संस्थान व्यवस्थापनामार्फत धार्मिक पुजा विधी, उत्सव साजरे केले जात आहेत.

मंदिर विभागाकडील दिनांक २५/०२/२०१९ रोजीचे मंजूर प्रस्तावानुसार श्री गुरुपौर्णिमा उत्सव सोमवार, दि. १५/०७/२०१९ ते बुधवार, दि. १७/०७/२०१९ (आषाढ शु. ॥ १४ शके १९४१ ते आषाढ कृ. ॥ १ शके १९४१) असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे.

सन-२०१९ मध्ये साजरा करावयाचे श्री गुरुपौर्णिमा उत्सवासाठी पुढीलप्रमाणे नियोजन करावे लागणार आहे.

| अ.नं. | तपशील | उत्सवात करावयाची कामे |
|---|---|---|
| १ | उत्सव निमंत्रण पत्रिका | अधिनियमातील तरतुदीनुसार भक्त मंडळाचे सामान्य,आजीव व आश्रयदाते सभासदांना उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका पाठवाव्या लागतात.<br>यंदाचे श्री गुरुपौर्णिमा उत्सवात भक्तमंडळाचे सभासद, प्रतिष्ठीत व्यक्ति व ग्रामस्थ यांना पाठविण्यासाठी १,८०,००० निमंत्रणपत्रिका पाकीटांसह छपाई करुन घेण्याची तजवीज चालू आहे. तसेच नेहमीप्रमाणे प्रेसनोट (न्यूज ॲटम) वर्तमानपत्रातून प्रसिध्दीस देण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| २ | उत्सव व्यवस्था | अ) कलाकार कार्यक्रम– उत्सवाचे तिन्ही दिवसांकरीता निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम निश्चित करावयाचे आहेत. याकरीता स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.<br>निमंत्रीत कलाकारांची निवासव्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात येईल. निमंत्रीत कलाकारांचे मानधन मंदीर विभागामार्फत आदा करण्यात येईल. निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडपाचे स्टेजवर आयोजित करता येईल. |
| | सोमवार दि.१५/०७/२०१९ (प्रारंभ दिवस ) | सायंकाळी ७.३० ते रात्रौ. १०.१५ पर्यंत. |
| | मंगळवार दि.१६/०७/२०१९ (मुख्य दिवस) | १) सायंकाळी ०७.३० ते रात्रौ. १०.३० पर्यंत.<br>२) मुख्य दिवशी पहाटे ०१.३२ ते ०४.३० या काळात खंडग्रास चंद्रग्रहण असल्याने मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०.०१.२०१९ रोजीचे सभेतील निर्णयानुसार शेजआरती १२.०० वाजता होऊन मंदिर बंद होईल. नेहमीच्या प्रथेप्रमाणे रात्रौ ११.०० ते पहाटे ५.०० या कालावधीत होत असलेला कलाकार हजेरी कार्यक्रम होणार नाही. |
| | बुधवार दि. १७/०७/२०१९. ( सांगता दिवस ) | १) सायंकाळी ७.३० ते १०.१५ पर्यंत . |
| | सोमवार दि.१५/०७/२०१९ (सायं. ४ ते ६)<br>मंगळवार दि.१६.०७.२०१९ (सायं. ४ ते ६)<br>बुधवार दि.१७/०७/२०१९ (सकाळी १० ते १२) | ब) कीर्तन कार्यक्रम<br>उत्सवाचे तिन्ही दिवसांकरीता कीर्तनकार निश्चित करावयाचा आहे. याकरीता स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.<br>निमंत्रीत कीर्तनकारांची निवासव्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात येईल. निमंत्रीत कीर्तनकारांचे मानधन मंदीर विभागामार्फत आदा करण्यात येईल.<br>नेहमीच्या प्रथेप्रमाणे कीर्तनकार्यक्रम समाधी मंदिराचे उत्तर बाजुस असलेल्या जागेत स्टेज उभारुन करता येईल. |
| ३ | श्री साईसत्यव्रत (सत्यनारायण) पूजा व अभिषेक पूजा | उत्सव काळात दि.१५/०७/२०१९ ते दि.१७/०७/२०१९ अखेर मंदिर विभागामार्फत पार पाडल्या जाणा-या श्री साईसत्यव्रत व अभिषेक पुजा भक्तांच्या गर्दीचा अंदाज घेऊन चालू किंवा बंद टेवणेबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर निर्णय घेतला जाईल. |
| ४ | विद्युत रोषणाई | समाधी मंदिर, द्वारकामाई, चावडी, गुरुस्थान व मंदिर परिसरात विद्युत रोषणाई करण्यात येईल. श्री साईराज डेकोरेटर्स, मुंबई हे विनामुल्य रोषणाई करीत असतात. त्यांची शिर्डी येथे निवास, भोजन व चहा- नाष्टयाची व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात येते. मात्र ट्रक भाडे व जाणे -येण्याचा खर्च देण्याची प्रथा आहे. यावेळी विद्युत विभागामार्फत त्यांना कळविण्यात येईल ते न आल्यास संस्थानमार्फत विद्युत रोषणाई करण्यात येईल. |
| ५ | अखंड पारायण व्यवस्था | उत्सव काळात दिनांक १५/०७/२०१९ रोजी सकाळी ५.१५ वाजता श्री द्वारकामाई मंदिरात श्री साईचरित्राचे अखंड पारायणास सुरुवात होईल. दि.१७/०७/२०१९ रोजी सकाळी ५.०० वाजता त्याची समाप्ती होईल. मा. व्यवस्थापन समितीचे सदस्य पहिले पाच अध्याय वाचतील व राहिलेले ४८ अध्याय प्रत्येकी एक असे ४८ भक्त वाचतील. इच्छुक भक्तांची नांवे दि.१४/०७/२०१९. रोजी मंदिरासमोरील स्टेजवर नोंदविली जातील व त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या चिठ्ठया काढून पारायणाकरीता नांवे निश्चित केली जातील. पारायणात भाग घेणा-या प्रत्येक भक्तास प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात येईल.अखंड पारायणाकरीता व्दारकामाई रात्रभर उघडी ठेवण्यात येईल. श्री गुरुपौर्णिमा उत्सवात पोथी, वीणा, प्रतिमा,अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपूजा या कार्यक्रमाकरीता मा.सदस्यांची नावे निश्चित करावयाची आहेत. याबाबतची टिपणी मा. व्यवस्थापन समितीचे सभेत स्वतंत्रपणे सादर करण्यात येत आहे |
| ६ | पालखी व रथ मिरवणूक | उत्सवाचे पहिले दिवशी सोमवार दिनांक १५/०७/२०१९ रोजी रात्रौ ९.१५ वाजता श्रींचे पालखीची गांवातून मिरवणूक होईल, मंगळवार दिनांक १७/०७/२०१९ रोजी रात्रौ ९.१५ वाजता रथाची गांवातून मिरवणूक होईल. |
| ७ | संरक्षण व्यवस्था | उत्सव काळात समाधी मंदिर व मंदिर परिसरात बंदोबस्त ठेवणेकामी संरक्षण विभागात ठेकेदारी पध्दतीने जादा गार्ड नेमण्यात येतील. तसेच शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना तसेच सांस्कृतीक |

| | | |
|---|---|---|
| | | कार्यक्रमासाठी ध्वनीक्षेपणचे परवानगीबाबत मा. पोलीस निरीक्षक, शिर्डी यांना विनंती करण्यात येईल. |
| ८ | प्रसाद - भोजन व्यवस्था | उत्सव काळात प्रसादालयात मिष्टान्नासह भक्तांना मोफत प्रसाद भोजन दिले जाते. मा. व्यवस्थापन समितीचे सदस्य व त्यांचे कुटुंबिय तसेच निमंत्रित कलाकारांना स्वतंत्र प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात येईल. पोलीस कर्मचारी व उत्सवात काम करणेकरीता मदतीसाठी येणा-या व्यक्तीची प्रसाद भोजनाची व्यवस्था नेहमीप्रमाणे केली जाईल. साईभक्तांचे सोयीसाठी चहा, कॉफी, दूध व बिस्कीटे इत्यादी कॅन्टीनमध्ये २४ तास सुविधा उपलब्ध आहे. उत्सव काळात लाडू प्रसाद विक्री जास्तीत जास्त ठिकाणी सुरु करणेत येईल. याकामी सबंधित विभागाकडुन नियोजन करण्यात येईल.<br>सन २०१९ चे गुरुपौर्णिमा उत्सवात तिनही दिवसांचे प्रसाद भोजनात मिष्ठांन्न पदार्थ देणेसाठी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर निश्चिती करता येईल. |
| ०९ | देणगी काऊंटर्स | उत्सवाचे तीनही दिवशी देणगी काऊंटर्सची वेळ सकाळी ४ वा. ते रात्रौ ११ वा. पर्यंत करण्यात येईल मात्र मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे उत्सवाचे मुख्य दिवशी मंदिर रात्री १२ वाजेपर्यंत उघडे राहणार असल्याने देणगी काऊंटर्स १२ वाजेपर्यंत चालू ठेवण्यात येतील. |
| १० | जादा कंत्राटी कर्मचारी | उत्सवाचे पुर्व तयारी करणेकामी व उत्सव पार पाडणेकरीता विविध विभागांकडून आलेल्या मागणीची छाननी केल्यानंतर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, यांचे स्तरावर ज्या-त्या खात्यास जादा कंत्राटी कर्मचारीवर्ग देण्यात येईल. |
| ११ | प्रथमोपचार केंद्र | संस्थानमार्फत नेहमीप्रमाणे चोवीस तास प्रथमोपचार केंद्र सुरु करण्यात येतील. तसेच सुसज्ज अशी रुग्णवाहिका मंदिर परिसर, श्री साईप्रसादालय परिसर या ठिकाणी ठेवण्यात येईल. |
| १२ | पाणीपुरवठा | पाटबंधारे खात्यास उत्सव काळात कॅनॉल चालू ठेवणे बाबत विनंती करण्यात येईल. नियमित पाणीपुरवठा राहिल, याची व्यवस्था करण्यात येईल. |
| १३ | भक्तांची प्रासंगिक निवास व्यवस्था | संस्थानचे व्दारावती, भक्तनिवासस्थान इ. इमारतीमधून तसेच साई आश्रम, व साई धर्मशाळा परिसरात स्वतंत्र मंडप टाकून पालखी पदयात्रीसाठी व भक्तांची निवास व्यवस्था करण्यात येईल. उत्सवात समाधी मंदीर परिसर व इतर ठिकाणी तसेच आवश्यकतेनुसार मंडप/शामियाने टाकणेत येतील. आवश्यकतेनुसार व गरजेनुसार त्यात वाढ करता येईल याकामी बांधकाम विभागासह इतर संबंधीत विभागामार्फत नियोजन करणेत येईल. पालखी धारकांची आलेल्या पत्रानुसार सर्व निवासस्थाने एकत्रीत नियोजन करतील. |
| १४ | पालखी व्यवस्था | श्री गुरुपौर्णिमा उत्सवात पुणे तसेच इतर ठिकाणाहून पालख्या येत असतात. उत्सवात येणा-या पालख्या ठेवण्याची व्यवस्था श्री साईबाबा धर्मशाळा येथे करण्यात येते. या वर्षीही नेहमीप्रमाणे ती व्यवस्था करण्यात येईल. त्याचप्रमाणे येणा-या पालख्यांसाठी पिण्याचे पाण्याची व्यवस्था मागील उत्सवाप्रमाणे यंदाही करण्यात येईल नेहमीप्रमाणे पालखी मंडप, वीज व्यवस्था व पाणी व्यवस्था करणेत येईल. |
| १५ | कार्यक्रमाची सांगता | गोपाळ काल्याचे कीर्तनाने उत्सवाची सांगता होईल. काल्याचे कीर्तन निमंत्रित कीर्तनकार करतील. |
| १६ | खर्चाचे अंदाजपत्रक | श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१८ मध्ये प्रत्यक्ष खर्च रु.४१,९३,२३८/- (अक्षरी रुपये एक्केचाळीस लाख, त्र्यान्नव हजार, दोनशे अडोतिस) मात्र इतका खर्च झाला होता. श्री गुरुपौर्णिमा उत्सव सन-२०१९ करीता खालील तपशिलाप्रमाणे अंदाजे रु.५७,२१,२३९/- (रु.सत्तावन्न लाख एकविस हजार दोनशे एकोणचाळीस ) मात्र खर्च अपेक्षीत आहे. |

श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२०१९ अंदाजपत्रक

| अ.क्र | खर्च तपशिल | श्री गरुपौर्णिमा उत्सव -२०१८ | | श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१९अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|
| | | अंदाजे खर्च | प्रत्यक्ष खर्च | |
| १ | मंडप, कमानी, स्टेज, व इतर | ४,६२,००० | ५,९३,९०९.५३ | ४,९३,००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | कलाकार बिदागी (किर्तनकार व निमंत्रीत कलाकार कार्यक्रम ) व मंदिराकडील इतर खर्च | २,९२,००० | ६१,०४१.०० | १२,००,००० |
| ३ | भक्तांना मिष्टान्न (श्रम परिहार मजुरीसह) | ८,६९,००० | ७,८६,८४८.०० | १०,८५,१३५ |
| ४ | विदयुत रोषणाई (जनरेटर भाडे, इंधन खर्च ) | १,१०,००० | ९४,९३९.०० | १,२०,००० |
| ५ | निमंत्रण पत्रिका, जाहिरात, पोष्टेज,लेबल स्टीकर (आश्रयदाते विदेशी भक्तांसह ) | २५,४०,००० | २३,५३,९३७.२० | १३,९६,००० |
| ६ | जादा कर्मचारी स्वयंसेवक (विदयार्थी ) मानधन | ४,००,००० | २,६७,६५८.०० | ४,७२,१०४ |
| ७ | पालख्याचे ठिकाणी पिण्याची पाण्याची व्यवस्था खर्च (टॅकर डिझेलसह) | २५,००० | २२०५.०० | ३,२५,००० |
| ८ | सीसीटीव्हीसेल | १,५०,००० | ३,०००.०० | ३,६५,००० |
| ९ | मंदिर व मंदिर परीसर फुलाचे डेकोरेशन | - | - | २,५०,००० |
| १० | भाडोत्री क्रेन व इतर खर्च | ५०,००० | २९,७००.०० | १५,००० |
| | **एकुण रुपये** | **४८,९८,०००** | **४१,९३,२३७.७३** | **५७,२१,२३९** |

विभागाचा अभिप्राय– श्री गुरूपौर्णिमा उत्सव २०१९ साजरा करणेसाठी व याकामी संस्थानचे विविध विभागांनी उपरोक्तप्रमाणे सादर केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता मिळणेकामी सदरहू विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

मंदिर व मंदिर परिसरात करावयाच्या फुल सजावटीसाठी देणगीदार साईभक्तांचा प्रस्ताव प्राप्त न झाल्यास संस्थानमार्फत फुल सजावट करणेसाठी उपरोक्त अ.नं.९ मध्ये तरतूद करणेत आलेली आहे.

प्रस्ताव– तरी श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१९ साजरा करणेकामी वरीलप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रुपये ५७,२१,२३९/- (रुपये सत्तावन्न लाख एकविस हजार दोनशे एकोणचाळीस) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१९४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१९ साजरा करणेकामी उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.५७,२१,२३९/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- शताब्दी कक्ष)**

---

**विषय नं.२३ श्री गुरुपोर्णिमा उत्सव-२०१९ किर्तनकार ठरविणे व मानधन निश्चीत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानमार्फत साज-या होणा-या श्री गुरुपैर्णिमा उत्सव-२०१९ मध्ये (दि.१५,१६,१७ जुलै२०१९ ) इ-मेलव्दारे खालील कीर्तनकार यांनी तीन दिवस कीर्तन सेवेची संधी मिळणेबाबत विनंती केली आहे.

| अ.नं. | किर्तनकारांचे नाव |
|---|---|
| ०१ | ह.भ.प.भालचंद्र मा.सरदेशपांडे |
| ०२ | ह.भ.प. शामबुवा धुमकेकर,नागपुर |
| ०३ | ह.भ.प.सौ.अंजली श्रीकृष्ण जोशी ,डोंबिवली पुर्व |
| ०४ | ह.भ.प. सौ.वैशाली विजय लुडवे, नागपूर |
| ०५ | ह.भ.प.गंगाधर व्यास, डोंबिवली |
| ०६ | ह.भ.प.मंदार व्यास, डोंबिवली |

संस्थानतर्फे साजरे केल्या जाणा-या उत्सवातील कीर्तन मंदिराच्या उत्तर बाजूच्या स्टेजवर होते.

ह.भ.प. दासगणू महाराज प्रतिष्ठाण, गोरटे यांनी पाठविलेल्या कीर्तनकाराचे कीर्तन श्री रामनवमी उत्सवात ठेवण्यात येते. ही परंपरा ह.भ.प. दासगणू महाराज यांनी स्वतः रामनवमी उत्सवात कीर्तन सेवा देण्यास

सुरुवात केल्यापासून आजतागायत अखंडीत सेवा चालू आहे. त्यानुसार ह.भ.प. दासगणू महाराज प्रतिष्ठाण, गोरटे यांनी पाठविलेल्या कीर्तनकाराचे कीर्तन रामनवमी उत्सवात परंपरेनुसार ठेवले जाते.

संस्थानमार्फत गुरुपौर्णिमा व पुण्यतिथी उत्सवात कीर्तनकारांचे प्राप्त झालेल्या सर्व अर्ज एकत्रित करुन कीर्तनकारांचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेत ठेवण्यात येतो, सदर प्रस्तावावर चर्चा होऊन योग्य कीर्तनकाराची निवड व मानधनाबाबत निर्णय घेण्यात येतो.

श्री. गुरुपौर्णिमा व श्री पुण्यतिथी उत्सवात श्री रामनवमी उत्सवाप्रमाणे कोणत्याही कीर्तनकाराची कीर्तन सेवा करण्याची परंपरा नाही. मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे कीर्तनकाराची निवड केली जाते.

श्री. गुरुपार्णिमा उत्सवात सेवा दिलेल्या कीर्तनकारांची नांवे खालीलप्रमाणे

| अ.नं. | कीर्तनकाराचे नाव | गुरुपौर्णिमा उत्सवात कीर्तन सेवा दिलेले साल |
|---|---|---|
| ०१ | ह.भ.प .डॉ.ग्र.प्र.परांजपे,पुणे | दि .१९/०७/१९९७ ते दि.२१/०७/१९९७ |
| ०२ | ह.भ.प .श्री.रा .आळेकर, इंदौर | दि .०८/०७/१९९८ ते दि १०/०७/१९९८ |
| ०३ | ह.भ.प.श्री.उत्तमराव विष्णूजी बडधे, कोपरगांव यांचे प्रथम व दुस-या दिवशी कीर्तन<br>ह.भ.प.श्री.माधव तुकाराम आजेगांवकर,परभणी यांचे तिस-या दिवशी काल्याचे कीर्तन | दि .२७/०७/१९९९ ते दि.२९/०७/१९९९ |
| ०४ | ह.भ.प .श्री.उत्तमरव विष्णूजी बडधे, कोपरगांव | दि.१५/०७/२००० ते दि.१७/०७/२००० |
| ०५ | ह.भ.प .श्री.महादेव शंकर गोखले, विरार | दि.०४/०७/२००१ ते दि.०६/०७/२००१ |
| ०६ | ह.भ.प .श्री.शरद नेरळकर, नांदेड | दि.२३/०७/२००२ ते दि.२५/०७/२००२ |
| ०७ | ह.भ.प .गंगाधर नरहर व्यास )सन २००३ (डोंबिवली )पूर्व ( जिल्हा-ठाणे | सन २००३ |
| ०८ | ह.भ.प .गंगाधर नरहर व्यास डोंबिवली )पूर्व (जिल्हा-ठाणे | दि.०१/०७/२००४ ते दि ०३/०७/२००४ |
| ०९ | ह.भ.प.माधव तु.आजेगांवकर,परभणी | दि.२०/०७/२००५ ते दि.२२/०७/२००५ |
| १० | ह.भ.प.प्रा.डॉ.माधवराव दिक्षीत पुणे | दि.१०/०७/२००६ ते दि.१२/०७/२००६ |
| ११ | ह.भ.प .गंगाधर नरहर व्यास डोंबिवली )पूर्व (जिल्हा-ठाणे | दि.२८/०७/२००७ ते दि.३०/०७/२००७ |
| १२ | ह.भ.प.माधव तु.आजेगांवकर,परभणी | दि.१७/०७/२००८ ते दि.१९/०७/२००८ |
| १३ | ह.भ.प.माधव तु.आजेगांवकर,परभणी | दि.०६/०७/२००९ ते दि.०८/०७/२००९ |
| १४ | ह.भ.प.मंदार गंगाधर व्यासबुवा, डोंबिवली | दि.२४/०७/२०१० ते दि.२६/०७/२०१० |
| १५ | ह.भ.प .मनोहर महाराज कोकलेगांवकर विठ्ठलवाडी, नांदेड. | दि.१४/०७/२०११ ते दि.१६/०७/२०११ |
| १६ | ह.भ.प.माधव तु.आजेगांवकर,परभणी | दि ०२/०७/२०१२ ते दि.०४/०७/२०१२ |
| १७ | ह.भ.प .गंगाधर नरहर व्यास डोंबिवली )पूर्व (जिल्हा-ठाणे | दि.२१/०७/२०१३ ते दि.२३/०७/२०१३ |
| १८ | ह.भ.प .माधवराव तुकारामपंत आजेगावकर, परभणी | दि.११/०७/२०१४ ते दि.१३/०७/२०१४ |
| १९ | ह.भ.प .माधवराव तुकारामपंत आजेगावकर, परभणी | दि.३०/०७/२०१५ ते दि.०१/०८/२०१५ |
| २० | ह.भ.प .माधवराव तुकारामपंत आजेगावकर, परभणी | दि.१८/०७/२०१६ ते दि .२०/०७/२०१६ |
| २१ | ह.भ.प.सौ.अंजली श्रीकृष्ण जोशी, डोंबिवली | दि. ०८/०७/२०१७ ते दि.१०/०७/२०१७ |
| २२ | ह.भ.प. चारुदत्त गोविंदस्वामी आफळे | दि. २६/०७/२०१८ ते दि. २८/०७/२०१८ |

श्री रामनवमी उत्सव २०१९ मध्ये केलेल्या कीर्तनकारास तीन दिवसाची एकत्रीत बिदागी/मानधन १५,००१/- देण्यात आले होते.

विभागाचा अभिप्राय:- नामवंत कीर्तनकारांचे कीर्तन ठेवल्यास साईभक्तांना एक वेगळया प्रकारचे प्रबोधन होवु शकेल. श्री गुरुपैर्णिमा उत्सवात संस्थानकडे सादर केलेल्या कीर्तनकारांतुन एका कीर्तनकारांची निवड करता येईल, अथवा मा. व्यवस्थापन समितीने सुचविलेले कीर्तनकारांचा कार्यक्रम आयोजित करता येईल. त्यासाठी श्री रामनवमी उत्सवाप्रमाणेच तीन दिवसासाठी रक्कम रु. १५,००१/- मानधन आदा करता येईल.

प्रस्ताव:- तरी श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१९ च्या तीन दिवसांसाठी कीर्तनकार व त्यांचे मानधन निश्चित करणेसाठी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१९५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गुरुपोर्णिमा उत्सव-२०१९ तीन दिवसांसाठी कीर्तनकार व त्यांचे मानधन हे समिती सदस्य मा.ॲड मोहन जयकर यांनी निश्चीत करावे, असे ठरले.**

**(कार्यवाही- शताब्दी कक्ष)**

---

**विषय नं.२४** **श्री गुरुपोर्णिमा उत्सव-२०१९ मध्ये आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे कलाकार व त्यांचे मानधन निश्चित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

प्रस्तावना :-

मागिल वर्षी श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१८, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव असल्याने खालील नामवंत कलाकाराचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

| अ.नं. | कलाकाराचे नांव | कार्यक्रम प्रकार | ठिकाण | दिनांक व वेळ | प्रवास खर्चासह मानधन |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. विश्वनाथ ओझा, श्रीरामपुर | साई भजन | श्री साईबाबा समाधी शताब्दी मंडप | **गुरुवार २६/०७/२०१८** सायं. ७.३० ते रात्रौ.९.०० व रात्रौ. ९.३० ते १०.३० | विनामुल्य |
| ०२ | पंडीत हरिप्रसाद चौरसिया, मुंबई व पंडीत विजय घाटे, पुणे | बासरी व तबला वादन (फ्युजन) | | **शुक्रवार २७/०७/२०१८** सायं. ७.३० ते रात्रौ.९.०० व रात्रौ. ९.३० ते १०.३० | |
| ०३ | सुधांशु सर, शिर्डी | साई भजन | | **शनिवार २८/०७/२०१८** सायं. ७.३० ते रात्रौ. ९.०० | |
| | अंचल शर्मा, रायपूर | साई भजन | | रात्रौ. ९.०० ते ९.४५ | |
| | मदन चौहान, रायपूर | साई भजन | | रात्रौ. ९.४५ ते ११.०० | |

श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२०१९ सोमवार दिनांक १५.०४.२०१९ ते बुधवार दिनांक १७.०४.२०१९ असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे. श्री गुरुपौर्णिमा उत्सवात कार्यक्रम करणेसाठी खालील कलाकारांचे अर्ज प्राप्त झाले आहेत.

| अ.नं. | कलाकाराचे नांव | मो.नंबर | कार्यक्रमाचा प्रकार | कलाकार संख्या | मानधन |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | आर.के.शंकर, बंगलोर | ९८८६३९२७३४ | भजन संध्या | १० | विनामुल्य |
| ०२ | उज्जवल शर्मा, हरिद्वार | ७०४२७०५४०४ | भजनसंध्या | २० | २५,०००/- (प्रवास भाडे) |
| ०३ | अर्पना शंकर , बंगलोर | ९९४५७१९८२२ | भरतनाटयम | १० | विनामुल्य |
| ०४ | अनंत पांचाळ, मुंबई | ९९३०१२६३२७ | अभंग/भक्ती संगीत | १० | ३५,०००/- |
| ०५ | आश्विनी जोशी, नाशिक | ८९९९३६५३०७ | भजन संध्या | १० | विनामुल्य |
| ०६ | अजय मोरे, मुंबई | ९८१९८७२३६४ | साई गीत आणि भक्ती गीत | २५ | २५,०००/- (प्रवास भाडे) |
| ०७ | विजय साखरकर, मुंबई | ९८२०२१५८११ | साई स्वर नृत्योत्सव | ३० | ८०,०००/- |

विभागाचा अभिप्राय:- मागील श्री गुरुपौर्णिमा उत्सवातील (२०१८) कलाकार कार्यक्रम श्री साईबाबा समाधी शताब्दी मंडप या ठिकाणी आयोजित करण्यात आले होते. चालू वर्षीचे कलाकार कार्यक्रम ही श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप या ठिकाणी आयोजित करता येतील. तसेच कलाकार निश्चितीसाठी उपरोक्त नमूद केलेल्या तक्त्यातील नांवाप्रमाणे अथवा मा. व्यवस्थापन समितीने सुचविलेले कलाकार कार्यक्रम आयोजित करता येतील.

प्रस्ताव:- तरी श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१९ कालावधीत आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी वर नमुद केलेल्या तक्त्यातील कलाकारातुन अथवा मा. व्यवस्थापन समितीचे संमतीने सुचविलेले कलाकार कार्यक्रम आयोजित करणेस व त्यांचे मानधन निश्चित करणेसाठी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१९६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१९ कालावधीत आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी विनामुल्य सेवा देणाऱ्या कलाकारांचे कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत, तसेच पं.जितेंद्र अभिषेकी यांचे शिष्य पं.राजा काळे यांचे भजन संध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येऊन त्यांना शिर्डी येथे येण्या-जाण्याचे प्रवास भाडे आदा करणेत यावे अथवा वाहन व्यवस्था करण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही- शताब्दी कक्ष)**

---

**विषय नं.२५ श्री गुरुपोर्णिमा उत्सवातील वीणा,पोथी, फोटो, पाद्यपुजा, रुद्राभिषेक इत्यादीसाठी मा.व्यवस्थापन समिती सदस्यांची नावे निश्चीत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानमार्फत श्री रामनवमी उत्सव, श्री गुरुपौर्णिमा उत्सव व श्री पुण्यतिथी उत्सव पुर्व परंपरेनुसार पार पाडले जातात. सदरच्या प्रत्येक उत्सवात पहाटे व्दारकामाईत अखंड पारायणास सुरुवात होते तत्पूर्वी श्रींचा फोटो /पोथी /वीणा मिरवणूकीने गुरुस्थानमार्गे व्दारकामाईत येतात व मा. व्यवस्थापन समितीचे सदस्यांच्या हस्ते अंखड साईसच्चरित पारायणास व्दारकामाईत सुरवात होते. तसेच श्रींचे स्नान झाल्यानंतर समाधि मंदिरात मा. व्यवस्थापन समितीचे सदस्य यांचे हस्ते पाद्यपुजा पार पाडली जाते.

श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०१६ पासून सदरच्या कार्यक्रमात भाग घेतलेल्या मा. व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची माहिती खालीलप्रमाणे..

श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०१६ पाद्यपुजा व इतर कार्यक्रम.

| दिनांक | वेळ | कार्यक्रमात सहभागी झालेल्या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| १०/१०/२०१६. सोमवार | | उत्सवाचा प्रथम दिवस |
| | पहाटे ५.०० | श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक<br>वीणा- मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य<br>पोथी– मा.श्री. सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष<br>प्रतिमा - मा. ॲड.मोहन मोतीराम जयकर, सदस्य / मा.डॉ. संदीप आहेर, उपकार्यकारी अधिकारी |
| | पहाटे ५.१५ | अध्याय वाचन – अध्याय क्र.१ - मा.श्री.प्रताप सखाहरी भोसले – सदस्य<br>अध्याय क्र.२ - मा. सौ.अनिताताई विजय जगताप – पदसिध्द सदस्य<br>अध्याय क्र.३ - मा.सौ.सरस्वती भाऊसाहेब वाकचौरे, सदस्य<br>अध्याय क्र.४- मा.ॲड.मोहन मोतीराम जयकर, सदस्य<br>अध्याय क्र.५ - मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य |
| | सकाळी ६.०० | श्रींची पाद्यपूजा – मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम – उपाध्यक्ष |
| ११/१०/२०१६. मंगळवार | | उत्सवाचा मुख्य दिवस |
| | पहाटे ५.०० | श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक<br>वीणा - मा. श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम – उपाध्यक्ष<br>पोथी – मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे – सदस्य<br>प्रतिमा- १) मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य, २) मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य |
| | सकाळी ६.०० वाजता | श्रींची पाद्यपूजा- १) मा.श्री. सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष २) मा.ॲड.मोहन मोतीराम जयकर, सदस्य ३) मा.डॉ. संदीप आहेर, उपकार्यकारी अधिकारी |
| | सकाळी ९.०० | भिक्षा झोळी कार्यक्रम – १) मा. श्री सुरेश हावरे, अध्यक्ष २)चंद्रशेखर कदम , उपाध्यक्ष |

| | | |
|---|---|---|
| | | ३) श्री. भाऊसाहेब वाकचौरे, सदस्य ३) श्री.सचिन तांबे, सदस्य ४) मा.ॲड.मोहन जयकर, सदस्य ५) मा.डॉ. संदीप आहेर, उपकार्यकारी अधिकारी |
| | सकाळी १०.४५ | आराधना विधी कार्यक्रम- मा.अध्यक्ष व उपस्थित सदस्य |
| १२/१०/२०१६. बुधवार | | तृतीय दिवस |
| | सकाळी ६.०० | श्रींची पाद्यपूजा- मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे – सदस्य व श्री.सचिन तांबे, सदस्य |
| १३.१०.२०१६ गुरुवार | सकाळी ६.०० | उत्सवाचा सांगता दिवस<br>श्रींची पाद्यपूजा- मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य |
| | सकाळी ६.४५ | गुरुस्थान येथे रुद्राभिषेक – मा.श्री.बाजीराव शिंदे , कार्यकारी अधिकारी |

श्री रामनवमी उत्सव २०१७ पाद्यपुजा व इतर कार्यक्रम.

| दिनांक | वेळ | कार्यक्रमात सहभागी झालेल्या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| ०३/०४/२०१७. सोमवार | | उत्सवाचा प्रथम दिवस |
| | पहाटे ५.०० | श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक<br>वीणा- मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम , उपाध्यक्ष<br>पोथी– मा.सौ. योगिता अभय शेळके पाटील, सदस्य<br>प्रतिमा-१) मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे , सदस्य २) मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य |
| | पहाटे ५.१५ | अध्याय वाचन – अध्याय क्र.१ - मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम , उपाध्यक्ष<br>अध्याय क्र.२ - मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य<br>अध्याय क्र.३ - मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य<br>अध्याय क्र.४ - मा.ॲड.मोहन मोतीराम जयकर, सदस्य<br>अध्याय क्र.५ - मा.सौ. योगिता अभय शेळके पाटील , सदस्य |
| | सकाळी ६.०० | श्रींची पाद्यपुजा – मा.श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से.- मुख्य कार्यकारी अधिकारी |

...०२...

| | | |
|---|---|---|
| ०४/०४/२०१७. मंगळवार | | उत्सवाचा मुख्य दिवस |
| | पहाटे ५.०० | श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक<br>वीणा - मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य<br>पोथी – मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य<br>प्रतिमा- १) मा.श्री.प्रताप सखाहरी भोसले २) मा.डॉ.राजेंद्र राजाबली सिंग , सदस्य |
| | सकाळी ६.०० | श्रींची पाद्यपूजा- मा.श्री. सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष |
| ०५.०४.२०१७ बुधवार | सकाळी ६.०० | उत्सवाचा सांगता दिवस<br>श्रींची पाद्यपूजा- मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम , उपाध्यक्ष |
| | सकाळी ६.३० | गुरुस्थान येथे रुद्राभिषेक – मा.डॉ. संदीप आहेर, उपकार्यकारी अधिकारी |

श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२०१७ पाद्यपुजा व इतर कार्यक्रम.

| दिनांक | वेळ | कार्यक्रमात सहभागी झालेल्या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| ०८/०७/२०१७. शनिवार | | उत्सवाचा प्रथम दिवस |
| | पहाटे ५.०० | श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक<br>वीणा- मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम – उपाध्यक्ष<br>पोथी– मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे – सदस्य<br>प्रतिमा - मा. ॲड.मोहन मोतीराम जयकर, सदस्य व मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य |
| | पहाटे ५.१५ | अध्याय वाचन – अध्याय क्र.१ - मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम – उपाध्यक्ष<br>अध्याय क्र.२ मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे – सदस्य<br>अध्याय क्र.३ - मा.सौ.योगिता शेळके पाटील सदस्या<br>अध्याय क्र.४ - मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य |

| | | |
|---|---|---|
| | | अध्याय क्र.५ - मा. ॲड.मोहन मोतीराम जयकर, सदस्य |
| | सकाळी ६.०० | श्रींची पाद्यपूजा – मा.श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से.-मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ०९/०७/२०१७.<br>रविवार | पहाटे ५.०० | उत्सवाचा मुख्य दिवस<br>श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक<br>वीणा - मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य<br>पोथी – मा. श्री सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष<br>प्रतिमा- १) मा.श्री.प्रताप सखाहरी भोसले व मा. ॲड.मोहन मोतीराम जयकर, सदस्य |
| | सकाळी ६.०० | श्रींची पाद्यपूजा- मा.श्री. सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष |
| | सकाळी ६.०० | उत्सवाचा सांगता दिवस<br>श्रींची पाद्यपूजा- मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष |
| १०.०७.२०१७<br>सोमवार | सकाळी ६.१५ | गुरुस्थान येथे रुद्राभिषेक – मा.डॉ.संदीप आहेर - उपकार्यकारी अधिकारी |

श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०१७ पाद्यपुजा व इतर कार्यक्रम

| दिनांक | वेळ | कार्यक्रमात सहभागी झालेल्या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| २९/०९/२०१७<br>शुक्रवार | पहाटे ५.०० | उत्सवाचा प्रथम दिवस<br>श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक<br>वीणा- मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष<br>पोथी- मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य<br>प्रतिमा- मा.ॲड.मोहन मोतीराम जयकर, सदस्य व मा.श्री. धंनजय निकम, उपजिल्हाधिकारी |
| | पहाटे ५.१५ | अध्याय वाचन-<br>अध्याय क्र.१ - १.मा. सौ. सरस्वती वाकचौरे व मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे<br>अध्याय क्र.२ ते ४ - २. मा. ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य<br>अध्याय क्र.५ - ३.मा. सौ. शेळके पाटील |
| | सकाळी ६.०० | श्रींची पाद्यपूजा - मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष |
| ३०/०९/२०१७.<br>शनिवार | पहाटे ५.०० | उत्सवाचा मुख्य दिवस<br>श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक<br>वीणा - मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य<br>पोथी - मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य<br>प्रतिमा- १) मा. ॲड.मोहन मोतीराम जयकर, सदस्य २) मा.श्री.प्रताप सखाहरी भोसले |
| | सकाळी ६.०० | श्रींची पाद्यपूजा- मा.श्री. सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष |
| | सकाळी ९.०० | भिक्षा झोळी कार्यक्रम - १) मा.श्री. सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष व २)चंद्रशेखर कदम , उपाध्यक्ष ३) श्री. भाऊसाहेब वाकचौरे, सदस्य ४) मा.श्री.प्रताप सखाहरी भोसले, सदस्य ५)मा. सौ.योगिताताई शेळके पाटील, सदस्य ६) मा.श्री. धंनजय निकम,उपजिल्हाधिकारी ७) मा.श्री. मनोज घोडेपाटील – उपजिल्हाधिकारी. |
| | सकाळी १०.३० | आराधना विधी कार्यक्रम- मा.श्री. सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष व उपस्थित सदस्य |
| ०१/१०/२०१७.<br>रविवार | सकाळी ६.०० | तृतीय दिवस<br>श्रींची पाद्यपूजा- मा.श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से. मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ०२.१०.२०१७<br>सोमवार | सकाळी ६.०० | उत्सवाचा सांगता दिवस<br>श्रींची पाद्यपूजा- मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य |
| | सकाळी | गुरुस्थान येथे रुद्राभिषेक - मा.श्री. मनोज घोडेपाटील, उपजिल्हाधिकारी |

| | | |
|---|---|---|
| | ६.४५ | |

श्री रामनवमी उत्सव २०१८ पाद्यपुजा व इतर कार्यक्रम

| दिनांक | वेळ | कार्यक्रमात सहभागी झालेल्या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| २४/०३/२०१८<br>शनिवार | | उत्सवाचा प्रथम दिवस |
| | पहाटे ५.०० | श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक<br>वीणा- मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष<br>पोथी– मा. ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य<br>प्रतिमा-१) मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य<br>२) मा.श्री. मनोज घोडेपाटील, उपजिल्हाधिकारी |
| | पहाटे ५.१५ | अध्याय वाचन - अध्याय क्र.१ - मा. श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष<br>अध्याय क्र.२ - मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य<br>अध्याय क्र.३ - मा. ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य<br>अध्याय क्र.४ - मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य<br>अध्याय क्र.५ - मा. सौ. योगिताताई शेळके पाटील, सदस्या |
| | सकाळी ६.०० | श्रींची पाद्यपूजा – मा.श्रीमती. रुबल अग्रवाल, मुख्य कार्यकारी अधिकारी |
| | सांय. ६.०० | श्रींची पाद्यपूजा – मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य |
| २५/०३/२०१८<br>रविवार | पहाटे ५.०० | उत्सवाचा मुख्य दिवस |
| | | श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक<br>वीणा - मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य<br>पोथी – मा. सौ. योगिताताई शेळके पाटील, सदस्या<br>प्रतिमा- १) मा. ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य २) मा.श्री. धंनजय निकम, उपजिल्हाधिकारी |
| | सकाळी ६.०० | श्रींची पाद्यपूजा- मा.श्री. प्रताप भोसले, सदस्य |
| | सांय. ६.०० | श्रींची पाद्यपूजा – मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य |
| २६/०३/२०१८.<br>सोमवार | | उत्सवाचा सांगता दिवस |
| | सकाळी ६.०० | श्रींची पाद्यपूजा- मा. श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष |
| | सकाळी ६.३० | गुरुस्थान येथे रुद्राभिषेक – मा.श्री. धंनजय निकम, उपजिल्हाधिकारी |
| | सांय. ६.०० | श्रींची पाद्यपूजा- मा.श्री. सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष |

श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१८ पाद्यपुजा व इतर कार्यक्रम

| दिनांक | वेळ | कार्यक्रमात सहभागी झालेल्या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| २६/०७/२०१८.<br>गुरुवार | | उत्सवाचा प्रथम दिवस |
| | पहाटे ५.०० | श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक<br>वीणा- मा. श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष<br>पोथी- मा. श्री. भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य<br>प्रतिमा - मा. श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य व<br>मा. ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य |
| | पहाटे ५.१५ | अध्याय वाचन –<br>अध्याय क्र.१ - मा. ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य<br>अध्याय क्र.२ - मा. श्री. भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य<br>अध्याय क्र.३ - मा. श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष<br>अध्याय क्र.४ - मा. सौ. योगिताताई शेळके पाटील, सदस्या<br>अध्याय क्र.५ - मा. श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य |
| | सकाळी ६.००<br>सायंकाळी | श्रींची पाद्यपूजा – मा. श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष<br>मा. ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य |

| | | |
|---|---|---|
| २७/०७/२०१८.<br>शुक्रवार | <br>पहाटे ५.०० | उत्सवाचा मुख्य दिवस<br>श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक<br>वीणा - मा. श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य<br>पोथी – मा. सौ. योगिताताई शेळके पाटील, सदस्या<br>प्रतिमा- मा. श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष व<br>मा. श्री. भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य |
| | सकाळी ६.००<br>सायंकाळी | श्रींची पाद्यपूजा- मा. श्री. सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष<br>मा. श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य |
| २८/०७/२०१८<br>शनिवार | <br>सकाळी ६.०० | उत्सवाचा सांगता दिवस<br>श्रींची पाद्यपूजा- मा. श्रीमती रुबल अग्रवाल, मुख्य कार्यकारी अधिकारी |
| | सकाळी ६.१५ | गुरुस्थान येथे रुद्राभिषेक- मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे प्रतिनीधी<br>श्री. धनंजय निकम, उपजिल्हाधिकारी |

श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०१८ पाद्यपुजा व इतर कार्यक्रम

| दिनांक | वेळ | कार्यक्रमात सहभागी झालेल्या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| १७/१०/२०१८.<br>बुधवार | <br>पहाटे ५.०० | उत्सवाचा प्रथम दिवस<br>श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक<br>वीणा- मा. श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष<br>पोथी- मा. श्री. भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य<br>प्रतिमा - मा. ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य व<br>मा. श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य |
| | पहाटे ५.१५ | अध्याय वाचन –<br>अध्याय क्र.१ - मा. ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य<br>अध्याय क्र.२ - मा. श्री. भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य<br>अध्याय क्र.३ - मा. सौ. योगिताताई अभय शेळके पाटील, सदस्या<br>अध्याय क्र.४- मा.डॉ. सुरेश काशिनाथ हावरे,अध्यक्ष<br>अध्याय क्र.५ - मा. श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष |
| | सकाळी ६.००<br>सायंकाळी<br>५.३० | श्रींची पाद्यपूजा – मा. श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष<br>मा. सौ. योगिताताई अभय शेळके पाटील, सदस्या |
| १८/१०/२०१८.<br>गुरुवार | <br>पहाटे ५.०० | उत्सवाचा मुख्य दिवस<br>श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक<br>वीणा - मा. श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य<br>पोथी – मा. सौ. योगिताताई अभय शेळके पाटील, सदस्या<br>प्रतिमा- मा. श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष व मा. ॲड. मोहन मोतीराम जयकर |
| | सकाळी ६.००<br>सायंकाळी<br>५.३० | श्रींची पाद्यपूजा- मा. डॉ. सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष<br>श्रींची पाद्यपूजा- मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य |
| | सकाळी ९.०० | भिक्षा झोळी कार्यक्रम - सर्व सदस्य |
| | सकाळी<br>१०.३० | आराधना विधी कार्यक्रम - सर्व सदस्य |
| १९/१०/२०१८,<br>शुक्रवार | <br>पहाटे ५.१५<br>सायं. ५.३० | उत्सवाचा सांगता दिवस<br>श्रींची पाद्यपूजा- मा. श्रीमती रुबल अग्रवाल, मुख्य कार्यकारी अधिकारी<br>श्रींची पाद्यपूजा- मा. श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य |
| | पहाटे ५.३० | गुरुस्थान येथे रुद्राभिषेक- मा. श्रीमती रुबल अग्रवाल, मुख्य कार्यकारी अधिकारी |

श्री रामनवमी उत्सव २०१९ पाद्यपुजा व इतर कार्यक्रम

(लोकसभा निवडनूक २०१९ ची आचारसंहिता लागु असल्याने सदरहू कार्यक्रमात संस्थान अधिकारी कर्मचारी यांचा सहभाग होता.)

| दिनांक | वेळ | कार्यक्रमात सहभागी झालेल्या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| १२/०४/२०१९ शुक्रवार | पहाटे ५.०० वाजता | उत्सवाचा प्रथम दिवस |
| | | श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक<br>वीणा- श्री. संजय कुंभार, वरिष्ठ लिपीक, मंदिर विभाग<br>पोथी– श्री शिवलिंग ब. पटणे, प्राचार्य, आयटीआय विभाग<br>प्रतिमा -१) श्री अशोक रंभाजी औटी, प्र. प्रशासकीय अधिकारी<br>२) श्री. विश्वनाथ बजाज, प्र. अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग |
| | पहाटे ५.१५ वाजता | अध्याय वाचन<br>अध्याय क्र.१ - श्री विजय रोहमारे, उपकार्यकारी अभियंता, विद्युत विभाग<br>अध्याय क्र.२ - श्री. मोहन यादव, जनसंपर्क अधिकारी<br>अध्याय क्र.३ - श्री. नवनाथ कोते, प्र. अधिक्षक, सभाकामकाज विभाग<br>अध्याय क्र.४ - श्री. विष्णु थोरात , प्र.अधिक्षक, प्रसादालय विभाग<br>अध्याय क्र.५ - श्री. रघुनाथ आहेर, प्र. मुख्य कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग |
| | सकाळी ६.०० वाजता | श्रींची पाद्यपूजा – श्री. सुर्यभान विठ्ठलराव गमे, प्रशासकीय अधिकारी |
| | सांय. ६.०० वाजता | श्रींची पाद्यपूजा – डॉ आकाश रामहरी किसवे, प्रशासकीय अधिकारी |
| १३/०४/२०१९ शनिवार | पहाटे ५.०० वाजता | उत्सवाचा मुख्य दिवस |
| | | श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक<br>वीणा - श्री. मधुकर लक्ष्मण गंगावणे, संरक्षण अधिकारी<br>पोथी – डॉ. मैथिली पितांबरे, प्र. वैद्यकीय संचालक<br>प्रतिमा- १) श्री. दिलीप त्र्यंबक उगले, प्रशासकीय अधिकारी<br>२) श्री. अविनाश कुलकर्णी, प्र. अधिक्षक, खरेदी विभाग |
| | सकाळी ६.०० वाजता | श्रींची पाद्यपूजा- श्री. बाबासाहेब बाळकृष्ण घोरपडे, मुख्य लेखाधिकारी |
| | सांय. ६.०० वाजता | श्रींची पाद्यपूजा –श्री. रमेश नारायण चौधरी, प्र.अधिक्षक, मंदिर विभाग |
| १४/०४/२०१९ रविवार | | उत्सवाचा सांगता दिवस |
| | सकाळी ६.०० वाजता | श्रींची पाद्यपूजा- श्री. राजतिलक बागवे, प्र.अधिक्षक, शताब्दी कक्ष/प्रकाशने विभाग |
| | सकाळी ६.३० वाजता | गुरुस्थान येथे रुद्राभिषेक– श्री. रघुनाथ आहेर, प्र. मुख्य कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग |
| | सांय. ६.०० वाजता | श्रींची पाद्यपूजा- डॉ. नरोडे, प्र. वैद्यकीय संचालक, साईबाबा हॉस्पिटल |

आता श्री गुरुपौर्णिमा उत्सवामध्ये पाद्यपुजा व इतर कार्यक्रमासाठी मान्यवरांची निश्चिती करणे आहे. तरी वीणा, पोथी, श्रींचा फोटो, अध्यायाचे वाचन, श्रींची पाद्यपुजा, रुद्राभिषेक कोणी करावा याबाबत निर्णय होणे आवश्यक आहे.

श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१९ पाद्यपुजा व इतर कार्यक्रम

| दिनांक | वेळ | कार्यक्रमात सहभागी होणा-या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| दि.१५/०७/२०१९ सोमवार | | उत्सवाचा प्रथम दिवस |
| | पहाटे ५.०० | श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक<br>वीणा-<br>पोथी-<br>प्रतिमा- |
| | पहाटे ५.१५ | अध्याय वाचन –<br>अध्याय क्र.१ -<br>अध्याय क्र.२ –<br>अध्याय क्र.३ - |

| | | |
|---|---|---|
| | | अध्याय क्र.४ –<br>अध्याय क्र.५ - |
| | सकाळी ६.००<br>सायंकाळी | श्रींची पाद्यपूजा - |
| १६/०७/२०१९.<br>मंगळवार | | उत्सवाचा मुख्य दिवस |
| | पहाटे ५.०० | श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक<br>वीणा -<br>पोथी -<br>प्रतिमा- |
| | सकाळी ६.००<br>सायंकाळी | श्रींची पाद्यपूजा- |
| १७/०७/२०१९<br>बुधवार | सकाळी ७.००<br>सायंकाळी | उत्सवाचा सांगता दिवस<br>श्रींची पाद्यपूजा – |
| | सकाळी ७.०० | गुरुस्थान येथे रुद्राभिषेक - मा. मुख्य कार्यकारी अधिकारी |

तरी उपरोक्त तक्त्यात दर्शविलेप्रमाणे मान्यवरांची नावे निश्चित होणेसाठी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१९७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गुरुपोर्णिमा उत्सवातील वीणा,पोथी, फोटो, पाद्यपुजा, रुद्राभिषेक इत्यादीसाठी खालीप्रमाणे मान्यवरांची नावे निश्चीत करण्यात आली.**

| दिनांक | वेळ | कार्यक्रमात सहभागी होणा-या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| दि.१५/०७/२०१९<br>सोमवार | | उत्सवाचा प्रथम दिवस |
| | पहाटे ५.०० | श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक<br>वीणा- मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य<br>पोथी- मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य<br>प्रतिमा- मा.ॲड मोहन मोतीराम जयकर, सदस्य<br>मा.श्री.रविंद्र ठाकरे,उप मुख्य कार्यकारी अधिकारी |
| | पहाटे ५.१५ | अध्याय वाचन –<br>अध्याय क्र.१ - मा.डॉ.सुरेश काशिनाथ हावरे,अध्यक्ष<br>अध्याय क्र.२ – मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य<br>अध्याय क्र.३ - मा.सौ.योगिता अभय शेळकेपाटील, सदस्या<br>अध्याय क्र.४ – मा.ॲड मोहन मोतीराम जयकर, सदस्य<br>अध्याय क्र.५ - मा.डॉ.राजेंद्र राजाबाली सिंह, सदस्य |
| | सकाळी ६.००<br>सायंकाळी | श्रींची पाद्यपूजा – मा.मुख्य कार्यकारी अधिकारी<br>मा.सौ.योगिता अभय शेळकेपाटील, सदस्या |
| १६/०७/२०१९.<br>मंगळवार | | उत्सवाचा मुख्य दिवस |
| | पहाटे ५.०० | श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक<br>वीणा - मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे,सदस्य<br>पोथी - मा.डॉ.सुरेश काशिनाथ हावरे,अध्यक्ष<br>प्रतिमा- मा.ॲड मोहन मोतीराम जयकर ,सदस्य/<br>मा.डॉ.राजेंद्र राजाबाली सिंह, सदस्य |
| | सकाळी ६.००<br>सायंकाळी | श्रींची पाद्यपूजा- मा.डॉ.सुरेश काशिनाथ हावरे,अध्यक्ष<br>मा.ॲड मोहन मोतीराम जयकर, सदस्य |
| १७/०७/२०१९<br>बुधवार | सकाळी ७.००<br>सायंकाळी | उत्सवाचा सांगता दिवस<br>श्रींची पाद्यपूजा– मा.ॲड मोहन मोतीराम जयकर,सदस्य<br>मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे,सदस्य |

| | | |
|---|---|---|
| | **सकाळी ७.००** | **गुरुस्थान येथे रुद्राभिषेक- मा. मुख्य कार्यकारी अधिकारी** |

**(कार्यवाही- शताब्दी कक्ष)**

---

**विषय नं.२६** **श्री साईबाबांच्या पादुका दर्शन सोहळयाचे आयोजन करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :-

१) अधिनियमाचे कलम १७ (२) ठ- श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लिला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ड) श्रीसाईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय –

१) दि.२८.०४.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२८०

जे सर्वसामान्य साईभक्त दर्शनासाठी शिर्डी येथे येऊ शकत नाही, अशा साईभक्तांच्या सोयीसाठी, समाधी शताब्दी महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर श्रींच्या मुळ पादुका देश-विदेशामध्ये ठिकठिकाणी दर्शनासाठी उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

२) दि.२३.०५.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३५८

देश विदेशातील पादुका दर्शनासाठी दोन पादुकांचा सेटचा वापर करण्यात यावा.

३) दि.२२.०८.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५२८

पादुका दर्शन सोहळा शताब्दी वर्ष समाप्तीनंतरही भविष्यात सुरु ठेवावेत

प्रस्तावना - श्री साईबाबा समाधी शताब्दी कालावधीमध्ये संपूर्ण वर्षभर वेगवेगळ्या धार्मिक सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले होते. श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार व प्रसार करणेसाठी महाराष्ट्रासह देशातील विविध राज्यांतील शहरांमध्ये श्रींचे पादुका दर्शन सोहळा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येऊन, श्रींचे पादुका दर्शनाचा अनेक साईभक्तांनी लाभ घेतलेला आहे.

आता साई मंदिर पेठ वडगांव, कोल्हापूर, ऑल इंडिया साईसमाज, चेन्नई, डॉ. संजय जी.शिरबुर, कॅलिफोर्निया (यु.एस.ए) यांनी प्रस्ताव दिलेले आहेत. तसेच पादुका मिळणेसाठी दुरध्वनीवरुनही विचारणा होत आहे.

विभागाचा अभिप्राय– दि.२२.०८.२१८ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत पादुका दर्शन सोहळा शताब्दी वर्ष समाप्तीनंतरही भविष्यात सुरु ठेवावेत असा निर्णय क्र.५२८ झालेला आहे. सदरहू निर्णयास अनुसरुन श्रींचे पादुका दर्शन सोहळ्याची रुपरेषा अंतिम करता येईल तथापि पादुका दर्शन सोहळा पुन्हा चालू करावा किंवा कसे याबाबत धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल.

प्रस्ताव– तरी पादुका दर्शन सोहळा पुन्हा चालू ठेवणेबाबत धोरणात्मक निर्णयासाठी सादर.

**निर्णय क्र.१९८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबांच्या पादुका दर्शन सोहळयाचे आयोजन करणेकामी मा.श्री.बिपीनदादा कोल्हे,अध्यक्ष व मा.ॲड मोहन जयकर, सदस्य यांची समिती गठीत करण्यात आली. या समितीने श्री साईबाबांचे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजन करणेबाबत धोरणात्मक निर्णय घ्यावा, असे ठरले.**

**तसेच श्री साईबाबांच्या मुळ पादुका भारताबाहेर नेण्यात येऊ नये, त्याऐवजी चांदीच्या पादुका नेण्यात याव्यात, असे ठरले.** **(कार्यवाही- शताब्दी कक्ष)**

---

**विषय नं.२७** **स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा-शिर्डी यांना संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सिटी सर्व्हे नं.३२ मधील साईनाथ छाया इमारतीतील तळमजल्यावरील ९ चौ.मीटर ए.टी.एम.साठी वापरास दिलेल्या जागेच्या वापरास मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अथवा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना– यापूर्वी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१३/१२/२०१८ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.७४० अन्वये स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांना ए.टी.एम.चे वापरासाठी साईनाथछाया इमारतीतील

तळमजल्यावरील दिलेल्या ९ चौमी जागेस दि.२८/०६/२०१८ ते दि.२७/०५/२०१९ या ११ महीन्यांचे कालावधीसाठी मागील मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.६,६००/- + रु.६६०/-(१०%) =एकूण रु.७,२६०/- मात्र भाडे व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर मुदतवाढ देण्यास व त्याबाबतचा करारनामा करण्यास मान्यता दिलेली आहे. त्याप्रमाणे उक्त कालावधीचा लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेण्यात आलेला आहे.

स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांना संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.३२ मधील साईनाथछाया इमारतीतील तळमजल्यावरील ९ चौमी. इतकी ए.टी.एम.साठी वापरास दिलेल्या जागा वापराची मुदत दि.२७/०५/२०१९ रोजी संपत असलेने मा.शाखाधिकारी,स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.०६/०५/२०१९ रोजीच्या पत्रान्वये उक्त जागा वापराची मुदत पुढील कालावधीसाठी वाढवून मिळणेकामी इकडेस विनंती केलेली आहे.

विभागाचा अभिप्राय - स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.०६/०५/२०१९ रोजीच्या उक्त जागा वापराचे मुदतवाढीचे पत्राचे अनुषंगाने साईभक्तांना सेवा-सुविधा पुरविण्यासाठी त्यांना ए.टी.एम.चे वापरासाठी साईनाथछाया इमारतीतील तळमजल्यावरील दिलेल्या ९ चौमी.जागेस पुढील दि.२८/०५/२०१९ ते दि.२७/०४/२०२० या ११ महिन्यांचे कालावधीसाठी मागील मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.७,२६०/-+१०% रु.७२६/- = एकूण रु.७,९८६/- इतके मासिक भाडे आकारण्यात येवून व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन लिव्ह ॲण्ड लायसन्स कराराने जागा वापराची मुदत वाढवून देता येईल व यापूर्वीप्रमाणेच लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेता येईल.

प्रस्ताव– स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांना संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सिटी स.नं.३२ मधील साईनाथछाया इमारतीतील तळमजल्यावरील ९ चौमी.इतकी ए.टी.एम.चे वापरासाठी दिलेल्या जागेच्या वापराची पुढील मुदत दि.२८/०५/२०१९ ते दि.२७/०४/२०२० या ११ महिन्यांचे कालावधीसाठी मागील मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.७,२६०/-+१०% रु.७२६/-अशीएकूण रक्कम रु.७,९८६/- इतके मासिक भाडे आकारण्यात येवून व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन लिव्ह ॲण्ड लायसन्स कराराने जागा वापराची मुदत वाढवून देणेच्या व त्याप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेणेकामीच्या निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१९९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालकीची मौजे शिर्डी येथील सिटी स.नं.३२ मधील साईनाथ छाया इमारतीतील तळमजल्यावरील ९ चौ.मीटर जागा स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांना ए.टी.एम.चे वापरासाठी दि.२८/०५/२०१९ ते दि.२७/०४/२०२० या ११ महिन्यांचे कालावधीसाठी मागील मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.७,२६०/-+१०% रु.७२६/-अशी एकूण रक्कम रु.७,९८६/- इतके मासिक भाडे आकारण्यात येवून व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन लिव्ह ॲण्ड लायसन्स कराराने मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. व त्याप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

विषय नं.२८ **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१२६/४ पै.चे क्षेत्रापैकी नगरपंचायत, शिर्डी यांना दिलेल्या क्षेत्राव्यतीरिक्त संस्थानचे क्षेत्रात नगरपंचायत करीत असलेल्या प्रस्तावीत बांधकामाबाबत.**

प्रस्ताव- अधिनियमातील तरतूद- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

तसेच २१(२) (दोन) मध्ये स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करण्यासाठीची तरतूद आहे.

प्रस्तावना- शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांच्या शिर्डी शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या झोन क्रं.३ मधील जलकुंभाकरीता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे सर्वे नं.१०७ पै. उत्तर-पूर्व कोप-यात व झोन क्रं.२ मधील जलकुंभाकरीता सर्वे नं.१२६ पै. मधील नांदुर्खी रस्त्यालगत (प्रस्तावित विकास

योजनेतील १८ मीटर वळण रस्त्यालगत) प्रत्येकी १२ आर इतके श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्या मालकीचे क्षेत्र शिर्डी नगरपंचायतीस महाराष्ट्र शासन,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रं.सासंवि/२००६/५८०/(७९)/का.१६ दि.२०/१२/२००६ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार त्याचवेळेस संस्थानकडून नगरपंचायत,शिर्डी यांनी सर्वे नं.१२६/४ पै. ०.१२ आर क्षेत्राचा ताबा संस्थानकडून घेवून त्यात जलकुंभाचे बांधकाम पूर्ण केलेले आहे.

उपरोक्त सर्वे नं.१२६/४ चे क्षेत्रात नगरपंचायतीने बांधकामासाठी आखणी केलेचे दि.१६/०२/२०१९ रोजी निदर्शनास आलेवरुन बांधकाम विभागाकडील मुकादम श्री.गिरीश चोळके व मालमत्ता विभागाकडील कं.मोजणीदार श्री.बाळासाहेब जाधव यांना तात्काळ संस्थानचे उक्त क्षेत्राचे समक्ष स्थळनिरीक्षण करुन येणेबाबत सुचित करणेत आले. त्याप्रमाणे त्यांनी दि.१६/०२/२०१९ रोजी उक्त क्षेत्राची समक्ष पाहणी करुन इकडेस अहवाल सादर केलेला आहे. त्यात त्यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२६/४ पैकी नांदुर्खी रस्त्यालगत क्षेत्र १२ आर इतके शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांच्या शिर्डी शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेच्याझोन क्रं.२ मधील जलकुंभाकरीता देण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्याचवेळेस सदर क्षेत्राचा ताबा घेवून त्यात जलकुंभाचे बांधकाम पूर्ण केलेले आहे.

नगरपंचायत,शिर्डी यांनी सदर क्षेत्रात कर्मचारी निवासस्थान बांधण्याचे व कंपांऊड करणेचे प्रस्तावित केलेले असलेचे दि.१६/०२/२०१९ रोजी संस्थानचे निदर्शनास आले असता सदर जागेत समक्ष जावून संस्थान कर्मचारी यांनी पाहणी केली असता सदर जलकुंभाचे परिसरात कर्मचारी निवासस्थानचे चुना फक्कीने लाईनआऊट केलेली असून कॉलमचे खड्डे घेतलेले दिसून आलेले आहे. सदरचे लाईन आऊटचे निरीक्षण केले असता नगरपंचायत,शिर्डी यांनी श्री साईबाबा संस्थानचे क्षेत्रात उक्त बांधकाम प्रस्तावित असलेचे दिसून आलेले आहे.

यास्तव संस्थानने नगरपंचायतीस दिलेल्या ०.१२ आर क्षेत्राचाच वापर करावा. त्या व्यतिरिक्त संस्थानचे मालकीचे उर्वरित क्षेत्राचा वापर करु नये अथवा त्यात बांधकाम करु नये,असेबाबत मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,

यांना इकडील जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/५६५०/२०१९ दि.२३/०२/२०१९ अन्वये कळविणेत आले.

तद्रुषंगाने मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील जा.क्रं.नपं/टे-८/२/४९१/२०१९ दि.०१/०३/२०१९ अन्वये प्रस्तुत प्रकरणी इकडील जा.क्रं.एसएसएसटी/ मालमत्ता/ ५६५०/२०१९ दि.२३/०२/२०१९ च्या पत्रास अनुसरुन "शिर्डी नगरपंचायत हद्दीतील सर्वे क्रं.१२६/४ पै. मधील १२.७९ आर जागा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी चे मा.व्यवस्थापन समिती सभेतील विषय क्रं.२४ निर्णय क्रं.३०५ नुसार व शासन निर्णय क्रं.सासंवि-२००६/५८०/(७९)/का.सोळा दि.२० डिसेंबर २००६ अन्वये शिर्डी नगरपंचायतीस मिळालेली आहे. सदर जागेची महसुल दप्तरी ७/१२ उता-यावर नगरपंचायतची मालकी हक्क सदरी नोंद झालेली आहे. सदर जागेची उपअधिक्षक,भुमी अभिलेख कार्यालयाकडून मोजणी करुन नकाशा प्राप्त करुन घेणेत आलेला आहे. सदरची जागा ही सुधारित (प्रारुप) शिर्डी विकास योजनमध्ये अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थान या प्रयोजनासाठी दर्शविलेली आहे. प्रस्तावित आरक्षणानुसार सदर जागेत अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकामाचे प्रस्तावास मा.सहसंचालक,नगररचना विभाग, नासिक यांचे शिफारशीनुसार सहायक संचालक,

नगररचना विभाग,अहमदनगर यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.बां.प/मौ.शिर्डी,ता.राहाता/स.नं.१२६/४ (१२६/१ जुना) ससंअ/२७७५/१८ दि.२०/०८/२०१८ अन्वये मंजूरीची शिफारस केलेली आहे. मंजूर बांधकाम नकाशानुसार नगरपंचायत मालकीच्या सदर जागेतच बांधकाम चालू आहे. शिर्डी नगरपंचायतने नगरपंचायत मालकीचे जागेतच प्रस्तावित बांधकामाचे लाईन आऊट करुन बांधकाम सुरु केलेले असल्याने श्री साईबाबा संस्थानला पूर्वसुचना देण्याचा प्रश्नच उदभवत नाही," असे बाबत इकडेस कळविलेले आहे.

प्रस्तुत पत्राचे अवलोकन केले असता नगरपंचायतीने शिर्डी सुधारीत प्रारुप विकास योजनेमध्ये संस्थानचे मालकीचे सर्वे नं.१२६/४ पै. चे क्षेत्रामध्ये अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थान या प्रयोजनासाठी क्षेत्र प्रस्तावित केलेले असलेचे नमुद केलेले आहे. शिवाय प्रस्तावित आरक्षणानुसार सदर जागेत अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकामाचे प्रस्तावास मा.सहायक संचालक, नगररचना यांनी मंजुरीची शिफारस केलेली असलेचेही नमुद केलेले आहे. म्हणजेच सदरची सुधारीत (प्रारुप) शिर्डी विकास योजना अद्यापपावेतो मंजूर झालेली नाही व अंतिम झालेली नाही.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे सर्वे नं.१२६ पै. ०.१२ आर इतकेच क्षेत्र नगरपंचायतीस जलकुंभाचे बांधकाम करणेकामी सन २००६ मध्ये दिलेले आहे व तदनुसार त्याचवेळेस संस्थानकडून नगरपंचायत,शिर्डी यांनी सर्वे नं.१२६ पै.चे ०.१२ आर क्षेत्राचा ताबा संस्थानकडून घेवून त्यात जलकुंभाचे बांधकाम पूर्ण केलेले आहे.

म्हणजेच नगरपंचायत,शिर्डी यांचे मालकीचे सध्यस्थितीत फक्त ०.१२ आर इतकेच क्षेत्र आहे. तरीदेखील नगरपंचायतने सदर सर्वे नं.१२६ पै.चे क्षेत्रात सुधारीत (प्रारुप) विकास योजनेत प्रस्तावित अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थान दर्शविलेले आहे. मात्र सदरची सुधारीत (प्रारुप) शिर्डी विकास योजना अद्यापपावेतो मंजूर व अंतिम झालेली नाही. त्यामुळे नगरपंचायतीने त्यांना संस्थानने दिलेल्या ०.१२ आर क्षेत्रा व्यतिरिक्त संस्थानचे इतर क्षेत्रात बांधकाम करणे अथवा संस्थानचे उर्वरित क्षेत्राचा वापर करणे ही बाब विधीग्राहय नाही.
वास्तविक पाहता नगरपंचायतीने सुधारीत (प्रारुप) शिर्डी विकास योजनेस अंतिम मंजुरी प्राप्त झालेनंतर त्याप्रमाणे भुसंपादनाची कार्यवाही पूर्ण करुन घेवून भुसंपादित क्षेत्र नगरपंचायतीकडे वर्ग झालेनंतर त्यात प्रस्तावित अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकाम करणे विधीग्राहय आहे.

मात्र नगरपंचायतीने उपरोक्तप्रमाणे प्रक्रिया पूर्ण न करता संस्थानचे जागेत अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकाम बेकायदेशीरपणे सुरु केलेले असलेचे निदर्शनास येत आहे. यास्तव सदरचे बांधकाम तात्काळ बंद करणेत यावे आणि संस्थानची मालकीची जागा पूर्ववत करुन देणेत यावी. संस्थानने नगरपंचायतीस दिलेल्या ०.१२ आर क्षेत्राचे टाकीचे क्षेत्रासह जागेची निश्चिती करुन घेवून त्याव्यतिरिक्त संस्थानचे इतर क्षेत्रात कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नयेअथवा संस्थानचे मालकीचे क्षेत्राचा वापर करु नये, असेबाबत मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/ मालमत्ता/ ५८३८/२०१९ दि.०५/०३/२०१९ अन्वये पुन:श्च कळविणेत आले.

तत्राप मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी सदर पत्रास कोणताही प्रतिसाद दिला नसलेने प्रस्तुत प्रकरणा संदर्भात दि.०२/०४/२०१९ रोजी तहसिलदार, राहाता,मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी, उपअधिक्षक, भुमी अभिलेख, राहाता यांची बैठक घेण्यात आली.

सदर बैठकीत मुख्याधिकारी,नगरपंचायत,शिर्डी यांनी "संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२६ पै. चे शिर्डी-नांदुर्खी या १८ मी. रस्त्यालगत ०.१२ गुंठे जागा नगरपंचायतीचे शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या जलकुंभाकरीता सन २००६ मध्ये शासनाच्या मान्यतेने दिलेली आहे. त्याप्रमाणे नगरपंचायतचे नावाने नोंद झालेली आहे व सदर क्षेत्रात सन २०१३ मध्ये जलकुंभाचे बांधकाम पूर्ण करणेत आलेले आहे. संस्थानकडून नगरपंचायतला जलकुंभासाठी मिळालेल्या ०.१२ गुंठे जागेची मोजणी होवून निश्चिती करणेत आलेली नव्हती. त्यामुळे नगरपंचायतीने भुमी अभिलेख विभागाकडून नगरपंचायतीस मिळालेल्या जागेची मोजणी करुन घेतली असता सदर १८ मी. रस्त्यालगतच्या जागेपासून मोजमापानुसार संस्थानच्या जागेत अंदाजे ५ ते ५.५ गुंठयात संस्थानच्या जागेत टाकी सरकलेली आहे. रस्त्याकडील जागेत शिर्डी सुधारीत प्रारुप विकास आराखडयात नगरपंचायतीचे अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थान दर्शविलेले आहे. त्या अनुषंगाने नगररचना विभागाकडून नगरपंचायतीने बांधकामास परवानगी घेतली आहे. त्यासाठी सुमारे २.५ कोटीचे टेंडर काढण्यात आलेले आहे आणि ठेकेदाराला कार्यारंभ आदेश देखील देण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे टाकीचे दक्षिण बाजूकडील रस्त्यालगतच्या जागेत नगरपंचायतीचे अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकाम चालू करणेत आलेले आहे. सदरचे बांधकाम आता बंद करता येणार नाही. जलकुंभाचे बांधकाम संस्थानच्या जागेत सरकलेले आहे. सदरच्या अग्निशमन केंद्राचा उपयोग सार्वजनिक हितासाठीच होणार आहे. त्यासाठी सदरचे क्षेत्र नगरपंचायतीस संस्थानकडून मिळणेकामीचा प्रस्ताव नगरपंचायतीमार्फत अलाहिदा सादर करणेत येईल व सदर जागेची होणारी किंमत नगरपंचायत संस्थानला अदा करेन. तरी सदरचे

अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे चालू असलेले बांधकाम बंद करु नये,"असेबाबत मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी विनंती केली.

प्रस्तुत बैठकीत झालेल्या चर्चेत संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील जमीन सर्वे नं.१२६ पै.चे ०.१२ आर क्षेत्र नगरपंचायतीस जलकुंभासाठी देणेकामी सन २००६ साली शासनाने मान्यता दिलेली आहे. मात्र त्यावेळेस सदर क्षेत्राचीमोजणी तसेच ताबा देणे-घेणेची कार्यवाही झालेली नसलेचे दिसून आले. तसेच शासन निर्णयामध्ये सदरचे ०.१२ आर क्षेत्र हे प्रस्तावित १८ मी. रुंदीच्या रस्त्यालगत पासून देण्यासाठी शासनाने मान्यता दिलेली आहे. मात्र सदरचा रस्तात्यावेळी अस्तित्वात नसल्याकारणाने त्यावेळेस सदर ०.१२ आर क्षेत्राचे हद्दी निशाण्या निश्चित झालेल्या नसलेचे दिसून येते. शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी सदर ०.१२ आर क्षेत्राची मोजणी

करणेकामीची हद्द सध्यस्थितीत असलेल्या शिर्डी-नांदुर्खी रोडलगत पासून गृहीत धरुन त्या ठिकाणापासून मोजणी केली असल्याकारणाने नगरपंचायतीमार्फत बांधणेत आलेले जलकुंभ संस्थानच्या जागेत सरकलेले असलेचे दिसून येत आहे. नगरपंचायतने दि.०७/०४/२०१८ रोजीची मोजणी बेस धरुन संस्थान मालकीचे उर्वरित क्षेत्रात अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकाम सुरु केलेले आहे. सदरचे प्रस्तावित बांधकाम न करणेबाबत संस्थान प्रशासनाने नगरपंचायतीमार्फत सदर क्षेत्रात बांधकामासंबंधीची आखणी केली त्याचवेळेस लेखी कळविलेले आहे व तदनंतर देखील नगरपंचायतने सुरु केलेले बांधकाम संस्थानने नगरपंचायतीस दिलेल्या ०.१२ आर क्षेत्राची निश्चिती होईपर्यंत बांधकाम करु नये,असेबाबत देखील नगरपंचायतीस संस्थानने लेखी कळविलेले आहे. तरीदेखील नगरपंचायतीने सदरचे बांधकाम सुरुच ठेवलेले आहे,असे निदर्शनास आलेले आहे.

नगरपंचायतमार्फत सुरु असलेले अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकाम हे सार्वजनिक हिताच्या दृष्टिकोनातून होत असलेबाबत मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी सांगितले असून त्यासाठीचे टेंडर काढून ठेकेदारास कार्यारंभ आदेश देखील पारित केला आहे व त्या ठिकाणी बांधकाम सुरु देखील करणेत आलेले आहे. अशा परिस्थितीत बांधकाम बंद करणे सार्वजनिक हिताचे दृष्टिने हितावह ठरणार नाही. सदर क्षेत्राची होणारी किंमत नगरपंचायत संस्थानला देणेस तयार आहे आणि जागा मागणीचा प्रस्ताव नगरपंचायत संस्थानकडे सादर करणार असलेबाबत मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी सांगितलेने ''नगरपंचायत, शिर्डी यांनी तसा जागा मागणीचा स्वतंत्र प्रस्ताव संस्थानकडे तात्काळ सादर करावा. नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी,'' असे बैठकीत ठरले.

विभागाचा अभिप्राय– उपरोक्त बैठकीत ठरलेप्रमाणे शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेकडून जागा मागणीचा स्वतंत्र प्रस्ताव संस्थानकडे प्राप्त झाल्यानंतर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार उचित कार्यवाही करता येईल.

प्रस्ताव– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२६/४ पै. चे क्षेत्रापैकी नगरपंचायत,शिर्डी यांना दिलेल्या क्षेत्रा व्यतिरिक्त नगरपंचायतने संस्थानचे क्षेत्रात प्रस्तावित केलेल्या बांधकामाखालील जागा मागणीचा स्वतंत्र प्रस्ताव संस्थानकडे प्राप्त झालेनंतर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करणेकामी मा.व्यवस्थापन समितीच्या बैठकीत निर्णयास मंजूरी मिळणेकामी सादर.

**निर्णय क्र.२००** **सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात येऊन मा.व्यवस्थापन समितीच्या पुढील बैठकीत सादर करण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**दि.०६.०६.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय-**

**विषय नं.२९** **शिर्डी विकास योजना आरक्षण व प्रारुप विकास आराखडा (सुधारीत) मधील संस्थानसाठी समाधी मंदिराचे दक्षिणेकडील बाजूस अतिरिक्त जागा उपलब्ध करणेकामी प्रस्तावीत आरक्षणाबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद– १) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ट) मध्ये विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील,अशी तरतूद आहे.

२) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम २८(१) चे परंतुकात मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जे ठराव शासनाच्या निदर्शनास आणणे आवश्यक आहे असे वाटत असेल असे समितीचे ठराव शासनाकडे पाठवता येतील अशी तरतूद करणेत आलेली आहे.

प्रस्तावना- मा.व्यवस्थापन समितीचे दि.३१/०८/२०१६ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.५८८ प्रमाणे संस्थानसाठी पूर्वीचे आरक्षणांसह नवीन क्षेत्रांसाठी आरक्षण प्रस्तावित करणेबाबत संस्थानचे बांधकाम विभागामार्फत नगररचना अधिकारी,शिर्डी विकास योजना (सुधारीत) शिर्डी तथा प्र.सहायक संचालक,नगररचना आणि मुल्य निर्धारण विभाग, अहमदनगर यांना बांधकाम विभागाकडील जा.नं.३०११/२०१६ दि.१२/०९/२०१६ रोजीचे पत्रान्वये कळविणेत आलेले आहे व सदर आरक्षणा संबंधात मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.७७२ प्रमाणे ''सध्या होणारी गर्दी,तयामुळे येणा-या अडचणी तसेच सुरक्षेच्या दृष्टिकोनातून गुरुस्थान,द्वारकामाई,श्रीं चे समाधी मंदिर व चावडी या मंदिरांचे सुलभ दर्शनासाठी

एकत्रित दर्शनरांगेच्या नियोजनासाठी तसेच रथ पालखी मिरवणुकीचे गर्दीचे नियोजनासाठी दक्षिणेकडील बाजूस अतिरिक्त जागा उपलब्ध करणेसाठी प्रारुप सुधारीत विकास योजनेत सहायक संचालक,नगररचना,अहमदनगर यांचेकडेस आरक्षण प्रस्तावित केलेले आहे. त्याप्रमाणे शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी प्रारुप विकास योजना (सुधारीत) मध्ये आरक्षण क्रं.५ प्रमाणे संस्थान हेतूसाठी शिर्डी येथील सर्वे नं.१/२ पैकी क्षेत्रात ०.१२ आर इतके क्षेत्राचे आरक्षण प्रस्तावित केलेले आहे."

उपरोक्त आरक्षण संदर्भात सौ.उज्ज्वला दिलीपचंद संकलेचा व इतर १७ यांनी सदर आरक्षण क्रं.५ संस्थान हेतू संदर्भात श्री साई मंदिराचे दक्षिण बाजूचे १२ मी.रस्त्याचे भुसंपादन रद्द करावे यासाठी दि.१४/०३/२०१८ रोजी संस्थानकडे अर्ज सादर केलेले आहेत.

सदर अर्जासंदर्भात व इतर आरक्षणासंदर्भात प्राप्त झालेल्या अर्जांबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१८ रोजीच्या सभेत प्रस्ताव सादर करणेत आला. त्यात अर्जदार सौ.उज्वला दिलीपचंद संकलेचा व इतर १७ यांनी समाधी मंदिराचे दक्षिण बाजूकडील रस्त्याची रुंदी १२ मीटर ऐवजी ९ मीटर करणेबाबत विनंती केलेली आहे. तथापि सुरक्षेच्या दृष्टिकोनातून गुरुस्थान,द्वारकामाई,समाधी मंदिर व चावडी या मंदिरांचे सुलभ दर्शनासाठी एकत्रित दर्शनरांगेच्या नियोजनासाठी तसेच रथ पालखी मिरवणुकीचे गर्दीचे नियोजनासाठी सदरच्या रस्त्याला अतिरिक्त जागा उपलब्ध होणे आवश्यक आहे. यावर विचारविनिमय होवून निर्णय होणेकामीचा प्रस्ताव सादर करणेत आला.

त्यावर निर्णय क्रं.४८२ प्रमाणे "श्री साई मंदिराचे दक्षिण बाजूकडील सध्याचा रस्ता ९ मीटर रुंदीचा आहे. श्रीं ची पालखी द्वारकामाई मंदिरातून निघत असल्याने पालखीस अडथळा निर्माण होत नाही. तसेच सन २००५ मध्ये संपादन करतांना ९ मीटर रस्त्यासाठी सर्व मालमत्ता धारकांनी संमती दिली होती. त्याप्रमाणे संपादन होवून ९ मीटर पालखी रस्ता झालेला आहे. त्यामुळे आता पुन्हा १२ मीटर साठी संपादन करणे योग्य होणार नाही. त्यामुळे नवीन ३ मीटर वाढीव जागेची आवश्यकता नाही. त्यामुळे सदर आरक्षण वगळण्याचा प्रस्ताव सादर करणेत यावा," असेबाबतचा निर्णय झालेला आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम २८(१) चे परंतुकात मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जे ठराव शासनाच्या निदर्शनास आणणे आवश्यक आहे असे वाटत असेल असे समितीचे ठराव शासनाकडे पाठवता येतील अशी तरतूद करणेत आलेली आहे. तदनुषंगाने सदर निर्णयाचे संबंधात "श्री साई मंदिराचे दक्षिण बाजूकडील द्वारकामाई रोड हा अत्यंत अरुंद आहे. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टिकोनातून गुरुस्थान,द्वारकामाई, समाधी मंदिर व चावडी या मंदिरांचे सुलभ दर्शनासाठी एकत्रित दर्शनरांगेच्या नियोजनासाठी तसेच रथ पालखी मिरवणुकीचे गर्दीचे नियोजनासाठी सदरच्या रस्त्याला अतिरिक्त जागा उपलब्ध होणे आवश्यक आहे. सध्यस्थितीत साईभक्तांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून संस्थानने लोखंडी बॅरिकेटींग केलेले आहे. साईभक्तांची सदर रस्त्यावर मोठया प्रमाणावर गर्दी असते. भविष्यात उत्सव काळात चेंगराचेंगरीसारखी आपत्कालीन परिस्थिती उदभवण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी सदर रस्त्याचे बाजूस अतिरिक्त जागा उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरचे आरक्षण रद्द करणे

उचित होणार नाही.यास्तव निर्णय क्रं.४८२ मधील परिच्छेद १ मधील अ संबंधात मा.व्यवस्थापन समितीचे घेतलेला निर्णय क्रं.४८२ "श्री साई मंदिराचे दक्षिण बाजूकडील सध्याचा रस्ता ९ मीटर रुंदीचा आहे. श्रीं ची पालखी द्वारकामाई मंदिरातून निघत असल्याने पालखीस अडथळा निर्माण होत नाही. तसेच सन २००५ मध्ये संपादन करतांना ९ मीटर रस्त्यासाठी सर्व मालमत्ता धारकांनी संमती दिली होती. त्याप्रमाणे संपादन होवून ९ मीटर पालखी रस्ता झालेला आहे. त्यामुळे आता पुन्हा १२ मीटर साठी संपादन करणे योग्य होणार नाही. त्यामुळे नवीन ३ मीटर वाढीव जागेची आवश्यकता नाही. त्यामुळे सदर आरक्षण वगळण्याचा प्रस्ताव सादर करणेत यावा," हा निर्णय संस्थानचे दृष्टिने हितावह नसल्याने तसेच साई मंदिराची सुरक्षा व गर्दीचे व्यवस्थापनाचे दृष्टिकोनातून योग्य नसल्याने निरस्त करणे आवश्यक आहे म्हणून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम २८(१) चे परंतुकातील तरतुदीनुसार सदर बाब शासनाचे निदर्शनास आणण्यात येत आहे. तरी शासन स्तरावरुन उचित कार्यवाही होणेस विनंती आहे,"असेबाबतचा अहवाल मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग, मंत्रालय,मुंबई यांचेकडेस इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/४३६९/२०१८ दि.०३/१२/२०१८ अन्वये अहवाल सादर करणेत आला.

त्यास अनुसरुन मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांनी त्यांचेकडील क्रं.सासंवि-१०१९/प्र.क्र.३८/का.१६ दि.३०/०३/२०१९ रोजीच्या पत्रान्वये मा.व्यवस्थापन समिती,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना उद्देशून व्यवस्थापन समितीच्या दि.२६/०७/२०१८ रोजीच्या सभेतील

निर्णय क्रं.४८२ अन्वये श्री साई मंदिराचे दक्षिण बाजूकडील सध्याचा रस्ता ९ मी.रुंदीचा आहे. श्रीं ची पालखी द्वारकामाई मंदिरातून निघत असल्याने पालखीस अडथळा निर्माण होत नाही. तसेच सन २००५ मध्ये संपादन करतांना ९ मी.रस्त्यासाठी सर्व मालमत्ता धारकांनी संमती दिली होती. त्याप्रमाणे भुसंपादन होवून ९ मी. पालखी रस्ता झालेला आहे. त्यामुळे आता पुन्हा १२ मी. साठी संपादन करणे योग्य होणार नाही. त्यामुळे नवीन ३ मी.वाढीव जागेची आवश्यकता नाही. त्यामुळे सदर आरक्षण वगळण्याचा प्रस्ताव सादर करण्यात यावा,असे ठरल्याबाबत कळविण्यात आले आहे. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ चे कलम २८ (१) चे परंतुकातील तरतुदीनुसार सदर ठराव शासनाच्या निदर्शनास आणून हा निर्णय संस्थानच्या दृष्टिने हितावह नसल्याने तसेच साई मंदिराची सुरक्षा व गर्दीचे व्यवस्थापनाचे दृष्टिकोनातून योग्य नसल्याने निरस्त करणे आवश्यक असलेचे मत व्यक्त केले आहे. यास्तव या अनुषंगाने आपले अभिप्राय शासनास कळविणेबाबत विनंती करण्यात येत आहे,असेबाबत कळविलेले आहे.

विभागाचा अभिप्राय– मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग यांचेकडील मा.व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना उद्देशून लिहीलेल्या दि.३०/०३/२०१९ रोजीच्या पत्रात नमूद केलेप्रमाणे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ चे कलम २८(१) चे परंतुकातील तरतुदीनुसार उक्त ठराव शासनाचे निदर्शनास आणून हा निर्णय संस्थानच्या दृष्टिने हितावह नसल्याने तसेच साई मंदिराची सुरक्षा व गर्दीचे व्यवस्थापनाचे दृष्टिकोनातून योग्य नसल्याने निरस्त करणे आवश्यक असलेचे मत व्यक्त केले आहे. यास्तव तदनुषंगाने मा.व्यवस्थापन समितीचे अभिप्राय शासनास कळविता येतील.

प्रस्ताव- मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग यांचेकडील मा.व्यवस्थापन समिती,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना उद्देशून लिहीलेल्या दि.३०/०३/२०१९ रोजीच्या पत्रात नमूद केलेप्रमाणे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ चे कलम २८(१) चे परंतुकातील तरतुदीनुसार उक्त ठराव शासनाचे निदर्शनास आणून हा निर्णय संस्थानच्या दृष्टिने हितावह नसल्याने तसेच साई मंदिराची सुरक्षा व गर्दीचे व्यवस्थापनाचे दृष्टिकोनातून योग्य नसल्याने निरस्त करणे आवश्यक असलेचे मत व्यक्त केले आहे. तदनुषंगाने शासनास मा.व्यवस्थापन समितीचे अभिप्राय सादर करणेकामीच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२०१** **विधी व न्याय विभाग यांचेकडील क्रं.सासंवि-१०१९/प्र.क्र.३८/का.१६ दि.३०/०३/२०१९ रोजीचे पत्राची नोंद घेण्यात आली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई मंदिराचे दक्षिण बाजूकडील सध्याचा रस्ता ९ मी.रुंदीचा आहे. श्रीं ची पालखी द्वारकामाई मंदिरातून निघत असल्याने पालखीस अडथळा निर्माण होत नाही. तसेच सन २००५ मध्ये भूसंपादन करतांना ९ मी.रस्त्यासाठी सर्व मालमत्ता धारकांनी संमती दिली होती. त्याप्रमाणे भुसंपादन होवून ९ मी. पालखी रस्ता झालेला आहे. त्यामुळे आता पुन्हा १२ मी. साठी भूसंपादन करणे योग्य होणार नाही. त्यामुळे नवीन ३ मी.वाढीव जागेची आवश्यकता नाही. त्यामुळे सदर आरक्षण वगळण्याचा प्रस्ताव सादर करण्यात यावा, असा मा.व्यवस्थापन समितीचा अभिप्राय शासनास कळविणेत यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.३०** **व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांचे दि.२७.०२.२०१९ चे पत्राबाबत.**

**प्रस्ताव-** मे.व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांचे प्लॅन्टला दि.०४.०१.२०१९ रोजी भेट दिली होती. त्यावेळी ठरल्याप्रमाणे (पाहणी अहवाल अ.नं.१२ दि.०७.०१.२०१९) मे.व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज,अहमदाबाद यांना इकडील जा.नं एसएसएस/वशी-खरेदी/५०३४/२०१९ दि.१७.०१.२०१९ अन्वये "Please give strict instructions to all the your concerned staff, not to put the plastic bags with Butter in hot Pot/Kadhai at the time of conversion of Butter into Ghee." अशा सुचना देऊन याबाबत उचित कारवाई करणेबाबत सुचना लेखी पत्राद्वारे देण्यात आल्या होत्या.

सदर पत्रावर मे.व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांनी खालीलप्रमाणे कारवाई केलेबाबत खुलासा त्यांचे दि.२७/२/२०१९ चे पत्राद्वारे केला आहे.

In the reference to above mentioned subject & observation of Audit visit team of the trust, we have immediately taken the step to rectify plastic bags problem in processing

area, and asked the production team that this types of situation should not happened in future.

Dairy Technologist Mr.Manish Kumar is appointed to ensure hygienic conditions of processing area. Going one step further we have purchased & installed Butter Melter so that first step of cooking the Butter will be through Butter Melter at 40 degree C then untouched Melted & filter Butter will be shifted to cooking Vat automatically.

So, we here by promise your kind self, that this type of problem will not be happened in future. We also assure you that we are committed supply of best quality Ghee to Sansthan.

मे.व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांनी वरीलप्रमाणे केलेला खुलासा अवलोकनार्थ व माहितीसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.२०२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांनी दिलेल्या खुलाशाचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.** **(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**विषय नं.३१** **३ लाख ते २५ लाख खरेदीसाठी वर्तमान पत्रात जाहिरात न देणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानसाठी विविध वस्तु/साहित्यांची खरेदी केली जाते. यामध्ये रक्कम रू.५ लाख व त्यापेक्षा जास्त असणारे साहित्याची खरेदी ही खरेदी विभागामार्फत केली जाते.

१) खरेदी नियमावलीतील ४.४.२ निविदा जाहिरात व वितरण यामध्ये खालील तरतुदी आहेत.

२) रू.तीन (३) लाख ते रू.पंचवीस (२५) लाख पर्यंतच्या सर्व खरेदीसाठीच्या जाहिराती वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्याची आवश्यकता नाही.

३) सर्व खुल्या निविदांतील अंदाजित खर्च रू.पंचवीस (२५) लाख ते रू.पाच (५) कोटीपेक्षा अधिक नसेल, त्यांच्या जाहिराती एका प्रमुख विभागीय स्तरावरील वर्तमानपत्रात आणि एका राज्य स्तरावरील वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात येतील.

४) सर्व खुल्या निविदांतील अंदाजित खर्च रू. पाच (५) कोटी व अधिक असेल तर त्यांच्या जाहिराती कमीत कमी एका राष्ट्रीय वर्तमानपत्रात आणि एका राज्य स्तरीय वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात येतील.

५) निविदा नोटीस महाराष्ट्र सरकारच्या ई-निविदा पोर्टलवर आणि विभागाच्या संकेत स्थळावर देखील प्रसिध्द करण्यात येईल.

शासनाची सुधारीत खरेदी नियमावली ही संस्थानला लागू आहे. संस्थानच्या व्यवसस्थापन समितीच्या दि.२५.०२.२०१७ रोजी झालेल्या सभेत निर्णय क्रं.२१ अन्वये सदरची सुधारीत खरेदी नियमावली संस्थानला लागू करण्यात आलेली आहे.

वरील नमूद तरतुदीपैकी अ.नं.५ चे तरतुदीनुसार संस्थानच्या विविध विभागांमार्फत करीत असलेल्या खरेदीच्या जाहिराती वेबसाईटवर प्रसिध्द केल्या जातात. तसेच जनसंपर्क कार्यालयामार्फत वर्तमानपत्रात ई-निविदेस व्यापक प्रमाणात प्रतिसाद मिळणेचे दृष्टीने या निविदांच्या जाहिराती सध्या शासकीय दराने देण्यात येतात.

सन २०१८-१९ या वर्षात रू.३ लाख ते २५ लाखपर्यंतच्या खरेदीसाठी जाहिरातींचा मोठया प्रमाणावर खर्च झाला असल्याचे मा.मुख्य लेखाधिकारी यांनी चर्चेत सांगितले आहे व त्यामुळे रू. ३ ते २५ लाखापर्यंतच्या खर्चाचे खरेदीसाठी यापुढे वर्तमानपत्रात जाहिराती न देता सदर ई-निविदांची जाहिरात फक्त संस्थानच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणेस प्रस्तावित करण्याचे चर्चेअंती सुचविले आहे. याबाबत खरेदी विभागाकडील दि.०८.०५.२०१९ रोजीचे टिपणीवर सदरची बाब धोरणात्मक असल्यामुळे व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्याचे निर्देश आहेत.

तरी रू. ३ ते २५ लाखपर्यंतचे वस्तु/साहित्य खरेदीसाठी वर्तमानपत्रात जाहिरात न देता फक्त संस्थानच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणेबाबत उचित निर्णय होणेसाठी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२०३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, रू.३ लाख ते २५ लाखपर्यंतच्या खरेदीसाठी पुर्वीप्रमाणेच वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द् करण्याबरोबरच संस्थानच्या वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करण्याबाबतची पुर्वीचीच कार्यपध्दती कायम ठेवण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**विषय नं.३२** **माहे ऑक्टोंबर २०१८ ते डिसेंबर-२०१८ या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या मालाचे विविध प्रयोगशाळेमार्फत करण्यात आलेल्या तपासण्याचे अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८.१०.२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८०० अन्वये "यापुढे मोतीचुर लाडु प्रसाद निर्मीती करीता खरेदी करणेत येत असलेल्या गाईचे शुद्ध (गावरान) तुपाचे प्रत्येक नमुन्याची तपासणी अश्वमेध इंजिनीअर्स ॲण्ड कन्सलटंटस नासिक, या NABL मान्यताप्राप्त प्रयोगशाळेकडुन करुन घेण्यात यावी", असे ठरलेले आहे.

खरेदी विभागाचे दि.१४.०७.२०१७ रोजीचे टिपणी वरील निर्देश नुसार संस्थानला प्राप्त होणा-या गाईचे शुद्ध तुप व खाद्यतेलाची तपासणी राज्य/ केंद्र शासनाच्या प्रयोगशाळेमधून करुन घेणेबाबत निर्देश झालेले आहेत.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.३१.०८.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६३७ अन्वये "संस्थानसाठी किराणा माल अथवा इतर ज्या साहित्यांच्या नमुन्यांची लॅब तपासणी करण्यात येते अशा लॅब तपासण्यांचा अहवाल सभेसमोर सादर करण्यात यावा", असे ठरलेले आहे.

संदर्भीय निर्णयांनुसार, गाईचे शुद्ध तुपाचे पुरवठादार मे. हर्ष फ्रेश डेअरी प्रॉडक्ट्स प्रा. लि., हरीद्वार, यांचेकडून प्राप्त होणा-या तूपाची तपासणी संस्थानचे प्रयोगशाळेसह अश्वमेध इंजिनीअर्स ॲण्ड कन्सलटंटस नासिक (NABL Lab) व जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा (शासकीय प्रयोगशाळा) यांचेकडून करणेत येत आहे, तसेच आवश्यकतेनुसार केंन्द्रीय खाद्य प्रोद्योगिक अनुसंधान संस्थान, मैसूर, यांचेकडूनही तपासणी करणेत येत आहे. तसेच खाद्यतेलाची तपासणी संस्थानचे प्रयोगशाळेसह शासकीय प्रयोगशाळेकडून करणेत येत आहे.

वरील निर्णयानुसार माहे सप्टेंबर २०१८ पर्यंतचे सर्व प्रयोगशाळा तपासणी अहवाल मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेत आलेले आहेत. आता संस्थानला माहे ऑक्टोबर २०१८ ते डिसेंबर २०१८ या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या गाईचे शुद्ध तुप व खाद्यतेलाचे विविध प्रयोगशाळेंमार्फत करणेत आलेल्या तपासण्यांचे अहवाल तपशिलवार परिशिष्ठासह यासोबत सादर केले आहेत. त्यामध्ये

**अ)** प्रादेशिक आरोग्य प्रयोगशाळा, औरंगाबाद, (शासकीय प्रयोगशाळा), जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, नासिक, (शासकीय प्रयोगशाळा), अश्वमेध इंजिनीअर्स ॲण्ड कन्सलटंटस, नासिक, (NABL Lab) यांचेसह संस्थानचे प्रयोगशाळेतील सर्व तपासणी अहवालांमध्ये उपरोक्त सर्व तुपाचे नमुने अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६, नुसार conform असल्याचे नमुद आहे.

**ब)** केंन्द्रीय खाद्य प्रोद्योगिक अनुसंधान संस्थान, मैसूर, यांचे गाईचे शुद्ध तुपाचे तपासणी अहवालांमध्ये सूस्पष्ट अभिप्राय नमुद नाहीत.

**क)** अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६, (नियम व नियमन २०११) नुसार गाईचे तुपासाठी बिगर कापूस उत्पादीत क्षेत्र (Areas, other than cotton track areas) करीता BRR हा ४० ते ४३ इतका तर कापूस उत्पादीत क्षेत्र (Cotton track areas) साठी तो ४१.५ ते ४५ इतका असणे आवश्यक असते. मात्र, केंन्द्रीय खाद्य प्रोद्योगिक अनुसंधान संस्थान, मैसूर, यांचे काही तपासणी अहवालांमध्ये BRR हा ४३ पेक्षा अधिक असल्याचे निदर्शनास येत आहे. ते पुढीलप्रमाणे तसेच त्याबाबतचे तपशिलवार परिशिष्ठ यासोबत स्वतंत्र सादर केलेले आहे.

| Sr.No. | Batch No. & Date | BRR | Sr.No. | Batch No. & Date | BRR |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 35/ 21.08.2018 | 43.1 | 05 | 40/ 01.10.2018 | 44.0 |
| 02 | 36/ 24.08.2018 | 43.4 | 06 | 41/ 03.10.2018 | 43.1 |
| 03 | 37/ 08.09.2018 | 43.4 | 07 | 45/ 30.10.2018 | 43.1 |
| 04 | 38/ 18.09.2018 | 43.4 | 08 | 46/ 10.11.2018 | 43.4 |

तथापि, गाईचे शुद्ध तुपाचे पुरवठादार मे. हर्ष फ्रेश डेअरी प्रॉडक्ट्स प्रा. लि., हरीद्वार, हे उत्तराखंड राज्यातील उत्पादक आहेत. अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६, (नियम आणि विनियमन २०११) नुसार उत्तराखंड हे राज्य कापूस उत्पादीत क्षेत्र (Cotton track areas) मध्ये येत नाही, त्यामुळे तेथील उत्पादीत शद्ध

तुपाचा BRR हा ४० ते ४३ या दरम्यान असणे गरजेचे आहे, मात्र वरील तपशिलातील नमुन्यांचा BRR हा ४३ पेक्षा अधिक असल्याने तो अन्न सुरक्षा व मानके कायद्याचे norms मध्ये बसत नाही. तसेच बॅच नं. ४२/ Dtd. ०६.१०.२०१८ चे तपासणी अहवालामध्ये Test of Baudouin ही Positive आलेली आहे. त्यामुळे तीही अन्न सुरक्षा व मानके कायद्याचे norms मध्ये बसत नाही.

ड) खाद्यतेलाचे सर्व प्रयोगशाळेंकडील तपासणी अहवालांमध्ये ते अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६, (नियम व नियमन २०११) नुसार conform असल्याचे नमुद आहे.

इ) भांडार विभागातून उपरोक्त परिशिष्ठातील नमुद सर्व बॅचचे गाईचे शुद्ध तुपाचा व खाद्यतेलाचा साठा विनातक्रार संपलेला आहे. तसेच पुरवठादार मे. हर्ष फ्रेश डेअरी प्रॉडक्ट्स प्रा. लि., हरीद्वार, यांचा पुरवठा कालावधी संपल्याने त्यांनी संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम परत मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

उपरोक्त अ, ब, क, ड व इ प्रमाणे तपासणी अहवालाच्या झेरॉक्स प्रती व तपशिलवार परिशिष्ठ मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ/ निर्णयार्थ सादर करणेस मान्यता मिळणेस्तव दि.२०.०२.२०१९ रोजी टिपणी/ प्रस्ताव सादर केला असता, त्यावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांनी “Call explanation and put up for decision” असा शेरा/ अभिप्राय नोंदविला होता. तदनंतर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे उपरोक्त निर्देशाप्रमाणे कार्यवाही करणेकामी खरेदी विभागास कळविणेत आलेले होते. त्यानुसार त्यांनी जा.नं. एसएसएस/वशी-खरेदी/५९०४/२०१९, दि.०७.०३.२०१९, अन्वये गावरान तुपाचे पुरवठादार मे. हर्ष फ्रेश डेअरी प्रॉडक्टस प्रा.लि. हरिद्वार, यांना कारणे दाखवा नोटीस बजावून सात दिवसांचे आत लेखी खुलासा मागविला होता.

तथापि, मे. हर्ष फ्रेश डेअरी प्रॉडक्टस प्रा.लि., भगवानपुर, हरिद्वार, यांचा लेखी खुलासा खरेदी विभागामार्फत दि.१५.०३.२०१९ रोजी इकडील कार्यालयास प्राप्त झालेला आहे, त्यात खालीलप्रमाणे मजकुर नमुद आहे.

“Dear Sir, We have received your mail on 7th march 2019 regarding the supply of pure cow ghee (Lab report).

We would like to bring your notice that when we were sending the product to you we had checked the every batch number with NABL Lab as per the FSSAI norms.

Sir, whenever we have shortage of milk, in that situation we purchase butter from Rajasthan, Gujrat, Madhya Pradesh, Maharashtra or Punjab/Haryana. Among these places there are some areas where people feeds cotton seeds cake to the cattle. Due to this there are chances of increment in BR and this can be one of the reasons.

While you may give the same sample to different labs the report will maybe come to in different ways because every lab has their own criteria. That’s why the difference will have come to 0.5 to 1 so you could not get the 100% same report and this can be the 2nd reason.

We are always using digital method so it is not possible to serve you the wrong products. We can ensure you that our product are perfectly fine as promised, we had to give you the perfect and the best product from our side.

We take advertiser feedback very seriously as we always striving to improve our service. We welcome any additional feedback you may have & we will be sending the hard copy to you by courier.

Please do not hesitate to contact us if we can be of any further assistance. Thank you for choosing Harsh Fresh Dairy Products Pvt. Ltd.”

तरी गावरान तुपाचे पुरवठादार मे. हर्ष फ्रेश डेअरी प्रॉडक्टस प्रा.लि. हरिद्वार, यांच्या लेखी खुलाशाची प्रत तसेच उपरोक्त तपासणी अहवालाच्या झेरॉक्स प्रती (पा.नं. १ ते ४८) व दि.२०.०२.२०१९ रोजीचे तपशिलवार परिशिष्ठ (पा.नं. १ ते ७) मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ/ निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२०४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे ऑक्टोंबर २०१८ ते डिसेंबर-२०१८ या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या मालाचे विविध प्रयोगशाळेमार्फत करण्यात आलेल्या तपासणी अहवालाचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- भांडार विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.३३** **सन २०१८-१९ मध्ये दर्शन रांगेत मोफत वाटप करण्यात आलेल्या चहा, कॉफी, दुध,बिस्किट वाटपाकामी झालेल्या खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७५४ नुसार माहे एप्रिल २०१८ ते मार्च २०१९ या कालावधी मध्ये दर्शनरांगेतील साईभक्तांना खालील प्रमाणे चहा,कॉफी,दुध बिस्किट मोफत वाटप करणेत आले आहे.

| माहे | चहा | कॉफी | दुध | बिस्किट पुडे | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| एप्रिल २०१८ | १५९७९६ | ७१६६४ | २७६२१ | ११९३० | ६७३०९७ |
| मे २०१८ | २२३६०९ | ९८२१७ | ३०२१० | ११५४४ | ८९०२१९ |
| जुन २०१८ | १९६४२१ | १०८१३१ | २७६६० | १०१६२ | ८५१०२५ |
| जुलै २०१८ | १९५४९३ | ८५८७३ | २५१०१ | ११९७३ | ७८३७७३ |
| ऑगस्ट २०१८ | १७१५५८ | ७९५१६ | २२३९० | १२२८९ | ७१०२७९ |
| सप्टेबर २०१८ | १२१५२३ | ६५२८२ | २३७४० | ११७८८ | ५६९०५२ |
| ऑक्टोबर २०१८ | १५४५२७ | ७९७९५ | २७२०५ | १६२२४ | ७११९७४ |
| नोव्हेबर २०१८ | १४३६५९ | ६७२४० | २२२२० | १३६३६ | ६२३८७८ |
| डिसेंबर २०१८ | १७२७७८ | ८०६०० | २७१२० | १५४६६ | ७४६०४६ |
| जानेवारी २०१९ | १६०४०५ | ७३६९० | २१५८० | १४८३४ | ६८०७९० |
| फेब्रुवारी २०१९ | १०८२४१ | ५४०६५ | १८९८० | १२४०६ | ४९७६४७ |
| मार्च २०१९ | १३०२९५ | ५७४१० | २४३४० | १५८१६ | ५८४९२० |
| एकूण संख्या | १९३८३०५ | ९२१४८३ | २९८१६७ | १५७२६८ | |
| दर | २ | ३ | ३ | ५ | |
| एकूण रुपये | ३८७६६१० | २७६४४४९ | ८९४५०१ | ७८६३४० | ८३२१९०० |

वरील प्रमाणे माहे एप्रिल २०१८ ते मार्च २०१९ अखेर शांतिनिवास/ भक्तनिवास दर्शन रांगेमध्ये मोफत वाटप झालेल्या चहा,कॉफी,दुध, बिस्किट यासाठी एकूण झालेल्या रुपये ८३,२१,९०० .०० (अक्षरी रुपये - त्र्याऐंशी लाख एकवीस हजार नऊशे मात्र ) खर्चाची नोंद घेणेकामी सदरचा विषय सविनय सादर

**निर्णय क्र.२०५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१८-१९ मध्ये दर्शन रांगेत मोफत वाटप करण्यात आलेल्या चहा,कॉफी, दुध, बिस्किट वाटपाकामी झालेल्या खर्चाची रक्कम रु. ८३,२१,९००/-मात्रचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-कॅन्टीन विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.३४** **श्री साईबाबा संस्थानचे ॲडव्होकेट पॅनलवर नेमणूक देणेबाबत ॲड संदेश एच.पोटे, मुंबई यांचा अर्ज.**

**प्रस्ताव-** उपरोक्त विषयान्वये, श्री संदेश एच. पोटे, ॲडव्होकेट हायकोर्ट, स्पेशल पब्लीक प्रोसीक्युटर, मुंबई यांनी संस्थान ॲडव्होकेटपॅनलवर नेमणुक करणेकामीचादि. ०४/०४/२०१९ रोजी विनंती अर्ज केलेला आहे. सदर अर्जात त्यांनी नमुद केले की त्यांना विविध न्यायालयात, वेगवेगळ्या कोर्ट केसेसमध्ये कामकाज केले बाबतचा १५ वर्षे वकीली व्यवसायाचा अनुभव आहे.

विधी विभागामार्फत कोर्ट केसेससाठी वार्षिक रु.१९,८०,०००/- मात्र अंदाजपत्रकीय तरतूद असून ब-याचशा केसेसमध्ये ॲडव्होकेट पॅनलवरील ॲडव्होकेट्स फी घेत नाहीत. सध्या संस्थान ॲडव्होकेट पॅनलवर खालील ॲडव्होकेटस् नियुक्त आहेत.

| अ.नं. | ॲडव्होकेटचे नाव | त्यांचेकडे असलेल्या प्रकरणांची संख्या |
|---|---|---|
| मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे संस्थानचे पॅनलवर ॲडव्होकेटसची नेमणूक केलेली नाही. परंतु खालील ॲडव्होकेटसना कामकाजासाठी नियुक्त केलेले आहे. | | |
| १ | ॲड.श्री.संजय खर्डे, कोल्हार | ०१ |

| अ.नं. | ॲडव्होकेटचे नाव | त्यांचेकडे असलेल्या प्रकरणांची संख्या |
|---|---|---|
| मा.उच्च न्यायालय, मुंबई | | |
| २ | ॲड. श्री.कुलदिप एस. पाटील, मुंबई | ०१ |
| ३ | ॲड. श्री.सचिन शानबाग, मुंबई | ०१ |
| ४ | ॲड. श्री.विनोद शहा, मुंबई | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| ५ | ॲड. श्री.आर.आय. जोशी | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद | | |
| ६ | ॲड. श्री.आर.एन. धोर्डे, औरंगाबाद (सिनीयर कौन्सील) | ०६ |
| ७ | ॲड. श्री.अनिल बजाज, औरंगाबाद (सिनीयर कौन्सील) | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| ८ | ॲड. श्री.विनायक होन, औरंगाबाद (सिनीयर कौन्सील) | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| ९ | ॲड. श्री.नितिन भवर, औरंगाबाद | २७ |
| १० | ॲड. श्री.संजय आर. चौकीदार, औरंगाबाद | ०३ |
| ११ | ॲड. श्री.राजेंद्र रघुवंशी, औरंगाबाद (सध्या औरंगाबाद येथे प्रॅक्टीस करत नाही.) | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| १२ | ॲड. श्री.बाबासाहेब वाघ, औरंगाबाद (यांची न्यायाधीश म्हणून नेमणूक झालेली आहे. ) | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| १३ | ॲड. श्री.संदिप एकनाथ गोंदकर, शिर्डी | सध्या संस्थानचे कामकाज दिलेले नाही. |
| मा.जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर | | |
| १४ | ॲड. श्री.अशोक पाटील, अहमदनगर | १५ |
| १५ | ॲड. श्री.ए.आर. गाडेकर, राहुरी | सध्या संस्थानचे कामकाज दिलेले नाही. |
| १६ | ॲड. श्री.प्रसन्न बिंगी, अहमदनगर | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| १७ | ॲड. श्री.संजय सलालकर, अहमदनगर | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| १८ | ॲड. श्री.दत्तात्रय वाय. जंगले, अहमदनगर | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| मा.अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय, कोपरगाव | | |
| १९ | ॲड. श्री.एम. पी. गुजराथी, कोपरगाव | ०३ |
| २० | ॲड. श्री.एस.डी. कुलकर्णी, कोपरगाव | १४ |
| २१ | ॲड. श्री.एस.एम.वाघ, कोपरगाव | ०१ |
| २२ | ॲड. श्री.आर. एस. जपे, कोपरगाव | ०३ |
| २३ | ॲड. श्री.रमेशचंद्र ठोळे, कोपरगाव | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| २४ | ॲड. श्री.मच्छिंद्र खिल्लारी, कोपरगाव | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| २५ | ॲड. श्री.आर.के. वाघ, कोपरगाव | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| २६ | ॲड. सौ.नंदा लहाडे, कोपरगाव | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| मा.दिवाणी कनिष्ठ स्तर न्यायालय, राहाता | | |
| २७ | ॲड. श्री.जे.के. गोंदकर, शिर्डी | ०८ |
| २८ | ॲड. श्री.बी.व्ही.कोते, शिर्डी | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| २९ | ॲड. श्री.राजेश व्ही. नाईक, राहाता | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| ३० | ॲड. श्री.पी.बी.बावके, राहाता | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| ३१ | ॲड. श्री.ए.डी. गमे, राहाता | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| ३२ | ॲड. श्री.नितिन विखे, राहाता | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| ३३ | ॲड. श्री.अविनाश जे. बोठे, राहाता | आजपर्यंत काम दिलेले नाही. |

विभागाचा स्पष्ट अभिप्राय-

(१) मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे संस्थानच्या केसेस ज्युरीडिक्शन मुळे खुपच कमी असतात, तेथे दाखल झालेल्या केसेस कालांतराने मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे वर्ग होत असतात.

(२)	संस्थानसाठी नवीन ॲडव्होकेट पॅनल नेमणूकीसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१/६/२०१८, रोजीचे सभेमध्ये प्रस्ताव सादर केला असता, त्यावर निर्णय क्र.३७८ अन्वये,यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.ॲड मोहन मोतीराम जयकर, सदस्य यांनी सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयातील केसेससाठी आणखी वकीलांची नावे सुचवावीत व सदर प्रस्ताव उपसमिती समोर सादर करावा असे ठरलेले आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयास अनुसरुन समिती सदस्य ॲड मोहन जयकर यांना वेळोवेळी दुरध्वनीवरुन व समक्ष भेटून ॲडव्होकेट पॅनल तयार करणे करीता वकीलांची नावे सुचविणे बाबत विनंती केलेली आहे. त्यांनी लवकरच वकीलांची नावे कळवितो असे सांगीतले आहे.

तरी ॲड. संदेश एच. पोटे, मुंबई यांना संस्थानचे ॲडव्होकेट पॅनलवर नेमणूक देणेबाबतचे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२०६	**यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरचा विषय मा.स्थानिक उपसमितीचे सभेसमोर ठेवण्यात येऊन ॲड. संदेश एच. पोटे, मुंबई यांना मुलाखतीसाठी बोलविण्यात यावे,असे ठरले.**

**(कार्यवाही- विधी विभाग)**

---

विषय नं.३५	**श्री साईबाबा संस्थानचे ॲडव्होकेट पॅनलवर नेमणूक होणेबाबत ॲड संदीप सुधाकर देशमुख यांचा अर्ज.**

प्रस्ताव-	उपरोक्त विषयान्वये, ॲड. संदीप सुधाकर देशमुख यांनी दि.०८/०२/२०१९, रोजीचा अर्ज पाठविला असून त्यात त्यांनी खालील प्रमाणे नमुद केले आहे.

"I, the undersigned, am practicing exclusively before the Hon'ble Supreme Court of India as an Advocate. I have been certified to be an "Advocate-On - Record" (AOR) by the Hon'ble Supreme Court of India.

I am desirous of representing the holy Trust before the Hon'ble Supreme Court Of India and hence do hereby grant my consent for consideration of my requisition for being appointed as Standing Counsel on Pro-Bono basis (free of cost) for the shreeSai Baba Sansthan Trust (Shirdi). Please note that, I am interested in representing the Holy Trust at no cost towards conducting the matters/ representing the Trust before the Hon'bleSuperme Court Of India. I hereby also assure to represent the Trust with complete devotion and integrity at my command.

Please find copy of my Curriculum Vitae attached herewith "

मा. सर्वोच्च न्यायालयात संस्थानचे वतीने कामकाज पहाणेकामी संस्थान ॲडव्होकेट पॅनलवर ॲडव्होकेटची नेमणूक केलेली नाही, परंतू आवश्यकते नुसार ॲड. संजय खर्डे, यांना वकीलपत्र देवून कामकाज पाहिले जाते व केलेल्या कामाची वकील फी अदा करण्यात येते.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१.०६.२०१८ रोजीचे सभेत श्री साईबाबा संस्थानसाठी नवीन ॲडव्होकेट पॅनल तयार करणे बाबतचा विषय सादर करणेत आला होता, त्यावर निर्णय क्र.३७८ अन्वये सविस्तर चर्चा होऊन,मा.ॲड मोहन मोतीराम जयकर,सदस्य यांनी सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयातील केसेससाठी आणखी वकीलांची नावे सुचवावीत व सदर प्रस्ताव उपसमितीसमोर सादर करावा असे ठरले. प्रस्तुतचे निर्णयानुसार समिती सदस्य ॲड.मोहन जयकर यांना वेळोवेळी दुरध्वनीवरुन व समक्ष भेटून, ॲडव्होकेट पॅनेल तयार करणेकरीता वकीलांची नावे सुचविणेबाबत विनंती केलेली आहे. ते लवकरच वकीलांची नावे कळविणार आहेत. असे त्यांनी सांगीतले आहे.

ॲड. संदीप सुधाकर देशमुख, यांनी मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये संस्थानचे वतीने विनामुल्य (free of cost) कामकाज पहाणेस तयारी दर्शविली असल्याने त्यांची संस्थानचे ॲडव्होकेट पॅनलवर नियुक्ती करता येईल असे मत आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयात ॲड. संदीप सुधाकर देशमुख, यांची संस्थानचे ॲडव्होकेट पॅनलवर नेमणूक करणेबाबत निर्णय घेणे बाबतचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२०७	**यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरचा विषय मा.स्थानिक उपसमितीचे सभेसमोर सादर करण्यात येऊन ॲड. संदीप सुधाकर देशमुख यांना मुलाखतीसाठी बोलविण्यात यावे,असे ठरले.**

**(कार्यवाही- विधी विभाग)**

---

**विषय नं.३६** **श्री.साईदास निवृत्ती शिंदे, सुरक्षा रक्षक, संरक्षण विभाग सेवा निलंबीत कर्मचारी यांचे पुन्हा कामावर रुजु करुन घेणे संदर्भातील दि.१९.०३.२०१९ रोजीचे अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.साईदास निवृत्ती शिंदे, वर्ग-४ कर्मचारी, हा संरक्षण विभागात कायम सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत आहे. ते दि.३०/१०/२०१८ पासून विनापरवानगी रजा अर्जाशिवाय गैरहजर आहेत. त्यामुळे दैनंदिन कामकाजामध्ये अडथळा निर्माण होऊन साईभक्तांना सेवा पुरविणेस अडचण निर्माण झाली आहे. श्री.शिंदे यांचे सदरचे कृत्य गैरशिस्त वर्तनात मोडते.

दरम्यान साईदास निवृत्ती शिंदे यांचेवर शिर्डी पोलीस स्टेशन गुन्हा रजी नंबर|229|2018 भा.द.वि.कलम ३०४(ब) प्रमाणे दि.२८/१०/२०१८ रोजी दाखल झाला असुन सदर गुन्हयातील मयत नामे वैशाली साईदास शिंदे वय ३३ रा.वेदभक्ती निवास गणेशवाडी, शिर्डी हीस तीचे सासरचे लोकांनी तीचे माहेरुन घराचे कर्ज भरण्यासाठी पैसे आनावे म्हणुन मानसिक व शाररीक त्रास दिल्याने सदर मयत हीने शिर्डी येथील तीचे राहते घराचे छतावरुन उडी मारुन आत्महत्या केले आहे. तीच्या आत्महतेस तीचे सासरचे लोकांनी प्रवृत केले म्हणुन मयत हीचे आईचे फिर्यादी वरुन गुन्हा राजी दाखल करण्यात आला आहे. श्री.शिंदे यास दि.२८/१०/२०१८ रोजी सदर गुन्ह्यात अटक करण्यात आलेली असुन त्यास दि.२८/१०/२०१८ ते दि.३१/१०/२०१८ रोजी पावेतो पोलीस कस्टडी रीमांड घेण्यात आलेली असुन व्दीतीय पोलीस कस्टडी दि.३१/१०/२०१८ ते दि.०२/११/२०१८ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आलेली असून दि.०२/११/२०१८ रोजी पासुन तो न्यायालयीन कोठीत आहे,

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे कलम ३ – प्रामाणिकपणा, सेवेशी एकनिष्ठता कायम राखण्याचे संस्थानाच्या कर्मचा-याचे कर्तव्य या शीर्षाखाली उपकलम १ मध्ये संस्थानचा प्रत्येक कर्मचारी नेहमीच - (i) संपुर्ण प्रामाणीकपणा कायम राखेल (ii) सेवेशी एकनिष्ठता कायम राखेल; आणि (iii) संस्थानच्या कर्मचा-याला साजेसे नसणारे कृत्य करणार नाही, असे नमूद करणेत आलेले आहे.

श्री. साईदास निवृत्ती शिंदे, सुरक्षा रक्षक(वर्ग-४ कर्मचारी) यांचे वर नमूद केलेले गैरशिस्तवर्तन विचारात घेतां, त्यांनी उपरोक्त सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ मधील कलम ३(१) चे उल्लंघन करुन, शिस्तभंग केलेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१३/१२/२०१८ रोजीचे सभेमध्ये श्री.शिंदे यांचेवर शिर्डी पोलीस स्टेशनमध्ये दाखल झालेल्या गुन्हयाबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. निर्णय क्र.७५६ नुसार ''त्यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (शिस्त व अपील) विनियम, २०१३ कलम ०४ (२) (अ) अन्वये श्री.साईदास निवृत्ती शिंदे, सुरक्षा रक्षक(वर्ग-४ कर्मचारी) यास सदर गुन्ह्यात अटक झाल्याच्या दि.२८/१०/२०१८ पासून पुर्वलक्षी प्रभावाने संस्थान सेवेतून निलंबीत करण्यात यावे, असे ठरले'' आहे.

त्यानुसार श्री.साईदास निवृत्ती शिंदे यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/३१३४/२०१९ दि.१९.०१.२०१९ रोजीचे आदेशान्वये दि.२८/१०/२०१८ पासून संस्थानचे सेवेतुन**"निलंबीत"** करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र शासन वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक डीआरएस १०८३/सीआर-१५५५/एसईआर-८ मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक २७ जुलै १९८७ नुसार कर्मचा-याच्या अपराधसिद्धीच्या कालावधीत निर्वाह भत्त्याच्या प्रदान करणे असल्याने श्री. साईदास शिंदे यांना सेवा निलंबन कालावधीत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी सेवा (पदग्रहन अवधी आणि निलंबन, सेवेतुन बडतर्फी आणि काढुन टाकणे या कालखंडातील प्रदाने) विनीयम, २०१३ चे कलम १७(अ) अन्वये त्यांना निलंबन कालावधीत निम्या वेतनावर रजेवर असताना जेवढे रजा वेतन मिळाले असते तेवढे वेतन अधिक रजा वेतनावरील महागाई भत्ता इतका निर्वाह भत्ता दि.२८.१०.२०१८ पासून पुर्वलक्षी प्रभावाने देण्यात येत आहे.

आता, त्यांना CRIMINAL BAIL APPLICATION NO.80/2019 अन्वये त्यांना जामीनावर मुक्त करणेत आलेले आहे. सदरचे CRIMINAL BAIL APPLICATION NO.80/2019 मध्ये ORDER BELOW EXH-1 नुसार अतिरिक्त मा.सत्र न्यायालय, कोपरगांव यांनी दि.२१.०२.२०१९ रोजी खालील प्रमाणे आदेश केलेले आहेत.

1) Instant application for grant of bail of the applicant is hereby allowed.

2) The applicant Saidas Nivrutti Shinde age 45 years, be released on bail on furnishing P.R.bond of Rs.15,000/-with one solvent suerty in the like amount in connection with CR No. 229/2018 (RTC No.43/2019) registered with Shirdi Police Station on the following conditions :-

a) Applicant shall not tamper with the prosecution evidence in any manner.

b) Applicant is directed to furnish documents pertaining to his permanent residence.

3) The concerned police station be informed about the order.

4) Bail before Ld.J.M.F.C.

श्री.शिंदे यांनी दि.११.०३.२०१९ रोजीचे अर्जान्वये नोकरीस पुन्हा कामावर रुजु करुन घेणेबाबत विनंती अर्ज केलेला आहे. त्यात त्यांनी,"वरील विषयास अनुसरुन मी विनंती पुर्वक अर्ज करतो की, मी श्री साईबाबा संस्थान शिर्डी येथे संरक्षण विभागात सन २००८ पासून कायम कर्मचारी म्हणुन रुजु आहे. दि.२८.१०.२०१८ रोजी माझेवर शिर्डी पोलीस स्टेशनमध्ये गु.र.नं.२२९/२०१८ भा.द.वी. कलम ३०४ (ब) अन्वये गुन्हा दाखल होवून मला अटक करण्यात आली होती.त्यानंतर माझे वरील भा.द.वी.कलम ३०४ (ब) हा कलम कमी करण्यात आला आहे व आज रोजी माझेवर भा.द.वी.कलम ३०६ वगैरे अन्वये गुन्हा दाखल आहे.सदर गुन्ह्यात मला दि.२१.०२.२०१९ रोजी जामीन मंजुर झालेला आहे.सदरच्या गुन्ह्यात संपुर्ण तपास होवुन कोपरगांव येथील जिल्हा सत्र न्यायालयात दोषारोप पत्र दाखल होवून सदरची केस प्रलंबीत आहे.वरील कारणामुळे सुमारे ४ महिने माझेवर सदर गुन्ह्याबाबत चौकशी चालू असल्याने मी न्यायालयीन कस्टडीत होतो.त्यामुळे मी कामावर येवु शकलो नाही अथवा रजेचा अर्ज देवू शकलो नाही.

माझेवर श्री साईबाबा संस्थानने दि.१९.०१.२०१९ रोजी निलंबनाची कारवाई झाल्याचे पत्र मला दि.०९.०३.२०१९ रोजी मिळाले आहे. वास्तविक सदर गुन्ह्यात माझा काहीएक सबंध नाही.अदयाप पावेतो सदरच्या गुन्ह्यात माझेवर आरोप सिध्द झालेला नाही. माझे कुटूंबाची सर्वस्वी जबाबदारी माझेवर असल्याने मला कामाची अत्यंत आवश्यकता असून मला दूसरे कुठलेही उत्पन्नाचे साधन नाही.तरी मला माझे यापुर्वीचे १० वर्षातील कामाचा व विश्वासूपणाचा विचार होवून पुन्हा कामावर रुजू करण्यात यावे. ही नम्र विनंती." असे म्हटलेले आहे.

श्री.साईदास निवृत्ती शिंदे,सुरक्षा रक्षक, (वर्ग -०४ कर्मचारी),संरक्षण विभाग यांना सध्या कामावर हजर करुन घ्यावे किंवा त्यांचेवर दाखल असलेल्या गुन्हयाच्या निकालानंतर निर्णय घ्यावा किंवा कसे ? याबाबत संस्थान पॅनलवरील कायदेशीर सल्लागार ॲड.अशोकराव पाटील,अहमदनगर यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/६११३/२०१९ दि.२२.०३.२०१९ प्रमाणे पत्र देण्यात येवुन त्यांचा कायदेशिर अभिप्राय मागविणेत आलेला होता.

ॲड.अशोकराव पाटील, अहमदनगर यांनी दि.२३.०३.२०१९ रोजीचे श्री.शिंदे यांचेबाबत कायदेशीर अभिप्राय पत्र दिलेले आहे.त्यात त्यांनी," I have gone through your letter referred above and perused the relevant provisions of service rules relating to suspension of an employee involved in criminal offence. It appears that,the accused Shri.Saidas Shinde is released on bail and therefore,he has moved an application to resume on duty. In view of an offence registered against him and subsequent arrest and detention in Police custoday it is sufficient to place him under suspension. Therefore, in my opinion his request for reemployment did not require any consideration at this stage.असे स्पष्ट मत दिलेले आहे.

श्री.साईदास निवृत्ती शिंदे,सुरक्षा रक्षक,(वर्ग -०४ कर्मचारी),संरक्षण विभाग यांना कामावर हजर करुन घेवु नये असा स्पष्ट अभिप्राय संस्थान पॅनलवरील ॲड.अशोकराव पाटील, अहमदनगर यांनी दि.२३.०३.२०१९ रोजीचे पत्रान्वये दिलेला आहे.तसचे त्यांचेवर दाखल असलेल्या गुन्हयांचे स्वरुप पाहता तपासाकामी त्यांना पुन्हा अटक होवु शकते.श्री.शिंदे यांचेवर असलेल्या गुन्हयाचा निकाल लागेपर्यत त्यांना कामावर हजर करुन घेता येणार नाही.तरी.शिंदे यांनी कामावर हजर करुन घेणेबाबत दिलेले दि.११.०३.२०१९ रोजीचे अर्जाचे प्रकरण त्यांचेवर असलेल्या केसेसचा न्यायालयीन निकालानंतर विचार करता येईल.तुर्तास श्री.शिंदे यांचे कामावर हजर/रुजू करुन घेणेचे प्रकरण बंद करणेत येवुन, दप्तरी दाखल करता येईल याबाबत दि.२७.०३.२०१९ रोजीची टिपणी सादर करणेत आलेली होती.श्री.शिंदे यांना मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय क्र.७५६ अन्वये सेवा निलंबीत केलेले आहे.

त्यामुळे श्री.शिंदे यांना त्यांचे विनंती अर्जानुसार कामावर घ्यावयाचे झाल्यास त्याकामी मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागेल.

सबब, श्री.साईदास निवृत्ती शिंदे,सुरक्षा रक्षक,(वर्ग -०४ कर्मचारी),सरंक्षण विभाग यांना कामावर हजर करुन घेवु नये असा स्पष्ट अभिप्राय संस्थान पॅनलवरील ॲड.अशोकराव पाटील, अहमदनगर यांनी दि.२३.०३.२०१९ रोजीचे पत्रान्वये दिलेला आहे.तथापी, श्री.साईदास निवृत्ती शिंदे, सुरक्षा रक्षक यांना सेवा निलंबीत ठेवुन निर्वाह भत्ता आदा करणे ऐवजी त्यांचे दि.११.०३.२०१९ रोजीचे विनंती अर्जाचा सहानुभूतीपुर्वक विचार होवुन मा.अतिरिक्त सत्र न्यायालयाचे होणारे पुढील आदेशास अधिन राहुन श्री.शिंदे यांना कामावर हजर करुन घेणेचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती आहे.

निर्णयास्तव सविनय सादर.

निर्णय क्र.२०८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, समिती सदस्य मा.ॲड मोहन जयकर यांनी कामगार कायद्यातील तज्ञ ॲडव्होकेट यांचे नाव सुचवावे. सदर ॲडव्होकेट यांचेकडून कायदेशीर अभिप्राय घेण्यात यावा. अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्य लेखाधिकारी यांचे समितीने सदर अभिप्रायाचे अवलोकन करुन अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३७ दिवंगत कर्मचाऱ्यांच्या पात्र वारसांना अनुकंपा कारणास्तव गट 'क' व गट 'ड' चे पदावर नेमणूक देणेबाबत.**

**प्रस्ताव-** (अ) संस्थान सेवेत असतांना मृत पावणा-या कर्मचा-यांच्या कुटुंबातील एका पात्र नातेवाईकास वेळोवेळी पारीत होणा-या शासन निर्णयातील अनुकंपा तरतुदीचे अधिन राहून मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने दि.०७/०८/२००९ पुर्वीपर्यंत संस्थान सेवेत स्थायी पदांवर सामावून घेण्यात आलेले आहे. दि.०७/०८/२००९ रोजी मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडून श्री साईबाबा संस्थानचे विविध पदांचे आकृतीबंधास मंजुरी मिळालेली आहे. मंजुर आकृतीबंधानुसार संस्थान आस्थापनेवर त्यावेळी कार्यरत असलेल्या वर्ग ०४ कर्मचा-यांची संख्या मंजुर पदांपेक्षा जास्त होती. मंजुर आकृतीबंधामध्ये, 'समितीला आकृतीबंधा बाहेर जाऊन पदभरती करता येणार नाही.' अशी अट असल्याने दि.०७/०८/२००९ नंतर अनुकंपा कारणास्तव नोकरी मिळणेसाठी अर्ज केलेल्या संबधीत नातेवाईकांना मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/११/२०११ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.७६५ (१) अन्वये तूर्त किमान वेतनदरा प्रमाणे कर्मचारी ठेकेदारामार्फत कंत्राटी पध्दतीने संस्थान सेवेत घेण्यात आलेले आहे व त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे विविध सभेतील निर्णयानुसार वेळोवेळी मयत कर्मचा-यांच्या वारसांना माहे – डिसेंबर, २०१६ अखेरपर्यंत (एकूण ३१ वारसांना) तूर्त कंत्राटी पध्दतीने कामावर घेण्यात आलेले आहे. तसेच माहे जानेवारी, २०१७ पासून आज अखेर उर्वरीत ३० मयत कर्मचा-यांच्या वारसांना कंत्राटी पध्दतीने अथवा अनुकंपा तत्त्वावर थेट सेवेत सामावून घेणे प्रलंबीत आहे.

(ब) आता, दि.२१ सप्टेंबर, २०१७ रोजीचे मा. शासनाने पारीत केलेल्या निर्णयातील अनुकंपा तरतूदी संस्थान व्यवस्थापनासाठी लागू करणेबाबतचे प्रस्तावावर मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६/०९/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५३७ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय संमत करणेत आला आहे.

" मा.शासनाचे अनुकंपा कारणास्तव नेमणूक देणेबाबतच्या नियमावलीतील अटी शर्तीनुसार संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या गट 'क' व गट 'ड' संवर्गामधील संस्थान कर्मचा-यांच्या पाल्यांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच संस्थान सेवेतील गट 'अ' व गट 'ब' या संवर्गातील कर्मचा-यांच्या पात्र कुटूंबियांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती देणेबाबत मार्गदर्शन घेणेकामी शासनाचे विधी व न्याय विभाग यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले."

तसेच संस्थान कर्मचा-यांचे संस्थान सेवाकालावधीत निधन झाल्यास त्यांचेवरील अवलंबीत व्यक्तीला शैक्षणिक पात्रतेनुसार संस्थान सेवेत कायम कर्मचारी म्हणून सामावून घेणेत यावे, याबाबत संस्थान कायम व कंत्राटी कर्मचारी यांनी दि.०७/१२/२०१८ रोजी संस्थानमधील कर्मचारी यांना विविध सवलती लागू करणेबाबत लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे. सदरचे निवेदन यासोबत अवलोकनार्थ सादर केले आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार संस्थान व्यवस्थापनासाठी लागु करणेत आलेल्या तरतुदीतील सर्वसाधारण नियम खालील प्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| ०१ | दि.२१ सप्टेंबर, २०१७ चे शासन निर्णयानुसार, अनुकंपा तत्वावरील नियुक्तीचा लाभ सेवेत असतांना दिवंगत पावलेल्या गट 'क' व 'ड' संवर्गातील कर्मचा-यांच्या कुटूंबातील ०१ पात्र व्यक्ती गट 'क' किंवा गट 'ड' मधील पदावर नियुक्तीसाठी अनुज्ञेय राहील. |

| | |
|---|---|
| ०२ | सेवेत असतांना दिवंगत झालेल्या गट 'क' व 'ड' संवर्गातील कर्मचा-यांच्या पात्र कुटूबियांनाच अनुकंपा तत्वावर नियुक्ती अनुज्ञेय राहील. |
| ०३ | दि.२१ सप्टेंबर, २०१७ चे शासन निर्णयानुसार, गट 'क' व 'ड' मधील सरळ सेवेच्या पदांवर त्या पदाच्या सेवाप्रवेश नियमातील विहीत शैक्षणिक अर्हता असल्यास अशी नियुक्ती देता येईल. यासाठी स्पर्धा परिक्षेला बसण्याची आवश्यकता नाही. |
| ०४ | दि.२१ सप्टेंबर, २०१७ चे शासन निर्णयानुसार, अनुकंपा नियुक्तीसाठी दिवंगत कर्मचा-यांचे पुढील एका पात्र नातेवाईकास नियुक्ती अनुज्ञेय राहील.<br>१. पती / पत्नी २. मुलगा / मुलगी (अविवाहीत / विवाहीत) मुत्यूपूर्वी कायदेशीररित्या दत्तक घेतलेला मुलगा / मुलगी (अविवाहीत / विवाहीत) ३.दिवंगत कर्मचा-याचा मुलगा हयात नसेल, किंवा तो नियुक्तीसाठी पात्र नसेल तर त्याची सुन ४. घटस्फोटीत मुलगी किंवा बहिण, परित्यक्ता मुलगी किंवा बहीण, विधवा मुलगी किंवा बहीण ५.केवळ दिवंगत अविवाहित कर्मचा-यांच्या बाबतीत त्यांच्यावर सर्वस्वी अवलंबून असणारा भाऊ किंवा अविवाहित बहीण. |
| ०५ | दि.२१ सप्टेंबर, २०१७ चे शासन निर्णयानुसार, दि.३१ डिसेंबर, २००१ नंतर तिसरे अपत्य झालेल्या कर्मचा-यांच्या कुटूंबियास अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी पात्र समजले जाणार नाही. |
| ०६ | दि.२१ सप्टेंबर, २०१७ चे शासन निर्णयानुसार, कर्मचा-यांच्या मृत्यू दिनांकापासून एका वर्षाच्या आत अर्ज दाखल करणे आवश्यक असते. (नियुक्ती प्राधिका-यांना सदरची तरतुद शिथील करण्याचा अधिकार आहे.) |
| ०७ | किमान वयोमर्यादा १८ वर्ष. |
| ०८ | कमाल वयोमान ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे. |
| ०९ | दि.२१ सप्टेंबर, २०१७ चे शासन निर्णयानुसार, वर्ग ०३ व वर्ग ०४ चे पदावर नेमणूक देणेसाठी संबधीत पात्र उमेदवारांची परिक्षा घेणेची आवश्यकता नाही. |
| १० | दिवंगत शासकीय कर्मचा-यांच्या विधवांना केवळ गट – ड मधील पदावर नियुक्ती करावयाची असल्यास शैक्षणिक अर्हता शिथील करण्याबाबतची तरतुद आहे. |
| ११. | महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार - (अ) नुसार दि.०६ जानेवारी, २०१८ अन्वये प्रसिध्द करणेत आलेल्या अधिसूचना खंड (ग) मध्ये अनुकंपा तत्त्वावर निवड करणेसाठी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार खंड (ख) च्या उप खंड (दोन) मध्ये विहीत केलेली अर्हता धारण करीत असलेल्या योग्य व्यक्तीची अनुकंपा तत्वावर नियुक्तीने; परंतु असे की,<br>(एक) हे सेवाप्रवेश नियम शासन राजपत्रात प्रसिध्द होण्याच्या दिनांकापुर्वी अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठीच्या प्रतिक्षायादीतील अंतर्भूत असलेल्या उमेदवारांसाठी, प्राथमिक शाळेमधून चौथ्या इयत्तेची परिक्षा उत्तीर्ण असल्याची शैक्षणिक अर्हता लागू राहील.<br>(दोन) हे सेवाप्रवेश नियम शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकास व त्यानंतर अनुकंपा तत्वाद्वारे नियुक्तीसाठी प्रतिक्षायादीत नाव नोंदविण्याकरीता खंड (ख) च्या उप खंड (दोन) मध्ये विहीत केलेली शैक्षणिक अर्हता आवश्यक राहील. |
| १२. | शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१२१७/प्र.क्र.४६/ आठ, दि.०३/०५/२०१७ अन्वये, अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी प्रतीवर्षी रिक्त होणा-या पदांच्या १०% च्या मर्यादेस दिनांक ०१/०३/२०१७ पासून पुढे २ वर्ष ( दिनांक २८/०२/२०१९ पर्यंत) मुदतवाढ देण्यात आली आहे.<br>**तथापी**, शासन निर्णयानुसार पदभरतीवरील असलेले निर्बंध विचारात घेता, प्रस्तुत निर्बंध असेपर्यंन्त गट क व गट ड संवर्गातील एका वर्षात भरण्यास मान्यता असलेल्या रिक्त पदांच्या २०% पदे ही अनुकंपा नियुक्तीने भरण्यात यावीत. तसेच सदर २०% ची मर्यादा ही दि.०१ जानेवारी, २०१७ पासून ते पदभरतीवरील निर्बंध असेपर्यंत लागू राहील, अशी तरतुद आहे. |

**क**) मंजुर आकृतीबंधातील तरतुदीनुसार जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/४४६०/२०१४ दि.२७/१२/२०१४ रोजी पुर्वप्रसिध्द केलेल्या सेवाप्रवेश नियमात लिपीक-टंकलेखक पदासाठी खालील प्रमाणे शैक्षणिक पात्रता प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

तक्ता क्र.०१ (वर्ग क संवर्गासाठी)

| अं.क्र | पदनाम | वेतनश्रेणी | सध्याची रिक्त पदसंख्या | प्रस्तावीत पात्रता Proposed Qualification | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | By Nomination | By Promotion |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Clerk-Typist | 3050-4590 Pay Band 5200-20200 Grade pay 1900 | 92 | 1. Age not more than 33 years.<br>2. Graduate from any Government recognized University;<br>3. MS-CIT or Government prescribed equivalent Computer Operating Course;<br>4. Government Commercial Certificate of Typing English 40 w.p.m and Marathi 30 w.p.m speed. | 1. Graduate from any Government recognized University;<br>2. MS-CIT or Government prescribed equivalent Computer Operating Course;<br>3. Government Commercial Certificate of Typing English 40 w.p.m and Marathi 30 w.p.m speed.<br>4. Experience of 5 years as a Coupon Seller or Class -IV Employees in sansthan. |

सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार प्रतिक्षायादीतील उमेदवारांनी शासन मान्य विद्यापीठाचे (पुणे विद्यापीठ व यशवंतराव मुक्त विद्यापीठ, नाशिक येथून) पदवी शिक्षण पूर्ण केलेले असून महाराष्ट्र शासनाचे दि.१२ डिसेंबर, २००६ रोजीचे शासन निर्णयान्वये यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचेकडून प्रदान केलेल्या पदवी / पदवीकांना राज्यातील सेवा व पदांवरील भरतीसाठी मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार पात्र अनुकंपा उमेदवारांना वर्ग क चे पदावर नियुक्ती देता येईल, असे मत आहे.

ड) तसेच, मंजूर आकृतीबंधामध्ये **गट-ड** संवर्गाची **१२३२ पदे मंजूर** आहेत. दि.१२/११/२०१६ रोजी आस्थापना विषयक कामे पूर्ण करुन घेणेकामी मा. व्यवस्थापन समितीची आढावा बैठक घेण्यात येऊन मंजूर आकृतीबंधातील गट-ड कर्मचा-यांचे एकूण ०५ संवर्ग (सफाई कामगार, सुरक्षा रक्षक, वॉर्डबॉय, आया, शिपाई / मदतनिस) तयार करावे असे ठरले.

त्यानुसार सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेपुढे सादर करणेत येऊन निर्णय क्र.३३१ नुसार मंजूर आकृतीबंधातील १२३२ गट-ड कर्मचा-यांचे पदांचे एकूण ०५ संवर्ग (सफाई कामगार, सुरक्षा रक्षक, वॉर्डबॉय, आया, शिपाई / मदतनिस) करुन विभाजन करण्यात आलेले असून, **वर्ग ड** संवर्गातील पदासाठी खालील प्रमाणे शैक्षणिक पात्रता प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

तक्ता क्र.०२ (वर्ग ड संर्वगासाठी)

| अं.क्र | पदनाम | वेतनश्रेणी | सध्याची रिक्त पदसंख्या | प्रस्तावीत पात्रता Proposed Qualification | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | By Nomination | By Promotion |
| 01 | मदतनिस / शिपाई | (2550-3200) 4440-7440+1300 | 194 | 1.Age not more than 28 years.<br>2.Minimum Secondary School Certificate Examination passed. | - |
| 02 | सफाई कामगार | (2550-3200) 4440-7440+1300 | | 1. Age not more than 28 years.<br>2. Minimum 5th Std. Passed | - |
| 03 | सुरक्षा रक्षक | (2550-3200) 4440-7440+1300 | | 1. Age not more than 28 years.<br>2. Minimum Secondary School Certificate Examination passed and physical Fitness as per Police Department Rules. | - |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 04 | वार्डबॉय | (2550-200)<br>4440-<br>7440+1300 | | 1. Age not more than 28 years.<br>2. Minimum Secondary School Certificate Examination passed. | - |
| 05 | आया | (2550-3200)<br>4440-<br>7440+1300 | | 1. Age not more than 28 years.<br>2. Minimum Secondary School Certificate Examination passed. | - |

**इ)** मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६/०९/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५३७ नुसार अनुकंपा कारणास्तव नेमणूक मिळणेसाठी अर्ज केलेल्या संबंधीत नातेवाईकांची पात्रता व अनुकंपा नेमणूकीच्या सध्याच्या तरतुदी व प्रस्तावीत सेवाप्रवेश नियमातील गट क व गट ड पदाच्या शैक्षणिक पात्रता इत्यादीचे अनुषंगाने आस्थापना विभागामार्फत प्राप्त अर्जाची तपासणी प्राथमिक स्तरावर करण्यात आलेली आहे. प्रतिक्षा यादीतील जेष्ठतेनुसार अनुकंपा उमेदवारांचे माहीतीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र.०३ (अनुकंपा वारसांची वैयक्तीक माहिती)**

| अं. क्र | दिवंगत झालेल्या कर्मचा-यांचे नांव, पदनाम व विभाग | कर्मचारी मयत झाल्याची तारीख | अनुकंपा तत्वावर नोकरीसाठी अर्ज केलेल्या वारसाचे नाव व पत्ता. | नाते | अर्ज केल्याची तारीख | वारसाची जन्मतारीख | सध्याचे वय (दि.३०/११/२०१८ अखेर) | शैक्षणिक पात्रता | जात प्रवर्ग | नियुक्तीस पात्र संवर्ग | निकषानुसार पात्र / अपात्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **कै.विमल चांगदेव बारहाते**, वर्ग ०४ कर्मचारी, प्रसादालय विभाग. | ०७/०७/२००८ | **श्री.अंकुश चांगदेव बारहाते**, श्री साईबाबा नगर, शिर्डी .ता.राहाता. | मुलगा | ०२/०९/२००८ | ०६/०८/१९९२ | २६ वर्षे | इ.०८ वी पास. | मराठा खुला | गट ड | पात्र |
| २ | **कै.श्रीरंग देवराम गव्हाळे**, वर्ग ०४ कर्मचारी, साईप्रसाद निवासस्थान. | १७/१०/२०१० | **श्रीमती लता श्रीरंग गव्हाळे**, मु.नांदुर्खी बृ, पो.को-हाळे,ता.राहाता. | पत्नी | ०८/१२/२०१० | ०१/०६/१९७६ | ४३ वर्षे | इ.०३ री पास | मराठा खुला | गट ड | **अपात्र** (शैक्षणिक पात्रता इ.४ पेक्षा कमी) |
| ३ | **कै.संपत गणपत ससाणे,** सफाई कर्मचारी आरोग्य विभाग | १६/१२/२०१० | **श्री सुभाष संपत ससाणे**,मु.पो.शिर्डी ता.राहाता.जि.अहमदनगर | मुलगा | १५/०१/२०११ | ०५/१०/१९७३ | **४५ वर्षे ६ महिने** | इ.५ वी. पास | हिंदू-मातंग (SC) | .. | **अपात्र** ( उमेदवाराचे आजचे वय ४५ वर्षापेक्षा जास्त) |
| ४ | **कै.भाऊसाहेब तुकाराम मोकळ**, सफाई कर्मचारी, आरोग्य विभाग | १९/१२/२०१० | **श्री ज्ञानेश्वर बाळू (भाऊसाहेब) मोकळ**, मु.पो. निमगांव को-हाळे, ता.राहाता. जि.अहमदनगर | मुलगा | १६/०२/२०११ | १५/०६/१९९३ | २५ वर्षे | इ.०६ वी पास | हिंदू - महार (SC) | गट ड | पात्र |
| ५ | **कै.कैलास निंबा गवळी, वर्ग ०४ कर्मचारी पाणीपुरवठा विभाग** | २७/०२/२०११ | **श्री राकेश कैलास गवळी,मु.पो.शिर्डी ता.राहाता.जि.अहमदनगर** | मुलगा | २३/०३/२०११ | २९/१२/१९९२ | २६ वर्षे | इ.०५वी पास. | हिंदू-माळी (OBC) | गट ड | पात्र |
| ६ | **कै.बाळासाहेब पुंजा कोते, वॉर्डबॉय, श्री साईनाथ रुग्णालय,** | ११/०४/२०११ | **श्री विठ्ठल बाळासाहेब कोते, मु.पो.शिर्डी, व्दारकानगर, बिरेगांव रोड, ता.राहाता.जि. अहमदनगर** | मुलगा | २९/०४/२०११ | २६/०८/१९८६ | ३२ वर्षे | इ.९ वी. | हिंदू-मराठा | गट ड | पात्र |
| ७ | **कै.भाऊसाहेब कारभारी सुरसे, वॉर्डबॉय, श्री साईनाथ रुग्णालय** | २६/०५/२०११ | **श्री गौरव भाऊसाहेब सुरसे, राजगुरुनगर, बिरेगांव रोड, शिर्डी,ता.राहाता. जि.अहमदनगर** | मुलगा | १७/०६/२०११ | ०२/०६/१९९२ | २६ वर्षे | इ.०८ वी पास. | मराठा खुला | गट ड | पात्र |
| ८ | **श्री.बाळासाहेब आप्पाजी डांगे,** वाहनचालक, वाहन विभाग | ०८/०५/२०११ | **श्री.साईअमृत बाळासाहेब डांगे,** मु.पो.कनकुरी ता.राहाता | मुलगा | १) २३/०६/२०११ (१८ वर्षपेक्षा कमी वय )<br>२) ११/१२/२०१७ (१८ वर्ष पुर्ण वय) | १२/१०/१९९९ (बोनाफाईड सर्टी.) | १८ वर्षे | इ.९ वी पास. | हिंदु मराठ - खुला | गट-ड | पात्र |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | **कै.कृष्णदास आसराजी चौकटे**, लिपिक-टंकलेखक, कॅन्टीन विभाग | २२/०५/२०११ | **श्रीमती मंगल कृष्णदास चौकटे**, मु.पो.शिर्डी, ता.राहाता. जि.अहमदनगर | पत्नी | २७/०६/२०११ | ०१/०६/१९६३ | **५५ वर्षे** | **अशिक्षीत (अपात्र)** | बिगर मागास | ... | **अपात्र** (उमेदवाराचे आज रोजीचे वय ४५ वर्षा पेक्षा जास्त आहे.) |
| १० | **कै.मोहन नारायण देशपांडे**, वर्ग ०४ कर्मचारी बगीचा विभाग | २९/०४/२०११ | **श्रीमती रंजना मोहन देशपांडे**, मु.पो. निमगांव को. ता.राहाता. जि.अहमदनगर | पत्नी | ३०/०६/२०११ | ०३/१०/१९७६ | ४२ वर्षे | इ.०५ वी पास | ब्राम्हण खुला | गट ड | पात्र |
| ११ | **कै.रतन जयराम सोळसे**, वर्ग ०४ कर्मचारी, प्रसादालय विभाग | १३/०७/२०११ | **श्रीमती सुनिता रतन सोळसे**, मु.पो.निमगांव हौसिंग, ता.राहाता,जि.अहमदनगर | पत्नी | ०३/०८/२०११ | ०१/०६/१९८३ | ३५ वर्षे | इ.०२ री पास | हिंदु मांग (SC) | गट ड | अपात्र (शैक्षणिक पात्रता इ.४ वी पेक्षा कमी) |
| १२ | **कै.अजिज बुढाणभाई शेख**, वर्ग ०४ कर्मचारी, संरक्षण विभाग | ०६/०७/२०११ | **श्रीमती रेहाना अजिज शेख**, आंबेडकर नगर, वार्ड क्र.०९ मु.पो. शिर्डी ता.राहाता. जि.अहमदनगर | पत्नी | २४/०९/२०११ (अर्ज आवक दि.) | १९/११/१९८५ | ३३ वर्षे | इ.०२ री | मुस्लीम खुला | गट ड | अपात्र (शैक्षणिक पात्रता इ.४ वी पेक्षा कमी) **तसेच** मयतास दि.३१ डिसेंबर, २००१ नंतर तिसरे अपत्य |
| १३ | **कै.शशिकांत गंगाधर कोरडे**, वर्ग ०४ कर्मचारी प्रसादालय विभाग | २४/११/२०१० | **श्रीमती कविता शशिकांत कोरडे**, मुंजाबानगर, कोरडे वस्ती, मु.पो. ता.राहुरी, जि.अहमदनगर, | पत्नी | २१/११/२०११ | २३/०७/१९८६ | ३२ वर्षे | इ.०७ वी पास | हिंदू - न्हावी (OBC) | गट ड | पात्र |
| १४ | **कै.अजय विजय पंजाबी**, वर्ग ०४ कर्मचारी, पाणीपुरवठा विभाग. | २०/०८/२०११ | **श्री.आशु अजय पंजाबी**, मु.पो.शिर्डी, ता.राहाता,जि.अहमदनगर | मुलगा | १०/०१/२०१२ (अर्ज आवक दि.) | १४/०४/१९९३ | २५ वर्षे | इ.१२ वी पास | पंजाबी | गट ड | पात्र |
| १५ | **कै. रामदास बाळासाहेब पाटणकर**, वर्ग ०४ कर्मचारी साईप्रसाद निवासस्थान, | २४/१२/२०११ | **श्री मंगेश रामदास पाटणकर**, मु.पो. निमंगाव को-हाळे , ता.राहाता. जि.अहमदनगर | मुलगा | १०/०१/२०१२ | ०९/०५/१९९१ | २७ वर्षे | इ.११ वी पास | मराठा-खुला | गट ड | पात्र |
| १६ | **कै.सुभाष शिवराम सोनवणे**, वर्ग ०४ कर्मचारी, संरक्षण विभाग | २१/१२/२०११ | **श्रीमती निर्मला सुभाष सोनवणे**, माऊलीनगर, शिर्डी ता.राहाता. जि.अहमदनगर | पत्नी | ११/०१/२०१२ | ०१/०६/१९७२ | **४६ वर्षे** | इ.०८ वी पास. | मराठा-खुला | ... | **अपात्र** (उमेदवाराचे आज रोजीचे वय ४५ पेक्षा जास्त आहे.) |
| १७ | **कै.कैलास गंगाधर शेज्वळ, वर्ग ०४ कर्मचारी, लेखाशाखा विभाग** | ३१/०१/२०१३ | **श्रीमती मनिषा कैलास शेज्वळ, भिमनगर, मु.पो.शिर्डी ता.राहाता. जि.अहदमनगर** | पत्नी | ०२/०३/२०१३ | ०१/०६/१९७५ | **४३ वर्षे** | इ.०८ वी पास. | नवबौध्द (SC) | गट ड | **पात्र** |
| १८ | **कै. दत्तू रामनाथ सोमवंशी**, वर्ग ०४ कर्मचारी प्रसादालय विभाग | १०/०२/२०१२ | **श्री दिपक दत्तात्रय सोमवंशी**, करडोबानगर, नांदुर्खी रोड, मु.पो.शिर्डी,ता.राहाता. जि.अहदमनगर | मुलगा | १६/०३/२०१२ | २७/०१/१९९४ | २४ वर्षे | इ.०८ वी पास. | मराठा-खुला | गट ड | पात्र |
| १९ | **कै.कानिफनाथ काशिनाथ पवार**, वर्ग ०४ कर्मचारी आरोग्य विभाग | २४/०३/२०१३ | **श्रीमती मंगल कानिफनाथ पवार**, मु.पो.शिडी ता.राहाता. जि.अहमदनगर | पत्नी | ३०/०४/२०१३ | १५/०७/१९८५ | ३३ वर्षे | इ.०१ली | हिंदू-मातंग (SC) | गट ड | अपात्र (शैक्षणिक पात्रता इ.४ वी पेक्षा कमी) |
| २० | **कै.बबन सबाजी कहांडळ**, वर्ग ०४ कर्मचारी, श्री साईबाबा भ.निवासस्थान | २३/०१/२०१२ | **श्रीमती शिला बबन कहांडळ**, मु.पो.शिर्डी, ता.राहाता.जि.अहमदनगर | पत्नी | ०८/०५/२०१३ (अर्ज आवक दि.) | २०/०१/१९७० | **४८ वर्षे** | इ.०१ली | मराठा-खुला | .. | **अपात्र** (उमेदवाराचे आज रोजीचे वय ४५ वर्षा पेक्षा जास्त आहे.) |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २१ | **कै.शरद दौलत ताकवाले**, वर्ग ०४ कर्मचारी,संरक्षण विभाग | ३०/०५/२०१३ | **श्री आनंद शरद ताकवाले**, मु.पो.शिर्डी ता.राहाता. जि.अहमदनगर | मुलगा | २०/०६/२०१३ | २८/०२/१९९२ | २६ वर्षे | इ.१२ वी | हिंदू-मांग (SC) | गट ड | पात्र |
| २२ | **कै.भगवान दिनकर पाईक**, वर्ग ०४ कर्मचारी, प्रसादालय विभाग | १२/०३/२०१३ | **श्री प्रविण भगवान पाईक**, मु.पो.शिर्डी ता.राहाता. जि.अहमदनगर | मुलगा | २२/०६/२०१३ | १३/०६/१९९६ | २२ वर्षे | इ.०७ वी पास | हिंदू - महार (SC) | गट ड | पात्र |
| २३ | **कै.बाळगीर शिवगीर गोसावी**, वर्ग ०४ कर्मचारी, प्रसादालय विभाग | ०२/०५/२०१३ | **कु.सरला बाळगीर गोसावी**, मु.पो.जेऊर कुंभारी, ता.कोपरगांव जि.अहमदनगर | मुलगी | ०२/०७/२०१३ (अर्ज आवक दि. ) | १३/०३/१९९५ | २३ वर्षे | १२ वी पास | हिंदू- गोसावी (NT) | गट ड | पात्र |
| २४ | **कै.संगिता दिपक नेहे**, स्टाफ नर्स, श्री साईबाबा हॉस्पीटल, | १२/०५/२०१३ | **श्री दिपक सुर्यभान नेहे**, मु.पो.निमगांव ता.राहाता.जि.अहमदनगर | पती | १०/१०/२०१३ | १६/०६/१९७१ | **४७ वर्षे** | बी.ए.पास | मराठा-खुला | गट ड | **अपात्र** (उमेदवाराचे आज रोजीचे वय ४५ वर्षा पेक्षा जास्त आहे.) |
| २५ | **कै.डॉ.संजय जयवंत तांबे**, आर.एम.ओ, श्री साईबाबा हॉस्पीटल. | ०२/११/२०१३ | **श्रीमती सुजाता संजय तांबे**, मु.पो.चिंचपुर, ता.संगमनेर, जि.अहमदनगर. | पत्नी | २६/१२/२०१३ | ०१/०१/१९७० | **४८ वर्षे** | एम.ए.पास | मराठा-खुला | ... | **अपात्र** (मयत कर्मचारी गट-ब संवर्गातील आहे.**तसेच** उमेदवाराचे आज रोजीचे वय ४५ वर्षपेक्षा जास्त आहे. ) |
| २६ | **कै.अजय शिवराम पांडे**, कनिष्ठ अभियंता, बांधकाम विभाग. | २४/०४/२०१४ | **श्रीमती भाग्यश्री अजय पांडे**, मु.पो.पुणतांबा, ता.राहाता,जि.अहमदनगर | पत्नी | २४/०५/२०१४ | ०६/०४/१९८० | ३८ वर्षे | बी.ए पास, मराठी,हिंदी,इंग्रजी टंकलेखक ४० श.प्र.मि. | ब्राम्हण खुला | ... | **अपात्र** (मयत कर्मचारी गट-**ब** संवर्गातील आहे) तसेच मयतास दि.३१ डिसेंबर, २००१ नंतर तिसरे अपत्य |
| २७ | **कै.भाऊसाहेब विनायक जाधव**, वर्ग ०४ कर्मचारी,कॅन्टिन विभाग. | ०८/०५/२०१४ | **श्री.सचिन भाऊसाहेब जाधव**, मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर. | मुलगा | २१/०६/२०१४ | १९/०५/१९८५ | ३३ वर्षे | इ.१२ वी पास, तारतंत्री प्रमाणपत्र. | मराठा खुला | गट क | पात्र |
| २८ | **कै.प्रकाश भाऊसाहेब कोते**, वर्ग ०४ कर्मचारी, साईबाबा भक्तनिवासस्थान | ०१/०७/२०१४ | **श्री.किरण प्रकाश कोते**, मु.पो.शिर्डी, ता.राहाता,जि.अहमदनगर | मुलगा | २९/०७/२०१४ | २१/०८/१९८४ | ३४ वर्षे | इ.०५ वी पास | मराठा खुला | गट ड | **पात्र** |
| २९ | **कै.भाऊसाहेब पोपट पठारे**, लिपीक-टंकलेखक, साईआश्रम भक्तनिवासस्थान. | १६/०९/२०१४ | **श्री.स्वप्नील भाऊसाहेब पठारे**, मु.पो.शिर्डी,ता.राहाता, जि.अहमदनगर. | मुलगा | ११/१०/२०१४ | २३/०२/१९९२ | २६ वर्षे | डिप्लोमा इन सिव्हील इंजिनिअर, (DCE) मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि, इंग्रजी टंकलेखन ३०, ४० श.प्र.मि, एम.एस.सी.-आय.टी | हिंदु महार -(SC) | गट क | पात्र |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३० | **कै.शेषराव रावसाहेब चव्हाण**, वॉर्डबॉय, श्री साईनाथ रुग्णालय. | ०७/१२/२०१४ | **श्री.ज्ञानेश्वर शेषराव चव्हाण**, मु.पो.नांदुर्खी ता.राहाता | मुलगा | २९/१२/२०१४ | ०८/०३/१९९१ | २७ वर्षे | इ.१२ वी, हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरिंग टेक्नालॉजी | हिंदु मांग (SC) | गट ड | पात्र |
| ३१ | **कै.वैशाली मिलींद कराडे,** सिस्टर इनचार्ज, श्री साईबाबा हॉस्पीटल. | २६/०२/२०१४ | **चि.अक्षय मिलींद कराडे,** मु.पो.सावळीविहीर,ता. राहाता, जि.अहमदनगर | मुलगा | २८/०१/२०१५ | १३/१०/१९९३ | २५ वर्षे | बी.ई (Computer) एमएस-सीआयटी | हिंदु-माळी (ई.मा.व) | ... | **अपात्र** (मयत कर्मचारी गट-ब संवर्गातील आहे.) |
| ३२ | **कै.शंकर कारभारी व-हे**, वर्ग ०४ कर्मचारी, साईप्रसाद निवासस्थान. | ०५/०२/२०१५ | **श्रीमती सुमित्रा शंकर व-हे,** मु.पो.कोकमठाण, ता.कोपरगाव,जि.अहमदनगर. | पत्नी | १०/०३/२०१५ | १७/०६/१९८५ | ३३ वर्षे | इ.०८वी पास. | हिंदु धनगर (NT) | गट ड | **अपात्र** (मयतास दि.३१ डिसेंबर, २००१ नंतर तिसरे अपत्य) |
| ३३ | **कै.मोहन बबन शिरसाठ,** वर्ग ०४ कर्मचारी, कॅन्टिन विभाग. | ०३/१६/२०१५ | **श्री.साईराज मोहन शिरसाठ,** मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर. | मुलगा | ३०/०४/२०१५ | १५/०८/१९९२ | २६ वर्षे | इ.१२ वी. | हिंदु माळी (OBC) | ... | पात्र |
| ३४ | **कै. रावसाहेब सुर्यभान मते,** वर्ग ०४ कर्मचारी, भांडार विभाग. | १०/०४/२०१५ | **रोहिणी रावसाहेब मते** उर्फ **सौ.रोहिणी प्रदिप मोरे**, मु.पो.रामपूर ता.राहुरी, जि.अहमदनगर. | मुलगी | २५/०६/२०१५ | ०८/१२/१९८७ | ३० वर्षे | इ.११ वी पास. | मराठा खुला | गट ड | पात्र |
| ३५ | **कै. पोपट एकनाथ शेलार,** वर्ग ०४ कर्मचारी प्रसादालय विभाग. | ०१/०७/२०१५ | **श्री बाळासाहेब पोपट शेलार,** पानमळा, मु.पो. शिर्डी ता.राहाता. जि.अहमदनगर. | मुलगा | २९/०७/२०१५ | ०१/०३/१९८३ | ३५ वर्षे | इ.७ वी पास | हिंदु माळी (OBC) | गट ड | पात्र |
| ३६ | **कै. पंडीत देवराम गव्हाळे**, लिपीक-टंकलेखक, खरेदी विभाग. | ०४/०८/२०१५ | **श्रीमती छाया पंडीत गव्हाळे**, मु.पो.कनकुरी ता.राहाता,जि.अहमदनगर. | पत्नी | २९/०८/२०१५ | १५/०५/१९८० | ३८ वर्षे | इ.९ वी पास. | मराठा खुला | गट ड | पात्र |
| ३७ | **कै.ओमप्रकाश रामदेव सिंह,** वर्ग ०४ कर्मचारी, श्री साईनाथ रुग्णालय. | ०२/०२/२०१६ | **चि.शुभमकुमार ओमप्रकाश सिंह,** मु.पो.शिर्डी, ता.राहाता. | मुलगा | ०७/०३/२०१६ | ०३/०६/२००० | १८ वर्षे | इ.९ वी., एमएस-सीआयटी | हिंदु-क्षत्रिय | गट ड | पात्र |
| ३८ | **कै.नसिरा कादर पठाण**, आया, श्री साईनाथ रुग्णालय | ०२/११/२०१५ | **श्री.हुसेन कादर पठाण**, मु.पो.शिर्डी, ता.राहाता. | मुलगा | २२/०४/२०१६ | ०२/०६/१९८० | ३८ वर्षे | इ.०९ वी | मुस्लिम | गट ड | पात्र |
| ३९ | **कै.बेबी गोरख धामणे**, वर्ग ०४ कर्मचारी, श्री साईनाथ रुग्णालय. | १८/०४/२०१६ | **श्री.किशोर गोरख धामणे**, मु.पो.शिर्डी ता.राहाता जि.अहमदनगर | मुलगा | ११/०६/२०१६ | १३/०४/१९७८ | ४० वर्षे | इ. १२ वी., डिप्लोमा इन ईलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन, एमएससी-आयटी | हिंदु-तेली (ई.मा.व) | गट ड | पात्र |
| ४० | **कै. गणपत भगवंता आरणे**, सफाई कर्मचारी, आरोग्य विभाग. | १६/०७/२०१६ | **श्री.साईनाथ गणपत आरणे**, आण्णाभाऊ साठे नगर, मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर. | मुलगा | ०९/०८/२०१६ | २०/०५/१९९७ | २१ वर्षे | **इ.५ वी.** | हिंदू-मातंग (SC) | गट ड | **पात्र** |
| ४१ | **कै.दत्तात्रय भाऊसाहेब परजणे**, मदतनिस, व्दारावती भक्तनिवासस्थान | १५/१०/२०१६ | **श्रीमती मिना दत्तात्रय परजणे**, मु.पो.निघोज ता.राहाता | पत्नी | ०८/११/२०१६ | ०१/०६/१९८१ | ३७ वर्षे | इ.०९ वी पास | हिंदु – कुणबी | गट ड | पात्र |
| ४२ | **कै.देवचंद गोपीनाथ बनसोडे**, मदतनिस, प्रसादालय विभाग | २६/१०/२०१६ | **श्री.अशोक देवचंद बनसोडे**, मु.पो.को-हाळे ता.राहाता | मुलगा | ०९/११/२०१६ | ११/०६/१९९१ | २७ वर्षे | इ.१२ वी.पास | हिंदु-महार (SC) | गट ड | पात्र |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४३ | **कै.आशाबाई धनराज सुर्यवंशी**, मदतनिस, प्रसादालय विभाग | २८/१०/२०१६ | **कु.सिमा धनराज सुर्यवंशी**, मु.पो.सावळ-विहीर ता.राहाता | मुलगी | २८/११/२०१६ | १३/०८/१९८५ | ३३ वर्षे | इ.०४ थी. | हिंदु महादेव कोळी (NT) | गट ड | पात्र |
| ४४ | **कै.भानुदास परशराम शिरसाठ**, मदतनिस, बगीचा विभाग | ०८/०२/२०१६ | **श्री.हेमंत भानुदास शिरसाठ**, मु.पो.राहाता | मुलगा | ०२/१२/२०१६ | ०५/०८/१९८६ | ३२ वर्षे | इ.०७ वी पास. | हिंदु सुतार (OBC) | गट ड | पात्र |
| ४५ | **कै.विलास तात्याबा डांगे**, प्लंबर, पाणीपुरवठा विभाग | ०६/१०/२०१६ | **चि.शुभम विलास डांगे**, मु.पो.कनकुरी ता.राहाता | मुलगा | ०६/१२/२०१६ | २२/०२/२००१ | १८ वर्षे | इ.१० वी पास. | हिंदु-मराठा | गट ड | **अपात्र** (मयतास दि.३१ डिसेंबर, २००१ नंतर तिसरे अपत्य) |
| ४६ | **कै.विनायक नामदेव पन्हाळे**, पहारेकरी, संरक्षण विभाग | ३०/११/२०१६ | **श्री.साईनाथ विनायक पन्हाळे**, शिर्डी-साकुरी शिव, मु.पो.शिर्डी. | मुलगा | २०/१२/२०१६ | ०८/०१/१९९३ | २५ वर्षे | इ.१२ वी पास, एमएससी-आयटी | हिंदु तेली (OBC) | गट ड | पात्र |
| ४७ | **कै.रामभाऊ मनोहर खरात**, मदतनिस, आरोग्य विभाग | १४/०१/२०१७ | **श्री.चंद्रकांत रामभाऊ खरात**, मु.पो.शिर्डी ता.राहाता. Mob-8855947771 | मुलगा | ०८/०२/२०१७ | १५/०५/१९९५ | २३ वर्षे | इ.०४ थी पास | हिंदु-मांग (SC) | गट ड | पात्र |
| ४८ | **कै.आप्पासाहेब दगडू गायके**, पहारेकरी, संरक्षण विभाग | **२८/०९/२०१५** | **श्री.शिवाजी आप्पासाहेब गायके**, मु.पो.शिर्डी. | मुलगा | **२०/०३/२०१७** | ०३/०१/१९९४ | २४ वर्षे | इ. १२ वी. एल.एल.बी. | हिंदु-मराठा | गट ड | **अपात्र** (विहीत मुदतीनंतर अर्ज सादर केला आहे.) |
| ४९ | **कै.पोपट लव्हाजी राक्षे**, मदतनिस, प्रसादालय विभाग | १३/०२/२०१७ | **श्री.विजय पोपट राक्षे**, कर्डोबा नगर, नांदुर्खी बु. ता.राहाता | मुलगा | २४/०३/२०१७ | २९/०७/१९९० | २८ वर्षे | एम.ए.बी.एड. कोपा, (कॉम्प्यूटर ऑपरेटर), एमएससी-आय.टी, टायपींग मराठी ३० प्र.श.प्र.मि., इंग्रजी ४० प्र.श.प्र.मि. | हिंदु-मांग (SC) | गट क | पात्र |
| ५० | **कै.शिवाजी रामचंद्र दुशिंग, लिपीक-टंकलेखक, आय.टी.आय** | ०३/०३/२०१७ | **श्री.संभाजी शिवाजी दुशिंग, मु.पो.शिंगवे ता.राहाता** | मुलगा | ०८/०४/२०१७ | ०९/०८/१९९२ | २६ वर्षे | इ.०८ वी. | हिंदु-महार (SC) | गट ड | अपात्र (मयतास दि.३१ डिसेंबर, २००१ नंतर तिसरे अपत्य) |
| ५१ | **कै.बाबासाहेब काशिनाथ थेटे**, मदतनिस, व्दारावती भक्तनिवास | ०१/०८/२०१७ | **श्रीमती सुनिता बाबासाहेब थेटे**, मु.पो.कनकुरी ता.राहाता | पत्नी | ०२/०९/२०१७ | ०१/०६/१९७७ | ४१ वर्षे | इ.१० वी पास | हिंदु-मराठा | ... | अपात्र (मयतास दि.३१ डिसेंबर, २००१ नंतर तिसरे अपत्य) |
| ५२ | **कै.माधव मुरलीधर घारे**, ओ.टी.असिस्टंट, साईनाथ हॉस्पीटल | ०४/०८/२०१७ | **श्री.सचिन माधव घारे**, मु.शहापुर ता.कोपरगाव | मुलगा | २४/१०/२०१७ | ३१/०८/१९८३ | ३५ वर्षे | इ.१२ वी. जनरल नर्सिंग, जी.एन.एम | हिंदु-मराठा | गट क | पात्र |
| ५३ | **कै. भिमराज शिवराम आरणे**, मदतनीस, आरोग्य विभाग | २२/१०/२०१७ | **श्रीमती संगिता भिमराज आरणे**, मु.पो. रुई, ता. राहाता, जि. अहमदनगर. | पत्नी | २५/११/२०१७ | ०२/०३/१९८३ | ३५ वर्षे | इ. ०३ री. | हिंदु-मांग (SC) | गट ड | **अपात्र** (मयतास दि.३१ डिसेंबर, २००१ नंतर तिसरे अपत्य ) तसेच शैक्षणिक पात्रता इ.४ वी पेक्षा कमी |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५४ | **कै. सुर्यकांत नामदेव वाणी**, मदतनीस, श्री साईनाथ रुग्णालय | १५/१२/२०१७ | **श्री. गोविंद सुर्यकांत वाणी**, मु.पो. शिर्डी ता. राहाता | मुलगा | ०९/०१/२०१८ | २३/०८/१९८९ | २९ वर्षे | १२ वी., B.B.A., एमएससी-आयटी, टायपींग मराठी ३० प्र.श.प्र.मि., इंग्रजी ४० प्र.श.प्र.मि. | हिंदु-मराठा | गट ड | पात्र |
| ५५ | कै. सुभाष पंडीत पोतदार, मदतनीस, साईप्रसाद निवासस्थान | २८/१२/२०१७ | कु. पुजा सुभाष पोतदार, मु.पो. निघोज, ता. राहाता | मुलगी | १०/०२/२०१८ | १५/०३/२००० | १८ वर्षे | १२ वी., एमएससीआयटी | हिंदु सोनार (OBC) | गट ड | पात्र |
| ५६ | **कै. पुंजाबाई चोखाजी कोळे,** स्त्री मदतनीस, साई प्रसादालय | २४/०४/२०१८ | श्री.मोहन चोखाजी कोळे, मु.नांदुर्खी बु. ता. राहाता | मुलगा | २१/०५/२०१८ | ०१/०६/१९७५ | ४३ वर्षे | इ. ०३ री. | हिंदु-महार (SC) | गट ड | **अपात्र** (शैक्षणिक पात्रता इ.५ वी पेक्षा कमी) |
| ५७ | **कै. राजेंद्र कोंडाजी वाणी,** मदतनीस, वाहन विभाग | २९/०४/२०१८ | श्रीमती आशाबाई राजेंद्र वाणी, मु. वारेगांव, पो. पाथरे ता. सिन्नर जि.नाशिक | पत्नी | ३१/०५/२०१८ | ०२/०९/१९८० | ३८ वर्षे | इ. ०७ वी. | हिंदु-मराठा | गट ड | पात्र |
| ५८ | **कै. लक्ष्मण राधुजी पवार,** मदतनीस, पाणी पुरवठा विभाग | १६/११/२०१७ | श्री. सुरेश लक्ष्मण पवार, मु.पो. शिर्डी ता. राहाता, जि. अहमदनगर | मुलगा | ०६/०८/२०१८ | १०/०६/१९८६ | ३२ वर्षे | इ. ०७ वी. | हिंदु-भिल्ल | गट ड | पात्र |
| ५९ | **कै. बाळासाहेब गणपत आरणे,** मदतनीस, श्री साई प्रसादालय | २४/०८/२०१८ | श्रीमती मंदा बाळासाहेब आरणे मु.पो.ता. राहाता जि. अहमदनगर | पत्नी | १९/०९/२०१८ | ३१/०७/१९७९ | ३९ वर्षे | **अशिक्षीत** | हिंदु-मांग (SC) | गट ड | **अपात्र** (शैक्षणिक पात्रता इ.५ पेक्षा कमी) (मयतास दि.३१ डिसेंबर, २००१ नंतर तिसरे अपत्य) |
| ६० | कै. अशोक अनाजी बनकर, वर्ग ४ कर्मचारी, संरक्षण विभाग | ०९/०९/२०१८ | चि. संदिप अशोक बनकर, मु.पो. शिर्डी, ता. राहाता, जि.अ.नगर | मुलगा | २५/०९/२०१८ | २७/०२/१९९२ | २६ वर्षे | एम-एससी, (कॉम्प्टर सायन्स) | हिंदु धनगर (NT) | गट ड | पात्र |
| ६१ | **कै. पोपट फकीरा गोसावी,** तारतंत्री, विद्युत विभाग | ०५/१२/२०१८ | **श्रीमती सविता पोपट गोसावी,** मु.पो.वाळकी, ता. राहाता, जि.अ.नगर | पत्नी | २०/१२/२०१८ | ०८/०७/१९८३ | ३५ वर्षे | इ. १० वी | हिंदु गोसावी (NT) | गट ड | **अपात्र** (मयतास दि.३१ डिसेंबर, २००१ नंतर तिसरे अपत्य) |
| ६२ | **कै. संजय चंद्रकांत गायकवाड,** प्र. अधिक्षक, आरोग्य विभाग | १५/०१/२०१९ | **चि. साईराज संजय गायकवाड, मु.पो. निमगांव (को) ता. राहाता, जि.अ.नगर** | मुलगा | ०८/०२/२०१९ | २५/०३/२००२ | १७ वर्षे | इ. १० वी | हिंदु परिट | गट ड | **अपात्र** (वयाची १८ वर्ष पुर्ण नाही) |

मा. शासनाने दि.२१ सप्टेंबर, २०१७ अन्वये पारीत केलेल्या निर्णयातील अनुकंपा तरतूदी मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६/०९/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५३७ अन्वये संस्थान व्यवस्थापनासाठी लागू करणेत आलेल्या असून, सदर तरतुदीनुसार उपरोक्त नमूद अनुकंपा उमेदवारापैकी खालील उमेदवार स्तंभ क्र.४ मध्ये नमूद कारणास्तव अनुकंपा नेमणूकीस अपात्र होत आहे.

तक्ता क्र.०४ (सुधारीत नियमावली नुसार अपात्र उमेदवार )

| अ.क्र. | अपात्रतेचे कारण | अपात्र उमेदवार | अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | अनुकंपा नियुक्तीचे तरतुदीनुसार अर्जदाराचे नेमणूकीच्या वेळी कमाल वयोमान ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे. (तक्ता क्र.०४ मधील अ.नं.३, ९, १६, २०, २४, २५) | ०६ | - |
| २. | दि.२१ सप्टेंबर, २०१७ चे शासन निर्णयानुसार, कर्मचा-यांच्या मृत्यू | ०१ | नियुक्ती प्राधिकारी |

| | | | |
|---|---|---|---|
| | दिनांकापासून एका वर्षाच्या आत अर्ज दाखल करणे आवश्यक. (तक्ता क्र.०४ मधील अ.नं.४८, ) | | याबाबत विचार करुन, शिथीलता देऊ शकतात, अशी तरतुद आहे. |
| ३. | दि.२१ सप्टेंबर, २०१७ चे शासन निर्णयानुसार, दि.३१ डिसेंबर, २००१ नंतर तिसरे अपत्य झालेल्या कर्मचा-यांच्या कुटूंबियास अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी पात्र समजले जाणार नाही. (तक्ता क्र.०४ मधील अ.नं.१२, २६, ३२, ४५, ५०, ५१, ५३, ५९, ६१) | ०९ | - |
| ४. | दिवंगत कर्मचारी गट ब संवर्गात सेवेत कायम होते, (दि.२१ सप्टेंबर, २०१७ चे शासन निर्णयानुसार, अनुकंपा तत्वावरील नियुक्तीचा लाभ सेवेत असतांना दिवंगत पावलेल्या गट 'क' व 'ड' संवर्गातील कर्मचा-यांच्या कुटूंबातील ०१ पात्र व्यक्ती गट 'क' किंवा गट 'ड' मधील पदावर नियुक्तीसाठी अनुज्ञेय राहील.) (तक्ता क्र.०४ मधील अ.नं. २५, २६, ३१ ) | ०३ | - |
| ५. | शैक्षणिक पात्रता इ.४ थी पेक्षा कमी, (संदर्भः दि.०६ जानेवारी, २०१८ रोजी मा. शासनाने प्रसिध्द केलेल्या अधिसुचनेनुसार ) (तक्ता क्र.०४ मधील अ.नं.२, ११, १२, १९, ५३, ५६, व ५९) | ०७ | याबाबत दिवंगत शासकीय कर्मचा-यांच्या विधवांना केवळ गट – ड मधील पदावर नियुक्ती करावयाची असल्यास शैक्षणिक अर्हता शिथील करण्याबाबतची तरतुद आहे. |

अनुकंपा तरतुदीनुसार उपरोक्त पैकी अ.नं.२ चे बाबत नियुक्ती प्राधिकारी याबाबत विचार करुन, शिथीलता देऊ शकतात, अशी तरतुद आहे.

तसेच अ.नं. ५ बाबत अनुकंपा तरतुदीनुसार अनुकंपा नियुक्तीसाठी दिवंगत शासकीय कर्मचा-यांच्या विधवांना केवळ गट ड मधील पदावर नियुक्ती करावयाची असल्यास शैक्षणिक अर्हता शिथील करण्याबाबतची तरतुद आहे. याव्यतिरिक्त अन्य कोणतीही अट शिथील करण्यास शासन सक्षम नाही असा स्पष्ट उल्लेख शासन निर्णय, दि.२६.१०.१९९४ मध्ये करण्यात आला आहे. त्यानुसार केवळ अनुकंपा उमेदवारांपैकी दिवंगत कर्मचा-यांच्या विधवांना शैक्षणिक अर्हता शिथील करता येईल, असे मत आहे.

ई) सन २००९ पासून अनुकंपा उमेदवार अनुकंपा नियुक्तीचे प्रतिक्षायादीवर आहे. त्यानुसार सन २००९ ते २०१८ अखेर पर्यंत गट क व गट ड संवर्गातील रिक्त पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

तक्ता क्र. ५ (रिक्त पदांचा तपशिल)

| सन | वर्ग 'क' संवर्गातील रिक्त पदांचा तपशिल | मा. शासनाने अनुकंपा नियुक्तीसाठी विहीत केलेल्या पदांच्या मर्यादेबाबत. | | | वर्ग 'ड' संवर्गातील रिक्त पदांचा तपशिल | | मा. शासनाने अनुकंपा नियुक्तीसाठी विहीत केलेल्या पदांच्या मर्यादेबाबत. | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सन २०१४ पुर्वी रिक्त पदाच्या ५ % | दि.०१/०३/२०१४ च्या शासन निर्णयान्वये दरवर्षी रिक्त पदाच्या १० % | दि.०३/०५/२०१७ पासून ते पदभरतीवरील निर्बंध असेपर्यंत २०% | | सन २०१४ पुर्वी रिक्त पदाच्या ५ % | दि.०१/०३/२०१४ च्या शासन निर्णयान्वये दरवर्षी रिक्त पदाच्या १० % | दि.०३/०५/२०१७ पासून ते पदभरतीवरील निर्बंध असेपर्यंत दरवर्षी रिक्त पदाच्या २०% |
| २००९ | ६ | ०.३ | .. | .. | ९ | ०.४५ | .. | .. |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१० | ३ | ०.१५ | .. | .. | १५ | ०.७५ | .. | .. |
| २०११ | ८ | ०.४ | .. | .. | १९ | ०.९५ | .. | .. |
| २०१२ | ४ | ०.२ | .. | .. | १६ | ०.८ | .. | .. |
| २०१३ | ७ | ०.३५ | .. | .. | १४ | ०.७ | .. | .. |
| २०१४ | १४ | .. | १.४ | .. | १० | .. | १ | .. |
| २०१५ | ९ | .. | ०.९ | .. | १७ | .. | १.७ | .. |
| २०१६ | १५ | .. | १.५ | .. | ३५ | .. | ३.५ | .. |
| २०१७ | १५ | .. | .. | ३ | २९ | .. | .. | ५.८ |
| २०१८ | ११ | .. | .. | २.२ | ३० | .. | .. | ६ |
| **एकूण -** | ९२ | १.४ | ३.८ | ५.२ | १९४ | ४ | ६.२ | ११.८ |
| एकूण पुर्णाकींत - | | १० | | | एकूण पुर्णाकीत - | | २२ | |

अनुकंपा नियुक्तीसाठी गट क आणि गट ड मध्ये प्रतिवर्षी रिक्त होणा-या पदांच्या ५% पदांची मर्यादा शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१०१४/प्र.क्र.३४/आठ, दि.०१/०३/२०१४ अन्वये सदर ५% ची मर्यादा वाढवून ती एक वर्षासाठी **१०%** इतकी करण्यात आली. त्यानंतर दि.२३/०९/२०१५ चे शासन निर्णयानुसार सदर १०% ची दि.२८/०२/२०१७ पर्यंत चालू ठेवण्याबाबत निर्णय झालेला आहे.

त्यानंतर दि.२०/०६/२०१५ चे शासन निर्णयानुसार पदभरतीवरील असलेले निर्बंध विचारात घेता प्रस्तुत निर्बंध असेपर्यंत गट क आणि गट  ड संवर्गातील एका वर्षात भरण्यास मान्यता असलेल्या रिक्त पदाच्या २०% पदे ही अनुकंपा नियुक्तीने भरण्यात यावीत. तसेच सदर २०% ची ही मर्यादा दि.०१ जानेवारी, २०१७ पासून ते पदभरतीवरील निर्बंध असेपर्यंत लागू राहील, अशी तरतूद आहे.

त्यानुसार उपरोक्त तक्ता क्र.५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे रिक्त असलेल्या पदावर शासन निर्णयानुसार गट क व गट ड संवर्गातील पात्र अनुकंपा उमेदवारांना शैक्षणिक पात्रतेनुसार शासनाने अनुकंपा नियुक्तीसाठी विहीत केलेल्या पदांच्या मर्यादेनुसार परिच्छेद 'इ' मधील तक्ता क्र.०३ मध्ये नमूद केलेल्या प्रतिक्षा यादीतील प्रथम प्राधान्य क्रमाने संस्थान सेवेत सामावून घेता येईल. तसेच, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ अनुषंगाने दि.०१ जानेवारी, २०१५ रोजी प्रसिध्द करणेत आलेल्या, सर्वसाधारण सेवा अटी विनियम, २०१३ मधील प्रकरण ४ (१) (११) नियुक्त्या या शिर्षाखाली, नियुक्ती प्राधिकारी म्हणून मा. व्यवस्थापन समितीस अधिकार आहेत. त्यामुळे खाली नमूद केलेल्या बाबींवर निर्णय होणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणे उचित राहील, असे मत आहे.

१) उपरोक्त परिच्छेद 'इ' मधील तक्ता क्र.४ मध्ये नमूद अ.नं. १ ते ५ चे तपशिलानुसार नियुक्तीस अपात्र होत असलेल्या अनुकंपा उमेदवारांपैकी अ.नं.२ व ५ बाबत अनुकंपा तरतुदीनुसार नियुक्ती प्राधिकारी हे याबाबत विचार करुन, अटी- शर्ती शिथील करु शकतात, अशी तरतुद आहे.  त्यानुसार, परिच्छेद 'इ' मधील तक्ता क्र.४ मधील अ.नं.२ व ५ बाबत अटी - शर्ती शिथील करणेस तसेच अ.नं.१,३,व ४ बाबत योग्य तो उचित निर्णय होणेस विनंती.

२) तसेच, शासन निर्णय क्रमांक - सासंवि -२००९/४३३/(३७/०९) / का.१६, मंत्रालय, मुंबई दि.०७ ऑगस्ट, २००९ अन्वये कर्मचारी आकृतीबंधास दिलेल्या शासन मान्यतेस अधिन राहून, पात्र अनुकंपा उमेदवारांना मा. शासनाचे अनुकंपा तरतुदीनुसार त्यांचे शैक्षणिक पात्रतेनुसार **वर्ग क** व **वर्ग ड** संवर्गात त्या - त्या संर्वगातील दरवर्षी रिक्त होणा-या पदांवर वर नमूद परिच्छेद 'इ' मधील तक्ता क्र.०३ मध्ये नमूद केलेल्या प्रतिक्षा यादीतील प्रथम प्राधान्य क्रमाने त्या पदांचे वेतन श्रेणीमध्ये एक वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीचे अटीवर संस्थान सेवेत सामावून घेणेबाबत उचित निर्णय होणेस विनंती.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६/०९/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५३७ नुसार "मा. शासनाचे अनुकंपा कारणास्तव नेमणूक देणेबाबतच्या नियमावलीतील अटी शर्तीनुसार" संस्थान व्यवस्थापनाकरीता लागु करणेत आलेल्या सुधारीत अनुकंपा नियमावलीस अनुसरुन खालील बाबींवर निर्णय होणेबाबत दि. ०२/०४/२०१९ अन्वये प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेस्तव सादर करणेत आला होता.

३)	तथापी, दि. ०२/०४/२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यतेस्तव सादर करणेत आलेल्या टिपणीस अनुसरुन सादर करणेत आलेल्या दि.०२/०५/२०१९ रोजीच्या सलग्न टिपणी क्र. ०२ वर मा. वरिष्ठांनी खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत.

१) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) (सर्वसाधारण सेवा अटी) अधिनियम २००४, व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) सेवा (भरती) विनियम २०१४ मध्ये अनुकंपा भरती संदर्भात तरतूद दिसून येत नाही. अधिनिमात यासंदर्भात तरतूद होणे आवश्यक असून, सदर अनुकंपा विषयक तरतुदी समाविष्ट करणेसंदर्भात शासनाला प्रस्ताव सादर करणे बाबत कार्यवाही करणेत येऊन शासनाचे मान्यतेनंतर कार्यवाही करणेत यावी.

२) दिनांक ०७/०८/२००९ रोजी आकृतीबंध मंजूर आहे. परंतु अद्याप बिंदुनामावली मंजूर नाही. तरी अनुकंपा भरती करण्यापुर्वी बिंदुनामावली मागासवर्गीय कक्ष यांनी विभागीय आयुक्त कार्यालयाकडून मंजूर करणे आवश्यक आहे. त्यामुळे रिक्त पदे भरण्यापुर्वी बिंदुनामावली मंजूर करुन घ्यावी.

३) दिनांक १५/०२/२०१८ चा शासननिर्णयात अनुकंपा भरती नियुक्ती मर्यादा रिक्त पदांच्या २०% पर्यंत होती ती केवळ पदभरती वरील निर्बंध असे पर्यंत होती. सद्यस्थितीत राज्यशासनाची पदभरती चालू झालेली आहे त्यामुळे २० टक्के मर्यादेपर्यंत भरती करणे योग्य वाटत नाही.

४) सामान्य प्रशासन विभागाचे दिनांक २१/०९/२०१७ च्या शासन निर्णयातील मुद्दा क्र.२० मधील तरतुदीनुसार संस्थानला पदभरती संदर्भात मागासवर्गीय आरक्षण लागु आहे. त्यामुळे बिंदुनामावली मंजूरीनंतर अनुकंपा नियुक्ती व मुद्दा क्र.२० मधील कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करणे योग्य होईल असे निर्देश आहे.

मा. वरिष्ठांनी दिलेल्या उपरोक्त निर्देशानुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करता येईल, असे मत आहे.

१.	अनुकंपा विषयक तरतुदींचा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) (सर्वसाधारण सेवा अटी) अधिनियम २००४ व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) सेवा (भरती) विनियम २०१४ मध्ये समावेश करणेकामी मा. शासनाचे अनुकंपा नियुक्ती संदर्भातील तरतुदीनुसार मा. शासनाचे विधी व न्याय विभाग, यांचे मार्गदर्शन / अभिप्राय घेणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने प्रस्ताव सादर करता येईल.

२.	संस्थानचे सेवा प्रवेश विनियम अद्याप अंतिम नाही. त्यामुळे १०० बिंदुनामावलीही मंजूर (अंतिम) झालेली नाही. अनुकंपा उमेदवारांचे नियुक्तीसंदर्भात १०० बिंदुनामावली संस्थानचे मागासवर्गीय कक्ष यांनी विभागीय आयुक्त कार्यालयाकडून मंजूर करुन घेतल्यानंतर रिक्त पदे भरणेबाबत कार्यवाही करता येईल.

३.	अनुकंपा भरती नियुक्तीच्या मर्यादेबाबत (दरवर्षी रिक्त पदांच्या टक्केवारीनुसार ) मा. शासनाचे वेळोवेळी पारीत होणा-या निर्णयानुसार कार्यवाही करता येईल.

४.	दि.२१/०९/२०१७ चे शासन निर्णयातील मुद्दा क्र.२० मधील तरतुदीनुसार संस्थानला अनुकंपा पदभरती संदर्भात मागासवर्गीय आरक्षण लागु करणेकामी बिंदुनामावली मंजूरीनंतर याबाबतची पुढील कार्यवाही करता येईल.

तरी, दिवंगत कर्मचा-यांच्या पात्र वारसांना अनुकंपा कारणास्तव गट ‘क’ व गट ‘ड’ चे पदावर नेमणूक देणेबाबतचे प्रस्तावातील परिशिष्ठ ‘उ’ मध्ये नमूद केलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करणेकामी उपरोक्त प्रस्तावाबाबत योग्य तो उचित निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२०९**	**यावर सविस्तर चर्चा होऊन, शासनाने लागु केलेल्या दि.२१ सप्टेंबर,२०१७ च्या अनुकंपा नेमणूकीबाबतचे धोरणामध्ये/ निर्णयात, सदर अनुकंपा धोरण स्वतंत्ररित्या राबविणेस प्रशासकीय संस्था त्यांचे स्तरावर स्वतंत्र आहेत, असे नमुद केलेले आहे. त्यास अनुसरुन संस्थान व्यवस्थापनामार्फत अनुकंपा धोरण राबविणेस व त्याअनुषंगाने संस्थान प्रशासनामार्फत स्वतंत्ररित्या नियमावली तयार करणेस मान्यता देण्यात आली. सदरचे धोरणात्मक नियमावलीस मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन, शासनाकडे मान्यतेसाठी पाठविणेत यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३८**	**माहे एप्रिल-२०१८ ते मार्च-२०१९ अखेर लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-**	संस्थानला लेबर व सिक्युरीटी कॉन्ट्रक्टर्स यांचेमार्फत कंत्राटी पध्दतीने पुरविण्यात आलेल्या कुशल, अकुशल व सुरक्षा कामगारांचा प्रतिदीन व श्रमदिन संख्येचे विभागनिहाय तपशिलवार तक्ते प्रत्येक महिन्यास मा.कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेसाठी सादर करणेत यावेत व आर्थिक वर्षाचे शेवटी उपरोक्त विषयांचा एकत्रित अहवाल मा.व्यवस्थापन समिती समोर नोंद घेण्यासाठी सादर करणेत यावा बाबत मा.विश्वस्तांचे सूचने नुसार उपरोक्त संदर्भीय ठरावान्वये मान्यता मिळालेली आहे.

उपरोक्त मा.विश्वस्तांचे सूचनेनुसार माहे एप्रिल-२०१८ ते माहे मार्च-२०१९ अखेर या आर्थिक वर्षात दरमहा संस्थानला लेबर व सिक्युरीटी कॉन्ट्रक्टर्स यांचेमार्फत कंत्राटी पध्दतीने पुरविण्यात आलेल्या कुशल, अकुशल व सुरक्षा कामगारांचा प्रतिदीन व श्रमदिन संख्येचा तपशिल खालीलप्रमाणे देणेत येत आहे.

| अ.नं | कालावधी | तपशील | अकुशल | | कुशल | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्रतिदिन संख्या | श्रमदिन संख्या | प्रतिदिन संख्या | श्रमदिन संख्या | प्रतिदिन संख्या | श्रमदिन संख्या |
| ०१ | एप्रिल- २०१८ | लेबर | ११६५ | २६३७८ | ६३६ | १२८६१ | १८०१ | ३९२३९ |
| | | सिक्युरीटी | ७६४ | १८१२९ | ७२ | १२८० | ८३६ | १९४०९ |
| ०२ | मे-२०१८ | लेबर | ११६६ | २७०६० | ६७७ | ११९३० | १८४३ | ३८९९० |
| | | सिक्युरीटी | ७६४ | १७२२९ | ७२ | १३१९ | ८३६ | १८५४८ |
| ०३ | जून- २०१८ | लेबर | ११७० | २७००४ | ६७८ | १३७१९ | १८४८ | ४०७२३ |
| | | सिक्युरीटी | ७६४ | १८३८२ | ७२ | १३०० | ८३६ | १९६८२ |
| ०४ | जूलै- २०१८ | लेबर | ११६९ | २७२८३ | ६७८ | १४३०६ | १८४७ | ४१५८९ |
| | | सिक्युरीटी | ७६४ | १९५५२ | ७२ | १४०१ | ८३६ | २०९५३ |
| ०५ | ऑगष्ट- २०१८ | लेबर | ११६९ | २७००७ | ६७८ | १२७१८ | १८४७ | ३९७२५ |
| | | सिक्युरीटी | ७६४ | १९४४९ | ७२ | १४५३ | ८३६ | २०९०२ |
| ०६ | सप्टेंबर- २०१८ | लेबर | ११६९ | २६६४१ | ६७२ | १३९७० | १८४१ | ४०६११ |
| | | सिक्युरीटी | ७६४ | १८९१४ | ७२ | १४४५ | ८३६ | २०३५९ |
| ०७ | ऑक्टोंबर- २०१८ | लेबर | ११७४ | २६६४१ | ६७२ | १३९७० | १८४६ | ४०६११ |
| | | सिक्युरीटी | ७६६ | १८२०८ | ६७ | १५१३ | ८३३ | १९७२१ |
| ०८ | नोव्हेंबर- २०१८ | लेबर | ११०६ | २५१०५ | ७१९ | १३७८३ | १८२५ | ३८८८८ |
| | | सिक्युरीटी | ७६६ | १८६३७ | ६७ | १४१६ | ८३३ | २००५३ |
| ०९ | डिसेंबर- २०१८ | लेबर | १०८० | २९८४६ | ७२२ | १८१५० | १८०२ | ४७९९६ |
| | | सिक्युरीटी | ७६६ | २२३८५ | ६७ | १७५० | ८३३ | २४१३५ |
| १० | जानेवारी-२०१९ | लेबर | १०८० | २९७९६ | ६३२ | १८४४१ | १७१२ | ४८२३७ |
| | | सिक्युरीटी | ७४८ | २२२१९ | ५७ | १७१९ | ८०५ | २३९३८ |
| ११ | फेब्रूवारी-२०१९ | लेबर | १०९९ | २६८८३ | ६३४ | १६५३५ | १७३३ | ४३४१८ |
| | | सिक्युरीटी | ७८६ | २०३३० | ५९ | १५७५ | ८४५ | २१९०५ |
| १२ | मार्च-२०१९ | लेबर | १०८९ | २९८८५ | ६३३ | १८३८७ | १७२२ | ४८२७२ |
| | | सिक्युरीटी | ७८९ | २२४३७ | ६२ | १८२१ | ८५१ | २४२५८ |
| | एकूण संख्या | | २२८४१ | ५६५४०० | ८८४२ | १९६७६२ | ३१६८३ | ७६२१६२ |

उपरोक्त नमूद केले प्रमाणे माहे एप्रिल-२०१८ ते माहे मार्च-२०१९ अखेर या आर्थिक वर्षात दरमहा संस्थानला लेबर व सिक्युरीटी कॉन्ट्रक्टर्स यांचेमार्फत कंत्राटी पध्दतीने कुशल, अकुशल व सुरक्षा कामगार आवश्यकतेप्रमाणे पुरविणेत आलेले आहे.तरी सदर प्रतिदिन व श्रमदिन संख्येची नोंद घेणेत येवून, त्यास मान्यता असावी.

उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.२१० **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे एप्रिल-२०१८ ते मार्च-२०१९ अखेर लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-कामगार विभाग)**

---

विषय नं.३९ **संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल व सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी सध्या असलेले ठेकेदार यांना ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना दि.१०.०६.२०१८ ते दि.०९.०६.२०१९ अखेर १ वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कर्मचारी व सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी ०२ एजन्सींची नेमणूक करण्यात आलेली असून, त्यात मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. पुणे यांना संस्थानचे विविध विभागांना अकुशल, कुशल कंत्राटी कर्मचारी व मे.सेंट्रल इनव्हेस्टीगेशन सिस्टिम ॲण्ड सर्व्हिसेस, मुंबई यांना सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविण्याचे कार्यादेश देण्यात आलेले असून, संबंधित लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर यांचेमार्फत संस्थानला प्रतिदिनी व मंजूर संख्येनुसार कंत्राटी पध्दतीने खालीलप्रमाणे अकुशल, कुशल कामगार, सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेत येत आहेत.

| अ. नं. | एजन्सीचे नांव | विभागांना दिलेल्या मंजूरी प्रमाणे कंत्राटी कर्मचारी संख्या | | | हजेरी पटावरील कंत्राटी कर्मचारी संख्या | | | कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अकुशल | कुशल | एकूण | अकुशल | कुशल | एकूण | |
| १ | मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे. जा.नं.एसएसएस/वशी-७ए/६४९/ २०१८, दि.०८.०६.२०१८ | १०८१ | ६८४ | १७६५ | १०९० | ५९८ | १६८८ | दि.१०.०६.२०१८ ते दि.०९.०६.२०१९ |
| २ | मे.सेंट्रल इन्व्हेस्टिगेशन सिस्टीम ॲण्ड सर्व्हिसेस, मुंबई. जा.नं.एसएसएस/वशी-७ए/६५०/ २०१८, दि.०८.०६.२०१८ | ७४८ | ६७ | ८१५ | ७७५ | ६१ | ८३६ | दि.१०.०६.२०१८ ते दि.०९.०६.२०१९ |
| | एकूण (१ + २ ) = | १८२९ | ७५१ | २५८० | १८६५ | ६५९ | २५२४ | |

संस्थानला पुरविणेत येणा-या कंत्राटी अकुशल, कुशल कामगारांना व सुरक्षा रक्षक कर्मचा-यांना किमान वेतन कायद्यानुसार महाराष्ट्र शासनाचे शॉप ॲण्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.- ०३ (मुंबई, सिकंदराबाद कार्यालयासाठी झोन नं. ०१) प्रमाणे अनुज्ञेय असणारे किमान वेतनदर, तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचा-यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील चर्चा / वाटाघाटीत ठरलेप्रमाणे वेतनदर, अधिक प्रॉव्हीडंड फंड प्रशासकीय चार्जेसह (मालकाचा हिस्सा - १३.१५ %) अधिक कंत्राटी कर्मचा-यांचे वेतनदराचे रक्कमेवर ०.००००००००१ % व ०.०००००००१० % सर्व्हिस चार्ज अधिक संपूर्ण बिलाचे रक्कमेवर CGST ९ % , SGST ९ % , एकूण GST १८% , अधिक सानुग्रह अनुदान ८.३३ % , अधिक कामगार नुकसान भरपाई अधिनियम अंतर्गत ग्रृप इन्शुरन्स प्रिमियम (अंशदान) , तसेच मा.व्यवस्थापन समिती सभा निर्णय क्र.१४२ नुसार सदर कंत्राटी कर्मचा-यांचे किमान वेतनावर ४० % वेतनवाढ याप्रमाणे रक्कम संस्थानकडून देण्यात येते. तसेच दि.०१.१२.२०१८ पासून साप्ताहिक सुट्टी (Paid Weekly Off) देण्यात येत आहेत.

उपरोक्त संदर्भिय क्र. १ अन्वये मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन सिक्युरिटी सर्व्हिसेस, मुंबई यांचे पत्र प्राप्त झाले असून त्यात त्यांनी, आमचे कॉन्ट्रॅक्ट दि.०९.०६.२०१९ रोजी संपत असून, पुढील १ वर्ष कालावधीसाठी आहे त्या अटी शर्तीस अधीन राहून संस्थानला सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेस तयार आहेत असे कळविलेले आहे.

तसेच संदर्भ क्र. २ अन्वये मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे यांचे पत्र प्राप्त झाले असून त्यात त्यांनी, सदर कार्यादेशातील अट क्र. ३१ नुसार संस्थानला आवश्यकता असल्यास आमच्या एजन्सीला मुदतवाढ दिल्यास सदर मुदतवाढीच्या कालावधीत आम्ही काम करण्यास तयार आहोत. तथापि, सदर कालावधीत शासनाच्या नियमानुसार किमान दरामध्ये होणारी वाढ व पी.एफ. अंशदानाच्या रक्कमेत भविष्यनिर्वाह निधी कार्यालयाकडून काही बदल झाल्यास त्यानुसार सुधारीत दराने पी.एफ. रक्कम संस्थानकडून आमचे एजन्सीला देय राहील. तसेच इतर शासकीय कर उदा.GST मध्ये शासकीय नियमानुसार काही बदल झाल्यास त्यानुसार सुधारित दराने सदर कराची रक्कम संस्थानकडून आमचे एजन्सीला देय राहील. तसेच, अट क्र. २० नुसार कंत्राटी कर्मचा-यांचा प्रत्येकी रु.१० लाख रक्कमेचा अपघाती विमा उतरविणेत आलेला असून, मुदतवाढीच्या अल्प कालावधीकरीता सदर पॉलीसीची मुदतवाढ करता येणार नसल्याने रु.१० लाख रक्कमेपर्यंतचा अपघात विमा व वर्कमॅन कॉम्पेनसेशन विमा पॉलिसी याबाबतची जबाबदारी मुदतवाढीच्या कालावधीत आमचे एजन्सीची असणार नाही.

सदर जबाबदारी संस्थानची राहील त्यामुळे आमचे एजन्सीवर दोन्ही पॉलीसीची जबाबदारी निश्चित करु नयेबाबत नमूद केलेले आहे.

प्रस्तावनाः- उपरोक्त संदर्भ क्र.३ मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२६.०२.२०१९ निर्णय क्र.११० अन्वये संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल व सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्यासाठी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता मिळालेली आहे. तथापि माहे फेब्रुवारी -२०१९ अखेरनंतर लोकसभा निवडणूक आचारसंहिता दि.२३.०५.२०१९ अखेर लागू झालेली असल्याने आचारसंहिता कालावधीत निविदा मागविणे, मा.व्यवस्थापन समिती सभेमध्ये निर्णय घेणे, कामाचे कार्यादेश देणे इ.बाबी करता येणार नाही. याकरीता संस्थानला अकुशल, कुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणारे ठेकेदार मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे व मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन सिक्युरिटी सर्व्हिसेस, मुंबई यांना निविदेतील व करारनामा तसेच कार्यादेशातील अटी – शर्तींनुसार सन २०१९-२० करीता सुरु असलेली ई-निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन नविन ठेकेदारास कार्यादेश देई पावेतो कार्यादेशातील व करारनाम्यातील आहे त्याच अटी व शर्ती, दरपत्रकनुसार मुदतवाढ द्यावी लागेल असे मत आहे.

विभागाचा अभिप्रायः- सबब, दि.२३.०५.२०१९ अखेर लोकसभा निवडणूक- २०१९ ची आदर्श आचारसंहिता लागू असल्याने व सदर निविदा प्रक्रिया राबविणेची कार्यवाही विस्तृत स्वरुपाची असल्याने दि.०९.०६.२०१९ अखेर निविदा प्रक्रिया पूर्ण होऊ शकत नाही. करीता उपरोक्त बाबींचा विचार करता संस्थानला अकुशल, कुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी ठेकेदार मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे व मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन सिक्युरिटी सर्व्हिसेस, मुंबई यांना कामाची गैरसोय होऊ नये म्हणून पुढील ई-निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन पात्र ठेकेदारास कार्यादेश देई पावेतो दि.१०.०६.२०१९ पासून निविदेतील, करारनाम्यातील व कार्यादेशातील आहे त्याच अटी-शर्तीस व दरपत्रकास अधिन राहून मुदतवाढ देणेस मान्यता असावी. तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.२११ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला अकुशल, कुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी ठेकेदार मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे व मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन सिक्युरिटी सर्व्हिसेस, मुंबई यांना निविदेतील, करारनाम्यातील व कार्यादेशातील आहे त्याच अटी-शर्तीस व दरपत्रकास अधिन राहून दि.१०.०६.२०१९ ते ३१.०८.२०१९ या कालावधीकरीता मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- कामगार विभाग)**

---

**विषय नं.४० मंदिर विभागाकरीता एक वर्षाकरीता आवश्यक असणारे अष्टगंध देणगी स्विकारणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ तरतुद-

| अ.क्र | कलम/तरतूद क्रमांक | कलम/ तरतूदीचे शीर्षक | पोटकल/उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १ (ग) | भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे |

प्रस्तावना- मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०/२०१६ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.२२(३) नुसार सभेच्या सुरुवातीस झालेल्या चर्चेप्रमाणे साईभक्त हा केंद्रस्थानी माननेत येऊन, त्यासाठी संस्थानतर्फे साईभक्तांना आणखी सुविधा देण्यात याव्यात याबाबत चर्चा करणेत आली व चर्चेअंती श्रीपुण्यतिथी उत्सवाचे मुहुर्तावर यापुढे दर्शन रांगेमधील सर्व भक्तांचे श्रींचा गंध लावून स्वागत करणेत यावे असे ठरले आहे. त्यानुसार मंदिर विभागामार्फत कर्मचारी नेमुन सर्व साईभक्तांना गंध लावणेत येत आहे.

प्रस्ताव- अर्जदार साईभक्त श्री संभाजी शामसुंदर शहाणे,रा.शिर्डी यांनी दि.२५/०२/२०१९ चे अर्जान्वये श्रींचे दर्शनासाठी समाधी मंदिरात येणा-या साईभक्तांना दर्शनापुर्वी श्रींचा गंध लावतात त्यामुळे भक्तांमध्ये भक्तीमय वातावरणाचा अनुभव येत असल्याचे जाणवत आहे. देणगीदार यांनी साईबाबा समाधी शताब्दी काळात अष्टगंध देणगी स्वरुपात दिलेला आहे. पुनश्च देणगीदार श्री.शहाणे यांनी एक वर्षाकरीता मंदिर विभागास आवश्यक असणारे अष्टगंध देणगी स्वरुपात देणेबाबत इच्छा व्यक्त केली असून त्याबबतची परवानगी मागितली आहे.

मंदिर विभागाकरीता सन २०१९-२० या वर्षाकरीता काशी अष्टगंध खरेदी करणेबाबत इकडील विभागामार्फत प्रस्ताव सादर केला असून त्यास मान्यता देण्यात आलेली आहे. प्रस्तावात नमूदप्रमाणे मंदिरा

विभागासाठी साधारण अंदाजे ४० ते ४५ किलो अष्टगंध प्रति महिन्यास लागतो. तसेच गर्दी नसल्यास प्रति दिवशी अंदाजे १ किलो व गर्दीचेवेळी अंदाजे दिड किलो अष्टगंध वापरला जातो.

विभागाचा अभिप्राय - मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०/२०१६ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.२२(३) नुसार समाधी मंदिरामध्ये दर्शनासाठी येणारे साईभक्त व ग्रामस्थ यांना दैनंदिन गंध लावणेत येत आहे. त्याकरीता मंदिर विभागामार्फत वार्षिक खरेदीद्वारे अष्टगंध खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवुन दि.२३.०५.२०१७ चे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.०१, निर्णय क्र.४१९(२२) नुसार सन-२०१७-१८ करीता अष्टगंध खरेदीकरणेकामी भवानी शंकर अष्टगंध (पिवळा) खरेदी करणेकामी मे. गंगवाल ए.एस. & कं. शिर्डी यांचे प्रती किलो दर रु.१५५/- मात्र अंतीम दर स्विकारणेत आलेले आहे. करीता मंदिर विभागास पुरवठादार मेसर्स.गंगवाल ए.एस & कं., शिर्डी यांचेकडुन आवश्यक असणारे अष्टगंध खरेदी करणे ऐवजी देणगीदार यांचेकडुन त्याच प्रतिचे अष्टगंध स्विकारणेस हरकत नाही, असे नम्र मत आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे मंदिर विभागाकरीता आवश्यक असणारे भवानी शंकर अष्टगंध (पिवळा) साईभक्त श्री.संभाजी शामसुंदर शहाणे, रा.शिर्डी यांचेकडुन देणगीदाखल स्विकारणेस व त्याबाबतची देणगी पावती देणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२१२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे समाधी मंदिरामध्ये दर्शनासाठी येणारे साईभक्त व ग्रामस्थ यांना दैनंदिन गंध लावणेकामी भवानी शंकर अष्टगंध (पिवळा) साईभक्त श्री.संभाजी शामसुंदर शहाणे, रा.शिर्डी यांचेकडुन देणगीदाखल स्विकारणेस व त्याबाबतची देणगी पावती देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-मंदिर विभाग)**

---

**विषय नं.४१** **श्री साई सत्यव्रत पूजा व अभिषेक पूजेकरीता आवश्यक श्रीफळ ई-निविदाव्दारे खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/१२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. १०२४ "यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे माहे-जानेवारी २०१८ ते मार्च २०१९ अखेर या कालावधीसाठी श्री साईसत्यव्रत पुजा व अभिषेक पुजेकरीता आवश्यक असलेले श्रीफळ ई-निविदाव्दारे खरेदी करणेस व त्याकामीचे खर्चास तसेच माहे नोहेंबर -१७ व माहे डिसेंबर-१७ अखेर याकालावधीकरीता आवश्यक असलेले श्रीफळ स्थानिक दुकानदार यांचेकडून कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली. "

प्रस्तावना- पुर्वी श्रींचे दर्शनार्थ आलेल्या साईभक्तांनी आणलेल्या पुजेच्या साहित्यामध्ये असलेले श्रीफळ मंदिरामार्फत जमा करणेत येऊन श्रीसाईसत्यव्रत पूजा व अभिषेक पूजेकरीता वापरण्यात येत होते. तसेच याव्यतिरीक्त श्रीं चे दर्शनार्थ येणा-या मान्यवरांचा सत्कार करणेकामी, उत्सवामध्ये होत असलेल्या कार्यक्रमातील कलाकारांचा व श्रीं चे स्नानाकरीता पाणी कावड घेऊन येणा-या साईभक्तांना सत्कारासाठी श्रीफळ देण्यात येत होते. परंतू मा..व्यवस्थापन समितीचे दि.२३/१०/२०१७ चे सभेतील निर्णय क्र.८५१ चे निर्णयानुसार साईभक्तांनी आणलेली श्रीफळ/नारळ स्विकारणेस बंदी करण्यात आल्याने सदरहू पुजेकरीता श्रीफळ जमा होत नाही. करीता उपरोक्त संदर्भिय मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय क्र.१०२४ अन्वये मागील वर्षात श्रीसाईसत्यव्रत पूजा व अभिषेक पुजेकरीता श्रीफळ खरेदी विभागामार्फत ई-निविदा प्रसिध्द करुन खरेदी करणेत येत आहे.

सन २०१८-२०१९ या कालावधीत श्रीसाईसत्यव्रत पूजा व अभिषेक पूजेकरीता साधारण एकूण ७०,६८१ नग श्रीफळ पुरवठादाराकडून तसेच बगिचा विभागामार्फत घेऊन वापरण्यात आले आहे.

विभागाचा अभिप्राय- सध्या श्रीसाईसत्यव्रत पूजा व भक्त अभिषेक पूजेकरीता लागणारे श्रीफळ साईभक्तांमार्फत जमा होणारे श्रीफळ वापरण्याची प्रथा होती. आता साईभक्तांकडील श्रीफळ येण्याचे प्रमाण दिवसें-दिवस कमी होत असल्याने सत्यनारायण पूजेसाठी व भक्त अभिषेक पूजेसाठी श्रीफळ उपलब्ध होत नाही. श्रीसाईसत्यव्रत पूजा व भक्त अभिषेक पूजेकरीता तसेच उत्सवातील कार्यक्रमातील कलाकारांचे सत्कारासाठी व इ. करीता लागणारे श्रीफळ संस्थानमार्फत खरेदी करावे लागणार आहे. संस्थानमार्फत प्रती महिन्यास अंदाजे साधारण श्रीसाईसत्यव्रत ६,५०० व अभिषेक ५,००० पुजा होत असतात. तसेच श्रावण महिना, उत्सव, पौर्णिमा, सुटयांचे काळात सदरच्या पुजेमध्ये वाढ होत असते. करीता सन २०१९-२०२० या कालावधीत खालीलप्रमाणे अंदाजे श्रीफळ खरेदी करावे लागणार आहे.

| अ.नं. | तपशिल | अंदाजे दर | एकूण वार्षिक अंदाजे खरेदी | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | सत्यनारायण पुजेकरीता श्रीफळ | रु. २०/- | ८०००० नग | १६,००,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०२ | अभिषेक पुजेकरीता श्रीफळ | | | |

प्रस्ताव- तरी उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे श्रीसत्यनारायण व अभिषेक पुजेकरीता लागणारे श्रीफळ खरेदीकामी अंदाजे रु.१६ लक्ष मात्र खर्च अपेक्षित असून माहे-एप्रिल-२०१९ ते मार्च-२०२० अखेर श्रीफळ खरेदी ई-निविदाद्वारे खरेदी विभागामार्फत करणेस व त्याकामीचे येणारे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२१३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे एप्रिल-२०१९ ते मार्च २०२० अखेर श्रीसत्यनारायण व अभिषेक पुजेकरीता लागणारे श्रीफळ खरेदी करणेकामी खरेदी विभागामार्फत विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१६ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- मंदिर विभाग)**

---

**विषय नं.४२** **दि.२६ डिसेंबर,२०१९ चे सकाळी ०८:०५ वाजता कंकणाकृती सुर्यग्रहण असल्याने मंदिराचे दैनंदिन कार्यक्रमात बदल करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ तरतुद-

| अ.क्र | कलम/तरतूद क्रमांक | कलम/ तरतूदीचे शीर्षक | पोटकलम/उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १ (ग) | भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे |

प्रस्तावना- श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत समाधी मंदिर येथे विविध उत्सव, स्थानिक उत्सव, सण, महोत्सव असे विविध कार्यक्रम साजरे करण्यात येतात. त्याचप्रमाणे चंद्रग्रहण व सुर्यग्रहण दिसणार असल्याससंस्थान प्रथेप्रमाणेग्रहणाचे वेध पाळण्यात येत नाहीत अशी पूर्वीपासून प्रथा आहे. याबाबत मंदिर पुजारी- श्री.बाळासाहेब जोशी यांनी ग्रहण कालावधीबाबत अनुभवातून मत व्यक्त केले आहे. त्यामध्ये खालील गोष्टी नमूद केल्या आहेत.

दाते पंचांग पान नंबर २६ (अहमदनगर) मध्ये दर्शविले नुसार, मार्गशिर्ष कृ.॥३०,शके१९४१, गुरुवार, दि.२६/१२/२०१९ रोजीचे दिवशी कंकणाकृती सुर्यग्रहण आलेले आहे. ग्रहणकाल २६/१२/२०१९ रोजी सकाळी ०८:०५ ते ११:०० असा आहे. प्रथेप्रमाणे ग्रहण काळात दर्शन, आरती इ.कार्यक्रम बंद ठेऊन संस्थान पुजाऱ्यांमार्फत मंत्रोच्चार करण्यात येतो. त्यामुळे ग्रहणकालावधीत खालील प्रमाणे कार्यक्रम घेता येतील.

| अ.नं. | वेळ | कार्यक्रम तपशिल |
|---|---|---|
| ०१ | सकाळी ०८:०० वा. | श्रींचे दर्शन बंद होईल. |
| ०२ | सकाळी ०८:०५ वा. | मंत्रोच्चार सुरु होईल. |
| ०३ | सकाळी ११:०० वा. | मंत्रोपच्चार संपेल. |
| ०४ | सकाळी ११:१० वा. | श्रींचे मंगलस्नान. |
| ०५ | सकाळी ११:२५ वा. | श्रींची शिरडी माझे पंढरपुर आरती होईल. |
| ०६ | दुपारी १२:३० वा. | मध्यान्ह आरती |

विभागाचा अभिप्राय- पूर्वीपासून सुर्यग्रहण, चंद्रग्रहण या कालावधीत मंदिरांचे दैनंदिन कार्यक्रमात बदल करण्यात आलेले आहेत.

अ) प्रथेप्रमाणे ग्रहण कालावधीत श्रींचे समाधी चौथरा तुळस, हरळने झाकूण समाधी मंदिर गाभाऱ्यात मंदिर पुजारी यांचेमार्फत मंत्रोच्चार करण्यात येतील. ग्रहण कालावधी संपलेनंतर श्रींचे मंगलस्नान सुरु झाल्यानंतर श्रींची शिरडी माझे पंढरपुर आरती होईल तसेच श्रींची मध्यान्ह आरती दुपारी १२:३० वाजता होईल.

ब) इतर मंदिरातील दर्शन ग्रहण कालावधीत बंद ठेवावे लागेल.

क) अभिषेक पुजा, साईसत्यव्रत पुजा सकाळी फक्त १ली बॅच घेता येईल पुढील बॅचेस बंद ठेवाव्या लागतील.

ड) अभिषेक पुजा व साईसत्यव्रत पुजा तिकीटांची ऑनलाईन विक्री होत असल्याने दि. २६/१२/२०१९ रोजी सदर बुकींग बंद ठेवणेबाबत संस्थानचे आय.टी. विभाग व लेखाशाखा विभागास आदेशित करावे लागेल.

प्रस्ताव- तरी उपरोक्तप्रमाणे निर्देशित केलेनुसार दि.२६ डिसेंबर २०१९ रोजी सुर्यग्रहण असलेने मंदिरांचे दैनंदिन कार्यक्रमात बदल करणेकामी सदरहू प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.२१४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.२६ डिसेंबर,२०१९ चे सकाळी ०८:०५ वाजता कंकणाकृती सुर्यग्रहण असल्याने मंदिराचे दैनंदिन कार्यक्रमात उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे बदल करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-मंदिर विभाग/माहिती तंत्रज्ञान विभाग/लेखाशाखा/जनसंपर्क विभाग)**

---

**विषय नं.४३ मे.जस्मीन आर्टस प्रिन्टर्स प्रा.लि.मुंबई यांचे पुस्तक छपाई कामाच्या सुरक्षा अनामत रक्कमेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम तरतुद– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम नं.१७ ठ मध्ये "श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार – प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील" प्रमाणे तरतुद आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय–मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९.१०.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८९.

प्रस्तावीत साठा संपत आलेली संस्थान प्रकाशित प्रकाशने पुनर्मुद्रणकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील गडद व अधोरेखीत केलेले निम्नत्तम दर स्विकारणेत येऊन, मागील छपाई दरांची तुलना करणेत येऊन, त्यानुसार संबंधितांना कार्यादेश देण्यात यावा, तसेच ज्या छपाईकामी समान निम्नतम दर प्राप्त झालेले आहेत, त्यासाठी समान विभागून कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

प्रास्तवीकः- श्री साईबाबा संस्थान, प्रकाशने विभागामार्फत सन-२०१६-१७ या आर्थिक वर्षात, साठा संपुष्टात आलेली ३७ प्रकारची पुस्तके व फोटो छपाई कामाकरिता दि.०५.०७.२०१६ ते १५.०७.२०१६ या कालावधीत ई-निविदा मागविणेत आलेली होती. त्यामध्ये १४ निविदाधारकांनी भाग घेतलेला होता. त्यातील मे.जस्मीन आर्टस् प्रिन्टर्स प्रा.लि.,मुंबई यांनी सदरील निविदेतील अ.नं.३३ चे श्री साई सत्चरित पोथी (डिलक्स) मराठी , आवृत्ती क्र.१, या पुस्तकासाठी न्युनतम दर रू.१००.७२ भरलेला होता. त्यानुसार त्यांना संदर्भीय ४ चे पत्राने कार्यादेश देण्यात आलेला होता. याकामी प्रेसधारकाकडून सुरक्षा अनामत रक्कम म्हणून रक्कम रू.१,००,०००/- संस्थान खाती जमा करणेत आलेली आहे.

तथापि त्यांनी पुस्तक छपाई करून पुरवठा न केलेने संस्थानमार्फत पुन्हा ई-निविदा मागवून मे.प्रिन्ट प्लस प्रा.लि.मुंबई यांचेकडून प्रति नग रू.१५८/- प्रमाणे छपाई करून घेणेत आलेली आहे. (छपाई संख्या-१०,००० प्रती) .

त्यानंतर प्रेसधारक मे.जस्मीन आर्टस् प्रिन्टर्स प्रा.लि.,मुंबई यांनी दि.१७.०६.२०१७ रोजीचे पत्रामध्ये खालीलप्रमाणे मजकूर नमूद केलेला आहे. तथापि त्यांनी पाठविलेले पत्र संबंधित नस्तीस जोडल्याचे दिसून येत नाही.

On e-tendering we had submitted EMD of Rs.1,00,000/- vide DD No.988651 dtd.13.07.2016 in your fovour. Inspite of our request you have not refunded the EMD amount .

We have received tender notice through mail on 27th June 2016 and after as per your schedule of works we did your costing and visited to Mr.Pravin Shinde on 12 july 2016 at Shirdi office. Accordingly we had submitted our price in “Item rate BOQ” of online tender site. We had qualified for 33rd item of the schedule of works. We had quoted our rate as per the work description and printing specifications mentioned in schedule of works as per the mail dated 27th June 2016.

Job specification mentioned in schedule of works and Rate BOQ of online tender form are varied. In the presumption of the accurncy of data in the schedule of works , we had submitted our rate in BOQ. When we received your PO -3458, dtd.3/10/2016 we came to know the differences in printing specification. Below insert will give you the clear picture.

| As Per schedule of work | As Per BOQ (price schedule) |
|---|---|

| Sr. No. | Description: Shri Sai Sat Charitra-Pothi (Delux) Marathi | Qty. | Sr. No. | Description: Shri Sai Sat Charitra-Pothi (Delux) Marathi | Qty. |
|---|---|---|---|---|---|
| 33 | Edition no.1 | 2500 | 33 | Edition no.1 | 2500 |
| | Cover size: 14.5 cm x 22.5 cm | | | Cover Size: 21.5 cm x 31 cm | |
| | Printing page Size: 14 cm x 21.5 cm | | | Printing page size: 21 cm x 30 cm | |
| | Printing (black) : 70 GSM Maplitho paper | | | Printing (4 colors) 75 GSM natural shade buff paper | |
| | Photos on inner cover. 100 GSM maplitho paper | | | Photos on inner cover. 130 GSM Maplitho paper | |

The variations in Schedule of works and BOQ are not informed us earlier. Due to the variations in job specifications, we could not take up the printing job. Same we had dicussed with Mr.Pravin Shinde almost Six

times through phone, Hence we request you to cancel the PO and refund the EMD amount at the earliest.

ऑक्टोबर-२०१८ मध्ये प्रेसधारक यांनी तत्कालीन प्रकाशने विभागप्रमुख यांना उपरोक्त नमूद केलेले तेच पत्र व संबंधित कागदपत्रे मेल केलेली आहेत. त्यानंतर जा.नं.एसएसएस/वशी-प्रकाशने/४२१५/२०१८, २४/११/२०१८ चे पत्रान्वये संबंधितांकडून खुलासा मागविणेत आला होता. त्यावर त्यांनी दि.४/१२/२०१८ च्या पत्रान्वये पुस्तक छपाई कामाची सूरक्षा अनामत रक्कम मिळाली नसलेबाबत कळविले असून त्यात खालीलप्रमाणे मजकूर नमूद केलेला आहे.

With reference to your letter dated 24.11.2018 which we received on 30.11.2018, we would like to give explanation as under for the subject matter.

We are working for Shirdi Sansthan for past many years in a small way but with entire satisfaction of Shirdi Sansthan. In our business we ensure that some part of our work is devoted for some spiritual work and accordingly we work for few organizations on a very minimal or no profit no loss basis. Shirdi Sansthan is one of the organization where we treat the work as a spiritual and devotional way of doing printing work. We always give minimal rates for the printing work for Sansthan and whatever work is allotted , execute it with utmost care.

In 2016 we had given our rates for the E-tender for about 37 item's wherein 33rd items description was changed which has not brought to our notice by an email or any corrigendum. When we got purchase order for only one item and that is for 33rd item only, we realized that the specification of the book size is exactly double and inside pages to be printed in 4 color than 1 color mentioned in tender. Therefore the cost of the book was increasing to more than double which we tried to explain the concern persons. If nominal cost escalation would have been there , without asking for price increase we would have executed the job. Since cost difference was too much, we were compelled to refuse that order.

We had made many attempts to explain the situation to the concern people but did not get any reply. We also requested to return our EMD of Rs.1,00,000/- lying with you towards the same tender as there was no any requisition to our favour.

We once againg request you to kindly check the specifications of Schedule of work and BOQ and PO which are not matching. After checking the facts we hope, you will return our EMD lying at your end.

विभागाचा अभिप्रायः- प्रकाशने विभागाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची पडताळणी केली असता, प्रकाशने विभागाच्या तत्कालीन कर्मचा-याकडून ई-निविदा प्रसिध्द करतांना सदरहू पुस्तकाचे Shedule

of Works मध्ये एक तपशिल तर BOQ मध्ये त्याच पुस्तकाचा दुसरा तपशिल अशी चूक झाली असल्याची बाब निदर्शनास येते.

तसेच प्रेसधारक यांनीही ई-निविदा भरणेपूर्वी Shedule of Works व BOQ मध्ये नमूद केलेला तपशिल वेगवेगळा असल्याचे संस्थानचे निदर्शनास आणून देणे गरजेचे होते. तथापि प्रेसधारक यांनी BOQ मधील न पाहता फक्त Shedule of Works मधील तपशिल पाहूनच ई-निविदेतील दर भरलेले आहेत असे दिसते. मात्र इतर प्रेसधारक यांनी BOQ मधील तपशिल पाहून योग्य दर दिलेले आहेत. त्यामुळे मे.जस्मीन आर्टस प्रिन्टस् प्रा.लि.मुंबई यांनी दिलेले दर चुकीचे होते. यामध्ये संस्थान व प्रेसधारक या दोन्ही बाजूंकडून चुका झालेचे निदर्शनास येते.

प्रस्तावः- सबब उपरोक्त वस्तूस्थिती विचारात घेता, प्रेसधारक मे.जस्मिन आर्टस प्रिंन्टर्स , नवी मुंबई यांची याकामी संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम रू.१,००,०००/-(अक्षरी एक लाख मात्र) त्यांचे मागणीप्रमाणे परत दयावी किंवा कसे ? याबाबत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२१५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रेसधारक मे.जस्मिन आर्टस प्रिंन्टर्स , नवी मुंबई यांची संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम रू.१,००,०००/-मात्र त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- प्रकाशने विभाग)**

---

**विषय नं.४४** **सन २०२० ची श्री साई दैनंदिनी व विविध प्रकारच्या दिनदर्शिका संस्थानमार्फत प्रकाशित करणेकामी व साईभक्तांना विक्रीसाठी उपलब्ध करुन देणेसाठी येणाऱ्या छपाई खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम तरतुद– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम नं.१७ ठ मध्ये खालील प्रमाणे तरतुद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार –प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय-

१) मा.व्यवस्थापन समिती दि.०२.०५.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.३१५.

प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे सन-२०१९ ची श्री साई दैनंदिनी/दिनदर्शिका व डिलक्स साईबाबा दिनदर्शिका प्रकाशित करून भक्तांना उपलब्ध करून देणेसाठी येणा-या अंदाजे रू.४,६१,५०,०००/- मात्रच्या छपाई खर्चास मान्यता देण्यात आली.

तसेच यावेळी अशाही सूचना करण्यात आल्या की, कालनिर्णय दिनदर्शिकेप्रमाणे संस्थानच्याही तीन आकारामध्ये (ऑफिस, घरगूती व कार साईज) दिनदर्शिका छपाई करण्यात याव्यात.

प्रास्तविकः- श्री साईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार प्रसार करण्याच्या उद्देशाने दरवर्षी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे वतीने श्री साई दैनंदिनी तसेच विविध प्रकारच्या श्री साईबाबा दिनदर्शिका छपाई करुन साईभक्तांना विक्रीसाठी उपलब्ध करुन दिल्या जातात.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२.०५.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३१५ नुसार सन-२०१९ साठी श्री साई दैनंदिनी व विविध प्रकारच्या दिनदर्शिकांची छपाई निम्नतम दरधारकांकडून करून घेण्यात आली होती त्याची व आजअखेर शिल्लक साठयाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | तपशिल | आदेशीत संख्या | सन-२०१९ चे ई-निविदेतील मंजूर दर रु. पै. | विक्री दर रु. पै. | शिल्लक साठा |
|---|---|---|---|---|---|
| | | १ | २ | ३ | ५ |
| ०१ | श्री साई दैनंदिनी डिलक्स -२०१९ साईज-(७.५०"x९.७५") | २३०००० | ८५.४० | ९०/- | ९,७०० |
| ०२ | श्री साई दैनंदिनी २०१९ पॉकेट साईज (३"x ४.५०") | १,००,००० | ११.८० | १५/- | ०० |
| ०३ | श्री साई दिनदर्शिका २०१९, ०१ पानी मोठे | ३००००० | १४.९६ | १५/- | ०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | साईज-(१९"x२९") | | | | |
| ०४ | श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर्स-२०१९ (८ पेजेस) साईज- २२.००"x३५.००" | १५००० | २०७/- | २१०/- | ०० |
| ०५ | श्री साईबाबा मेटपेट वॉल कॅलेंडर्स-२०१९ (७ पेजेस) साईज- १९.२५" x २७" | १०००० | २२३/- | २२५/- | ०० |
| ०६ | श्री साईबाबा थ्रीडी वॉल कॅलेंडर्स-२०१९ (सिंगल पेज) साईज- १९.००"x२७.००" | २००० | २३५/- | २४०/- | ०० |
| ०७ | श्री साईबाबा थ्रीडी डेस्क कॅलेंडर्स -२०१९ (७ पेजेस) साईज- ९.७५"x०७.००" | १५००० | ११९/- | १२०/- | ०० |
| ०८ | श्री साईबाबा थ्रीडी डेस्क कॅलेंडर्स -२०१९ (१४ पेजेसवर छपाई) साईज- ६.५०" x ९.५०" | १०००० | ५०.४० | ५५/- | ०० |
| ०९ | श्री साईबाबा वॉल कॅलेंडर्स-२०१९ (ऑफीस) साईज -१९.५०" x २८.००" | १०००० | २४.६६ | ३०/- | ०० |
| १० | श्री साईबाबा वॉल कॅलेंडर्स-२०१९ (घरगुती) साईज- ११.००" x १६.८०" | १०००० | १०.२० | १५/- | ०० |
| ११ | श्री साईबाबा कार कॅलेंडर्स -२०१९ साईज-३.८०" x ५.५०" | २०००० | ५/- | ५/- | ०० |

उपरोक्त तक्त्यात नमूद केलेल्या सन-२०१९ च्या साई दैनंदिनी व विविध प्रकारच्या दिनदर्शिका छपाईकामी रु.३,३८,५२,६००/- मात्रचा प्रत्यक्ष खर्च झालेला आहे.

विभागाचा अभिप्रायः- श्री साई दैनंदिनी व विविध प्रकारच्या दिनदर्शिका सन २०२० ह्या माहे सप्टेंबर-ऑक्टोंबर महिन्यात (विजयादशमी पूर्वी) छपाई होऊन विक्रीसाठी उपलब्ध होणेसाठी आतापासूनच कार्यवाही सुरू करावी लागेल.

सन-२०१९ च्या साई दैनंदिनी व विविध प्रकारच्या दिनदर्शिका खरेदी कामी साईभक्तांचा चांगला प्रतिसाद विचारात घेता, सन २०२० करीता प्रस्तावित छपाई संख्या खालीलप्रमाणे निश्चित करावी असे नम्र मत आहे. तसेच खालील तक्त्यात मागील वर्षाच्या दरामध्ये १० % वाढ धरण्यात आलेली आहे. अंदाजे छपाई दराने अपेक्षीत खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अं.नं. | तपशिल (सन २०१९) | प्रस्तावित छपाई संख्या | अंदाजे छपाई दर | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई दैनंदिनी डिलक्स -२०२० साईज-(७.५०"x९.७५") | २,२५,००० | १००/- | २,२५,००,०००/- |
| ०२ | श्री साई दैनंदिनी २०२० पॉकेट साईज (३"x ४.५०") | १,००,००० | १८/- | १८,००,०००/- |
| ०३ | श्री साई दिनदर्शिका २०२०, ०१ पानी मोठे साईज-(१९"x२९") | ३,२५,००० | २५/- | ८१,२५,०००/- |
| ०४ | श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर्स-२०२० (८ पेजेस) साईज- २२.००"x३५.००" | २०,००० | २५०/- | ५०,००,०००/- |
| ०५ | श्री साईबाबा मेटपेट वॉल कॅलेंडर्स-२०२० (७ पेजेस) साईज- १९.२५" x २७" | १५,००० | २७५/- | ४१,२५,०००/- |
| ०६ | श्री साईबाबा थ्रीडी वॉल कॅलेंडर्स-२०२० (सिंगल पेज) साईज- १९.००"x२७.००" | ३,००० | ३००/- | ९,००,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०७ | श्री साईबाबा थ्रीडी डेस्क कॅलेंडर्स -२०२० (७ पेजेस)<br>साईज- ९.७५"x०७.००" | १५,००० | १५०/- | २२,५०,०००/- |
| ०८ | श्री साईबाबा थ्रीडी डेस्क कॅलेंडर्स -२०२० (१४ पेजेसवर छपाई) साईज- ६.५०" x ९.५०" | १५,००० | ६५/- | ९,७५,०००/- |
| ०९ | श्री साईबाबा वॉल कॅलेंडर्स-२०२० (ऑफीस)<br>साईज -१९.५०" x २८.००" | १५,००० | ४०/- | ६,००,०००/- |
| १० | श्री साईबाबा वॉल कॅलेंडर्स-२०१९ (घरगुती)<br>साईज- ११.००" x १६.८०" | १५,००० | २०/- | ३,००,०००/- |
| ११ | श्री साईबाबा कार कॅलेंडर्स -२०१९<br>साईज-३.८०" x ५.५०" | २५,००० | १०/- | २,५०,०००/- |
| | | | एकूण रुपये. | ४,६८,२५,०००/- |

(अक्षरी रु. चार कोटी अडोसष्ट लाख पंचवीस हजार मात्र.)

उपरोक्त तक्त्यात नमूद केलेली अंदाजीत रक्कम ही सन-२०१९-२० चे अंदाजपत्रकात पुस्तके/फोटो/ श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईसाठी असलेल्या रु.१० कोटी अंदाजपत्रकीय तरतूदीतून खर्च करता येईल.

सबब प्रस्तावित दैनंदिनी / दिनदर्शिकांची २०२० छपाईकामी खालील बाबींवर निर्णय होणे गरजेचे आहे.

१) छपाईकामी येणा-या अंदाजे रु.४,६८,२५,०००/- मात्रच्या खर्चाबाबत...

२) जनसंपर्क कार्यालयव्दारा वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्दी करणेकामी येणा-या योग्य त्या खर्चाबाबत..

३) आय.टी विभागामार्फत संस्थान संकेतस्थळावर प्रसिध्दी करणेबाबत...

४) विहीत पध्दतीने ई-निविदा व त्यापुढील प्रक्रीया राबविणेबाबत..

५) प्रस्तावित केलेल्या श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका नगांचा शिल्लक साठा संपत आलेस आणखी २५ टक्के जादा छपाई करुन घेणे व त्याकामी येणा-या खर्चाबाबत..

प्रस्तावः- तरी विभागाच्या अभिप्रायामध्ये नमूद केलेप्रमाणे सन-२०२० चे श्री साई दैनंदिनी व विविध प्रकारच्या दिनदर्शिकाचे प्रस्तावीत छपाई संख्येस व इतर बाबींवर निर्णय होणेसाठी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.२१६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०२० ची श्री साई दैनंदिनी व विविध प्रकारच्या दिनदर्शिका संस्थानमार्फत प्रकाशित करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. ४,६८,२५,०००/- मात्रचे खर्चास तसेच प्रस्तावित केलेल्या श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका नगांचा शिल्लक साठा संपत आल्यास २५ टक्के जादा छपाई मंजुर दरात करुन घेण्यास व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

**विषय नं.४५** **रुग्णालये व श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथे आर.ओ.प्लॅन्टचे नवीन प्लंबिग कनेक्शन करीता प्लंबीग साहित्य खेरदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

| अ.नं. | कलम/ तरतुद | कलम/तरतुदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालववयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०२ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | २ (झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील. |
| ०३ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | ६ | या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियामाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील. |

मा.अध्यक्ष महोदय यांनी दि.०५.०३.२०१९ रोजी दुरध्वनीव्दारे श्रीसाईबाबा हॉस्पिटल, श्रीसाईनाथ रुग्णालय व श्रीसाईबाबा भक्तनिवास (५०० रुम) येथे आवश्यक त्या ठिकाणी तातडीने आर.ओ.प्लॅन्ट व वॉटर कुलर बसविणेबाबत सुचना केलेल्या आहेत. त्यानुसार आर.ओ.प्लॅन्ट व वॉटर कुलर बसवुन ठिक-ठिकाणी कनेक्शन काढावे लागतील. आर.ओ.प्लॅन्टमधुन निघाणारे वेस्टेज पाणी हौदात सोडणे तसेच पाण्याचे टाकीपासुन ते आर.ओ.प्लॅन्ट पर्यंत इनलेट व आऊटलेट पाईपलाईन अशा स्वरुपाची प्लंबिंग कामे करावी लागणार आहेत. त्यानुसार खालील ठिकाणी आवश्यक आर.ओ. प्लँटचे कनेक्शन व प्लंबींग करावे लागणार आहे-

| अ.क्र | ठिकाण | तपशील |
|---|---|---|
| ०१ | श्रीसाईनाथ रुग्णालय | अ) ०२ बिल्डींग २१० पॉईंट उत्तर व दक्षिण बाजू इमारत येथे आर.ओ. पॉईंट.<br>ब) सर्व ०४ ओ.टी.चे ठिकाणी तसेच ड्रेनेज पाईपलाईन हौदापर्यंत. |
| ०२ | श्रीसाईबाबा हॉस्पीटल | अ) सर्व ०६ ओ.टी., मेन जनरल वॉर्ड, ब्लड बँकेच्या पाठीमागे कॅथलॅब, एस.पी.आर, डिल्क्स, मेडिसीन वॉर्ड, ओपीडी, अधिसेविका येथे आर.ओ. पॉईँट.<br>ब) तसेच आर.ओ. मधुन निघालेले वेस्टेज पाणी हौदापर्यंत पाईपलाईन टाकणे. |
| ०३ | श्रीसाईबाबा भक्तनिवास | अ) सर्व माळ्यावरील एकूण ३२ नग व परिसर ०४ नग कुलर्स येथे आर. ओ. पॉईंट.<br>ब) तसेच ०३ आर.ओ. मधुन निघालेले वेस्टेज पाणी हौदापर्यंत पाईपलाईन टाकणे. |

त्याकामी खालील तपशिलानुसार प्लंबिंग साहित्य खरेदी करावे लागेल.

| अ.नं. | साहित्य तपशिल | साईज | कंपनी | मागणी | परिमाण | अंदाजे दर | एकुण किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | UPVC पाईप SCH-80 | 2" | फिनोलेक्स/आशिर्वाद | 4800 | फुट | 67.00 | 3,21,600/- |
| 02 | UPVC पाईप SCH-80 | 1½" | फिनोलेक्स/आशिर्वाद | 5500 | फुट | 49.00 | 2,69,500/- |
| 03 | UPVC पाईप SCH-80 | 1" | फिनोलेक्स/आशिर्वाद | 4400 | फुट | 28.00 | 1,23,200/- |
| 04 | UPVC पाईप SCH-80 | ½" | फिनोलेक्स/आशिर्वाद | 2000 | फुट | 14.00 | 28,000/- |
| 05 | UPVC एल्बो SCH-80 | 2" | फिनोलेक्स/आशिर्वाद | 150 | नग | 60.00 | 9,000/- |
| 06 | UPVC एल्बो SCH-80 | 1½" | फिनोलेक्स/आशिर्वाद | 140 | नग | 35.00 | 4,900/- |
| 07 | UPVC एल्बो SCH-80 | 1" | फिनोलेक्स/आशिर्वाद | 180 | नग | 20.00 | 3,600/- |
| 08 | UPVC एल्बो SCH-80 | ½" | फिनोलेक्स/आशिर्वाद | 400 | नग | 08.00 | 3,200/- |
| 09 | UPVC ब्रास एल्बो SCH-80 | ½" | फिनोलेक्स/आशिर्वाद | 70 | नग | 50.00 | 3,500/- |
| 10 | UPVC टी SCH-80 | 2"x1½" | फिनोलेक्स/आशिर्वाद | 20 | नग | 70.00 | 1,400/- |
| 11 | UPVC टी SCH-80 | 1½"x1" | फिनोलेक्स/आशिर्वाद | 40 | नग | 50.00 | 2,000/- |
| 12 | UPVC टी SCH-80 | 1"x½" | फिनोलेक्स/आशिर्वाद | 80 | नग | 20.00 | 1,600/- |
| 13 | UPVC रेडयुसर SCH-80 | 2"x1½" | फिनोलेक्स/आशिर्वाद | 10 | नग | 45.00 | 450/- |
| 14 | UPVC रेडयुसर SCH-80 | 1½"x1" | फिनोलेक्स/आशिर्वाद | 20 | नग | 30.00 | 600/- |
| 15 | UPVC रेडयुसर SCH-80 | 1"x½" | फिनोलेक्स/आशिर्वाद | 20 | नग | 15.00 | 300/- |
| 16 | UPVC M.T.A ब्रास SCH-80 | 2" | फिनोलेक्स/आशिर्वाद | 10 | नग | 450.00 | 4,500/- |
| 17 | UPVC M.T.A ब्रास SCH-80 | 1½" | फिनोलेक्स/आशिर्वाद | 10 | नग | 330.00 | 3,300/- |
| 18 | UPVC M.T.A ब्रास | 1" | फिनोलेक्स/आशिर्वाद | 10 | नग | 150.00 | 1,500/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | SCH-80 | | | | | | |
| 19 | UPVC M.T.A ब्रास SCH-80 | ½" | फिनोलेक्स/आशिर्वाद | 20 | नग | 70.00 | 1,400/- |
| 20 | UPVC F.T.A ब्रास SCH-80 | 2" | फिनोलेक्स/आशिर्वाद | 10 | नग | 380.00 | 3,800/- |
| 21 | UPVC F.T.A ब्रास SCH-80 | 1½" | फिनोलेक्स/आशिर्वाद | 10 | नग | 220.00 | 2,200/- |
| 22 | UPVC F.T.A ब्रास SCH-80 | 1" | फिनोलेक्स/आशिर्वाद | 10 | नग | 150.00 | 1,500/- |
| 23 | UPVC F.T.A ब्रास SCH-80 | ½" | फिनोलेक्स/आशिर्वाद | 20 | नग | 60.00 | 1,200/- |
| 24 | टेपलॉन टेप | ¾" | फिनोलेक्स/आशिर्वाद | 200 | नग | 20.00 | 4,000/- |
| 25 | UPVC बॉल व्हाल SCH-80 | 2" | फिनोलेक्स/आशिर्वाद | 40 | नग | 600.00 | 24,000/- |
| 26 | UPVC बॉल व्हाल SCH-80 | 1½" | फिनोलेक्स/आशिर्वाद | 30 | नग | 400.00 | 12,000/- |
| 27 | UPVC बॉल व्हाल SCH-80 | 1" | फिनोलेक्स/आशिर्वाद | 50 | नग | 250.00 | 12,500/- |
| 28 | UPVC बॉल व्हाल SCH-80 | ½" | फिनोलेक्स/आशिर्वाद | 75 | नग | 150.00 | 11,250/- |
| 29 | UPVC टाकी नेपल SCH-80 | 1½" | फिनोलेक्स/आशिर्वाद | 30 | नग | 70.00 | 21,00/- |
| 30 | UPVC सॉकेट SCH-80 | 2" | फिनोलेक्स/आशिर्वाद | 240 | नग | 40.00 | 9,600/- |
| 31 | UPVC सॉकेट SCH-80 | 1½" | फिनोलेक्स/आशिर्वाद | 300 | नग | 25.00 | 7,500/- |
| 32 | UPVC सॉकेट SCH-80 | 1" | फिनोलेक्स/आशिर्वाद | 220 | नग | 15.00 | 3,300/- |
| 33 | UPVC सॉकेट SCH-80 | ½" | फिनोलेक्स/आशिर्वाद | 150 | नग | 06.00 | 900/- |
| 34 | UPVC सोल्युशन SCH-80 | 237ml पॅक | फिनोलेक्स/आशिर्वाद | 65 | पॅक | 200 | 13,000/- |
| 35 | सिन्टेक्स टाकी (व्हाईट कलर, थ्री लेअर) | 2000 लिटर | सिन्टेक्स | 14 | नग | 19000 | 2,66,000/- |
| 36 | UPVC टी SCH-80 | 2"x1" | फिनोलेक्स/आशिर्वाद | 60 | नग | 80.00 | 4,800/- |
| 37 | C.P बिग कॉक | ½" | प्लंबर /जग्वार | 90 | नग | 800.00 | 72,000/- |
| 38 | UPVC (ASTM)TEE P-9 | 2" | फिनोलेक्स/आशिर्वाद | 100 | नग | 101.00 | 10,100/- |
| 39 | UPVC (ASTM)TEE P-36 | 1" | फिनोलेक्स/आशिर्वाद | 25 | नग | 32.00 | 800/- |
| | | | | | | **एकुण रक्कम रुपये-** | 12,46,100/- |

तरी उपरोक्त तपशिलाप्रमाणे आवश्यक प्लंबिंग साहित्य ई-निविदा पध्दतीने खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व याकरिता येणा-या अंदाजे रक्कम रु.१२,४६,१००/-(अक्षरी रक्कम रुपये बारा लाख सेहेचाळीस हजार शंभर मात्र) चे खर्चास मान्यता मिळणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२१७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, रुग्णालये व श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथे आर.ओ.प्लॅन्टचे नवीन प्लंबिग कनेक्शन करीता प्लंबीग साहित्य खरेदी करणेकामी खरेदी विभागामार्फत विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१२,४६,१००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभाग)

---

**विषय नं.४६ पाणी शुध्दीकरणासाठी माहे ऑगस्ट-२०१९ ते जुलै-२०२० या बारा महिन्याचे कालावधीसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेस व त्यासाठी अंदाजे रु.१७,२३,७५०/-चे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

| अ.नं. | कलम/ तरतुद क्र. | कलम/ तरतुदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्र. | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील. |
| ०२ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | २ (झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील. |
| ०३ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | ६ | या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियामाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील. |

प्रस्तावना:- संस्थानकरीता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी, कनकुरी व पिंपळवाडी या संयुक्त पाणी पुरवठा योजनेच्या मौजे कनकुरी हद्दीतील पाणी साठवण तलावातुन पाणी पुरवठा करणेत येत आहे. या ठिकाणी पाणी साठविणेसाठी चार साठवण तलावांची निर्मिती करणे आलेली असून, सदरहू चार साठवण तलावांची एकुण पाणी साठवण क्षमता ३११ एम.एल.(द.ल.लिटर) इतकी आहे. सदर साठवण तलावात जलसंपदा (इरिगेशन) विभागाकडुन गोदावरी/दारणा नदी, गोदावरी उजवा तट कालवा याव्दारे शासन मंजुरीनुसार पाणी पुरवठा आवर्तन देण्यात येत आहे. याबाबत नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडुन ५३.३२०५ एम.सी.एफ.टी वार्षिक पाणी साठा मंजुर आहे.

संस्थानचे मौजे कनकुरी, ता.राहाता येथे साठवण तलावालगत जलशुध्दीकरण केंद्र असून, साठवण तलावातील पाणी शुध्द करणेसाठी ब्लीचिंग पावडर (विक्रम ब्रॅन्ड, ग्रासिम मेक, डी.सी.एच. (डी.एस.सी.एल.), आय.एस.आय मार्क, ३४% क्लोरीन उपलब्ध), फेरीक ॲलम (१६% ॲलोमिना फेरीक उपलब्ध) व क्लोरीन गॅस सिलेंडर यांची दैनदिन आवश्यकता भासते.

मागील वर्षी साठवण तलावातील पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर इ. साहित्य ई-निविदा मागवून खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रु.१६,२२,५००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२/०५/२०१८ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

यावर मा.व्यवस्थापन समिती सभा दि. ०२/०५/२०१८, निर्णय क्रं.३१७ खालीलप्रमाणे पारित करणेत आलेला होता.

"...यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्ताव मान्य करण्यात आला ."

याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.४९०-३ अन्वये मे.शिवम एंटरप्रायजेस, उस्मानाबाद यांना जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/२२७०/२०१८, दि.०७/०८/२०१८ अन्वये क्लोरीन गॅस सिलेंडर (१०० किलोचे ४५ नग ) रु.४,०००/- प्रती सिलेंडर (जी.एस.टी. सह ) एक वर्ष कालावधीसाठी पुरवठा करणेकामी आदेश देण्यात आला. तर मे.अलमायटी केमिकल्स, नाशिक यांना जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/२२७१/२०१८, दि.०७/०८/२०१८ अन्वये ब्लिचिंग पावडर रु.२७,४४०/- प्रती टन

(जी.एस.टी. सह) या दराने ३५ मे.टन व फेरीक ॲलम रु.६,९९९/- प्रती टन (जी.एस.टी. सह) या दराने ५५ मे.टन करीता सदरहू पुरवठाधारकांना एक वर्ष कालावधीसाठी पुरवठा आदेश देणेत आलेला आहे. सदरहु कालावधी माहे जुलै २०१९ अखेर असुन त्यानंतर पुढील कालावधीसाठी नव्याने खरेदी प्रक्रिया राबवावी लागणार आहे.

कनकुरी साठवण तलाव येथे पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर इ. मटेरियलचा माहे ऑगस्ट -२०१८ ते मार्च २०१९ या कालावधीत झालेला खर्च तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | माहे जुलै २०१८ अखेर विभागाकडील शिल्लक | मागणी करण्यात आलेले मटेरियल | माहे मार्च २०१९ अखेर खर्च | विभागाकडील शिल्लक मार्च २०१९ अखेर | मागणी येणे बाकी |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ब्लीचिंग पावडर | ०.५७५ मे.टन | २१.५०० मे.टन | १८.६२५ मे.टन | ३.४५०० मे.टन | १३.५०० मे.टन |
| ०२ | फेरीक ॲलम | ३.०६० मे.टन | ३७.९९० मे.टन | ३०.७६० मे.टन | १०.२९० मे.टन | १७.०१० मे.टन |
| ०३ | क्लोरीन गॅस सिलेंडर (प्रत्येकी १०० किलो वजन) | ०२ सिलेंडर | ३० सिलेंडर | २६ सिलेंडर | ०६ सिलेंडर | १५ सिलेंडर |

माहे एप्रिल ते जुलै या कालावधीत जलसंपदा (पाटबंधारे) विभागाकडुन पुरविण्यात येणारे पाणी हे जादा प्रमाणात दुषित, गाळ मिश्रीत व पाण्याला वास येत असलेने या कालावधीत पाणी शुध्दीकरणांसाठी जादा प्रमाणात मटेरियलचा वापर करावा लागतो.

प्रस्ताव:- माहे ऑगस्ट -२०१९ ते जुलै-२०२० या पुढील १२ (बारा) महिन्यांचे कालावधीसाठी पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर इ. मटेरियलचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | खरेदी करावयाच्या साहित्याचा तपशिल | आवश्यकता | अंदाजे दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | ब्लीचिंग पावडर (विक्रम ब्रॅन्ड, ग्रासिम मेक, डी.सी.एच. (डी.एस.सी.एल.), आय.एस.आय मार्क, ३४% क्लोरीन उपलब्ध) | ३५ मे.टन | रु.२८,९००/- प्रती मे.टन (सर्वसमावेशक दर) | १०,११,५००.०० |
| ०२ | फेरीक ॲलम (१६% ॲलोमिना फेरीक उपलब्ध) | ५५ मे.टन | रु.८,०००/- प्रती मे.टन (सर्वसमावेशक दर) | ४,४०,०००.०० |
| ०३ | क्लोरीन गॅस सिलेंडर (प्रत्येकी १०० किलो वजन) | ४५ सिलेंडर | रु.६,०५० प्रती सिलेंडर (सर्वसमावेशक दर) | २,७२,२५०.०० |
| | | | एकुण रक्कम:- | १७,२३,७५०.०० |

विभागाचा अभिप्राय:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ नुसार वरील नमुद तरतुदीस अनुसरुन मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेवून खरेदी विभागामार्फत माहे ऑगस्ट -२०१९ ते जुलै-२०२० या पुढील १२ (बारा) महिन्यांचे कालावधीसाठी पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेसाठी ई-निविदा प्रक्रिया राबवून मटेरियल खरेदी करता येईल असे नम्र मत आहे.

वरील नमुद केलेनुसार पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक मटेरियल खरेदी करणेसाठी अंदाजे रु. १७,२३,७५०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तरी सदरचे साहित्य ई-निविदा मागवून खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रु. १७,२३,७५०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२१८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, पाणी शुध्दीकरणासाठी माहे ऑगस्ट-२०१९ ते जुलै-२०२० या बारा महिन्याचे कालावधीसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेकामी खरेदी विभागामार्फत विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१७,२३,७५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग)**

---

**विषय नं.४७ डोऱ्हाळे गावाकरीता संस्थानमार्फत पाणी पुरवठा करणेचे मागणी बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-

| अ.नं. | कलम/ तरतुद क्र. | कलम/ तरतुदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्र. | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | २ (ण) | मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल |

प्रस्तावना:- श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेची पाणी पुरवठा योजना २५ वर्षे पुर्वीची आहे. त्या वेळेस संस्थानचा विस्तार मर्यादित असल्याने पाणी पुरवठा सुरळीत होत असे. सध्या संस्थानचे साईआश्रम, साईधर्मशाळा, श्री साईबाबा रुग्णालये तसेच शैक्षणिक संकुल या विभागांचा झालेला विस्तार व दिवसेंदिवस साईभक्तांची वाढती संख्या यामुळे आपल्याकडे उपलब्ध असलेल्या फिल्टर प्लँटची क्षमता कमी झालेली असुन २४ तास पंप चालवुन देखील पुरेसा पाणी पुरवठा होत नाही.

सद्यस्थितीत संस्थानचा दैनंदिन पाणी वापर हा अंदाजे सरासरी ३५ ते ४० लाख लिटर इतका झालेला आहे. गर्दीचे कालावधीत यामध्ये सरासरी अंदाजे ४० लाख ते ४५ लाख लिटर पर्यंत वाढ होत आहे. संस्थानचे उपलब्ध चार साठवण तलावांची पाणी साठवण क्षमता ३११ द.ल.लिटर असून यातील पाणी साठा हा अंदाजे ४५ ते ५० दिवस पुरतो.

प्रस्ताव:- गटविकास अधिकारी, पंचायत समिती राहाता, जा.क्रं.वशि/टंचाई/४३०/२०१९, दि.१३/०५/२०१९ रोजीचे व दि.१०/०५/२०१९ रोजीचे सरपंच व ग्रामसेवक ग्रामपंचायत डो-हाळे यांचे पत्र संस्थान कार्यालयास प्राप्त झालेले आहे. सदरहु पत्रात नमुद केलेनुसार पंचायत समिती राहाता अधिनस्त मौजे डो-हाळे येथे कनकुरी शिवारात ग्रामपंचायत डो-हाळे यांची पाणी पुरवठा योजनेची विहीर आहे. सदर विहीर संस्थानचे साठवण तलावाजवळ असून, संस्थानमार्फत सदर साठवण तलावास कागदी अस्तरीकरण करण्यात आल्यामुळे ग्रामपंचायतच्या विहीरीस मागील दोन वर्षापासून पाण्याचा पाझर होत नाही. त्यामुळे गावात प्रचंड पाणी टंचाई निर्माण झालेली आहे. सध्याच्या पाणी टंचाई काळात ग्रामपंचायत कडील विहीरीस संस्थान साठवण तलावातुन प्रतीदिन ५०००० लिटर पाणी मिळाल्यास गावाची पाणी टंचाई दुर होण्यास मदत होणार याहे. याबाबत मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचेशी दि.१०/०५/२०१९ रोजी व्हिडिओ कॉन्फरन्सव्दारे संवाद झालेला असून ग्रामपंचायतकडील २०० फुट अंतरावरील विहीरीस संस्थानचे साठवण तलावातुन प्रतीदिन ५०००० लिटर पाणी देणेबाबत कार्यवाही करावी असे नमुद करण्यात आलेले आहे.

विभागाचा अभिप्राय:- संस्थानकरीता पाटबंधारे (जलसंपदा) विभागाकडुन माहे फेब्रुवारी २०१९ मध्ये गोदावरी उजवा तट कालवा याव्दारे पाणी रोटेशन (आवर्तन) देण्यात आलेले होते. जलसंपदा विभागाकडुन सदरहू पाणी पुढील दोन महिने पुरेल असे पाण्याचे नियोजन करणेबाबत सुचित करणेत आलेने यावर उपाय-योजना म्हणून संस्थान इमारती मधील बहुतांशी पाणी कनेक्शन बंद करण्यात येवून फक्त आवश्यक त्या ठिकाणचे पाणी कनेक्शन सुरु ठेवणेत आले. तसेच संस्थानचे कर्मचारी निवासस्थान येथे दिवसाआड १/२ तास पाणी सोडण्यात येत आहे. संस्थानकडुन पाणी पुरविण्यात येणा-या कर्मचारी हौसिंग सोसायटी, शिर्डी पोलिस स्टेशन, शासकिय विश्रामगृह शिर्डी, ग्रामपंचायत कनकुरी व ग्रामपंचायत पिंपळवाडी यांना करण्यात येणारा पाणी पुरवठा पुर्णपणे बंद करण्यात आलेला आहे. संस्थानकरीता पाणी टंचाई जाणवू नये यासाठी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडील पाणी योजनेतून संस्थानकरीता दररोज अंदाजे ५ लाख लिटर पाणी उपलब्ध होणेसाठी मागणी करण्यात आलेली होती. परंतू त्यांचेकडुन दररोज अंदाजे दीड लाख लिटर पाणी संस्थानचे साईआश्रम भक्तनिवास इमारतीकरीता उपलब्ध करुन देण्यात आले.

माहे फेब्रुवारी २०१९ नंतर पाटबंधारे (जलसंपदा) विभागाकडुन दि.१८/०५/२०१९ रोजी संस्थान साठवण तलावात पाणी सोडण्यात आलेले आहे. पाटबंधारे (जलसंपदा) विभागाकडुन दोन महिन्यातुन रोटेशन (आवर्तन) उपलब्ध होत आहे.

जलसंपदा विभागाकडील आवर्तन कालावधी विचारात घेता, संस्थानकडील उपलब्ध पाणी साठा हा संस्थानकरीता अपुरा पडत असून शिर्डी येथे येणा-या साईभक्तांना पाण्याची टंचाई भासु नये यासाठी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचेकडुन पाणी उपलब्ध करुन घ्यावे लागत आहे. ग्रामपंचायत डो-हाळे यांचेकडुन प्रतीदिन ५०००० लिटर पाणी उपलब्ध करुन देणेबाबत मागणी करणेत आलेली असून त्यांचेप्रमाणे इतर गावांकडुनही

पाण्याची मागणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, शिर्डी नगरपंचायत व कोपरगांव नगरपालिका यांचे संयुक्त पाणी पुरवठा योजना कार्यान्वित होणेसाठी बराच कालावधी लागणार आहे.

प्रस्तुत प्रकरणी श्री डांगे, डो-हाळे ग्रामस्थ यांनी समक्ष हजर होवून २५००० लिटर पाणी आवश्यक असल्याचे तोंडी सांगितले. यावर ग्रामपंचायत डो-हाळे यांना गावात पाणी टंचाई निर्माण झाल्याने सध्याच्या पाणी टंचाई काळात ग्रामपंचायत कडील विहीरीस संस्थान साठवण तलावातुन आवश्यकतेनुसार प्रतीदिन २५००० लिटर पाणी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने उपलब्ध करुन देण्यात आलेले असून यास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२१९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, ग्रामपंचायत डो-हाळे यांना गावात पाणी टंचाई निर्माण झाल्याने सध्याच्या पाणी टंचाई काळात ग्रामपंचायत कडील विहीरीस संस्थान साठवण तलावातुन आवश्यकतेनुसार प्रती दिन २५००० लिटर पाणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने उपलब्ध करुन देण्यात आलेले असून त्यास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग)**

---

**विषय नं.४८** **मे.रिलायन्स जिओ इन्फोकॉम लि.यांचेकडून प्राप्त झालेल्या विविध प्रस्तावांबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद :- कलम २१ (१) ग नुसार भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.: -नाही.

प्रास्ताविक: -मे. रिलायन्स जिओ इन्फोकॉम लि., यांचे प्रतिनिधींनी शिर्डी येथे येऊन तत्कालीन उपजिल्हाधिकारी, मुख्यलेखाधिकारी यांची समक्ष भेट घेऊन, त्यांचेमार्फत श्री साईबाबा संस्थान येथे विविध सुविधा सुरू करणेबाबत इच्छा प्रदर्शित केली होती. सदरच्या सुविधा सुरू करणेकामी विविध प्रस्ताव त्यांचेमार्फत लेखाशाखा विभाग व माहिती तंत्रज्ञान विभागास प्राप्त झालेले आहेत.

सदर प्रस्तावांपैकी संस्थान आवक क्र.१९३२३ दि.२४.१२.२०१८ व आ.क्र.५४ दि.०१.०४.२०१९ हे प्रस्ताव लेखाशाखा विभागामार्फत तांत्रिक स्वरुपाचे विषय असल्याने इकडील विभागाकडे वर्ग करणेत आलेले आहेत.

मे.रिलायन्स जिओ इन्फोकॉम लि.,यांचेकडून प्राप्त झालेले प्रस्तावांमध्ये प्रामुख्याने पुढील बाबींचा समावेश आढळून येतो.

१. लाईव्हदर्शन:-उच्च क्षमतेच्या इंटरनेट कनेक्शनद्वारे त्यांचे Jio Giga TV, My Jio Apps व इतर Jio डिजीटल माध्यमांद्वारे साईभक्तांना श्रींचे लाईव्ह दर्शन उपलब्ध करुन देणे.

२. Jio Money / Payments Bank :-सदर सुविधेद्वारे जगभरातील कोणीही साईभक्त श्री साईबाबा संस्थानमार्फत उपलब्ध सुविधा उदा. दर्शनपास, अन्नदानासाठी देणगीइ. चा लाभ घेऊ शकेल.

३. इंटरनेटसुविधा:-सदर प्रस्तावामध्ये मे.रिलायन्स जिओ इन्फोकॉम लि., यांनी संस्थानसाठी उच्च क्षमतेचे इंटरनेट सुविधा उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविलेली आहे. याकामी प्रत्यक्ष इंटरनेट वापराप्रमाणे रक्कम संस्थानला अदा करावी लागणार आहे.

४. क्लाऊडस्टोरेज (Jio Cloud) :-सदर सुविधे अंतर्गत संस्थानचा सर्व डेटा उदा.CCTV फुटेज त्यांचे क्लाऊडसर्व्हरवर स्टोअर करण्याची त्यांनी तयारी दर्शविलेली आहे.

५. जिओटिव्ही:-सदर सुविधे अंतर्गत श्री साईबाबा संस्थानसाठी स्वतंत्र टिव्ही चॅनेल सुरू करुन त्याद्वारे श्री साईबाबांचे लाईव्ह दर्शन व इतर कार्यक्रमांचे थेट प्रक्षेपण त्यांचे ग्राहकांना उपलब्ध करुन देणे.

६. जिओसिनेमा (Jio Talks) :- सदर सुविधे अंतर्गत स्वतंत्र चॅनेल सुरू करुन त्याद्वारे विविध धार्मिक चित्रपट रिलायन्स जिओ ग्राहकांसाठी उपलब्ध करुन देणे.

७. ऑडीओजिओ (Music) :-सदर सुविधे अंतर्गत साई मंदिरात ध्वनिक्षेपीत करणेत येणारे भक्ती गिते व इतर भावगिते जिओ ग्राहकांसाठी उपलब्ध करुन देणे.

८. जिओचॅट :-सदर सुविधे अंतर्गत साईभक्त तसेच संस्थान प्रशासनास Text, Audio, Video चॅटींग सुविधा जिओचॅट द्वारो उपलब्ध करुन देणे तसेच विविध उत्सवांचे थेट प्रक्षेपण करणे.

९. Educational Magazine (Jio Magazine) :-संस्थानमार्फत प्रकाशित करणेत येत असलेल्या साईलिला मासिकाचे त्यांचे Jio Magazine या चॅनेलद्वारे विविध भाषांमध्ये प्रकाशन करणे.

उपरोक्त प्रमाणे मे.रिलायन्स जिओइन्फोकॉम लि.,यांनी संस्थान व साईभक्तांसाठी विविध डिजीटल सुविधा उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविलेली आहे. सद्यस्थितीत संस्थानमार्फत प्रचलीत पद्धतीनुसार ई-निविदा प्रक्रिया राबवून श्रींचे लाईव्ह दर्शन सुविधा उच्चत्तमदरधारक मे.टाटाकम्युनिकेशन लि.मुंबई व असोसिएटेड बोर्डकास्टींग को.प्रा.लि.हैद्राबाद (TV9) यांना दि.०१.०६.२०१७ ते दि.३१.०५.२०२० या ०३ वर्षाच्या कालावधीसाठी उपलब्ध करुन देणेत आलेले आहे.

श्री साईबाबा संस्थानमार्फत उपलब्ध सुविधांचा लाभ साईभक्तांना इंटरनेटद्वारे घेता यावा, याकरीता साईटेकप्रकल्पा अंतगर्तंत online.sai.org.in हि वेबसाईट विकसीत करुन कार्यान्वीत करणेत आलेली आहे. सदरचे वेबसाईटला साईभक्तांचा लक्षणीय प्रतिसाद मिळत आहे. सदर वेबसाईटद्वारे सुविधांचा लाभ घेणेसाठी याकामी भरावयाची रक्कम संस्थानखाती जमाकरणेसाठी सद्यस्थितीत HDFC बँकेमार्फत पेमेंट गेटवे व नेट बँकींग सुविधा उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. तसेच भविष्यात स्टेट बँक ऑफ इंडिया व देना बँक यांचे ही पेमेंट गेट वे व नेट बँकींग सुविधा वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. तसेच संस्थानमार्फत प्रकाशित साईलीला द्वैमासिकांसह इतर सर्व प्रकाशने साईभक्तांकरीता संस्थानचेअधिकृतवेबसाईट sai.org.in वरउपलब्ध करुन देणेत येतात.

मे.रिलायन्स जियो यांनी संदर्भीय प्रस्तावाद्वारे साईबाबा संस्थानसाठी विविध सुविधा उपलब्ध करुन देणेची तयारी दर्शविलेली आहे. परंतू नमुद केले प्रमाणे श्रींचे लाईव्हदर्शन Tata Sky व TV9 वर आणि संस्थानमार्फत उपलब्ध सुविधांचा लाभ साईभक्तांना इंटरनेटद्वारे घेता यावा याकरीता online.sai.org.in हि वेबसाईट कार्यान्वीत करणेत आलेली आहे.

मे.रिलायन्स जियो यांनी सादर केलेल्या प्रस्तावांबाबत निर्णय होणेकामी याबाबत एक सविस्तर सादरीकरण मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

मागणी : -प्रास्ताविकेत नमुद केले प्रमाणे मे.रिलायन्स जियो यांनी सादर केलेल्या प्रस्तावांबाबत निर्णय होणेकामी त्यांचे मार्फत सदर प्रस्तावांबाबत सविस्तर सादरीकरण करणेकामी त्यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर बोलविणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम/ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:- तांत्रिक, प्रशासकीय

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत: -मे.रिलायन्स जियो यांनी सादर केलेल्या प्रस्तावांबाबत निर्णय होणेकामी त्यांचेमार्फत सदर प्रस्तावांबाबत सविस्तर सादरीकरण करणेकामी त्यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर बोलविणेस सविनय सादर.

**निर्णय क्र.२२०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणी पडताळणी करुन फेर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.४९** **"ऑनलाईन सर्व्हिसेस" (online.sai.org.in) या संकेतस्थळावरुन संस्थानचे निवासस्थानामध्ये रुम आरक्षित केलेल्या साईभक्तांचे रुम आरक्षण रद्द करुन सदरची रक्कम त्यांना ऑनलाईन परत करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद :- कलम २१ (१) ग नुसार भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्राथनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य/समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं. :- नाही.

प्रास्तविक :- श्री साईबाबा संस्थानमार्फत उपलब्ध असलेल्या सुविधांचा लाभ साईभक्तांना इंटरनेटव्दारे घेता यावा, याकरीता साईटेक प्रकल्पांतर्गत "ऑनलाईन सर्व्हिसेस" (online.sai.org.in) हे संकेतस्थळ विकसीत करुन कार्यान्वीत करणेत आलेले आहे. सदर संकेतस्थळाव्दारे साईभक्त शिर्डी येथे येण्याअगोदर त्यांचे निवासाकरीता रुम आरक्षण, दर्शनपास आरक्षणतसेचदेणगी इ. सुविधांचा लाभ इंटरनेटव्दारे घेतात. सद्यस्थितीत सदर संकेतस्थळावरुन आरक्षीत केलेली कोणतीही सुविधा साईभक्ताने रद्द केल्यास सदर सुविधेसाठीची त्याने संस्थानखाती ऑनलाईन जमा केलेली रक्कम त्याला परत करणेत येत नाही.

नुकतेच ओरीसा येथे दि. ०३ मे, २०१९ रोजी फनी या चक्रीवादळासारखी नैसर्गीक आपत्ती निर्माण झालेली होती. सदर नैसर्गीक आपत्तीमुळे तेथील जन-जीवन विस्कळीत झालेले आहे. साईभक्त श्री नविन कुमार

परीदा व रंजीता समंतरॉय यांनी याच कालावधीमध्ये शिर्डी येथे श्रींचे दर्शनासाठी येण्याचे असल्याने संस्थानचे online.sai.org.inया वेबसाईटद्वारे रुम आरक्षीत केले असल्याचे त्यांनी ई-मेलद्वारेकळविलेले आहे. परंतू उद्भवलेल्या नैसर्गीक आपत्तीमुळे त्यांना शिर्डी येथे येणे शक्य होणार नाही असे कळविलेले आहे. तसेच ई-मेलद्वारे त्यांनी अचानक उद्भवलेल्या नैसर्गीक आपत्तीचा विचार करतात्यांचेमार्फत आरक्षीत केलेल्या रुमचे आरक्षण रद्द करणेत येऊन याकामी त्यांचे खात्यामधून संस्थानखाती जमा झालेली रक्कम त्यांना परत मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

सदरचे ई-मेलनुसार साईभक्तांनी आरक्षीत केलेल्या रुमचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

१. श्री नविन कुमार परीदा यांनी दि.०५ मे, २०१९ ते दि.०९ मे,२०१९ या कालावधीकरीता साईआश्रम भक्तनिवासस्थान येथे ०२ वातानुकूलीत खोल्या आरक्षीत केलेल्या असून यासाठीचे प्रती रुम प्रती दिन रुपये १,०००/-प्रमाणे एकूण रक्कम रुपये ४,०००/- मात्र संस्थानखाती जमा झालेले आहेत.

२. रंजीता समंतरॉय यांनी दि.१२ मे, २०१९ ते दि.१४ मे,२०१९ या कालावधीकरीता साईआश्रम भक्तनिवासस्थान येथे ०२ वातानुकुलीत खोल्या आरक्षीत केलेल्या असून यासाठीचे प्रती रुम प्रती दिन रुपये १,०००/- प्रमाणे एकूण रक्कम रुपये २,०००/- मात्र संस्थानखाती जमा झालेले आहेत.

उपरोक्तप्रमाणे साईभक्तांनी "ऑनलाईन सर्व्हिसेस" (online.sai.org.in) हे संकेतस्थळाव्दारे आरक्षीत केलेल्या कोणत्याही सुविधेपोटी संस्थानखाती जमा झालेली रक्कम सदरचे आरक्षण रद्द केल्यास रक्कम परताव्याची सुविधा उपलब्ध नसली तरी नैसर्गीक आपत्तीचा विचार करता अपवादात्मक परिस्थीती म्हणून साईभक्ताने विनंती केलेप्रमाणे त्यांचे रुम आरक्षण रद्द करुन सदरची रक्कम त्यांना परत मिळणेकामी मान्यता मिळणेसाठी सादर करणेत आलेल्या इकडील विभागाचे टिपणीवर "धोरणात्मक बाब असल्याने सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर ठेवण्यात यावा"असे निर्देश दिलेले आहेत.

सदरचे टिपणीवर देणेत आलेल्या निर्देशाप्रमाणे "ऑनलाईन सर्व्हिसेस" (online.sai.org.in) ह्या संकेतस्थळाद्वारे आरक्षीत केलेल्या सुविधा रद्द केलेनंतर याकामीची रक्कम परताव्याची सुविधा उपलब्ध नसली तरी साईभक्तांनी विनंती केलेप्रमाणे नुकत्याच ओरिसा येथे आलेल्या "फनी" चक्री-वादळासारख्या आकस्मिक नैसर्गिक संकटाचा विचार करता, सदर साईभक्तांचे आरक्षण रद्द करुन याकामी त्यांचे खात्यामधून श्री साईबाबा संस्थानचे खाती जमा झालेली रक्कम त्यांना ऑनलाईन परत करणे तसेच यापुढेही भविष्यातअशाप्रकारची आकस्मिक नैसर्गिक परिस्थिती निर्माण झाल्यास या कालावधीत संस्थानचे वेबसाईटद्वारे रुम व दर्शन/आरतीपास आरक्षीत केलेल्या सदर भागातील साईभक्तांचे आरक्षण रद्द करुन याकामी त्यांनी संस्थानखाती ऑनलाईन जमा केलेली रक्कम त्यांचेमार्फत सदर रक्कमेच्या परताव्याची मागणी केल्यास त्यांना अपवादात्मक बाब म्हणून प्रशासकीय मान्यतेने परत करणेबाबत धोरणात्मक निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

मागणीः- प्रास्तविकेत नमुद केलेप्रमाणे माहिती तंत्रज्ञान विभागाने सादर केलेल्या टिपणीवर देणेत आलेल्या निर्देशाप्रमाणे "ऑनलाईन सर्व्हिसेस" (online.sai.org.in) ह्या संकेतस्थळाद्वारे आरक्षीत केलेल्या सुविधा रद्द केलेनंतर याकामीची रक्कम परताव्याची सुविधा उपलब्ध नसली तरी साईभक्तांनी विनंती केलेप्रमाणे नुकत्याच ओरिसा येथे आलेल्या "फनी" चक्री-वादळासारख्या आकस्मिक नैसर्गिक संकटाचा विचार करता, सदर साईभक्तांचे आरक्षण रद्द करुन याकामी त्यांचे खात्यामधून श्री साईबाबा संस्थानचे खाती जमा झालेली रक्कम त्यांना ऑनलाईन परत करणेस तसेच यापुढेही भविष्यातअशाप्रकारची आकस्मिक नैसर्गिक परिस्थिती निर्माण झाल्यास या कालावधीत संस्थानचे वेबसाईटद्वारे रुम व दर्शन/आरतीपास आरक्षीत केलेल्या सदर भागातील साईभक्तांचे आरक्षण रद्द करुन याकामी त्यांनी संस्थानखाती ऑनलाईन जमा केलेली रक्कम त्यांचेमार्फत सदर रक्कमेच्या परताव्याची मागणी केल्यास त्यांना अपवादात्मक बाब म्हणून प्रशासकीय मान्यतेने परत करणेबाबत धोरणात्मक निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :- आर्थिक, तांत्रिक व प्रशासकीय

विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत :-माहिती तंत्रज्ञान विभागाने सादर केलेल्या टिपणीवर देणेत आलेल्यानिर्देशाप्रमाणे "ऑनलाईन सर्व्हिसेस" (online.sai.org.in) ह्या संकेतस्थळाद्वारे आरक्षीत केलेल्या सुविधा रद्द केलेनंतर याकामीची रक्कम परताव्याची सुविधा उपलब्ध नसली तरी साईभक्तांनी विनंती केलेप्रमाणे नुकत्याच ओरिसा येथे आलेल्या "फनी" चक्री-वादळासारख्या आकस्मिक नैसर्गिक संकटाचा विचार करता, सदर

साईभक्तांचे आरक्षण रद्द करुन याकामी त्यांचे खात्यामधून श्री साईबाबा संस्थानचे खाती जमा झालेली रक्कम त्यांना ऑनलाईन परत करणेच्या तसेच यापुढेही भविष्यातअशाप्रकारची आकस्मिक नैसर्गिक परिस्थिती निर्माण झाल्यास या कालावधीत संस्थानचे वेबसाईटद्वारे रुम व दर्शन/आरतीपास आरक्षीत केलेल्या सदर भागातील साईभक्तांचे आरक्षण रद्द करुन याकामी त्यांनी संस्थानखाती ऑनलाईन जमा केलेली रक्कम त्यांचेमार्फत सदर रक्कमेच्या परताव्याची मागणी केल्यास त्यांना अपवादात्मक बाब म्हणून प्रशासकीय मान्यतेने परत करणेबाबत धोरणात्मक निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.२२१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, फक्त अपरिहार्य प्रकरणात मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने "ऑनलाईन सर्व्हिसेस" (online.sai.org.in) या संकेतस्थळावरुन संस्थानचे निवासस्थानामध्ये रुम आरक्षित केलेल्या साईभक्तांचे रुम आरक्षण रद्द करुन सदरची रक्कम त्यांना ऑनलाईन परत करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.५०** **नवीन १५ प्रवासी बसेसचा वार्षिक टॅक्स भरणेकामी येणाऱ्या खर्चास तसेच सदर रक्कम लेखाशाखेमार्फत ऑनलाईन भरणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासन अधिनियम-२००४ मधील तरतुदः-

१) कलम १७ (१) मध्ये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व व कामाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, भक्तगंणांना आवश्यकत्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये, विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करणेसाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील" असे नमुद केलेले आहे.

२) कलम २१ (१)(ज)मध्ये, विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधीन राहून,त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये विश्वस्तव्यवस्थेकडून देय असलेले कोणतेही कर, भाडे, भरपाई, आकार व इतर रकमा यांचे प्रदान करण्यात येईल, नमुद केलेले आहे.

प्रस्तावनाः- दि चे २०१८/०६/०१.मापन समितीचे सभेतील निर्णय व खरेदी नियमानुसारवस्थाव्य., साईभक्तांच्या सुविधेकरीता १०, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील मुलींसाठी ५ अशा एकुण १५ नवीन प्रवासी बसेस खरेदी करण्यात आलेल्या आहेत. सदर वाहनांच्या वार्षिक टॅक्सची मुदत दि.३०/०९/२०१९ रोजी संपुष्टात येत आहे. या बसचा पुढील दि.०१/१०/२०१९ ते दि.३०/०९/२०२० या एक वर्ष कालावधी करीता प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे नियमानुसार १५ प्रवासी बसेसचे वार्षिक टॅक्स भरणे कामी खालील प्रमाणे खर्च येणार आहे.

| अ.नं. | तपशिल | टॅक्स रक्कम | प्रति बस आसन क्षमता | प्रति बस टॅक्स | बस संख्या | एकुण वार्षिक टॅक्सरक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | वार्षिक टॅक्स | १९००/- प्रति सिट | ५० सिट | ९५,०००/- | १५ बस | १४,२५,०००/- |

विभागाचा अभिप्रायः- सध्या आर.टी.ओ. कार्यालयातील वाहनाच्या टॅक्सची रक्कम भरणेची कामे ऑनलाईन झालेली असलेने सदरची रक्कम त्यांचे संकेतस्थळावर ऑनलाईन भरावी लागणार आहे. उपरोक्त प्रमाणे नवीन १५ प्रवासी बसेसच्या वार्षिक टॅक्सची एकुण रक्कम रु.१४,२५,०००/- (अक्षरी रु. चौदा लाख पंचवीस हजार मात्र) लेखाशाखा विभागामार्फत संस्थानचे बचत खात्यामधील रक्कमेतुन संस्थानचेच भारतीय स्टेट बँक, शाखा-शिर्डीचे ऑनलाईन भरणा करणे कामी असलेला खाते नंबर 32444777814 मध्ये वर्ग करण्यात येऊन या खात्यातुन सदर रक्कम उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, श्रीरामपुर यांचेकडे ऑनलाईनद्वारे भरणा करावी लागणार आहे. सदर खर्च मोटारकार कर व भाडे या अंदाजपत्रकातुन करता येईल.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी / शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमानः- महाराष्ट्र शासनाचे प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे नियमानुसार वार्षिक टॅक्स भरणे आवश्यक असुन सदर बाब आर्थिक स्वरुपाची आहे.

मागणीः- तरी उपरोक्त प्रमाणे १५ प्रवासी बसेसचा दि.०१/१०/२०१९ ते दि.३०/०९/२०२० या एक वर्ष कालावधी करीता वार्षिक टॅक्स भरणे व या कामी येणा-या एकुण रक्कम रु.१४,२५,०००/- (अक्षरी रु. चौदा लाख पंचवीस हजार मात्र) चे खर्चास मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२२२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, नवीन १५ प्रवासी बसेसचा वार्षिक टॅक्स भरणेस व याकामी येणाऱ्या खर्चाची रक्कम रु.१४,२५,०००/-मात्र लेखाशाखेमार्फत उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, श्रीरामपुर यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- वाहन विभाग)**

---

विषय नं.५१ **साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा विभागाकडील बेडशीट, उशी कव्हर, धुणे / इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, चादर धुणे, गादीच्या खोळी धुणे व भक्तांचे कपडे शुल्क आकारुन धुणे / इस्त्री करणेकामी वर्तमानपत्रात ई-निविदा जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४:- २१ (१) (ग) " भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धर्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे." व (२) पोट-कलम (१) (ख) " भक्तांना राहण्याकरिता व वापर करण्याकरिता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे."

प्रस्तावनाः- श्रींचे दर्शनासाठी राज्यभरातून, देशभरातून, देश विदेशातून येणा-या साईभक्तांचेनिवासाचे सोयीसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी मार्फत साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या विभागात साईभक्तांची निवासव्यवस्था करण्यात येते. या विभागातील निवासी साईभक्तांना अधिकाधिक चांगली सेवा सुविधा उपलब्ध व्हावी याकरीता साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागातील बेडशीट, उशी कव्हर धूणे/इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, चादर धुणे, गादीच्या खोळी धुणे व भक्तांचे कपडे शुल्क आकारुन धूणे/इस्त्री करणेचे कामे आऊटसोर्स लॉण्ड्री ठेकेदाराकडून करुन घेतले जातात.

सन २०१८-१९मधील दि.०१/०८/२०१८ ते दि.३१/०७/२०१९ अखेरएक वर्षासाठी साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागातील लॉन्ड्री कामाचामा.व्यवस्थापन समिती दि.३०/०६/२०१८ रोजीचे सभेतील विषय नं.०१ निर्णय क्र.४४१(१७) अन्वये द लॉण्ड्री सेंटर,नाशिक व साईश्रध्दा लॉन्ड्री ॲन्ड सर्व्हिसेस, सावळीविहीरयांनाअनुक्रमे जा.नं.एसएसएस/वशी-साईआश्रम भक्तनिवास/१८४२/२०१८ दि.१७/०७/२०१८ ने द लॉण्ड्री सेंटर,नाशिक यांना व जा.नं.एसएसएस/वशी-साईआश्रम भक्तनिवास/१९११/२०१८ दि.१८/०७/२०१८ ने साईश्रध्दा लॉण्ड्री सावळीविहीर यांनाखालील कोष्टकात दर्शविले प्रमाणे कार्यादेश देण्यात आलेला आहे.

**१) द लॉण्ड्री सेंटर नाशिक**

अ) संस्थानचे कपडे धुणे इस्त्री करणे कामासाठीचे दर.

| अ.नं | कपड्यांचा तपशील | मुळ प्रती नग दर रुपये पैसे | GST 18% | प्रती नग दर रुपये (सर्वकरासह) |
|---|---|---|---|---|
| १ | बेडशीट धुवून इस्त्री करणे | ४.०० | ०.७२ | ४.७२ |
| २ | उशी कव्हर धुवून इस्त्री करणे | २.०० | ०.३६ | २.३६ |
| ३ | सोलापूर चादर धुणे | ७.०० | १.२६ | ८.२६ |
| ४ | चादर धुणे | ६.०० | १.०८ | ७.०८ |
| ५ | गादीच्या खोळी धुणे | ६.०० | १.०८ | ७.०८ |

**२) साईश्रध्दा लॉन्ड्री ॲन्ड सर्व्हिसेस, सावळीविहीर.**

अ) संस्थानचे कपड्यासाठी दर

| अनं. | कपड्यांचा तपशील | मुळ प्रती नग दर रुपये पैसे | GST 18% रुपये पैसे | प्रती नग दर रुपये (सर्वकरासह) |
|---|---|---|---|---|
| १ | टॉवेल धुवून ड्रायर करणे | ४.०० | ०.७२ | ४.७२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | चादर धुणे | ६.०० | १.०८ | ७.०८ |
| ३ | गादीच्या खोळी धुणे | ६.०० | १.०८ | ७.०८ |

ब) साईभक्तांचे कपडे शुल्क आकारुन धुणे/इस्त्री करणे .

| अ.नं | कपड्यांचा तपशील | मुळ प्रती नग दर रुपये पैसे | GST 18% रुपये पैसे | प्रती नग दर रु. (सर्व करांसह) |
|---|---|---|---|---|
| | **पुरुषांचे कपडे धुणे/इस्त्री करणे** | | | |
| १ | सफारी सुट | २५.४२ | ४.५८ | ३० |
| २ | शर्ट /टी-शर्ट | १२.७१ | २.२९ | १५ |
| ३ | पॅन्ट / जिन्स पॅन्ट | १२.७१ | २.२९ | १५ |
| ४ | जाकेट/स्वेटर | १२.७१ | २.२९ | १५ |
| | **पुरुषांचे कपडे फक्त इस्त्री करणे** | | | |
| १ | सफारी सुट | १२.७१ | २.२९ | १५ |
| २ | शर्ट /टी-शर्ट | ५.९३ | १.०७ | ७ |
| ३ | पॅन्ट / जिन्स पॅन्ट | ५.९३ | १.०७ | ७ |
| ४ | जाकेट/स्वेटर | ५.९३ | १.०७ | ७ |
| | **महिलांचे कपडे धुणे/इस्त्री करणे** | | | |
| १ | साडी | २५.४२ | ४.५८ | ३० |
| २ | ब्लाऊज | ८.४७ | १.५३ | १० |
| ३ | टी-शर्ट | १२.७१ | २.२९ | १५ |
| ४ | स्लॅक्स/ शॉर्ट पॅन्ट | १२.७१ | २.२९ | १५ |
| ५ | पॅन्ट/जीन्स पॅन्ट | १२.७१ | २.२९ | १५ |
| ६ | नाईट सुट | २१.१८ | ३.८२ | २५ |
| ७ | जाकेट /स्वेटर | १२.७१ | २.२९ | १५ |
| ८ | पेटीकोट/गाऊन | १२.७१ | २.२९ | १५ |
| | **महिलांचे कपडे फक्त इस्त्री करणे** | | | |
| १ | साडी | १६.९४ | ३.०६ | २० |
| २ | ब्लाऊज | ५.९३ | १.०७ | ७ |
| ३ | टी-शर्ट | ५.९३ | १.०७ | ७ |
| ४ | स्लॅक्स/शॉर्ट पॅन्ट | ५.९३ | १.०७ | ७ |
| ५ | पॅन्ट/जीन्स पॅन्ट | ५.९३ | १.०७ | ७ |
| ६ | नाईट सुट | ५.९३ | १.०७ | ७ |
| ७ | जाकेट/स्वेटर | ५.९३ | १.०७ | ७ |
| ८ | पेटीकोट/गाऊन | ५.९३ | १.०७ | ७ |
| | **मुलांचे कपडे धुणे/इस्त्री करणे** | | | |
| १ | सफारी सुट | १२.७१ | २.२९ | १५ |
| २ | शर्ट/ टी-शर्ट | १२.७१ | २.२९ | १५ |
| ३ | पॅन्ट / जिन्स पॅन्ट | १२.७१ | २.२९ | १५ |
| ४ | जाकेट/ स्वेटर | १२.७१ | २.२९ | १५ |
| ५ | शॉर्ट पॅन्ट | १२.७१ | २.२९ | १५ |
| | **मुलांचे कपडे फक्त इस्त्री करणे** | | | |
| १ | सफारी सुट | ५.९३ | १.०७ | ७ |
| २ | शर्ट/ टी-शर्ट | ५.९३ | १.०७ | ७ |
| ३ | पॅन्ट/जीन्स पॅन्ट | ५.९३ | १.०७ | ७ |
| ४ | जकेट/स्वेटर | ५.९३ | १.०७ | ७ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | शॉर्ट पॅन्ट | ५.९३ | १.०७ | ७ |

प्रस्तावः-सन २०१८-१९ या वर्षामध्ये साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकडील बेडशीट, उशी कव्हर धूणे/इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, चादर धुणे, गादीच्या खोळी धुणे व भक्तांचे कपडे शुल्क आकारुन धूणे/इस्त्री करुन देणेचेकाम करत असलेल्यालॉण्ड्री कॉन्ट्रॅक्टरद लॉण्ड्री सेंटर,नाशिक व साईश्रध्दा लॉन्ड्री अ‍ॅन्ड सर्व्हिसेस, सावळीविहीरयांचा कार्यादेशाचा कालावधी दि.०१/०८/२०१८ ते दि.३१/०७/२०१९ अखेर असून, सदर कालावधी दि.३१/०७/२०१९ रोजी संपुष्टात येणार असल्याने, साईभक्तांना देण्यात येत असलेली लॉण्ड्री सेवा सुविधामध्ये गैरसोय होऊ नये. यासाठीसन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी नवीन कॉन्ट्रॅक्टरची नेमणूक करणेकामी वर्तमान पत्रात ई-निविदा जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा प्रक्रिया राबवावी लागणार आहे.

त्यासाठी सन २०१८-१९ मधील साईआश्रमभक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकडील माहे ऑगस्ट-२०१८ते माहे-फेब्रुवारी २०१९अखेरसात महिन्यांमध्ये रु. १४,१४,४४६/- एवढा खर्च झालेला आहे. माहे मार्च २०१९ ते जुलै २०१९अखेर पाच महिन्यांमध्ये सुमारे खर्च रु. १०,९७,१२५/- इतका होईल. असे एकूण आर्थिकवर्षात रु.२५,११,५७१/- एवढा खर्च अपेक्षित आहे. त्याचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं | महिना | द लॉण्ड्री सेंटर नाशिक बील रक्कम रुपये. | | साईश्रध्दा लॉण्ड्री अ‍ॅण्ड सर्व्हिसेस,सावळीविहीर बील रक्कम रुपये | | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| | | साईआश्रम भक्तनिवास | साईधर्मशाळा | साईआश्रम भक्तनिवास | साईधर्मशाळा | |
| ०१ | ऑगस्ट-२०१८ | -- | -- | १,८४,६२२/- | २८,०१०/- | २,१२,६३२/- |
| ०२ | सप्टेंबर-२०१८ | १,३४,१९७/- | २१,०४६/- | १६,१६६/- | -- | १,७१,४०९/- |
| ०३ | ऑक्टोंबर-१८ | १,६२,०४६/- | २१,१२९/- | १५,०७६/- | -- | १,९८,२५१/- |
| ०४ | नोव्हेंबर-२०१८ | १,५४,६१७/- | १४,६११/- | १४,९७७/- | -- | १,८४,२०५/- |
| ०५ | डिसेंबर-२०१८ | १,८७,०११/- | २५,५२६/- | १६,६६७/- | -- | २,२९,२०४/- |
| ०६ | जानेवारी-२०१९ | १,७१,०८२/- | १२,२३९/- | १५,९९९/- | -- | १,९९,३२०/- |
| ०७ | फेब्रुवारी-२०१९ | १,८६,५९०/- | १५,५००/- | १७,३३५/- | -- | २,१९,४२५/- |
| एकूण | | ९,९५,५४३/- | १,१०,०५१/- | २,८०,८४२/- | २८,०१०/- | |
| | | | | | एकूण झालेला खर्च | १४,१४,४४६/- |
| या चालू वर्षातील माहे मार्च-२०१९ ते जुलै २०१९ अखेर होणारा संभाव्य खर्च (माहे फेब्रुवारी २०१९ मध्ये झालेला खर्च रु.२,१९,४२५/- दरमहा खर्च गृहीत धरुन ०५ महिन्यांचा होणारा संभाव्य खर्च) | | | | | | १०,९७,१२५/- |
| | | | | | एकूण खर्च | २५,११,५७१/- |

सन २०१९-२० या वर्षाकरीता साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या विभागातील लॉण्ड्री कामासाठी येणा-या अंदाजे खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे.

| २०१८-१९ मधील खर्च | सन २०१९-२० पुढील वर्षासाठी होणारा वाढीव खर्च २०% | अंदाजे २०% वाढसह एकूण रक्कम रुपये | १८%GST रक्कम रुपये | एकूण सन २०१९-२० वर्षासाठी अंदाजे एकूण रक्कम रुपये. |
|---|---|---|---|---|
| २५,११,५७१/- | ५,०२,३१४/- | ३०,१३,८८५/- | ५,४२,४९९/- | ३५,५६,३८४/- |

सन २०१९-२० या वर्षाकरीता साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकडील लॉण्ड्री कामासाठी अंदाजे रक्कम रु.३५,५६,३८४/- (अक्षरी रु.पसतीस लाख छपन्न हजार तीनशे चौ-याऐंशी)इतका खर्च अपेक्षित आहे. त्यास मा.व्यवस्थापन समिती सभेची मान्यता मिळाल्यानंतर ई-निविदा प्रक्रिया राबवावी लागणार आहे.

विभागाचे स्पष्ट मत / अभिप्रायः-

१) सन २०१८-१९ मधील द लॉण्ड्री सेंटर,नाशिक व साईश्रध्दा लॉन्ड्री अ‍ॅन्ड सर्व्हिसेस, सावळीविहीर यांचा कार्यादेशाचा कालावधी दि.०१/०८/२०१८ ते दि.३१/०७/२०१९ अखेर असून, सदर कालावधी दि.३१/०७/२०१९ रोजी संपुष्टात येणार असल्याने, साईभक्तांना देण्यात येत असलेली लॉण्ड्री सेवा

सुविधामध्ये गैरसोय होऊ नये. यासाठी सन २०१९-२० (दि.०१/०८/२०१९ ते दि.३१/०७/२०२०) या कालावधीसाठी साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकडील बेडशीट, उशी कव्हर धूणे/इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, चादर धुणे, गादीच्या खोळी धुणे व भक्तांचे कपडे शुल्क आकारुन धूणे/इस्त्रीकरणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबवून नवीन ठेकेदाराची नेमणूक करणेकामी जनसंपर्क कार्यालयामार्फत दैनिक वर्तमानपत्रात ई-निविदा जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस,

२) सन २०१९-२० साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकडील बेडशीट, उशी कव्हर धूणे/इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, चादर धुणे, गादीच्या खोळी धुणे व भक्तांचे कपडे शुल्क आकारुन धूणे/इस्त्रीकरणेकामी येणा-या सुमारे रु.३५,५६,३८४/- (अक्षरी रु.पसतीस लाख छपन्न हजार तीनशे चौ-याऐंशी)मात्रचे अपेक्षित खर्चास,

उपरोक्त प्रस्तावीत केलेप्रमाणे०१ व ०२ बाबींस मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२२३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा विभागाकडील बेडशीट, उशी कव्हर, धुणे / इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, चादर धुणे, गादीच्या खोळी धुणे व भक्तांचे कपडे शुल्क आकारुन धुणे / इस्त्री करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.३५,५६,३८४/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- साईआश्रम भक्तनिवासस्थान )**

---

**विषय नं.५२** **साईआश्रम भक्तनिवास विभागातील शताब्दी मंडप (टेन्साईल फॅब्रीक शेड) साईभक्तांना धार्मिक / सांस्कृतीक कार्यक्रमासाठी देणेबाबतच्या नियमावलीबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमः- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४:- २१ (१) (ग) "भक्तांना मंदिरात देवतेच्यादर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धर्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे." व (२) पोट-कलम (१) (ख) "भक्तांना राहण्याकरिता व वापर करण्याकरिता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे."

मा.व्यवस्थापन समिती ठरावः- दि.०१/११/२०१८ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.६८६.

प्रस्ताविकः-श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनस्त साईआश्रम भक्तनिवास विभागामध्ये एकुण १२ इमारती असुन ११५२ साध्या व ३५६ वातानुकूलीत अशा एकुण १५३६ खोल्या आहेत. श्री साईबाबा समाधी शताब्दीवर्ष-२०१८ निमित्त साईभक्तांच्या अतिरिक्त निवासव्यवस्था व संस्थान तर्फे आयोजित विविध धार्मिक कार्यक्रमांसाठी ६५x३०० फुट याआकाराच्या कायमस्वरुपी टेन्साईल फेब्रीक शेड (साईआश्रम शताब्दी मंडप) उभारण्यात आला असुन गर्दीच्या काळात निवासव्यवस्था पुर्ण क्षमतेने भरल्यानंतर येथील मंडपामध्ये साईभक्तांची अतिरिक्त निवासव्यवस्थानियमाप्रमाणे करण्यात येते. शताब्दी महोत्सवाच्या अनुषंगाने देश-विदेशातील साई मंदिर प्रतिनिधींचे चर्चासत्र, शेतक-यांसाठी "झिरो बजेट नैसर्गिक व अध्यात्मिक शेती तसेच विषमुक्त शेती, तसेचश्री साई दिव्य कथाइ. विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

प्रस्तावः- उपरोक्त विषयान्वये मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०१/११/२०१८ रोजीच्या सभेतील आयत्यावेळेच्याविषय क्र.०९ निर्णय क्र.६८६ नुसार अंबा वेलफेअर फाऊंडेशन यांना साईआश्रम भक्तनिवास विभागातील शताब्दी मंडपामध्येदि.१०/०१/२०१९ ते दि.१३/०१/२०१९ अखेर दादा भगवान निवासी सत्संग शिबीर आयोजित करण्यास मान्यता देण्यात आली, तसेच साईआश्रम भक्तनिवास विभागातील टेन्साईल फेब्रीक शेड (शताब्दीमंडप) कोण-कोणत्याकार्यक्रमांसाठी उपलब्ध करुन देता येईल व त्यासाठी आकारण्यात येणारे शुल्क याबाबत स्वतंत्र नियमावली तयार करुन मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेत यावी, असे ठरले. मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयानुसारसाईआश्रम भक्तनिवास विभागात दिलेल्या खोल्या व शताब्दी मंडपासाठी बांधकाम विभागाने ठरविले प्रमाणे नियमानुसार विहीत सेवाआकार घेऊन आयोजकांमार्फत सदर शिबीर आयोजित करण्यात आले होते.

साईआश्रम भक्तनिवास विभागातील टेन्साईल फॅब्रीक शेड (शताब्दी मंडप) कोण-कोणत्या कार्यक्रमांसाठी उपलब्ध करुन देता येईल व त्यासाठी आकारण्यात येणारे शुल्क याबाबत स्वतंत्र नियमावली तयार करुन मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणे बाबत निर्देश देण्यात आले असुन त्यानुसार शताब्दी मंडपाबाबतची नियमावली खालील प्रमाणे आहे.

१) साईआश्रम भक्तनिवास विभागातील शताब्दी मंडप फक्त धार्मिक/सांस्कृतीक कार्यक्रमांसाठी नियमाप्रमाणे सेवाआकार घेऊन देता येईल. तसेच सदरील मंडपामध्ये लग्न समारंभ, सामाजिक, राजकिय व अनुषंगीक कार्यक्रमासाठी परवानगी दिली जाणार नाही.

२) संस्थानचे बांधकाम विभागामार्फत सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडुन (२४ तासासाठी) निश्चित केलेल्या दरानुसार प्रतिदिवस १०,०००/- याप्रमाणे कार्यक्रमापुर्वी (आगाऊ स्वरुपात) सेवाआकार घेण्यात येईल.

३) मंडपामध्ये, मॅट, कनात, खुर्च्या, ध्वनीक्षेपनइत्यादि अनुषंगीक बाबींची व्यवस्था आयोजकांना स्वखर्चाने करावी लागेल.

४) ५ केव्हीए पेक्षा जास्त विद्युतभाराची गरज असल्यास वीजपुरवठ्याची पर्यायी व्यवस्था आयोजकास स्वतः करावी लागेल.

५) जर ५ केव्हीए पेक्षा कमी इलेक्ट्रीकल लोड घ्यावयाचा असल्यास संस्थान मार्फत वीजपुरवठा करण्यात येईल व अनामत रक्कम रुपये ३०००/-मात्र (एका दिवसाकरीता) संस्थानचे लेखाशाखेत जमा करुन अनामत रक्कम जमा केल्याची पावती विद्युत विभागात जमा करुन व विद्युत पुरवठा जोडून घ्यावा. जर जास्त दिवस कार्यक्रम असेल तर त्या कालावधीच्या पटीत प्रति दिवसाप्रमाणे अनामत रक्कम भरावी लागेल.

६) कार्यक्रमास संस्थान मार्फत कोणतीही विद्युत उपकरणे, वायरिंग मटेरीअल,शिड्या वैगरे अनुषंगीक साहीत्य पुरविले जाणार नाही.

७) कार्यक्रमास वापरली जाणारी विद्युत उपकरणे तसेच ध्वनीक्षेपणाची उपकरणे ISI प्रमाणित व नामांकित कंपन्याची असावीत. तसेच ती संबंधीत विभागाच्या विद्युत पर्यवेक्षक यांचे नियत्रणानुसार जोडावीत. अर्थ लिकेज असलेली उपकरणे विद्युत प्रवाहास जोडु नयेत.

८) कार्यक्रमाला बॉक्स स्पिकरचा वापर करावा. ट्रॅम्पेटचा वापर करू नये.

९) साईआश्रम भक्तनिवास विभागामध्ये प्रसादालय विभागामार्फत जेवणाची व्यवस्था असल्यानेव साईभक्तांची सुरक्षितता, स्वच्छता इ. बाबी विचारात घेता इकडील विभागात आयोजकांना अन्नपदार्थ तयार करता येणार नाही, तसेच बाहेरुन तयार केलेले अन्न पदार्थ संस्थान परिसरात वाटप करता येणार नाही.

१०) कार्यक्रमासाठी लागणा-या लाऊड स्पीकरची परवानगी शिर्डी पोलिस स्टेशन, शिर्डी यांचेकडुन आयोजकास घ्यावी लागेल.

११) संस्थान चल अचल मालमत्तेचे कोणत्याही प्रकारे खराबी किंवा नुकसान करु नये.या बाबत आयोजकाने काळजी घ्यावीअशाप्रकारे खराबी/नुकसान झाल्याचे संस्थान प्रतिनिधीस आढळल्यास त्याचीनुकसान भरपाईची रक्कम आयोजका कडुन खरेदी दरानुसार वसूल करण्यात येईल त्यासाठी कार्यक्रमापुर्वी रु ५०००/- बिगरव्याजी अनामत रक्कम संस्थान खाती जमा करावी लागेल.

१२) सदर कार्यक्रमाचे वेळी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आयोजकाची राहील.

१३) एका वेळी कार्यक्रमासाठी खुर्चीवर १२०० व्यक्तीं व खुर्ची व्यतीरिक्त २००० व्यक्तीं यापेक्षा जादा मान्यवर बोलवता येणार नाही.

१४) मंडपाच्या बाहेरील भक्तांना ध्वनीक्षेपणाच्या आवाजाचा त्रास होणार नाही,तसेचनियमाप्रमाणे संरक्षण विभाग व शिर्डी पोलिस स्टेशन ठरवून देईल त्या क्षमतेपेक्षा (डेसिबल पेक्षा) जास्त आवाजअसता कामा नये. याकामी आवश्यक त्या परवानग्या घेण्याची जबाबदारी आयोजकाची राहील.

१५) सदर ठिकाणी आणण्यात येणा-या वस्तू/साहीत्य आयोजकाने स्वतःच्या जबाबदारीवर सांभाळावे.

१६) मंडपा शेजारी फटाके/तत्सम इतर ज्वलनशील वस्तुंचा वापर करता येणार नाही.

१७) आयोजकाने श्रीं च्या आरतीच्या वेळेत कार्यक्रम बंद ठेवण्याची काळजी घेण्यात यावी.

१८) मंडप उपलब्ध करुन देणे अथवा न देणेचा अधिकार व हक्क संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवलाला आहे.

१९) नियमावलीमध्ये बदल करणे, त्यामध्ये वाढ/कमी करणे किंवा अंशतः बदल करणे बाबतचाअधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवला आहे.

२०) आयोजकांची अथवा कार्यक्रमासाठी येणारांची वाहने संस्थानने नेमून दिलेल्या कार पार्किंगचे जागेतच उभी करावी.

२१) कार्यक्रमासाठी आलेल्या व्यक्तींमधील काही उपद्रवी इसमांकडून साईभक्तांना त्रास झाल्याची तक्रार प्राप्त झाल्यास कार्यक्रम ताबडतोब बंद करण्यात येईल व जागेचे भाडे आयोजकास परत दिले जाणार नाही, त्याची सर्वस्वी जबाबदारी आयोजकाची राहील.

२२) संदर्भीत कार्यक्रमासाठी आवश्यक असणा-या सर्व शासकिय परवानग्या तसेच पोलीस स्टेशनची परवानगी घेणेची जबाबदारी आयोजकाची राहील.

२३) शताब्दी मंडपात कोठेही ड्रिलींग करुन, खिळे ठोकून नुकसान पोहचवू नये. तसेच फ्लोरिंगवर मंडपाकरीता होल्स करु नये.

२४) मंडपातील इतर साहीत्य कार्यक्रमाच्यावेळी आणणे व कार्यक्रम संपल्यानंतर त्वरीत घेऊन जाणे ही आयोजक यांची जबाबदारी राहील. याकामी संस्थानची व साईभक्तांची गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी.

२५) शताब्दी मंडपाची बुकिंग दोन महिने अगोदर व गर्दीचा कालावधी सोडुन करण्यात यावी.*

२६) मंडप वापरासाठी देणे किंवा न देणेचा, कार्यक्रम रद्द करणेचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे.

२७) सदर शताब्दी मंडपामध्ये गर्दीच्या काळात साईभक्तांची अतिरिक्त निवासव्यवस्था करण्यात येत असल्याने, श्री गुरुपौर्णिमा उत्सव, श्री रामनवमी उत्सव, श्री पुण्यतीथी उत्सव, इत्यादी विविध उत्सव, नाताळ सलग सरकारी/आठवडा सुट्या आल्यास अशा अन्य कारणाअभावी शताब्दी मंडप इतर कार्यक्रमांकरीता देता येणार नाही.

विभागाचे स्पष्ट मत/अभिप्रायः-

१) शताब्दी मंडप (टेन्साईल फॅब्रीक शेड) साईभक्तांना विविध धार्मिक/सांस्कृतीक कार्यक्रमासाठी देणेकामी आयोजकास परवानगी देणे,

२) आयोजकांकडुन विद्युतआकारासाठी अनामत रक्कम (२४तासांसाठी) रु ३०००/- तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने निश्चित केलेल्या दरानुसार जागाभाडे (२४तासांसाठी) रु १०,०००/- स्विकारणेस,

३) तयार केलेल्या नियमावलीस मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणेस,

उपरोक्त १ ते ३ बाबीस मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२२४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास विभागातील शताब्दी मंडप (टेन्साईल फॅब्रीक शेड) साईभक्तांना धार्मिक / सांस्कृतीक कार्यक्रमासाठी देणेकामी प्रस्तावात नमुद केल्यानुसार नियमावलीस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- साईआश्रम भक्तनिवासस्थान)**

---

**विषय नं.५३** **साईबाबा भक्तनिवास विभागाचे निवासस्थान वितरणातील नियमावली अट क्र.३ एका व्यक्तीस खोली उपलब्ध करुन देणेबाबत फेरविचारार्थ.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद:- अधिनियमातील विनियम २१ मधील पोटकलम (१) (ख) मध्ये भक्तांना राहण्यासाठी व वापर करण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे अशी तरतुद आहे.

व्यवस्थापन समितीचा ठराव :- दि.०८/१२/२०१७ रोजीची मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.१०२३

प्रस्तावना:-साईबाबा भक्तनिवासस्थान विभागात एकुण ४८४ रुम तसेच १९८ लॉकर साईभक्तांचे वापरात आहेत. त्यात प्रतिदिनी एकुण ३७२० ते ३८०० पर्यंत साईभक्तांची निवासव्यवस्था करण्यात येते.

प्रस्ताव:-दि.०८/१२/२०१७ रोजीची मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.१०२३ नुसार - साईभक्तांच्या सुविधेसाठी असलेल्या सर्व निवास्थानांच्या प्रस्तावित "निवासस्थान वितरण" नियमावलीचे अवलोकन करणेत आले व त्यामधील अट क्र. ३ मध्ये व्यक्तिस खोली देता येणार नाही. अशी सुधारणा करणेत येऊन, सदरहु नियमावली अंतिम करणेत आली. तसेच अंतिम करण्यात आलेली "निवासस्थान वितरण" नियमावली साईभक्तांच्या माहितीसाठी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत यावी व प्लेक्स बोर्ड तयार करुन ते सर्व निवासस्थानामध्ये दर्शनी भागात लावण्यात यावे असे ठरले.

वरील निर्णयामध्ये खालीलप्रमाणे मसुदा समाविष्ठ करणेत यावा .

श्रींच्या दर्शनासाठी येणा-या साईभक्तांची निवासअभावी गैरसोय होऊ नये. याकरीता प्रायोगिक तत्वावर साईबाबा भक्तनिवास या निवासस्थांमध्ये एका व्यक्तीस खोली उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच

सहा महीने कालावधीनंतर याबाबतचा आढावा घेण्यात येऊन सविस्तर प्रस्ताव फेरविचारार्थ व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर करणेत यावा.

एका व्यक्तीस माहे दि. ०१ जानेवारी २०१८ ते दि. ३१ डिसेबर २०१८ अखेर कालावधीत रुम दिलेबाबतचा संक्षिप्त आढावा

| अ.क्र. | दिनांक | साई भक्ताचे नांव | रुम नंबर | लाभार्थी संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | १३ जाने.२०१८ | श्री. प्रतिभन रायपन, कोईमतुर | डी-३०१ | ०१ | |
| २. | २० जाने.२०१८ | श्री.अमीतकुमार, गाझियाबाद | बी-३२० | ०१ | |
| ३. | २५ जाने.२०१८ | श्री.नरेंद्र शौकत पटेल, संगमनेर | बी-१२४ | ०१ | |
| ४. | ३० जाने.२०१८ | श्री. सुधाकर सुकदेव पवार, रावेर. | अे-१३१ | ०१ | |
| माहे जानेवारी एकूण लाभार्थी संख्या | | | | ०४ | |
| ५. | ०३ फेब्रु.२०१८ | श्री.चंद्रकांत गंगाधर विचारे, मुंबई | अे-२१४ | ०१ | |
| ६. | १२ फेब्रु.२०१८ | श्री.के.एस.राजु, तिरुपती | अे-१२७ | ०१ | |
| ७. | १६ फेब्रु.२०१८ | श्री.जितेंद्र राऊत, ओरीसा | सी-३०८ | ०१ | |
| ८. | २० फेब्रु.२०१८ | श्री.अनिलकुमार निगम, ग्वॉलीयर | डी-१०८ | ०१ | |
| ९. | २२ फेब्रु.२०१८ | श्री.अमीत गहना, पाठानकोट | बी-३३० | ०१ | |
| १०. | २६ फेब्रु.२०१८ | कृष्णकुमार डहेरीया, सेवनी | अे-२१४ | ०१ | |
| माहे फेब्रूवारी एकूण लाभार्थी संख्या | | | | ०६ | |
| अ.क्र. | दिनांक | साई भक्ताचे नांव | रुम नंबर | लाभार्थी संख्या | शेरा |
| ११. | ०१ मार्च.२०१८ | श्री.वेलगुरम अण्यामल्ली, तामीळनाडू | बी-३१४ | ०१ | |
| १२. | ०१ मार्च-२०१८ | ए. वेंकटेश्वर लू , चेन्नई | बी -२०४ | ०१ | |
| १३. | ०२ मार्च-२०१८ | असिफ अली, रायपूर | अे-१०७ | ०१ | |
| १४. | १९ मार्च-२०१८ | अंकील बाला, मुंबई | अे-३०७ | ०१ | |
| १५. | २३ मार्च-२०१८ | श्री. विनोदकुमार चव्हाण, दिल्ली | बी-२३२ | ०१ | |
| १६. | ३१ मार्च-२०१८ | श्री. मोसमीदास, दिल्ली | बी-१२४ | ०१ | |
| माहे मार्च एकूण लाभार्थी संख्या | | | | ०६ | |
| १७. | ०३ एप्रिल-२०१८ | श्री. परशुराम आधुगतना, तेलंगना | अे -३२४ | ०१ | |
| १८. | २७ एप्रिल-२०१८ | श्री. विजयकमल रवि हेगडे, मुंबई | अे -१३ | ०१ | |
| माहे एप्रिल एकूण लाभार्थी संख्या | | | | ०२ | |
| १९. | ०९ मे-२०१८ | श्री. रामशिल घावट, कल्याण | डी-२११ | ०१ | |
| २०. | ३० मे-२०१८ | प्रियादर्शनी एम. बेंगलोर | अे-१०३ | ०१ | |
| माहे मे एकूण लाभार्थी संख्या | | | | ०२ | |
| २१. | ०३ जुलै-२०१८ | प्रिती शर्मा, बेंगलोर | बी/सी-१७ | ०१ | |
| २२. | २२ जुलै-२०१८ | विमलकुमार टी, कोरीमीट | अे-३१९ | ०१ | |
| २३. | २६ जुलै-२०१८ | राजेश पेरुमल, चेन्नई | डि-११० | ०१ | |
| २४. | ३० जुलै-२०१८ | रामप्रसाद जे. सत्तुर | सी-२३० | ०१ | |
| माहे जुलै एकूण लाभार्थी संख्या | | | | ०४ | |
| २५. | ०६ऑगस्ट-२०१८ | प्रदिप शेठी, दिल्ली | अे-३१५ | ०१ | |
| २६. | २९ऑगस्ट-२०१८ | मनीषकुमार, गाजीपुर | बी-३०८ | ०१ | |
| २७. | ३०ऑगस्ट-२०१८ | के.आर. सतीष, बेळगांव | अे-११३ | ०१ | |
| माहे ऑगस्ट एकूण लाभार्थी संख्या | | | | ०३ | |
| २८. | ०९ सष्टेबर-२०१८ | अे.व्ही.एस. श्रीधर | अे-१०९ | ०१ | |
| २९. | १५ सष्टेबर-२०१८ | हर्ष एमझाला, खम्मम | अे-३०६ | ०१ | |
| ३०. | १८ सष्टेबर-२०१८ | चंद्रप्रकाश श्रीवास्तव, दिल्ली | अे-३२१ | ०१ | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३१. | २२ सप्टेंबर-२०१८ | राजेंद्रकुमार मालकीया, इटारसी | सी-२०८ | ०१ | |
| माहे सप्टेंबर एकूण लाभार्थी संख्या | | | | ०४ | |
| ३२. | ०४ ऑक्टो-२०१८ | योगेश खंडेराव मुलीक, मुंबई | बी-३३२ | ०१ | |
| | माहे आक्टोबर एकूण लाभार्थी संख्या | | | ०१ | |
| ३३. | ०२नोव्हेंबर-२०१८ | रघुवीर सिंघ आजाद, ग्वॉलीयर | सी – २१० | ०१ | |
| माहे नोव्हेंबर एकूण लाभार्थी संख्या | | | | ०१ | |
| ३४. | ०८ डिसेंबर-२०१८ | रंगा सुरेश सन्नीधी, हैद्राबाद | सी-३३८ | ०१ | |
| ३५.. | १९ डिसेंबर-२०१८ | रमेशचंद्र सिंग, गाझीपुर | अे-२११ | ०१ | |
| माहे डिसेंबर एकूण लाभार्थी संख्या | | | | ०२ | |
| दि.०१ जानेवारी २०१८ ते दि.३१ डिसेबर २०१८ अखेर भक्त संख्या | | | | ३५ | |

विभागाची मागणी:- साईबाबा भक्तनिवास विभागाचे निवासस्थान वितरणातील नियमावली अट क्र.३ एका व्यक्तीस खोली उपलब्ध करुन देणेबाबत फेरविचारार्थ. . .

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-

१) एका व्यक्तीस रुम दिल्यास त्याची मानसिकता समजुन येत नाही. जसे की तो चितांग्रस्त असले तर आत्महत्या करण्यास प्रवृत्त होऊ शकतो. (निवासस्थान मधील पुर्वीचा इतिहास बघीतला तर अशा घटना झालेल्या आहेत.)

२) फॅमिली (कुटुंब) असेल तर काही घटना झाल्यास मदत मिळविणे सहज शक्य होते.

३) घटना घडल्यास संस्थानचे नावलौकीकास बाधा पोहचणार आहे.

४) एका व्यक्तीस रुम मागणीचा प्रतिसाद अत्यल्प आहे.

साईबाबा भक्तनिवास विभागामधील एका व्यक्तीस रुम देणेबाबत निवासस्थान वितरणातील नियमावली अट क्र.०३. एका व्यक्तीकरीता खोली उपलब्ध करणेबाबतचा प्रायोगीक तत्वावर दि. ०१ जाने २०१८ ते दि. ३१ डिसेंबर २०१८ या कालावधीचा आढावा घेतला असता,

एका व्यक्तीस रुम मागणी प्रतिसाद अत्यल्प असल्याने एका व्यक्तीस रुम देऊ नये असे नम्र मत आहे. यास्तव उपरोलिखीत सविस्तर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेसमोर निर्णयार्थ फेरसादर.

निर्णय क्र.२२५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईबाबा भक्तनिवास विभागामधील रुम एका व्यक्तीस देण्यात येऊ नये, परंतु देणगीदार साईभक्तांना साईबाबा भक्तनिवास मधील रुम उपलब्धतेनुसार उपलब्ध करुन द्यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा भक्तनिवासस्थान)**

---

विषय नं.५४ **सन २०१९-२० या एक वर्षासाठी साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती निवासस्थान या विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल (किटकनाशक औषध फवारणी) ई-निविदा प्रक्रिया बाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद :- अधिनियमाचे कलम- (१)१४/२ घ- भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्ती काम किंवा उपाययोजना हाती घेणे.(२) पोट कलम (१) (ख) भक्तांना राहण्याकरीता व वापर करण्याकरीता विश्रामगृह बांधणे व त्यांची देखभाल करणे.

व्यवस्थापन समितीचा ठराव :- मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१/०६/२०१८ रोजीचे सभेतील आयत्या वेळचा विषय नं. १३ व निर्णय क्र. ४०३ नुसार यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१८-१९ या एक वर्ष कालावधीसाठी साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती निवासस्थान या तिनही विभागांकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल, (किटकनाषक औषध फवारणी) करुन घेणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.८,०२,२८५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली असुन साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती निवासस्थान या तीन विभागाकडील इमारती व परिसरात करावयाचे पेस्ट कंट्रोल (किटक नाशक औषध फवारणी) करणे कामी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०९ /२०१८ रोजीचे सभेतील आयत्या वेळचा विषय नं.०१ निर्णय क्र.५५७ नुसार निम्नतम .दरधारक Pest Control M.Walshe, Mumbai हे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. समितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली. यावर सविस्तर चर्चा होऊन, साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती निवासस्थान या विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल (किटकनाशक औषध फवारणी) करणेकामी निम्नतम दरधारक मे.पेस्ट कंट्रोल, एम.वॉल्श, मुबंई यांचे दर प्रती चौ.फुटास रु.१.५५ इतके असून मंजुर दरानुसार रक्कम रु.६,५८,६५५.६२ + GST १८ % रक्कम -१,१८,५५८.०१ असे एकुण रक्कम रु.७,७७,२१३.६३ (अक्षरी रक्कम रु. सात लाख, सत्याहत्तर हजार, दोनशे तेरा पैसे त्रेसष्ट) मात्र स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

प्रस्ताविक:- श्रींच्या दशर्नासाठी येणा-या साईभक्तांचे निवासासाठी साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती निवासस्थान या विभागाकडील इमारतीमध्ये एकूण ९७३ खोल्या, २९ हॉल व ९९ लॉकर्स असून त्याचे एकूण क्षेत्रफळ ४.२४.९३९.११ इतके आहे.

सन २०१८-१९ करीता दि. ०१/०९/२०१८ ते दि.३१/०८/२०१९ या एक वर्ष कालावधीसाठी साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान, व व्दारावती निवासस्थान या विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्टकंट्रोल करणे कामी ई-निविदा प्रक्रिया राबवितांना निविदाधारकांकडुन कर वगळुन दर मागविण्यात आलेले होते. त्यानुसार पात्र निविदाधारकांचे वाणिज्यिक बीड खरेदी समितीचे दि. १४/०८/२०१८ रोजीचे सभेत उघडुन त्यामध्ये M/S. Pest Control, M Walshe, Mumbai. यांचे निम्नतम दर रु.१.५५ प्रति चौ.फुट आहेत.

त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०६/०९/०२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ५५७ नुसार जा.नं.एसएसएसा/वशी- सा.भ.नि./२९७०/२०१८ दि. २०/०९/२०१८ अन्वये मे. पेस्ट कंट्रोल,एम. वॉल्शे, मुबंई यानां दि.०१/०९/२०१८ ते दि.३१/०८/२०१९ या एक वर्ष कालावधीकरीता साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान, व व्दारावती निवासस्थान विभागासाठी पेस्ट कंट्रोल ( किटकनाषक औषध फवारणी) करणे कामी कार्यादेश देण्यात आलेला आहे

विभागाची मागणी:-कार्यदेशाची दि. ०१/०९/२०१८ ते दि.३१/०८/२०१९ या एक वर्ष कालावधीसाठी साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान, व व्दारावती निवासस्थान या विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्टकंट्रोल अखेर सपुंष्ठात येत असल्याने पुढील दि.०१/०९/२०१९ ते दि.३१/८/२०२० या एक वर्ष कालावधीसाठी साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवाससथान व व्दारावती निवासस्थान औषध फवारणी करणे कामी एकत्रित ई-निविदा कार्यवाही करणे आवश्यक आहे.

साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान, व व्दारावती निवासस्थान विभागासाठी पेस्ट कंट्रोल ( किटकनाषक औषध फवारणी) करणे कामी एक वर्ष कालावधीकरीता कार्यादेशातील मागील पेस्ट कंट्रोलचा प्रती चौ. फुट दर रु. १.५५ पैसे असा होता . सदरचे दर जीएसटी वगळुन आहेत.

तरी सध्याचे नविन दर हे १०% महागाई वाढीव रक्कम लावुन सदरचे दराप्रमाणे साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवाससथान व व्दारावती निवासस्थान या इमारतीमध्ये पेस्ट कंट्रोलकामी एक वर्षाकरीता (वर्षातुन ६ फवारण्या) करणेकामी खर्चाची रक्कम (इन्स्टीमेटेड कॉस्ट) खालीलप्रमाणे होत आहे.

| अ.नं | विभाग | खोल्या संख्या | हॉल संख्या | लॉकर्स | खोल्या व हॉल मिळवून एकूण क्षेत्रफळ (चौरसफुटामध्ये) | फवारणीचा चौ.फुट वार्षिक दर सर्व करासह (सहा फवारणी) (जीएसटी वगळुन) रुपये | पैसे | मागील सन २०१८-१९ रक्कम (जीएसटी वगळुन) | प्रस्तावित १०% वाढीव रक्कम सन २०१९-२० करीता (जीएटी वगळुन ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | साईबाबा भक्तनिवासस्थान | ५०९ | १५ | --- | १,७३,२६८.०० | ०१.५५ | | २,६८,५६५.४० | २,९५,४२१.९४ |
| २) | साईप्रसाद निवासस्थान | १३४ | १४ | ९९ | ४६,५५४.११ | | | ७२,१५८.८७ | ७९,३७४.७५ |
| ३) | व्दारावती निवासस्थान | ३३० | --- | --- | २,०५,११७.०० | | | ३,१७,९३१.३५ | ३,४९,७२४.४८ |
| | एकूण | ९७३ | २९ | ९९ | ४,२४,९३९.११ | -- | -- | ६,५८,६५५.६२ | **७,२४,५२१.१८/-** |
| | | | | | | | | **जीएसटी १८ % रुपये** | **१,३०,४१३.८१/-** |
| | | | | | | | | **एकुण** | **८,५४,९३५/-** |

| |
|---|
| (अक्षरी रुपये - आठ लाख चोपन्न हजार नऊशे पस्तीस मात्र/- ) |

उपरोक्तकामी एकुण अंदाजे रुपये ७,२४,५२१/- अधिक जीएसटी रक्कम १८ टक्केप्रमाणे रुपये १,३०,४१४/- असे एकुण रुपये ८,५४,९३५/- (अक्षरी रुपये - आठ लाख चोपन्न हजार नऊशे पस्तीस मात्र/- ) खर्च अपेक्षित आहे.

विभागाचा अभिप्राय /स्पष्ट मतः –

१) दि.०१/०९/२०१९ ते दि.३१/८/२०२० या एक वर्ष कालावधीसाठी साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवाससथान व व्दारावती निवासस्थान औषध फवारणी करणे कामी उपरोक्त लिखीत तक्त्यात नमुद केले प्रमाणे रुपये - ८,५४,९३५ /- ( अक्षरी रुपये - आठ लाख चोपन्न हजार नऊशे पस्तीस मात्र /-) खर्चास

तसेच

२) याकामी शासनाचे मंजूर दराने वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेकामी मंजुरीसाठी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२२६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१९-२० या एक वर्षासाठी साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती निवासस्थान या विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल (किटकनाशक औषध फवारणी) करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.८,५४,९३५/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- श्री साईबाबा भक्तनिवासस्थान)**

---

विषय नं.५५ **लॉण्ड्रीतील स्टीम बॉयलर करीता वार्षिक इंधन खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद –

१) २१ (१) चा (क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल,व्यवस्थापन व प्रशासन.

२) २१ (१) चा (ग) भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

प्रस्तावीक – साईबाबा भक्तनिवासस्थान विभागात सन-२००० पासुन लॉण्ड्री युनिट कार्यान्वित करण्यात आलेले आहे. सदर युनिटमध्ये साईप्रसाद निवासस्थान, द्वारावती भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवासस्थान, मंदिर, वाहन विभाग, शैक्षणिक संकुले इ. विभागाकडील बेडशिट, उशिकव्हर, चादर, गादीकव्हर, पडदे, रग, बसेसचे शिटकव्हर, आदी कपडे धुवून इस्त्री केली जातात.

लॉण्ड्रीचे कामकाज गरजेनुसार जनरल शिफ्टमध्ये करण्यात येते. त्याद्वारे प्रतिदिवशी साधारणपणे ८०० ते १००० नग कपडे धुवून इस्त्री केले जातात. धुण्यासाठी येणा-या कपडयांमध्ये प्रामुख्याने नमुद निवासस्थान विभागाकडील व्हि.आय.पी. खोल्यांचे धुतलेले टॉवेल सुकविण्यासाठी तसेच पावसाळा व हिवाळा सिझनमध्ये उन्हाचे प्रमाण कमी असते अशा वेळी धुतलेले कपडे सुकविण्यासाठी ड्रायर मशिनचा वापर केला जातो त्यासाठी बॉयलरद्वारे स्टीम देवून कपडे सुकविले जातात, त्याचप्रमाणे धुतलेल्या कपडयांना इस्त्रीकरणेसाठी कॅलेंडर मशिनचा दैनंदिन वापर केला जातो. याकरीता कॅलेंडर मशिनला स्टीम दयावी लागते. मशिनमध्ये धुवून पिळलेले बेडशिट, उशिकव्हर घातल्यावर सुकून इस्त्री होऊन बाहेर पडतात. या दोन्ही मशिनसाठी २०० किलो क्षमतेचा स्टिम बॉयलर कार्यान्वित आहे.

संस्थानचे वाहन विभागामार्फत इंधन खरेदीचा सविस्तर प्रस्ताव तयार करुन संदर्भ क्र.०१ चे ठरावा अन्वये मान्यता मिळालेली आहे, यामध्ये संस्थानचे विविध विभागांकरीता लागणारे सर्व प्रकारचे इंधन खरेदीकामी मा.आमदार श्री राधाकृष्ण विखे पाटील सहकारी ट्रक वाहतुक संस्था लि., साकुरी शिव, शिर्डी यांचे प्रचलीत इंधन दरामध्ये रु.०.५० पैसे मात्र सवलत व मागणीतील अटी/शर्तीनुसार बीलास ३० दिवसाचे क्रेडीट हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, पुरवठा आदेश देण्यात यावा असे नमुद असल्याने सदरकामी येणा-या अंदाजे खर्चास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता आवश्यक असल्याने संदर्भ क्र.०२ अन्वये लॉण्ड्रीकरीता माहे- जुलै - २०१८ ते माहे – जुन २०१९ करीता वार्षिक इंधन खरेदी करणेस व याकामी येणा-या रुपये ५,१०,०००/- (अक्षरीरुपये –पाचलाख दहा हजार) खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

सन जुलै - २०१८ ते जुन - २०१९ या कालवधीत झालेला खर्च इंधनाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | माहे | डिझेल खर्च लिटर | आईल | ग्रीस | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | जुलै-२०१८ | २०० लिटर | - | - | जुलै -२०१८ ते जुन - |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०२ | ऑगस्ट-२०१८ | २०० लिटर | - | - | २०१९ मध्ये स्टिम बॉयलर करीता एकुण २००० लिटर डिझेल खर्च होणार आहे. |
| ०३ | सप्टेंबर -२०१८ | २०० लिटर | - | - | |
| ०४ | ऑक्टोबर -२०१८ | २०० लिटर | - | - | |
| ०५ | नोव्हेबंर -२०१८ | २०० लिटर | - | - | |
| ०६ | डिसेंबर -२०१८ | -- | - | - | |
| ०७ | जानेवारी-२०१९ | २०० लिटर | - | - | |
| ०८ | फेब्रुवारी -२०१९ | -- | - | - | |
| ०९ | मार्च—२०१९ | २०० लिटर | - | - | |
| १० | एप्रिल—२०१९ | २०० लिटर | - | - | |
| ११ | मे--२०१९ | २०० लिटर | - | - | |
| १२ | जुन -२०१९(अंदाजे) | २०० लिटर | - | - | |
| | एकुण लिटर | २००० लिटर | | - | |

हिवाळयात उष्णतेचे प्रमाण कमी असते त्यामुळे कपडे लवकर सुकत नाही. तसेच पावसाळयात पाऊस चालु असल्यास कपडे सुकले जात नाही. त्यामुळे ड्रायर मशिन व कॅलेंडर मशिन जास्त वेळ चालवावे लागते. त्यामुळे डिझेलचा वापर जास्त होतो. जास्त होणारा डिझेल वापर विचारात घेऊन अतिरीक्त १००० लिटर व मागिल वर्षाचा डिझेल खर्च २००० लीटर असे एकुण ३००० लिटर आवश्यकता भासनार आहे .

विभागाची मागणी - माहे- जुलै २०१९ ते जुन -२०२० या एका वर्षाचे कालावधीकरीता अंदाजे ३००० लिटर डिझेल स्टिम बॉयलरसाठी व कॅलेंडर मशिनसाठी ०५ लिटर ऑईल व लॉण्ड्रीतील सर्व मशिनरीसाठी ०३ किलो ग्रीसची आवश्यकता भासणार आहे.

इंधन खरेदीकामी खालीलप्रमाणे अंदाजे खर्च (संभाव्य वाढ विचारात घेवून ) अपेक्षित आहे .

| अ.नं. | तपशिल | अंदाजे रक्कम |
|---|---|---|
| ०१ | ३००० लिटर डिझेल x ७० अंदाजे दर रुपये प्रती लिटर = | २,१०,०००.०० |
| ०२ | ०५ लिटर ऑईल x ३०० अंदाजे दर रुपये प्रती लिटर = | १,५००.०० |
| ०३ | ०३ किलो ग्रीस x ३५० अंदाजे दर रुपये प्रती किलो = | १,०५०.०० |
| एकूण रुपये - | | २,१२,५५०.००/- |
| ( अक्षरी रुपये दोन लाख, बारा हजार, पाचशे, पन्नास मात्र/- ) | | |

संदर्भ क्र.०१ चे मंजुर ठरावान्वये मा.आमदार श्री राधाकृष्ण विखे पाटील सहकारी ट्रक वाहतुक संस्था लि., साकुरी शिव, शिर्डी या पेट्रोल पंपावरुन आवश्यक इंधन खरेदी करणेस मान्यता असावी हि विनंती.

संस्थान अधिनियम यानुसार छाननी करुन अनुमान – नमुद अधिनियमातील तरतुदी नुसार व संमत मा.व्यवस्थापन समितीचे मंजुर ठरावानुसार साईबाबा भक्तनिवासस्थान विभागात असणा-या लॉण्ड्रीतील मशिनरी करीता इंधन खरेदी करता येईल.

विभागाचा अभिप्राय– माहे - जुलै २०१९ ते माहे- जुन २०२० या एका वर्षाचे कालावधीकरीता अंदाजे ३००० लिटर डिझेल स्टिम बॉयलरसाठी, कॅलेंडर मशिनसाठी ०५ लिटर ऑईल व लॉण्ड्रीतील सर्व मशिनरींसाठी ०३ किलो ग्रीसची आवश्यकता असून त्याकामी रुपये २,१२,५५०/- (अक्षरी रुपये दोन लाख, बारा हजार,पाचशे पन्नास मात्र ) खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चाची तरतुद सन २०१९/२०२० चे अंदाजपत्रकामध्ये केलेली आहे.

तरी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२२७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईबाबा भक्तनिवासस्थान विभागात असणा-या लॉण्ड्रीतील मशिनरी करीता आवश्यक इंधन खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.२,१२,५५०/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा भक्तनिवासस्थान)**

---

**विषय नं.५६** **व्दारावती भक्तनिवास विभागातील तिसऱ्या माळयावरील ८० नॉन एसी खोल्यांमध्ये एसी व इतर अनुषंगीक सुविधा बसवुन एसी खोल्यामध्ये रुपांतरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद :-

०१) २१ चा (१) चा (ग) - साईभक्तांना मंदिरात श्रींच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी /सुविधा पुरविणे.

०२) (ख) साईभक्तांना राहण्यासाठी व वापर करण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे....

प्रस्तावीक:- व्दारावती भक्तनिवास इमारत दि.१५/०८/२००९ पासुन साईभक्तांचे दैनंदिन निवासस्थनासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.. सदरची इमारत समाधी मंदिरापासुन अर्धा किलो मिटर अंतरावर आहे. सदर इमारत हि ४ मजली असुन इमारतीमध्ये ८० ए.सी. व २३६ नॉन ए.सी. अशा एकुण ३१६ खोल्या साईभक्तांना निवासासाठी उपलब्ध करुन देण्यात येतात. सदर इमारतीत एकुण ३१६ खोल्यांमध्ये सरासरी प्रतिदिनी अंदाजे २००० साईभक्तांची निवासव्यवस्था करण्यात येते. भारतामध्ये प्रथमच हिंदु तिर्थक्षेत्रामध्ये श्री क्षेत्र शिर्डी येथील श्री साईबाबा संस्थान विश्वस्त्व्यवस्था शिर्डी मधील व्दारावती भक्तनिवास विभागास आय. एस. ओ. ९००१:२०१५ मानांकन दि. २४/०१/२०१५ रोजी प्रदान करण्यात आलेले आहे.

व्दारावती भक्तनिवास विभागामध्ये दैनंदिन ८० एसी व २३६ नॉन एसी खोल्यामधून साईभक्तांचे निवासव्यवस्थेकरीता खालीलप्रमाणे सेवाआकार आकारण्यात येत असतो.

| अ.नं. | खोलीचा प्रकार | सेवाआकार रुपये | खोलीमधील एकुण व्यक्ती | जादा प्रति व्यक्ती सेवाआकार रुपये | खोलीमधील एकुण भक्तसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | नॉन एसी | ५००/- | ०३ | ५०/- | ०५ |
| ०२ | एसी | ९००/- | ०३ | ५०/- | ०५ |

व्दारावती भक्तनिवास विभागातील एकुण ३१६ खोल्यांपैकी ८० % खोल्यांची ऑनलाईन बुकिंगची सोय उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | खोलीचा प्रकार | काऊंटर देण्यासाठी खोल्यांची संख्या | ऑनलाईन देण्यात आलेल्या खोल्यांची संख्या | विभागातील एकुण खोल्यांची संख्या | ऑनलाईन आरक्षण (%) |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | जनरल (इंडियन टॉयलेट) | २६ | १०६ | १३२ | नॉन एसी ८० % |
| ०२ | जनरल (वेस्टर्न टॉयलेट) | २१ | ८३ | १०४ | |
| ०३ | एसी रुम | १६ | ६४ | ८० | एसी ८० % |
| ०४ | एकुण खोल्या | ६३ | २५३ | ३१६ | एसी, नॉन एसी ८० % |

उपरोक्त तक्त्यात नमुद केलेनुसार एकुण ३१६ खोल्यांपैकी १८९ नॉन एसी खोल्यांची व ६४ एसी खोल्यांची अशा एकुण २५४ खोल्यांची बुकिंग ऑनलाईनव्दारे होत असते. सदरची ऑनलाईन बुकिंग बुकिंग तारखेच्या ६० दिवस अगोदर चालु होते व ०३ दिवस अगोदर बंद होत असते. त्यामुळे परिवारासह येणारे देश विदेशातील साईभक्त लवकरच खोल्यांची ऑनलाईन बुकिंग करतात. तसेच ऑनलाईन बुकिंग करणाऱ्या साईभक्तांमध्ये जवळ जवळ सर्वच साईभक्त एसी खोल्यांची ऑनलाईन बुकिंग लवकर होत असलेबाबत तसेच एसी खोल्यांची बुकिंग पुर्ण झाल्यानंतरही संस्थानचे दुरध्वनीवरुन एसी खोल्यांची ऑनलाईन बुकिंग होत नसलेबाबत विचारणा करतात. त्यांना एसी खोल्यांची ऑनलाईन बुकिंग पुर्ण झालेबाबत सांगितल्यास ते नाराजी व्यक्त करतात.

तसेच एकुण ३१६ खोल्यांपैकी ४७ नॉन एसी खोल्यांची व १६ एसी खोल्यांची अशा एकुण ६३ खोल्यांची बुकिंग प्रत्यक्ष काऊंटरवर दैनंदिन पी.आर.ओ यादीमधील मान्यवर, गावातील प्रतिष्ठीत व्यक्ती, आजी माजी विश्वस्त, शिर्डी नगरपंचायत अधिकारी, आजी माजी नगराध्यक्ष, संस्थान अधिकारी वर्ग तसेच कर्मचारी, पचांयत समिती राहाता, सरकारी अधिकारी, देणगीदार साईभक्त, देणगी कार्यालयातील वेळो वेळी देणगी देणारे साईभक्तांसाठी तसेच काऊंटरवर प्रत्यक्ष येणारे साईभक्त यांना खोल्या दयाव्या लागतात.

विभागाची मागणी:- ऑनलाईन बुकिंग व काऊंटर बुकिंग करणारे साईभक्तांमध्ये एकुण ८० % साईभक्तांची मागणी हि एसी रुम मिळणेबाबतची असते. तसेच एसी रुम उपलब्धतेबाबत कायमच साईभक्त संस्थानचे दुरध्वनीवरुन विचारणा करत असतात. त्यामुळे व्दारावती इमारतीमधील २३६ नॉन एसी खोल्यांपैकी तिस-या माळयाचे एकुण ८० नॉन एसी खोल्यांमध्ये मॅकेनिकल विभागामार्फत ८० एसी व सीसीटिव्ही विभागामार्फत प्रत्येक खोलीमध्ये एक याप्रमाणे ८० केबल कनेक्शनसह टिव्ही बसवून एसी रुममध्ये रुपांतरण

करता येईल. एसी रुममध्ये रुपांतरीत झालेल्या खोल्यांचा सेवाआकार वाढवुन सध्याच्या एसी रुमप्रमाणे आकारता येईल. त्यामुळे साईभक्तांची निवासाची सोय होऊन परिणामी संस्थानचे उत्पन्नात वाढ होईल.

विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत:- व्दारावती भक्तनिवास इमारतीमधील एकुण ८० खोल्या एसी असून साईभक्तांची एसी खोल्यांची मागणी जादा प्रमाणात असते. परिणामी एसी खोल्यांची कमतरता भासते. ऑनलाईन नॉन एसी खोली बुकिंग केलेले साईभक्त काऊंटरवर एसी खोली मिळणेबाबत विनंती करत असतात.

करीता, साईभक्तांचे मागणीनुसार व्दारावती भक्तनिवास इमारतीमधील तिस-या माळयावरील ८० नॉन एसी खोल्यांचे रुपांतर एसी खोल्यांमध्ये करणेस व सदर खोल्यांमध्ये मॅकेनिकल विभागामार्फत ८० एसी व सीसीटिव्ही विभागामार्फत प्रत्येक खोलीमध्ये ०१ याप्रमाणे ८० केबल कनेक्शनसह टिव्ही बसविणेस मान्यता मिळणेस तसेच नविन रुपांतरीत केलेल्या एसी रुमचा सेवा आकार सध्याच्या एसी रुम प्रमाणे आकारणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२२८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारावती भक्तनिवास इमारतीमधील तिस-या माळयावरील ८० नॉन एसी खोल्यांचे रुपांतर एसी खोल्यांमध्ये करण्यास, सदर खोल्यांमध्ये मॅकेनिकल विभागामार्फत ८० एसी, सिसिटिव्ही विभागामार्फत प्रत्येक खोलीमध्ये ०१ याप्रमाणे ८० केबल कनेक्शनसह टिव्ही बसविण्यास तसेच नविन रुपांतरीत केलेल्या एसी रुमचा सेवा आकार सध्याच्या एसी रुम प्रमाणे आकारणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- व्दारावती भक्तनिवासस्थान/ मॅकॅनिकल विभाग/ सिसिटीव्ही कक्ष/विद्युत विभाग)**

---

विषय नं.५७ **मंदिर परिसरातील झिरो नंबर सभागृहाचे "लेंडीबाग सभागृह" असा नावात बदल करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थानचे साईनिवास अतिथीगृह येथे एक व मंदिर परिसरात लेंडीबागे शेजारी झिरो नंबर बैठक कक्ष येथे एक असे एकूण ०२ वातानुकूलीत सभागृह आहेत. या सभागृहांत साधारण ४० ते ५० व्यक्ती एका वेळी बसू शकतात इतकी क्षमता आहे.

साईनिवास अतिथीगृहातील मिटींग हॉल मध्ये वेळोवेळी मा.व्यवस्थापन समिती सभा, स्थानिक उपसमिती सभा, छाननी समिती सभा, खरेदी समिती सभा, प्री-बीड या सभांचे आयोजन करणेत येते.

तसेच झिरो नंबर बैठक कक्ष येथील सभागृहात श्रीरामनवमी, गुरुपौर्णिमा, पुण्यतिथी या उत्सवांच्या तसेच नाताळ व नववर्षारंभ मध्ये होणा-या गर्दीचे नियोजनाकामी आढावा बैठका होत असतात. तसेच वेळोवेळी संस्थान कामकाजा संदर्भात मा.मुख्य कार्यकारी यांचे अध्यक्षतेखाली विभागप्रमुखांच्या सभा होत असतात. या शिवाय वेळोवेळी मा.मंत्री महोदय, स्थानिक आमदार, खासदार यांचे उपस्थितीत शासकिय अधिकारी यांचे समवेत संस्थान कामकाजा संबंधीत बैठका होत असतात. श्रींचे दर्शनाकरीता आलेल्या व्ही.व्ही.आय.पी. मान्यवरांचे तसेच देणगीदार साईभक्त यांचे येथे सत्कार सोहळयाचे आयोजन करणेत येत असते.

संस्थानने पुर्वी बैठक कक्ष येथे मा.व्यवस्थापन समिती सदस्यांना बसण्याकरीता तसेच श्रींचे दर्शनाकरीता आलेल्या व्ही.व्ही.आय.पी. मान्यवरांना फ्रेश होण्याकरीता एकूण चार कक्ष बांधण्यात आले आहेत त्या कक्षास संस्थानने पुर्वी पासून १,२,३ व ४ असे नंबर दिलेले आहे. एक नंबर कक्षा शेजारी सभागृह असल्याने त्या सभागृहास O नंबर दिलेला आहे. त्यामुळे सदर सभागृहास पूर्वीपासून झिरो नंबर सभागृह या नावाने संबोधले जाते. परंतू सदरचे नाव योग्य वाटत नाही.

तरी सदर सभागृह लेंडीबागेच्या शेजारी असल्याने, या सभागृहास "लेंडीबाग सभागृह" या नावाने संबोधता येईल असे या विभागाचे मत आहे. तरी बैठक कक्ष येथील सभागृहाचे नाव "लेंडीबाग सभागृह" ठेवणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा होऊन निर्णय होणेस्तव, सादर

निर्णय क्र.२२९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसरातील झिरो नंबर सभागृहाचे "साई सभागृह" असे नामांतर करण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही- साईप्रसाद निवासस्थान)**

---

विषय नं.५८ **साईआश्रम भक्तनिवास येथील A,B व C इमारतीचे ए.सी.यंत्रणेचे सन २०१९-२०२० वर्षाकरीता मे.डायिकन एअर कंडीशनींग इंडीया प्रा.लि.यांना वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट (AMC) देणेसाठी मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमामधील तरतूद २०१४ : (1) कलम २(१४)(घ) – भक्तांचे सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे (२) कलम २१(१)(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

प्रस्तावना : शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेमार्फत देणगीदाखल साईआश्रम भक्तनिवास येथे A,B,C या तीन इमारतीमध्ये प्रत्येकी १२८ रुम नुसार एकूण ३८४ रुममध्ये डायकीन कंपनीचे VRV (Variable Refrigerant Volume) टाईप ए.सी. यंत्रणा बसवून दिलेली आहे. सदरची यंत्रणा दिनांक ११/०१/२०१३ रोजीपासून कार्यान्वित झालेली आहे. शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई व डायकीन एअर कंडीशनिंग इंडिया प्रा. लि. यांचेत सदर यंत्रणा बसविणेकामी दिलेल्या कार्यादेशाच्यावेळी करण्यात आलेल्या करारनाम्यात खालीलप्रमाणे तरतूद करण्यात आलेली आहे.

"Cost of Annual Maintenance Charges (AMC) after the warranty period, will be Rs. 6,10,500/- per year. The AMC will be comprehensive and will include cost of labour and parts. Other Taxes on the AMC Charges will be paid at actuals. The AMC Price will remain fixed and confirmed as valid for 8 years after warranty, by Dalkin (i.e.) 10 years from the date of acceptance of the installation."

उपरोक्त नमूद करारनाम्यातील अटी व शर्थीनुसार तसेच मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक-२५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. १५१ अन्वये साईआश्रम भक्तनिवास येथील A, B व C इमारतीतील VRV ए.सी. यंत्रणेचे एक वर्षे (दिनांक ०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०१९) कालावधीसाठी मे. डायकीन एअर कंडीशनिंग इंडिया प्रा. लि. यांना इकडील जा.नं.एसएसएस/वशी/मेकॅनिकल/१५५/२०१८ दि. ०९/०४/२०१८ अन्वये वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) करीता कार्यादेश देण्यात आलेला आहे.

मागणी: मे. डायकीन एअर कडीशनिंग इंडिया प्रा. लि., पुणे यांना देण्यात आलेल्या AMC कार्यादेशाची मुदत दिनांक ३१/०३/२०१९ रोजी संपुष्टात येत असून, त्यापुढील एक वर्ष कालावधीकरीता त्यांना AMC देणे आवश्यक आहे.

विभागाचा अभिप्राय- शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई व मे. डायकीन एअर कंडीशनिंग इंडिया प्रा. लि. यांच्यात झालेल्या करारनाम्यातील अटी व शर्थीनुसार वारंटी कालावधी संपलेपासून पुढील 8 वर्षाचे कालावधीसाठी वार्षिक ए.एम.सी. करीता प्रत्येक वर्षी रक्कम रुपये ६,१०,५००/- + टॅक्सेस याप्रमाणे दर निश्चिती करण्यात आली आहे. या ८ वर्ष कालावधीपैकी ५ वर्षाचा कालावधी पूर्ण झालेला असून, पुढील ३ वर्षाचा कालावधी बाकी आहे. प्रत्येक वर्षी ए.एम.सी. कामी अदा करावयाची रक्कम निश्चित करण्यात आलेली असल्याने, AMC करीता पुढील एक वर्ष कालावधीसाठी (दिनांक ०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२० पर्यंत ) कार्यादेश देणे आवश्यक आहे.

मे. डायकीन एअर कंडीशनिंग इंडिया प्रा. लि. यांना AMC करीता कार्यादेश देणेकामी तसेच AMC कामी वार्षिक रक्कम रुपये ६,१०,५००/- + टॅक्सेस याप्रमाणे अदा करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागणार आहे.

प्रस्ताव:- साईआश्रम भक्तनिवास येथील A, B व C इमारतीतील ए.सी. यंत्रणेचे पुढील एक वर्षाचे कालावधीसाठी (दिनांक ०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२० पर्यंत) उत्पादक कंपनी मे. डायकीन एअर कंडीशनिंग इंडिया प्रा. लि., पुणे यांना वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेकामी येणा-या रुपये ६,१०,५००/-+टॅक्सेस खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२३०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास येथील A, B व C इमारतीतील ए.सी. यंत्रणेचे दिनांक ०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२० या एक वर्ष कालावधीसाठी उत्पादक कंपनी मे. डायकीन एअर कंडीशनिंग इंडिया प्रा. लि., पुणे यांना वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देण्यास व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु. ६,१०,५००/- + टॅक्सेस चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.५९** **श्री साई प्रसादालयातील जुने भाजीपाला कोल्ड स्टोअरेज बायबॅक करुन नवीन कोल्ड स्टोअरेज खरेदी करणेकामी येणाऱ्या खर्चास तसेच ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम 2004 मधील तरतूद : (१) कलम १४(२)(घ) – भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोंजना हाती घेण्याचे (२) कलम १७(झ) – सर्वसाधारणपणे,

विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील.

प्रस्तावना:- साईभक्तांचे सुविधेसाठी श्री साईप्रसादाल विभागात भाजी पाला शुध्द राहणेकरीता १ नग भाजीपाल कोल्ड स्टोअरेज कार्यान्वित आहेत. सदर भाजीपाला कोल्ड स्टोअरेज सततच्या अविरत वापरामुळे खराब झालेले आहेत. सध्या त्यांची वारंवार दुरुस्ती करावी लागत आहे.

मागणी:- श्री साईप्रसादालयाती जुने १ नग भाजीपाला कोल्ड स्टोअरेज बायबॅक करुन, त्याचे बदली नविन १ नग भाजीपाला कोल्ड स्टोअरेज खरेदी करावा लागणार आहे. जेणेकरुन श्री साईप्रसादालयातील भाजीपाला खराब होवू नये म्हणून भाजीपाला सुरक्षित साठविणेची व्यवस्था अविरत चालू राहील. सध्या श्री साईप्रसादालय विभागात नादुरुस्त असलेल्या जूने भाजीपाला कोल्ड स्टोअरेज यंत्रणेचा तपशील खालीलप्रमाणे :

| अ.नं. | तपशील | डेड-स्टॉक नंबर | खरेदी दिनांक | नग | एकूण मुळ किंमत |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Vegetable Cold Storage | MCH/0844 | 07/08/2008 | 1 | 5,87,500.00 |
| 31/03/2018 अखेर घसारा किंमत रुपये : | | | | | 5,54,415.81 |
| घसारा वजा जाता किंमत रुपये : | | | | | 33,084.19 |
| **पुर्णांकित रुपये :** | | | | | **33,084.00** |

उपरोक्तप्रमाणे जुने एक भाजीपाला कोल्ड स्टोअरेज दिनांक ३१/०३/२०१८ अखेर घसारा किंमत रुपये ३३,०८४/- होत आहे. सदर जुने भाजीपाला कोल्ड स्टोअरेज बायबॅक देवून, नविन १ नग भाजीपाला कोल्ड स्टोअरेज खरेदी करावा लागेल. या खरेदीकामी येणा-या खर्चाच्या अंदाजाकरीता विविध पुरवठादार यांचेकून दरपत्रके मागविण्यात आली होती. तसेच इंटरनेटव्दारेही दराची माहिती घेतली. त्यानुसार नविन खरेदीकामी खालीलप्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षीत आहे :

| Sr. No. | Description | App. Rate (Rs) |
|---|---|---|
| 1. | Supply installation of Cold storage Insulation type for Chiller Room, Floor Insulation,<br>Capacity - 60000 Btu/hr, Refrigerant - R 404 A<br>Size - App - 7.8 m x 6.2 m x 4 mtr | 13,11,790.00 |

उपरोक्त प्रमाणे भाजीपाला कोल्ड स्टोअरेज यंत्रणा खरेदी करणेकामी रक्कम रूपये १३,११,७९०/- मात्रचा खर्च अपेक्षीत आहे. सदरील खर्चाची तरतूद सन २०१९ - २०२० या वर्षातील 'मशीनरी खरेदी खर्च' या शिर्षातील रकमेतून करता येईल. सदर खरेदीकामी महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर ई-निविदा नोटीस अपलोड करून ई-निविदा मागवुन करणेत येईल मात्र कार्यवाही ई-निविदा व्दारे करता येईल या कार्यवाहीस मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागेल.

आवश्यक मान्यता:- प्रशासकीय

विभागाचा स्पष्ट अभिप्राय : बांयबॅक करावयाचा भाजीपाला कोल्ड स्टोअरेज सततच्या वापराने, त्यांची वारंवार दुरूस्ती करावी लागते. त्यामुळे सदरचे कोल्ड स्टोअरेज यंत्रणा बायबॅक देवुन नवीन कोल्ड स्टोअरेज यंत्रणा खरेदी करणे आवश्यक आहे. संस्थान अधिनियम 2004 मधील कलम 17(4) मध्ये " विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित केलेले, पन्नास हजार रुपयांपेक्षा अधिक किंमतीचे कोणतेही जडजवाहिर, दागिने व इतर मौलयवान जंगम मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज, समितीकडून विकण्यात येणार नाही, तारण म्हणून ठेवण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रामित करण्यात येणार नाही " असे नमूद आहे. मात्र उपरोक्तप्रमाणे बायबॅक करावयाच्या भाजीपाला कोल्ड स्टोअरेजची घसारा किंमत ही रुपये ५०,०००/- पेक्षा कमी (प्रती नग रुपये- ३३,०८४/-मात्र) असल्याने, भाजीपाला कोल्ड स्टोअरेज यंत्रणा बायबॅक करणेकामी शासन मान्यतेची आवश्यकता नाही.

भाजीपाला कोल्ड स्टोअरेज यंत्रणा बायबॅक करुन नविन यंत्रणस खरेदी करणेसाठी महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर जाहीरात नोटीस अपलोड करावी लागेल तसेच सदरील भाजीपाला कोल्ड स्टोअरेज यंत्रणा खरेदी करणेकरीता तसेच सदरील यंत्रणा बायबॅक दयावयाचे ची किंमत अशा दोन BOQ अपलोड करुन ई-निविदा मागविता येतील.

तरी प्रसादालयातील जुने झालेले भाजीपाला कोल्ड स्टोअरेज यंत्रणा बायबॅक करुन आवश्यक नविन यंत्रणा खरेदी करणेकामी ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये १३,११,७९०/- (अक्षरी रुपये- तेरा लाख, आकरा हजार, सातशे, नव्वद ) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.२३१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयातील जुने भाजीपाला कोल्ड स्टोअरेज यंत्रणा बायबॅक करुन आवश्यक नविन यंत्रणा खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. १३,११,७९०/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.६०** **श्री साईनाथ रुग्णालयाकरीता नविन दोन लिफ्ट बसविणेकामी ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम अधिनियम 2004 मधील तरतूद : (1) कलम 14(2)(घ) - भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयी साठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे (2) कलम 17(2)(झ) - सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्वगोष्टी करणे.

प्रस्तावना - श्री साईबाबा संस्थानचे श्री साईनाथ रुग्णलय येथे रुग्णांची संख्या दिवसें दिवस वाढत असलेने सदर रुग्णालयाचे दोन्ही इमारती वर तिसरे मजल्याचे बांधकाम चालू आहे. वाढीव बांधकामात दोन लिफ्टचा अंर्तभाव करण्यात आलेला आहे. अर्किटेक यांचे कडूलन प्राप्त ड्रॉईंग नुसार सदर ठिकाणी १५ पॅसेंजर क्षमतेच्या २ नग ॲटोमॅटीक लिफ्ट बसवाव्या लागणार आहे.

**मागणी-** उपरोक्त प्रमाणे दोन लिफ्ट बसविणेकामी येणा-या अपेक्षीत खर्चाचे अंदाजाकरीता लिफ्ट पुरवठाधारक यांचे कडून दरपत्रके घेण्यात आली आहेत. त्या नुसार तसेच PWD महाराष्ट्र शासन CSR 2018-19 नुसार नविन दोन लिफ्ट बसविणे कामी खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| Sr. No. | Description | As per market survey (App. Price) | As per PWD CSR (mah) 2018-19 |
|---|---|---|---|
| 1. | SITC of Electric Traction Passenger Cum Stretcher / Hospital lift<br>Rated Capacity - 15Passenger<br>Floor - G+ 3, Location of Lift M/C - MRL , Quantity- 2 Nos. | 34,22,000.00 | 3731830.00 |

उपरोक्त प्रमाणे मार्केट सर्व्हे व CSR 2018-19 चे दराचा विचार करता मार्केट मधील दर कमी आहेत. त्या नुसार श्री साईनाथ रुग्णालय येथे नवीन दोन लिफ्ट बसविणे करीता अंदाजे रु. ३४,२२,०००/- मात्र खर्च अपेक्षीत आहे. तसेच या कामी मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन ई निविदा बोलावावे लागणार आहे.

विभागाचा अभिप्राय - श्री साईनाथ रुग्णालय येथे सध्या G + 2 २० पॅसेंजर क्षमतेच्या दोन हायड्रोलीक लिफ्ट बसवून कार्यान्वित आहे. तिस-या मजलेचे काम पुर्ण झालेनंतर पेशंटचे संख्येत वाढ होणार आहेत. तसेच ऑपरेशन थिएटर तिस-या मजलेवर असल्याने आणखी दोन लिफ्टची आवश्यकता भासणार आहे. नविन दोन्ही लिफ्ट बसवून कार्यान्वित झालेनंतर जुन्या दोन्ही लिफ्ट डक्टची उंची बांधकाम विभागामार्फत वाढवून लिफ्ट मॉडीफिकेशन करावे लागेल या करीता स्वतंत्र प्रस्ताव अलाविदा सादर करणेत येईल.

नविन दोन लिफ्ट बसविणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे मान्यते साठी सादर करुन मान्यते नंतर महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahatender.gov.in या संकेत स्थळावर जाहीरात अपलोड करुन ई निविदा बोलविता येतील.

प्रस्ताव - श्री साईनाथ रुग्णालय इमारतीकरीता दोन नवीन स्वयंचलीत लिफ्ट बसविणेकामी येणा-या रक्कम रु. ३४,२२,०००/- मात्रचे खर्चास व ई निविदा मागविणेस मान्यता मिळणे कामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२३२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालय इमारतीकरीता दोन नवीन स्वयंचलीत लिफ्ट बसविणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.३४,२२,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

विषय नं.६१

विषय नं.६१ **श्री साई प्रसादालय व साईआश्रम भक्तनिवास येथे असणाऱ्या साईटेक प्रोजेक्टकरीता बसविण्यात आलेल्या ए.सी.यंत्रणेचे कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्टर मे.कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांना दिलेल्या मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समिती दिनांक २/०२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७६(७) अन्वये श्री साई प्रसादालय व साईआश्रम भक्तनिवास येथे असणा-या साईटेक प्रोजेक्टकरीता बसविण्यात आलेल्या ए.सी. यंत्रणेचे दिनांक १/०४/२०१८ ते दिनांक ३१/०३/२०१९ या एक वर्ष कालावधी करीता कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांना जा. नं. एसएसएस/वशि/मेकॅनिकल/७००८/२०१८ दिनांक २९/३/२०१८ अन्वये रक्कम रुपये ३,४८,३००/- मात्र कार्यादेश देणेत आलेला आहे. कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टची मुदत दिनांक ३१/३/२०१९ रोजी संपत असल्याने सदर कामाीच विहित पद्धतीने ई निविदा प्रकिया राबविणेस व याकामी येणा-या रक्कम रु. ३,६५,७१५/- मात्रचे खर्चास इकडिल विभागाकडील दिनांक २९/०१/२०१९ रोजीचे व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी आवक क्रं ८/२/२०१९ चे टिपणीने मान्यता घेणेत आलेली आहे.

उपरोक्त निर्णयानुसार ई-निविदा नोटीस महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in वेबसाईटवर अपलोड करण्यात आली होती. ई निविदा अपलोड करणेची मुदत दिनांक १५/०२/२०१९ ते २५/०२/२०१९ पर्यंत देण्यात आली होती. मात्र या मुदतीत दोनच निविदा प्राप्त झालेल्या असल्याने दिनांक ५/३/२०१९ पर्यंत मुदतवाढ देणेत आली. परंतु सदर कालावधीमध्ये हि दोन निविदा आल्याने दिनांक १२.३.२०१९ पर्यत दुस-यांदा मुदतवाढ देणेत आलेली होती. सदर कलावधीमध्ये तीन निविदा प्राप्त झालेल्या आहेत परंतु लोकसभा २०१९ ची आचार सहिंता लागु असल्याने खरेदी समिती, उपसमिती व मा. व्यवस्थापन समिती बैठक होणेस तसेच बैठक झालेनंतर निम्मत्तम दराची निवीदाधारक यांना कार्यादेश देणेस कालावधी लागणार आहे.

या कालावधीमध्ये उन्हाळा असल्याने श्री साई प्रसादालय व साईआश्रम भक्तनिवास येथे असणा-या साईटेक प्रोजेक्टकरीता बसविण्यात आलेल्या ए.सी. यंत्रणा सुस्थितीत कार्यान्वित राहणेसाठी मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांना दिनांक १/०४/२०१९ ते दिनांक ३०/६/२०१९ या कालावधीकरीता अथवा ई निविदा पुर्ण होईपर्यंत सध्याच्या दरात मुदतवाढ देणेकामी मा. मुख्यकार्यकारी अधिकारी साहेब यांचेशी इकडील विभागाचे दिनांक ५.४.२०१९ रोजीचे मंजूर टिपणीने मान्यता घेतलेली आहे.

मागणी:- उपरोक्त प्रमाणे मुदतवाढीचे कार्यावाहीस व काम पुर्तता झालेनंतर बीलाची रक्कम रु.१,४२,५००/- (तिमाही बिल) आदा करणेकामी मा. व्यवस्थापन समितीची कार्योत्तयर मान्यता घेणे आवश्यक आहे.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय:- श्री साई प्रसादालय व साईआश्रम भक्तनिवास येथे असणा-या साईटेक प्रोजेक्टकरीता बसविण्यात आलेल्या ए.सी. यंत्रणेचे कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टची मुदत दिनांक ३१.३.२०१९ रोजी संपत आहे. उपरोक्त प्रस्तुत केलेप्रमाणे ई निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन निम्नत्तम दरधारकास कार्यादेश देणेस होणारा विलंब व मेकॅनिकल विभागाकडे पुरेसे मनुष्यबळ नसल्यामुळे मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांना सध्याच्या दरात दिनांक १.४.२०१९ ते दि. ३०/०६/२०१९ या कालावधी करीता अथवा ई निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मुदतवाढ देणे आवश्यक होते. तसेच मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांचेशी

करणेत आलेल्या करारनाम्यातील अटी शर्ती मधील मुद्दा क्रं मध्ये ४.The department reserve the right to extend the contract period by 3 Months with mutual consent. अशी तरतुद होती त्यानुसार मुदतवाढ देणेत आलेली आहे.

प्रस्ताव:- तरी श्री साई प्रसादालय व साईआश्रम भक्तनिवास येथे असणा-या साईटेक प्रोजेक्टकरीता बसविण्यात आलेल्या ए.सी. यंत्रणेचे कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट काम करणेकरीता मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांना दिनांक १/४/२०१९ ते ३०/०६/२०१९ या अथवा ई निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सध्याचे मंजूर दरास देणेत आलेल्या मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता घेणेकामी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समिती सभेमध्ये निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२३३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालय व साईआश्रम भक्तनिवास येथे असणाऱ्या साईटेक प्रोजेक्टकरीता बसविण्यात आलेल्या ए.सी.यंत्रणेचे कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट काम करणेकरीता मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांना ई निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सध्याचे मंजूर दरात देणेत आलेल्या मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.६२** **श्री साईबाबा संस्थान परिसरात लावणेत आलेल्या सर्व वॉटर कुलरचे वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रक्टर (CAMC) करीता मे.हेरब एंटरप्राईजेस, जळगाव यांना देणेत आलेल्या मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०७/०३/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१४०(६) अन्वये श्री साईबाबा संस्थान परिसरात लावणेत आलेल्या सर्व वॉटर कुलरचे सन २०१८-२०१९ या एक वर्ष कालावधी करीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी जा.नं. एसएसएस/वशि/मेकॅनिकल/ ६९७५/ २०१८ दिनांक २७/०३/२०१८ नुसार दिनांक ०१/०४/२०१८ ते दिनांक ३१/०३/२०१९ या कालावधीकरीता रक्कम रूपये ५,७०,०००/- मात्रचा कार्यादेश देणेत आलेला होता. वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट्ची मुदत दिनांक ३१/०३/२०१९ रोजी संपत असल्याने सदर कामी पुढील एक वर्ष कालावधी करीता CAMC देणेकामी मान्यता घेणेत आलेली होती. विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी येणा-या रक्कम रूपये ६,००,०००/- मात्रचे अपेक्षित खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २६/०२/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र. १२२(२७) अन्वये मान्यता मिळालेली होती. ई-निविदा प्रसिध्द करणेकरीता ई-निविदा मसुदा मंजुर करून घेणेत आलेला होता. परंतु लोकसभा २०१९ ची आचारसहिता लागु असलेणे खरेदी समिती, उपसमिती व मा. व्यवस्थापन समिती बैठक होणेस तसेच बैठक झालेनंतर निम्नत्तम दराचे निविदा धारक यांना कार्यादेश देणेस कालावधी लागणार होता.

सदर कालावधीमध्ये भक्तांना थंड पिण्याचे पाणी उपलब्ध होणेस अडचण येऊ नये म्हणुन वॉटर कुलर CAMC करीता मे. हेरंब एंटरप्राईजेस, जळगाव यांना देणेत आलेल्या कार्यादेशास दिनांक ०१/०४/२०१९ ते दिनांक ३०/०६/२०१९ पर्यंत अथवा ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होई पर्यंत मुदतवाढ देणेकामी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब याची इकडील विभागाचे दिनांक २/०४/२०१९ रोजीचे मंजूर टिपणीने मान्यता घेणेत आलेली आहे.

मागणी:- उपरोक्त प्रमाणे मुदतवाढीचे कार्यवाहीस व काम पुर्तता झालेनंतर बिलाची रक्कम रु. १,४२,५००/- (तिमही बील) अदा करणेकामी मा. व्यवस्थापन समिती सभेची कार्योत्तर मान्यता घेणे आवश्यक आहे.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय/मत:- श्री साईबाबा संस्थान परिसरात लावणेत आलेल्या सर्व १८० नग वॉटर कुलरचे सन २०१८ - २०१९ या एक वर्षे कालावधीकरीता वार्षीक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टची मुदत दिनांक ३१/०३/२०१९ रोजी संपलेली आहे. उपरोक्त प्रस्तुत केले प्रमाणे ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन निम्नत्तम दर धारकास कार्यादेश देणेस होणारा विलंब व मेकॅनिकल विभागाकडे पुरेसे मनुष्यबळ नसल्यामुळे मे. हेरंब एंटरप्राईजेस, जळगाव यांना सध्याच्या दरात दिनांक ०१/०४/२०१९ ते दिनांक ३०/०६/२०१९ पर्यंत अथवा ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मुदतवाढ देणे आवश्यक आहे. मे. हेरंब एंटरप्राईजेस, जळगाव यांचेशी करणेत आलेल्या करारनाम्यातील अटी व शर्ती मधील मुद्दा क्र. ४.० मध्ये SANSTHAN reserves the right to

extend the contract period by 3 months with mutul consent. अशी तरतुद आहे. त्या नुसार मुदतवाढ देणेत आली आहे.

प्रस्ताव:- श्री साईबाबा संस्थान परिसरात लावणेत आलेल्या सर्व वॉटर कुलरचे वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) कामी मे. हेरंब एंटरप्राईजेस, जळगाव यांना देणेत आलेल्या कार्यादेशास दिनांक ०१/०४/२०१९ ते दिनांक ३०/०६/२०१९ या पर्यंत अथवा ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सध्याचे मंजूर दरास देणेत आलेल्या मुदवाढीस कार्योत्तर मान्यता घेणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२३४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान परिसरात लावणेत आलेल्या सर्व वॉटर कुलरचे वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) कामी मे. हेरंब एंटरप्राईजेस, जळगाव यांना देणेत आलेल्या कार्यादेशास ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सध्याचे मंजूर दरात देणेत आलेल्या मुदवाढीस कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

विषय नं.६३ **प्रसाद भोजन व लाडू प्रसाद तयार करणेकामी आवश्यक बल्क एल.पी.गॅस खरेदीकामी मे.भारत पेट्रोलियम कॉर्पो.लि.यांचेशी डिस्काऊंट दराबाबत चर्चा करुन नविन करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम:-क्रमांक -१४ मधील २१ (१- घ) भक्तांना जेवन पुरवणे व अन्नछत्र चालविणे.

प्रस्तावना:- श्री साईप्रसादालयात दररोज सरासरी ४० हजार साईभक्त प्रसाद मोफत भोजनाचा लाभ घेतात. लाडू प्रसाद निर्मिती विभागामार्फत दर्शन रांगेत प्रत्येक साईभक्तांना विनामुल्य बुंदी प्रसाद व विक्रीसाठी लाडू प्रसाद तयार करण्यात येतो. प्रसाद भोजन, लाडू व बुदी प्रसाद व नाष्टा पाकीट करीता प्रति दिन २००० किलो एल. पी. गॅसचा वापर होतो. त्याकामी मे. भारत पेट्रोलियम कॉ. लि. यांचेकडून सिन्नर व मे. इंडियन ऑईल कॉ. लि. यांचेकडून मनमाड येथून बल्क एल. पी. गॅस खरेदी करण्यात येतो. त्याकामी उपरोक्त संदर्भिय अन्वये दोन्ही कंपनीकडे प्रत्येकी तीस लाख रुपये अॅडव्हान्स देणेत आलेला आहे तसेच त्याचेशी करारानामा करणेत आलेला आहे.

प्रत्येक महिन्याच्या १ तारखेस दोन्ही कंपनीकडून ई मेलद्वारे दरपत्रक प्राप्त होतात. दोनही कंपनीचे दर हे त्यांनी दिलेल्या सवलतीनुसार सारखेच असतात. यदाकदाचित दोन्ही कंपनीच्या दरात फरक असल्यास निम्नत्तम दरधारकाकडुन एल.पी. गॅस खरेदी करण्यात येतो.

मे. इंडीयन ऑईल कॉ. लि. दिनांक १/११/२०१६ ते दिनांक ३१/१०/२०२१ या कालावधी करीता गॅस पुरविणेकामी करारनामा करणेत आलेला आहे. तसेच मे. भारत पेट्रोलियम कॉर्पो. लि. यांचेशी दिनांक १.५.२०१४ ते ३०.४.२०१९ या पाच वर्षाच्या कालावधीकरीता दिनांक ८.५.२०१४ रोजी करारनामा करणेत आलेला आहे. मे. भारत पेट्रोलियम कॉ. लि यांचे करारनाम्याची मुदत दिनांक ३०.४.२०१९ रोजी संपुष्ठात आल्याने पुढिल पाच वर्ष कालावधीकरीता दिनांक १.५.२०१९ ते ३०.४.२०२४ या कालावधी करीता नविन करारनामा करावा लागणार आहे .

मागणी:- मात्र मे. भारत पेट्रोलियम कॉर्पो. लि. यांनी सन २०१४ मध्ये गॅस दरात रु. ४२००/- प्रती टन इतकी सुट दिलेली आहे. नव्याने करारनामा करतेवेळी मे. भारत पेट्रोलियम कॉर्पो. लि. यांचे प्रतिनिधी यांना मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे बोलावून दरात वाढीव सुट मिळणेबाबत चर्चा करुन मा. व्यवस्थापन समिती सभेचे मान्यतेनंतर पुढिल करारनामा करता येईल

प्रस्ताव:- तरी मे. भारत पेट्रोलियम कॉ. लि. यांचे प्रतीनीधी यांना मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे समक्ष बोलावून सवलतीचे दराबाबत चर्चा करुन मे. भारत पेट्रोलियम कॉ. लि. यांचेकडून बल्क एल. पी. गॅस खरेदीकामी त्यांचेशी पुढील पाच वर्ष कालावधी करीता जास्तीत जास्त डिस्काऊट दर निश्चित करुन करारनामा करणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२३५ **प्रस्तुत प्रकरणी मे.भारत पेट्रोलियम कॉर्पो.लि.यांचे प्रतिनिधी आजचे व्यवस्थापन समितीसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. समितीने त्यांचेशी दरात सवलत मिळणेबाबत चर्चा केली असता, त्यांनी गॅस दरात रक्कम रु.५०००/-प्रति टन इतकी सवलत देऊ केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रसाद भोजन व लाडू प्रसाद तयार करणेकामी आवश्यक बल्क एल.पी.गॅस खरेदीकामी मे.भारत पेट्रोलियम कॉर्पो.लि.यांचेशी दिनांक १.५.२०१९ ते ३०.४.२०२४ या कालावधी करीता त्यांनी देऊ केलेल्या सवलतीच्या दरात करारनामा करुन घेण्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)

---

विषय नं.६४ **श्री साईबाबा संस्थानचे सोलर हॉट वॉटर यंत्रणेचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (CAMC) कामी मे.साई एजन्सी, शिर्डी यांना दिलेल्या मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- मा. व्यवस्थापन समिती दिनांक २.२.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ७६(६) अन्वये मे. साई एजन्सी, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानचे साईआश्रम भक्तनिवासस्थान, साईधर्मशाळा, साईउद्यान, साईप्रसाद निवासस्थान गेस्ट हाऊस, साईबाबा भक्तनिवासस्थान, व्दारावती भक्तनिवासस्थान तसेच साईबाबा हॉस्पीटल व साईनाथ हॉस्पीटल येथील सोलर हॉट वॉटर यंत्रणेचे एक वर्ष करीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट् (AMC) देणेकामी जा. नं. एसएसएस/वशि/मेकॅनिकल/६२१८/२०१८ दिनांक १९/२/२०१८ नुसार दिनांक १.३.२०१८ ते दि. २८.२.२०१९ या कालावधीकरीता रक्कम रुपये ९,२५,६००/- मात्रचा कार्यादेश देणेत आलेला आहे. वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट्ची मुदत दिनांक २८.२.२०१९ रोजी संपत असल्याने सदर कामाचे विहित पद्धतीने ई निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी येणा-या रक्कम रु. ९,७१,८८०/- मात्रचे अपेक्षित खर्चास मा. व्यवस्थापन समिती दिनांक २०.११.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ७०४ अन्वये मान्यता मिळालेली आहेत.

उपरोक्त निर्णयानुसार याकामी ई निविदा नोटीस व जाहीरात महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर अपलोड करण्यात आली होती. ई निविदा अपलोड करण्याची मुदत दि. १४.१.२०१९ ते दि. २१.१.२०१८ पर्यत देण्यात आली होती. सदर कालावधीमध्ये एकच ई निविदा प्राप्त झालेली असल्याने दिनांक २९.१.२०१९ पर्यंत मुदत वाढ देणेत आलेली होती. सदर मुदतीतही एकच निविदा प्राप्त झालेली असल्याने दिनांक ५.२.२०१९ पर्यंत पुन्हा मुदतवाढ दिली. निविदा प्रकिया पुर्ण होणेकामी कमीत कमी तीन निविदेची आवश्यकता असल्याने सदर निविदा प्रकिया रद्द करुन दिनांक २५.०२.२०१९ पासुन फेर ई निविदा अपलोड करणेत आलेली आहे. सदर निविदेची मुदत दिनांक ५.३.२०१९ पर्यंत होती. सदर कालावधीमध्ये तीन निविदा प्राप्त झालेल्या आहे. परंतु लोकसभा २०१९ ची आचारसहिता लागु झालेने खरेदी समिती, उपसमिती व मा. व्यवस्थापन समिती बैठक होणेस तसेच बैठक झालेनंतर निम्नत्तम दराची निविदाधारक यांना कार्यादेश देणेस कालावधी लागाणार होता. सदर कालावधीमध्ये साईभक्त व रुग्णालयातील रुग्णांना आंघोळीसाठी गरम पाण्याची अडचण येऊ नाही म्हणून मे. साई एजन्सी, शिर्डी यांना दिनांक १.३.२०१९ ते दि. ३१.५.२०१९ या कालावधीकरीता अथवा ई निविदा पुर्ण होई पर्यंत सध्याच्या दरात मुदतवाढ देणेकामी मा. मुख्यकार्यकारी अधिकारी साहेब यांची इकडील विभागाचे दिनांक २.४.२०१९ रोजीचे मंजूर टिपणीने मान्यता घेणे आलेली आहे.

मागणी:- उपरोक्त प्रमाणे मुदतवाढीचे कार्यावाहीस व काम पुर्तता झालेनंतर बीलाची रक्कम रु. २,३१,४००/- (तिमाही बिल) आदा करणेकामी मा. व्यवस्थापन समिती ची कार्योत्तर मान्यता घेणे आवश्यक आहे.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय:- श्री साईबाबा संस्थानचे सर्व भक्तनिवासस्थाने तसेच दोन्ही हॉस्पीटल येथील एकुण ५,११,००० लिटर क्षमतेच्या सोलर हॉट वॉटर सिस्टीमचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्टची मुदत दिनांक २८.२.२०१९ रोजी संपलेली आहे. उपरोक्त प्रस्तुत केलेप्रमाणे ई निविदा प्रकियेस तांत्रिक अडचणीमुळे होणारा विलंब व मेकॅनिकल विभागाकडे पुरेसे मनुष्यबळ नसल्यामुळे मे. साई एजन्सी, शिर्डी यांना सध्याच्या दरात दिनांक १.३.२०१९ ते दि. ३१.५.२०१९ या कालावधीकरीता अथवा ई निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मुदतवाढ देणे आवश्यक आहे, तसेच मे. साई एजन्सी, शिर्डी यांचेशी करणेत आलेल्या करारनाम्यातील अटी शर्ती मधील मुद्दा क्रं.४ मध्ये The department reserve the right to extend the contract period by 3 Months with mutual consent. अशी तरतुद होती. त्यानुसार मुदतवाढ देणेत आलेली आहे.

प्रस्ताव:- तरी श्री साईबाबा संस्थानचे सर्व भक्तनिवासस्थाने तसेच दोन्ही हॉस्पीटल येथील एकुण ५,११,००० लिटर क्षमतेच्या सोलर हॉट वॉटर सिस्टीमचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट कामाची मे. साई एजन्सी, शिर्डी यांना दिनांक १.३.२०१९ ते दि. ३१.५.२०१९ या अथवा ई निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सध्याच्या मंजुर दरात दिलेल्या मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता घेणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२३६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचे सर्व भक्तनिवासस्थाने तसेच दोन्ही हॉस्पीटल येथील एकुण ५,११,००० लिटर क्षमतेच्या सोलर हॉट वॉटर सिस्टीमचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट कामी मे. साई एजन्सी, शिर्डी यांना ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सध्याच्या मंजुर दरात दिलेल्या मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.६५** **श्री साईबाबा हॉस्पिटल तसेच श्री साईनाथ हॉस्पिटल येथील ए.सी.यंत्रणेचे दि.०१.०७.२०१९ ते दि.३०.०६.२०२० या एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकरीता ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये सर्व ऑपरेशन थिएटर्स व आय.सी.सी.यु. मध्ये सेंट्रल ए.सी. प्लाटच्या एकूण 13 यंत्रणा तसेच स्प्लिट टाईप ए.सी. एकूण 71 नग, मॉरच्युरी 2 नग, मेडीसीन कोल्ड स्टोअर 1 नग आणि डोमेस्टिक फ्रिज एकूण 26 नग कार्यान्वित आहे. त्याचप्रमाणे श्री साईनाथ हॉस्पीटलमध्ये स्प्लिट टाईप ए.सी. एकूण 38 नग आणि डोमेस्टिक फ्रिज एकूण 24 नग कार्यान्वित आहे. ऑपरेशन शिएटरमध्ये ऑपरेशन करतेवेळी व नंतर आय.सी.यु. वॉर्डमध्ये ठेवण्यात येते. काही वेळा या यंत्रणेमधील काही स्पेअरपार्ट खराब झाल्यास ते तातडीने बदलणे गरजेचे असते. त्याकरीता सदरचे स्पेअरपार्टची खरेदी करावी लागते. प्रत्येक कंपनीचे स्पेअरपार्ट हे दुस-या कंपनीच्या स्पेअरपार्ट पेक्षा वेगळे असल्याने तसेच सदरचे स्पेअरपार्ट हे जवळपास उपलब्ध होत नसल्याने ते थेट मुंबई, पुणे येथून खरेदी करावे लागतात. त्यामुळे हे स्पेअरपार्ट मिळवून फिटींग करुन यंत्रणा कार्यान्वित होईपर्यंत पर्यायाने ए.सी. यंत्रणा काही वेळा बंद ठेवावी लागते अथवा कमी क्षमतेवर कार्यान्वित ठेवावी लागते. सदरचा स्पेअरपार्ट उपलब्ध झाल्यानंतर तो बसवून ए.सी. यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यान्वित केली जाते किंवा एखाद्या वेळी संबंधीत कंपनीचे प्रतिनिधी यांना बोलावून दुरुस्ती करुन घ्यावी लागते. यासाठी प्रत्येक वर्षी सदर यंत्रणेची देखभाल व दुरुस्ती करणेकामी वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देण्यात येते.

मागील वर्षी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक - ३०/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४४१(१३) अन्वये श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल येथील ए.सी. यंत्रणेचे सन २०१८-२०१९ या एक वर्षाचे वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांना दिनांक ०१/०७/२०१८ ते ३०/०६/२०१९ या कालावधीकरीता रुपये ८,६६,७००/- + GST मात्रचे रकमेस कार्यादेश देण्यात आला आहे. या सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दिनांक ३०/०६/२०१९ रोजी संपत आहे. ए.सी. यंत्रणा व्यवस्थित कार्यरत राहणेकरीता पुढील एक वर्षाकरीता CAMC देणे आवश्यक आहे.

श्री साईबाबा संस्थानमधील श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल येथील ए.सी यंत्रणेचे पुढील एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी मागील वर्षीचे प्राप्त दरानुसार अंदाजे अपेक्षित खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :

| अ.नं. | तपशील | २०१८-२०१९ या वर्षातील कार्यादेशातील रक्कम रुपये | सन २०१९-२०२० वर्षाकरीता अपेक्षित खर्च रुपये ( मागिल एकूण खर्चात ५% रक्कम वाढ गृहीत धरुन ) |
|---|---|---|---|
| ०१ | CAMC of Central AHU with condensing units & other air conditioning units insatalled Installed in Shri Saibaba Hospital & Shri Sainath Hospital as per attached list. | ०८,६६,७००/- + GST | ९,१०,०३५/- + GST |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल येथील ए.सी यंत्रणेचे सन २०१९-२०२० या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी अंदाजे रक्कम रुपये - ०९,१०,०३५/- + GST (अक्षरी रक्कम रुपये - नऊ लाख, दहा हजार, पस्तीस+ GST) मात्रचा खर्च अपेक्षित आहे. सदरील खर्च इकडील विभागाचे मंजूर अंदाजपत्रका- मध्ये तरतूद केलेल्या '*मशीनरी दुरुस्ती व देखाभाल खर्च*' या शिर्षाखालील रक्कमेतून करता येईल. याकामी महाराष्ट्र शासनाचे www//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर जाहीरात नोटीस अपलोड करुन कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवाव्या लागतील. या कार्यवाहीस मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागेल.

तरी उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल येथील ए.सी यंत्रणेचे एक वर्षाचे करीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता घेणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२३७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल तसेच श्री साईनाथ हॉस्पिटल येथील ए.सी.यंत्रणेचे दि.०१.०७.२०१९ ते दि.३०.०६.२०२० या एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी विहीत पध्दतीने ई-निवीदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.०९,१०,०३५/-+ GST चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.६६** **शिर्डी शहरामध्ये व संस्थानमध्ये Shirdi Smart City Project बाबत महाराष्ट्र शासनाकडून सुरु असलेल्या कार्यवाहीस अनिश्चित कालावधीसाठी विलंब होत असल्याने सदरकामी तातडीने सीसीटीव्ही क्षेत्रातील तज्ञ व अनुभवी सल्लागाराची ई-निविदा प्रक्रियेव्दारे नेमणूक करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१५,५०,०००/-+Tax मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद– सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. १४ मधील ३५६(घ) साईभक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपयायोजना हाती घेणे.

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.– दि.२६/०२/२०१९ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.२६, निर्णय क्र. १२१.

प्रस्तावना- श्रीं चे मंदिर व मंदिर परिसरामध्ये साईभक्त तसेच संस्थानचे परिसरातचे सुरक्षेच्या दृष्टीकोनातुन १०१ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले आहे. सदर कॅमे-यांद्वारे मंदिर परिसरात काही अनुचित प्रकार, पाकीटमारी तसेच इतर घटना इ.चे निरीक्षण करुन घटनांना पायबंद घालण्यात येतो. सीसीटीव्ही कंट्रोल रुम हे श्रींचे मंदिर व परिसराचे दृष्टीने अत्यंत महत्वाचा भाग आहे. सीसीटीव्ही कंट्रोल रुम येथे पहाणी केली असता, ४५ अती महत्वाचे सीसीटीव्ही कॅमेरे बंद अवस्थेत असुन यंत्रणा पुर्णतः तांत्रिक दृष्टया कालबाहय झालेली असल्याकरणाने दिवसें-दिवस सीसीटीव्ही कॅमेरे बंद पडण्याचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे मंदिर परिसरात काही अनुचित प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तथापी, श्रीं चे मंदिर व परिसराचे सुरक्षेच्या दृष्टीने बंद असलेले सीसीटीव्ही कॅमेरे पुर्ववत चालु करणेबाबत संरक्षण विभागाचे दि.१६/०२/२०१९ रोजीचे पत्रान्वये तसेच दि.०४/०४/२०१९ रोजीचे संरक्षण विभागाचे आदेशातील अ.नं.७,८,९,१५,२१,२४ मध्ये नमुद केलेल्या मुद्दातील सीसीटीव्ही कॅमे-यांबाबत त्रृटी पुर्तता करणेबाबत तसेच दि.१८/०३/२०१९ रोजीचा लाडुप्रसाद विभागाचे आदेशान्वये मोफत बुंदी प्रसाद वाटप काऊंटर, लाडु पॅकींग कक्ष, व बंदी किचन व दि.२६/०२/२०१९ रोजीचा मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.२६, निर्णय क्र.१२१अन्वये श्री साईप्रसादालायाचे ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेबाबत कळविलेले आहे. तसेच दि.१८/०४/२०१९ रोजीचे संरक्षण विभागाचे पत्रान्वये साई मंदिर सुरक्षा विभागाचे कार्यालयात सीसीटीव्ही स्क्रिन कनेक्शनबाबत कार्यवाही करणेकामी कळविण्यात आलेले आहे. तसेच संस्थानमध्ये कार्यरत असणा-या इतर विभागांचीही सीसीटीव्ही कॅमेरे तातडीने बसवुन मिळणेबाबत सतत पत्राद्वारे मागणी होत असते. श्री साईभक्तांचे सुरक्षिततेच्या दृष्टाकोनातुन सीसीटीव्ही प्रकल्प तातडीने कार्यान्वित होणे अत्यंत आवश्यक व गरजेचे आहे.

सदर यंत्रणा साईभक्तांचे सुरक्षेचे दृष्टीने लवकरात-लवकर दुरुस्त होणेकामी तत्कालीन पोलस उप अधिक्षक व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांचे सुचनेनुसार सीसीटीव्ही क्षेत्रात काम करणारे तज्ञ श्री वज्रेश गुजराथी (आय टॅलेंन्ट मेडीया) अहदनगर यांना तसेच श्री मंदार मुळे, अहमदनगर यांना आमंत्रित करण्यात आलेले होते. परंतु, सदर यंत्रणेतील साहित्य त्यांनाही दुरुस्त करता आलेली नाही. तसेच सदर सिस्टीम ही तांत्रिक दृष्टया पुर्णतः कालबाहय झालेली असल्याकारणाने कधी व केव्हा बंद पडेल याची शास्वती देता येत नाही.

सद्यस्थितीत कार्यरत व तांत्रिक दृष्टया कालबाहय झालेली यंत्रणा यापुर्वी संरक्षण विभागामार्फत व्हेन्टेज इंटीग्रेटेड सेक्युरीटी सोल्युशन प्रा.लि., नोएडा कंपनीकडुन सन २०११ मध्ये कार्यान्वित करण्यात आलेली होती. सदर कंपनीचे प्रतिनीधींना देखील सदर यंत्रणा दुरुस्तीकामी आमंत्रित करण्यात आलेले होते. त्यानुसार त्यांनी शिर्डी येथे येवुन सदर यंत्रणेची प्रत्यक्ष पहाणी केली असुन, सदर तांत्रिक दृष्टया कालबाहय व नादुरुस्त झालेली यंत्रणा दुरुस्तीकामी रक्कम रु.२८,०४,२६०/- मात्र (सर्व करांसहीत) व त्याची वार्षिक दुरुस्ती व देखभालकामी (AMC) रक्कम रु.४६,९६,९९०/- मात्र (सर्वकरांसहीत) असे एकत्रित रक्कम रु.७५,०१,२५०/- मात्र (सर्वकरांसहीत) (अक्षरी रक्कम रुपये पंच्याहत्तर लाख एक हजार दोनशे पन्नास) इतका दि.१८/१२/२०१८ रोजीचे प्रस्तावाद्वारे खर्च कळविलेला होता.

तथापी, व्हेन्टेज इंटीग्रेटेड सेक्युरीटी सोल्युशन प्रा.लि., नोएडा यांनी कळविलेल्या खर्चाचा सारासार विचार करता, सदर खर्चात सध्याची सीसीटीव्ही दुरुस्त करुन त्याचे वार्षिक दुरुस्ती व देखभालकामी होणा-या एकत्रित रक्कम रु.७५,०१,२५०/- मात्र (सर्वकरांसहीत) (अक्षरी रक्कम रुपये पंच्याहत्तर लाख एक हजार दोनशे पन्नास) रक्कमेत संस्थानला मंदिर व मंदिर परिसरात नविन अद्यावत सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित होवु शकते. त्यामुळे जुन्या यंत्रणेवर दुरुस्ती व देखभालीकामी रक्कम रु.७५,०१,२५०/- मात्र (सर्वकरांसहीत) खर्च करणे संस्थानला उचित व आर्थिक दृष्टया हितावह होणार नाही.

उपरोक्त सर्व बाबींचा सारासार विचार करता, तांत्रिक दृष्टया सदरकामी तातडीने सीसीटीव्ही क्षेत्रात काम करण्या-या तज्ञ व अनुभवी सल्लागाराची ई-निवीदेद्वारे नेमणुक करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.११,५०,०००/- +Tax मात्रचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेकामी दि.०४/०१/२०१९ रोजीची मंजुर टिपणीन्वये प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. परंतु, सदर प्रस्तावावर तत्कालीन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांनी "alredy धोरणात्मक निर्णय झालेला आहे आणि शासन स्तरावर tender सुरु आहे. प्रस्ताव नामंजुर" असे आदेशीत केलेले आहे.

तरी, शिर्डी शहरामध्ये व संस्थानमध्ये महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान विभाग, मुंबई मार्फत Shirdi Smart City Project बाबत सुरु असलेल्या कार्यवाहीस अनिश्चित कालावधीसाठी विलंब होत असल्याने सदर कार्यवाही महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत करणेऐवजी सदरकामी संस्थानमार्फत तातडीने सीसीटीव्ही क्षेत्रात काम करण्या-या तज्ञ व अनुभवी सल्लागाराची ई-निवीदा प्रक्रीयाद्वारे नेमणुक करुन नियुक्त सल्लागाराचे मार्गदर्शनानुसार सदरकामी निवीदा प्रक्रीया राबवुन संस्थानचे सर्व विभागात अद्यावत सीसीटीव्ही यंत्रणा उभारणीकामी कार्यवाही होणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.१५,५०,०००/- +Tax मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी तसेच सल्लागाराची नेमणुकीचे कार्यवाहीबाबत महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान विभाग व विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांना पत्राद्वारे कळविणेकामी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल.

विभागाचा अभिप्राय – उपरोक्त प्रस्तावनेत नमुद केलेनुसार शिर्डी शहरामध्ये व संस्थानमध्ये महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान विभाग, मुंबई मार्फत Shirdi Smart City Project बाबत सुरु असलेल्या कार्यवाहीस अनिश्चित कालावधीसाठी विलंब होत असल्याने सदर कार्यवाही महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत करणेऐवजी सदरकामी संस्थानमार्फत तातडीने सीसीटीव्ही क्षेत्रात काम करण्या-या तज्ञ व अनुभवी सल्लागाराची ई-निवीदा प्रक्रीयाद्वारे नेमणुक करुन नियुक्त सल्लागाराचे मार्गदर्शनानुसार सदरकामी निवीदा प्रक्रीया राबवुन संस्थानचे सर्व विभागात अद्यावत सीसीटीव्ही यंत्रणा उभारणीकामी कार्यवाही होणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.१५,५०,०००/- +Tax मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी तसेच सल्लागाराची नेमणुकीचे कार्यवाहीबाबत महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान विभाग व विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांना पत्राद्वारे कळविणेकामी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

विभागाचा प्रस्ताव- उपरोक्त प्रस्तावनेत व विभागाचे अभिप्रायात नमुद केलेनुसार शिर्डी शहरामध्ये व संस्थानमध्ये महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान विभाग, मुंबई मार्फत Shirdi Smart City Project बाबत सुरु असलेल्या कार्यवाहीस अनिश्चित कालावधीसाठी विलंब होत असल्याने सदर कार्यवाही महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत करणेऐवजी सदरकामी संस्थानमार्फत तातडीने सीसीटीव्ही क्षेत्रात काम करण्या-या तज्ञ व अनुभवी सल्लागाराची ई-निवीदा प्रक्रीयाद्वारे नेमणुक करुन नियुक्त सल्लागाराचे मार्गदर्शनानुसार सदरकामी निवीदा प्रक्रीया राबवुन संस्थानचे सर्व विभागात अद्यावत सीसीटीव्ही यंत्रणा उभारणीकामी कार्यवाही होणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.१५,५०,०००/- +Tax मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी तसेच सल्लागाराची नेमणुकीचे कार्यवाहीबाबत महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान विभाग व विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांना पत्राद्वारे कळविणेकामी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

निर्णय क्र.२३८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे सर्व विभागात अद्यावत सीसीटीव्ही यंत्रणा उभारणीकामी सीसीटीव्ही क्षेत्रात काम करण्या-या तज्ञ व अनुभवी सल्लागाराची नेमणूक करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१५,५०,०००/-+Tax चे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान विभाग आणि विधी व न्याय विभाग यांचेकडे पाठविण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल)**

---

**विषय नं.६७** **श्रीं चे Live दर्शनासाठी कार्यान्वित करण्यात आलेल्या यंत्रणेचे Digitalization करणेकामी प्रत्यक्ष काम करतेवेळी पुरवठा केलेल्या अतिरीक्त साहित्याचे खर्चाचे रकमेस तसेच सदरची रक्कम कंपनीस आदा करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद – सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. १४ मधील ३५६(घ) साईभक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपयायोजना हाती घेणे.

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. – १) दि. २५/०२/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र. ०८, निर्णय क्र.१४३.

२) दि. १४/११/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र. ०२, निर्णय क्र.९१५ (१३).

प्रस्तावना - श्री साईभक्तांना श्रीं चे दर्शन सुलभतेने व्हावे याकरीता मंदिर परिसरात सध्या कार्यान्वित असलेली Live Darshan, फोटोग्राफी व व्हिडीओ शुटींग यंत्रणेचे Digitalization करणेकामी विविध प्रकारचे साहित्य, सॉफ्टवेअर विहीत पद्धतीने ई-निवीदा मागवुन खरेदी करणेकामी येणारे सर्व समावेशक खर्चास दि.२५/०२/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.०८, निर्णय क्र.१४३ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन सदरकामी ई-निवीदा मागविण्यात आलेल्या होत्या. सदर ई-निवीदांतील पुरवठाधारक ईमरजन्सी इलेक्ट्रॉनिक सेक्युरीटी (आय) प्रा.लि., मुंबई यांचे दर निम्नतम प्राप्त झालेले असल्याने त्यांना दि.१४/११/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र. ०२, निर्णय क्र.९१५ (१३) अनुसरुन दि.३०/११/२०१७ रोजी ईमरजन्सी इलेक्ट्रॉनिक सेक्युरीटी (आय) प्रा.लि., मुंबई यांना सदरकामी रक्कम रु.७८,००,०००/- मात्रचा पुरवठा आदेश देण्यात आलेला होता.

सदर पुरवठा आदेशास अनुसरुन पुरवठाधारक ईमरजन्सी इलेक्ट्रॉनिक सेक्युरीटी (आय) प्रा.लि., मुंबई यांनी साहित्य पुरवठा केलेले असुन पुरवठा आदेशातील नमुद केलेल्या साहित्यातील नगापैकी तत्कालीन मा.वरिष्ठांचे पुर्व परवानगीने प्रत्यक्ष काम करतेवेळी पुरवठा आदेशातील नमुद दरानुसार पुरवठा केलेले अतिरिक्त साहित्य खरेदीचे आवक क्र.२५३७८, दि.२८/०३/२०१९ अन्वये रक्कम रु.४,१४,७८०/- मात्रचे बील सादर केलेले होते. सदर बीलाची रक्कम रु.४,१४,७८०/- मात्र ईमरजन्सी इलेक्ट्रॉनिक सेक्युरीटी (आय) प्रा.लि., मुंबई यांना आदा करणेकामी दि.२३/०४/२०१९ अन्वये टिपणी सादर करण्यात आलेली होती. सदर टिपणीवर "व्यवस्थापन समितीपुढे सदर अतिरीक्त खर्चास मान्यता घेण्याची कार्यवाही करावी " असे निर्देश दिलेले आहे.

तथापी, उपरोक्त संदर्भ क्र.४ अन्वये शासन खरेदी नियमावली ३.१.२.१ नुसार खरेदीची वास्तविक किंमत व अंदाजित किंमत यामध्ये (-) २०% ते (+) १०% तफावत असल्यास ती मान्य करण्यास खरेदीदारास विचार करता येईल, असे नमुद करण्यात आलेले आहे. त्यानुसार सदरकामी ईमरजन्सी इलेक्ट्रॉनिक सिक्यरीटी (आय) प्रा.लि., मुंबई यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेशातील एकुण रक्कम रु.७८,००,०००/- मात्र रक्कमेवर होणारी (-) २०% रक्कम रु.१५,६०,०००/- व (+) १०% रक्कम रु.७,८०,०००/- मात्र इतकी होत आहे. त्यानुसार प्रत्यक्ष काम करतेवेळी देय पुरवठा आदेशातील नमुद दरास अनुसरुन खालील तपशीलात नमुद केलेले अतिरीक्त साहित्याचे वापराचे बील कंपनीस आदा करता येईल.

| अ.नं. | पुरवठा आदेशातील साहित्याचा तपशील | पुरवठा आदेशातील नमुद नग | पुरवठा आदेशातील प्रतिनग दर रु. | पुरवठा आदेशानुसार एकुण देय रक्कम रु. | प्रत्यक्ष काम करतेवेळी अतिरीक्त वापरलेले नग | पुरवठा आदेशातील नमुद दरानुसार प्रतिनग दर रु. | पुरवठा आदेशातील दरास अनुसरुन अतिरीक्त आदा करावयाची रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५ (३ x४) | ६ | ७ | ८ (६ x७) |
| १. | HDMI Extender over IP • Compatible HDCP. • Supports 1080p and 720p video, plus 2-channel audio • Uses off-the-shelf gigabit IP switches for extension and distribution | ४ | २१,१७०.०० | ८४,६८०.०० | ३ | २१,१७०.०० | ६३,५१०.०० |
| २. | RING MEDIA CONVERTER 10 / 100 / 1000 MB WITH MANAGABLE 4 PORT 10 / 100 /1000 INDUSTRIAL GRADE Ring Media Converter, 1Console Port Support Web Management 2 Fiber Port :1.25 Gbps FC / Connector SM - 20 Km | ७ | ३३,६६०.०० | २,३५,६२०.०० | ५ | ३३,६६०.०० | १,६८,३००.०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३. | 6U 19" rack with tray | ६ | ५,३००.०० | ३१,८००.०० | १६ | ५,३००.०० | ८४,८००.०० |
| ४. | Fiber Patch Cord SM ( 3Mtr.) | १८ | १,२००.०० | २१,६००.०० | १०० | १,२००.०० | १,२०,०००.०० |
| | **Total amount** | | | | | | ४,३६,६१०.०० |
| | **Less Discount** | | | | | | २१,८३०.०० |
| | **Final Amount** | | | | | | ४,१४,७७९.५० |
| | | | | | | पुर्णांकीत रु. | ४,१४,७८०.०० |

तरी, ईमरजन्सी इलेक्ट्रॉनिक सेक्युरीटी (आय) प्रा.लि., मुंबई यांनी श्रीं चे LIVE दर्शनासाठी कार्यान्वित करण्यात आलेल्या यंत्रणेचे Digitalization चे प्रत्यक्ष काम करतेवेळी पुरवठा आदेशातील नमुद दरानुसार पुरवठा केलेल्या अतिरीक्त साहित्याचे आवक क्र.२५३७८, दि.२८/०३/२०१९ अन्वये सादर केलेल्या बीलाचे रक्कम रु.४,१४,७८०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी तसेच सदरची रक्कम ईमरजन्सी इलेक्ट्रॉनिक सेक्युरीटी (आय) प्रा.लि., मुंबई यांना लेखाशाखा विभागामार्फत आदा करणेकामी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल.

विभागाचा अभिप्राय – उपरोक्त प्रस्तावनेत नमुद केलेनुसार श्रीं चे LIVE दर्शनासाठी कार्यान्वित करण्यात आलेल्या यंत्रणेचे Digitalization चे प्रत्यक्ष काम करतेवेळी पुरवठा आदेशातील नमुद दरानुसार पुरवठा केलेल्या अतिरीक्त साहित्याचे रक्कम रु.४,१४,७८०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी तसेच सदरची रक्कम ईमरजन्सी इलेक्ट्रॉनिक सेक्युरीटी (आय) प्रा.लि., मुंबई यांना लेखाशाखा विभागामार्फत आदा करणेकामी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करत आहे.

विभागाचा प्रस्ताव – उपरोक्त प्रस्तावनेत व विभागाचे अभिप्रायात नमुद केलेनुसार श्रीं चे LIVE दर्शनासाठी कार्यान्वित करण्यात आलेल्या यंत्रणेचे Digitalization चे प्रत्यक्ष काम करतेवेळी पुरवठा आदेशातील नमुद दरानुसार पुरवठा केलेल्या अतिरीक्त साहित्याचे रक्कम रु.४,१४,७८०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी तसेच सदरची रक्कम ईमरजन्सी इलेक्ट्रॉनिक सेक्युरीटी (आय) प्रा.लि., मुंबई यांना लेखाशाखा विभागामार्फत आदा करणेकामी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.२३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीं चे LIVE दर्शनासाठी कार्यान्वित करण्यात आलेल्या यंत्रणेचे Digitalization चे प्रत्यक्ष काम करतेवेळी पुरवठा आदेशातील नमुद दरानुसार पुरवठा केलेल्या अतिरीक्त साहित्याचे रक्कम रु.४,१४,७८०/- मात्रचे खर्चास तसेच सदरची रक्कम ईमरजन्सी इलेक्ट्रॉनिक सेक्युरीटी (आय) प्रा.लि., मुंबई यांना लेखाशाखेमार्फत आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल)**

---

**विषय नं.६८** **श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, प्राथमिक विभाग इयत्ता ५ वी करीता विद्यार्थी यांना शाळेच्या गणवेषात हाफ शर्ट फुल पॅन्ट (गुलाबी-निळा) व विद्यार्थीनींना सलवार कमीज (गुलाबी-निळा) ड्रेस असा बदल करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद –सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमा मधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी,शैक्षणिक संस्था स्थापन करील.

प्रास्ताविकः-श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी संचलीत श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल,शिर्डी ही शाळा श्री साईबाबा संस्थान यांचेकडून कायम विनाअनुदानीत तत्वावर चालविली जाते. आपल्या शाळेत पुर्व प्राथमिक विभाग ( ज्यु. केजी व सिनी केजी. ) तसेच प्राथमिक विभाग इ. १ ली ते ७ वी पर्यंत व माध्यमिक विभागाची इ.८ वी ते १० वी पर्यंत वर्ग भरविले जात असून शाळेत एकूण अंदाजे २६२८ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शाळेत एकूण ५३ वर्ग तुकडी कार्यरत आहेत. अपु-या वर्ग खोल्यामुळे शाळा दोन सत्रात भरविण्यात येत आहे. सकाळचे सत्र सकाळी ०७.१५ ते १२.१५ व दुपारचे सत्र दुपारी १२.३० ते ०५.३० या वेळेत भरविले जाते.

विभागाची मागणीः-आपल्या शाळेत इयत्ता ६ वी ते १० वर्गात शिक्षण घेणा-या विद्यार्थी / विद्यार्थीनींना शाळेच्या गणवेषात गुलाबी रंगाचा हाफ शर्ट व निळया रंगाची फुल पॅन्ट तसेच मुलींना निळया रंगाचा सलवार व गुलाबी रंगाचा कमीज असा गणवेश बंधनकारक केलेला आहे. आजमितीस इयत्ता ५ वी करीता एकूण २५२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यापुर्वी सन २०१८-१९ अखेर इयत्ता ५ वी चे मुलांसाठी हॉफ

शर्ट व हाफ पॅन्ट तसेच मुलींसाठी फ्रॉक असा गणवेश वापर केला जात आहे. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये इ. ५ वी या वर्गासाठी २३९ विद्यार्थी शिक्षण घेतील.

परंतू या मुलामुलींचे वय आणि उंची विचारात घेता त्यांनाही इयत्ता ६ वी ते ७ वी चे वर्गाप्रमाणे इ. ५ वी मध्ये शिक्षण घेणा-या मुलांना हाफ शर्ट व फुल पॅन्ट (गुलाबी, निळा) तसेच मुलींना सलवार कमीज (गुलाबी, निळा) असा गणवेश करण्यात यावा असे नम्र मत आहे. याबाबत ब-याच पालकांनीही शाळेच्या मुख्याध्यापिका यांचेकडे तोंडी मागणी केलेली आहे.

विभागाचा अभिप्रायः- विद्यार्थ्यांचे गणवेश पालक स्वतः खर्च करुन खरेदी करत असतात. मुलांमुलीचे वाढते वय आणि उंची विचारात घेता व पालकांची फुल गणवेशाबाबतची मागणी विचारात घेता असा बदल करणेस हरकत नाही तरी इयत्ता ५ वी चे विद्यार्थ्यांना हाफ शर्ट व फुल पॅन्ट (गुलाबी, निळा) तसेच सलवार कमीज (गुलाबी, निळा) असा शाळेच्या गणवेशात बदल करणेकामी निर्णयार्थ सादर,

**निर्णय क्र.२४०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणी परिसरातील इतर शाळेमधील ड्रेसकोड बाबत आढावा घेऊन फेर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल)**

---

**विषय नं.६९** **शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता ज्युनिअर केजी वर्गाच्या ०२ वाढीव तुकडीस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद –सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमा मधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील.

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक – मा. व्यवस्थापन समितीची दिनांक २६/०२/२०१९ रोजीची सभा विषय नं. ०९ निर्णय क्र. १४८

प्रास्ताविक – शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये ज्यु. केजी वर्गासाठी प्रवेश प्रक्रिया राबविणेकामी वेळापत्रक तयार करुन ०३ वर्ग तुकडी करणे व फक्त १५० विद्यार्थ्यांना प्रवेश देणेबाबत दि. ०४.०४.२०१८ रोजीचे सभेत विषय नं. २२ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक – दि. ०४.०४.२०१८ रोजीची सभा निर्णय क्र. २४५ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता ज्युनियर के.जी. वर्गासाठी प्रवेश प्रक्रिया राबविणेकामी तयार करण्यात आलेल्या नियमावलीचे अवलोकन करुन सदरहू नियमावलीमधील नियम क्र.१ , २, व ३ यांना मान्यता देण्यात आली. तसेच इयत्ता १ ली च्या फक्त ३ वर्ग तुकडींना मान्यता मिळालेली असल्याने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये ज्यु. केजी करीता ०३ वर्ग तुकडीसाठी मर्यादीत एकूण १५० प्रवेश देण्यात यावा. उपरोक्त १५० प्रवेशांच्या जागा प्रथम प्राधान्याने संस्थान कायम कर्मचारी पाल्य व कंत्राटी/ आऊटसोर्स कर्मचा-यांचे पाल्य यांना प्रवेश देण्यात यावा. या कर्मचारी पाल्यांचे प्रवेश अर्ज १५० पेक्षा जास्त असल्यास प्रवेशासाठी लॉटरी पद्धतीचा अवलंब करणेत यावा. तसेच १५० पैकी जागा शिल्लक असल्यास शिर्डी नगरपंचायत हद्दीतील पाल्यांच्या अर्जाची लॉटरी पद्धतीचा अवलंब करुन प्रवेश देण्यात यावा, त्यानंतरही जागा शिल्लक राहिल्यास नगरपंचायत हद्दीचे बाहेरील अर्जदारांना लॉटरी पद्धतीने प्रवेश देण्यात यावा, असे ठरले.

सदरच्या निर्णयानुसार ज्यु. केजी साठी प्रवेश देण्याचे नियोजन करण्यात आले परंतू प्रवेशाबाबत पालकांची वाढती मागणी विचारात घेता दि. ३०/०६/२०१८ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र. ४१५ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन , शिर्डी परिसरातील गरीब विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून ज्यु. केजी ॲडमिशनसाठी मागील वर्षाप्रमाणे याही वर्षी प्रत्येकी ५० विद्यार्थ्यांच्या ५ तुकडयां कराव्यात. १५० विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रीया पुर्ण झालेली असून उर्वरीत प्रवेशासाठी प्रतिक्षा यादीमधील शिर्डी नगर पंचायत हद्दीतील १०० विद्यार्थ्यांना सोडत पद्धतीने प्रवेश देण्यात यावा, असे ठरले.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये ज्यु. केजी वर्गासाठी संस्थान कर्मचारी पाल्य, कंत्राटी / आऊटसोर्स कर्मचारी पाल्य व शिर्डी नगरपंचायत हद्दीतील व परिसरातील गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी एकूण २५० प्रवेश देणे निश्चित करण्यात आले होते मात्र सन २०१८-१९ मध्ये मागील वर्षी ज्यु. केजी साठी एकूण २१५ विद्यार्थ्यांना प्रवेश घेतलेला आहे. ज्यु. केजी च्या एकूण ५ वर्ग तुकडी तयार करण्यात आल्या असून प्रत्येक वर्ग तुकडीत किमान ४३ विद्यार्थ्यांना प्रवेश दिलेले आहेत.

याच धर्तीवर शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये ज्युनियर केजी वर्गाकरीता नवीन प्रवेशासाठी **दि. ०३ मे २०१९** पासून प्रवेश प्रकीया राबविण्यात येत असल्याने सदर प्रवेशाबाबत मान्यता घेणेकामी मा. व्यवस्थापन समितीची दिनांक २६/०२/२०१९ रोजीचे सभेत विषय नं. ०९ नुसार प्रस्ताव ठेवण्यात आलेला होता. निर्णय क्र. १४८ निर्णयानुसार यावर सविस्तर चर्चा होऊन शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये ज्यु. के जी करीता ०३ वर्ग तुकडीसाठी प्रति वर्ग तुकडी ५० विद्यार्थी प्रमाणे वयात बसलेले नियम व अटी शर्तीस अधिन राहून एकूण १५० प्रवेश या प्रमाणे प्रवेश प्रक्रीया राबविणेस मान्यता देण्यात आली आहे.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय – मागील वर्षाची प्रवेश प्रक्रीया विचारात घेता याही वर्षी ज्यु. केजी करीता एकूण ०५ तुकडयां कराव्या लागतील. शिर्डी परिसरातील गरीब विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाहीकरीता, ज्यु. केजी ॲडमिशनसाठी मागील वर्षाप्रमाणे याही वर्षी प्रत्येकी ५० विद्यार्थ्यांच्या वाढीव २ तुकडयां एकूण प्रवेशाबाबतच्या सर्व अटी व शर्तीस अधिन राहून आणखी १०० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावे असे नम्र मत आहे.

संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी /शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–शिक्षण हा सर्व बालकांचा हक्क असून शासनाने सक्तीचे केलेले आहे. श्री साईबाबा संस्थान ही धर्मदायी संस्था असून अधिनियमा मधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील असे अधिनियमात नमूद केलेले आहे. आपल्या शिक्षण संस्थेत निकालाची परंपरा, शिक्षणाचा दर्जा व नाममात्र शैक्षणिक फी असल्याने परिसरातील इतर इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील फी च्या तुलनेत अत्यंत कमी आहे. आपल्या शाळेत इंग्रजी माध्यमाचे शिक्षण घेणेसाठी पालक नेहमी आग्रही असतात. तसेच आपल्या शहरात गोरगरीब पालकांची बालके शिक्षण घेतात. श्री साईबाबा संस्थानचे नावांला साजेशे असे अत्यंत महत्वाचे व ज्ञानदानाचे काम करण्यात येत असल्याने संस्थानचे एक वेगळे नावलौकीक आहे. आजमितीस ज्यु. केजी ते इयत्ता १० वी पर्यंत आपल्या शाळेची एकूण विद्यार्थी संख्या २६२८ इतकी आहे. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये ज्यु. के.जी करीता संस्थान प्रशासन सर्व अटी शर्तीस अधिन राहून आणखी वयानुसार पात्र असलेले १०० प्रवेश दिले तर लॉटरी पद्धतीने सोडत करण्याची आवश्यकता भासणार नाही असे वाटते व शिर्डी नगरपंचायत हद्दीत वास्तव्य करणारे सर्व पालकांचे पाल्यांचा प्रवेशाबाबत प्रश्न मार्गी लागेल तसेच प्रवेशाबाबत संस्थान प्रशासनावर कुठलाही रोष राहणार नाही किंवा अडचण येणार नाही असे नम्र मत आहे.

विभागाची मागणीः- मा.व्यवस्थापन समितीची दिनांक २६/०२/२०१९ रोजीचे सभेत विषय नं. ०९ , निर्णय क्र. १४८ निर्णयातील सर्व नियम व अटी शर्तीस अधिन राहून आणखी ०२ वाढीव तुकडीस मान्यता व १०० प्रवेशासाठी मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२४१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता ज्युनिअर केजी वर्गाच्या ०२ वाढीव तुकडीस मान्यता देण्यात आली. तसेच प्रति वर्ग तुकडी ५० विद्यार्थी प्रमाणे वयात बसलेले नियम व अटी शर्तीस अधिन राहून मर्यादीत एकूण १०० प्रवेश या प्रमाणे प्रवेश प्रक्रिया राबविण्यात यावी, असे ठरले.**

**कार्यवाही- श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल)**

---

**विषय नं.७०** **वरिष्ठ महाविद्यालयाचे प्रथम व व्दितीय वर्ष प्रवेश प्रक्रिया व शुल्क आकारणीबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमः- अधिनियम २००४ मधील तरतुद क्र.१७ (१) व १७ (२) (ढ) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिररपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील. तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक – ०१. मा.व्य.समितीचे दि.०५.१०.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.६१३ (२१)

०२. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१.०६.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.३७०

प्रस्ताविकः- श्री साईबाबा सस्थानचे नवीन वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणेकामी महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन आदेश क्रमांक–मान्यता–२०१८/(३०/१८)/माशि-४, दि.२८ फेब्रुवारी, २०१८ चे आदेशान्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मिळाले आहे. तसेच शासन आदेश क्रमांक एनजीसी २०१८/(१००/१८)/ मशि-४, दि.१५ जून, २०१८ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये नवीन महाविद्यालय सुरु करण्यास मान्यता देण्यात आली. उपरोक्त संदर्भ क्र.०४ चे आदेशान्वये श्री साईबाबा महाविद्यालय हा स्वतंत्र विभाग सुरु करण्यात आलेला असून, सदर महाविद्यालयाचे दैनंदिन

कामकाजसाठी ०२ लिपीक टंकलेखक व ०२ मदतनीस कर्मचारी नेमण्यात आलेले आहेत. तसेच नवीन महाविद्यालयाचा शुभारंभ कार्यक्रम दि.१७.०७.२०१८ रोजी करण्यात आलेला आहे. शासनाकडून व विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार महाविद्यालयामध्ये तीनही शाखेंच्या प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेस दि.२० जुन, २०१८ पासून सुरुवात करण्यात आलेली असून, प्रथम वर्षाकरिता तीन्ही शाखेत एकुण ३१५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेले आहेत.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५.१०.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.६१३ (२१) नुसार श्री साईबाबा वरिष्ठ महाविद्यालयात B.Sc.(Computer Science) व BCA हा नवीन अभ्यासक्रम व कला, वाणिज्य शाखेची दुसरी तुकडी तसेच नैसर्गिक तुकडीवाढीचे वर्ग शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० मध्ये सुरु करणेस मान्यता मिळालेली आली. त्याबाबतचा प्रस्ताव सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात दाखल करण्यात आलेला असून, त्याकामी विद्यापीठाकडील तज्ञ समितीने नुकतीच महाविद्यालयास समक्ष भेट देऊन पाहणी करुन, B.Sc.(Computer Science) व BCA हा नवीन अभ्यासक्रम व कला, वाणिज्य शाखेची दुसरी तुकडी तसेच नैसर्गिक तुकडीवाढीचे वर्ग शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० मध्ये सुरु करणेबाबत शिफारस केलेली आहे. त्याची अंतिम मंजुरी प्राप्त होणे बाकी आहे.

सदर मंजुरीबाबत विद्यापीठात चौकशी केली असता, सदरची मंजुरी ही मे -२०१९ च्या शेवटच्या आठवडयात अथवा जुन-२०१९ च्या पहिल्या आठवडयात प्राप्त होण्याची शक्यता असलेबाबत कळविण्यात आलेले आहे. मात्र तोपर्यंत सदर मंजुरीस अधीन राहुन सन २०१९-२० च्या प्रवेश प्रक्रियेची पुर्वतयारी करणे गरजेचे आहे.

सन २०१९-२० मध्ये कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या प्रथम द्वितीय वर्षासाठी खालीलप्रमाणे प्रवेश प्रक्रिया राबविता येईल.

(अ) प्रथव वर्षाचे प्रवेश प्रक्रिया इ.१२ वी.चा निकाल लागल्यानंतर राबविणे गरजेचे आहे. सदर प्रवेश प्रक्रिया राबवितांना विद्यापीठाचे मार्गदर्शक तत्वानुसार खालील बाबींचा विचार होऊन निर्णय होणे गरजेचे आहे.

१. संस्थानचे कनिष्ठ महाविद्यालयातील इ.१२ वी मधून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रथम प्राधान्याने प्रवेश देण्यात यावा.

२. संस्थानमध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांच्या (कायम/कंत्राटी/आऊटसोर्स) पाल्यांना प्राधान्य देण्यात यावा.

३. त्यानंतर शिर्डी व पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांना प्राधान्य राहील.

४. या बरोबरच विद्यापीठाचे मार्गदर्शक तत्वानुसार व नियमावलीनुसार प्रवेश प्रक्रिया राबविता येईल.

(ब) द्वितीय वर्षाची प्रवेश प्रक्रिया प्रथम वर्षाचे निकाल लागल्यानंतर राबविणे गरजेचे आहे. सदर प्रवेश प्रक्रिया राबवितांना विद्यापीठाचे मार्गदश्क तत्वानुसार संस्थान महाविद्यालयातील प्रथम वर्षाचे विद्यार्थ्यांना प्रथम प्राधान्य व त्यानंतर इतर विद्यार्थ्यांना प्रवेश देता येईल.

(क) मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१.०६.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.३७० अन्वये नवीन वरिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रवेशप्रक्रिया राबविंना विद्यापीठाचे मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करुन पुढील निकषांप्रमाणे प्रवेश देण्याचे ठरले.

१. संस्थानचे कनिष्ठ महाविद्यालयातील इ.१२ वी मधून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रथम प्राधान्याने प्रवेश देण्यात यावा.

२. संस्थानमध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांच्या (कायम/कंत्राटी/आऊटसोर्स) पाल्यांना प्राधान्य देण्यात यावा.

३. शिर्डी व पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांना प्राधान्य राहील.

४. विद्यापीठाचे मार्गदर्शक तत्वानुसार व नियमावलीनुसार प्रवेश प्रक्रिया राबविता येईल.

विद्यापीठाचे मार्गदर्शक तत्वानुसार विनाअनुदानित महाविद्यालयांसाठी प्रस्तावित केलेले प्रथम वर्ष बी.ए. करिता रु.३,५६५/-, बी.कॉम.करिता रु.३,४२५/- व बी.एस्सी.करिता रु.४,०६५/- मात्र शुल्क विद्यार्थ्यांकडून आकारण्यात यावे. तसेच वेळोवेळी विद्यापीठाचे परिपत्रकानुसार सुधारीत शुल्क आकारणी करण्यात यावी, असे ठरले आहे.

(ड) विद्यार्थ्यांकडून आकारावयाचे शैक्षणिक शुल्काबाबत विद्यापीठ आदेश क्र.५४२ दि.१७.०२.२०११ नुसार शैक्षणिक शुल्क व इतर शुल्क घेणेबाबत निर्देश आहेत. शुल्कासबंधी आदेश पी.जी.एस.७८५२

दि.२३.१२.२००९ हा विद्यापीठाचे संकेतस्थळावर उपलबध आहे, त्याची प्रत सोबत जोडलेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

तक्ता क्र.०१ - प्रथम वर्ष

| अ.क्र. | शुल्काचा तपिशल | अनुदानित | | | विना अनुदानित | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | F.Y.B.A. | F.Y.B.Com | F.Y.B.Sc. | F.Y.B.A. | F.Y.B.Com | F.Y.B.Sc. |
| 01. | Registration Fee | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 |
| 02. | Admission Fee | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| 03. | Tuition Fee | 800 | 800 | 800 | 3900 | 3900 | 5200 |
| 04. | Laboratory Fee | - | 40 | 100 | - | 345 | 9200 |
| 05. | Library Fee | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 06. | Laboratory Deposit | - | - | 150 | - | | 150 |
| 07.. | Gymkhana Fee | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 08. | Library Deposit | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 |
| 09. | Computerisation Fee | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 |
| 10. | Student Aid. Fund | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 11. | Ashwhamegh Fee | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 |
| 12. | Disaster Management | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| 13. | Student Welfare Fund | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 14. | Student Insurance | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 15. | Medical Fee | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 |
| 16. | Eligibility Fee | 300 | 300 | 300 | 300 | 300 | 300 |
| 17. | Development Fee | 125 | 125 | 125 | 125 | 125 | 125 |
| 18. | Student Activities | 950 | 950 | 950 | 950 | 950 | 950 |
| 19. | Vridhi Process | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 20. | NSS Fee | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 21. | Tutorial/ Seminar / Workshop Test Fee | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 22. | Comp.Lab.Dev.Fee | 300 | 300 | 300 | 300 | 300 | 300 |
| 23. | Magazine Fee | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| | Total Fee | 3340 | 3380 | 3690 | 6440 | 6785 | 17090 |

तक्ता क्र.०२ द्वितीय वर्ष

| अ.क्र. | शुल्काचा तपिशल | अनुदानित | | | विना अनुदानित | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | S.Y.B.A. | S.Y.B.Com | S.Y.B.Sc. | S.Y.B.A. | S.Y.B.Com | S.Y.B.Sc. |
| 01. | Registration Fee | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 |
| 02. | Admission Fee | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| 03. | Tuition Fee | 800 | 800 | 800 | 3900 | 3900 | 5200 |
| 04. | Laboratory Fee | - | 80 | 100 | - | 345 | 9200 |
| 05. | Library Fee | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 06. | Laboratory Deposit | - | - | - | - | - | - |
| 07.. | Gymkhana Fee | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 08. | Library Deposit | - | - | - | - | - | - |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 09. | Computerisation Fee | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 |
| 10. | Student Aid. Fund | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 11. | Ashwhamegh Fee | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 |
| 12. | Disaster Management | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| 13. | Student Welfare Fund | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 14. | Student Insurance | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 15. | Medical Fee | - | - | - | - | - | - |
| 16. | Eligibility Fee | - | - | - | - | - | - |
| 17. | Development Fee | 125 | 125 | 125 | 125 | 125 | 125 |
| 18. | Student Activities | 950 | 950 | 950 | 950 | 950 | 950 |
| 19. | Vridhi Process | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 20. | NSS Fee | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 21. | Tutorial/ Seminar / Workshop Test Fee | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 22. | Comp.Lab.Dev.Fee | 300 | 300 | 300 | 300 | 300 | 300 |
| 23. | Magazine Fee | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| | Total Fee | 2830 | 2910 | 2930 | 5930 | 6275 | 16430 |

उपरोक्त नमुद तक्त्यामध्ये अ.क्र.१९ Vridhi Process फी ही विद्यापीठाचे फी व्यतिरिक्त नमुद केलेली आहे. कारण सदरची रक्कम ही सबंधीत Software कंपनीस आदा करावी लागणार आहे. तसेच अ.क्र.२० ते २३ चे शुल्क हे महाविद्यालयाचे विकासासाठी व इतर कार्यक्रमांसाठी स्विकारण्यात येत असते.

विद्यापीठाचे मार्गदर्शक तत्त्वानुसार अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांसाठी शुल्क आकरणी करण्यात येत असते. यापैकी काही रक्कम नियमानुसार विद्यापीठास अदा करावी लागते. त्याबाबतचे चलन वेळोवेळी विद्यापीठाकडून कळविण्यात येत असते. संस्थानमार्फत सुरु करण्यात येणारे महाविद्यालय हे कामय विनाअनुदानित तत्त्वावर चालविण्यात येत आहे.

तसेच सदरची प्रवेश प्रक्रिया राबवितांना वृद्धी सॉफ्टेवअरद्वारे ऑनलाईन पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबविता येईल, तसेच विद्यार्थ्यांकडून स्विकारण्यात येणारे शुल्क हे रोख स्वरुपात न घेता, विद्यार्थ्यांना चलनाद्वारे बँकेत भरणा करणेबाबत कळविता येईल, असे नम्र मत आहे.

मागणी– तरी उपरोक्त तक्ता क्र.०१ प्रथम वर्ष व तक्ता क्र.०२ द्वितीय वर्षाकरिता नमुद शैक्षणिक शुल्कामधील अनुदानित अथवा विनाअनुदानित यापैकी कोणत्याही स्वरुपाचे शुल्क स्विकारावे याबाबत निर्णय होणेस तसेच तसेच सदरची प्रवेश प्रक्रिया राबवितांना वृद्धी सॉफ्टेवअरद्वारे ऑनलाईन पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२४२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा महाविद्यालयाचे प्रथम व व्दितीय वर्ष प्रवेशाकरीता विद्यापीठाचे मार्गदर्शक तत्त्वानुसार अनुदानित स्वरुपाचे शुल्क स्विकारणेत यावे, असे ठरले. तसेच सदरची प्रवेश प्रक्रिया वृद्धी सॉफ्टवेअरद्वारे ऑनलाईन पद्धतीने राबविणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा महाविद्यालय)**

---

**विषय नं.७१** **श्री साईबाबा महाविद्यालय कला, वाणिज्य व विज्ञान शाखा प्रथम व व्दितीय वर्षाकरीता आवश्यक प्राध्यापक भरतीबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमः- अधिनियम २००४ मधील तरतुद क्र.१७ (१) व १७ (२) (ढ) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील. तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

प्रस्ताविकः- मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३-२४.०५.२०१७ चे सभेतील निर्णय क्र.४५० अन्वये संस्थानचे कला, वाणिज्य, विज्ञान शाखेचे वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणेस तसेच त्यासाठी राहाता तालुक्याचा बृह्द आराखडयात समावेश करणेकामी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचेकडे पाठपुरावा करण्यात येऊन, पुढील शैक्षणिक वर्षामध्ये शासन मान्यता मिळवून वरिष्ठ महाविद्यालय सुरु करता येईल, अशी कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले

श्री साईबाबा सस्थानचे नवीन वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणेकामी महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन आदेश क्रमांक – मान्यता – २०१८/(३०/१८)/माशि-४, दि.२८ फेब्रुवारी, २०१८ चे आदेशान्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मिळाले आहे. तसेच शासन आदेश क्रमांक एनजीसी २०१८/(१००/१८)/ मशि-४, दि.१५ जून, २०१८ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये नवीन महाविद्यालय सुरु करण्यास मान्यता देण्यात आली. उपरोक्त संदर्भ क्र.०४ चे आदेशान्वये श्री साईबाबा महाविद्यालय हा स्वतंत्र विभाग सुरु करण्यात आलेला असून, सदर महाविद्यालयाचे दैनंदिन कामकाजसाठी ०२ लिपीक टंकलेखक व ०२ मदतनीस कर्मचारी नेमण्यात आलेले आहेत. तसेच नवीन महाविद्यालयाचा शुभारंभ कार्यक्रम दि.१७.०७.२०१८ रोजी करण्यात आलेला आहे. शासनाकडून व विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार महाविद्यालयामध्ये तीनही शाखेंच्या प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेस दि.२० जुन, २०१८ पासून सुरुवात करण्यात आलेली असून, प्रथम वर्षाकरिता तीन्ही शाखेत एकुण ३१५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेले आहेत.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४.०४.२०१८ चे सभेतील निर्णयानुसार वरिष्ठ महाविद्यालयाकरिता शासन स्तरावरुन स्वतंत्र आकृतीबंध निश्चित न करता सह संचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग यांचेकडील प्रतिवर्षी संच मान्यतेनुसार आकृतीबंध कायम ठेवणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार इकडील जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/७३/२०१८ दि.०५ एप्रिल, २०१८ अन्वये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडे वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणेबाबत व त्यासाठी आवश्यक आकृतीबंधाबाबत मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. त्यास विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक सासंवि-१०१८/६५६/प्र.क्र. ५६/का.१६ दि.१२ जुलै, २०१८ अन्वये मान्यता दिलेली आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०.०६.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.४५० अन्वये श्री साईबाबा महाविद्यालयासाठी आवश्यक सहाय्यक प्राध्यापकांची पुर्णवेळ तासिका तत्वावर नेमणूक करणेकामी दि.०७ ऑगस्ट, २०१८ रोजी मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत. सदर मुलाखतीद्वारे निवड केलेल्या उमेदवारांना प्रति माह रु.१५,०००/- मात्र मानधनावर दि.२०.०८.२०१८ रोजी नेमणूक आदेश देण्यात आलेल्या आहेत. सदर नेमणूक आदेशानुसार खालीलप्रमाणे प्राध्यापक हजर झालेले होते.

**<u>तक्ता क्र.०१</u>**

| अ.क्र. | सहाय्यक प्राध्यापकाचे नांव | विषय | हजर दिनांक |
|---|---|---|---|
| ०१. | श्री.शिवाजी गोरक्षनाथ ढोकणे | राज्यशास्त्र | दि.२१.०८.२०१८ |
| ०२. | डॉ.योगिता अरुण् कोपटे (गायकवाड) | कॉमर्स | दि.२१.०८.२०१८ |
| ०३. | श्रीमती शितल अरविंद धरम | इतिहास | दि.२१.०८.२०१८ |
| ०४. | श्री.किशोर रामदास शेळके | इंग्रजी | दि.२३.०८.२०१८ |
| ०५. | श्रीमती स्वप्नाली रमेश खांडरे | अर्थशास्त्र | दि.२४.०८.२०१८ |
| ०६. | श्री.अमोल झुंबर कचरे | भूगोल | दि.२५.०८.२०१८ |
| ०७. | श्रीमती सोनाली रामदास हरदास | हिंदी | दि.२५.०८.२०१८ |
| ०८. | श्रीमती सुनिता सकाहरी वडितके | मराठी | दि.२५.०८.२०१८ |
| ०९. | श्री.गणेश रामचंद्र भांड | भौतिकशास्त्र | दि.२७.०८.२०१८ |
| १०. | श्री.दिपक बाबासाहेब पटारे | वनस्पतीशास्त्र | दि.२७.०८.२०१८ |
| ११. | श्री.अशिष ओमप्रकाश धोकटे | रसायनशास्त्र | दि.३०.०८.२०१८ |
| १२. | श्री.अजिंक्य भरतराज पाटील | प्राणीशास्त्र | दि.०८.०९.२०१८ |
| १३. | श्री.गणेश भानुदास मगर | गणित | हजर झाले नाही. |

गणित विषयासाठी निवड झालेले प्राध्यापक हे हजर झालेले नसल्याने जा.क्र.एसएसएस/वरिष्ठ महाविद्यालय/१२०८/२०१८ दि.२६ जुलै, २०१८ अन्वये व्हिजिटींग पद्धतीने प्राध्यापकांना आमंत्रित करुन,

अभ्यासक्रम पुर्ण करुन घेण्यात येत आहे. तसेच अ.क्र.१२ श्री.अजिंक्य भरतराज पाटील – सहा. प्राध्यापक प्राणीशास्त्र यांनी दि.१० डिसेंबर, २०१८ रोजी राजीनामा दिला असून, जा.क्र.एसएसएस/साप्रशा/ आस्था/ ४६६२/२०१८ दि.२२.१२.२०१८ अन्वये दि.३१.१२.२०१८ पासून राजीनामा मंजुर करण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर विषयासाठी देखील व्हिजिटींग पद्धतीने प्राध्यापकांना आमंत्रित करुन, अभ्यासक्रम पुर्ण करुन घेण्यात येत आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५.१०.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.६१३ (२१) नुसार श्री साईबाबा वरिष्ठ महाविद्यालयात B.Sc.(Computer Science) व BCA हा नवीन अभ्यासक्रम व कला, वाणिज्य शाखेची दुसरी तुकडी तसेच नैसर्गिक तुकडीवाढीचे वर्ग शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० मध्ये सुरु करणेस मान्यता मिळालेली आली. त्याबाबतचा प्रस्ताव सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात दाखल करण्यात आलेला असून, त्याकामी विद्यापीठाकडील तज्ञ समितीने नुकतीच महाविद्यालयास समक्ष भेट देऊन पाहणी करुन, B.Sc.(Computer Science) व BCA हा नवीन अभ्यासक्रम व कला, वाणिज्य शाखेची दुसरी तुकडी तसेच नैसर्गिक तुकडीवाढीचे वर्ग शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० मध्ये सुरु करणेबाबत शिफारस केलेली आहे. त्याची अंतिम मंजुरी प्राप्त होणे बाकी आहे. मात्र द्वितीय वर्षाचे वर्ग जुन २०१९ चे दुस-या आठवडयात सुरु करावयाचे असल्याने शासनाचे व विद्यापीठाचे मंजुरीचे अधीन राहून श्री साईबाबा महाविद्यालयाचे प्रथम व द्वितीय वर्षाकरिता आवश्यक प्राध्यापक भरतीबाबत कार्यवाही करणे योग्य राहील.

**(अ)** इकडील कार्यालयाकडील जा.क्र.एसएसएस/वरिष्ठ महाविद्यालय/११९/२०१८ दि.१८.०१२.२०१८ व जा.क्र.एसएसएस/ वरिष्ठ महाविद्यालय/१८१/२०१९ दि.१४.०२.२०१९ रोजीचे पत्रान्वये वरिष्ठ महाविद्यालयासाठी नेमण्यात आलेले शैक्षणिक सल्लागा श्री.अरुण कुंभारे यांचेकडे श्री साईबाबा महाविद्यालयामध्ये सन २०१९-२० या वर्षापासून B.Sc.(Computer Science) व BCA हे नवीन अभ्यासक्रमासाठी आवश्यक मनुष्यबळ, वर्ग, खोल्या, फर्निचर व इतर अनुषंगिक येणा-या खर्चाबाबत मार्गदर्शन मागविण्यात आलेले होते. त्यानुसार पुढील वर्षीसाठी असणारा कार्यभार, त्यानुसार अनुज्ञेय पदे व नव्याने भरावयाची पदे याबाबतची माहिती सादर केलेली आहे. त्यानुसार नैसर्गिक तुकडीवाढ, विशेषस्तर विषय यांचे अवलोकन करता सन २०१९-२० मध्ये प्राध्यापकांचा कार्यभार व पदसंख्या खालीलप्रमाणे राहील.

तक्ता क्र.०२

| अ.क्र. | विषय | आकृतीबंधामध्ये मंजुर पदे | | सध्या कार्यरत असलेले पदे | कार्यभार प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष | कार्याभारानुसार अनुज्ञेय व सुधारीत आकृतीबंधामध्ये समावेश करावयाची पदे | | नव्याने आवश्यक (भरती करावयाची) असलेले पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुर्णवेळ | CHB | | | पुर्ण वेळ | CHB | पुर्ण वेळ |
| ०१. | इंग्रजी | ०० | ०१ | ०१ पुर्णवेळ | १६ | ०१ | ०० | ०१ |
| ०२. | मराठी | ०० | ०१ | ०१ पुर्णवेळ | २४ | ०१ | ०० | ०१ |
| ०३. | हिंदी | ०० | ०१ | ०१ पुर्णवेळ | २० | ०१ | ०० | ०१ |
| ०४. | भूगोल | ०० | ०१ | ०१ पुर्णवेळ | १६ | ०१ | ०० | ०१ |
| ०५. | राज्यशास्त्र | ०० | ०१ | ०१ पुर्णवेळ | १६ | ०१ | ०० | ०१ |
| ०६. | इतिहास | ०० | ०१ | ०१ पुर्णवेळ | १६ | ०१ | ०० | ०१ |
| ०७. | अर्थशास्त्र | ०० | ०१ | ०१ पुर्णवेळ | २८ | ०१ | ०१ | ०१ |
| ०८. | तत्वज्ञान | ०० | ०१ | ०० | ०४ | ०० | ०० | ०० |
| ०९. | समाजशास्त्र | ०० | ०१ | ०० | ०४ | ०० | ०० | ०० |
| १०. | मानसशास्त्र | ०० | ०१ | ०० | ०४ | ०० | ०० | ०० |
| ११. | वाणिज्य | ०१ | ०० | ०१ पुर्णवेळ | ३२ | ०२ | ०० | ०२ |
| १२. | पदार्थ विज्ञान/भौतिकशास्त्र | ०२ | ०० | ०१ पुर्णवेळ | ७० | ०३ | ०१ | ०३ |
| १३. | रसायनशास्त्र | ०२ | ०० | ०१ पुर्णवेळ | ७० | ०३ | ०१ | ०३ |
| १४. | वनस्पतीशास्त्र | ०१ | ०० | ०१ पुर्णवेळ | ७० | ०३ | ०१ | ०३ |
| १५. | प्राणीशास्त्र | ०२ | ०० | १ CHB | ६६ | ०३ | ०१ | ०३ |
| १६. | सुक्ष्मजीवशास्त्र | ०२ | ०० | ०० | ०४ | ०० | ०१ | ०० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १७. | गणित (BCA व B.Sc. (Computer Science) सह ) | ०० | ०१ | १ CHB | ६६ | ०३ | ०० | ०३ |
| | एकुण | १० | ११ | ११ पुर्णवेळ ०२ CHB | - | २४ | ०६ | २४ |

तक्ता क्र.३ - शिक्षकेतर कर्मचारी

| अ.क्र. | पदाचे नांव | मंजुर पदे | नव्याने आवश्यक पदे |
|---|---|---|---|
| ०१. | मुख्य लिपीक | ०१ | ०१ |
| ०२. | वरिष्ठ लिपीक | ०१ | ०१ |
| ०३. | कनिष्ठ लिपीक | ०१ | ०२ |
| ०४. | प्रयोगशाळा सहाय्यक | ०१ | ०२ |
| ०५. | प्रयोगशाळा परिचर | ०३ | ०६ |
| ०६. | ग्रंथालय परिचर | ०१ | ०१ |
| ०७. | शिपाई | ०३ | ०५ |
| | एकुण | ११ | १८ |

सन २०१९-२० मध्ये नैसर्गिक तुकडीवाढीचे वर्ग, द्वितीय वर्षाचे वर्ग, विशेषस्तर विषय सुरु करणेकामी प्राध्यापक भरतीकामी खालीलप्रमाणे उपाययोजना करणे गरजेचे आहे.

१. नैसर्गिक तुकडीवाढीचे वर्ग, द्वितीय वर्षाचे वर्ग, विशेषस्तर विषयाकरिता नव्याने आवश्यक सहा.प्राध्यापकांची सामान्य प्रशासन विभागामार्फत जाहिरात देऊन नेमणूक करणे.

२. विद्यापीठाचे नियमानुसार प्राध्यपकांची नेमणूक करणेबाबत मुलाखती घेतल्यानंतर केलेल्या कार्यवाहीबाबत व नेमणूक केलेल्या प्राध्यापकांची माहिती ७२ तासांचे आंत विद्यापीठास विहित नमुन्यात कळवावी लागते, त्यानंतरच सदर प्राध्यपकांना विद्यापीठाकडून Approval प्राप्त होत असते. असे श्री.कुंभारे यांनी तोंडी चर्चेमध्ये सांगितलेले आहे. मात्र सध्या कार्यरत असलेल्या प्राध्यपकांचे बाबतीत सदरची कार्यवाही करण्यात आलेली नाही. कारण प्राध्यापक भरतीच्या मुलाखती दि.०७.०८.२०१८ रोजी झाल्यानंतर दि.२०.०८.२०१८ रोजी नेमणूक पत्र दिलेले आहेत. म्हणजे किमान १२ दिवसानंतर प्राध्यपकांच्या नेमणूका करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे सदर वेळी Approval घेण्याची कार्यवाही करता आली नाही. त्यामुळे सध्या कार्यरत असलेल्या प्राध्यापकांचे विद्यापीठाकडून Approval मिळालेले नाही. त्यामुळे सदर प्राध्यापकांचे Approval घेणेकामी त्यांचे पदांची देखील सामान्य प्रशासन विभागामार्फत पुन्हा जाहिरात देणे आवश्यक आहे, असे नम्र मत आहे.

३. तसेच शिक्षकेतर कर्मचारी हे संस्थानचे विविध विभागांतून अथवा कंत्राटी स्वरुपात नेमता येतील.

उपरोक्तनुसार नैसर्गिक तुकडीवाढीचे वर्ग, द्वितीय वर्षाचे वर्ग, विशेषस्तर विषयांसाठी आवश्यक प्राध्यापक भरती करणेकामी जाहिरात देऊन नेमणूका करणेस, तसेच सुधारीत आकृतीबंधास महाराष्ट्र शासनाची मान्यता घेणे व इतर अनुषंगिक बाबींना मान्यता मिळणेकामी इकडील कार्यालयामार्फत दि.२३.०२.२०१९ रोजी टिपणी सादर केली असता, सदर टिपणीवर "मागणी अ, ब व क ह्या आस्थापना विषयक असल्याने सदरची मागणी आस्थापना (सामान्य प्रशासन) विभागामार्फत सादर करावे असे मत आहे" असे निर्देश दिलेले आहेत.

त्यानुसार सदरची नस्ती सामान्य प्रशासन विभागाकडे वर्ग करण्यात आलेली असून, सदरबाबत सामान्य प्रशासन विभागामार्फत कार्यवाही सुरु आहे, त्याबाबत त्यांनी शैक्षणिक सल्लागार डॉ.अरुण कुंभारे यांचेशी पत्रव्यवहार केलेला आहे.

तसेच दि.२३.०२.२०१९ रोजीचे टिपणीवरील निर्देशानुसार व सामान्य प्रशासन विभागाकडील मार्गदर्शनानुसार इकडील कार्यालयामार्फत दि.२६.०४.२०१९ रोजी टिपणी सादर केली असता, सदर टिपणीवर प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मुख्यलेखाधिकारी यांचे अभिप्राय घेणेबाबत दिलेले होते, त्याबाबत मुख्यलेखाधिकारी यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत.

१. आस्थापना विभाग, शैक्षणिक संकुल व डॉ.अरुण कुंभारे यांची संयुक्त बैठक बोलवावी.

२. जुन्या मानधनावरील शिक्षकांचे मुदतवाढीसंदर्भात सदर मुदतवाढ किती कालावधीसाठी द्यावयाची.

३. नवील भरतीसंदर्भात कार्यपद्धती, वेळापत्रक

४. पुणे विद्यापीठाकडून पुर्ण करुन घ्यावयाच्या पुर्तता उपरोक्तबाबत चर्चा करुन निर्णय घ्यावा.

याबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आस्थापना विभागाने सविस्तर तपासणी करावी असे निर्देश दिलेले होते.

मुख्यलेखाधिकारी यांचे अभिप्रायानुसार दि.१३.०५.२०१९ रोजी मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात आस्थापना विभाग, शैक्षणिक संकुल व सल्लागार डॉ.अरुण कुंभारे यांचे समवेत संयुक्त बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आलेली आहे.

अ) द्वितीय वर्षाचे वर्ग, विशेषस्तर विषय तसेच B.Sc.(Computer Science), BCA चे वर्ग सुरु करणेकामी महाराष्ट्र शासनाची तसेच पुणे विद्यापीठाची मान्यता मिळणे बाकी आहे, मात्र सदर मान्यतेचे अधीन राहुन कार्यवाही सरु करण्यात यावी. तसेच नवीन आकृतीबंधाबाबत देखील मा.विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेस अधीन राहुन भरतीप्रक्रिया राबविण्यात यावी.

आ) प्रथम व द्वितीय वर्षाचे वर्ग तसेच विशेषस्तर विषय याचा व B.Sc.(Computer Science), BCA या नवीन अभ्यासक्रमांसाठी दोन स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्यात यावे.

इ) तक्ता क्र.०२ मध्ये नमुद केलेप्रमाणे प्राध्यपकांचे भरतीबाबतची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागामार्फत करण्यात यावी.

ई) प्राध्यापक भरतीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अभिप्राय ७२ तासंचे आंत पुणे विद्यापीठाकडे सादर करण्यात यावा.

उ) नव्याने नेमणूक करावयाचे प्राध्यापकांचे मानधनाबाबत सल्लागार डॉ.अरुण कुंभारे यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय घेण्यात येईल, असे ठरले. (सोबत तक्ता जोडलेला आहे.)

मागणी– त्यामुळे वरिष्ठ महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० करिता नैसर्गिक तुकडीवाढीचे वर्ग, द्वितीय वर्षाचे वर्ग च विशेषस्तर विषयांचे अध्यापनासाठी उपरोक्त नमुद "अ" ते "उ" प्रमाणे कार्यवाही करुन, तक्ता क्र.२ मध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यभारानुसार अनुज्ञेय होणारी पदांचा सुधारीत आकृतीबंधामध्ये समावेश करणेस, तसेच आवश्यक प्राध्यापकांची सामान्य प्रशासन विभागामार्फत विहित पद्धतीने भरतीप्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेस विनंती.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत – मागणी परिच्छेदात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२४३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० करीता नैसर्गिक तुकडी वाढीचे वर्ग, द्वितीय वर्षाचे वर्ग व विशेषस्तर विषयांचे अध्यापनासाठी कार्यभारानुसार अनुज्ञेय होणाऱ्या पदांचा सुधारीत आकृतीबंधामध्ये समावेश करणेस मान्यता देण्यात आली. तसेच आवश्यक प्राध्यापकांची भरती ही पुर्वीच्या प्राध्यापक भरती प्रक्रियेनुसार व त्यामधील प्रतिक्षायादी मधुन करण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा महाविद्यालय)**

---

**विषय नं.७२** **श्री साईबाबा महाविद्यालय B.Sc.(Computer Science) व BCA अभ्यासक्रमासाठी आवश्यक प्राध्यापक भरतीबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमः- अधिनियम २००४ मधील तरतुद क्र.१७ (१) व १७ (२) (ढ) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील. तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक – मा.व्य.समितीचे दि.०५.१०.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.६१३ (२१)

प्रस्ताविकः- श्री साईबाबा सस्थानचे नवीन वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणेकामी महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन आदेश क्रमांक – मान्यता – २०१८/(३०/१८)/माशि-४, दि.२८ फेब्रुवारी, २०१८ चे आदेशान्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मिळाले आहे. तसेच शासन आदेश क्रमांक एनजीसी २०१८/(१००/१८)/ मशि-४, दि.१५ जून, २०१८ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये नवीन महाविद्यालय सुरु करण्यास मान्यता देण्यात आली. उपरोक्त संदर्भ क्र.०४ चे आदेशान्वये श्री साईबाबा महाविद्यालय हा स्वतंत्र विभाग सुरु करण्यात आलेला असून, सदर महाविद्यालयाचे दैनंदिन कामकाजसाठी ०२ लिपीक टंकलेखक व ०२ मदतनीस कर्मचारी नेमण्यात आलेले आहेत. तसेच नवीन महाविद्यालयाचा शुभारंभ कार्यक्रम दि.१७.०७.२०१८ रोजी करण्यात आलेला आहे. शासनाकडून व

विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार महाविद्यालयामध्ये तीनही शाखेंच्या प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेस दि.२० जुन, २०१८ पासून सुरुवात करण्यात आलेली असून, प्रथम वर्षाकरिता तीन्ही शाखेत एकुण ३१५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेले आहेत.

विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक सासंवि-१०१८/६५६/प्र.क्र. ५६/का.१६ दि.१२ जुलै, २०१८ अन्वये वरिष्ठ महाविद्यालयाचे प्रथम वर्षाकरिता आवश्यक प्राध्यापक व शिक्षकेतर पदांचे आकृतीबंधास मान्यता दिलेली आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०.०६.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.४५० अन्वये श्री साईबाबा महाविद्यालयासाठी आवश्यक सहाय्यक प्राध्यपकांची पुर्णवेळ तासिका तत्वावर नेमणूक करणेकामी दि.०७ ऑगस्ट, २०१८ रोजी मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत. सदर मुलाखतीद्वारे निवड केलेल्या उमेदवारांना प्रति माह रु.१५,०००/- मात्र मानधनावर नेमणूक आदेश देण्यात आलेल्या आहेत

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५.१०.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.६१३ (२१) नुसार श्री साईबाबा वरिष्ठ महाविद्यालयात B.Sc.(Computer Science) व BCA हा नवीन अभ्यासक्रम व कला, वाणिज्य शाखेची दुसरी तुकडी तसेच नैसर्गिक तुकडीवाढीचे वर्ग शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० मध्ये सुरु करणेस मान्यता मिळालेली आली. त्याबाबतचा प्रस्ताव सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात दाखल करण्यात आलेला असून, त्याकामी विद्यापीठाकडील तज्ञ समितीने नुकतीच महाविद्यालयास समक्ष भेट देऊन पाहणी करुन, B.Sc.(Computer Science) व BCA हा नवीन अभ्यासक्रम व कला, वाणिज्य शाखेची दुसरी तुकडी तसेच नैसर्गिक तुकडीवाढीचे वर्ग शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० मध्ये सुरु करणेबाबत शिफारस केलेली आहे. B.Sc.(Computer Science), BCA चे वर्ग सुरु करणेकामी महाराष्ट्र शासनाची तसेच पुणे विद्यापीठाची मान्यता मिळणे बाकी आहे, सदर मान्यतेचे अधीन राहुन कार्यवाही करता येईल.

(अ) इकडील कार्यालयाकडील जा.क्र.एसएसएस/वरिष्ठ महाविद्यालय/११९/२०१८ दि.१८.०१२.२०१८ व जा.क्र.एसएसएस/ वरिष्ठ महाविद्यालय/१८१/२०१९ दि.१४.०२.२०१९ रोजीचे पत्रान्वये वरिष्ठ महाविद्यालयासाठी नेमण्यात आलेले शैक्षणिक सल्लागा श्री.अरुण कुंभारे यांचेकडे श्री साईबाबा महाविद्यालयामध्ये सन २०१९-२० या वर्षापासून B.Sc.(Computer Science) व BCA हे नवीन अभ्यासक्रमासाठी आवश्यक मनुष्यबळ, वर्ग, खोल्या, फर्निचर व इतर अनुषंगिक येणा-या खर्चाबाबत मार्गदर्शन मागविण्यात आलेले होते. त्यानुसार त्यांनी दि.१६.०२.२०१९ रोजी ई-मेलद्वारे पुढील वर्षीसाठी असणारा कार्यभार व त्यानुसार आवश्यक प्राध्यपकांची माहिती सादर केलेली आहे. त्यानुसार नैसर्गिक तुकडीवाढ, विशेषस्तर विषय व नवीन अभ्यासक्रमांचे अवलोकन करता सन २०१९-२० मध्ये प्राध्यापकांचा कार्यभार व पदसंख्या खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | विषय | कार्यभार प्रथम वर्ष | कार्यभारानुसार अनुज्ञेय व सुधारीत आकृतीबंधामध्ये समावेश करावयाची पदे | | नव्याने आवश्यक (भरती करावयाची) असलेले पदे |
|---|---|---|---|---|---|
| | | | पुर्ण वेळ | CHB | पुर्ण वेळ |
| | प्रथम वर्ष बी.एस्सी (कॉम्पयुटर सायन्स) | | | | |
| ०१. | गणित(बी.एस्सी.मध्ये नमुद केले आहे.) | ४२ | ०० | ०० | ०० |
| ०२. | Statistics | २२ | ०१ | ०० | ०१ |
| ०३. | Electronics | २२ | ०१ | ०० | ०१ |
| ०४. | Computer Sciecnce<br>१. Computer C Programming<br>२. File Organization, DBMS | ३८ | ०१ | ०१ | ०१ |
| | प्रथम वर्ष बी.सी.ए. (विज्ञान) | | | | |
| ०१. | Computer Science<br>१. Fundamentals of Computer<br>२. Basic Programming in C<br>3. Computer Organization<br>4. Advanced Programming<br>5. RDBMS | ६२ | ०२ | ०० | ०२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०२. | गणित (बी.एस्सी. नमुद केले आहे.) | १० | ०० | ०० | ०० |
| ०३. | इंग्रजी | ०६ | ०० | ०० | ०० |
| | | एकुण | ०५ | ०१ | ०५ |

सन २०१९-२० मध्ये B.Sc.(Computer Science) व BCA हे नवीन अभ्यासक्रम सुरु करणेकामी उपरोक्त तक्त्यात नमुद केलेल्या विषयांनुसार नव्याने आवश्यक सहा.प्राध्यापकांची सामान्य प्रशासन विभागामार्फत जाहिरात देऊन नेमणूक करावी लागेल. त्यासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता खालीलप्रमाणे –

| अ.क्र. | अध्यापनाचे विषय | आवश्यक प्राध्यापक संख्या पुर्णवेळ | आवश्यक शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| ०१. | Electronics | ०१ | M.Sc. (Electronics ), SET/NET/Ph.D. |
| ०२. | Computer Science | ०३ | MCS/ M.Sc. (Computer Science), SET/NET/Ph.D. |
| ०३. | Statistics | ०१ | M.Sc. (Statistics ), SET/NET/Ph.D. |
| | एकुण | ०५ | |

उपरोक्तनुसार B.Sc.(Computer Science) व BCA अभ्यासक्रमांसाठी आवश्यक प्राध्यापकभरती करणेकामी महाराष्ट्र शासनाची तसेच पुणे विद्यापीठाचे मान्यतेचे अधीन राहुन सामान्य प्रशासन विभागामार्फत जाहिरात देऊन नेमणूका करता येतील, असे नम्र मत आहे.

मागणी– प्रास्ताविकात नमूद केलेली वस्तुस्थितीचे अवलोकन करता सन २०१९-२० मध्ये वरिष्ठ महाविद्यालयाकडील प्रथम वर्ष B.Sc.(Computer Science) व BCA चे वर्ग माहे जुन-२०१९ मध्ये सुरु करणे क्रमप्राप्त आहे. करिता B.Sc.(Computer Science) व BCA करिता आवश्यक प्राध्यपकांची सामान्य प्रशासन विभागामार्फत वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करुन भरतीप्रक्रिया करणेस मान्यता मिळणेस विनंती.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत- मागणी परिच्छेदामध्ये नमूद केलेनुसार B.Sc.(Computer Science) व BCA अभ्यासक्रमाचे अध्यपनासाठी आवश्यक प्राध्यपकांची सामान्य प्रशासन विभागामार्फत विहित पद्धतीने भरती करणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.२४४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा महाविद्यालयामध्ये B.Sc.(Computer Science) व BCA अभ्यासक्रमाचे वर्ग सुरु करणेसाठी महाराष्ट्र शासनाची तसेच पुणे विद्यापीठाची मान्यता घेण्यात यावी, व त्यानंतर सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात यावा,असे ठरले.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा महाविद्यालय)**

---

**विषय नं.७३ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये फेब्रुवारी २०१९ महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.९०,४५,१९८/- ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय बिलात सवलत देण्या संबंधित मा.व्य.स.निर्णय क्र.५१९/दि.२४.०७.२०११ संमत झाला आहे. वैद्यकिय बिलात सवलत देण्याचे अधिकार उप.वै.संचालक/वै.संचालक यांना देण्यात आलेले आहेत त्यांचे गैर हजेरीत वै.प्रशासक/जनसंपर्क अधिकारी यांना अधिकार सुपुर्त करण्यात येऊन रुग्णांना मासिक वैद्यकिय बिलात सवलत देण्यात येते.

सोशल वर्कर हे रुग्णांची आर्थिक परिस्थीती जाणून घेतात व आवश्यक कागदपत्रांसह सवलत मंजुरी करीता प्रस्तावीत करतात.अशा प्रकारे हॉस्पिटलमध्ये वैद्यकिय बिलात सवलत देण्याकरीता स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. निर्णय क्र.५६४/२६.०६.२०१४ अन्वये प्रत्येक महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेण्यात येऊन आर्थिक वर्षाच्या शेवटी एकत्रित अहवाल मा.व्य.स.चे सभे समोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावा असे ठरले आहे. माहे सप्टेंबर २०१७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मान्यतेचे प्रस्तावावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दर महा मा.व्य.समिती सभेसमोर सादर करण्यास शेरा दिला आहे. त्याप्रमाणे माहे फेब्रुवारी२०१९ मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलला ओपीडी रुग्ण १४,२१६ व ९,६३ आयपीडी रुग्णांपैकी ३,५८८ ओपीडी व ५३८ आयपीडी रुग्णांना वैद्यकिय बिलात एकुण

रु.८४,७८,८९८/- इतकी सवलत देण्यात आली व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय बिलात सवलत देण्या संबंधीत मा.व्य.स.निर्णय क्रं.३४६/ दि.१८-१९.०८.२००१ संमत झाला आहे, जा.नं.एसएसएस/एसएसएच/३३१/२०१७ दि.३०.०३.२०१७ आदेश. दि.०६.०३.२०१० ची सिकल सेल आजाराच्या रुग्णांना मोफत रक्त देणेबाबत टिपणी प्रमाणे एकुण ३२९ रुग्णाना रक्कम रु.५,६६,३००/- इतकी मोफत/सवलत देण्यात आली आहे. सवलत/मोफतचे विवरण खालील प्रमाणे-

**(अ) श्री साईबाबा हॉस्पिटल**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १८० | १९,७७,२०४/- | १ | १९,७७,२०३/- |
| २ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ३२६ | २३,५६,५३१/- | ९,४९,६०५/- | १४,०६,९२६/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ११ | १,९८,६७०/- | १,३०,५७५/- | ६८,०९५/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्ययोजना इ. | ६५८ | ५३,६८,५५६/- | ३५,९३,९८४/- | १७,७४,५७२/- |
| ५ | महात्मा फुले आरोग्या योजना आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २१७ | ९३,०५,७५२/- | ७८,१३,०००/- | १४,९२,७५२/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २,७३४ | १७,५९,३५०/- | - | १७,५९,३५०/- |
| | **एकुण** | **४,१२६** | **२,०९,६६,०६३/-** | **१,२४,८७,१६५/-** | **८४,७८,८९८/-** |

**(ब) श्री साईनाथ रक्तपेढी**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | थॅलॅसिमिया | ३७ | ४८,८००/- | - | ४८,८००/- |
| २ | हिमोफिलीया | ० | - | - | - |
| ३ | सिकल सेल ॲनेमीया फ्रि | ० | - | - | - |
| ४ | फ्रि डन बाय एमएडी/एमएस | १३ | १८,८००/- | - | १८,८००/- |
| ५ | व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि | २३ | २,८००/- | - | २,८००/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना | ११८ | ३,०१,८००/- | - | ३,०१,८००/- |
| ७ | संस्थान एम्प्लॉयी फ्रि | ६ | १५,९००/- | - | १५,९००/- |
| ८ | कॉन्ट्रक्ट एम्प्लॉयी फ्रि | ३ | ३,०००/- | - | ३,०००/- |
| ९ | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | १२९ | १,७५,२००/- | - | १,७५,२००/- |
| | **एकुण** | ३२९ | ५,६६,३००/- | - | ५,६६,३००/- |
| | **एकुण अ+ब** | ४,४५५ | २,१५,३२,३६३/- | १,२४,८७,१६५/- | ९०,४५,१९८/- |

प्रस्ताव- उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये फेब्रुवारी २०१९मध्ये वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम रु.९०,४५,१९८/- ची नोंद घेऊन दिलेल्या सवलतीस मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

निर्णय क्र.२४५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये फेब्रुवारी २०१९ महिन्यात वैद्यकीय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम रु.९०,४५,१९८/- मात्रचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.७४** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये मार्च-२०१९ महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.१,००,३५,६०९/- ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय बिलात सवलत देण्या संबंधित मा.व्य.स.निर्णय क्र.५१९/दि.२४.०७.२०११ संमत झाला आहे. वैद्यकिय बिलात सवलत देण्याचे अधिकार उप.वै.संचालक/वै.संचालक यांना देण्यात आलेले आहेत त्यांचे गैर हजेरीत वै.प्रशासक/जनसंपर्क अधिकारी यांना अधिकार सुपुर्त करण्यात येऊन रुग्णांना मासिक वैद्यकिय बिलात सवलत देण्यात येते.

सोशल वर्कर हे रुग्णांची आर्थिक परिस्थीती जाणून घेतात व आवश्यक कागदपत्रांसह सवलत मंजुरी करीता प्रस्तावीत करतात.अशा प्रकारे हॉस्पिटलमध्ये वैद्यकिय बिलात सवलत देण्याकरीता स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. निर्णय क्र.५६४/२६.०६.२०१४ अन्वये प्रत्येक महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेण्यात येऊन आर्थिक वर्षाच्या शेवटी एकत्रित अहवाल मा.व्य.स.चे सभे समोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावा असे ठरले आहे. माहे सप्टेंबर २०१७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मान्यतेचे प्रस्तावावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दर महा मा.व्य.समिती सभेसमोर सादर करण्यास शेरा दिला आहे. त्याप्रमाणे माहे मार्च२०१९ मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलला ओपीडी रुग्ण १५,३४६ व १,०५३ आयपीडी रुग्णांपैकी ३,६६२ओपीडी व ६०८ आयपीडी रुग्णांना वैद्यकिय बिलात एकुण रु.९४,८२,३०९/- इतकी सवलत देण्यात आली व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय बिलात सवलत देण्या संबंधीत मा.व्य.स.निर्णय क्रं.३४६/दि.१८-१९.०८.२००१ संमत झाला आहे, जा.नं.एसएसएस/एसएसएच/३३१/२०१७ दि.३०.०३.२०१७ आदेश. दि.०६.०३.२०१० ची सिकल सेल आजाराच्या रुग्णांना मोफत रक्त देणेबाबत टिपणी प्रमाणे एकुण ३३९ रुग्णाना रक्कम रु.५,५३,३००/- इतकी मोफत/सवलत देण्यात आली आहे. सवलत/मोफतचे विवरण खालील प्रमाणे-

(अ) **श्री साईबाबा हॉस्पिटल**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १६७ | १८,०४,६७२/- | - | १८,०४,६७२/- |
| २ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ४१२ | २८,६६,०९३/- | १२,८५,८१०/- | १५,८०,२८३/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १६ | ७५,८२७/- | २४,१२१/- | ५१,७०६/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्ययोजना इ. | ६५८ | ५१,१७,६३९/- | २९,४२,९१९/- | २१,७४,७२०/- |
| ५ | महात्मा फुले आरोग्या योजना आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २६३ | १,२१,३६,३८१/- | १,०१,९७,९५८/- | १९,३८,४२३/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २,७५४ | १९,३२,५०५/- | - | १९,३२,५०५/- |
| | **एकुण** | **४,२७०** | **२,३९,३३,११७/-** | **१,४४,५०,८०८/-** | **९४,८२,३०९/-** |

**(ब) श्री साईनाथ रक्तपेढी**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | थॅलॅसिमिया | ३९ | ४८,२००/- | - | ४८,२००/- |
| २ | हिमोफिलीया | ० | - | - | - |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | सिकल सेल अॅनेमीया फ्रि | ० | - | - | - |
| ४ | फ्रि डन बाय एमएडी/एमएस | ११ | १०,८००/- | - | १०,८००/- |
| ५ | व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि | २४ | ३,५००/- | - | ३,५००/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना | १२० | २,८५,६००/- | - | २,८५,६००/- |
| ७ | संस्थान एम्प्लॉयी फ्रि | १ | ६००/- | - | ६००/- |
| ८ | कॉन्ट्रक्ट एम्प्लॉयी फ्रि | ४ | ६,०००/- | - | ६,०००/- |
| ९ | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | १४० | १,९८,६००/- | - | १,९८,६००/- |
| | **एकुण** | ३३९ | ५,५३,३००/- | - | ५,५३,३००/- |
| | एकुण अ+ब | ४,६०९ | २,४४,८६,४१७/- | १,४४,५०,८०८/- | १,००,३५,६०९/- |

प्रस्ताव- उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा हॅास्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्येमार्च २०१९मध्ये वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम **रु.१,००,३५,६०९/-** ची नोंद घेऊन दिलेल्या सवलतीस मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

निर्णय क्र.२४६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॅास्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये मार्च-२०१९ महिन्यात वैद्यकीय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम रु.१,००,३५,६०९/-मात्र ची नोंद घेण्यात येऊन त्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.७५ अ संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.७,२२,४२४/- मात्र आदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद –

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –१) जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१०/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु.२०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

प्रास्ताविक– खालील संस्थान कर्मचा-यांची रु. २०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

पुढील तक्त्यात नमुद केलेल्या कर्मचा-यांचे बिले परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज

| अनं | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | <u>अ. संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये रेफर केले होते.</u> | | | | | | | चालु आर्थिक वर्षात देय रक्कम . |
| १. | शिंदे भाऊसाहेब बाबुराव विभाग -ज्यु.कॉलेज +हुद्दा - ग्रंथपाल | वडिल | DM Nephropathy किडनी उपचार | डॉ. जाधवर | श्रीसाईबाबा हॉस्पिटल | १०६००.०० | १०६००.०० | ७४५८९.०० |
| २. | अशोक नामदेव झुरंगे विभाग–भांडार हुद्दा-अधिक्षक | स्वत: | Diabets Blood Pressure मधुमेह व रक्तदाब | डॉ. जाधवर | श्रीसाईबाबा हॉस्पिटल | ३५५१.०० | ३५५१.०० | ६२६२२.०० |
| ३. | रुक्साना साजिद खान विभाग– साईनाथ रुग्णालय हुद्दा - परिचारिका | स्वत: | HTN उच्च रक्तदाब | डॉ. शर्मा | श्रीसाईबाबा हॉस्पिटल | ६९५७.०० | ६९५७.०० | ३४४२८.०० |

ब) श्री साईबाबा हॉस्पिटलचे मंजुर आकृतीबंधानुसार रिक्त असलेल्या ०६ परिचारीकांचे पदावर पुढील आदेश होईपावेतो बाह्यएजन्सीमार्फत (आऊटसोर्सिंद्वारे) सेवा घेणेकामी दि. २९/०१/२०१८ रोजीचे टिपणीने मंजुरी मिळालेली आहे. त्यास अनुसरून कामगार विभागाने संस्थानला कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या ठेकेदारास दि. २०/०२/२०१८ रोजीचे आदेशान्वये ०६ परिचारीकांची सेवा बाह्यएजन्सीमार्फत (आऊटसोर्सिंद्वारे) ११ महिने कालावधीसाठी पुरविणेबाबत कळविले होते. त्यानुसार सध्या परिचारीका कार्यरत आहेत.

सहाय्यक अधिसेविका, श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी दि. ०५/०१/२०१९ रोजीचे पत्रान्वये, श्री साईबाबा हॉस्पिटलकडील विविध वॉर्डचे दैनंदिन कामकाज सुरळीत चालणेकामी उपरोक्त ०६ परिचारीकांचे सेवेची आवश्यकता असलेबाबत कळविले आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटलचे मंजुर आकृतीबंधानुसार स्टाफनर्स पदांची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| मंजुर पदसंख्या | भरलेली पदे | | | एकुण | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|
| | संस्थान आस्थापनेवर | | बाह्यंत्रणेमार्फत | | |
| | स्थायी | कंत्राटी | | | |
| २०० | १०१ | ०८ | ७५+९ | १९३ | ०७ |

उपरोक्त अ व ब प्रमाणे श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयात परिचारीकांची मंजुरी मिळणेकामी दि. ११/०२/२०१९ रोजी टिपणी सादर केली होती. त्यावर तत्कालीन मा उपजिल्हाधिकारी यांनी 'outsource पध्दतीने घेण्यासाठी कायमस्वरूपी मान्यता नाही. केवळ नियमित भरती प्रक्रीया होईपावेतो ११ महिन्यांसाठी मान्यता आहे. त्यामुळे पुढील ११ महिन्यांसाठी पुन्हा मा व्य. स. मान्यता आवश्यक आहे, असे मत आहे' असे अभिप्राय दिले होते. तदनंतर टिपणी फेरसादर करणेत आली सदर टिपणीवर मा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी 'आचारसंहिता कक्ष ची परवानगी घेऊन परत Put up करा' असे अभिप्राय दिल्याने दि. १६/०३/२०१९ रोजीचे मंजुर टिपणीस अधिन राहुन जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/६०५१/२०१९ दि. १८/०३/२०१९ रोजी पत्र पाठविणेत आले होते. दि. १८/०४/२०१९ रोजीचे पत्रास अनुसरून जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी, (आचारसंहीता कक्ष), जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर यांनी क्र.निवडणूक २०१९/आचारसंहिता/का.वि.९५/२०१९ दि. २९/०३/२०१९ चे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

याबाबत मा. भारत निवडणूक आयोगाकडील आदर्श आचारसंहिता नियमावलीमधील प्रश्न क्र २७ मध्ये निर्देश दिले आहेत. त्यामधील २७(२) प्रमाणे आचारसंहिता लागु होणेपुर्वी a,b,c,d,e मध्ये नमुद बाबींची पुर्तता करित असल्यास नवीन कामांकरिता परवानगीबाबत निर्णय घेऊन मा निवडणूक आयोगास सूचित करणेबाबत नमुद केले आहे. यास्तव a,b,c,d,e बीबींची पुर्तता होत असल्यास मा. भारत निवडणूक आयोगाकडील आदर्श आचारसंहिता नियमावलीमधील प्रश्न क्र २७ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करावी. तसेच याबाबत आपणास अधिक माहितीची आवश्यकता असल्यास मा. भारत निवडणूक आयोग यांच्या www.eci.gov.in या संकेतस्थळावरून उपलब्ध करून घ्यावी. प्रस्तुत प्रकरणी कोणत्याही प्रकारे आचारसंहितेचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी. सदर प्रकरणी कोणत्याही प्रकारे आचारसंहितेचा भंग झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील. समवेत वर नमुद सहपत्र जोडून पाठविण्यात येत आहे.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय- श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयाकरीता उपरोक्त अ व ब मध्ये नमुद केलेप्रमाणे एकुण ४१ परिचारीकांचा हजर तारखेपासून ११ महिनेचा कालावधी दि २०१९/०४/२९ .अखेर पासुन टप्याटप्याने संपुष्टात येत आहे. रूग्णांना वैद्यकीय सेवा देतांना अडचण येऊ नये वैद्यकीय सेवा सुरळीत सुरू रहावी म्हणून संस्थानला कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या (मे. बी. व्ही. जी. इं. लि. पुणे, कॅम्प-शिर्डी) लेबर ठेकेदारामार्फत

(बाह्ययंत्रणेद्वारे) ४१ परिचारीकांची सेवा ०४ दिवस सर्विस ब्रेक देऊन ११ महिने कालावधीसाठी आहे त्याच वेतनावर कामगार विभागामार्फत घेणेस मान्यता असावी.

निर्णय क्र.२५१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयाकरीता उपरोक्त् प्रस्तावात नमुद एकुण ४१ परिचारीकांना संस्थानला कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या मे. बी. व्ही. जी. इं. लि. पुणे, कॅम्प-शिर्डी या लेबर ठेकेदारामार्फत बाह्ययंत्रणेद्वारे ०४ दिवस सर्व्हिस ब्रेक देऊन ११ महिने कालावधीसाठी आहे त्याच वेतनावर कामगार विभागामार्फत घेणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

विषय नं.८० **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील दैनंदिन वापराने खराब झालेले लिनन नष्ट करुन, त्याचा साठा रजिष्टरमधून निर्लेखित करणेबाबत.**

प्रस्ताव- लिनन विभागामार्फत श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सर्व वॉर्ड/ओ.टी./ विविध विभागांसाठी आवश्यक असणारे लिनन पुरविणेत येते.सदरहू लिनन सततच्या वापराने जीर्ण होतात.तसेच वेगवेगळया आजाराच्या रुग्णांनी वापरल्यामुळे रक्ताच्या व इतर डागांमुळे खराब होते. त्यामुळे ते नष्ट करणे आवश्यक असते.त्यानुसार दैनंदिन वापराने विविध वॉर्ड/ओटी/ विभागांमधील खराब झालेले लिनन नष्ट करणेसाठी परत लिनन विभागाकडे जमा करण्यात येते.

यापुर्वी मा.व्यवस्थापन समिती दिनांक ०५/१०/२०१८ रोजीच्या सभेतील निर्णयक्र.६११अन्वये दि.०१/०७/२०१७ तेदिनांक ३०/०६/२०१८ या कालावधीमध्ये विविध वॉर्ड/ ओ टी/विभागांमध्ये दैनंदिनवापराने अतिशय जीर्ण तसेच रक्ताच्या डांगाने खराब झालेले एकुण रु.५,०९,२७०/-मात्र किमंतचे लिनन विहीत पध्दतीने नष्ट करुन त्याचा साठ रजिष्टामधुन निर्लखीत करणेस मान्यता मिळालेली होती व त्याप्रमाणे कार्यवाही पूर्ण झालेले आहे.

आता,दैनंदिन वापराने जीर्ण झालेले व रक्ताच्या डागांनी खराब झालेले दिनाक ०१/०७/२०१८तेदिनांक ३१/०३/२०१९ या कालावधीमधील विविध वॉर्ड/ ओटी/ विभागांमधील लिनन इकडील विभागाकडे जमा झालेले आहे.सदरहु लिनन खरेदीची किंमत रु.६,०७,४७६/-मात्र असुन हे लिनन फाटलेल्या व खराब अवस्थेतील असल्यामुळे वापरण्यास निरोपयोगी असुन सद्यः परिस्थितीत त्याची किंमत निरंक आहे.याबाबत सहा. अधिसेविका व वैद्यकीय संचालक यांनी प्रत्यक्ष पहाणी करुन अभिप्राय दिलेले आहेत

तर दिनाक ०१/०७/२०१८ते दिनांक ३१/०३/२०१९ या कालावधीमधील विविध वॉर्ड/ ओटी/ विभागांमध्ये दैनंदिन वापराने जीर्ण व रक्ताच्या डागांनी खराब झालेले सोबतच्या यादीमधील रु.६,०७,४७६/-मात्र किमतीचे लिनन वापरण्यास निरोपयोगी असल्यामुळे ते विहीत पध्दतीने नष्ट करणेस व त्याचा साठा रजिष्टरमधुन निर्लखीत करणेस मंजुरी घेणेकरीता सदरहु प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी.

निर्णय क्र.२५२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.०१/०७/२०१८ ते दि.३१/०३/२०१९ या कालावधीतील विविध वॉर्ड/ ओटी/ विभागांमध्ये दैनंदिन वापराने जीर्ण व रक्ताच्या डागांनी खराब झालेले रक्कम रु.६,०७,४७६/-मात्र किंमतीचे लिनन वापरण्यास निरुपयोगी असल्यामुळे ते विहीत पध्दतीने नष्ट करणेस व त्याचा साठा रजिष्टरमधुन निर्लेखीत करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

विषय नं.८१ **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता लिनन खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री.साईबाबा व श्री.साईनाथ रुग्णालयामध्ये दैनदिन डॉक्टर्स व इतर स्टाफचे ड्रेस,गाऊन,विविध वार्डमध्ये आवश्यक असलेले पेशंट ड्रेस,मेट्रसे,बेडशीट,उशीकव्हर इ.जवळपास ३०ते३५ प्रकारचे लिनन विविध वॉर्ड /विभागांच्या मागणीनुसार लिनन विभागामार्फत खरेदी करणेत येऊन,त्यांना उपलब्ध करुन देण्यात येते.एकदा खरेदी केलेले लिनन साधारणतः २ते३ वर्षापर्यत पुरते, त्यामुळे लिननची प्रत्येक वर्षी खरेदी करण्यात येत नव्हती. श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालये मिळून १० (दहा) शस्त्रक्रिया गृहे असुन.

श्री साईनाथ रुग्णालये सर्व रुग्णांवरील उपचाराकरीता मोफत असल्यामुळे रुग्णांची गर्दी वाढत आहे. व परिणामी लिननचा वापरही जास्त प्रमाणात होत आहे.सध्या इकडील विभागा व संबधीत वॉर्ड मिळुन खालील लिननचा साठा साधरणतः २ ते ३ महिने पुरेल एवढा शिल्लक आहे.

| अ.नं | तपशील | अ.नं. | तपशील |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| १ | लिनन ट्रॉली बॅग (बीग साईज) | ८ | पिलो |
| २ | स्ट्रेचर मेट्रेस कव्हर | ९ | बीग होलशीट |
| ३ | डोअर मॅट | १० | मॅट्रेस |
| ४ | ट्रॉली कव्हर | ११ | पेंशट/ पेटीकोट |
| ५ | होलशीट मोठे | १२ | सोलापुरी चादर |
| ६ | ड्रॉशीट | १३ | ग्रीन होलशीट |
| ७ | नॅपकीगं | १४ | पडदे कापड (निळे |

उपरोक्त तक्तयामध्ये नमुद लिननची विहीत पध्दतीने खरेदी करणेकामी.अंदाजे खर्चाची रक्कम निश्चित करण्यासाठी स्थानिक पुरवठाधारकांकडून कोटेशनची मागणी केली असता.खालील पुरवठाधारकांनी कोटेशन दिलेल आहेत.

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नाव | शेरा |
|---|---|---|
| १ | देवांशी एंटरप्राईज,मुंबई | ई-मेलव्दारे प्राप्त |
| २ | एम.बी.ट्रेडींग कंपनी,नाशिक रोड | बंद पाकिट |
| ३ | राजेंद्र आर काबरा, पुणतांबा | बंद पकिट |

| अ.न | तपशील | एकुण मागणी | देवांशी एंटरप्रासज मुंबई. | एम.बी.ट्रेडींग कंपनी फॅशन कलेक्शन नाशिक | राजेंद्र आर काबरा पुणतांबा. | सरासरी एक नगाची किंमत रु. | सरासरी अंदाजे किंमत रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | लिनन ट्रॉली बॅग (ग्रीन बीग साईज) | १५०नग | ४०० | ३३६ | २९५ | ३४३.६६ | ५१,५५०.०० |
| २ | स्ट्रेचर मॅट्रेस कव्हर, (चॉकलेटी, ७२x२० इंच) | ५० | ६०० | ३९० | २६५ | ४१८.३३ | २०,९१७.०० |
| ३ | डोअर मॅट (रबर, २८ x १५इंच) | २०० | १५० | १३२ | ११० | १३०.६६ | २६,१३३.०० |
| ४ | ट्राली कवर पौस्टीक,तपकीरी | २५० | ८० | २३१ | १०२ | १३७.६६ | ३४,४१७.०० |
| ५ | होलशीट मोठे ग्रीन,७५ x ४५ | १०५० | २२५ | २४२ | २६५ | २४४.०० | २,५६,२००.०० |
| ६ | ड्रॉशीट ग्रीन,७५x ५० | ३००० | २२० | २२५ | २६५ | २३६.६६ | ७,१०,०००.०० |
| ७ | नॅपकीन सफेद,२२ x १५इंच | ५०० | ४० | ४५ | ३५ | ४०.०० | २०,०००.०० |
| ८ | पिलो गुलाबी, १ x १६इंच | ५०० | ४०० | ३३५ | १६५ | ३००.०० | १,५०,०००.०० |
| ९ | बीगशीट ग्रीन,१२० x ६०इंच | ३०० | २२५ | २२५ | ३५० | २६६.६६ | ८०,०००.०० |
| १० | मॅट्रेस | ४०० | ३५०० | ४९५० | ३२०० | ३८८३.३३ | १५,५३,३३३.०० |
| ११ | पेशंट/पेटीकोट कॉटन | ५०० | १३० | ४०२ | ५४४ | ३५८.६६ | १,७९,३३३.०० |
| १२ | सोलापुरी चादर मयुरपंख,६०x९० | ५०० | ३२० | ०० | ३२० | ३२०.०० | १,६०,०००.०० |
| १३ | प्लेन ग्रीनशीट | ५०० | १५० | १३८ | २८९ | १९२.३३ | ९६,१६७.०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रीनकॉटन ७५x४५इंच | | | | | | |
| १४ | पडेद कापड (निळे कॉटन) | ६००मी. | १३० | ०० | ११० | १२०.०० | ७२,०००.०० |
| | | | | | | | ३४,१०,०५०.०० |

मागणी- उपरोक्त प्रमाणे.

संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी,शासन निर्देश,तांत्रिक,कायदेशीर तसेच आर्थिक विषय छाननी करुन अनुमान- १) समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र.१७-२(ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये साहय करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे,त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालये चालविण्यात येतात. २) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसारशासननिर्णय क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-३/उद्योग-४,दि.१डिसेंबर २०१६ अन्वये-परिच्छेद खुली स्पर्धात्मक निविदा ज्या अंदाजित मुल्य रु.तीन (३.००)लाखांपेक्षा जास्त असेल अशा सर्व निविदा ई निविदा पध्दतीने काढण्यात याव्यात.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत- श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता लागणरे लिनन सन २०१५-२०१६मध्ये खरेदी करण्यास आलेले असुन, सततच्या वापराने वरील १४ प्रकारचे लिनन खराब झालेले आहे.वत्याचा साठा संपुष्टात येत आहे.याकरीता सदरहु लिनन खरेदी करणेकामी रु.३४,१०,०५०/- मात्र खर्च येणार असुन,या खरेदीकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता मिळावी, असे नम्र मत आहे.

तरी श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता प्रस्तावात नमुद केलेले १४ प्रकारचे लिनन विहीत पध्दतीने ई निविद मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.३४,१०,०५०/-मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरहु प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर.

**निर्णय क्र.२५३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता प्रस्तावात नमुद केलेले १४ प्रकारचे लिनन खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविद प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.३४,१०,०५०/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.८२** **श्री साईबाबा संस्थान परिसरात बाहेरील रक्तपेढयांना रक्तसंकलनासाठी परवानगी देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद** – कलम १७(१) व १७(२)(ण) मानव जातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपतमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

व्यवस्थापन समिती ठराव क्र.–मा.व्यवस्थापन समिती सभा दि. २३/१०/२०१७ रोजीचे विषय नं २३ निर्णय क्र.८६९

प्रस्ताविक–मा.अध्यक्ष साहेब यांनी दि. १२/०२/२०१७ रोजी घेतलेल्या रक्तपेढयांचे चर्चासत्रात समाजात रक्तदानाचे महत्व रुजावे, अडीअडचणीच्या वेळी गरजु रुग्णांना रक्त उपलब्ध व्हावे, रक्तदान संकल्पना रुजविली जावी तसेच थॅलॅसेमिया, हिमोफेलिया व सिकलसेल ॲनिमिया यासारख्या रुग्णांना संस्थान मार्फत मदत व्हावी, तिरुपती बालाजी संस्थानमध्ये ज्या प्रकारे केशदान ही संकल्पना रुजवलेली आहे. त्याच धर्तीवर शिरडीत रक्तदान ही संकल्पना रुजवावी असे संस्थानचे उद्देश आहे.

त्यास अनुसरुन रक्तदान चळवळ वाढीस लागणेसाठी श्री साईनाथ रक्तपेढी व महाराष्ट्रातील इतर नामांकीत रक्तपेढी यांचेमध्ये समन्वये साधणेकामी समीती गठीत करण्यात आली. तसेच गठीत समिती सदस्यांनी बाहेरील रक्तपेढयांना रक्तदान शिबीर घेणेकामी परवानगी देणेकरीता रक्तदान शिबीर नियमावली बनविण्यात आलेली आहे. सरहु नियमावली खालील प्रमाणे आहे.

०१) रक्तदान शिबीर घेणेकरीता आठवडयातुन ०१ दिवस ठरवुन परवानगी दिली जाईल.

०२) रक्तदान शिबीराची वेळ ही सकाळी ०९ ते ०५ अशी असेल.

०३) शिबीराची वेळ किंवा दिवस वाढविणे तसेच कमी करणेचे संपुर्ण अधिकार वैद्यकिय अधिक्षीका, वैद्यकिय संचालक यांना राहतील.

०४) श्री साईबाबा संस्थान उत्सव काळात शिबीराची वेळ आवश्यकतेनुसार वाढविणेत येईल.

०५) रक्तदान शिबीरात रक्तदान करणेकरीता येणा-या रक्तदात्यांना आपल्या रक्तपेढीची संपुर्ण माहिती

आवश्यकतेनुसार देणेत यावी.

०६) रक्तदान शिबीर घेणेकरीता आलेनंतर व झालेल्या रक्तदात्यांची संख्येची नोंद रक्तपेढीने संस्थान रक्तपेढीत रक्तपेढीत ठेवणे बंधनकारक आहे.

०७) रक्तदान शिबीरात संकलीत होणा-या रक्त पिश्व्यांपैकी २५% पिशव्या संस्थानचे श्री साईनाथ रक्तपेढीत जमा करणे बंधनकारक आहे.

०८) श्री साईबाबा संस्थानच्या नाव लौकिकास बाधा पोहोचेल अशा प्रकारचे कोणतेही काम रक्तपेढीकडुन होता कामा नये, याची काळजी घ्यावी.

०९) रक्तदान शिबीराची परवानगी कोणाला द्यावी अथवा देऊ नये याची संपुर्ण जबाबदारी संस्थान प्रशासनाची आहे.

१०) रक्तदान शिबीर घेणेकामी देण्यात येणा-या संस्थानच्या जागेबाबत व मशिनरी बाबतची संपुर्ण जबाबदारी ही शिबीर अयोजक रक्तपेढी यांची राहील.

उपरोक्त नियमावली अन्वये रक्तदान शिबीराकरीता येणा-या रक्तपेढयांना नियमावलींचे पालन करण्यात येवुन तथा रक्तपेढयांचे कागदपत्रांची पडताळणी करुन (उदा. अर्ज, एफडीए लायसन्स, एसबीटीसी सर्टिफिकेट, थॅलेसेमिया अहवाल, ऑडीट रिर्पोर्ट, दर आकारणी पत्र) रक्तदान शिबीराकरीता संस्थान परिसरात समाविष्ट करण्याकरीता मान्यता देणेत आलेली आहे. याअनुषंगाने संस्थान परिसरातील दैनंदिन रक्तदान शिबीराकरीता संस्थान मार्फत खालील रक्तपेढयांना आतापर्यंत परवानगी देण्यात आलेली आहे.

| अ.नं | रक्तपेढीचे नाव | वार | | अ.नं | रक्तपेढीचे नाव | वार |
|---|---|---|---|---|---|---|
| श्री साईबाबा मंदीर परिसर | | | | साईआश्रम - ०१ १००० रुम | | |
| ०१ | जनकल्याण रक्तपेढी, अहमदनगर | मंगळवार | | ०१ | जनकल्याण ब्लड बॅक, जालना | गुरुवार |
| ०२ | दत्ताजीभाले रक्तपेढी, औरंगाबाद | सोमवार | | ०२ | पि.एम.टी., लोणी | शुक्रवार |
| ०३ | मेट्रो रक्तपेढी, जिल्हा रुग्णालय रक्तपेढी, नाशिक | बुधवार | | ०३ | आनंदऋषिजी ब्लड बॅक, अहमदनगर | शनिवार |
| ०४ | जिल्हा रुग्णालय रक्तपेढी, अहमदनगर | शुक्रवार | | ०४ | हेडगेवार ब्लड बॅक, अकोला | रविवार |
| | | | | ०५ | विळदघाट ब्लड बॅक, अहमदनगर | मंगळवार |

श्री साईनाथ रक्तपेढी यांना रविवार, गुरुवार, शनिवार असे तीन दिवस राखीव ठेवण्यात आलेले आहे. परंतु असे निदर्शनास आले आहे की, ज्या रक्तपेढयांना साईआश्रम–१ येथे रक्तसंकलनाकरीता परवानगी दिलेली आहे. अशा रक्तपेढयांचे रक्तसंकलन खुपच कमी होत आहे. तसेच समाधी मंदीर परीसरातील रक्तसंकलन केंद्रात सदरचे संकलन चांगले होत आहे. त्यामुळे साईआश्रम – १ (१००० रु म) मधील काही रक्तपेढया समाधी मंदीर परीसरात आवश्यकते नुसार रक्तसंकलन करत आहेत.

साईआश्रम ०१ व मंदीर परिसर येथील रक्तसंकलन (जानेवारी २०१८ ते डिसेंबर २०१८) तौलानिक तक्ता

| रक्तपेढीचे नाव | वार | साईआश्रम – १ | मंदीर परिसर |
|---|---|---|---|
| जनकल्याण रक्तपेढी, जालना | गुरुवार | १०० | १२१७ |
| पी.एम.टी., लोणी | शुक्रवार | १२१ | ११७० |
| आनंदऋपीजी रक्तपेढी, अहमदनगर | शनिवार | ३८ | ८७८ |
| हेडगेवार ब्लड बॅक, अकोला | रविवार | १५० | ९०६ |
| विळदघाट ब्लड बॅक, अहमदनगर | मंगळवार | १४७ | ३१५ |
| एकुण | | ५५६ | ४४८६ |

उपरोक्त परवानगी देण्यात आलेल्या ०९ रक्तपेढयांच्या धर्तीवर परवानगी मिळणेकरीता अजुनही ०९ रक्तपेढयांनी अर्ज केलेला आहे. सदर अर्जाची छाननी करुन खालील कोष्टकात माहिती सादर करीत आहोत.

| अ.नं | रक्तपेढयांचे नाव | अर्ज | एफडीए लायसन्स | एसबीटीसी सर्टिफिकेट | थॅलेसेमिया अहवाल | ऑडीट रिपोर्ट | दर आकारणी पत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | अहमदनगर ब्लड बॅक, अहमदनगर | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ०२ | अष्टविनायक ब्लड बॅक, अहमदनगर | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ०३ | अर्पण ब्लड बॅक, संगमनेर | ✓ | × | × | × | × | × |
| ०४ | विभागीय रक्तपेढी (घाटी), औरंगाबाद | ✓ | × | × | × | × | × |
| ०५ | अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी, अहमदनगर | ✓ | × | × | × | × | × |
| ०६ | अर्पण व्होलंटरी ब्लड बॅक, अहमदनगर | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ०७ | रोटरी ब्लड बॅक, राहुरी | ✓ | ✓ | × | × | × | × |
| ०८ | जनकल्याण ब्लड बॅक, नंदुरबार | ✓ | ✓ | ✓ | × | ✓ | × |
| ०९ | जनकल्याण ब्लड बॅक, नाशिक | ✓ | × | × | × | × | × |

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार अनुमान – मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २३/१०/२०१७ विषय नं २३ निर्णय क्र. ८६९

विभागाचा अभिप्राय – पुर्वी परवानगी देणेत आलेल्या ९ रक्तपेढयां सद्यस्थितीला मंदीर परीसरात रक्तसंकलन करत आहेत. सद्यस्थितीला एकही दिवस रक्तसंकलनाकरीता रिकामा नसलेमुळे मंदीर परीसरातील नव्याने अर्ज आलेल्या रक्तपेढयांना मंदीर परीसरात सामावुन घेणे शक्य नाही.

परंतु नव्याने दाखल केलेल्या अर्जांची छाननी करता फक्त तीनच रक्तपेढयांनी (१) अहमदनगर ब्लड बॅक, अहमदनगर, २) अष्टविनायक ब्लड बॅक, अहमदनगर, ३) अर्पण व्होलंटरी ब्लड बॅक, अहमदनगर) संपुर्ण कागदपत्रे सादर केलेले असुन ती बरोबर आहेत. नव्याने अर्ज दाखल केलेल्या व पात्र असलेल्या रक्तपेढयांना संस्थान परिसरात इतर ठिकाणी रक्तसंकलन करणेकरीता परवानगी देता येईल असे मत आहे.

सदर पात्र रक्तपेढयांकडे रक्तसंकलन करणेकामी स्वतःची मोबाईल रक्तसंकलन व्हॅन ही उपलब्ध असलेचे त्यांनी कळविले. सदरची व्हॅन उभी करुन रक्तसंकलन करणेकामी संस्थान परिसरातील श्री साई प्रसादालय येथे परवानगी देणेत यावी. असे मत आहे. सदर रक्तपेढयांना परवानगी द्यावयाची झालेस प्रस्तावित नियमावलीच्या अनुषंगाने मान्यता देता येईल.

तरी सदरहु प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती समोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२५४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, पात्र रक्तपेढयांकडे रक्तसंकलन करणेकामी संस्थानचे भक्तनिवासस्थान येथे जागा उपलब्ध करुन देण्यात यावी, असे ठरले.** **(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**विषय नं.८३** **दि.०१ एप्रिल,२०१८ ते दि.३१ मार्च,२०१९ अखेर कालावधीत दिलेले रुग्ण संख्या व अनुदान रक्कम यांची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनिय २००४ मधील तरतुद:- कलम १७ (१) व १७ (२) (ण ) मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र:- दि.२४/०७/२०११ रोजीची मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.१४, निर्णय क्र.५८१.

प्रास्तविक:- उपरोक्त विषयाकिंत संदर्भान्वये, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी. यांचे मार्फत गरीब व गरजु रुग्णांना त्यांचे वैद्यकिय,उपचाराकरीता रुग्ण उपचार घेत असलेल्या रुग्णालयाचे नावे वैद्यकीय आर्थिक अनुदान देण्यात येते. त्यासाठी संस्थान व्यवस्थापनाने स्वतंत्र नियमावली तयार केलेली आहे. यास शासन मान्यता आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत वैद्यकीय आर्थिक अनुदान हे केवळ, भारतातील सरकारी जिल्हा परिषद वा म्युनिसिपल रुग्णालय, सार्वजनिक धर्मदाय न्यासाने चालविलेले रुग्णालय, सार्वजनिक लिमिटेड कंपनी (Public Limited Company) यांनी चालविलेले अगर सहकारी संस्था (Co Operative Society) यांनी चालविलेले रुग्णालय यातील उपचार / शस्त्रक्रियेवरील खर्चा पोटी खर्चाच्या १५% अगर रुपये २५,०००/- पैकी जी कमी पुर्णाकिंत रक्कम असेल तेवढी रक्कम, पॅनलवरील ८१ रुग्णालयांना रुग्णाचे नावे नियमावलीतील आठ आजारांकरीता देण्यात येते. त्यास अनुसरुन दि.१ एप्रिल-२०१८ ते दि.३१ मार्च २०१९ अखेर कालावधीत मंथली दिलेले वैद्यकिय आर्थिक अनुदान लाभार्थी रुग्ण संख्या व रक्कम खालील प्रमाणे आहे.

| अं.नं. | महिना | लाभार्थी रुग्ण संख्या | अनुदान वाटपाची रक्कम | मंजुर बजेट |
|---|---|---|---|---|
| १ | ०१ एप्रिल -२०१८ | ४७ | ११,१७,५००/- | ५,००,००,०००/- |
| २ | मे -२०१८ | ६१ | १३,९३,५००/- | |
| ३ | जुन – २०१८ | ५१ | १२,३२,५००/- | |
| ४ | जुलै -२०१८ | ७५ | १७,१९,७५०/- | |
| ५ | ऑगस्ट -२०१८ | ५७ | १३,६३,५००/- | |
| ६ | सप्टेंबर -२०१८ | ६६ | १६,०७,५००/- | |
| ७ | ऑक्टोंबर -२०१८ | ४१ | ९,६३,७५०/- | |
| ८ | नोव्हेंबर -२०१८ | ६० | १४,४८,५००/- | |
| ९ | डिसेंबर -२०१८ | ७८ | १७,९३,७५०/- | |
| १० | जानेवारी -२०१९ | ७९ | १९,१०,०००/- | |
| ११ | फेब्रुवारी -२०१९ | ५२ | ११,९६,२५०/- | |
| १२ | ३१ मार्च -२०१९ | ४३ | १०,३३,७५०/- | |
| | एकुण | ७१० | १,६७,८०,२५०/- | |

दि.१ एप्रिल-२०१८ ते दि.३१ मार्च २०१९ अखेर ७१० रुग्णांना रक्कम रु.१,६७,८०,२५०/- वैद्यकिय आर्थिक अनुदान देणेत आलेले आहे.

त्या बाबतचा रुग्णालयनिहाय तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | रुग्णालयाचे नाव | रुग्ण | अनुदान रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|
| ०१) | अमेय चॅरिटेबल ट्रस्ट एस हॉस्पिटल | ०१ | २५,०००/- |
| ०२) | आनंदऋषीजी हार्टकेअर,अहमदनगर. | ०५ | १,१८,०००/- |
| ०३) | आनंद ऋषीजी हॉस्पीटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटर , अहमदनगर. | २८ | ५,८५,०००/- |
| ०४) | आश्विनी सहकारी रुग्णालय आणि संशोधन केंद्र नियमित, सोलापुर. | २५ | ६,१६,५००/- |
| ०५) | बाई जेराबाई वाडिया हॉस्पीटल फॉर चिल्ड्रन, मुंबई. | ०१ | २५,०००/- |
| ०६) | बालाजी हॉस्पीटल ॲण्ड डायग्नोस्टिक सेंटर, मुंबई. | १०३ | २५,५१,२५०/- |
| ०७) | भारतीय संस्कृती दर्शन ट्रस्ट आयुर्वेदिक हॉस्पिटल | ०४ | १,००,०००/- |
| ०८) | बॉम्बे हॉस्पीटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटर, मुंबई. | ०२ | ५०,०००/- |
| ०९) | कार्डिनल ग्रेसिएस मेमोरिअल ट्रस्ट , वसई. | १९ | ४,७५,०००/- |
| १०) | डिन बी वाय एल नायर चॅरिटेबल हॉस्पिटल, मुंबई. | ०९ | २,२५,०००/- |
| ११) | डॉ.बालाभाई नानावटी हॉस्पिटल,मुंबई. | ०१ | २५,०००/- |
| १२) | डॉ.हेडगेवार रुग्णालय, औरंगाबाद. | २५ | ६,२५,०००/- |
| १३) | हॉली स्पिरीट हॉस्पिटल, मुंबई. | ११ | २,७५,०००/- |
| १४) | जसलोक हॉस्पिटल ॲन्ड रिसर्च सेंटर, मुंबई . | १५ | ३,७५,०००/- |
| १५) | जहॉगीर हॉस्पिटल , पुणे. | ०६ | १,५०,०००/- |
| १६) | के एल ई एस हॉस्पिटल ॲन्ड मेडिकल रिसर्च सेंटर, बेळगांव, कर्नाटक. | ०२ | ५०,०००/- |
| १७) | कमलनयन बजाज हॉस्पिटल, औरंगाबाद. | ०२ | ५०,०००/- |
| १८) | किंग एडवर्ड मेमोरिअल हॉस्पिटल ( के ई एम ), पुणे. | ६१ | १५,२०,०००/- |
| १९) | कोंकण मित्र मंडळ मेडिकल ट्रस्ट, सह्याद्री स्पेशालीटी हॉस्पिटल, पुणे. | २२ | ५,५०,०००/- |
| २०) | कृष्णा हॉस्पिटल ॲन्ड मेडिकल रिसर्च सेंटर, कराड. | ०५ | १,२२,५००/- |
| २१) | लोकमान्य मेडिकल फाऊंडेशन लोकमान्य हॉस्पिटल | ०१ | २५,०००/- |
| २२) | महात्मा गांधी मिशन हॉस्पिटल ॲन्ड रिसर्च इन्स्टिट्युट, औरंगाबाद. | २९ | ७,२५,०००/- |
| २३) | मुलजीभाई पटेल युरोलॉजिकल हॉस्पिटल, नदियाड, गुजरात. | ४२ | १०,५०,०००/- |
| २४) | नर्गिस दत्त मेमोरिअल कॅन्सर हॉस्पिटल, बार्शी. | ०५ | १,२०,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| २५) | पी डी हिंदुजा नॅशनल हॉस्पिटल ॲन्ड मेडिकल रिसर्च सेंटर, मुंबई. | ०५ | १,२५,०००/- |
| २६) | पद्मश्री डॉ विखे पाटील मेमोरिअल हॉस्पिटल विळद अहमदनगर. | ०१ | ७,५००/- |
| २७) | पुणा हॉस्पिटल ॲन्ड रिसर्च सेंटर पुणे. | ०५ | १,२५,०००/- |
| २८) | आर टी भोईटे स्मृती आरोग्य प्रतिष्ठाण गिरीराज हॉस्पिटल, पुणे . | १४ | ३,५०,०००/- |
| २९) | एस एल रहेजा हॉस्पिटल मुंबई | ०१ | २५,०००/- |
| ३०) | शेठ नंदलाल धुत हॉस्पिटल, औरंगाबाद. | ०३ | ७५,०००/- |
| ३१) | श्री सिध्देश्वर कॅन्सर हॉस्पिटल ॲन्ड रिसर्च सेंटर, सोलापूर. | ९३ | १७,८८,७५०/- |
| ३२) | श्री गुरुजी रुग्णालय नाशिक. | ०६ | ८६,२५०/- |
| ३३) | श्री मार्कण्डेय सोलापूर सहकारी रुग्णालय, सोलापूर. | ०३ | ७५,०००/- |
| ३४) | श्री सिध्दीविनायक गणपती कॅन्सर हॉस्पिटल, मिरज. | २४ | ५,७७,५००/- |
| ३५) | शुश्रुशा सिटीझन्स को-ऑप हॉस्पिटल, मुंबई. | ०१ | २५,०००/- |
| ३६) | सुराना सेठीया हॉस्पिटल ॲन्ड रिसर्च सेंटर मुंबई | ०३ | ७५,०००/- |
| ३७) | शुश्रुत मेडिकल केअर ॲन्ड रिसर्च सोसायटी हार्डीकर हॉस्पिटल, पुणे. | ३१ | ७,४७,०००/- |
| ३८) | टाटा मेमोरिअल हॉस्पिटल, मुंबई. | ०२ | ४०,०००/- |
| ३९) | वसंतराव आर नगरकर मेडिकल फौंडेशन, नाशिक. | ९४ | २२,२५,०००/- |
| | **एकुण** | **७१०** | **१,६७,८०,२५०/-** |

प्रस्ताव:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी. यांचे मार्फत गरीब व गरजु रुग्णांना त्यांचे वैद्यकिय, उपचाराकरीता रुग्ण उपचार घेत असलेल्या रुग्णालयाचे नावे, दि.०१ एप्रिल २०१८ ते ३१ मार्च २०१९ अखेर देण्यात आलेल्या, वैद्यकीय आर्थिक अनुदानाची नोंद घेणेचा प्रस्ताव, मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर.

**निर्णय क्र.२५५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमार्फत गरीब व गरजु रुग्णांना त्यांचे वैद्यकीय उपचाराकरीता रुग्ण उपचार घेत असलेल्या रुग्णालयाचे नावे दि.०१ एप्रिल,२०१८ ते दि.३१ मार्च,२०१९ अखेर कालावधीत देण्यात आलेल्या रुग्ण संख्या व अनुदान रक्कम यांचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**विषय नं.८४** **श्री साईनाथ रुग्णालयात माहे एप्रिल-२०१८ ते मार्च २०१९ अखेर रुग्णांवर मोफत वैद्यकीय उपचारा पोटी खर्च झालेल्या रकमेच्या तपशीलाबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद– कलम १७(१) व १७(२)(ण) मानव जातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपतीमध्ये साहय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

व्यवस्थापन समिती ठराव क्र - १) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २२/१२/२०१६ रोजीच्या निर्णय क्र. ९४४.

मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २५/०२/२०१७ रोजीच्या निर्णय क्र. ०६.

मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०१/११/२०१८ रोजीच्या निर्णय क्र. ६३८.

प्रस्ताव - श्री साईबाबांच्या शिकवणुकीस अनुसरुन गरीब व गरजु रुग्णांना मोफत उपचार पुरविण्याच्या दृष्टीने श्री साईनाथ रुग्णालय उपरोक्त संदर्भ क्र. ०१ नुसार दि. ०१/०१/२०१७ रोजी पासुन संपुर्णपणे मोफत उपचार सुरु केलेले आहे. संदर्भ क्र. ०२ नुसार दि. ०१/०३/२०१७ रोजी पासुन श्री साईनाथ रुणालय भरती होणा-या रुग्णांना आवश्यकते प्रमाणे उपचारासाठी लागणारे रक्त व रक्तघटक मोफत देण्यात येत आहेत. तसेच मा. व्यवस्थापन सभा दि. ०१/११/२०१८ रोजीच्या निर्णय क्र. ६३८ अन्वये श्री साईबाबा रुग्णालयातील सद्यास्थितीला लागु असणारे दर जसेच्या तसे श्री साईनाथ रुग्णालयात लागु करणेत यावेत, व ते उपचार, शस्त्रक्रिया श्री साईबाबा रुग्णालयात होत नाहीत परंतु शासकीय रुग्णालयात होत आहेत. अशा उपचारांचे दर शासनाच्या दरप्रमाणे घेण्यात यावे. तसेच शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या परिपत्रकाप्रमाणे शासकीय रुग्णालयामधुन देण्यात येणा-या तपासणी व त्याबाबतच्या रुग्णशुल्काबाबतचे सेवाआकारामध्ये आकारण्यात येणा-या शुल्क दरामध्ये दर दोन वर्षांनी १५ ते २० टक्के वाढ करणेत येईल असे नमुद केलेले आहे. याअनुषंगाने

श्री साईनाथ रुग्णालयातील दर निश्चीत झालेनंतर दोन वर्षांनी १० टक्के वाढ करणेस मान्यता देण्यात आली. सदर निर्णयाची अंबलबजावणी दि. ०१/०१/२०१९ नुसार करण्यात आलेली आहे.

श्री साईनाथ रुग्णालयात माहे. एप्रिल २०१८ ते मार्च २०१९ अखेर अर्थिक वर्षात ओपीडी व आयपीडी रुग्णांवर मोफत तपासणी, शस्त्रक्रिया वर झालेल्या खर्चाची रक्कमेचा तपशिल खालील दर्शविलेल्या कोष्टका प्रमाणे आहे.

| अ.नं | महिना | अंतर्रुग्ण रक्कम | बाह्यरुग्ण रक्कम | औषधांवर खर्च केलेली रक्कम | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ०१ | एप्रिल – २०१८ | १०,३९,८३९ | ८,४६,८५६ | १५,४२,००९ | ३४,२८,७०४ |
| ०२ | मे – २०१८ | १२,३९,०५८ | ११,११,२४२ | ४३,७४,५८६ | ६७,२४,८८६ |
| ०३ | जुन – २०१८ | ११,३६,६३६ | ९,३७,६७३ | ३२,४८,०८१ | ५३,२२,३९० |
| ०४ | जुलै – २०१८ | १३,२७,१६८ | १०,७४,०८७ | २९,९३,३२० | ५३,९४,५७५ |
| ०५ | ऑगस्ट – २०१८ | २४,१६,९६५ | १०,३२,४३४ | २२,७६,६८४ | ५७,२६,०८३ |
| ०६ | सप्टेंबर – २०१८ | १२,५६,५४७ | ११,३९,०३७ | ४०,२९,८१६ | ६४,२५,४०० |
| ०७ | ऑक्टोबर – २०१८ | २५,२१,३१० | १३,५९,६५५ | ३६,६०,९०६ | ७५,४१,८७१ |
| ०८ | नोव्हेंबर – २०१८ | ९,४०,५९३ | १०,८४,२६५ | २७,१६,४६५ | ४७,४१,३२३ |
| ०९ | डिसेंबर – २०१८ | १५,१४,८७८ | ११,०१,६७७ | २८,१९,१८३ | ५४,३५,७३८ |
| १० | जानेवारी – २०१९ | ३८,७२,०३८ | २१,७२,३७६ | १९,३१,१६१ | ७९,७५,५७५ |
| ११ | फेब्रुवारी – २०१९ | ४४,९९,४९५ | १९,६२,४९९ | ३०,७९,७५२ | ९५,४१,७४६ |
| १२ | मार्च – २०१९ | ५५,६१,१६२ | २१,७८,५७१ | ६१,४०,८२० | १,३८,८०,५५३ |
| | **एकुण** | **२,७३,२५,६८९** | **१,६०,००,३७२** | **३,८८,१२,७८३** | **८,२१,३८,८४४** |

(संस्थान अधिनियम / ठराव यानुसार अनुमान – १) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २२/१२/२०१६ रोजीच्या निर्णय क्र. ९४४ नुसार दि. ०१/०१/२०१७ रोजी पासुन संपुर्णपणे मोफत उपचार सुरु केलेले आहे.

२) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २५/०२/२०१७ रोजीच्या निर्णय क्र. ०६ नुसार दि.०१/०३/२०१७ रोजी पासुन श्री साईनाथ रुग्णालय भरती होणा-या रुगणांना आवश्यकतेनुसार प्रमाणे उपचारासाठी लागणारे रक्त व रक्तघटक मोफत देण्यात येत आहेत.

३) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०१/११/२०१८ रोजी पासुन श्री साईबाबा हॉस्पीटल मधील सद्यस्थितीला लागु असणारे दर जसेच्या तसे श्री साईनाथ रुग्णालयात लागु करणेत यावेत, व श्री साईनाथ रुग्णालयाचे दर निश्चित झालेनंतर दर दोन वर्षांनी १० टक्के वाढ करणेस मान्यता देण्यता आली.

विभागाचे मत / अभिप्राय- तरी उपरोक्त प्रमाणे मागील आर्थिक वर्षात रक्कम रु. ८,२१,३८,८४४/- इतकी श्री साईनाथ रुग्णालयाच्या गरीब व गरजु रुग्णांच्या मोफत वैद्यकिय उपचारापोटी खर्च झालेली आहे. तसेच मागील आर्थिक वर्ष माहे. एप्रिल–२०१८ व मार्च–२०१९ अखेरची रक्कम अंदाजपत्रकात खर्ची टाकणेकामी मान्यता असावी.

सदर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२५६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयात माहे एप्रिल-२०१८ ते मार्च २०१९ अखेर रुग्णांवर मोफत वैद्यकीय उपचारा पोटी खर्च झालेली रक्कम रु.८,२१,३८,८४४/-मात्रचे अवलोकन करुन सदरची रक्कम सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकात खर्ची टाकणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईनाथ रुग्णालय)**

---

विषय नं.८५ **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये एप्रिल २०१९ महिन्यात वैद्यकिय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.९३,२९,९०८/- ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय बिलात सवलत देण्या संबंधित मा.व्य.स.निर्णय क्र.५१९/दि.२४.०७.२०११ संमत झाला आहे. वैद्यकिय बिलात सवलत देण्याचे अधिकार उप.वै.संचालक/वै.संचालक यांना देण्यात आलेले आहेत त्यांचे गैर हजेरीत वै.प्रशासक/जनसंपर्क अधिकारी यांना अधिकार सुपुर्त करण्यात येऊन रुग्णांना मासिक वैद्यकिय बिलात सवलत देण्यात येते.

सोशल वर्कर हे रुग्णांची आर्थिक परिस्थीती जाणून घेतात व आवश्यक कागदपत्रांसह सवलत मंजुरी करीता प्रस्तावीत करतात.अशा प्रकारे हॉस्पिटलमध्ये वैद्यकिय बिलात सवलत देण्याकरीता स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. निर्णय क्र.५६४/२६.०६.२०१४ अन्वये प्रत्येक महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेण्यात येऊन आर्थिक वर्षाच्या शेवटी एकत्रित अहवाल मा.व्य.स.चे सभे समोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावा असे ठरले आहे. माहे सप्टेंबर २०१७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मान्यतेचे प्रस्तावावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दर महा मा.व्य.समिती सभेसमोर सादर करण्यास शेरा दिला आहे. त्याप्रमाणे माहे एप्रिल२०१९ मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलला ओपीडी रुग्ण १४,३६८व १,०३४ आयपीडी रुग्णांपैकी ३,४८४ओपीडी व ५६२ आयपीडी रुग्णांना वैद्यकिय बिलात एकुण रु.९३,२९,९०८/- इतकी सवलत देण्यात आली व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय बिलात सवलत देण्या संबंधीत मा.व्य.स.निर्णय क्रं.३४६/दि.१८-१९.०८.२००१ संमत झाला आहे, जा.नं.एसएसएस/एसएसएच/३३१/२०१७ दि.३०.०३.२०१७ आदेश. दि.०६.०३.२०१० ची सिकल सेल आजाराच्या रुग्णांना मोफत रक्त देणेबाबत टिपणी प्रमाणे एकुण ३६५ रुग्णाना रक्कम रु.५,८८,६००/- इतकी मोफत/सवलत देण्यात आली आहे. सवलत/मोफतचे विवरण खालील प्रमाणे-

(अ) श्री साईबाबा हॉस्पिटल

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १६२ | १५,२५,९९२/- | - | १५,२५,९९२/- |
| २ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ३९४ | २८,१०,७१०/- | १२,५६,२९५/- | १५,५४,४१५/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ९ | ६७,६७१/- | २,०००/- | ६५,६७१/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्ययोजना इ. | ६३७ | ५४,८०,८०३/- | ३३,१४,४४७/- | २१,६६,३५६/- |
| ५ | महात्मा फुले आरोग्या योजना आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २४० | १,२४,५४,५७९/- | १,०८,११,२५०/- | १६,४३,३२९/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २,६०४ | १७,८५,५४५/- | - | १७,८५,५४५/- |
| | **एकुण** | **४,०४६** | **२,४१,२५,३००/-** | **१,५३,८३,९९२/-** | **८७,४१,३०८/-** |

(ब) श्री साईनाथ रक्तपेढी

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | थॅलॅसिमिया | ४१ | ५२,४००/- | - | ५२,४००/- |
| २ | हिमोफिलीया | ० | - | - | - |
| ३ | सिकल सेल ॲनेमीया फ्रि | ० | - | - | - |
| ४ | फ्रि डन बाय एमएडी/एमएस | २५ | ३२,४००/- | - | ३२,४००/- |
| ५ | व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि | २४ | २,८००/- | - | २,८००/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना | ११८ | २,६३,४००/- | - | २,६३,४००/- |
| ७ | संस्थान एम्प्लॉयी फ्रि | ६ | ११,४००/- | - | ११,४००/- |
| ८ | कॉन्ट्रक्ट एम्प्लॉयी फ्रि | १ | १,८००/- | - | १,८००/- |
| ९ | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | १५० | २,२४,४००/- | - | २,२४,४००/- |
| | एकुण | ३६५ | ५,८८,६००/- | - | ५,८८,६००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | एकुण अ+ब | ४,४११ | २,४७,१३,९००/- | १,५३,८३,९९२/- | ९३,२९,९०८/- |

प्रस्ताव- उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये एप्रिल २०१९ मध्ये वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम रु.९३,२९,९०८/- ची नोंद घेऊन दिलेल्या सवलतीस मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

निर्णय क्र.२५७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये एप्रिल २०१९ महिन्यात वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम रु.९३,२९,९०८/- मात्रचे अवलोकन करुन त्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **शासन निर्णय व परिपत्रक यांचे वाचन.**

**प्रस्ताव** महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाकडून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे कामकाजा संबंधीत शासन निर्णय, परिपत्रके व इतर पत्र प्राप्त होतात. सदर पत्रांची एकत्रित रित्या मागासवर्ग कक्षाकडे नोंद घेऊन सदर पत्रावर उचित कार्यवाहीसाठी संबंधीत विभागाकडे पाठविण्यात येते. सदर शासन पत्रावर संबंधीत विभागाने काय कार्यवाही केली आहे त्याबाबतचा अहवाल प्रत्येक महिन्यास वरिष्ठांकडे सादर करण्यात येतो.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२/०५/२०१८ चे सभेत आयत्या वेळचा विषय क्र.१७, निर्णय क्र.३४६ "संस्थानचे कामकाजासंबंधी शासनाचे निर्णय,परिपत्रके वेळोवेळी समितीचे बैठकीत सर्व समिती सदस्यांना बैठकीच्या अजेंडयासोबत देण्यात यावी व सदर शासन निर्णय, परिपत्रके यांचे वाचन असा विषय अजेंडयामध्ये समाविष्ट करण्यात यावा."असा झालेला आहे.

उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार दि.२७/०२/२०१९ ते दि. ०४/०६/२०१९ अखेर या कालावधीत महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाकडून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे कामकाजासंदर्भात खालीलप्रमाणे प्राप्त झालेली पत्रे सोबत सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | शासन पत्र क्र. व दिनांक | प्राप्त दिनांक | विषय |
|---|---|---|---|
| ०१ | शासन निर्णय क्र.सासंवि-१०१८/९६९/ प्र.क्र.११०/का.१६ दि.०६/०३/२०१९ | १८/०३/२०१९ | श्री साईबाबा संस्थानचे मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं.१८३ पै येथे शैक्षणिक संकूल उभारण्यास येणा-या सुधारीत खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत |
| ०२ | क्र.सासंवि-२०१८/८८४/प्र.क्र.८६/का.१६ विधी व न्याय विभाग दि. १०/०४/२०१९ | १६/०४/२०१९ | श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील रु.५० हजार पेक्षा अधिक घसारा वजा किंमत असलेली जुनी वैद्यकीय मशिनरी / उपकरणे निर्लेखित करण्यास मान्यता देण्याबाबत |
| ०३ | शासन निर्णय क्र.सासंवि-१०१८/१४७०/ प्र.क्र.१५८/का.१६ दि.२४/०४/२०१९ | ०१/०५/२०१९ | श्री साईसमाधी शताब्दी महोत्सव २०१८ निमित्त २५ ग्रॅम वजनाचे नाणे साई संस्थान विश्वस्त / अधिकारी / कर्मचारी यांना सप्रेम भेट म्हणून न देता सर्व चांदीची नाणी खरेदी मुल्यानुसार साईभक्तांना विक्रीकरीता उपलब्ध करुन देण्याबाबत |

सदर पत्रे मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार सर्व समिती सदस्यांना बैठकीच्या अजेंडयासोबत वाचन करणेकामी द्यावयाची असल्याने सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

निर्णय क्र.२५८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शासनाकडून प्राप्त झालेल्या उपरोक्त शासन निर्णयाचे वाचन करुन त्याची नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-मागासवर्ग कक्ष)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **प्रसादालय, लाडू निर्मीती व मंदिर विभागासाठी सन २०१९-२० लॅमिनेटेड पेपर पिशवी खरेदीकामी ई-निविदेत प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव** संस्थानचे प्रसादालय, लाडू निर्मिती व मंदिर विभागासाठी लॅमिनेटेड पेपर पिशवी खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य/वस्तुचा तपशिल | लॅमिनेटेड पेपर पिशवी खरेदी |
| ०२ | मागणी | लॅमिनेटेड पेपर पिशवी |
| ०३ | ई-निविदा प्रसिद्धी | दि. ११.०२.२०१९ ते दि. ०२.०३.२०१९ |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसूचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट व ०६ निविदाधारकांना ई-मेल व्दारे |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले? | ०६ईमेल आय डी वर |
| ०६ | निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ | दिनांक – ११.०२.२०१९<br>टेक्निकल बीड – ०७.०३.२०१९<br>कमर्शियल बीड – ३०.०५.२०१९ |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या | ०४ (चार) |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या | ०४ (चार) |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | होय. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का ? | ०४ हि निविदाधारकांनी बयाणा रक्कम भरलेली आहे. |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का ? | --- |
| १२ | निविदाकारांनी सादर केलेले दर – | |

| SR.No | Description of Work / Item(s) | No.ofQty In Quintal | **Star Packaging** | **HariomFlexipack Industries** | **Savvy packaging Private Limited** | **DELIGHT INC** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | Rate Per Quintal | | | |
| 1 | Size 4.5"x 6.5" Poster Laminated Plain Paper Bags, 70 GSM, 2 Side Seal | 125.00 | 14000.00 | **12964.00** | 13200.00 | 13700.00 |
| 2 | Size 6"x 7" Poster Laminated Paper Bags, Prasad, 70 GSM, 3 Colour Printing, 2 Side Seal | 450.00 | **13900.00** | 15161.00 | 15100.00 | **13900.00** |
| 3 | Size 5"x 6" Poster Laminated Paper Bags, Prasad, 70 GSM, 3 Colour Printing, 2 Side Seal | 550.00 | **13800.00** | 15161.00 | 15100.00 | 13900.00 |
| 4 | Size 8"x 10",1 Colour Printing, Poster Laminated Paper Bags, 70 GSM, 2 Side Seal, Food Packet | 325.00 | 13900.00 | 13450.00 | 13700.00 | **13400.00** |
| 5 | Size 8"x 10", 1 Colour Printing, Poster Laminated Paper Bags, 70 GSM, 2 Side Seal, ShriSaiSatyavrat Prasad | 10.00 | 13900.00 | 13450.00 | 13700.00 | **13400.00** |
| 6 | Poster Laminated Paper Bags, 70 GSM, 2 Side Seal, Plain, Size 8"x 10" | 15.00 | 13900.00 | 13450.00 | **13200.00** | 13400.00 |

| | | |
|---|---|---|
| १३ | यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर – | |

| SR.No | Description of Item(s) | Rate per Quintal for the year 2018-19 |
|---|---|---|
| 1 | Size 4.5"x 6.5" Poster Laminated Plain Paper Bags, 70 GSM, 2 Side Seal | 14500 |
| 2 | Size 6"x 7" Poster Laminated Paper Bags, Prasad, 70 GSM, 3 Colour Printing, 2 Side Seal | 14600 |
| 3 | Size 5"x 6" Poster Laminated Paper Bags, Prasad, 70 GSM, 3 Colour Printing, 2 Side Seal | 14400 |
| 4 | Size 8"x 10",1 Colour Printing, Poster Laminated Paper Bags, 70 GSM, 2 Side Seal, Food Packet | 13500 |
| 5 | Size 8"x 10", 1 Colour Printing, Poster Laminated Paper Bags, 70 GSM, 2 Side Seal, ShriSaiSatyavrat Prasad | 13500 |
| 6 | Poster Laminated Paper Bags, 70 GSM, 2 Side Seal, Plain, Size 8"x 10" | -- |

| | | |
|---|---|---|
| १४ | मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल - --- | |
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | --- |
| १६ | मागील खरेदी दर | वरील अ.नं १३ मध्ये नमुद केले आहेत. |
| १७ | मागील पुरवठादार | मे. स्टार पॅकेजिंग, श्री प्लास्टो फिल्मस,सॅव्ही पॅकेजिंग प्रा.लि. |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | वरील अ.नं १२ मध्ये नमुद केले आहेत. |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव | वरील अ.नं १२ मध्ये नमुद केले आहेत. |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर - करण्यात आला आहे का ? | होय |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, प्र.अधिक्षक, खरेदी |

| २२ | मागील खरेदी | सध्याचे प्राप्त दर | फरक | % ने कमी/जास्त |
|---|---|---|---|---|
| | ---- | --- | ---- | ---- |

२३. संक्षिप्त टीप– (प्रस्ताव) संस्थानचे प्रसादालय, लाडू निर्मिती व मंदिर विभागासाठी लॅमिनेटेड पेपर पिशवी खरेदीकामी सदर ई-निविदा राबविण्यात आलेली असुन या ई-निविदेमध्ये ०४ निविदाधारकांनी भाग घेतला होता तथापी याकामी तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या ०४ निविदाधारकांच्या कमर्शिअल निविदा लोकसभेच्या निवडणूकीची आचारसंहिता चालु असल्याने उघडण्यात आल्या नव्हत्या, दि. २४.०५.२०१९ रोजी लोकसभेच्या निवडणूकीची आचारसंहिता संपुष्टात आल्याने खरेदी समितीचे दि. ३०.०५.२०१९ चे सभेत सदर कमर्शिअल निविदा उघडण्यात आल्या आहेत. यामध्ये मे. स्टार पॅकेजिंग, दमण, मे हॅरी ओम फ्लेक्सी पॅक इंडस्ट्रीज, मे. सॅव्ही पॅकेजिंग प्रा.लि., मे. डिलाईट इंक. या चार निविदाधारक यांचे न्युनतम दर वर सादर केलेल्या तक्त्यामध्ये अधोरेखित केलेप्रमाणे न्युनतम आहेत.

मात्र अ.नं. ३ च्या items च्या खरेदीसाठी मे. स्टार पॅकेजिंग, दमण यांचे दर न्युनतम आहेत. तथापी ते महाराष्ट्र राज्याबाहेरील निविदाधारक असल्याने महाराष्ट्र शासनाचे सुधारीत खरेदी नियमावली नुसार व्दितीय न्युनतम निविदाधारकमे. डिलाईट इंक. यांना प्रथम न्युनतम दराने ५०% पुरवठा आदेश देणेबाबत विचारणा करावी लागेल व ते तयार असल्यास सदर पेपर पिशव्यांचा ५०% परिमाणा इतका पुरवठा आदेश त्यांना द्यावा लागेल.

तरी न्युनतम निविदाधारक यांचेशी निविदेत दिलेल्यान्युनतम दरांबाबत चर्चा वाटाघाटी होऊन निर्णय होणेकामी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेत सादर.

निर्णय क्र.२५९ **प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील काही निम्नतम निविदाधारक आजचे व्यवस्थापन समितीसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. समितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता चर्चेअंती त्यांनी खालील प्रमाणे अंतिम दर देऊ केले.**

| Sr.No. | Description | Quantity | Unit | Bidders Name | Rate in Tender Rs. | Final Rate |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Size 4.5"x 6.5" Poster Laminated Paper Bags, 70 GSM, 2 Side Seal | 125 | Quintal | हरीओम फ्लेक्झिपॅक इंडस्ट्रिज, कोल्हापुर | 12,964.00 | 12,900.00 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 2 | Size 6"x 7" Poster Laminated Paper Bags, Prasad, 70 GSM, 3 Colour Printing, 2 Side Seal | 450 | Quintal | स्टार पॅकेजिंग, दमण | 13,900.00 | 13,800.00 |
| | | | | डीलाईट आयएनसी, नाशिक | 13,900.00 | 13,800.00 |
| 3 | Size 5"x 6" Poster Laminated Paper Bags, Prasad, 70 GSM, 3 Colour Printing, 2 Side Seal | 550 | Quintal | स्टार पॅकेजिंग, दमण | 13,800.00 | 13,700.00 |
| | | | | डीलाईट आयएनसी, नाशिक | 13,900.00 | 13,700.00 |
| 4 | Size 8"x 10", 1 Colour Printing, Poster Laminated Paper Bags,, 70 GSM, 2 Side Seal, Food Packet | 325 | Quintal | डीलाईट आयएनसी, नाशिक | 13,400.00 | 13,300.00 |
| 5 | Size 8"x 10", 1 Colour Printing, Poster Laminated Paper Bags,, 70 GSM, 2 Side Seal, Satyanarayan | 10 | Quintal | डीलाईट आयएनसी, नाशिक | 13,400.00 | 13,300.00 |
| 6 | Plain Poster Laminated Paper Bags, 70 GSM, 2 Side Seal, Size 8"x 10" | 15 | Quintal | सॅव्ही पॅकेजिंग, नाशिक | 13,200.00 | 13,200.00 |

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालय, लाडू निर्मीती व मंदिर विभागासाठी सन २०१९-२० करीता वरील अ.नं.१,४,५ व ६ लॅमिनेटेड पेपर पिशवी खरेदीकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक यांनी चर्चेअंती देऊ केलेले वरील प्रमाणे अंतिम निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यास मान्यता देण्यात आली. वरील अ.नं.२ साठी ज्या निविदाधारकांचे दर समान आहेत त्यांना विभागुन पुरवठा आदेश देण्यात यावा, तसेच अ.नं.३ (Size 5"x 6" Poster Laminated Paper Bags) साठी मे.स्टार पॅकेजींग, दमन यांचे दर निम्नतम आहेत. तथापी ते महाराष्ट्र राज्याबाहेरील असल्याने महाराष्ट्रातील व्दितीय निम्नतम दरधारक डीलाईट आयएनसी, नाशिक हे प्रथम निम्नतम दरधारकाचे दरात पुरवठा करण्यास तयार असल्यामुळे सुधारीत खरेदी नियमावलीनुसार विभागुन पुरवठा आदेश देण्यात यावा,असे ठरले.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

आयत्या वेळेचा

**विषय नं.०३** **प्रसादालय व मंदिर विभागासाठी सन २०१९-२० या वर्षासाठी खाद्य तेल खरेदीकामी वार्षिक ई-निविदा प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव** संस्थानचे प्रसादालय व मंदिर विभागासाठी खाद्य तेल खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य/वस्तुचा तपशिल | खाद्य तेल खरेदी |
| ०२ | मागणी | खाद्य तेल |
| ०३ | ई-निविदा प्रसिद्धी | दि. ११.०२.२०१९ ते दि. ०२.०३.२०१९ |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसूचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट व ४९ निविदाधारकांना ई-मेल व्दारे किराणामाल व इतर अनुशंगिक साहित्यासाठी |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले? | ४९ ईमेल आय डी वर |
| ०६ | निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ | दिनांक – ११.०२.२०१९<br>टेक्निकल बीड – ०७.०३.२०१९<br>कमर्शियल बीड – ३०.०५.२०१९ |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या | ०७ (सात) |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या | ०७ (सात) |

| | | |
|---|---|---|
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | होय. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का ? | ०६ निविदाधारकांनी बयाणा रक्कम भरलेली आहे तर ०१ निविदाधारकास MSME अंतर्गत सुट आहे. |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का ? | --- |

१२ निविदाकारांनी सादर केलेले दर –

| Sl. No | Description | Quantity In Quintals | JAI HIND KIRANA | PRAMOD SUPPLIERS | RAMNATH JAGGANATH & CO. | KAILAS FOOD & KIRANA STORES | AMIT KUMAR TRADING CO. | **BALAJI TRADING CO.** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Rate Per Quitals | | | | | |
| 1 | माहे एप्रिल-जुन २०१९ खाद्य तेल | 750.50 | 9363 | 9345 | 9599 | 9600 | <u>8865</u> | 9513 |
| 2 | माहे जुलै-सप्टेंबर २०१९ खाद्य तेल | 750.50 | 9474 | 9597 | 9599 | 9600 | <u>8865</u> | 9513 |
| 3 | माहे ऑक्टोबर-डिसें २०१९ खाद्य तेल | 750.50 | 9580 | 9702 | 9599 | 9600 | <u>8875</u> | 9527 |
| 4 | माहे जाने-मार्च २०२० खाद्य तेल | 750.50 | 9694 | 9849 | 9599 | 9600 | <u>8875</u> | 9515 |

१३ यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर –

| SR.No | Description of Item(s) | कालावधी | Rate per Kilogram for the year 2018-19 |
|---|---|---|---|
| 1 | खाद्य तेल | माहे एप्रिल- जुन २०१८ | 88.75 |
| 2 | खाद्य तेल | माहे जुलै- सप्टेंबर २०१८ | 88.75 |
| 3 | खाद्य तेल | माहे ऑक्टोबर- डिसें २०१८ | 88.75 |
| 4 | खाद्य तेल | माहे जाने- मार्च २०१९ | 88.75 |

| | | |
|---|---|---|
| १४ | मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल - --- | |
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | --- |
| १६ | मागील खरेदी दर | वरील अ.नं १३ मध्ये नमुद केले आहेत. |
| १७ | मागील पुरवठादार | मे. कैलास फुड & किराणा जनरल स्टोअर्स, सातारा |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | वरील अ.नं १२ मध्ये नमुद केले आहेत. |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव | वरील अ.नं १२ मध्ये नमुद केले आहेत. |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर - करण्यात आला आहे का ? | होय |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, प्र.अधिक्षक, खरेदी |

| | मागील खरेदी | सध्याचे प्राप्त दर | फरक | % ने कमी/जास्त |
|---|---|---|---|---|
| २२ | ---- | --- | ---- | ---- |

२३. संक्षिप्त टीप – (प्रस्ताव) संस्थानचे प्रसादालय व मंदिर विभागासाठी खाद्य तेल खरेदीकामी सदर ई-निविदाप्रक्रीया राबविण्यात आलेली असुन या ई-निविदेमध्ये ०७ निविदाधारकांनी भाग घेतला होता. तथापी याकामी तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या ०७ निविदाधारकांच्या कमर्शिअल निविदा लोकसभेच्या निवडणूकीची आचारसंहिता चालू असल्याने उघडण्यात आल्या नव्हत्या, दि. २४.०५.२०१९ रोजी लोकसभेच्या निवडणूकीची आचारसंहिता संपुष्टात आल्याने खरेदी समितीचे दि. ३०.०५.२०१९ चे सभेत सदर कमर्शिअल निविदा उघडण्यात आल्या आहेत. एकुण ०७ निविदाधारकां पैकी मे. शिवम मिल्स & सप्लायर्स यांनी प्लेन प्लास्टीक पिशवीत खाद्य तेलाचा नमुना दिला होता. सदर तेल हे ब्रँडेड नसल्याने तज्ञ समितीने नमुने निवडताना त्यांना अपात्र ठरविले आहे. उर्वरीत ०६ निविदाधारकांचे दर वर सादर केलेल्या तक्त्यामध्ये अधोरेखित केलेप्रमाणे न्युनतम आहेत.

तरी न्युनतम निविदाधारक यांचेशी निविदेत दिलेल्या न्युनतम दरांबाबत चर्चा वाटाघाटी होऊन निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर.

निर्णय क्र.२६० **प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक AMIT KUMAR TRADING CO. हे आजचे व्यवस्थापन समितीसभेसमोर चर्चेसाठी अनुपस्थित होते. तथापी त्यांनी दि.५.६.२०१९ रोजी ई-मेल व्दारे खाद्यतेलाचे दर हे लिटरचा विचार करुन भरलेले आहेत. व त्यामुळे सदर दरामध्ये दरवाढ मिळावी अन्यथा ते खाद्यतेल पुरवठा करणेस असमर्थ असल्याचे कळविले होते.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, निविदा अटी-शर्ती व सुधारीत खरेदी नियमावलीत दरवाढ देण्याची तरतुद नसल्यामुळे मे.अमितकुमार ट्रेडींग कंपनी,बार्शी यांची विनंती फेटाळण्यात येऊन, ते पुरवठा करण्यास तयार नसल्यामुळे व त्यांनी MSME सवलत घेऊन निविदा भरलेली असल्यामुळे, पुढील तीन वर्षासाठी त्यांचे नाव काळया यादीत टाकण्यात यावे, असे ठरले.**

**तसेच याकामी त्वरीत फेर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी, फेर ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत आवश्यक असणारे खाद्यतेल मागील पुरवठा धारक यांचेकडून मंजूर दराने खरेदी करावे. ते पुरविण्यास तयार नसल्यास तातडीने दरपत्रके मागवुन खाद्यतेल खरेदी करावे, असे ठरले.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **कॅन्टीन विभागासाठी सन २०१९-२० या वर्षासाठी चहा पावडर व फिल्टर कॉफी खरेदी कामी वार्षिक ई-निविदा प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव** संस्थानचे कॅन्टीन विभागासाठीसन २०१९-२० या वर्षासाठी चहा पावडर व फिल्टर कॉफी खरेदीसाठी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य/वस्तुचा तपशिल | चहा पावडर व फिल्टर कॉफी खरेदी |
| ०२ | मागणी | चहा पावडर व फिल्टर कॉफी |
| ०३ | ई-निविदा प्रसिद्धी | दि. ११.०२.२०१९ ते दि. ०२.०३.२०१९ |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसूचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट व ४९ निविदाधारकांना ई-मेल व्दारे किराणामाल व इतर अनुशंगिक साहित्यासाठी |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले? | ४९ ईमेल आय डी वर |
| ०६ | निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ | दिनांक – ११.०२.२०१९<br>टेक्निकल बीड – ०७.०३.२०१९<br>कमर्शियल बीड – ३०.०५.२०१९ |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या | ०५ (पाच) |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या | ०५ (पाच) |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | होय. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का ? | ०१ निविदाधारकांनी बयाणा रक्कम भरलेली आहे तर ०४ निविदाधारकास MSME अंतर्गत सुट आहे. |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का ? | --- |
| १२ | निविदाकारांनी सादर केलेले दर – | |

| Sl. No | Description | Quantity In Quintals | VMDistributors | Vyankatesh Suppliers | SOMNATH KASHINATH MALPURE | M/S Amitkumar Trading Company |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | Rate IN Quintals | | | |
| 1 | Tea Powder (Chaha Powder) - Dust, Brookbond-Taaza, Sapat-Sahyadri,Tata- Agni | 151.00 | 16200.00 | 16000.00 | 15951.00 | 16050.00 |
| 2 | Coffee - Filter, Branded | 15.50 | ---- | 0.00 | 60000.00 | 0.00 |

१३ यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर –

| SR.No | Description of Item (s) | कालावधी | Rate per Quintal for the year 2018-19 |
|---|---|---|---|
| 1 | चहा पावडर (टाटा अग्नी) | माहे एप्रिल २०१८- मार्च २०१९ | 14000 |
| 2 | फिल्टर कॉफी (टाटा ग्रॅन्ड) | माहे एप्रिल २०१८ - मार्च २०१९ | 29700 |

| | | |
|---|---|---|
| १४ | मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल - --- | |
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | --- |
| १६ | मागील खरेदी दर | वरील अ.नं १३ मध्ये नमुद केले आहेत. |
| १७ | मागील पुरवठादार | मे. स्वामी समर्थ एजन्सीज, कोपरगाव |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | वरील अ.नं १२ मध्ये नमुद केले आहेत. |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव | वरील अ.नं १२ मध्ये नमुद केले आहेत. |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर - करण्यात आला आहे का ? | होय |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, प्र.अधिक्षक, खरेदी |

वरीलप्रमाणे मंजूर निविदा रकमेपेक्षा रु.२०,१४,७७६/- मात्र वाढीव खर्च होत आहे. याप्रमाणे होणारा वाढीव खर्च हा प्रामुख्याने इमारतींचे आतिल भागास लस्टर पेंट करणे या बाबीचे प्रत्यक्ष झालेल्या कामाचे क्वांटीटीमध्ये मोठया प्रमाणावर वाढ झाल्यामुळे झालेला आहे. होणा-या एकुण वाढीव खर्चापैकी लस्टर पेंटचे एका बाबीमध्ये रु .१८,०४,८३५/- इतका म्हणजेच ९०% वाढीव खर्च होत आहे.

उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक तयार करतेवेळी ते लवकर तयार करुन खर्चास मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्याचे दृष्टीने यापुर्वी सन २००७ मध्ये मंदिर परिसर साईउदयान मंगल कार्यालय या इमारतीच्या रंगकामासाठी मागविणेत आलेल्या निविदेमधील बाबींच्या क्वांटीटीजनुसार तयार करणेत आले होते. तथापी प्रत्यक्ष झालेल्या कामाची मोजमापे तपासली असता त्यानुसार वरीलप्रमाणे लस्टर पेंटचे बाबीच्या क्वांटीटीमध्ये मोठया प्रमाणावर वाढ झाल्याचे आढळुन आले आहे.

प्रस्ताव:- तरी ठेकेदार मे. एस. व्ही. चंदन यांचे मंदिर परिसर, साईउद्यान, साईनाथ मंगलकार्यालय या इमारंतीचे आतील व बाहेरील बाजुचे रंगकाम करणे कामाचे दुसरे व अंतिम देयक रक्कम रु.८३,३७ ,०२७/- मात्र मंजूर होऊन तसेच याकामी झालेल्या रक्कम रु.२०,१४,७७६/- मात्रचे वाढीव खर्चास व उर्वरीत निव्वळ देय रक्कम रु.२९,४२०२७/-मात्र ठेकेदार यांना अदा करणेस मान्यतेसाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीपुढे सादर होणेस विनंती.

**निर्णय क्र.२७१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसर, साईउद्यान व साईनाथ मंगल कार्यालय या इमारतीचे आतील व बाहेरील बाजुचे रंगकाम करणे कामी वाढीव खर्चाची रक्कम रु. २०,१४,७७६/-मात्र सह एकुण रक्कम रु.८३,३७ ,०२७/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात येऊन त्यापैकी उर्वरीत शिल्लक देय रक्कम रु.२९,४२,०२७/- मात्र सदर कामाचे ठेकेदार मे.एस.व्ही.चंदन, मुंबई यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५** **नियोजीत श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारत बांधकाम प्रकल्पातील ess (Electrical Substation) इमारतीचे बांधकामाकरीता मंजुर रेखांकनात ॲमेनिटी स्पेस म्हणून दर्शविलेली सर्व्हे नं.२/४,३/१ व ३/७ मधील १२७५ चौ.मिटर जागा ठेकेदार यांना उपलब्ध करुन देणेबाबत.**

**प्रस्ताव** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-

१) अधिनियम कलम २१(१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोट कलम (क) अन्वये, मंदिराची व

विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

२) अधिनियमाचे कलम १७ पोटकलम (३) अन्वये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजुरीने असेल त्याखेरीज समितीकडून, एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता, भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही, किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रामित करण्यात येणार नाही.

मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयः-

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२२/०८/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५०६ नुसार श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग इमारत बांधकामाकरीता निविदाधारक भानु कन्स्ट्रक्शन, मुंबई यांची निम्नतम दराची निविदा स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेत यावा, असे ठरले आहे.

प्रस्तावना:-

सदर प्रकल्पाचे कामास दि.१९/१०/२०१८ पासून सुरुवात झालेली असून या प्रकल्पाचा ठळक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| कामाचे नाव : | श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारतीचे बांधकाम करणे. |
| ठेकेदार : | भानू कन्ट्रक्शन, मुंबई. |
| कार्यादेश : | जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/२५२०/२०१८, दि.२३/०८/२०१८. |
| मंजूर निविदा रक्कम : | रु.१०९.५० कोटी. |
| करारनामा दिनांक : | दि.२२/१०/२०१८. |
| कामाचा कालावधी : | १२ महिने. (दि.१८/१०/२०१९ अखेर) |

ठेकेदार यांनी दि.२५/०२/२०१९ व दि.२५/०३/२०१९ रोजीचे पत्राव्दारे नियोजित श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारतीचे ESS, UGT & STP कामाकरीता जागा उपलब्ध करुन देणेबाबत विनंती केलेली आहे.

नियोजित श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारतीचे UGT (भूमिगत आर.सी.सी. पाण्याची टाकी) व STP (सांडपाणी प्रक्रिया सयंत्र) चे जागेवर सध्या संस्थानचे बायोमेट्रीक पास काऊंटर कार्यरत आहे. सदरहू बायोमेट्रीक पास काऊंटर्स तात्पुरते स्वरुपात ०१ वर्षाकरीता मंदिर परिसराचे गेट क्रं. ०४ समोरील शिर्डी सर्व्हे क्रं.०१ येथिल नगर-मनमाड रस्त्यालगतचे त्रिकोणी जागेत स्थलांतरीत करणेकामी सदर जागा ०१ वर्षाकरीता संस्थानला मिळणेबाबत मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना दि.१३/०४/२०१९ रोजीचे पत्रान्वये विनंती केलेली आहे.

नियोजित श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारतीचे कामातील ESS (Electrical Substation) इमारतीचे बांधकाम हे मंजूर रेखांकनात दक्षिण-पूर्व कोप-यात (गेट नं.०२ समोर) सर्व्हे नं.२/४, ३/१व ३/७मधिल जागेत दर्शविण्यात आलेले आहे. ESS (इलेक्ट्रीकल सबस्टेशन)चे ठिकाणी असलेले संस्थानचे जुने बाथरूम व शौचालय दि.२५/०२/२०१९ रोजी पाडण्यात आले आहे.

तथापी ESS (इलेक्ट्रीकल सबस्टेशन) चे प्रस्तावित जागेबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि.२६/०२/२०१९ रोजीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय क्रं. १६३ समंत झालेला आहे.

"मौजे शिर्डी येथील मोफत सर्व्हे नं.०१(त्रिकोण)मधील १०१ दुकानदार हे आजचे व्यवस्थापन समितीचे सभेसमोर उपस्थित होते. त्यांनी सभेत अशी विनंती केली की, दर्शन रांगेच्या ले आऊट मध्ये दक्षिण पुर्व कोप-यामध्ये १२७५ चौ. मी. ॲमेनिटी स्पेस दर्शविले असून त्यामध्ये इलेक्ट्रीकल सबस्टेशन व जनरेटर रुम दर्शविलेले आहे. सदर सबस्टेशन व जनरेटर रुम भूखंडाचे उत्तर हद्दीलगत सध्याचे बायोमेट्रीक पास काऊंटरचे समोर बांधण्यात यावे, त्यासाठी ॲमेनिटी स्पेस त्या ठिकाणी दर्शविणेत यावी. तसेच त्यासाठी ओपन स्पेस सध्याचे सुलभ शौचालय व साईनिवास अतिथीगृह यांचे मधील मोकळया जागेत व सध्याचे बायोमेट्रीक पास काऊंटरचे जागेवर अशा दोन ठिकाणी दर्शविण्यात यावे, तसेच सध्याचे मंजूर रेखांकनामध्ये दर्शविण्यात आलेल्या ॲमेनिटी स्पेसची जागा तसेच त्यालगतच्या सर्व्हे नं.३/२ मधील संस्थानला भूसंपादनाने मिळालेली २०० चौ. मी. जागेसह विस्थापित १०१ दुकानदारांसाठी दुकानगाळे बांधकामासाठी उपलब्ध करुन देण्यात यावी.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली, मौजे शिर्डी येथिल मोफत सर्व्हे नं.०१ (त्रिकोण) मधील १०१ दुकानदारांचे पुर्नवसन करण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली. याबाबत दि.२२/०२/२०१६ रोजी मा. सर्वोच्च

न्यायालयाने मौजे शिर्डी येथील मोफत सर्व्हे नं. ०१ (त्रिकोण) बाबत दिलेल्या आदेशाचे समिती सदस्य मा. ॲड. मोहन जयकर यांनी तातडीने अवलोकन करावे व सदर आदेशाबाबत ॲटर्नी जनरल तसेच विधी व न्याय विभाग यांचे मागदर्शन घ्यावे, तसेच एफ. एस. आय बाबत नगररचना विभाग यांचे अभिप्राय घेऊन त्यानंतर प्रस्तुत प्रकरणी सविस्तर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे पुढील सभेसमोर सादर करावा,असे ठरले.”

मा. व्यवस्थापन समितीचा वरीलप्रमाणे निर्णय झालेला असल्याने, ESS (Electrical Substation) ची जागा अद्याप ठेकेदार भानु कन्स्ट्रक्शन, मुंबई यांना कामासाठी उपलब्ध करुन दिलेली नाही. ठेकेदार यांनी वरील संदर्भिय पत्रान्वये सदरESS, UGT & STP Work करीता जागा उपलब्ध करुन देणेबाबत विनंती केली आहे. नियोजित दर्शन रांग इमारतीचे बांधकाम विहीत वेळेत पूर्ण करण्याचे दृष्टीने बायोमेट्रीक पास काऊंटर स्थलांतरीत करुन ESS, UGT & STP चे कामाकरीता ठेकेदार यांना संबधित जागा हस्तातंरीत करणे गरजेचे आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार संस्थान मालकीची जागा विस्थापित दुकानदारांसाठी दुकानगाळे बांधकामासाठी उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधिल वर नमूद कलम १७८३ अन्वये राज्य शासनाची पुर्वमंजूरी घेणे आवश्यक आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयाचे अंमलबजावणीसाठी खालील टप्प्यांनुसार कार्यवाही करावी लागेल.

अ) दि.२२/०२/२०१६ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने मौजे शिर्डी येथिल मोफत सर्व्हे नं.०१ (त्रिकोण) बाबत दिलेल्याआदेशाचे समिती सदस्य मा. ॲड मोहन जयकर यांनी अवलोकन करुन सदर आदेशाबाबत ॲटर्नी जनरल यांचे मार्गदर्शन घेणे. याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाचा उपरोक्त आदेश संस्थानचे विधी विभागाने दि.०२/०४/२०१९ रोजीचे ईमेल व्दारे मा. ॲड मोहन जयकर यांना पाठविला असून विधी विभागामार्फत पुढील कार्यवाही चालू आहे.

ब) वरील “अ” मध्ये नमूद केलेप्रमाणे मार्गदर्शन प्राप्त झालेनंतर याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणे.

क) या विषयी मा. व्यवस्थापन समितीचा अंतिम निर्णय झालेनंतर अधिनियमाचे कलम १७(३) अन्वये प्रस्तुत स्थावर मालमत्ता हस्तांतरणासाठी राज्य शासनाचे पूर्वमंजुरीकरीता प्रस्ताव सादर करणे, तसेच भूखंडाचे सुधारीत रेखांकनास शिर्डी नगरपंचायत यांची मान्यता घेणे.

प्रस्ताव:- वर नमूद कार्यवाहीसाठी सुमारे दोन महिन्यांपेक्षा जास्त कालावधी लागेल. तोपर्यंत ठेकेदार भानू कन्स्ट्रक्शन यांना ESS चे बांधकामासाठी जागा उपलब्ध करुन देता येणार नाही. परिणामी दर्शनरांग इमारत बांधकाम प्रकल्प पूर्ण करणेस विलंब होईल. तरी सदर भूखंडाचे मंजूर रेखांकनात दर्शविलेली ॲमेनिटी स्पेसची जागा ठेकेदार यांना ईलेक्ट्रीकल सबस्टेशनचे बांधकामासाठी उपलब्ध करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२७२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारत बांधकाम प्रकल्पातील ess (Electrical Substation) इमारतीचे बांधकामाकरीता मंजुर रेखांकनात ॲमेनिटी स्पेस म्हणून दर्शविलेली सर्व्हे नं.२/४,३/१ व ३/७ मधील १२७५ चौ.मिटर जागा सदर बांधकामाचे ठेकेदार यांना ईलेक्ट्रीकल सबस्टेशनचे बांधकामासाठी उपलब्ध करुन देणेबाबत संस्थानचे विद्युत विभागाने तपासणी करुन कार्यवाही करावी, असे ठरले.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग/विद्युत विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६** **मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं.१६९ मध्ये वर्ग ४ कर्मचारी निवासस्थान बांधकाम ठेकेदार मे. अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा.लि.,मुंबई यांचे लवाद (Arbiration) बाबत.**

**प्रस्ताव** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :

१. अधिनियम १७ (२) (च) विश्वस्तव्यवस्थेशी संबंधित असे कोणतेही दावे, खटले व इतर कादेशीर कार्यवाही, न्यायालयात किंवा न्यायाधिकरणापुढे किंवा इतर प्राधिकरणामुळे दाखल करील व त्या संबंधात बचाव करील; अशी तरतुद आहे.

२. अधिनियम कलम २१ (१) (छ) कोणत्याही न्यायालयाचा किंवा न्यायाधिकाकरणाचा किंवा कोणत्याही प्राधीकरणाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा निवाडा याची पूर्ती करण्यासाठी आवश्यक असतील अशा कोणत्याही रकमांचे प्रदान; अशी तरतुद आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :

१. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९/०७/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६३७.
२. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २७/०२/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१८६.
३. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०८/१०/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८१०.
४. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २३/०५/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२९९.
५. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०३/०८/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६१५.

प्रस्तावना:- संस्थानचे मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं. 169 मधील जागेत संस्थानचे वर्ग 04 कर्मचारी यांचे करीता निवासस्थान बांधकाम करणेचे काम ठेकेदार मे. अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांचे मार्फत पूर्ण करण्यात आले आहे. या प्रकल्पाची माहिती खालील प्रमाणे आहे :-

| | | |
|---|---|---|
| 01 | कामाचे नांव | निमगांव (को.) गट.नं.169 मध्ये वर्ग-4 कर्मचारी निवासस्थानांचे बांधकाम करणे. |
| 02 | आर्किटेक्ट | मे.भालचंद्र चावरे, नाशिक. |
| 03 | ठेकेदाराचे नांव | मे.अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा. लि. मुंबई |
| 04 | अंदाजपत्रकीय रक्कम | रू. 3,74,76,286/- |
| 05 | निविदा टक्केवारी | 5.04% अधिक |
| 06 | मंजूर निविदा रक्कम | रू. 3,93,65,091/- |
| 07 | व्य.मं.निर्णय क्रमांक व दि. | नि.क्र. 656 दि. 05/11/2005 |
| 08 | कार्यादेश क्रमांक | एसएसएस/ वशी- बांधकाम-13431/05 दि.21/11/2005 |
| 09 | काम सुरु केल्याचा दिनांक | दि. 03/12/2005 |
| 10 | निविदेनुसार काम पूर्ण करण्याची मूदत | 12 महिने - दि.02/12/2006अखेर |
| 11 | मंजूर मूदतवाढ | दि.30/04/2007 , दि.15/08/2007 |
| 12 | काम पुर्ण झाल्याची दिनांक | दि. 15/08/2007 |
| 13 | अंतिम बिलापर्यंत झालेल्या कामाची किमंत | रु. 3,50,43,777.00 |
| 14 | दोषदायित्व कालावधी (Defect liability period) | 12 महिने - दि.14/08/2008अखेर |

ठेकेदार अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा.लि.,मुंबई यांचे काम दि. 15/08/2007 रोजी पुर्ण झाल्यानंतर व त्यांनी अंतिम बिलातील त्रुटींची पुर्तता केल्यानंतर मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. 216/7 दि. 16.03.2008 अन्वये मंजूरी नंतर ठेकेदार यांना अंतिम बिल अदा करण्यात आले आहे.
त्यानंतर ठेकेदार यांनी दि. 01.04.2009 चे पत्रान्वये अंतिम बिल व सुरक्षा ठेव स्वीकारले नंतर रु.2,07,50,441.00 मात्र इतक्या अतिरीक्त रकमेची मागणी केली असून सदर रक्कम पंधरा दिवसाचे आत न मिळाल्यास आर्बिट्रेशनमध्ये जाणेबाबत कळविले होते. ठेकेदार यांचे पत्रातील मुद्दे व वस्तुस्थिती खालील प्रमाणे आहे.

ठेकेदार यांनी कळविले आहे की,

“ संस्थान व आर्किटेक्ट यांचेकडून विविध बाबींसाठी उशीर तथा अडथळे निर्माण झाले, करार भंग झाला, त्यामुळे सदर काम विहीत मुदतीपेक्षा उशिराने दि.15.08.2007 रोजी पूर्ण झाले. सदर काम दि. 15.08.2007 रोजी पूर्ण झाले असले तरी सदर कामाचा अंतिम हिशोब अद्यापही आपणांकडून पुर्ण झालेला नाही. सादर केलेले कामाचे अंतिम बिल विवादात्मक रित्या रु.3,50,43,477.00 इतक्या कमी रकमेसाठी प्रमाणीत करण्यात आले, ॲबस्ट्रक्ट व बिलाची प्रत आम्हाला दि.31.12.2008 रोजी मिळाली. दर व परिमाणामध्ये वजावटीबाबतचा तपशिल अद्यापही आम्हाला प्राप्त झालेला नाही. आम्ही संस्थानचे 31.12.2008 रोजीचे पत्र व त्यासोबतचे पेमेंट रु.16,84,159.00 मात्र कायदेविषयक हक्क राखून प्राप्त केले. त्यानंतर आम्हाला रु. 20,00,000.00 मात्र फुल ॲण्ड फायनल सेटलमेंट म्हणून देण्यात आले. परंतू ही रक्कम फुल ॲण्ड फायनल सेटलमेंट म्हणून आम्हाला मान्य नाही. आतापर्यंत दिलेली रक्कम देखील आर्किटेक्ट यांनी प्रमाणीत केलेल्या रकमेशी जुळत नाही. अद्याप सुरक्षा ठेव व इसारा रक्कम देखील मिळणे बाकी आहे. आम्ही सतत आर्थीक अडचणीत होतो, त्यामुळे सुरक्षा ठेव मिळणेबाकी असल्याने कोणतेही मुद्यावर मागणी करु शकत नव्हतो. शेवटी दि. 30.03.2009 रोजी मोठ्या विलंबानंतर आम्हाला सुरक्षा ठेव परत करण्यात आली. आता

पर्यंत मिळालेली रक्कम कामाचे परिमाण लक्षात घेता कुठल्याही प्रकारे प्रतिबीबींत होत नसल्याने आम्ही खालील यादी नूसार विवीध रकमाही निवीदेतील व कायदेशीर तरतूदीनूसार मागणी करीत आहोत. "

ठेकेदाराच्या पत्रातील मुद्द्यानुसार वस्तुस्थितीदर्शक स्पष्टीकरण :-

मुद्दा क्र. 01 :- कामाची एकूण रक्कम रु. 4,17,99,228.00 अशी होते. तथापी आर्किटेक्ट यांनी प्रमाणीत केलेनुसार बिलाची रक्कम फक्त रु.3,50,43,477.00 आहे. अशाप्रकारे उर्वरीत रक्कम रु.67,55,751.00 मात्र करारनाम्यातील अटीनुसार देय असणाऱ्या अतिरिक्त बाबी व अतिरिक्त क्वाटींटीसाठी आहे. आर्किटेक्ट यांचेकडून दि. 31/12/2008 रोजी मिळालेल्या सर्टीफिकेट मध्येही बिलाचा, वजावटीचा, दर कपातीबाबतचा असे तपशिल नमूद केलेले नसल्याने बिलाचे सर्टीफिकेट बरोबर आहे किंवा नाही. याविषयी वक्तव्य करता येत नाही. म्हणून आर्किटेक्ट यांनी रु.67,55,751.00 प्रमाणीत करुन संस्थानने अदा करावेत.

वस्तुस्थिती:-

i. ठेकेदार यांनी प्लिंथलेव्हल पर्यंत पूर्वीचे बिलात आर्कीटेक्ट यांनी अंतिम केलेल्या क्वांटीटी न घेता वाढीव मोजमापे

नव्याने घेऊन क्वांटीटी व दर वाढविले व त्यानुसार वाढिव रकमेसह बिल सादर केले आहे.

ii. निविदेमध्ये असलेल्या मोझॅक टाईल ऐवजी सिरॅमिक टाईल फ्लोरींगसाठी संडास बाथरुम क्वांटीटी व्यतिरिक्त इतर

क्वांटीसाठी जादा दराची मागणी केली आहे.

iii. निविदेत दर असून ही आर सी सी पडदी दर जादा ॲटममध्ये दर मागीतला.

iv. प्लिंथ मध्ये मुरमाव्यतीरीक्त मटेरीअल रॅबीट भरलेले असतांना मुरुम भराईचे दराची मागणी केली.

वरील प्रमाणे जादा दर क्वांटीटीसाठी मागणी ची निविदा शर्तीनुसार अदा करण्यात आली व साईटवरील मोजमांपानंतर क्वांटीटी कमी झाल्याने बिल रक्कम कमी झाली. त्यामुळे त्यांना उपरोक्तप्रमाणे रु. 67,55,751.00 मात्र देय होत नाहीत. तसेच संपूर्ण बिल, वजावटीचा तपशील इ. ठेकेदार यांना यापुर्वीच वेळोवेळी दाखविण्यात आलेले आहे.

तसेच उपरोक्त वाढीव दरांबाबत यापुर्वी देखील मा. व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा होऊन निविदा शर्तीनुसार बिल अंतिम करण्याबाबत ठरले आहे. त्यानुसार ठेकेदार यांना अंतिम बिल व भावफरक बिल अदा करणेत आले आहे.

मुद्दा क्र. 2 :-अंतिम बिल प्रमाणपत्रानुसार आम्हाला रू.40,27,171.45 मात्र देय होतात. तथापी या देय रकमेतून आम्हाला पार्ट पेंमेंट मिळाले. उर्वरीत रु.3,43,012.00 आर्किटेक्ट यांचे चुकीचे सर्टीफिकेटनुसारही देय आहे. त्यामुळे वरीलप्रमाणे रु.3,43,012.00 मात्र प्रमाणीत होऊन आम्हाला मिळावेत.

वस्तुस्थिती :- ठेकेदार यांना आर्किटेक्ट यांचे प्रमाणपत्रानुसार रु.40,27,171.00 मात्र दि. 07.04.2008 चे पेमेंट सर्टीफिकेटनुसार अदा करण्यात आली आहे.

मुद्दा क्र. 3:-निविदा शर्तीनुसार 50% सुरक्षा ठेव काम पूर्ण झाल्यावर म्हणजे दि.15.08.2007 रोजी मिळायला हवी होती. तसेच उर्वरीत 50% सुरक्षा ठेव दोषदायीत्व (Defects liability period) पूर्ण झाल्यानंतर दि.15.08.2008 रोजी मिळायला हवी होती. तथापी सदर सुरक्षा ठेव मोठ्या विलंबानंतर दि. 30.03.2009 रोजी मिळाली. त्यामुळे विलंबाने मिळालेल्या सुरक्षा ठेवीवर 18% दराने रु.4,35,182.00 मात्र व्याज मिळण्यास पात्र ठरतो. तरी रु. 4,35,182.00 मात्र व्याज प्रमाणीत होऊन आम्हाला मिळावे.

वस्तुस्थिती:-निविदाशर्तीनुसार 50% सुरक्षा ठेव आर्किटेक्ट यांचेकडील व्हर्च्युयल कम्प्लीशन सर्टीफिकेट (virtual complition certificate)प्राप्त झाल्यावर ठेकेदार यांना परत करता येते उर्वरीत 50% सुरक्षा ठेव स्पेशलाईज्ड बाबीवरील सुरक्षा ठेव वगळता दोषदायीत्व कालावधी पूर्ण झाल्यानंतर परत करता येते.

ठेकेदार यांनी दि.15/08/2007 ला काम पूर्ण केल्याने म्हटले असले तरी ठेकेदार यांनी त्यांचे निवीदेनूसार सर्व कामे पुर्ण केलेली नाहीत. सदरची कामे ठेकेदार यांनी निवीदेमधील स्पेशल कन्डीशन पान नं. 29 क्लॉज नं. 13 नूसार निवीदेमध्ये समाविष्ट नसलेली कामे परंतू सदर प्रकल्प पुर्ण करावयासाठी लागणारी कामे ठेकेदार यांनी आर्किटेक्ट यांनी प्रमाणीत केलेले दरानूसार ठेकेदार यांनी पूर्ण करावयाची होती मात्र ठेकेदार यांनी कंपाउंड वॉल, पॅनेल रुम, रोडचे काम, ड्रेनेज लाईन इ. कामे न केल्याने ती संस्थानला विभागामार्फत पूर्ण करावी लागली. त्यामुळे ठेकेदार यांचे काम व्हर्च्युअल कम्पलीशन झालेले नसल्याने त्यांना 50% डीपॉझीट रक्कम परत करणेत आलेले नाहीत. अंतिम बिलाचे प्रमाणपत्रानुसार सुरक्षा ठेव रक्कम अंतिम झाल्यावर ठेकेदार यांना सुरक्षा ठेव रक्कम अदा करण्यात आली. त्यामुळे ठेकेदार यांना सदर रकमेवरील व्याज देय होत नाही.

मुद्दा क्र. 04 :- काम पूर्ण करण्यास दि. 30.11.2006 ते दि. 15.08.2007 इतका विलंब झाल्याने या काळात ओव्हरहेड, आस्थापना पर्यवेक्षकीय स्टाफ, मशिनरी साधनसामुग्री, सेंट्रींग, शटरींग व स्कॅफोल्डींग इ.बाबींवर सुमारे रु.6,00,000.00प्रतीमाह दराने साडेआठ महिन्यांसाठी एकूण रु. 51,00,000.00 मात्र नुकसान झाले आहे. हे नुकसान केवळ आर्किटेक्ट/ संस्थानकडून विलंब झाल्याने झालेले आहे. सबब ते आम्हाला मिळावे.

वस्तुस्थिती :- सदरचा विलंब हा ठेकेदार यांचे प्रकल्प नियोजनातील त्रुटींमुळे झालेला आहे. त्यांनी मटेरीअल खरेदी, मजूर / कुशल कारागीर नियोजन इ. बाबत वेळीच व्यवस्थित नियोजन करून पाठपुरावा करुन कामाचे नियोजन केले असते तर त्यावर योग्य ते मॉनिटरींग होऊन कामासाठी मटेरीअल लेबर, इ. बाबी वेळेवर उपलब्ध होऊन कामाची गती राखून वेळेत काम पूर्ण करता आले असते. परंतू तसे झाले नाही. वेळोवेळी त्यांचेकडे मजूर/ कुशल कारागीर, मटेरीअल इ. बाबींची कमतरता भासल्याने काम वेळेत पूर्ण झाले नाही. ठेकेदार यांनी त्यांचे स्वत:चे अडचणीमुळे कामास विलंब होत असल्याचे मान्य करीत मुदतवाढीबाबत दि. 31.10.06 व 26.06.07 चे पत्रान्वये कळविलेल्या होत्या. त्या खालीलप्रमाणे होत्या.

अ)

1. वाळु उपलब्ध न झाल्यामुळे बाहेरुन वाळु आणावी लागली
2. माल वाहतुकीच्या नियामात बदल झाल्याने अडचणी आल्या.
3. बांधकाम साहित्यात वाजवीपेक्षा दरवाढ झाली.

ब)

1. बांधकाम साहित्याच्या दरात मोठया प्रमाणात झालेली वाढ. त्यांचे भांडवलातील बराचशा भाग बांधकाम साहित्याच्या खरेदीत अडकला बांधकाम साहित्याच्या खरेदीसाठी रोख बिल अदा करावे लागले.
2. रंगकाम 25/04/2008 पर्यंत पुर्ण करता आले नाही.
3. उपठेकेदार उपलब्ध झाले नाही.

उपरोक्त बाबींमुळे ठेकेदार यांनी काम उशीराने पुर्ण केल्यामुळे संस्थानचे एकुण 99 फ्लॅट धारकांना जादा दराने खाजगी रुम भाडोत्री घेऊन राहावे लागले. त्यामुळे संस्थानचेच नूकसान झालेले असल्यामुळे ठेकेदार यांनाच दंड आकारणी करुन नूकसान भरपाई आकारणे आवश्यक होते. परंतू संस्थानने सकारात्मक दृष्टीकोण ठेऊन दंड आकारणी न करता मुदतवाढ दिलेली आहे. त्यामुळे त्यांना रु. 51,00,000/- मात्र रक्कम अदा करण्याचा प्रश्नच येत नाही.

मुद्दा क्र. 05 :- निविदेतील त्रुटींबाबत/ आयटेमचे परिमाणाबाबत - ठेकेदार यांनी सदरची निविदा टक्केवारी दराने असल्याने निविदेत असलेले परिमाण हे बरोबर असल्याचे गृहीत धरुन निविदा दर भरलेले होते. परंतू निविदेतील काही बाबींचे परिमाण कमी जास्त झाल्याने रु.18,99,360.00 इतकी नुकसान भरपाई मिळावी.

वस्तुस्थिती:- ठेकेदार यांना निविदेसोबत आर.सी.सी व वर्किंग ड्रॅाईंग देण्यात आलेले होते. ठेकेदार यांनी प्रत्यक्ष साईटची पहाणी करुन व कामाच्या परिमाणाची स्वत: तपासणी करुन तसेच बाजारातील मटेरीअलची उपलब्धता दर हया सर्व बाबींची खातरजमा करुनच दर भरणे अपेक्षीत होते. तसेच निवीदेमधील पान नं. 37 क्लॉज नं. 40 नूसार निवीदेतील परिमाणापेक्षा 25% परिमाण जादा झाल्यास सदर ॲटम आर्थीक वर्षाचे दरसूची नूसार देण्याची तरतूद होती. तसेच नॉन डी. एस. आर. ॲटमसाठी बाजारातील मटेरियल व मजूरीदर व त्यावर 10% प्रॉफीटसह दर देण्याची तरतूद होती. व त्यानूसार आर्किटेक्ट यांनी ठेकेदार यांना दर तपासणी करुन देण्यात आलेली आहे. त्यामुळे आता काम पूर्ण झाल्यावर याबाबत वेगळी नुकसान भरपाई मागणे योग्य नाही. निविदेतही अशाप्रकारची तरतूद नाही. निविदेनुसार Price Variation & quantity varriation clause नुसार ठेकेदार यांना बिल अदा करण्यात आलेले आहे. ठेकेदार यांनी बिलात बऱ्याचशा बाबींचे परिमाण झालेल्या कामापेक्षा जादा मागणी केलेली आहे. सदर मोजमापे तपासणी अंती कमी झालेली आहे. त्यामुळे त्यांना रुपये 18,99,360.00 मात्र रक्कम देय होत नाही. साईटवरील आवश्यकतेनुसार ठेकेदार यांचेकडून काम करुन घेण्यात आले आहे. याबाबत वेळोवेळी झालेल्या कामाचे आढावा मिटींगमध्ये ठेकेदार यांचे प्रतीनिधी यांनी निविदा दरामध्ये काम करणेचे मान्य केले.

मुद्दा क्र. 6 :- मटेरीअलचे लिड चार्जेस बाबत -ठेकेदार यांचे म्हणणेनुसार जिल्हा दरसूची मधील चार्जेसप्रमाणे सदर कामाकरीता आवश्यक मटेरीअल उदा. विट, वाळू, खडी, मुरुम उपलब्ध झाले नाही. त्यामुळे जादा अंतरावरुन मटेरीअल आणणेकामी रु. 24,99,544.00 अतिरिक्त खर्च करावा लागला तो मिळावा.

वस्तुस्थिती :- ठेकेदार यांनी निवीदेतील अटी व शर्तींचा अभ्यास करुन तसेच परिसरातील मटेरियलची उपलब्धतता व दर यांचा अभ्यास करुन निवीदा भरणे आवश्यक होते. ठेकेदार यांनी वेळीच मटेरियलचा स्टॉक केला असता तर त्यांना योग्य भावात व पुरेशे मटेरियल उपलब्ध झाले असते. व जे मटेरियल परिसरात उपलब्ध नव्हते त्या मटेरियलची उपलब्धता व दर यांचा विचार करुन दर भरणे आवश्यक होते. तसेच ठेकेदार यांनी जादा वहातूकीचे दराबाबत केलेली मागणी अवास्त व अयोग्य असल्याने मा. व्यवस्थापन समितीचे दि. 06.01.2007 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 87 अन्वये ठेकेदार यांची मागणी अमान्य करणेत आलेली आहे. ठेकेदार यांनी योग्य ते नियोजन करुन मटेरीअल खरेदी केले असते तर त्यांना स्थानिक बाजारातच मटेरीअल उपलब्ध झाले असते, परंतू योग्य नियोजनाअभावी त्यांना अधिक अंतरावरुन मटेरीअल आणावे लागले असल्यास त्यास संस्थान जबाबदार नाही. त्यामुळे सदर रक्कम त्यांना देय होत नाही.

मुद्दा क्र. 7:- फ्लोअर पी.सी.सी. चे बाबीबाबत - काम सुरु करतेवेळी प्लींथ लेव्हलला फ्लोअर बेड करीता पी.सी.सी. चा आयटेम होता. परंतू मुरुम फिलींग उंची जास्त असल्याने फ्लोअर बेडचे पी.सी.सी. करीता स्टील वापरणेबाबत संस्थानने सांगितले. तरी सदरचा आयटेम पी.सी.सी. ऐवजी आर.सी.सी. धरण्यात यावा व ॲटम मधील दराचे फरकानुसार रु.4,50,122.16 मात्रचा खर्च मिळावा.

वस्तुस्थिती :- ठेकेदार यांना सदर बाबींबाबत फ्लोअर पी.सी.सी. 1:3:6 बाबीनुसार निविदा दराप्रमाणे रक्कम अदा केलेली असून फ्लोअर पी.सी.सी. मध्ये वापरण्यात आलेले स्टील वेगळे अदा केलेले आहे. याबाबींकरीता ठेकेदार यांनी कोणतेही प्रकारचे शटरींग व सेट्रींग मटेरीअल वापरलेले नाही. करीता ठेकेदार यांना सदरचा आयटेम हा आर.सी.सी. आयटेम म्हणून देय होत नाही. याकरीता कोणताही अतिरिक्त खर्च देय होत नाही. याबाबत आर्किटेक्ट यांचेकडून माहिती घेता येईल.

मुद्दा क्र. 8 :- अंतिम बिलाचे तपासणीकरीता झालेल्या विलंबाबत -दि. 14.08.2007 पुर्वीकाम पूर्ण केले असल्याचे व अंतिम बिल तपासणी कामी संस्थानने विलंब केल्याने दि. 14.08.2007 ते दि. 31.03.2008 (अंदाजे 7.5 महिने कालावधीत) हयाकामी त्यांना त्यांचा स्टाफ ठेवावा लागला. सदर स्टाफकरीता त्यांना रु. 3,69,000.00 प्रतीमाह याप्रमाणे पगार द्यावा लागला. त्यानुसार एकूण रु. 27,67,500.00 अतिरिक्त खर्चापोटी नुकसान भरपाई मिळावी.

वस्तुस्थिती :- ठेकेदार यांनी दि.08.09.2007 रोजीचे पत्रान्वये सदर कामाचे आठवे रनिंग बिल सादर केले होते. त्यानंतर दि. 08/12/2007 चे पत्रान्वये ठेकेदार यांनी अंतिम बिलाचे ॲब्स्ट्रॅक्ट सादर केले होते. त्यानंतर दोनच दिवसांनी दि. 10.12.2007 चे पत्रान्वये आठवे रनिंग बिलातील मोजमापे अंतिम बिलाकरीता धरण्यात यावी असे कळविले तसेच दि.23.01.2008 रोजीचे पत्रान्वये अंतीम बिलातील उर्वरीत मोजमापे सादर केली. यावरुन ठेकेदार यांनी अंतीम बिलाची पुर्तता दि. 23.01.2008 रोजी पुर्तता केली. यावरुन ठेकेदार यांचे कामातच अपूर्तता असल्याने ठेकेदार हे 23.01.2008 पर्यंत अंतिम सादर करु शकले नाहीत. ठेकेदार यांनी बिलही योग्य पद्धतीने सादर केलेले नव्हते व साईटवर स्टाफही ठेवलेला नव्हता. व त्यानंतर निवीदेनूसार 02 महिन्यात त्यानुसार इकडील दि. 22.12.2007 रोजीचे पत्रान्वये आर्किटेक्ट यांना अंतिम बिल तपासणीकरीता कळविण्यात येऊन आर्किटेक्ट यांनी अंतीम बिलाची संयुक्त तपासणी केली. दि. 20.01.2008 चे पत्रान्वये आर्किटेक्ट यांनी प्राथमिक ॲब्स्ट्रॅक्ट शिट सादर केले होते. यामध्ये इलेक्ट्रीकल आयटेममध्ये बऱ्याशा त्रुटी असल्याने संस्थानचे इलेक्ट्रीकल विभागाचे अभिप्रायानंतर अंतिम बिलाची रक्कम ठरविता येईल असे कळविले . संस्थानचे विद्युत विभाग व आर्किटेक्ट यांनी दि. 02.02.2007 पर्यंत विद्युतविषयक बाबी तपासून दि. 07.02.2008 पत्रान्वये अंतिम बिलाबाबत प्रमाणपत्र तयार करुन पाठविले. निविदा शर्तीनुसार अंतिम बिल दोन महिनेत अदा करणेबाबत तरतूद आहे. ठेकेदार यांनी आर्किटेक्ट यांचे अंतिम बिलाची एक प्रत तपासणी करणेकामी सादर करणे आवश्यक होते.

ठेकेदार यांनी दि. 07.02.2008 चे प्रमाणपत्रान्वये प्रमाणीत केलेले अंतिम बिल मा. व्यवस्थापन समितीचे दि. 16.03.2008 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यतेसाठी सादर करण्यात आले होते. दि. 07.04.2008 रोजीचे अहवालानुसार बिल ठेकेदार यांना अदा करणेबाबत मंजुरी देण्यात आली. त्यामुळे ठेकेदार यांनी अंतिम बिलाचे तपासणी विलंबाबत मागणी केलेली रक्कम रु. 27,67,500.00 मात्र देय होत नाही.

मुद्दा क्र. 09 :- अंतिम बिल भावफरकाचे बिलाबाबत - अंतिम बिलाचे भावफरकाची रु.5,00,000.00 रक्कम याबाबत आर्किटेक्ट यांचेकडून प्रमाणपत्रानंतर अदा करण्यात यावी .

वस्तुस्थिती :- ठेकेदार यांनी अंतिम बिलासोबत भावफरक (Escalation) मिळणेबाबतचे बिल सादर केलेले नसल्याने आर्किटेक्ट यांचेकडून भावफरकाबाबत प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाही. त्यामुळे सदर रक्कम अदा करता येणार नाही.

मुद्दा क्र. 10 :-उपरोक्तप्रमाणे मागणी केलेल्या रकमेवर विलंबाचे कालावधीत सदर रकमेवर 15.02.2008 पासून सदरची रक्कम मिळेपर्यंत 18 टक्केप्रमाणे व्याजसह भरपाई मिळावी.

वस्तुस्थिती :-ठेकेदार यांनी नुकसान भरपाईपोटी केलेली मागणी हि निविदाशर्ती व करारनाम्यास धरुन नसल्याने व्याज देय होत नाही.

उपरोक्त प्रमाणे रक्कम पंधरा दिवसात न मिळाल्यास त्यानंतर Arbitration मध्ये जाण्याबाबतही त्यांनी कळविले आहे. ठेकेदार यांचे दि.1/4/2009 चे पत्र सोबत अवलोकनार्थ जोडले आहे.

सर्वसाधारण टिपणी :-सदरचे काम पुर्ण करण्यासाठी संस्थान अथवा आर्किटेक्ट यांचेकडून कुठल्याही प्रकारे करार भंग, उशीर अथवा

अडथळा निर्माण करण्यात आलेला नव्हता. कामाचे विलंबास ठेकेदार यांचे व्यक्तीगत अडचणी, साईटवरील व्यवस्थापन व तदनुषंगीक बाबींच जबाबदार आहेत. उलट काम लवकरात लवकर व दिलेल्या वेळेत कसे पुर्ण करुन घेता येईल याबाबत ठेकेदार यांना आवश्यक ती सर्व मदत करण्यात आली. प्रकल्पातील अडचणींचे वेळेवर निराकरण होउन कामाची गती राखता यावी यासाठी वेळोवेळी आर्कीटेक्ट, संस्थान व ठेकेदार प्रतिनिधींची प्रकल्प आढावा बैठका घेउन ठेकेदार यांचे अडचणी दूर करण्यात आल्या. तसेच निविदेतील Price variation क्लॉजनुसार ठेकेदार यांना भाववाढ देण्यात आली. निविदेत व करारात तरतुद नसतांनाही विशेष बाब म्हणून ठेकेदार यांना सिमेंटचे प्रत्यक्ष बाजारातील दर व बेसिक दर यातील फरक अदा करण्यात आला. तसेच वेळोवेळी मटेरियल ॲडव्हान्सही दिला गेला. तरीही ठेकेदार यांचे काम त्यांनी सादर केलेल्या बारचार्टप्रमाणे होत

नसल्यामुळे त्यांना वेळेत काम पुर्ण करणेबाबत इकडील जा. नं. 3762/2007 दि. 09.03.2007, जा. नं. 8201/2007 दि.28.05.2007 चे पत्रान्वये कळविण्यात आले होते. तसेच आर्किटेक्ट यांनी 23.08.2007 रोजी कामाची गती वाढवून काम वेळेत पूर्ण करणेबाबत पत्र दिले. तसेच ठेकेदार यांनी खाली नमूद केलेल्या अडचणीमुळे कामास विलंब होत असल्याचे मान्य करीत मुदतवाढीबाबतचे दि. 31/10/06 व 26/06/07 रोजी पत्र देऊन मुदतवाढ मागितलेली आहे.

मुदतवाढी बाबत कळविलेल्या अडी-अडचणी खालील प्रमाणे: -

अ)

1. वाळु उपलब्ध न झाल्यामुळे बाहेरुन वाळु आणावी लागली
2. माल वाहतुकीच्या नियमात बदल झाल्याने अडचणी आल्या.
3. बांधकाम साहित्यात वाजवीपेक्षा जास्त दरवाढ झाली.

ब)

1. बांधकाम साहित्याच्या दरात मोठया प्रमाणात झालेली वाढ.त्यांचे भांडवलातील बराचशा भाग बांधकाम साहित्याच्या खरेदीत अडकला बांधकाम साहित्याच्या खरेदीसाठी रोख बिले अदा करावी लागली.
2. रंगकाम 25/04/2008 पर्यंत पुर्ण करता आले नाही.
3. उपठेकेदार उपलब्ध झाले नाही.

वास्तविक पहातां, सदरहू इमारतीचे बांधकाम ठेकेदाराने मुदत पूर्ण केल्याने, तसेच इमारतीचा ताबा उशीरा दिल्याने सदर इमारत कर्मचा-यांचे निवासासाठी देता न आल्याने संस्थानचे पूर्वीचे वर्ग 4 कर्मचारी रहात असलेल्या मध्यवर्ती जागेतील सेवाधाम इमारत नूतनिकरणाचे काम प्रलंबीत ठेवावे लागले त्यामुळे संस्थानची पर्यायाने साईभक्तांचीच गैरसोय झालेली आहे. या बद्दल ठेकेदार करारातील अटी शर्तीनूसार दंड आकारणीस पात्र होतात. परंतू संस्थानने सकारात्मक व मानवतावादी दृष्टीकोण स्वीकारुन ठेकेदार यांना दोन वेळेस एकुण 09 महिने कालावधीसाठी दंड आकारणी न करता मुदतवाढ दिलेली आहे.

ठेकेदार यांनी दि. 08.12.2007 रोजी अंतिम बिल सादर केले व सदरचे बिल सादर करतांना पुर्वी आर्कीटेक्ट यांनी तपासलेल्या क्वॉटीटी न घेता नव्याने वाढीव मोजमापे व वाढीव दर लावून बिलाची रक्कम काढली तसेच त्यात बरीचशी मोजमापे व्यवस्थीत लिहीलेली नसल्याने व काही बाबींची मोजमापे नव्याने घेऊन दि. 24.01.2008 रोजी पुरवणी बिल सादर केले. सदर बिलातील त्रुटी / अपुर्तता व कामातील त्रुटी निवारण करून देणेबाबत त्यांना जा.नं 20140 दि.22/12/2007 चे पत्रान्वये कळविण्यात आले आहे.त्यातील त्रुटी खालीलप्रमाणे कळविण्यात आल्या होत्या.

1. अंतिम बिलासोबत सविस्तर मोजमापे सादर करणे

2. ठेकेदार यांनी दि. 10/12/07 चे पत्रान्वये आठवे रनिंग बिलासोबत जोडलेले माजमापे अंतिम बिलासाठी धरण्यात यावे असे कळविले मात्र त्यामध्येही रोडचे काम,ओ.एच.टँक,प्लींथ लेव्हलपर्यंतचे स्टील मेजरमेंट सादर केलेले नव्हते.

3. त्याचप्रमाणे प्रा.फंडाचे पुर्ततेबाबत जानं /वशी 10 अ/1361, दि.24/11/05,13604 दि.03/10/04, 13069, दि.21/08/07, 5813 दि.17/04/08, 9203, दि.24/06/2008, 260, दि.15/07/2008, 5798, दि.24/10/08 व12852दि.30/08/2008 चे पत्रान्वये ठेकेदार यांना कळविण्यात आले आहे.

तसेच ठेकेदार यांना दि.29/01/08जा.नं.1839 चे पत्रान्वये अंतिम बिलातील त्रुटीसह अंतिम बिलाची तारीख 10/12/07 अशी धरण्यात येत असल्याचे कळविण्यात आले होते.त्याचप्रमाणे कामातील अपुर्णतेबाबत दि.06/03/2008 चे पत्रान्वये पुर्तता करणेबाबत कळविण्यात आले होते.

सदर पुर्तता ठेकेदार यांनी केल्यानंतर आर्किटेक्ट यांनी दि. 07.02.2008 रोजी पेमेंट सर्टीफीकेट दिले व मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. 216/7 दि. 16.03.2008 अन्वये मंजूरी नंतर बिल अदा करणेबाबत कार्यवाही करण्यात आली. ठेकेदार यांना वारंवार कळवूनही त्यांचे कडून कर्मचारी भविष्य निर्वाह निधी बाबतचे रेकॉर्ड उपलब्ध झाले नाही. त्यांनी योग्य ती पुर्तता केल्यानंतर दि. 31.12.2008 अखेर बिल अदा करण्यात आले आहे. उपरोक्त बिलातील सर्व मोजमापे ठेकेदार आर्किटेक्ट यांचे प्रतिनीधी समवेत सयुक्त रित्या घेण्यात आलेली आहेत. तसेच बिलाबाबतचे सर्व तपशिल ठेकेदार यांना उपलब्ध करुन देण्यात आले होते. आर्किटेक्ट यांचे पेमेंट सर्टीफीकेट नूसार ठेकेदार यांना सर्व पेमेंट व सुरक्षा ठेव / इ.एम. डी. देण्यात आलेली आहे.

ठेकेदार यांचे पत्राबाबत इकडील जा. नं. 4483/2009 दि. 21.04.2009 अन्वये संस्थानचे कायदेविषयक सल्लागार एस. डी. कुलकर्णी, कोपरगांव यांचा अभिप्राय मागविण्यात आला असता त्यांनी दि. 21.04.2009 अन्वये ठेकेदार मे. अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांना संस्थानतर्फे मार्फत नोटीस देउन ठेकेदार यांनी केलेली जादा रकमेची मागणी करारानूसार योग्य नसल्यामुळे त्यांची मागणी अमान्य असल्याचे नोटीसी अन्वये कळविले.

त्यानंतर ठेकेदार यांनी दि. 26.04.2009 रोजीचे पत्रान्वये सदरहू प्रकल्पाचे आर्किटेक्ट भालचंद्र चावरे, नाशिक यांनी, आम्ही केलेली अतिरीक्त मागणी केलेली रक्कम प्रमाणीत करुन द्यावी अन्यथा निवीदेतील क्लॉज नं. 56 नूसार ते वादातील मुद्याबाबत Arbitration मध्ये जाऊ असे कळविले आहे. तसेच त्यांनी दि. 06.06.2009 अन्वये आर्किटेक्ट यांनी उत्तर न दिल्याने निवीदेतील क्लॉज नं. 56 नूसार त्यांनी Arbitrator म्हणून श्री. एन. ए. बढेका यांचे नांव सुचवून त्यास संस्थानची सहमती कळवावी अन्यथा अन्य नांव सुचवावे असे कळविले आहे.

इकडील जा. नं. 7672/2009 दि. 20.06.2009 रोजीचे पत्रान्वये आर्किटेक्ट श्री. भालचंद्र चावरे, नाशिक यांनी निवीदेतील क्लॉज नं. 56 चा ठेकेदार हे फायदा घेत असल्यामुळे आपंण क्लॉज नं. 56 नूसार ठेकेदार यांचे पत्राबाबत कार्यवाही करावी असे कळविण्यात आले, तसेच इकडील जा. नं. 7671/2009 दि. 20.06.2009 अन्वये ठेकेदार यांना Arbitrator म्हणून श्री. एन. ए. बढेका यांचे सुचविलेले नांव मान्य नसून करारानूसार वादग्रस्त मुद्दे हे प्रथम आर्किटेक्ट यांचे मार्फत सोडविणे बाबत क्लॉज नं. 56 मध्ये तरतूद असल्यामुळे त्यांनी प्रथम आर्किटेक्ट यांचेकडे मुद्दे ठेवावे, आर्किटेक्ट याबाबत प्रथम निर्णय घेतील.

यानंतर ठेकेदार यांनी पुन्हा दि. 25.06.2009 अन्वये आर्किटेक्ट हे त्यांनी सादर केलेल्या मुद्याबाबत प्रतिसाद देत नसल्यामुळे आर्किटेक्ट यांचेकडे जाण्याचा प्रश्नच येत नाही. असे कळवून व Arbitrator म्हणून श्री. एन. ए. बढेका यांची नेमणूक Arbitrator म्हणून कोर्टामार्फत करुन घेऊ असे कळविले आहे.

त्यानंतर ठेकेदार यांना जा. नं. 8208/2009 दि. 04.07.2009 चे पत्रान्वये संस्थानमार्फत दि. 04.07.2009 चे पत्रान्वये कळविण्यात आले की, त्यांनी केलेली मागणी संस्थानला मान्य नसून त्यांनी सुचविलेल्या Arbitrator ही संस्थानला मान्य नाही. तसेच आर्किटेक्ट चावरे हे क्लॉज नं. 56 नूसार ते जबाबदारी स्विकारण्यास तयार असल्यामुळे Arbitrator म्हणून श्री. चावरे यांचे नियुक्तीस दोघांकडूनही मान्यता असावी असे कळविले आहे.

तरी ठेकेदार मे. अस्मिता कंन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांनी दि. 01.04.2009 चे पत्रान्वये आर्किटेक्ट यांनी प्रमाणीत केलेल्या अंतिम बिला व्यतिरीक्त अतिरीक्त रक्कम रु. 2,07,50,441.00 मात्र रकमेबाबत निवीदेतील अटी नूसार सदरहू प्रकल्पाचे आर्किटेक्ट भालचंद्र चावरे, नाशिक यांची Arbitrator म्हणून नेमणूक करणेस व संस्थानचे कायदेविषयक सल्लागार एस. डी. कुलकर्णी, कोपरगांव यांचा सल्ला घेऊन पुढील कार्यवाही

करणेस मा.व्यवस्थापन समितीचे दि. १९/०७/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६३७ अन्वये मान्यता घेणेत आली.

ठेकेदार अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा.लि.,मुंबई यांचे दि.१४/११/२००९ व दि.०४/१२/२००९ रोजीचे पत्राबाबत दिनांक ०२/०१/२०१० रोजी बांधकाम विभागाकडील संबधीत कामाचे फाईलसह शाखा अभियंता श्री.डी.एम.देसाई व तत्कालान विधी अधिकारी श्री.गर्कल साहेब यांनी संस्थानचे कायदेविषयक सल्लागार ॲड.कुलकर्णी यांचेशी याबाबत सविस्तर चर्चा केली असता त्यांनी सांगितले की, " ठेकेदार यांना संस्थानचे म्हणने यापूर्वीच पत्रव्यवहाराव्दारे कळविले आहे. तरी सुध्दा ठेकेदार यांना कोर्टात जावयाचे असल्यास त्यांचा प्रश्न आहे. त्यांना पुनःश्च पत्र देण्याची आवश्यकता वाटत नाही" अशी चर्चा झाली.

दि.१२ जानेवारी, २०११ रोजीचे पत्रान्वये, ॲड.बकुल बी.भोसले, मुंबई यांनी ठेकेदार मे.अस्मिता इंडीया लि,मुंबई (मे.अस्मिता कन्स्ट्रक्शन) यांचे वतीने उच्च न्यायालय, मुंबई मध्ये दावा नं.१४२-२०१० दाखल केला असल्याचे व सदर दाव्याची सुनावणी दि.१४ जानेवारी, २०११ पूर्वी मा.न्यायाधिश एस.जे.वजीफदार यांचे समोर होणार असल्याने आपणांस इच्छा असल्यास हजर रहावे असे कळविले आहे. सदर पत्र संस्थानला आवक नं.३५७९२ दि.२० जानेवारी, २०११ रोजी प्राप्त झाले आहे. पाठोपाठ दि.१९/०१/२०११ चे पत्राने त्यांनी सदर मॅटर ॲडमिशन सुनावणीसाठी कधीही येऊ शकते. अर्जाची प्रत यापूर्वीच पाठविली असल्याचे कळविले आहे. सदर (आ.क्र.३५९८२ दि.२२/०१/२०१० रोजी संस्थानला प्राप्त आहे.)

याबाबत दि.०५ फेब्रुवारी, २०११ रोजी संस्थानचे कायदे विषयक सल्लागार ॲड.एस.डी.कुलकर्णी,कोपरगाव यांचेशी प्रकरणी चर्चा केली असून, सदर प्रकरणाची एक छायांकित प्रत त्यांचेकडे सुपूर्त करणेत आली असून, ॲड. एस.डी.कुलकर्णी, कोपरगाव हे एक-दोन दिवसांत याबाबत सल्ला देतो असे सांगितले होते.

दरम्यान इंटरनेटव्दारे प्रस्तुत प्रकरणाची माहिती प्राप्त केली असता, मा.उच्च न्यायालय, मुंबई मा.न्यायाधिश एस.जे.वजीफदार यांचे समोर दि.२४ जानेवारी, २०११ रोजी प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी झाली. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी श्री.परेश कपाडीया यांची संस्थान करीता Arbitratior म्हणून व ठेकेदार यांचे वतीने एन.ए.बढेका यांची Arbitratior म्हणून नियुक्ती करण्यात येत असल्याचे ऑर्डर झाली असल्याचे निर्दशानास आले.

ठेकेदार मे. अस्मिता इंडीया लि. व संस्थान यांचेमध्ये मा. मुंबई उच्च न्यायालय येथे Arbitration application no 142/ 2010 वरील सुनावणी नुसार प्रस्तुत प्रकरणी Arbitration दि.०१ मार्च, २०१२ पासुन सुरु होते. मा. व्यवस्थापन समितीचे दि.२७/०२/२०११ रोजीचे सभेत निर्णय क्र.१८६ अन्वये उपरोक्त कायदेशीर कारवाई करणेकामी ॲड. सचिन शानबाग व ॲड. अमृत वेरनेकर, मुंबई यांची नियुक्ती करणेस तसेच त्यांचे सल्ल्याने Arbiration ची नेमणूक करणेस व त्यांची फी अदा करणेस मान्यता देण्यात आली. त्यानुसार प्रस्तुत प्रकरणी संस्थानचे वतीने ॲड. सचिन शानबाग व त्यांचे वरिष्ठ विधीज्ञ ॲड. अमृत वेर्नेकर, मुंबई यांनी काम पाहीले आहे. याकामी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे ऑर्डर नुसार Presiding Arbitrator म्हणून एफ. आय. रिबेलो, अलाहाबाद उच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायाधिश व संस्थानचे वतीने Arbitrator डॉ. कृष्णभुषण एकनाथ महाशब्दे व वादी (Claimant) यांचेवतीने श्री. एन. ए. बढेका यांची नेमणूक करणेत आलेली आहे.

अस्मिता इंडीया लि., मुंबई यांनी रु.२,०७,५०,४४१/- मात्र इतक्या रकमेचा क्लेम लवादाकडे दाखल केला आहे. संस्थानमार्फत रुपये १,३५,००,०००/- मात्र रकमेचा काउंटर क्लेम करणेत आला असून प्रस्तुत प्रकरणी खालील तारखांना Arbiration च्या बैठका झालेल्या आहेत.

| अ.नं. | तारीख | अ.नं. | तारीख |
|---|---|---|---|
| ०१. | दि.०१ मार्च, २०१२ | १६. | दि.०३ ऑक्टोबर, २०१३ |
| ०२. | दि.१८ जून, २०१२ | १७. | दि.२८ नोव्हेंबर, २०१३ |
| ०३. | दि.२६ जुलै, २०१२ | १८. | दि.१२ फेब्रुवारी, २०१४ |
| ०४. | दि.२१ ऑगस्ट, २०१२ | १९. | दि.१७ जून, २०१४ |
| ०५. | दि.२२ ऑक्टोबर, २०१२ | २०. | दि.१६ सप्टेंबर, २०१४ |
| ०६. | दि.२३ ऑक्टोबर, २०१२ | २१. | दि.०९ ऑक्टोबर, २०१४ |
| ०७. | दि.०८ जानेवारी, २०१३ | २२. | दि.१६ फेब्रुवारी, २०१५ |
| ०८. | दि.०९ जानेवारी, २०१३ | २३. | दि.१७ फेब्रुवारी, २०१५ |

| | | | |
|---|---|---|---|
| ०९. | दि.१० जानेवारी, २०१३ | २४. | दि.२७ जून, २०१५ |
| १०. | दि.२१ मार्च, २०१३ | २५. | दि.१० ऑगस्ट्, २०१५ |
| ११. | दि.१७ जुलै, २०१३ | २६. | दि.११ ऑगस्ट्, २०१५ |
| १२. | दि.१८ जुलै, २०१३ | २७. | दि.१२ ऑगस्ट्, २०१५ |
| १३. | दि.०७ ऑगस्ट्, २०१३ | २८. | दि.१३ ऑगस्ट्, २०१५ |
| १४. | दि.०८ ऑगस्ट्, २०१३ | २९. | दि.३० सप्टेंबर, २०१५ |
| १५. | दि.०१ ऑक्टोबर, २०१३ | | |

सदरहु लवादा प्रकरणी Arbitrator व संस्थान नियुक्त ॲडव्होकेट यांना वेळोवेळी रक्कम अदा करण्यात आलेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| Sr. No. | Name of Arbitrator | Amount (Rs) |
|---|---|---|
| 01 | HONBLE DR. JUSTICE F. I. REBELLO, PRESIDING ARBETRATOR | 15,62,500/- |
| 02 | HONBLE DR. K. E. MAHASHABDE CO. ARBETRATOR | 15,98,744/- |
| 03 | HONBLE SHRI. N. A. BADHEKA | 15,45,000/- |
| 04 | Adv.Sachin Shanbag, Mumbai. | 24,75,950/- |

(अ) उपरोक्त प्रकरणाचे लवादाचे कामकाज पूर्ण झालेले असून सदर प्रकरणाचा अंतिम निवाडा दि.२४/०१/२०१९ रोजी पूर्ण झालेला आहे. दि.२४/०१/२०१९ रोजी झालेल्या निवाडयात खालीलप्रमाणे रकमा देय असलेबाबत कळविले आहे.

The following amounts are therefore awarded:

| Issue no. | Claim no. | Amount Originally claimed Rupees. | Amount awarded Rupees. |
|---|---|---|---|
| 1 | 1 | 67,55,751/- | 2,95,897/- |
| 2 | 2 | 3,43,012/- | 3,30,298/- |
| 3 | 3 | 4,33,211/- | Nil |
| 4 | 4 | 17,90,215/- | Nil |
| 5 | 5 | 24,99,544/- | Nil |
| 6 | 6 | 4,50,122/- | Nil |
| 7 | 7 | 27,67,500/- | Nil |
| 8 | 8 | 415,00,000/- | 1,23,472/- |
| 9 | 9 | @ 18 % p.a from due date | 9 % from due date |
| 23 | Costs | | As per Para 45 |

Final Reliefs

a. Respondent is directed to pay to the claimant a sum of Rs.7,49,667/-

b. Respondent to pay to the claiment on the sum of Rs.7,49,667/- interest @ 9% p.a from 1st April, 2009 till the date of Award and thereafter, further interest @ 9 % p.a., on the principal amount from the date of theAward till final payment.

c. Respondent to pay to the Claimant, costs quantified at Rs.10,00,000/-.

उपरोक्त निवाडयामध्ये ठेकेदार मे. अस्मिता कंस्ट्रक्शन प्रा.लि.,मुंबई (मे.अस्मिता इंडिया, मुंबई) यांनी

क्लेम नं.०१ - मध्ये रक्कम रु.६७,५५,७५१/- ची मागणी केलेली होती. सदर रकमेपैकी सिव्हील कामाची रक्कम रु.५०,६६,६४६/- मात्र लवादाने नामंजूर केली आहे. मात्र इलेक्ट्रीकल कामाचे रक्कम रु.१६,८९,१०५/- पैकी Extra itam चे रक्कम रु.२,९५,८९७/- मात्र मंजूर केलेले आहेत.

क्लेम नं.०२ - मध्ये डिपॉजीट पोटी असलेली रक्कम रु.३,४३,०१२/- पैकी रु.३,३०,२९८/- देय असलेबाबत निर्णय देणेत आलेला आहे. याबाबत लेखाशाखा विभाग यांचा अभिप्राय घेतला असता त्यांनी दि.१८/०३/२०१९ रोजीचे पत्रान्वये लेखाशाखेकडील लेख्यांमध्ये मे.अस्मिता इंडीया, मुंबई यांची कुठल्याही प्रकारची रक्कम राखून ठेवले अथवा प्रलंबीत असल्याचे दिसून येत नाही असे कळविले आहे.

क्लेम नं.०८ - मध्ये भाव फरक रक्कम The price escalation formula is prescribed in the contract and computation is made in accordance thereof, and therefore the Claimant is entitled to Rs.1,23,472 on this account ; as shown in our Annexure-A. असे कळविले आहे.

लवादाचे उपरोक्त निवडयानुसार वादी मे. अस्मिता कंस्ट्रक्शन प्रा.लि., मुंबई यांना रक्कम रु.७,४९,६६७/- मात्र व त्यावरील एप्रिल २००९ पासून प्रतिवर्ष ९ % प्रमाणे होणारे अंतीम व्याज + The Claimant, costs quantified Amount रु.१०,००,०००/- अशी होणारी एकूण रक्कम अदा करावयाची आहे.

ब) प्रस्तुत प्रकरणांचे ऑर्डरमध्ये लवादाचे Presiding Arbitrator एफ.आय.रिबेलो, अलाहाबाद उच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायाधिश यांनी खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

1. The Award has been declared today.
2. In view of the declaration of the Award, the Proceedings stands terminated.
3. The Tribunal had to meet for its internal meetings as under :

i. On Saturday, the 18th February, 2017 – One Session.
ii. On Saturday, the 8th September, 2018 – Two Sessions.
iii. On Saturday, the 13th October, 2018 – One Session

Thus each of the Parties are therefore directed to pay a sum of Rs.1, 20,000/- each to each of the Arbitrators.

4. There were some practical difficulties in numbering the pages of the Annexures annesed to the Award, as the last page to the Award is page 42 and the first page of the Annexure- A Starts from page 36. As Such page nos.36-43 are renumbered by hand on the copies issued to the parties as 43-A to 43-H.
5. The Award can be collected / received from the office of the Prseiding Arbitrator on payment of the aforesid amount, on producing specific authorization.
6. Partes to collect/ receive the documents submitted to the Tribunal during the course of the Proceedings aftre 30 days from today by prodcucing secifice authorization failing which they will be destroyed.

प्रस्तुत लवादाचे Presiding Aribitrator एफ.आय.रिबेलो, अलाहाबाद उच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायाधिश यांनी वरील ऑर्डरमध्ये अ.नं.५ अन्वये निवाडयाची प्रत व त्यांचेकडे सादर केलेली दस्तावेज अब्रिटेटर यांना देय असणा-या रकमा अदा केलेनंतर देणेबाबत नमूद केले आहे. करीता सदरहू लवाद प्रकरणी Presiding Aribitrator यांनी दि.२४/०१/२०१९ रोजी केलेले ऑर्डरनुसार खालीलप्रमाणे रकमांची मागणी केलेली आहे.

| Sr.No | Name of Arbitrator | Amount (Rs) |
|---|---|---|
| 01 | HONBLE DR. JUSTICE F.I.REBELLO , PRESIDING ARBETRATOR | 1,20,000/- |
| 02 | HONBLE DR.K.E. MAHASHABDE CO. ARBETRATOR | 1,20,000/- |
| 03 | HONBLE SHRI N.A.BADHEKA | 1,20,000/- |
| | Total Amount: | 3,60,000/- |

याबाबत अपील दाखल करावे अगर कसे ? याबाबत संस्थानचे विधी विभागाकडून अभिप्राय घेणेत आलेला असून त्यांनी दि.०१/०६/२०१९ रोजीचे पत्राने पुढील प्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

विधी विभागाचा अभिप्राय - “.... मे.अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा.लि.मुंबई यांनी संस्थानचे विरुध्द दाखल केलेल्या लवाद (Arbitration) मध्ये दिलेल्या दि.२४/०१/२०१९, रोजीचे निकालाचे अवलोक केले असता, अस्मिता इंडीया लि.मुंबई यांनी रु.२,०७,५०,४४१/- मात्र इतक्या रकमेचा क्लेम लवादाकडे दाखल केला होता, तसेच संस्थानमार्फत रु.१,३५,००,०००/- मात्र रकमेचा काउंटर क्लेम दाखल करणेत आला होता, प्रस्तुत प्रकरणी एकूण २९ तारखांना Arbitration च्या बैठका झालेल्या

असल्याचे दिसून येते. सदरहु लवादा प्रकरणी Arbitration म्हणून मा.निवृत्त न्यायाधिशांची नियुक्ती करणेत आली होती, तसेच त्यांना संस्थान मार्फत वेळोवेळी रक्कम अदा करण्यात आलेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| Sr.No | Name of Arbitrator | Amount |
|---|---|---|
| 01. | HONBLE DR. JUSTICE F. I. REBELLO, PRESIDING ARBETRATOR | Rs.15,62,500.00 |
| 02. | HONBLE DR. K. E. MAHASHABDE CO. ARBETRATOR | Rs.15,98,744.00 |
| 03 | HONBLE SHRI N. A. BADHEKA CO. ARBETRATOR | Rs.15,45,000.00 |
| 04. | Adv.Sachin Shanbag, Mumbai & Senior Adv.A.M.Vernekar | Rs.24,75,950.00 |

प्रस्तुत लवाद मार्च २०१२ मध्ये दाखल होऊन लवादाचा अंतिम निवाडा दि.२४/०१/२०१९ रोजी पूर्ण झालेला आहे. अर्बिट्रेटरच्या दि.२४/०१/२०१९, रोजीच्या निकालाचे अवलोकन केले असता, सदर निकालाचे विरुध्द मा.सिव्हील जज्ज सिनियर डिव्हीजन राहाता कोर्टात अपील दाखल करावयाचे झाल्यास संस्थानने दाखल केलेली काऊंटर क्लेमची रक्कम व Arbitration कामी आतापर्यंत झालेला अंदाजे रु.१ कोटीचा खर्च, तसेच मा.सिव्हील जज्ज सिनियर डिव्हीजन राहाता कोर्टात अपील दाखल करणेकामी यापुढे होणारा खर्च, प्रकरणी निकाल कधी लागेल याबाबतचा कालावधी गृहित धरता येत नाही, तसेच संस्थानचे बाजूने निकाल न झाल्यास द्यावी लागणारी वाढीव रक्कम व त्यावरील २०१२ पासून द्यावे लागणारे व्याजाचे रक्कमेत होणारी वाढ याबाबी विचार करता Arbitration चे निकालाचे विरुध्द अपिल दाखल करणे जोखमीचे होईल असे मत आहे. याबाबत सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करुन समितीचे निर्णयानुसार कार्यवाही करणेत यावी." असे कळविले आहे.

**प्रस्ताव : -**

अ) प्रस्तुत लवादाचे निवडयानुसार वादी मे. अस्मिता कंस्ट्रक्शन प्रा.लि.,मुंबई (मे.अस्मिता इंडिया, मुंबई) यांना खालील प्रमाणे रक्कम देय होत आहे.

| | | |
|---|---|---|
| i) | Extra item for electrical works under claim no.1 | Rs.2,95,897.00 |
| ii) | Balance Amount against the final bill under claim no.2 | Rs.3,30,298.00 |
| iii) | The price variation payble to claimant as per the contract provisions for the 8th and final bill under claim no.8 | Rs.1,23,472.00 |
| | Total | Rs.7,49,667.00 |
| iv) | Interest @ 9 % p.a from 1st April, 2009 till the date of Award and till date 31/05/2019. | Rs.6,85,945.00 |
| v) | The Claimant, costs quantified Amount | Rs.10,00,000.00 |
| | **Total** | **Rs.24,35,612.00** |

ब) सदरहू लवादाचे अंतीम निवाडयाकरीता झालेल्या बैठकांचे Presiding Arbitrator तसेच Co.Arbitrator यांना प्रत्येकी रु.१,२०,०००/- प्रमाणे खालील प्रमाणे रक्कम अदा करावयाची आहे.

| | | |
|---|---|---|
| i) | HONBLE DR. JUSTICE F. I. REBELLO, PRESIDING ARBETRATOR | Rs.1,20,000.00 |
| ii) | HONBLE DR. K. E. MAHASHABDE CO. ARBETRATOR | Rs.1,20,000.00 |
| iii) | HONBLE SHRI N. A. BADHEKA CO. ARBETRATOR | Rs.1,20,000.00 |

| | | | |
|---|---|---|---|
| | | Total | Rs.3,60,000.00 |

तरी Arbitration यांचे निवडयानुसार तसेच विधी विभागाचे उपरोक्त अभिप्रायानुसार वादी मे. अस्मिता कंस्ट्रक्शन प्रा.लि.,मुंबई (मे.अस्मिता इंडिया, मुंबई) यांना उपरोक्त 'अ' प्रमाणे रक्कम रु.२४,३५,६१२/- तसेच Presiding Arbitrator व Co.Arbitrator यांना उपरोक्त 'ब' प्रमाणे रक्कम रु.३,६०,०००/- मात्र अदा करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२७३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं.१६९ मध्ये वर्ग ४ कर्मचारी निवासस्थान बांधकामाचे ठेकेदार मे. अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा.लि.,मुंबई यांचे लवाद (Arbiration) निवाडयानुसार मे. अस्मिता कंस्ट्रक्शन प्रा.लि.,मुंबई (मे.अस्मिता इंडिया, मुंबई) यांना रक्कम रु.२४,३५,६१२/- तसेच Presiding Arbitrator व Co.Arbitrator यांना रक्कम रु.३,६०,०००/- मात्र आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७** **शिर्डी सिटी सर्व्हे नं.११९ मधील संस्थान मालकीचे सेवाधाम इमारतीची दुरुस्ती व नुतनीकरण करणेकामाचे ठेकेदार ग्राफीक इन्फ्रास्टक्चर प्रा.लि., औरंगाबाद यांचे तिसरे व अंतिम देयक रक्कम रु.३३,८०,४२९/-मात्र मंजुर होऊन त्यापैकी उर्वरीत देय रक्कम रु.८,२६,१३६/-मात्र आदा करणेस मंजूरी मिळणेबाबत**

**प्रस्ताव** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधिल तरतूद –अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये " मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे " अशी तरतूद आहे.

प्रस्तावना– मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ३४८(२८) अन्वये शिर्डी येथिल सिटी सर्व्हे नं. ११९ मधील संस्थान मालकीचे सेवाधाम इमारतीतील दुरुस्ती व नुतनीकरण करणेकामी ठेकेदार ग्राफीक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., औरंगाबाद यांची निविदा स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेस मान्यता देणेत आलेली आहे. ठेकेदार यांनी दि. १५/०२/२०१९ रोजी सदर काम पूर्ण केले असून झालेल्या कामाचे तिसरे व अंतिम बिल सादर केले आहे. इकडील विभागामार्फत सदर बिलाची सविस्तर तपासणी करणेत आली आहे. सदर कामाचा व अंतिम बिलाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | कामाचे नाव | संस्थानचे सेवाधाम इमारतीची दुरुस्ती व नुतनीकरण करणे |
| २) | ठेकेदाराचे नाव | ग्राफीक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. औरंगाबाद |
| ३) | मंजूर निविदा रक्कम | रु.३९,७२,६४२/- |
| ४) | काम बहाल करणेबाबत मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्र.व दि. | निर्णय क्रं. ३४८(४) दि. ०१/०६/२०१८ |
| ५) | ठेकेदार यांना देण्यात आलेला कार्यादेश क्रं. व दिनांक | जा. नं. १३०७/२०१८, दि.१५/०६/२०१८ |
| ६) | अंतिम बिलानुसार झालेल्या कामाची रक्कम | रु.३३,८०,४२९/- |
| ७) | यापुर्वी अदा केलेली रक्कम | रु.२५,५४,२९३/- |
| ८) | उर्वरीत शिल्लक देय रक्कम | रु.८,२६,१३६/- |
| ९) | मंजूर निविदेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु.५,९२,२१३/- (१४.९०७% कमी) |
| १०) | करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मुदत | दि.२१/१२/२०१८ |
| ११) | प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक | दि. १५/०२/२०१९ |

ठेकेदार ग्राफीक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., औरंगाबाद यांनी शिर्डी सर्व्हे नं. ११९ मधील सेवाधाम इमारतीतील दुरुस्ती व नुतनीकरण करणेचे काम दि.१५/०२/२०१९ अखेर पूर्ण केले आहे. सदरचे कामास ५६ दिवस विलंब झाल्याने बिलंबानुसार होणारी दंडाची रक्कम रु.२८,०००/- मात्र ठेकेदार यांचे बिलातून कपात करणेत आली. ठेकेदार यांनी सादर केलेल्या अंतिम बिलाची तपासणी केली असता प्रत्यक्ष झालेल्या मोजमापानुसार सदरहू बिलाची एकूण रक्कम रु.३३,८०,४२९/- मात्र इतकी होते म्हणजेच मंजूर निविदा रकमेपेक्षा रु.५,९२,२१३(१४.९०७ % कमी) खर्च झालेला आहे. सदरहू इमारतीचे नुतनीकरण कामातील आतील व बाहेरील प्लास्टर, पॉलीमर कोटींग व स्टील रिनफोर्समेंटची क्वॉटीटी कमी झाल्याने खर्च कमी झालेला आहे.

विभागाचा अभिप्रायः- ठेकेदार यांनी सदर काम विहीत मानकांनुसार समाधानकारक रित्या पूर्ण केलेले असल्याने ठेकेदार यांचे सदरहू अंतिम बिल मंजूर करणेस हरकत नाही.

प्रस्ताव:- तरी ठेकेदार ग्राफीक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., औरंगाबाद यांचे संस्थानचे सेवाधाम इमारतीची दुरुस्ती व नुतनीकरण करणे कामाचे तिसरे व अंतिम देयक रक्कम रु.३३,८०,४२९/- मात्र मंजूर होऊन त्यापैकी उर्वरीत निव्वळ देय रक्कम रु.८,२६,१३६/- मात्र अदा करणेबाबत निर्णय होणेस विनंती

**निर्णय क्र.२७४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी सिटी सर्व्हे नं.११९ मधील संस्थान मालकीचे सेवाधाम इमारतीची दुरुस्ती व नुतनीकरण करणेकामाचे एकुण बिलाची रक्कम रु.३३,८०,४२९/- मात्र मंजूर करण्यात येऊन त्यापैकी उर्वरीत शिल्लक देय रक्कम रु.८,२६,१३६/- मात्र सदर कामाचे ठेकेदार ग्राफीक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., औरंगाबाद यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१८** **श्री साईबाबा संस्थानचे मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं.१८३ पैकी मध्ये शैक्षणिक संकुल उभारणीकामाचे ठेकेदार मे.न्याती इंजिनिअर्स ॲन्ड कंन्स्लटंट, पुणे ही प्रोप्रायटरी फर्म मे.न्याती इंजिनिअर्स ॲन्ड कंन्स्लटंट प्रा.लि.,पुणे यांनी टेक ओव्हर केल्याबाबत.**

**प्रस्ताव** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेमार्फत कार्यरत असलेल्या श्री साईबाबा इंग्लिश मेडीअम स्कूल, शिर्डी, श्री साईबाबा कन्या विद्या मंदीर, शिर्डीव श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी या शैक्षणिक संस्थांकरीता मौजे निमगांव-को-हाळे येथील गट नं.१८३ मध्ये नियोजीत शैक्षणिक संकुल उभारणेकामी निम्नतम दराचे निविदाधारक मे.न्याती इंजिनियर्स ॲन्ड कन्सलटंट, पुणे यांना जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम/५९३६/२०१८, दि.०८/०३/२०१९ अन्वये रक्कम रु.२१८ कोटीचा कार्यादेश देणेत आलेला आहे.दरम्यान लोकसभा निवडणूक-२०१९ ची आदर्श आचार संहिता लागू झाल्याने ठेकेदार यांचे समवेत करारनामा करणेत आलेला नाही.

आता ठेकेदार मे.न्याती इंजिनियर्स ॲन्ड कन्सलटंट, पुणे यांनी दि.२९/०३/२०१९ रोजीचे पत्राने पुढील प्रमाणे कळविले होते.

"We would like to hereby inform you that we have formed a new company named Nyati Engineers & Consultants pvt ltd. (NECPL), under the same management, which will take-over the entire business of our existing Proprietary concern. Nyati Engineers & Consultants (NEC) with effect from 1 April 2019 and all the assets and liabilities as on that date shall stand transferred to the new company."

ठेकेदार यांनी त्यांचे समवेत करणेत येणारा करारनामा आता Nyati Engineers & Consultants pvt ltd.या नावाने करणेत यावा तसेच बीलही त्याच नावाने अदा करणेत यावे अशी विनंती केली आहे. याबाबत कायदेशीर अभिप्रय घेणेसाठी ॲड.एम.पी.गुजराथी, कोपरगाव यांना दि.१२/०४/२०१९ रोजीच्या पत्राने कळविण्यात आले होते. त्यावर त्यांचेकडील दि.२२/०४/२०१९ रोजीच्या पत्राने सदरहू बाबतीत कंपनी सेक्रेटरी किंवा चार्टर्ड अकाऊंटंट यांचा सल्ला घ्यावा असे त्यांनी नमुद केले होते. सदरहू प्रकरणी संस्थानचे पॅनलवरीलचार्टर्ड अकाऊंटंट,एस.जी.अंदानी ॲन्ड कंपनी, अहमदनगर व अकाऊंटंट मे. मुकुंद एम. चितळे ॲन्ड कं., मुंबईयांनी देखील अभिप्राय सादर केला आहे. त्यानंतर सदरहू प्रकरणी ॲड. भवर यांनी त्यांचे दि.१४/०५/२०१९ रोजीचे पत्राने अभिप्राय सादर केला आहे.

अ) चार्टर्ड अकाऊंटंट,एस.जी.अंदानी ॲन्ड कंपनी, अहमदनगर यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय सादर केला आहे.

"As per documents received.

1. The firm Nyati Engineers and Consultant, A proprietary Firm was owned by Mr. NitinNyati.
2. New Company Nyati Engineers and Consultant Pvt Ltd is formed on 06/02/2019 with Directors Mr.NitinNyati, PiyushNyati and Praveen Nyati.
3. As per resolution in Board Meeting dated 01/04/2019 with Resolution Number- NIL, Entire Business of Nyati Engineers and Consultant, IS TAKEN OVER FROM 01/04/2019 BY New Company.

4. C.A. Mr.VipinGujrathi has given the certificate, all the business of PROPERTIORY FIRM Nyati Engineers and Consultant, is taken by New Company dated 08/04/2019.

1) Now the Sansthan has to take one Affidavit from the director Mr.NyatiNitin, about continues of business and responsibility of all the business by new company as director.

2) Take the affidavit from all three directors about continues of business and responsibility of all the business by new company as director.

3) Also after this made new agreement with new company with all the old terms and conditions and effect from old date of agreement."

ब) ॲड. भवर यांनी दि.१४/०५/२०१९ रोजीचे पत्राने खालीलप्रमाणे अभिप्राय सादर केला आहे.

I. Issue fresh work order specifically in the name of "M/s. Nyati Engineers & Consultants Pvt. Ltd. Pune" cancelling the earlier work order dated 08/03/2019 issued in the name of "M/s Nyati Engineers & Consultants, Pune"

II. Get execute the fresh letter of acceptance of work under Tender from M/s. Nyati Engineers & Consultants Pvt. Ltd. Pune."

III. Then get execute the Work Agreement specifically incorporating a clause in it about acceptance of tender, issuance of work order and cancellation of work order in the name of Nyati Engineers & Consultants, Pune and taking over the entire business & management of M/s. Nyati Engineers & Consultants, Pune by newly incorporated M/s. Nyati Engineers & Consultants Pvt. Ltd. Pune.

IV. Get execute an Indemnity Bond from M/s. Nyati Engineers & Consultants, Pune specially incorporating the clause in respect of rights benefits, responsibilities, liabilities etc. of M/s. Nyati Engineers & Consultants, Pune shall be the rights benefits, responsibilities, liabilities etc. of M/s. Nyati Engineers & Consultants Pvt. Ltd., Pune.

V. Get the certified copies of Certificate of Incorporation issued by the Registrar of Companies, GST Registration Certificate, PAN Card etc. in respect of M/s. Nyati Engineers & Consultants Pvt. Ltd. Pune.

क) चार्टर्ड अकाऊंटंट मे. मुकुंद एम. चितळे ॲन्ड कं., मुंबईयांनी खालीलप्रमाणे अभिप्राय सादर केला आहे.

1. The Trust has issued a Work Order No SSST/CONST/ 5936/2018 dated 18-3-2019 for construction of Shri Saibaba Educational Complex at Gat No 183, Nimgaon-Karhale, Tal Rahata, Dist Ahmednagar. The Work Order has also given the Permanent Account No. and GST No. of Nyati Engineers & Consultant, Proprietor Mr NitinNyati. This Work Order has been issued after following the e-tendering process therefore any change in the entity carrying on the work would be against the fundamental principles of e-tendering Process. The Private Company formed by Mr NitinNyati is a different legal entity and would have a different Permanent Account Number and GST No. This would result into the work being carried out by an entity which is other than the entity to whom the Work Order has been issued. This goes against the basis on which the tendering process is followed.

2. We have also reviewed the Memorandum of Association of Nyati Engineers & Consultants Pvt. Ltd. It does not state in its Objects the take over of business of Nyati Engineers & Consultants. We therefore, feel that the entity to whom the work was allotted can only continue to execute the work and no other entity can step into the contract since the Contract was allotted through e-tendering process. The Trust cannot entertain any other party to execute the work arising out of the Work Order issued to Nyati Engineers & Consultants."

न्याती इंजिनियर्स अ‍ॅन्ड कन्सलटंट, पुणे यांनी त्यांची कंपनी मे.न्याती इंजिनियर्स अ‍ॅन्ड कन्सलटंट प्रा. ली., पुणे यांनी टेक ओव्हर केल्याने सदर झालेल्या बदला संदर्भातखालीलप्रमाणे कागदपत्र सादर केले आहेत.

1. Request letter by firm Nyati Engineers & Consultants, Pune.
2. Company Registration Certificate.
3. Declaration for Commencement of Business.
4. Memorandum of Association of company limited by Shares.
5. Indemnity Bond.
6. GST and PAN Registration
7. Company Resolution and C.A. letter

सदरहू प्रकल्पास शासन निर्णय क्र.सासंवि-१०१८/९६९/प्र.क्र.११०/का.१६, दि.०६/०३/२०१९ रोजीचा शासन निर्णयानुसार याकामाचे अंदाजपत्रकास व ठेकेदार मे.न्याती इंजिनियर्स अ‍ॅन्ड कन्सलटंट, पुणे यांना कार्यादेश देणेस मान्यता देणेत आलेली आहे. त्यामुळे ठेकेदार यांचे कंपनीचे नावात होणा-या बदलामुळे त्यांचेशी करारनामा करणेस व पुढील देयके अदा करणेबाबतचा प्रस्ताव मा. अध्यक्ष महोदय यांचे सुचनेनूसार संस्थानचे जा. क्र. एसएसएसटी/ बांधकाम/४७६/२०१९, दि.११/०५/२०१९ रोजीचे पत्राने विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर करणेत आला होता. त्यावर शासनाचे क्र.सासंवि-१०१८/९६९/प्र.क्र.११०/का.१६, दि.२९/०५/२०१९ रोजीचे पत्राने खालील नमुद बाबींची पुर्तता करणेस कळिवले आहे.

अ) मुकुंद एम. चितळे अ‍ॅन्ड कं., मुंबई यांनी त्यांच्या दि.०९/०५/२०१९ रोजीच्या पत्रान्वये उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांबाबत खुलासा.

ब) सदर प्रस्तावानुषंगाने संस्थानाच्या विधी सल्लागाराचे अभिप्राय तसेच त्यासंदर्भात भविष्यात काही विधि विषयक अडचणी निर्माण होतील किंवा कसे, याबाबतही अभिप्राय घेण्यात यावेत.

क) सदर प्रस्ताव श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या बैठकीत उपस्थित करुन त्याबाबत समितीची मान्यता घेण्यात यावी.

चार्टर्ड अकाऊंटंट मुकुंद एम. चितळे अ‍ॅन्ड कं., मुंबई यांच्या दि.०९/०५/२०१९ रोजीचे पत्रातील मुद्यांबाबत खालीलप्रमाणे खुलासा सादर करणेत येत आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | The Trust has issued a Work Order No SSST/CONST/5936/2018 dated 18-3-2019 for construction of Shri Saibaba Educational Complex at Gat No 183,Nimgaon-Karhale, Tal Rahata, Dist Ahmednagar.<br>The Work Order has also given the Permanent Account No. and GST No. of Nyati Engineers & Consultant,Proprietor Mr NitinNyati. This Work Order has been issued after following the e-tendering process therefore any change in the entity carrying on the work would be against the fundamental principles of e-tendering Process.<br>The Private Company formed by Mr NitinNyati is a different legal entity and would have a different Permanent Account Number and GST No. This would result into the work being carried out by an entity which is other than the entity to whom the Work Order has been issued.This goes against the basis on which the tendering process is followed. | याबाबत कंपनी कायदा विशेषज्ञ यांचे मत घेणे योग्य होईल. |
| 2. | We have also reviewed the Memorandum of Association of Nyati Engineers & Consultants Pvt. Ltd. It does not state in its Objects the take over of business of Nyati Engineers & Consultants. We therefore, feel that the entity to whom the work was allotted can only continue to execute the work and no other entity can step into the contract since the Contract was allotted through e-tendering process. The Trust cannot entertain any other party to execute the work arising out of the Work Order issued to Nyati Engineers & Consultants. | न्याती इंजिनियर्स अॅन्ड कन्सलटंट, पुणे यांचा मे.न्याती इंजिनियर्स अॅन्ड कन्सलटंट प्रा. ली., पुणे यांनी बिझनेस टेक ओव्हर केलेबाबत त्यांच्याशी केलेल्या MOA (Memorandum of Association) मधील मुद्दा क्र.3 (B) 1, खालीलप्रमाणे सुपष्ट नमूद केले आहे.<br>3 (b) Matters which are necessary for furtherance of the objects specified in clause 3(a) are:<br>1. To Take Over the business “Nyati Engineers and Consultants”, a Proprietary Concern, owned by Proprietary Mr. Nitin D. Nyati ongoing concern basis, along with all assets, fixed assists, movable assets, all current assets including current and proposed recoveries, all legal rights and privileges, land stock, Vehicles, all construction equipment’s, all running contracts including proposed contracts and tenders already filed, Work in Progress, licenses, designs, trademarks, copyrights, intellectual properties and secured-unsecured liabilities, all other current liabilities including contingent liabilities. |

विभागाचा अभिप्राय- वरीलप्रमाणे चार्टर्ड अकाऊंटंटएस.जी.अंदानी अॅन्ड कंपनी, अहमदनगर,मे. मुकुंद एम. चितळे अॅन्ड कं., मुंबई तसेच अॅड. नितीन भवर यांनी दिलेल्या अभिप्रायाचे अवलोकनकेले असता मतभिन्नता दिसून येते. श्री साईबाबा संस्थानचे मौजे निमगाव-को-हाळे येथील गट नं.१८३ पै. मध्ये शैक्षणीक

संकुलउभारणेकामाचे ठेकेदार मे.न्याती इंजिनियर्स ॲन्ड कन्सलटंट, पुणे ही प्रोप्रायटरी फर्म मे. न्याती इंजिनिअर्स ॲन्ड कन्सलटंट प्रा. लि. पुणे यांनी टेक ओव्हर केल्यामुळे त्यांचेशी करारनामा करणे, नवीन नावाने देयक अदा करणे अथवा त्यांनी केलेली विनंती अमान्य करणे याबाबत कंपनी कायदा विषयी कामकाज पहाणारे तज्ञ सल्लागार यांचे कायदेशिर मत घेवून पुढील कार्यवाही करावी असे मत आहे.

तसेच नियोजीत श्री साईबाबा मंदीर शिर्डी दर्शन रांग इमारत बांधकाम करणे प्रकल्पाचे ठेकेदार यांचे कंपनीचे नावात देखील भानू कन्स्ट्रक्शन, मुंबई ऐवजी श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई असा बदल होत असल्याचे ठेकेदार यांनी दि.२७/०५/२०१९ रोजीचे पत्राने कळविले आहे. याबाबतही कंपनी कायदा विषयी कामकाज पहाणारे तज्ञ सल्लागार यांचे कायदेशिर मत घेवून पुढील कार्यवाही करावी असे मत आहे.

प्रस्ताव- तरी श्री साईबाबा संस्थानचे मौजे निमगाव-को-हाळे येथील गट नं.१८३ पै. मध्ये शैक्षणीक संकुल उभारणे कामाचे ठेकेदार मे.न्याती इंजिनियर्स ॲन्ड कन्सलटंट, पुणे ही प्रोप्रायटरी फर्म मे. न्याती इंजिनिअर्स ॲन्ड कन्सलटंट प्रा. लि. पुणे यांनी टेक ओव्हर केल्यामुळे त्यांचेशी करारनामा करणे, नवीन नावाने देयक अदा करणे अथवा त्यांनी केलेली विनंती अमान्य करणे याबाबत कंपनी कायदा विषयी कामकाज पहाणारे तज्ञ सल्लागार यांचे कायदेशिर मत घेवून पुढील कार्यवाही करणेस

तसेच श्री साईबाबा मंदीर शिर्डी दर्शन रांग इमारत बांधकाम करणे प्रकल्पाचे ठेकेदार यांचे कंपनीचे नावात देखील भानू कन्स्ट्रक्शन, मुंबई ऐवजी श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई असा बदल होत असल्याने या दोन्ही ठेकेदाराबाबत कंपनी कायदा विषयी कामकाज पहाणारे तज्ञ सल्लागार यांचे कायदेशिर मत घेणेस मान्यता मिळणेकामी पुढील कार्यवाही करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२७५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभाग जो निर्णय घेईल तो व्यवस्थापन समितीस मान्य असेल, असे ठरले.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१९** **श्री साईनाथ रुग्णालयाचे दोन्ही इमारतीवर तिसऱ्या मजल्याचे बांधकाम करणेकामाचे ठेकेदार आर.के.सावंत, नाशिक यांचे मुदतवाढ मागणीबाबत.**

**प्रस्ताव** श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतूदः-
अधिनियमाच्या कलम २१ (१) पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे.

मा. व्यवस्थापनसमितीनिर्णय :

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३८

"यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाच्या दोन्ही इमारतींवर वाढीव एका मजल्याचे बांधकाम करणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली."

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/१२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१०५१ (०९)

"यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाचे दोन्ही इमारतींवर तिसऱ्या मजल्याचे बांधकाम करणेकामी आर.के.सावंत, नाशिक यांचे एकत्रित रु.३,९९,९७,१६२/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली."

प्रस्तावना:- मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार ठेकेदार श्री.आर.के.सावंत, नाशिक यांना कार्यादेश देण्यात आला असुन सदरहू कामाचा तपशिल व सद्यस्थिती खालील प्रमाणे–

| | | |
|---|---|---|
| १ | कामाचे नांव | श्री साईनाथ रुग्णालयाचे दोन्ही इमारतींवर तिसऱ्या मजल्याचे बांधकाम करणे. |
| २. | ठेकेदार | आर.के. सांवत, नाशिक |
| ३. | मंजूर निविदा रक्कम | रु.३,९९,९७,१६२/- |
| ४. | कार्यादेश क्र. व दिनांक | जा.नं.६८४३/२०१७ दि.२०/०३/२०१८ |
| ५. | करारनाम्यानुसार काम सुरु करण्याचा दि. | दि.०५/०४/२०१८ |
| ६. | काम पूर्ण करण्याचा कालावधी व दिनांक | १२ महिने ( दि.०५/०४/२०१९ अखेर) |

| | | |
|---|---|---|
| ७. | कामाची सद्यस्थिती | १. रुग्णालयाचे दोन्ही इमारतींचे आर.सी.सी. स्लॅबचेकाम पुर्ण झाले आहे.<br>२. अंर्तगत विट बांधकाम व प्लास्टरचे काम प्रगतीपथावर आहे.<br>३. लिफ्टचे फुटींग व परदी कॉन्क्रीटींगचे काम सुरू आहे.<br>४. दोन्ही इमारतींना जोडणारा फॅब्रिकेशन मधील पुलाचे काम सुरू आहे. |

ठेकेदार यांचा करारनाम्यानुसार काम करण्याचा कालावधी बारा महिने दि.०५/०४/२०१८ ते दि.०५/०४/२०१९ अखेर असा होता. सदरचे मुदतीत ठेकेदार यांनी वरील तक्त्यात नमुद केलेप्रमाणे काम पूर्ण केले आहे. विहीत मुदतीत काम पुर्ण करणेसाठी व कामाचा वेग वाढविणेसाठी ठेकेदार यांना संस्थानमार्फत दि.१९/०५/२०१८, दि.२५/०५/२०१८, दि.०४/०६/२०१८, दि.२९/०६/२०१८, दि.११/०७/२०१८, दि.२१/०९/२०१८, दि.३१/१०/२०१८ व दि.२८/०१/२०१९ रोजी पत्र देण्यात आलेले आहे.

ठेकेदार यांनी उर्वरीत काम पूर्ण करणेसाठी दि.०४/०६/२०१९ रोजीचे पत्रान्वये खालील प्रमाणे अडचणी नमूद करुन दि.३१/१२/२०१९ पर्यंत मुदतवाढ मिळणेस विनंती केली आहे.

१) श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव मजला बांधकासाठी वाळू वापरण्यात येत होती. या कामासाठी वाळू लवकर उपलब्ध न झाल्यामुळे काम सुरू करणेस विलंब लागला आहे.

२) पावसाळयाचे कालावधीमुळे कामास विलंब लागला आहे.

३) श्री साईनाथ रुग्णाल व परीसरात रुग्ण त्यांचे नातेवाईकांची मोठया प्रमाणात गर्दी असल्याने काम करताणा अडचणी येत होत्या, त्यामुळे कामास विलंब लागला आहे.

४) सार्वजनीक सुट्टया व विवीध उत्सवांचे कालावधीत काम बंद असल्याने कामास विलंब लागला आहे.

५) ओ.टी.,आरएमओ रुम व स्टोअर इत्यादी अंतर्गत बदल या वाढीव कामासाठी अतिरीक्त कालावधी लागणर आहे.

विभागाचा अभिप्रायः- उपरोक्त नमुद कारणांमुळे ठेकेदार यांना काम करणेस विलंब लागला आहे. त्यामुळे ठेकेदार यांना दिलेल्या मुदतीत काम पूर्ण करता आलेले नाही. तसेच सदरचे वाढीव मजल्यावरील बांधकामामध्ये ओ.टी.,आरएमओरुम व स्टोअर इत्यादी अंतर्गत बदलयाकामाचे ठेकेदार आर.के.सावंत यांचेकडून करुन घेण्यास व सदर कामी येणाऱ्या रक्कम रु.९,११,७८१/-मात्रचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे दि.२६/०२/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१३९ अन्वये मान्यता देण्यात आली.त्यामुळे ठेकेदार यांनी सदर काम करणेसाठी दि.३०/०९/२०१९ अखेर मुदतवाढ मिळावी अशी विनंती केली आहे. सदरहु कामे ठेकेदार आर.के.सावंत यांचेकडून करुन घेणेसाठी ठेकेदार यांना मुदतवाढ देता येईल असे मत आहे.

प्रस्ताव:- तरी ठेकेदार आर. के सावंत, नाशिक यांचे विनंती नुसार त्यांना दि.३०/०९/२०१९ पर्यंत मूदत वाढ देणेबाबत निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.२७६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाचे दोन्ही इमारतीवर तिसऱ्या मजल्याचे बांधकाम करणेकामाचे ठेकेदार आर.के.सावंत, नाशिक यांना सदर कामासाठी दि.३०.०९.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२०** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी नाटय रसिक संच व शिर्डी ग्रामस्थ यांचे संयुक्त विद्यमाने २५ वा श्री साईसच्चरीत पारायण सोहळा साजरा करणेस व त्याचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४-

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम २(ठ) अन्वये, श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण यांबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील

प्रस्तावना– श्री.आप्पासाहेब खंडू कोते, अध्यक्ष, नाटयरसिक संच ,शिर्डी यांनी दि.१०.०४.२०१९ रोजीचे पत्रान्वये गेली २४ वर्षे श्री साई सच्चरित पारायण सोहळा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी हे नाट्यरसिक संचाचे सहकार्याने साजरा करीत आलेले आहे. यंदाचा पारायण सोहळा नेहमीप्रमाणेच भव्य दिव्य साजरा करण्याचा मानस आहे. पारायणासाठी दरवर्षी पुरुष व महिला मिळून अंदाजे ७,५०० पारायणार्थी बसतात ( मागील वर्षी शताब्दी सोहळयानिमित्त अंदाजे १५००० महीला व पुरष वाचक यांनी पारायणात सहभाग घेतला होता.) या वर्षीही पारायणार्थीची नेहमीप्रमाणे पारायणास बसणेची बैठक व्यवस्था चहा, नाष्टा व महाप्रसाद इ. तसेच कलाकारांची निवासव्यवस्था, दर्शनव्यवस्था, चहा नाष्टा व भोजनव्यवस्था करावयाची आहे. तसेच पारायणार्थींची बाथरुमची व हातपाय धुण्याची व पिण्याचे पाण्याची व पारायणासंबंधी इतर नेहमीप्रमाणे सोई उपलब्ध करावयाच्या आहेत. तसेच बाहेरुन येणा-या काही पारायणार्थींनी मागणी केल्यास त्यांची निवासव्यवस्था करावयाची आहे पारायण चालू असतांना व ग्रंथ समाप्तीनंतर मिरवणूकीच्या वेळी भाग घेणारे कलाकार, मेकअपमन, वाजंत्री व इतर सहकारी यांची निवास,भोजन,मानधन चहा पाण्याची इ.व्यवस्था करावयाची आहे.

यंदाचा पारायण सोहळा नेहमीचे प्रथेप्रमाणे शुक्रवार दि.०२ ऑगस्ट २०१९ ते शनिवार दि.१० ऑगस्ट २०१९ अखेर साजरा होणार आहे प्रथमदिनी म्हणजेच ०२.०८.२०१९ रोजी श्री साई सतचरित पारायणास सुरुवात होईल व दि.०९.०८.२०१९ रोजी अवतरणिका वाचन, ग्रंथपुजा व दुपारी गावातुन श्रींची शोभायात्रा निघेल व शनिवार दि.१०.०८.२०१९ रोजी काला किर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात येईल.

तरी उपरोक्त कालावधीत नेहमीप्रमाणे नाट्य रसिकसंचाच्या सहयोगाने यंदाचा महापारायण सोहळा साजरा करणेस मान्यता असावी ही विनंती, असे कळविले आहे.

त्यानंतर दि. २१.०५.२०१८ चे पत्रान्वये श्री.आप्पासाहेब खंडू कोते, अध्यक्ष, नाटयरसिक संच ,शिर्डी यांनी खालील प्रमाणे कळविले आहे.

आम्ही विनंतीपूर्वक अर्ज करतो की, श्री साई सच्चरित पारायण सोहळा शुक्रवार दि.०२ ऑगस्ट २०१९ ते शनिवार दि.१० ऑगस्ट २०१९ अखेर साजरा करण्यात येणार आहे. मागीलवर्षी समाधी शताब्दी महोत्सव असल्याने चौदा हजार पारायणार्थी या सोहळयात सहभागी झाले होते.हा पारायणसोहळा, गेली अनेक वर्ष प्रवेशव्दार क्र. ३ जवळील ज्या जागेत (१६ गुंठे) साजरा होत होता तथापि सहभागी पारायणार्थीची संख्या पाहाता तो त्या ठिकाणी न घेता नवीन प्रसादालयाजवळील श्री. गोंदकर यांचे जागेत सदर सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते.

आता यावर्षी साधारणतः १० हजाराच्या आसपास पारायणार्थी या सोहळयात सहभागी होण्याची शक्यता आहे. या संख्येचा विचार करता प्रवेशव्दार क्र.३ जवळील जागा (१६ गुंठे) यासाठी अपुरी पडेल. त्याचप्रमाणे सदर ठिकाणी स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध नाही. महिला व पुरुष अशा २ सत्रांमध्ये जरी पारायणाचे आयोजन केले तरी बसायला अतिशय अडचणीचे होते. पारायण सुरु असतांना भक्तांना ये-जा करण्यासाठी अत्यंत अरुंद जागा शिल्लक राहते. तेथून भक्तांच्या वर्दळीचा त्रास होतो.

एखाद्या दिवशी जास्त-गर्दी झाल्यास चेंगराचेंगरी होऊन अनुचित प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच यामुळे संरक्षण व्यवस्थेवरही अतिरिक्त ताण येतो.

या सर्व बाबींचा विचार करता यावर्षीचे श्री साईसच्चरित पारायण साईनगर समोरील मैदानावर आयोजित करण्यात यावे. सदर जागेचा आकार विस्तिर्ण असल्याने महिला व पुरुष ग्रंथ वाचकांचे पारायण एकाच सत्रात घेता येईल. त्याठिकाणी स्वच्छतागृहांचीही सोय आहे.

त्याचप्रमाणे कर्मचारी वसाहतीमधील स्वच्छतागृहांचा वापरही करता येवू शकतो. तेथे वाहनतळाचीही सुविधा आहे.

तरी वरील गोष्टींचा विचार करता यावर्षीचा श्री साईसच्चरित पारायण सोहळा१६ गुंठे येथे आयोजित न करता साईनगर मैदानावर आयोजित करावा अशी नम्र विनंती केली आहे.

विभागाचा अभिप्राय- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी व नाटय रसिक संच तसेच शिर्डी ग्रामस्थ यांचे संयुक्त विद्यमाने सन १९९५ पासून म्हणजेच गेल्या २४ वर्षापासून दरवर्षी श्रावण शु.१ ते श्रावण शु.८/९ या तिथीत सामुदायिक श्री साईसच्चरित पारायण सोहळयाचे मंदिर परिसरात व त्यानंतर १६ गुंठे जागेत

(आताचा श्री साईबाबा समाधी शताब्दी मंडप) आयोजन करण्यात येते. गतवर्षी शताब्दी महोत्सवी वर्षाचे निमित्ताने पारायणार्थींची संख्या सुमारे १४ हजार पर्यंत होती यावर्षी ती १० हजाराच्या आसपास असण्याची शक्यता नाकारता येत नाही. सन २०१७ मधील साईचरित्र पारायण सोहळयासाठी सुमारे ६००० पारायणार्थी पारायणासाठी बसले होते व या सोहळयाचे आयोजन श्री साईबाबा समाधी शताब्दी मंडपात आयोजित केले होते आणि यासाठी सुमारे रु.१२,७२,२९८.०० मात्र इतका प्रत्यक्ष खर्च झालेला आहे. तर गतवर्षी (२०१८) समाधी शताब्दी वर्ष असल्याने पारायणार्थींची संख्या १४ हजारपर्यंत होती त्यासाठी रु ४४,०३,५२२.०९पैसे इतका खर्च झाला होता.

श्री साईचरित्र पारायण सोहळा आयोजित करणेकामी खालील बाबींवर चर्चा करुन धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे.

१) श्री साईचरित्र पारायण सोहळयाची जागा निश्चित करणे.

अ) नेहमीचे प्रथेप्रमाणे श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडपात आयोजित करणे. (शताब्दी वर्षात पारायणार्थींची संख्या १४ हजार पर्यंत होती ती यावर्षी आता १० हजार पर्यंत असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या जागेत पारायण आयोजित केल्यास पारायणार्थी मोठ्या संख्येने बसू शकणार नाही तसेच साईभक्तांना गेट नं.३ मधून ये-जा करणे जिकीरीचे ठरेल.तसेच सीआयएसएफ यांनी समाधी मंदिर शताब्दी मंडपाचा भाग हा अतिसंवेदलशिल भाग म्हणून निर्देशित करावा असे त्यांचे अहवालात नमुद केले आहे. त्यामुळे सदरहू जागेत पारायण सोहळा आयोजित करणे उचित ठरणार नाही असे नम्र मत आहे.)

किंवा

अ) श्री साईचरित्र पारायण सोहळयाचे आयोजन संस्थान मालकीचे जागेत साईनगर मैदानावर करणेबाबत. ( सदरहू जागेत पारायण सोहळा आयोजित करणेबाबत नाट्यरसिक संचानेही पत्र दिले आहे. सदरची जागा बैठक व्यवस्थेसाठी मोठी असून या जागेत स्वच्छता गृहांची सुविधा व वाहनतळांची सुविधा असल्याने योग्य ठरेल)

२) साईनगर येथील जागा निश्चित झालेनंतर सदर जागेवर पत्राशेड मंडप व इतर अनुषंगिक सुविधा उभारणेबाबत.

३) पारायणार्थींसाठी चहा,पाणी, नाष्टा, महाप्रसाद, नेहमीचे प्रथेप्रमाणे मोफत पुरविणेबाबत.

४) पारायण कालावधीत आयोजित कार्यक्रमांसाठी निमंत्रीत कलाकार, किर्तनकार, प्रवचनकार यांचे मानधन व निवासव्यवस्था तसेच दर्शन आदि व्यवस्थेबाबत

५) पारायणासाठी बाहेरगावाहुन येणा-या साईभक्तांची निवासव्यवस्था संस्थानमार्फत मोफत करणेबाबत. ( गतवर्षी ११४९ साईभक्तांची निवासव्यवस्था साईधर्मशाळा येथील ३७ हॉलमध्ये करण्यात आली होती.)

६) पारायणाचे माहितीफलक व बॅनर, निमंत्रण पत्रिका, फुल सजावट व विद्युत रोषणाई आदि बाबींची पुर्तता संस्थानचे संबंधीत विभागाकडून करणेबाबत.

७) पारायण समाप्ती नंतरच्या मिरवणुक खर्चास (बॅन्ड, ढोल पथक, सनई- चौघडे, संबळ, देखावे इ.) मान्यता देणेबाबत.

८) पारायण समाप्तीनंतर द्यावयाच्या महाप्रसाद (भंडारा) खर्चास मान्यता देणबाबत.

९) उपरोक्त नमुद केलेल्या अ.नं.२,३,४,५,६,७,८ बाबींसाठी येणा-या अंदाजे रक्कम रु.५०,००,०००/- (अक्षरी रुपये पन्नास लाख मात्रचे) खर्चास मान्यता देणेबाबत.

१०) संस्थान वेबसाईटवरुन श्री साईचरित्र पारायण (वाचन) करणेसाठी साईभक्तांना आवाहन करणेबाबत.

तरी दरवर्षीप्रमाणे श्री साईसच्चरित पारायण सोहळयाचे आयोजन करणे व त्याबाबतच्या अनुषंगिक सुविधा उभारणेकामी उपरोक्त नमूद बाबी व त्यासाठी येणारा सर्व समावेशक खर्च आदि बाबत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२७७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईसच्चरित पारायण सोहळयाचे आयोजन साई आश्रम-१ याठिकाणी करणेस व त्याबाबतच्या अनुषंगिक सुविधा उभारणेकामी येणाऱ्या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व नाटय रसिक संच, शिर्डी यांचे संयुक्त विद्यमाने २५ वा श्री साईसच्चरीत पारायण सोहळा" असा नामोल्लेख करण्यात यावा,असे ठरले.**

**(कार्यवाही-शताब्दी कक्ष)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.२१ **संस्थान व रुग्णालय विभागाचा मालमत्ता विमा पॉलीस व श्री साईभक्तांचा अपघातील विमा पॉलीसीचे नुतनीकरणासाठी प्राप्त झालेल्या न्युनत्तम दराबाबत.**

**प्रस्ताव** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मालमत्तेचे विमा संरक्षण व श्री साईभक्तांचा अपघाती व घातपाती विमा संरक्षण मिळणेसाठी संस्थानकडून दरवर्षी राष्ट्रीयीकृत विमा कंपन्यांकडून दरपत्रके मागवून त्यातील न्युनतम दरांची दरपत्रक स्विकारुन विमा संरक्षण घेतले जाते.

त्याअनुषंगाने, दि.११ जुलै,२०१९ ते दि.१० जुलै,२०२० अखेर संस्थान मालमत्ता विमा व दि.१० जुलै,२०१९ ते दि.०९ जुलै,२०२० अखेर रुग्णालय मालमत्ता विमा, तसेच दि. १२ ऑगष्ट, २०१९ ते दि. ११ ऑगष्ट, २०२० अखेर श्री साईभक्त अपघाती/घातपाती विमा पॉलीसी नुतनीकरणाच्या प्रस्तावास, उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये मान्यता मिळाली आहे. मिळालेल्या मान्यतेनुसार संस्थानने फक्त राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांना जा.क्र.एसएसएस/वशी/लेखा/४०४,४०५ व ४०६/२०१९ दि.४ मे,२०१९ चे पत्रान्वये त्यांचे न्युन्नतम दरपत्रके बंद लिफाफ्यामध्ये दि.१५ मे,२०१९ अखेर संस्थानला पाठविणेबाबत कळविण्यात आले होते.

त्यास अनुसरुन, राष्ट्रीयीकृत विमा कंपन्यांनी त्यांचे न्युनत्तम दर सिलबंद लिफाफ्यामध्ये संस्थानला सादर केलेले होते. सादर केलेली दरपत्रकांची सिलबंद पाकीटे दि.३० मे,२०१९ रोजीच्या मा. खरेदी समिती सभेमध्ये उघडण्यात आली.

राष्ट्रीयीकृत विमा कंपन्यांनी दिलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला असुन, त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे-

| अ.नं | राष्ट्रीयीकृत विमा कंपनी | संस्थान मालमत्ता विमा | रुग्णालय मालमत्ता विमा | श्री साईभक्त अपघात विमा |
|---|---|---|---|---|
| १. | नॅशनल इंन्शुरन्स कं. लि, कोपरगांव | २५,००,४९९/- | १४,००,०००/- | ९,००,०००/- |
| २. | युनायटेड इंडिया इंन्शुरन्स कं. लि, शिर्डी | २२,५५,०००/- | १२,००,०००/- | ६,००,०००/- |
| ३. | दि. ओरीएंटल इंन्शुरन्स कं. लि, कोपरगांव | २४,००,०००/- | १०,५०,०००/- | ५,११,०००/- |
| ४. | दि. न्यु इंडिया एश्योरन्स कं.लि, श्रीरामपुर | २३,३२,०००/- | ११,५१,०००/- | ५,६१,०००/- |

उपरोक्तप्रमाणे, संस्थान व रुग्णालये मालमत्तेसाठी व श्री साईभक्त अपघात विमासाठी खालील कंपन्यांचे न्युन्नतम प्रिमियम दर प्राप्त झालेले आहेत.

| अ.नं | तपशिल | राष्ट्रीयीकृत विमा कंपनी | न्युन्नतम प्रिमियम दर रुपये (सर्व करांसहित) |
|---|---|---|---|
| १. | संस्थान मालमत्ता विमा | युनायटेड इंडिया इंन्शुरन्स कं. लि, शिर्डी | २२,५५,०००/- |
| २. | रुग्णालये मालमत्ता विमा | दि. ओरीएंटल इंन्शुरन्स कं. लि, कोपरगांव | १०,५०,०००/- |
| ३. | श्री साईभक्त अपघात विमा | दि. ओरीएंटल इंन्शुरन्स कं. लि, कोपरगांव | ५,११,०००/- |

तरी वरील तक्त्यातील अ.नं.०१ ते ०३ या राष्ट्रीयीकृत विमा कंपन्यांचे दर दि.११ जुलै,२०१९ ते दि.१० जुलै,२०२० अखेर संस्थान मालमत्ता विमा व दि.१० जुलै,२०१९ ते दि.०९ जुलै,२०२० अखेर रुग्णालय मालमत्ता विमा, तसेच दि. १२ ऑगष्ट, २०१९ ते दि. ११ ऑगष्ट, २०२० अखेर, श्री साईभक्त अपघाती/घातपाती विमा पॉलीसीचे नुतनीकरणासाठी न्युनतम असल्याने त्यांना मा .व्यवस्थापन समितीचे सभेसमोर चर्चा व वाटाघाटीसाठी बोलविणेस तसेच वाटाघाटीनंतर निम्मतम दर स्विकारुन संबंधीत राष्ट्रीयकृत विमा कंपनीस कार्यादेश देणेस व याकामी येणा-या योग्य त्या खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सविनय सादर.

निर्णय क्र.२७८ **प्रस्तुत प्रकरणी मागविण्यात आलेल्या दरपत्रकातील निम्नतम दरधारक दि. ओरीएंटल इंन्शुरन्स कं. लि, कोपरगांव व युनायटेड इंडिया इंन्शुरन्स कं. लि, शिर्डी हे आजचे व्यवस्थापन समितीसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. समितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता युनायटेड इंडिया इंन्शुरन्स कं. लि, शिर्डी यांनी रक्कम रु.२२,३५,०००/- मात्र दर देऊ केले. व दि. ओरीएंटल इंन्शुरन्स कं.लि, कोपरगांव यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान व रुग्णालय विभागाचा मालमत्ता विमा पॉलीस व श्री साईभक्तांचा अपघातील विमा पॉलीसीचे नुतनीकरणासाठी मागविण्यात आलेल्या दरपत्रकातील निम्नतम दरधारक यांनी चर्चेअंती देऊ केलेले खालील प्रमाणे दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.**

| अ.नं | तपशिल | राष्ट्रीयीकृत विमा कंपनी | न्युन्नतम प्रिमियम दर रुपये (सर्व करांसहित) |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| १. | संस्थान मालमत्ता विमा | युनायटेड इंडिया इंन्शुरन्स कं. लि, शिर्डी | २२,३५,०००/- |
| २. | रुग्णालये मालमत्ता विमा | दि. ओरीएंटल इंन्शुरन्स कं. लि, कोपरगांव | १०,५०,०००/- |
| ३. | श्री साईभक्त अपघात विमा | दि. ओरीएंटल इंन्शुरन्स कं. लि, कोपरगांव | ५,११,०००/- |

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२२** **विवादित (Disputed) व्हॅट कर भरणेबाबत शासनाच्या सरसकट माफी (Amnesty Scheme) योजणेबाबत.**

**प्रस्ताव** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीची मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० (BPT Act-1950) अन्वये नोंदणी झाली असुन विश्वस्तव्यवस्थेला भक्तांसाठी अधिक व्यापक कल्याणकार्य हाती घेणे शक्य व्हावे म्हणुन तीचे अधिक चांगल्याप्रकारे व्यवस्थापन, प्रशासन, शासन व नियंत्रण करण्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ या स्वतंत्र अधिनियमान्वये कामकाज चालते. श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणारे भक्त रोख स्वरुपात देणगी, वस्तु स्वरुपात सोने-चांदीचे दागिने, वस्त्रे, इतर वस्तु स्वरुपात दान देतात. वस्तु स्वरुपात आलेले सोने-चांदी वितळवुन बाबांची प्रतिमा असलेली नाणी तयार करुन प्रसाद रुपाने प्रचलित बाजारभावाने भक्तांना देऊन त्याचे रोख रक्कमेत रुपांतर केले जाते व आलेली रक्कम भक्तांना मुलभूत सोयी-सुविधा पुरविण्याकरिता वापरली जाते. याठिकाणी विक्री करणे हा उद्देश नसुन आलेले वस्तु स्परुपातील दान त्याचे रुपांतर रोख रक्कमेत करणे हा आहे व रोख स्वरुपात आलेली सदर रक्कम ही विक्री व्यवहारातून नसुन देणगी स्वरुपात लेखापुस्तकांमध्ये नोंदविली जाते. तसेच भक्तांना प्रसाद भोजन, चहा, कॉफी, दुध इ. अगदी प्रत्यक्ष खर्चापेक्षा कमी दराने पुरविले जातात. यामागे विक्री हा उद्देश नसुन आलेल्या भक्तांना सोयी-सुविधा पुरविणे हा उद्देश आहे.

अशाप्रकारे भक्तांना मुलभूत सोयी-सुविधा पुरविण्याच्या उद्देशाने संस्थानला प्राप्त होणा-या रक्कमेवर मुंबई विक्रीकर कायदा १९५९ मध्ये संस्थान विक्रेता (Dealer) नाही असा निर्णय महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरण (IIIrd Bench of Maharashtra Sales Tax Tribunal Bombay) यांनी दि.२०.०३.१९९० रोजी दिला होता.

सन २००५ पासून व्हॅट कर कायदा २००२ ची अंमलबजावणी सुरु झाली. विक्रीकर कायद्यात संस्थानला विक्रीकर लागु नव्हता. त्याप्रमाणे व्हॅट कायद्यात संस्थानला व्हॅट लागु नये करिता मा.आयुक्तांकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यांनी दि.१८.०३.२००९ रोजी संस्थान Dealer नसुन Deemed Dealer असलेबाबत निर्णय दिला. सदर आदेशाविरुद्ध IIIrd Bench of Maharashtra Sales Tax Tribunal Bombay मध्ये दि.२०.०४.२००९ रोजी अपिल दाखल करण्यात आले होते. सदर अपिलावर दि.०७.०९.२०१८ रोजी मा.आयुक्तांनी कळविल्याप्रमाणे संस्थान Deemed Dealer असलेबाबत निर्णय झाला. सदर निर्णयाविरुद्ध संस्थानने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे अपिल दाखल करण्यात आले असुन दि.२१.११.२०१८ रोजी "Appeal admitted on the following substantial question of law :-

Whether the Committee appointed under the Shri Saibaba Sansthan Trust (Shirdi) Act 2004 is a Dealer in respect of various activities as mentioned herein above or a mandated to be carried out by the Committee under provision of Sansthan Act?" Office objection if any may be removed latest by 5th December 2018. असा निर्णय झाला आहे. बाब अद्याप न्यायप्रविष्ट आहे.

दरम्यानच्या काळात दि.०३.०७.२०१८ रोजी विक्रीकर विभागाकडुन आर्थिक वर्ष २००९-१० चे अनोंदणीकृत विक्रता म्हणुन व्हॅट करनिर्धारण करण्यात येऊन संस्थानच्या सोने-चांदी नाणी, प्रसाद लाडु, प्रसाद भोजन, प्रसाद नाष्टापाकीट, चहा, कॉफी, दुध, पुस्तके, फोटो, सीडी, रुग्णालय बीलींग, चल-अचल मालमत्ता खरेदी इ. धार्मिक ॲक्टीव्हीटीपोटी मिळणा-या संपुर्ण रक्कमेवर महत्तम दराने व्हॅटकर आकारणी करुन व नोंदणी दाखला नसल्याने खरेदी खर्चावर आदा करण्यात आलेला व्हॅट याची वजावट न देता एकतर्फी व्हॅट आकारणी करुन रु.२२.८३ कोटी व्हॅट (व्हॅट रु.७.६१ कोटी + व्याज रु.७.६१ कोटी + दंड रु.७.६१ कोटी) कळविला आहे. तर दि.२८.०३.२०१९ रोजी आर्थिक वर्ष २०१०-११ संबंधीत व्हॅट करनिर्धारण करुन व्हॅटकर, व्याज, दंड इत्यादी रु.२१.०० कोटी दि.३०.०४.२०१९ अखेर पर्यंत भरण्याची मुदत दिली होती.

सदर बाबत मा.व्य.स. चे सभेपुढे वेळोवेळी प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. निर्णय क्र.७७६/ दि.१३.१२.२०१८ अन्वये विक्रीकर विभागाकडे अपिल दाखल करण्याचे विचाराधीन असलेबाबत नमुद केले

असुन दि.१३.०२.२०१९ रोजी व्हॅट अपिल व आवश्यक अर्ज मा.उपायुक्त विक्रीकर विभाग, अहमदनगर यांचेकडे दाखल करण्यात आले आहेत. दि.१८.०३.२०१९ रोजीचे पत्रान्वये विक्रीकर विभागाने मुळ व्हॅट कराच्या १०% रक्कम रु.७६ लाख भरणेबाबत कळविले आहे. आदर्श आचारसंहिता लागु असल्याने दरम्यानचे कालावधीत मा.व्यवस्थापन समितीची सभा झाली नाही. बाबत कोणतीही एकतर्फी वसुलीची कारवाई करु नये असे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पत्राने मा.आयुक्त, राज्य कर, मुंबई यांना कळविले आहे.

मा.विश्वस्त श्री.मोहन जयकर यांचे नियंत्रणाखाली मे.जुन्नरकर ॲण्ड असोसिएटस, मुंबई, ॲड.पी.सी. जोशी, मुंबई, मे.जयकर ॲण्ड जयकर पार्टनर्स, मुंबई यांचे समन्वयाने आर्थिक वर्ष २००९-१० चे अपिल दाखल करण्यात आले असुन कार्यवाही सुरु होण्याकरिता व्हॅटकराच्या १०% रु.७६,११,२९२/- आदा करणे, आर्थिक वर्ष २०१०-११ चे अपिल दाखल करुन देय व्हॅटकराच्या १०% रु.७०,००,९६३/- आदा करुन अपिल कार्यवाही सुरु करणे आवश्यक आहे अन्यथा व्हॅटकर वसुलीबाबत विक्रीकर विभागाकडुन कारवाई होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

दरम्यानचे कालावधीत व्हॅटकर विभागाने दि.०३.०५.२०१९ रोजीचे पत्रान्वये Availment of Benefits Under Settlement of Arrears of Tax, Interest, Penalty or Late Fee Ordinance, 2019 विषयांकीत पत्र संस्थानला पाठविले असुन खालीलप्रमाणे दोन टप्प्यामध्ये व्हॅटकर, व्याज व दंड माफीची तरतुद दिली आहे.

१. पहिला टप्पा - दि.०१ एप्रिल २०१९ ते दि.३०.०६.२०१९ अखेर पर्यंत

दि.३१ मार्च २०१० अखेर पर्यंतचा व्हॅटकर यामध्ये – व्हॅटकर ५०%, व्याज ९०% व दंड ९५% अशी माफी
दि.३० जून २०१७ अखेर पर्यंतचा व्हॅटकर यामध्ये – व्हॅटकर ३०%, व्याज ८०% व दंड ९०% अशी माफी

२. दि.०१ जुलै २०१९ ते दि.३१ जुलै २०१९ अखेर पर्यंत दुस-या टप्प्यात

दि.३१ मार्च २०१० अखेर पर्यंतचा व्हॅटकर यामध्ये – व्हॅटकर ४०%, व्याज ८०% व दंड ९०% अशी माफी
दि.३० जून २०१७ अखेर पर्यंतचा व्हॅटकर यामध्ये – व्हॅटकर २०%, व्याज ७०% व दंड ८०% अशी माफी
अशाप्रकारे देय व्हॅटकर, त्यावरील व्याज व त्यावरील दंड यामध्ये सुट जाहीर केली आहे.

विक्रीकर विभागाने आर्थिक वर्ष २००९-१० ते २०१७-१८ अखेर Amnesty Scheme चे अनुषंगाने साधारणतः देय होणा-या व्हॅटची रक्कम कळविली आहे. अनोंदणीकृत गृहीत धरुन वर्षनिहाय एकुण व्हॅट, व्याज व दंड रु.२१४,८०,४९,७३३/-, Amnesty Scheme अंतर्गत लाभ रु.१४५,८६,७२,६७६/- वजा जाता एकुण देय कर व्हॅटकर रु.६८,९३,७७,०५७/- इतका कळविला आहे.

अशाप्रकारे व्हॅट संबंधीत

१) शासनाने Amnesty Scheme करिता काही मर्यादित कालावधीकरिता पहिला टप्पा दि.३०.०६.२०१९ व दुसरा टप्पा दि.३१.०७.२०१९ अखेर पर्यंत जाहीर केला आहे. त्यानुसार

अ) Amnesty Scheme योजनेत अनोंदणीकृत विक्रेता म्हणुन रु.६८,९३,७७,०५७/- व्हॅटकर आदा करावा लागेल.

आ) Amnesty Scheme योजनेत Condonation Delay करिता मा.सह आयुक्त, नाशिक यांचेकडे अर्ज करुन मान्यता मिळाल्यास नोंदणीकृत विक्रेता म्हणुन आर्थिक वर्ष २००९-१० ते २०१७-१८ अखेर वर्षनिहाय आकारणी करण्यात आलेल्या व्हॅट करातून वर्षनिहाय खरेदी, खर्चावर आदा करण्यात आलेली व्हॅटकर रक्कम वजावट मिळेल. साधारणतः ५० ते ६० टक्क्यांपर्यंत व्हॅटकर रक्कम कमी होईल. उपरोक्त आकडेवारी गृहीत धरता रु.६८.९३ कोटी करातुन रु.४१.३६ कोटी खरेदी, खर्चावर वजावट मिळुन रु.२७.५७ कोटी व्हॅटकर देय होईल.

२) सध्या मा.उच्च न्यायालयात संस्थानला व्हॅट लागु आहे अथवा नाही सदर अपिल न्यायप्रविष्ट आहे त्याचा निर्णय होईपर्यंत विक्रीकर विभागाकडुन वर्षनिहाय व्हॅट करनिर्धारण करण्यात येईल. त्यानुसार मा.उपायुक्त अपिल, ट्रायब्युनल अपिल व मा.उच्च न्यायालयात अपिल अशी दाद मागता येईल व वर्षनिहाय व्हॅटकर+व्याज+दंड अशा वर्षनिहाय रक्कमेच्या १०% कर भरुन अपिल करावे लागेल. मा.उच्च न्यायालयात व्हॅट लागु असल्याचा लागु असल्याचा निर्णय झाल्यास व्हॅटकर+व्याज+दंड असे सध्याचे करनिर्धारणानुसार साधारणतः रु.२१५ कोटी आदा करावे लागतील अथवा मा.उच्च न्यायालयात संस्थानला व्हॅटकरातुन सुट देण्याचा निर्णय झाल्यास कोणत्याही प्रकारची रक्कम देय होणार नाही. तथापि, अपिल कार्यवाही व अपिल निर्णयानंतर मा.उच्च न्यायालयाची स्थगिती नसल्यास मात्र व्हॅटकर भरावा लागेल.

३) खरेदी/खर्चात आदा करण्यात आलेली व्हॅटकर रक्कम शोधण्याकरिता Oracle ERP व Tally ERP संगणक प्रणालीमधुन व मॅन्युअल व्हॉऊचर फाईल्स, खरेदी आदेश इ. ची तपासणी करुन वर्ष निहाय, खरेदी/खर्च

लेखाशिर्ष निहाय, पुरवठादार निहाय व्हॅट रक्कम विवरणे तयार करणे, व्हॅट करनिर्धारण करणेकामी आवश्यक माहिती संकलित करणे व Amnesty Scheme च्या अंतिम दि.३०.०६.२०१९ पर्यंत व्हॅटकर विभागाकडुन नोंदणीकृत विक्रेता म्हणुन करनिर्धारण करुन घेणेकामी तज्ञ लेखापरिक्षण संस्थांची नियुक्ती करणे.

उपरोक्त बाबत निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२७९ **विक्रीकर विभागाचे मा.अतिरिक्त आयुक्त, मा.सह आयुक्त व विक्रीकर अधिकारी हे आजचे व्यवस्थापन समितीसमोर उपस्थित होते. समितीने त्यांचेकडून शासनाने जाहिर केलेल्या Amnesty Scheme संबधी सविस्तर माहिती घेतली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरचा प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात येऊन समिती सदस्य मा.अॅड मोहन जयकर यांचे मार्गदर्शन घेऊन सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे पुढील सभेमध्ये सादर करावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.२३ **Red Bus व TSTDS चे E-Ticket या पोर्टलव्दारे बस तिकीट आरक्षीत करुन साईबाबांचे दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांसाठी Red Bus व TSTDS यांचे E-Ticket वर आरती / दर्शन पास आरक्षीत करणेची सुविधा उपलब्ध करुन देणेकामी त्यांनी केलेल्या मागणी विषयी निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव** जगभरातून शिर्डी येथे श्रींचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना त्यांचे दर्शन व निवासाची आगाऊ व्यवस्था करणेच्या दृष्टीने ऑनलाईन आरती/दर्शनपास व रुम बुकींग करता यावी, याकरीता संस्थानमार्फत राबविणेत आलेल्या साईटेक प्रकल्पाअंतर्गत online.sai.org.in हि वेबसाईट विकसीत करुन कार्यान्वीत करणेत आलेली आहे. सदरचे वेबसाईटला साईभक्तांकडून लक्षणीय प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. सद्यस्थितीत साईभक्तांना निर्धारीत तारखेच्या ६० दिवस अगोदरपासून ०२ दिवसांपर्यंत ऑनलाईन रुम बुकींग व निर्धारीत तारखेपर्यंत ऑनलाईन आरती/दर्शनपास सुविधा उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशान्वये, ऑनलाईन रुम बुकींगसाठी उपलब्ध असलेला कोटा बहुतेक वेळी पुर्ण आरक्षीत झालेला असतो. तसेच आरतीचा कोटा हा नेहमीच पुर्णपणे आरक्षीत होत असून दैनंदिन साधारणपणे ४,००० साईभक्तांसाठी दर्शनपास आरक्षीत होतात.

अ. ऑनलाईन आरती/दर्शनपास बुकींग सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत सादर केलेला प्रस्तावामध्ये मे.रेडबस यांनी मागणी केलेली आहे. प्राप्त झालेल्या प्रस्तावामध्ये पुढीलप्रमाणे नमुद करणेत आलेले आहे.

मे.रेडबस हि कंपनी भारतातील ऑनलाईन बस तिकीट आरक्षणाची सुविधा उपलब्ध करुन देणारी एक अग्रणी कंपनी असून Makemytreep Group या कंपनीची अंगीकृत कंपनी आहे. त्यांचेमार्फत शिर्डी येथे श्रींचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांसाठी ऑनलाईन दर्शनपास आरक्षणाची सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत त्यांनी प्रस्तावामध्ये मागणी केलेली आहे. सदर मागणीप्रमाणे सद्यस्थितीत online.sai.org.in या वेबसाईटद्वारे ऑनलाईन सुविधांचा लाभ घेणेकामी साईभक्तांना ऑनलाईन नोंदणी करण्याची अट त्यांचेसाठी शिथील करणेत येऊन त्यांनी फक्त वेबसाईटवर एकदा नोंदणी केलेनंतर सदर नोंदणीद्वारे त्यांचे ग्राहकांसाठी ऑनलाईन दर्शनपास आरक्षणाची सुविधा उपलब्ध करुन देणेत यावी, असे नमुद करणेत आलेले आहे.

याविषयी दि.१५ मे, २०१९ रोजी मे.रेडबस यांचे प्रतिनिधींनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे उपस्थितीत त्यांचे कंपनीची ओळख व ऑनलाईन दर्शनपास आरक्षणाकामी त्यांची मागणी याबाबत सादरीकरण सादर केलेले आहे. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखाधिकारी, प्रशासकीय अधिकारी, माहिती तंत्रज्ञान विभाग तसेच माहिती तंत्रज्ञान विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. सदर सादरीकरणात त्यांनी त्यांचेमार्फत बस आरक्षण करुन शिर्डी येथे येणा-या साईभक्तांसाठी त्यांचेच ई-पोर्टलवर दर्शनपास आरक्षणाची सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत मागणी केलेली आहे.

सद्यस्थितीत online.sai.org.in या वेबसाईटद्वारे उपलब्ध सुविधांचा लाभ घेणेसाठी साईभक्तांना सदरचे वेबसाईटवर प्रथम नोंदणी (online registration) करावी लागते. तद्नंतर नोंदणी केलेल्या ई-मेल आयडी व पासवर्डद्वारे वेबसाईटवर लॉगीन करुन स्वत:बरोबर कुटूंबातील इतर सदस्यांकरीता ऑनलाईन सुविधा आरक्षीत करता येतात. साईभक्तांनी आरक्षीत केलेल्या सुविधांपोटीची रक्कम वेबसाईटवर उपलब्ध पेमेंट गेटवेद्वारे थेट संस्थानखाती जमा होते. साईभक्तांनी आरक्षीत केलेल्या सुविधांसाठीची Acknowledgment साईभक्तांना प्रिंट करणेची सुविधा वेबसाईटवर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. साईभक्त शिर्डीस येतांना सदर Acknowledgment ची प्रिंट घेऊन येतात व संबंधीत ठिकाणी काऊंटरवर सदरची प्रिंट उपस्थित संस्थान

कर्मचा-यांना सादर करतात. सदर कर्मचा-यामार्फत Acknowledgment वर असलेला बारकोड स्कॅनरच्या सहाय्याने स्कॅन केलेनंतर साईभक्त व त्यांनी आरक्षीत केलेल्या सुविधांबाबतची सर्व माहिती कार्यप्रणालीमध्ये दाखविणेत येते. संबंधीत कर्मचारी उपस्थित साईभक्त व कार्यप्रणालीमधील माहितीची पडताळणी करुन साईभक्तांना आरक्षीत केलेल्या सुविधा उपलब्ध करुन देतात. online.sai.org.in या वेबसाईटद्वारे साईभक्तांकडून संस्थानखाती जमा होणा-या रक्कमेबाबत पडताळणी लेखाशाखा विभागामार्फत दैनंदिन स्वरुपात केली जाते.

मे.रेडबस यांनी मागणी केलेप्रमाणे साईभक्तांसाठी दर्शनपास आरक्षणाची सुविधा थेट त्यांचे ई-पोर्टलद्वारे उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास आर्थिक व्यवहार व साईभक्तांनी आरक्षीत केलेल्या सुविधा व त्यांची माहिती यांची पडताळणी करणे जिकरीचे होणार आहे. तसेच त्यांचे E-Portal द्वारे दर्शनपास आरक्षीत करणारे साईभक्तांचे Acknowledgement फॉर्मवर बारकोड प्रिंट होणार नसल्याने दर्शनपासचे झेरॉक्सद्वारे काळाबाजार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत त्यांना सादरीकरणादरम्यान संस्थानमार्फत संबंधीत अधिकारी यांनी संभाव्य अडचणींबाबत अवगत केलेले आहे. तसेच मे.रेडबस यांना त्यांचे मागणीप्रमाणे ऑनलाईन दर्शनपास आरक्षण सुविधा उपलब्ध करुन दिल्यास अशाप्रकारची मागणी भविष्यात इतरही खाजगी कंपन्या करु शकण्याची शक्यता नाकारता येऊ शकत नाही.

आ. Telangana State Tourism Development Corporation Ltd., Telanagana (TSTDC) यांनी त्यांचे बसेसमधून शिर्डी येथे श्रींचे दर्शनाकरीता येणा-या साईभक्तांसाठी दैनंदिन ५०० सशुल्क दर्शनपासचा कोटा उपलब्ध करुन देणेत यावा, अशी विनंती प्रस्तावाद्वारे केलेली आहे. सदरचे प्रस्तावासोबत त्यांनी तिरुपती देवस्थानने त्यांचेमार्फत दर्शनासाठी येणा-या भक्तांसाठी उपलब्ध करुन दिलेल्या दर्शनपास कोटाबाबतचे तिरुपती देवस्थान यांचे निर्णयाची सत्यप्रत जोडलेली आहे.

TSTDC यांचे मागणीमध्ये त्यांना संस्थानचे जनसंपर्क कार्यालयातून वितरीत होणा-या सशुल्क दर्शनपासचा कोटा अभिप्रेत असल्याचे निदर्शनास येते. सद्यस्थितीत जनसंपर्क कार्यालयातून वितरीत करणेत येणा-या दर्शनपाससाठी कोणत्याही प्रकारची शिफारशीची आवश्यकता नसते. तसेच सदरचे दर्शनपास वितरीत करणेकरीता सद्यस्थितीत जनसंपर्क कार्यालय, साईनिवास समोरील दर्शनपास वितरण काउंटर व संस्थानचे सर्व निवासस्थाने इ. ठिकाणी काऊंटर कार्यान्वीत आहेत. सबब, TSTDC यांचे बसेसद्वारे श्रींचे दर्शनासाठी शिर्डीत येणारे साईभक्त सदरचे पास शिर्डी येथे आलेनंतर नमुद काऊंटरपैकी कोणत्याही एका काऊंटरवर जाऊन सशुल्क दर्शनपास उपलब्ध करुन घेऊ शकतात.

उपरोक्त नमुद “अ” प्रमाणे मे.रेडबस यांचे मागणीनुसार त्यांचेमार्फत शिर्डी येथे येणा-या साईभक्तांसाठी त्यांचे ई-पोर्टलवर अथवा स्वतंत्र लॉगीनद्वारे ऑनलाईन दर्शनपास सुविधा उपलब्ध करुन दिल्यास येणा-या संभाव्य अडचणींचा विचार करता, याबाबत निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

तसेच “आ” मध्ये नमुद केलेप्रमाणे सशुल्क दर्शनपास उपलब्ध करणेकामी शिफारशीची आवश्यकता नसल्याने TSTDC यांनी मागणी केलेप्रमाणे त्यांचे बसेसद्वारे श्रींचे दर्शनाकरीता येणा-या साईभक्तांसाठी स्वतंत्र सशुल्क दर्शनपास कोटा देण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब, सदरचा प्रस्ताव नोंद घेणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :- तांत्रिक व प्रशासकीय

विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत :- “अ” प्रमाणे मे. रेडबस यांचे मागणीनुसार त्यांचेमार्फत शिर्डी येथे येणा-या साईभक्तांसाठी त्यांचे ई-पोर्टलवर अथवा स्वतंत्र लॉगीनद्वारे ऑनलाईन दर्शनपास सुविधा उपलब्ध करुन दिल्यास आर्थिक व्यवहार व दर्शनपास पडताळणी याबाबत अडचणी येऊ शकतात. तसेच अशा प्रकारची मागणी भविष्यात इतरही खाजगी कंपन्या करु शकतात.

“आ” मध्ये नमुद केलेप्रमाणे सशुल्क दर्शनपास उपलब्ध करणेकामी शिफारशीची आवश्यकता नसल्याने TSTDC यांनी मागणी केलेप्रमाणे त्यांचे बसेसद्वारे श्रींचे दर्शनाकरीता येणा-या साईभक्तांसाठी स्वतंत्र सशुल्क दर्शनपास कोटा देण्याची आवश्यकता वाटत नाही.

सद्यस्थितीत संस्थानचे online.sai.org.in या वेबसाईटद्वारे साईभक्तांमार्फत ऑनलाईन सुविधा आरक्षीत करण्याचे प्रमाण लक्षणीय आहे.

उपरोक्तप्रमाणे “अ” व “आ” प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सविनय सादर.

मागणी :- प्रास्ताविकेत नमुद "अ" व "आ" प्रमाणे प्रस्ताव निर्णयार्थ मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

प्रस्ताव :- अ. मे. रेडबस यांचे मागणीनुसार त्यांचेमार्फत शिर्डी येथे येणा-या साईभक्तांसाठी त्यांचे ई-पोर्टलवर अथवा स्वतंत्र लॉगीनद्वारे ऑनलाईन दर्शनपास सुविधा उपलब्ध करुन दिल्यास आर्थिक व्यवहार व दर्शनपास पडताळणी याबाबत येणा-या अडचणी तसेच अशा प्रकारची मागणी भविष्यात इतरही खाजगी कंपन्या करु शकण्याची शक्यता याचा विचार करता सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सविनय सादर.

आ. सशुल्क दर्शनपास उपलब्ध करणेकामी शिफारशीची आवश्यकता नसल्याने TSTDC यांनी मागणी केलेप्रमाणे त्यांचे बसेसद्वारे श्रींचे दर्शनाकरीता येणा-या साईभक्तांसाठी स्वतंत्र सशुल्क दर्शनपास कोटा देण्याची आवश्यकता वाटत नाही, सबब सदरचा प्रस्ताव नोंद घेणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.२८०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करण्यात आला.**

**(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२४** **आंतरराष्ट्रीय धार्मिक, तिर्थक्षेत्र, कल्याण, आध्यात्मिक आणि जागतिक योगदिन परिषदेत सहभागी होणेबाबत.**

**प्रस्ताव** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम २००४

महाराष्ट्र अधिनियम क्र१४ कलम नं. १७ (ठ) मध्ये खालील प्रमाणे तरतुद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार – प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील."

प्रस्तावना– श्री अजय गुप्ता चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर,आय सी एम ग्रुप , दिल्ली यांनी त्यांच्या दि. ८/५/२०१९ ते पत्रात खालील प्रमाणे कळविले आहे.

It would be our great pleasure to invite you for the forthcoming International Conference on Religious, Pilgrimage, Wellness, Spiritual Tourism & World Yoga Day Celebration , scheduled from June 20th till 22nd 2019 at Rishikesh ,Uttarakhand.

It would be our pleasure to have your gracious presence as a Speaker for SESSION on Religious, Pilgrimage, Wellness and Spiritual Tourism at the conference, as this would encourage us further with your expertise in Industry .We would appreciate if you instruct the concerned marketing department to take a participation for stall/ sponsorship at this Travel-Tourism Exhibition and Conclave as we are anticipated delegates from PAN India Consultants and Corporate who are travelling to Uttarakhand from different parts of the India at one place under one roof to showcase all the niche products under one crown and have up to date knowledge about the latest trends.

Highlights of The Exhibition & Conclave : A three day exhibition & conclave highlighting Religious , Pilgrimage, Wellness and Spiritual Tourism across the globe , Focused sessions throughout the day, Structured, Organized , B2B meetings, Interact with approx 200+ delegates from trade, Social Networking Events, Hosted Dinners, Cultural Program, World Yoga Day on june 21$^{st}$ 2019 , Ganga Arti , Adventure Activities.

We would also request you to kindly give us Prasad (300 qty) for our delegates.

The stall options are available as below:

09 sqmtr stall @ INR 150000

06 sqmtr stall @ INR 100000

04 sqmtr stall @ INR 60000

(Taxes extra)+18%GST

We are looking for favourable response & mutual beneficial relationship with your esteemed organization.

उपरोक्त पत्रावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी "व्यवस्थापन समितीसमोर ठेवावे" व मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी "प्रकाशने विभाग/जनसंपर्क, आचार सहीतेनंतरच्या पहिल्याच बैठकीत विषय ठेवावा" असे निर्देश दिलेले आहेत.

विभागाचा अभिप्राय- सदर परिषदेमध्ये धार्मिक, तीर्थक्षेत्र, कल्याण आणि अध्यात्मीक पर्यटन यावर होणा-या चर्चासत्रासाठी संस्थानमार्फत प्रवक्ता पाठविणेबाबत तसेच सदरचे परिषदेमध्ये/कार्यक्रमामध्ये स्टॉलचा सहभाग असणेविषयी पत्रलेखक संस्थेने विनंती केली आहे.

परंतु संस्थानने यापुर्वी हिंदु स्पिरिच्युअल ॲण्ड सर्व्हिस फौडेशन – चाप्टर मुंबई या संस्थेमार्फत शुक्रवार दि.११ जानेवारी ते रविवार दि.१३ जानेवारी २०१९ दरम्यान मुंबई येथे आयोजित केलेल्या हिंदू अध्यात्मीक आणि सेवा प्रदर्शनात तसेच हिंदू स्पिरिच्युअल ॲण्ड सर्व्हिस फेयर आणि इनिशियटिव्ह फॉर मॉरल ॲण्ड कल्चरल ट्रेनिंग फौंडेशन आयोजित चेन्नई येथे दि.२८ जानेवारी २०१९ ते ४ फेब्रुवारी २०१९ दरम्यान झालेल्या सेवाप्रदर्शनात प्रकाशने विक्रीला अतिशय अत्यल्प प्रतिसाद मिळालेला आहे. त्यामुळे फक्त श्री साईबाबा व श्री साईबाबा संस्थान यांची माहिती लोकांपर्यंत जाणेसाठी तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियमातील तरतुदीस अधिन राहून, श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार – प्रसार होणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने प्रवक्ता पाठविणेबाबतची कार्यवाही करता येईल असे नम्र आहे.

प्रस्ताव- तरी विभागाचे अभिप्रायात नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा व श्री साईबाबा संस्थान यांची माहिती लोकांपर्यंत जाणेसाठी तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियमातील तरतुदीस अधिन राहून, श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार – प्रसार होणेसाठी प्रवक्ता पाठविणेबाबत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२८१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करण्यात आला.**

**(कार्यवाही- प्रकाशने विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२५** **साठा संपुष्टात आलेली संस्थान प्रकाशित प्रकाशने पुर्नमुद्रण करणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागणी करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव** महाराष्ट्र अधिनियम २००४ तरतूदः-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी साठी महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ मधील कलम क्र.१७ (२) ठ मधील तरतूद.

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार – प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय-

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६.०२.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१५३ .

यापुर्वी साठा संपुष्टात आलेली संस्थान प्रकाशित प्रकाशने पुनर्मुद्रण करणेकामी ई-निविदा मागणी करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रू.८३,२५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

प्रास्तविकः- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीमार्फत संस्थान प्रकाशित पुस्तकांची छपाई करणेत येऊन साईभक्तांना सवलतीचे दरात उपलब्ध करून देण्यात येतात. उपरोक्त नमूद अधिनियमातील तरतूदीस अधिन राहून, प्रकाशने विभागामार्फत श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण, त्यांचा अगाध महिमा याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार –प्रसार व्हावा, त्याचा विस्तार व्हावा या उद्देशाने साईबाबांचे जीवनावर आधारीत ग्रंथ , पुस्तके,सीडी वगैरे निर्मितीकामी नामांकीत प्रेसधारकांकडून ई-निविदेद्वारे दर मागणी करून छपाई करणेत येते.

साईभक्तांचे सेवेसाठी प्रकाशने विभागामार्फत मंदीर परिसर तसेच संस्थान परिसरात एकूण ०७ बुक स्टॉल उभारणेत आलेले आहेत. तसेच संस्थानचे दादर येथील मुंबई कार्यालयात व चेन्नई, बंगलोर, हैद्राबाद या ठिकाणीही बुक स्टॉल उभारून इतर राज्यातील साईभक्तांनाही श्रींचे जीवनावर आधारीत प्रकाशने उपलब्ध करून दिलेली आहेत. त्याशिवाय लेखाशाखा विभागाअंतर्गत असलेल्या देणगी कार्यालयाकडून रू.२५ हजार व त्यापेक्षा जास्त देणगी देणा-या साईभक्तांना मागणीप्रमाणे मराठी,हिंदी,इंग्रजी,कन्नड, गुजराथी,तामिळ,तेलगू इ.

भाषेतील साईचरित्र भेट स्वरूपात देण्यात येतात. या सर्व बाबीं व शिल्लक साठयाचा अंदाज घेवून त्यानुसार पुढील छपाईची कार्यवाही करणेत येत असते.

विभागाचा अभिप्राय- पुनर्मुद्रण करावयाची पुस्तके, शिल्लक साठा तसेच पुढे किती महिने पुरेल या सर्व गोष्टींचा विचार करून प्रस्तावीत छपाई खर्चात ३० टक्के जादा किंमत गृहीत धरून (Estimate Cost) (मुंबईतील मे.सॅप प्रिन्ट सोलूशन, मे.प्रिन्ट प्लस प्रा.लि. तसेच मे.टॅको व्हिजन प्रा.लि.अशा नामांकित प्रेसधारकांकडून सरासरी अंदाजे किंमत घेण्यात आलेली आहे.) छपाई करावयाचे पुस्तकांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ नं | छपाई तपशिल | वार्षिक विक्री | शिल्लक साठा | दरमहा सरासरी विक्री | साठा किती महिने पुरेल | मागील छपाई संख्या /वर्ष | नवीन छपाई संख्या | मागील छपाई दर | अंदाजे छपाई दर | छपाईसाठी अंदाजे एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री साई सगुणोपासना आरती कन्नड आ.क्र.२ री | २०२५ | २०५६ | ४०० | ५ | ५०००/ २०१८ | २०,००० | १२.३७ | १६.०० | ३,२०,०००/- |
| २ | श्री साईंचरित्र कन्नड आ.क्र.२० वी | २५५४६ | १८१९८ | २१२९ | ९ | ५०,०००/ २०१८ | ५०,००० | ४७/- | ६१/- | ३०,५०,०००/- |
| ३ | गुरूपाठ अभंग मराठी सी.डी. आ.क्र.५ वी | १०४३ | ८७६ | ८७ | १० | ५०००/ २०१७ | ५,००० | ३६.६६ | ४८/- | २,४०,०००/- |
| | | | | | | | | | **एकूण-** | **३६,१०,०००/-** |

**(अक्षरी रूपये छत्तीस लाख दहा हजार मात्र)**

उपरोक्त प्रकाशने छपाईकामी विहीत पध्दतीनुसार वर्तमानपत्रात शासकीय दराने जाहिरात प्रसिध्द करून ई-निविदा मागणी करता येईल. याकामी तक्त्यात दर्शविलेप्रमाणे अंदाजे रक्कम रू.३६,१०,०००/- (अक्षरी रूपये छत्तीस लाख दहा हजार मात्र) खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च पुस्तके/फोटो व दैनंदिनी दिनदर्शिका छपाईसाठी असलेल्या रक्कम रू.१० कोटीच्या अंदाजपत्रकीय तरतूदीतून करता येईल.

प्रस्ताव-विभागाचे अभिप्रायातील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे साठा संपुष्टात आलेल्या संस्थान प्रकाशनांची छपाई करणेसाठी येणा-या अंदाजे रक्कम रू.३६,१०,०००/- (अक्षरी रूपये छत्तीस लाख दहा हजार मात्र) चे खर्चास, जनसंपर्क कार्यालयामार्फत शासकीय दराने मुंबई,नाशिक, औरंगाबाद, सोलापूर, नागपूर, पुणे,अहमदनगर या शहरातील वर्तमानपत्रात ई-निविदा जाहिरात प्रसिध्द करणेस तसेच आयटी विभागामार्फत संस्थानचे संकेतस्थळावर सदरील ई-निविदा सूचना प्रसिध्द करणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे साठा संपुष्टात आलेल्या संस्थान प्रकाशनांची छपाई करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.३६,१०,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२६** **श्री साई प्रसादालयातील माहे एप्रिल-२०१८ ते मार्च-२०१९ अखेर खाद्य तेल तुप व काजुचे रिकामे डब्यांचा अहवाल.**

**प्रस्ताव** अधिनियम २००४ मधील तरतूद :- अधिनियमन २००४ कलम १७ (४) नुसार निरुपयोगी वस्तुंची विल्हेवाट लावणे.

मा.व्यवस्थापन समितीचा ठराव :- मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१७/०७/२०१४ मधील निर्णय क्र.५९२.

प्रास्ताविक:- संस्थानचे साईप्रसादालयामध्ये सकाळी १०.०० ते रात्री १०.०० या वेळेत साईभक्तांन प्रसादभोजनाची सुविधा पुरविली जाते. प्रसादभोजनामध्ये चपाती, पुरी, भाजी, बर्फी इ.पदार्थ दिले जात असून सदरील पदार्थ बनविण्यासाठी खाद्यतेल, गावरान तूप, वनस्पती तूपाचा वापर होत असतो. सदर डब्यांचा मध्यवर्ती भांडार विभागाकडून पत्र्याच्या नविन डब्यात पुरवठा होत असून रिकामे झालेल्या डब्यांची अभिलेख कक्षामार्फत विक्री केली जाते.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१७/०७/२०१४ मधील निर्णय क्र.५९२ अन्वये तेला-तूपाचे एकुण डबे, रिकामे झालेले डबे तसेच रिकामे डबे कोठे वापरण्यात आले त्याच्या नोंदी ठेवणेत येऊन, त्याचा मासिक अहवाल मा.कार्यकारी अधिकारी यांचे समोर व वार्षिक अहवाल मा.त्रिसदस्य समितीसमोर सादर करणेत यावा असे ठरलेले आहे. त्यानुसार मासिक अहवाल वेळोवेळी मा.कार्यकारी अधिकारी यांचेसमोर सादर करणेत येत आहे.

खाद्यतेल, वनस्पती तूप, गावरान तूप व काजूचे रिकामे झालेले डबे अभिलेख कक्षामार्फत विक्री करण्यात येतात. तसेच संस्थानमधील इतर विभागांना त्यांचे मागणीनुसार व वापराकामी आवश्यकतेनुसार डबे दिले जातात व प्रसादालयाचे गिरण्या पॅकींगकरीता काही डबे वापरले जातात.

खरेदी करणेत आलेल्या व विक्री तसेच वापरणेत आलेल्या डब्यांचा ताळमेळाचा तपशिल खालीलप्रमाणे-

| तपशिल | खरेदी व मागील शिल्लक एकुण डबे | | | विक्री व वापरणेत आलेले डबे | | एकुण खर्च डबे | ०१ एप्रिल-२०१९ रोजी शिल्लक रिकामे डबे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ०१ एप्रिल-१८ रोजी शिल्लक रिकामे डबे | संस्थानसाठी खरेदी करणेत आलेले तेल,तूप व काजूचे डबे (मध्यवर्ती भांडार विभागामार्फत) | | प्रसादालय, स्वच्छता, मंदिर, लाडू विभागासाठी वापरणेत/देणेत आलेले डबे | अभिलेख कक्षामार्फत विक्री करणेत आलेले डबे | | |
| | | आवक डबे | एकुण जमा डबे | | | | |
| खाद्यतेल | २४५ | १६९३० +१०४(देणगी) | १७२७९ | ०९ | १६७३४ | १६७४३ | ५३६ |
| वनस्पती तूप | १६ | ३४१२ + ८८(देणगी) | ३५१६ | ७५ | ३३५५ | ३४३० | ८६ |
| काजू डबे | १ | ३८+८ (लाडू विभाग) | ४७ | ४२ | ०० | ४२ | ०५ |
| गावरान तूप | १५ | १५५ | १७० | १६६ | ०० | १६६ | ०४ |

| अभिलेख कक्षामार्फत विक्री करणेत आलेले एकुण डबे - | अभिलेख कक्षामार्फत विक्री करणेत आलेल्या रिकाम्या डब्यांची रक्कम- |
|---|---|
| १६७३४+ ३३५५ = २००८९ डबे | रु. ४,८८,९८२/- |

मागणी:- संस्थानसाठी माहे एप्रिल-२०१८ ते मार्च-२०१९ अखेर खरेदी करणेत आलेले तेल/तूप/काजूचे रिकामे झालेल्या डब्यांचा अहवाल सादर करणेस मान्यता असावी हि विनंती.

संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान :- आर्थिक

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत :-उपरोक्त प्रमाणे माहे एप्रिल-२०१८ ते मार्च-२०१९ अखेर एकुण खरेदी करणेत आलेल्या मालाचे रिकामे डबे तसेच विक्री करणेत व दैनंदिन वापरणेसाठी देण्यात आलेल्या रिकाम्या डब्यांच्या अहवालास प्रशासकीय मान्यता मिळणेकामी उपरोक्त विषयाची टिप्पणी मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२८३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयातील माहे एप्रिल-२०१८ ते मार्च-२०१९ अखेर खाद्य तेल तुप व काजुचे रिकामे डब्यांचे अहवालाचे अवलोकन करुन त्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साई प्रसादालय)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२७** **सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील श्री साई प्रसादालयातील धान्य, कडधान्य व किराणा मालाचे घट तुटी बाबत.**

**प्रस्ताव** अधिनियम २००४ मधील तरतुद :- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ भाग-४ मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१ (१ घ) नुसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे.

प्रस्ताविक:- श्री साई प्रसादालयातील प्रसाद-भोजनासाठी लागणारा किराणा माल, धान्य- कडधान्य डाळी इत्यादी साफ केल्यानंतर वापरासाठी देण्यात येतात. सदर माल डिस्टोनर मशिनव्दारे व मनुष्यबळाकरवी साफ करण्यात येतो. गहू व हरबरा दाळ दळल्यानंतर काही प्रमाणात घट येते. त्याचप्रमाणे दळण-कांडन व साफ केल्यानंतर काही प्रमाणात कचरा, खडे, मातेरे निघते. वातावरणातील बदलामुळेही कडधान्याच्या वजनात घट येते. या सर्व कारणामुळे व प्रक्रिया करतांना किराणा मालामध्ये घट-तुट येत असते. तसेच भाजी बनविणेसाठी लागणारा कच्चा मसाला, अखंड मिरची, अखंड हळद, अखंड धने २ ते ३ वेळेला ग्राईंडरव्दारे दळून बारीक करणेत येत असून त्यामध्ये देखील काही प्रमाणात घट येत असते.

याबाबत संदर्भिय अं.नं.१ नूसार, सन-२००५-२००६ मध्ये प्रसादालयाचे लेखापरिक्षणामधील मुद्दा व मा.व्यवस्थापन समिती दि.०२/०५/२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.४०५ नूसार, सन २००७-०८ पासून पुढे श्री लोंगाणी, स्थानिक अंतर्गत लेखापरिक्षक यांचे सुचनेनूसार शासकीय डिपार्टमेंटकडून माहीती घेवून श्री लोंगाणी यांचे मार्गदर्शनाने नियमावली करुन घट-तुट दर्शविण्याची कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली होती. घट-तुटीबाबत शासनाची निश्चित अशी नियमावली नसल्यामुळे त्याकरीता शासकीय संस्था, इतर देवस्थान, सरकारी कारागृह, मिलीटरी कॅम्प, सरकारी अन्नधान्य महामंडळ अशा १० संस्थांना प्रशासन शाखा जा.नं.७८३७ दि.२१/०५/२००७ पत्र पाठवून त्यांचेकडे असलेली धान्य कडधान्य व किराणा मालाचे घट-तुटीची पध्दती लिखीत स्वरुपात मागविणेत आलेली होती.

त्यानूसार धान्य कडधान्य व किराणा मालाचे घट-तुटीबाबत खालील तीन शासकीय व धार्मिक देवस्थानांकडून धान्य कडधान्य व किराणा मालाचे प्रचलीत घट-तुटीबाबत माहीती प्राप्त झाली होती. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ.नं. | संस्थेचे नांव | तपशिल (प्रति क्विंटल घट-तुट) |
|---|---|---|
| ०१. | येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे | ज्वारी-४%, बाजरी-५%, गहू-५%, तांदूळ-२%, सर्व प्रकारच्या डाळी-२%, फळभाजी-५%, पालेभाजी-१०%, ज.लाकूड/कोळसा-५% |
| ०२. | मध्यवर्ती कारागृह, नासिकरोड | साखर व वन.तुप या खाद्यतेलास घट नाही मात्र कडधान्य व डाळी-२% |
| ०३. | गजानन महाराज संस्थान, शेगांव | प्रती क्विंटल ३% ते ५% एवढी घट-तुट दर्शविलेली आहे. |

उपरोक्त सदर पध्दतीचा विचार करुन मा.श्री अभय शास्त्री (सी.ए.), मा.श्री.ए.जी.लोंगाणी, (सी.ए.) हे संस्थानचे अंतर्गत लेखापरिक्षक व मुख्य लेखाधिकारी यां नी संस्थानची घट-तुटीबाबतची नियमावली बनविणेत आलेली असून त्यास मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०७/०७/२००८ रोजीचे सभेत निर्णय क्रं. ५६० नूसार मान्यता मिळालेली आहे. तेंव्हापासून प्रचलीत नियमावलीप्रमाणे आजतागायत कार्यवाही चालू आहे.

१) सन २००७ -२००८ मध्ये प्रसादालयात प्रत्यक्ष आलेली घट-तुट इतर देवस्थान व संस्था यांचेकडील प्रचिलत घट- तुटीचे प्रमाण पाहता आपलेकडील आलेली सरासरी घट-तुट योग्य असून इतरांचे तुलनेने कमी असलेने दर सहा महिन्यानंतर प्रस्तावित घट-तुट नांवे टाकणेत यावी.

२) दर सहा महिण्यानंतर प्रत्यक्ष मालाचा साठा व रजिष्टरप्रमाणे दिसणारा मालाचा साठा याची पडताळणी करावी.

३) दर सहा महिण्यानंतर प्रत्यक्ष शिल्लक माल व रजिष्टरप्रमाणे दिसणारा साठा याची तपासणी केल्यानंतर तपासणी अंती आलेली घट-तुट प्रस्तावित सरासरी पेक्षा कमी आढळल्यास त्याबाबतचा वस्तुनिष्ठ अहवाल मा. व्यवस्थापन समिती समोर अवलोकनार्थ सादर करावा. मात्र प्रस्तावित सरासरी पेक्षा आलेली घट-तुट जादा असेल तर त्यास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी.

उपरोक्त नियमावलीनुसार व मा.व्यवस्थापन समिती निर्णयानूसार प्रसादालयातील धान्य-कडधान्य व किराणा मालाची घट-तुट खर्ची टाकणेस मान्यता मिळालेली आहे. यापुर्वी झालेल्या मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०६.०९.२०१८ निर्णय क्र.५४५ अन्वये श्री साई प्रसादालयातील सन २०१७-१८ मधील धान्य कडधान्य, किराणा माल घट-तुटीस व त्याचे कार्यपध्दतीस मान्यता मिळालेली आहे.

सन २०१८-२०१९ मध्ये धान्य-कडधान्य व किराणा मालामध्ये आलेल्या घट-तुटीचा तपशिल-

| अ. नं. | मालाचा तपशिल | मान्य झालेल्या घट-तुटीचे प्रमाण | दि.०१/०४/२०१८ ते दि.३१/०३/२०१९ अखेर प्रत्यक्ष खर्च झालेला माल | दि.०१/०४/२०१८ ते दि.३१/०३/२०१९ अखेर प्रत्यक्ष आलेली घट-तुट | प्रत्यक्ष घट-तुटीचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| | | टक्केवारीमध्ये | किलो/ग्रॅम | किलो/ग्रॅम | टक्केवारीमध्ये |
| १ | गहु | ३.०० | १३६१०६५.५०० | २३६६१.६५० | १.७४ |
| २ | तांदूळ | १.०० | ८९७११९.२०० | ९००.००० | ०.१० |
| ३ | तुरदाळ | १.०० | १२१३९०.००० | २००.००० | ०.१६ |
| ४ | हरबरा दाळ | २.०० | ४९११३.७५० | २७०.५०० | ०.५५ |
| ५ | मुगदाळ | १.०० | ८४०३७.००० | २१०.५०० | ०.२५ |
| ६ | गुळ | १.०० | ३५४८९.७५० | ६०.००० | ०.१७ |
| ७ | रवा | १.०० | ५५०६२.५५० | ५६.००० | ०.१० |
| ८ | शेंगदाणे | १.०० | ४६१५०.५०० | ११५.५०० | ०.२५ |
| ९ | अखंड मिरची | ४.०० | १५३१८.३०० | ३४७.७०० | २.२७ |
| १० | अखंड हळद | ४.०० | १०६४०.५५० | ३५१.८०० | ३.३१ |
| ११ | मोहरी | २.०० | ४५३८.८०० | १९.८०० | ०.४४ |
| १२ | जिरे | २.०० | ५९२२.७०० | ५८.९०० | ०.९९ |
| १३ | अखंड मसाला | २.२५ | २५५७.३०० | ३७.००० | १.४५ |
| १४ | अखंड धने | २.५० | १६२७५.५०० | १९८.५०० | १.२२ |
| १५ | खोबरेवाटी | १.०० | १७७३७.५०० | ३५.५०० | ०.२० |
| १६ | हरबरा | १.०० | ८३६५१.५०० | २०८.००० | ०.२५ |
| १७ | वाटाणा | १.०० | १२९८६.००० | १६.००० | ०.१२ |
| १८ | मुग | १.०० | ८१७१२.००० | २३३.००० | ०.२९ |
| १९ | मठ | १.०० | ७९२५१.००० | १६१.००० | ०.२० |
| २० | मेथी | २.२५ | ४३७.२०० | १.००० | ०.२३ |
| २१ | सुंठ (अखंड) | ५.२५ | २०९.५०० | ८.००० | ३.८२ |
| २२ | मैदा | ०.५० | ३०४२६.००० | २७.००० | ०.०९ |
| २३ | भगर | २.०० | २४७.५०० | १.५०० | ०.६१ |
| २४ | साबुदाणा | १.२५ | २३५००.००० | ७५.००० | ०.३२ |
| २५ | कच्चे पोहे | १.०० | ३४९०.५०० | ३.५०० | ०.१० |
| २६ | भाजके पोहे | ४.०० | २०५०.००० | ४२.००० | २.०५ |
| २७ | डाळ्या | १.२५ | ६४६.५०० | ०.५०० | ०.०८ |
| २८ | चवळी | १.०० | १८१८४.००० | २२.००० | ०.१२ |
| २९ | काबुली चना | १.०० | ३१७३२.५०० | २४.००० | ०.०८ |
| ३० | मसुर | १.०० | ५७६७६.००० | ८०.००० | ०.१४ |

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- उपरोक्तप्रमाणे श्री साई प्रसादालयात प्रत्यक्ष आलेली घट-तुट ही संस्थानने निश्चित केलेल्या प्रमाणापेक्षा कमी प्रमाणात आहे. तरी २०१८-२०१९ या आर्थिक वर्षामध्ये श्री साई प्रसादालयात धान्य-कडधान्य व किराणा माल यामध्ये आलेली घट-तुटीचा अहवालास प्रशासकीय मान्यता मिळणेकामी मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२८४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील श्री साई प्रसादालयातील धान्य, कडधान्य व किराणा मालाचे घट तुटी अहवालाचे अवलोकन करुन त्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साई प्रसादालय)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२८** **माहे एप्रिल-२०१८ ते मार्च-२०१९ अखेर शालेय विद्यार्थ्यांना मोफत बुंदी प्रसाद वाटपाकामी झालेल्या खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव** अधिनियम २००४ मधील तरतूद – महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले विनियम मधील १७ (१) मध्ये भक्तंगणाना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करून दयाव्यात अशी तरतुद केलेले आहे.

व्यवस्थापन समिती ठराव क्रं:- दि.२७/०३/२०१७ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्र.२२४

प्रस्ताविक:- उपरोक्त संदर्भ.क्र.१ ) मा. व्यवस्थापन समितीची दि.२७/०३/२०१७ ची सभेतील निर्णय क्र.२६२ मध्ये सविस्तर चर्चा होऊन,श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल,शिर्डी मधील शालेय विद्यार्थ्यांना संस्थानमार्फत मोफत मध्यान्ह भोजन देणेकामी उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली.

तसेच निर्णय क्र.२६३ मध्ये सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर,शिर्डी मधील शालेय विद्यार्थीनींना संस्थानमार्फत मोफत मध्यान्ह भोजन देणेकामी उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली.

२) संदर्भ क्र.२/३ मध्ये लाडू निर्मिती विभागाकडून दैनंदिन माध्यान्ह भोजन व्यवस्थेत ठरविलेल्या दिवशी विद्यार्थ्यानां बुंदी पाकिटे पुरविणेबाबत.कन्या शाळा व इंग्लिश मिडीयत स्कुल यांनी मंजुरी टिपणी द्वारे कळविले आहे.

३) संदर्भ क्र.४ नुसार " मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०४/२०१४ रोजीचे सभेतील विषय नं.०८ निर्णय क्र.५६४ अन्वये, शालेय विद्यार्थ्यानां वाटप केलेला बुंदी प्रसाद खर्चाची मासिक अहवाल मा.कार्यकारी अधिकारी सो.यांची मान्यतेसाठी सादर करणेत यावा व आर्थिक वर्षाचे शेवटी एकत्रित अहवाल मा.व्यवस्थापन समितीसमोर नोंद घेणेकामी सादर करणेत यावा असा निर्णय झालेला आहे."

लाडु प्रसाद निर्मीती विभागामार्फत बुंदीप्रसाद वाटपासाठी झालेल्या खर्चाचा मासिक अहवाल मा.कार्यकारी अधिकारी यांचे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे. मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयात नमुद केले नुसार माहे/एप्रिल २०१८ ते मार्च-२०१९ या आर्थिक वर्षामध्ये शालेय विद्यार्थ्याना देण्यात आलेला बुंदी प्रसादाचा खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे

| अ.नं | महिना | बुंदी प्रसाद पाकिटे संख्या | झालेला खर्च |
|---|---|---|---|
| ०१ | एप्रिल -२०१८ | २००० | १४८२० |
| ०२ | जुन-२०१८ | ११२०० | ९०३८४ |
| ०३ | जुलै-२०१८ | २११०० | १६६६९० |
| ०४ | ऑगस्ट-२०१८ | २९९६८ | २५१७३१ |
| ०५ | सप्टेंबर-२०१८ | १८००० | १५२८२० |
| ०६ | ऑक्टोंबर-२०१८ | १६००० | १३३१२० |
| ०७ | नोव्हेंबर-२०१८ | ६८०० | ५६१०० |
| ०८ | डिसेंबर-२०१८ | १०८०० | ८८०२० |
| ०९ | जानेवारी-२०१९ | ३०६९० | २२३११६ |
| १० | फेब्रुवारी-२०१९ | १४००० | ९९९६० |
| ११ | मार्च-२०१९ | ७९०० | ६५०१७ |
| | **एकुण** | **१६८४५८** | **१३४१७७८** |

संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी अनुसार–आर्थिक बाब

विभागाचा अभिप्राय स्पष्ट मत- माहे/एप्रिल-२०१८ ते मार्च-२०१ आथिक वर्षात १६८४५८ इतके बुंदी प्रसाद पाकीटाचे शालेय विद्यार्थ्यांना वाटप केलेले असुन सदरचे आर्थिक वर्षात त्याकामी आलेला एकुण खर्च रु १३४१७७८/-(अक्षरी रू–तेरा लाख, एक्केचाळीस हजार, सातशे आठयाहत्तर रुपये मात्र ) अन्नदान खाती वर्ग केलेली असुन सदरबाबत नोंद घेणे साठीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२८५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे एप्रिल-२०१८ ते मार्च-२०१९ अखेर शालेय विद्यार्थ्यांना मोफत बुंदी प्रसाद वाटपाकामी झालेल्या खर्चाचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-लाडू निर्मिती विभाग)

---

आयत्या वेळेचा

**विषय नं.२९** **माहे एप्रिल-२०१८ ते मार्च-२०१९ अखेर दर्शन रांगेत साईभक्तांना मोफत बुंदी प्रसाद वाटपाकामी झालेल्या खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव** अधिनियम २००४ मधील तरतुद- महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापित केलेले विनियम मधिल १७ (१) मध्ये भक्तंगणाना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्द करुन दयाव्यात अशी तरतुद केलेली आहे. मा व्यवस्थापन समितीचे दि. २६/०७/२०१३ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्र.५३७ मध्ये दर्शन रांगेतील साईभक्तांना मोफत बुंदी प्रसाद करणे बाबत निर्णय झालेला आहे.

उपरोक्त निर्णयानुसार दि.१५ ऑगस्ट २०१३ पासुन दर्शनरांगेतील साईभक्तांना प्रत्येकी १००ग्रॅमचे एक पाकिट या प्रमाणे लाडु प्रसाद पाकिटांचे वाटप करण्यात येत होते. मा. मुख्य लेखाधिकारी सो.यांनी मोफत लाडु वाटपाचे स्वतंत्र रजिस्टर ठेवावे. प्रत्येक दिवशी तयार केलेली लाडु पाकिटे वाटप केलेली पाकिटे व शिल्लक राहिलेली पाकिटे यांचे विवरण दररोज स्वतंत्र ठेवावे. प्रत्येक महिन्यात वाटप केलेले लाडु प्रसाद पाकिटे व त्यासाठी झालेल्या खर्चाचा रक्कम जमा नावे करणेसाठी प्रत्येक महिन्यात खर्चाचा तक्ता तयार करुन लेखाशाखेकडे पाठविण्यात यावा. प्रत्येक महिन्यात प्रसादरुपी वाटप झालेली लाडु प्रसाद पाकिटे व त्यासाठी एकुण निर्धारीत किंमत याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये नोंद घेणेसाठी विषय ठेवण्यात यावा प्रत्येक महिन्याचे मोफत लाडु पाकिटांचे अहवाल अंतर्गत लेखापरीक्षकां मार्फत तपासुन घेण्यात यावे असे निर्देश दिलेले आहेत.

त्यानुसार मा.मुख्य लेखाधिकारी यांचे उपरोक्त निर्देशाप्रमाणे लाडु प्रसाद निर्मिती विभागामार्फत प्रत्येक महिन्यात बुंदी प्रसाद पाकिटांचे वाटप,शिल्लक पाकिटे,मासिक खर्च,जमा नावे करणेची कार्यवाही करण्यात येत आहे.

१) मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०६/२०१४ रोजीचे सभेतील विषय नं.८ निर्णय क्रं.५६४ अन्वये दर्शनरांगेतील भक्तांना वाटप केलेला मोफत लाडु प्रसाद खर्चाचा मासिक अहवाल मा.कार्यकारी अधिकारी सो.यांचे मान्यतेसाठी सादर करणेत यावा व आथिक वर्षाचे शेवटी एकत्रित अहवाल मा.व्यवस्थापन समितीसमोर नोंद घेणेसाठी सादर करणेत यावा असा निर्णय झालेला आहे.

२) मा.व्यवस्थापन समितीचे दि.३१/८/२०१६ रोजीचे सभेतील विषय नं.२८ निर्णय क्र.६०९ अन्वये दर्शन रांगेत दि.३/९/२०१६ पासुन भक्तांना ५०ग्रॅम वजनाचे एक बुंदी प्रसाद पाकिट वाटप करण्यात यावे असा निर्णय झालेला आहे.

लाडु प्रसाद निर्मिती विभागामार्फत दरमहा बुंदी प्रसाद वाटपासाठी झालेल्या खर्चाचा मासिक अहवाल मा.कार्यकारी अधिकारी यांचे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे. माहे/एप्रिल -२०१८ ते मार्च-२०१९ या आर्थिक वर्षामध्ये मोफत बुंदी प्रसाद वाटपासाठी झालेल्या खर्चाची तपशिल खलील प्रमाणे –

| अ.नं | महिना | बुंदी प्रसाद पाकिटे संख्या | झालेला खर्च |
|---|---|---|---|
| ०१ | एप्रिल-२०१८ | १३९४२०० | १,०३,३१,०२२/- |
| ०२ | मे-२०१८ | १९७४४०० | १,४९,२६,४६४/- |
| ०३ | जुन-२०१८ | १९०९८०० | १,५४,१२,०८६/- |
| ०४ | जुलै-२०१८ | १६५२४०० | १,३०,५३,९६०/- |
| ०५ | ऑगस्ट-२०१८ | १६८७००० | १,४१,७०,८००/- |
| ०६ | सप्टेंबर-२०१८ | १४७५८०० | १,२५,२९,५४२/- |
| ०७ | ऑक्टोबर-२०१८ | १४६७६०० | १,२२,१०,४३२/- |
| ०८ | नोव्हेंबर-२०१८ | १८२७८०० | १,५०,७९,३५०/- |
| ०९ | डिसेंबर-२०१८ | १९७७८०० | १,६१,१९,०७०/- |
| १० | जानेवारी-२०१९ | १९६३८०० | १,४२,७६,८२६/- |
| ११ | फेब्रुवारी-२०१९ | १३०८४०० | ९३,४१,९७६/- |
| १२ | मार्च-२०१९ | १४७८८०० | १,२१,७०,५२४/- |
| - | एकुण | **२०११७८००** | **१५,९६,२२,०५२** |

संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी अनुसार–आर्थिक बाब

विभागाचा अभिप्राय स्पष्ट मत- माहे/एप्रिल-२०१८ ते मार्च-२०१९ आथिक वर्षात वर्षात २०११७८०० इतके बुंदी प्रसाद पाकीटांचे दर्शन रांगेत वाटप केलेले असुन सदरचे आर्थिक वर्षात त्याकामी आलेला एकुण खर्च रु १५,९६,२२,०५२ /-(अक्षरी रू –पंधरा कोटी, शहाण्णव लाख, बावीस हजार बावन्न रुपये मात्र) अन्नदान खाती वर्ग केलेली असुन सदरबाबत नोंद घेणे साठीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२८६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे एप्रिल-२०१८ ते मार्च-२०१९ अखेर दर्शन रांगेत साईभक्तांना मोफत बुंदी प्रसाद वाटपाकामी झालेल्या खर्चाचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-लाडू निर्मिती विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३०** **मंदिर व परिसर आणि साईबाबा भक्तनिवासस्थान येथील संपुर्ण ए.सी.यंत्रणेचे एक वर्ष कालावधीकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकरीता ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव** मंदिर व परिसर, व्दारावती तसेच साईबाबा भक्तनिवासस्थान येथे श्री साईभक्तांच्या सोयीकरीता ए.सी. व फ्रिज बसवून कार्यरत आहेत. सदर यत्रणा सतत कार्यरत असणे आवश्यक आहे. यदा कदाचित यंत्रणा बंद पडल्यास, ती तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक आहे. यासाठी या यंत्रणेमधील काही स्पेअरपार्ट खराब झाल्यास ते तातडीने बदलणे गरजेचे असते. त्याकरीता सदरचे स्पेअरपार्टची खरेदी करावे लागतात. प्रत्येक कंपनीचे स्पेअरपार्ट हे दुस-या कंपनीच्या स्पेअरपार्ट पेक्षा वेगळे असल्याने तसेच सदरचे स्पेअरपार्ट हे जवळपास उपलब्ध होत नसल्याने ते थेट मुंबई, पुणे येथून खरेदी करावे लागतात. त्यामुळे हे स्पेअरपार्ट मिळवून फिटींग करुन यंत्रणा कार्यान्वित होईपर्यत पर्यायाने ए.सी. यंत्रणा काही वेळा बंद ठेवावी लागते अथवा कमी क्षमतेवर कार्यान्वित ठेवावी लागते. सदरचा स्पेअरपार्ट उपलब्ध झाल्यानंतर तो बसवून ए.सी. यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यान्वित केली जाते किंवा एखाद्या वेळी संबंधीत कंपनीचे प्रतिनिधी यांना बोलावून दुरुस्ती करुन घ्यावी लागते. मेकॅनिकल विभागाकडे २ कायम व ६ कंत्राटी ए.सी मेकॅनिक आहेत. कायम कर्मचा-यां पैकी एक कर्मचारी संस्थानचे सर्व ए.सी यंत्रणा दैंनदीन काम सुपरव्हीजनचे काम करतो व उर्वरीत कर्मचा-यांन पैकी एक कर्मचारी साईआश्रम भक्तनिवास येथील VRV ए.सी यंत्रणा ऑपरेटींग करणे, तीन कर्मचारी साईबाबा हॉस्पीटल येथील तीन सेंट्रल ए.सी प्लॅन्ट ऑपरेटींग (३ शिफ्ट मध्ये प्रत्येकी १) काम करतात. दर्शनरांग मधील सेंट्रल ए.सी यंत्रणा दर्शन रांगेतील ५८ नग जम्बो एअर कुलर यांचे देखभाल दुरूस्तीची कामे विभागांर्तगत होत असलेने सदरील कामाकरीता २ कर्मचारी आवश्यक असतात. त्यामुळे इतर कामाकरीता मनुष्यबळ अपुरे असलेने साईभक्तांना देण्यात येणा-या सेवा सुविधांमध्ये व्यत्यय निर्माण होतो. याकरीता प्रत्येक वर्षी तातडीने जागेवरच दुरुस्ती करणेकामी सदर ठिकाणातील संपूर्ण ए.सी. यंत्रणेचे CAMC देण्यात येते. सध्या संस्थानकडे पुढील प्रकारच्या ए.सी. यंत्रणा कार्यरत आहेत :

| अ.नं. | ठिकाण | यंत्रणेचा तशील | संख्या |
|---|---|---|---|
| १. | मंदिर व परिसर | ए.सी. - १ टन | २५ |
| | | ए.सी. - १.५ टन | ४३ |
| | | ए.सी. - २ टन | ६९ |
| | | ए.सी. - ५ टन | ०३ |
| | | बॉटल कुलर आणि फ्रिज | १६ |
| २. | व्दारावती इमारत | ए.सी. - १ टन | ४१ |
| | | ए.सी. - १.५ टन | १४ |
| | | ए.सी. - २ टन | २५ |
| ३. | साईबाबा भक्तनिवास व परिसर | ए.सी. - १ टन - ७ | ०७ |
| | | ए.सी. - १.५ टन | १७ |
| | | ए.सी. - २ टन | ११ |
| | | बॉटल कुलर आणि फ्रिज | ०७ |
| ४. | साई प्रसादालय व्ही.आय.पी. | ए.सी. - १ टन | ०१ |

| | | | |
|---|---|---|---|
| | भोजन हॉल | ए.सी. - १.५ टन | ०५ |
| | | ए.सी. - २ टन | ०९ |
| | | डिप फ्रिज | १० |
| | | कोल्ड स्टोरेज - ५ टन | ०१ |
| | | कोल्ड स्टोरेज - ३ टन | ०१ |
| | | एकूण:- | ३०५ |

उपरोक्तप्रमाणे श्री साई भक्तांकरीता ए.सी. यंत्रणा संस्थानमध्ये कार्यरत आहे. मागील वर्षी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ३०/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४४१ (१४) अन्वये मंदिर व परिसर, व्दारावती आणि साईबाबा भक्तनिवासस्थान येथील संपूर्ण ए.सी. यंत्रणेचे सन २०१९ -२०२० या एक वर्षाचे वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांना दिनांक ०१/०७/२०१८ ते ३०/०६/२०१९ या एक वर्षाचे कालावधीकरीता रुपये - ५,२६,६००/- + GST मात्रचे रकमेस कार्यादेश देण्यात आला आहे. या सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दिनांक ३०/०६/२०१९ रोजी संपत आहे. ए.सी. यंत्रणा व्यवस्थित कार्यरत राहणेकरीता पुढील एक वर्षाकरीता CAMC देणे आवश्यक आहे.

मागील वर्षी समावेश असलेल्या व्दारावती भक्तनिवास इमारतीतील ८० नग ए.सी. माहे एप्रिल मध्ये बायबॅक देवुन त्या ठिकाणी नवीन ए.सी. बसविणेत आलेले असुन त्या ए.सी. ची एक वर्षे वॉरंटी कालावधी असलेने ते वगळता श्री साईबाबा संस्थानमधील मंदिर व परिसर आणि साईबाबा भक्तनिवासस्थान येथील संपूर्ण ए.सी. यंत्रणेचे पुढील एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी मागील वर्षीचे प्राप्त दरानुसार अंदाजे अपेक्षित खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :

| अ.नं. | तपशील | २०१८-२०१९ या वर्षातील कार्यादेशातील दर रुपये (GST वगळुन) | २०१९-२०२० या वर्षातील अपेक्षित खर्च रुपये (मागिल वर्षाचा खर्च + ५%) (GST वगळुन) |
|---|---|---|---|
| ०१ | CAMC of Air Conditioning Units Installed Temple & Campus, Saibaba Bhaktaniwassthan for year 2019 - 2020 | ५,२६,६००/- | ४,१८,७४०/- (मागील वर्षे CAMC कॉन्टॅक्ट रक्कम रू. ५,२६,६००/-वजा व्दारावती येथील ए.सी CAMCकॉन्ट्रॅक्ट रक्कम रू.१,२७,८००/-) + ५% वाढ करून |

उपरोक्तप्रमाणे मदिर व परिसर आणि साईबाबा भक्तनिवासस्थान येथील संपूर्ण ए.सी. यंत्रणेचे सन २०१९-२०२० या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी अंदाजे रक्कम रुपये ४,१८,७४०/- (अक्षरी रक्कम रुपये - चार लाख, आठरा हजार, सातशे चाळीस) + GST मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरील खर्च इकडील विभागाचे अंदाजपत्रका - मध्ये तरतूद केलेल्या '*मशीनरी दुरुस्ती व देखाभाल खर्च*' या शिर्षाखालील रकमेतून करता येईल व महाराष्ट्र शासनाचे www//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर जाहीरात नोटीस अपलोड करुन कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवून CAMC देता येईल. या कार्यवाहीस मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागेल.

प्रस्ताव:- तरी उपरोक्तप्रमाणे मदिर व परिसर आणि साईबाबा भक्तनिवासस्थान येथील संपूर्ण ए.सी. यंत्रणेचे एक वर्षाचे कालावधी करीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता घेणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२८७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर व परिसर आणि साईबाबा भक्तनिवासस्थान येथील संपुर्ण ए.सी.यंत्रणेचे सन २०१९-२० या एक वर्ष कालावधीकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.४,१८,७४०/-+GST चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.३१ **श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथील रुम्स मधील लोखंडी वस्तुंचे रंगकाम करणेबाबत.**

प्रस्ताव अधिनियम मधील तरतूद 2004: कलम (2)14(घ) भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरूस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे.

प्रस्ताविक- सन १९९४ पासुन श्री साईबाबा भक्तनिवास्थान हे भक्तनिवासी संकुल साई भक्तांचे सेवेत आहेत. सदर इमारतीमध्ये ५२७ खोल्या असुन ४९५ खोल्या साईभक्तांच्या प्रत्यक्ष वापरात आहे. सध्या सदर इमारतीतील खोल्याचे नुतनीकरणाचे काम चालू आहे.

सदरचे ४९५ खोल्यामधील खालील तपशिलात नमुद लोखंडी वस्तुचा रंग वापराने खराब झालेल्या असलेने त्यांना नवीन रंगकाम करणेस संदर्भीय क्र. १ व २ चे नुसार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांची मान्यता मिळालेली आहे.

| अ.नं. | तपशील | नग |
|---|---|---|
| ०१ | कॉट | १७२७ |
| ०२ | रॅक | ८० |
| ०३ | टिपॉय प्रेम | ४८२ |
| ०४ | आरसे फ्रेम | ४८९ |

मागणी- उपरोक्त तपशीलात नमुद वस्तुंची संख्या विचारात घेता सदरचे काम ( स्प्रेपेटींग ) बाहेरील ठेकेदार यांचेकडुन करुन घ्यावे लागणार आहे. याकामी येणा-या अपेक्षित खर्चाचे अंदाजाकरीता तत्सम प्रकारची कामाचा अनुभव असलेल्या ठेकदार यांचेकडुन दरपत्रक घेतले असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झालेली आहेत.

| Sr.No. | Works Detals | Item Discription | Nos | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Painting works of Approved Make to old surfaces, Work procedure - Scrapping dust & loose Material from external surface by wire brush & thinner, One coat primars and two coat color. | 1) Cot | 1727 | 500/- | 8,63,500/- |
| | | 2) Rack | 80 | 700/- | 56,000/- |
| | | 3) T-Poy | 482 | 250/- | 1,20,500/- |
| | | 4) Mirror Frame | 489 | 150/- | 73,350/- |
| Total Amount Rs. | | | | | 11,13,350/- |

(अक्षरी रक्कम रूपये - अकरा लाख, तेरा हजार तीनशे पंन्नास मात्र)

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा भक्तनिवास्थान मधील सर्व लोखंडी वस्तूचे रंगकाम ( स्प्रेपेटींग ) करुन घेणेकामी रुककम रुपये- ११,१३,३५०/- ( अक्षरी रक्कम रुपये - अकरा लाख, तेरा हजार, तीनशे, पन्नास ) मात्र खर्च अपेक्षित असुन, सदरचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता मिळालेनंतर ई-निविदा बोलावून, करावे लागेल.

विभागाचा अभिप्राय- श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीतील खोल्यांमधील लोखंडी कॉट,रॅक,टिपॉय व आरसे फ्रेम रंग सततच्या वापराने खराब झालेले आहेत. सध्या खोल्याचे नुतणीकरन काम चालू असलेने सदरचे लोखडी वस्तुनाही कलर काम करणे गरजेचे आहे. याकामी अंदाजे रक्कम रु. ११,१३,३५०/- मात्र खर्च अपेक्षित असुन, सदर कामी मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेवुन, महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.com या व संस्थानचे संकेत स्थळावर निविदा जाहीरात अपलोड करुन ई-निविदा मागविता येतील.

प्रस्ताव:- श्री साईबाबा भक्तनिवास्थान खोल्यामधील लोखंडी रॅक-१७२७ नग , लोखंडी रॅक ८० नग , लोखंडी टिपॉय-४८२ नग व आरसे फेंम ४८९ नग यांना नवीन कलर देणेकामी ( स्प्रेपेटींग ) येण-या अंदाजे रक्कम रुपये - ११,१३,३५०/- ( अक्षरी रक्कम रुपये- अकरा लाख, तेरा हजार, तीनशे, पन्नास ) मात्रचे खर्चास व याकामी ई-निविदा बोलाविणेचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२८८ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवास्थान खोल्यांमधील लोखंडी रॅक, टिपॉय व आरसे फ्रेम यांना रंगकाम करणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.११,१३,३५०/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.३२ श्री साईबाबा संस्थानचे सोलर हॉट वॉटर यंत्रणेचे एक वर्षाकरीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट (AMC) देणेकामी प्राप्त ई-निविदेतील निम्नतम दरधारकाशी चर्चा/वाटाघाटी करणेबाबत.

प्रस्ताव

| | | |
|---|---|---|
| १. | कामाचे नाव | श्री साईबाबा संस्थानचे सोलर हॉट वॉटर यंत्रणेचे एक वर्ष करीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट(AMC)देणे |
| २ | प्रशासकिय मान्यता | मा. व्यवस्थापन समिती दिनांक २०.११.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं ७०४ |
| ३ | अंदाजे खर्च | रु. ९,७१,८८०/- |
| ४. | प्रस्तावाची थोडक्यात माहीती | श्री साईबाबा संस्थानचे साईआश्रम भक्तनिवासस्थान, साईधर्मशाळा, साईउद्यान, साईप्रसाद निवासस्थान गेस्ट हाऊस, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, द्वारावती भक्तनिवासस्थान, तसेच श्री साईबाबा हॉस्पीटल व साईनाथ रुगणालय येथील सोलर हॉट वॉटर यंत्रणेचे एक वर्ष करीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट(AMC)देणेकामी विहित पद्धतीने ई निविदा प्रक्रिया राबवून कॉन्ट्रक्ट देणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. ९,७१,८८०/- मात्रचे खर्चास मा. व्यवस्थापन समिती दिनांक २०.११.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं ७०४ नुसार मान्यता देणेत आलेली आहे. |
| ५. | ई निविदा तपशिल | ई निविदा नोटीस महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.inया वेबसाईटवर अपलोड करण्यात आली होती. ई निविदा अपलोड करण्याची मुदत दिनांक ११/०१/२०१९ ते २१/०१/२०१९ ई निविदा प्रसिद्ध करण्यात आलेली होती सदर कालावधीमध्ये एकही निविदा प्राप्त न झालेमुळे दिनांक ५.२.२०१९ पर्यंत दोन वेळेस मुदतवाढ देऊनही एकच निविदा प्राप्त झाली होती. त्यामुळे सदर ई निविदा रद्द करुन दिनांक १५.२.२०१९ ते २५.२.२०१९ या कालावधीकरीता फेर ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आलेली होती. सदर कालावधीमध्ये दोनच ई निविदा प्राप्त झालेने दिनांक ५.३.२०१९ पर्यत मुदतवाढ देणेत आलेली होती. |
| | I. कामाची मुदत | ३६५ दिवस |
| | II. तांत्रिक निविदा उघडणेची दिनांक व वेळ | दिनांक ३०.५.२०१९ वेळ सकाळी ११.०० वा. |
| | III. प्राप्त ई निविदा | ०३ |
| | IV. प्राप्त ई निविदा धारकांनी सर्व आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन जमा केले आहेत का ? | Senergy Corporation, Nashik यांनी आवश्यक कागदपत्राची पुर्तता केलेली नाही. त्यामुळे ते अपात्र करण्यात आहे. |
| | V. सर्व निविदा धारकांनी EMD भरलेले कागदपत्र जमा केले आहेत का ? | होय. |
| | VI. मागील वर्षाकरीता निम्नत्तम दर रूपये | रू. ९,२५,६००/- |
| | VII. मागील निम्नत्तम दरधारक | मे. साई एजन्सी, शिर्डी |

ई-निविदा प्रक्रियातील तांत्रिक दुष्ट्या पात्र निविदाधारकांनी दिलेल्या दराचा तपशिल

| अ.नं. | निविदाधारकांचे नाव | निविदेतील प्राप्त दर रक्कम रू. | शेरा |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. बिपीन इंजिनिअरींग प्रा. लि., पुणे | १२,४९,९७०.०० | L2 |
| २. | **मे. साई एजन्सीज, शिर्डी** | **१०,१९,२५०.००** | L1 |

उपरोक्त तपशिलानुसार

श्री साईबाबा संस्थानचे साईआश्रम भक्तनिवासस्थान, साईधर्मशाळा, साईउद्यान, साईप्रसाद निवासस्थान गेस्ट हाऊस, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, द्वारावती भक्तनिवासस्थान, तसेच श्री साईबाबा हॉस्पीटल व साईनाथ रुग्णालय येथील सोलर हॉट वॉटर यंत्रणेचे एक वर्ष करीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट(AMC)देणेकामी मे. साई एजन्सीज, शिर्डी यांचे दर रक्कम रूपये - १०,१९,२५०/- (अक्षरी रक्कम रूपये – दहा लाख एकोणावीस हजार दोनशे पंन्नास) मात्र निम्नत्तम असुन त्यांचेशी प्राप्त दराबाबत चर्चा व वाटाघाटी करून पुढील कार्यवाही करणेकरीता सदरचा विषय मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२८९ **प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे. साई एजन्सीज, शिर्डी हे आजचे व्यवस्थापन समितीसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. समितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी रक्कम रु.१०,००,०००/-मात्र दर देऊ केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचे सोलर हॉट वॉटर यंत्रणेचे एक वर्षाकरीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट (AMC) देणेकामी निम्नतम निविदाधारक मे. साई एजन्सीज, शिर्डी यांनी चर्चेअंती देऊ केलेले रक्कम रु. १०,००,०००/-मात्र अंतिम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.३३ **श्री साई प्रसादालय व श्री साईआश्रम भक्तनिवास येथील असणाऱ्या साईटेक प्रोजेक्टकरीता बसविण्यात आलेल्या ए.सी.यंत्रणेचे सन २०१९-२० या एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकरीता प्राप्त ई-निविदेतील निम्नतम दरधारकाशी चर्चा/वाटाघाटी करणेबाबत.**

**प्रस्ताव**

| | | |
|---|---|---|
| ०१ | कामाचे नांव | श्री साई प्रसादालय व साईआश्रम भक्त निवास येथील असणा-या साईटेक प्राजेक्टकरीता बसविण्यात आलेल्या ए.सी यंत्रणेचे सन २०१९ - २०२० या एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणे... |
| ०२ | प्रशासकीय मान्यता | दिनांक २९ जानेवारी २०१९ रोजीची टिपणी. |
| ०३ | अंदाजे खर्च | रु. ३,६५,७१५/- |
| ०४ | प्रस्तावाची थोडक्यात माहिती. | श्री साईप्रसादालय व साईआश्रम भक्तनिवास येथील असणा-या साईटेक प्राजेक्टकरीता बसविण्यात आलेल्या ए.सी यंत्रणेचे एक वर्षा करीता वार्षिक कॉम्प्रसिव्ह कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी विविध प्रध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी येणा-या रक्कम रूपये - ३,६५,७५१ मात्र चे अपेक्षित खर्चास दिनांक २९.०१.२०१९ रोजीचे मंजुर टिपणी अन्वये मान्यता घेणेत आलेली आहे. |
| ०५ | ई-निविदा तपशिल - | ई निविदा नोटीस महाराष्ट्र शासनाचया www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर अपलोड करण्यात आली होती. ई निविदा अपलोड करण्याची मुदत दि. १५.०२.२०१९ ते दि. २५.२.२०१९ पर्यत देण्यात आली होती. मात्र मुदतीत दोनच निविदा प्राप्त झालेल्या असल्याने दिनांक २६.०२.२०१९ ते दि. १२.०३.२०१९ पर्यंत मुदतवाढ देणेत आली. |
| | I. कामाची मुदत | ३६५ दिवस |
| | II. तांत्रिक निविदा उघडण्याची दिनांक व वेळा | दिनांक ३०/०५/२०१९ सकाळी ११ :०० वाजता |
| | III. प्राप्त ई-निविदा | ०३ |
| | IV. प्राप्त ई-निविदा धारकांनी सर्व आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन जमा केले आहेत का ? | होय |
| | V. सर्व निविदाधारकांनी EMD भरलेले | होय |

| | | |
|---|---|---|
| | कागदपत्रे जमा केले आहेत का ? | |
| VI. | मागील वर्षाकरीता निम्नत्तम दर रूपये | रू. ३,४८,३००/- |
| VII. | मागील निम्नत्तम दरधारक | मे. कैलास रेफ्रिजरेशन, मुंबई |

ई-निविदा प्रक्रियातील तांत्रिक दृष्टया पात्र निविदाधारकांनी दिलेल्या दराचा तपशील.

| अ.नं. | निविदाधारकांचे नाव | ई-निविदेतील प्राप्त दर रक्कम रु. | शेरा |
|---|---|---|---|
| १. | मे. कैलास रेफ्रिजरेशन, मुंबई | ३,६३,०००/- | L 3 |
| २. | मे. चित्रा ईलेक्ट्रीकल्स ॲण्ड इंजि.,जळगाव | ३,४०,८००/- | L 2 |
| **३.** | **मे. हेरंब एंटर प्राईजेस, जळगाव** | **३,२७,०००/-** | L1 |

उपरोक्त तपशिलानुसार,

श्री साई प्रसादालय व साईआश्रम भक्त निवास येथील असणा-या साईटेक प्राजेक्टकरीता बसविण्यात आलेल्या ए.सी यंत्रणेचे सन २०१९ - २०२० या एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी मे. हेरंब एंटर प्राईजेस, जळगाव यांचे दर रक्कम रूपये - ३,२७,०००/- (अक्षरी रक्कम रूपये - तीन लाख, सत्तावीस हजार) मात्र निम्नत्तम असुन त्यांचेशी प्राप्त दराबाबत चर्चा/ वाटाघाटी करून पुढील कार्यवाही करणेकरीता सदरचा विषय मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२९० **प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे. हेरंब एंटर प्राईजेस, जळगाव यांनी ई-निविदेतील नमुद दर हे अंतिम असल्याचे ई-मेलव्दारे कळविले आहे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालय व श्री साईआश्रम भक्तनिवास येथील असणाऱ्या साईटेक प्रोजेक्टकरीता बसविण्यात आलेल्या ए.सी.यंत्रणेचे सन २०१९-२० या एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकामी निम्नतम निविदाधारक मे. हेरंब एंटर प्राईजेस, जळगाव यांचे निम्नतम दर रक्कम रु.३,२७,०००/- मात्र स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३४** **शिर्डी साईगृह (सैनिक आरामगृह) यांचेकडून संस्थानमार्फत पाणी पुरवठा होणेसाठी केलेल्या मागणीबाबत.**

**प्रस्ताव** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-

| अ.नं. | कलम/ तरतुद क्र. | कलम/ तरतुदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्र. | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील. |
| ०२ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | २ (झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील. |
| ०३ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | २ (ण) | मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल |
| ०४ | १७ | समितीची | ६ | या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | कर्तव्ये व अधिकार | | अधिनियामाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील. |

प्रस्तावना:- श्रीक्षेत्र शिर्डी येथे श्रीसाईबाबांचे दर्शनासाठी दिवसेंदिवस साईभक्तांचे संख्येत मोठ्या प्रमाणवर वाढ होत आहे. संस्थानमार्फत साईभक्तांचे सोयी-सुविधेसाठी निवासव्यवस्था, भोजनव्यवस्था माफक दरात उपलब्ध करुन देण्यात येत आहे. साईभक्तांचे पिण्याचे व निवासव्यवस्थेकरिता बांधण्यात आलेल्या इमारतींकरिता पाणी पुरवठा करणेकामी शिर्डी संस्थान, कनकुरी व पिंपळवाडी या संयुक्त पाणी पुरवठा योजना सन-१९९५ पासून कार्यान्वित करण्यात आलेली आहे. सदर योजने अंतर्गत मौजे कनकुरी, ता.राहाता या ठिकाणी पाणी साठविणेसाठी तीन साठवण तलावांची निर्मिती करण्यात आली असून त्यांची क्षमता ३११ एम.एल. इतकी आहे. सदरचे साठवण तलावात नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडुन गोदावरी/ दारणा नदी, गोदावरी उजवा तट कालवा याद्वारे शासन मंजुरीनुसार पाणी पुरवठा आवर्तन (रोटेशन) देण्यात येत आहे. याबाबत नाशिक पाट्बंधारे विभा, नाशिक यांचेकडून ५३.३२०५ एम.सी.एफ.टी वार्षिक पाणी साठा मंजुर आहे.

सदरहू योजनेतून मौजे कनकुरी, पिंपळवाडी या गावांसह संस्थान परिसर, श्रीसाईप्रसादालय विविध भक्तनिवासस्थाने, शैक्षणिक संकुले यासह कर्मचारी वसाहती, साईआश्रम भक्तनिवास व साईआश्रम धर्मशाळा तसेच ०३ कर्मचारी हौसिंग सोसायटी, शिर्डी पोलीस स्टेशन, शासकीय विश्रामगृह, कर्मचारीवसाहत सिंचनशाखा शिर्डी व द्वारकामाई वृद्धाश्रम, शिर्डी या ठिकाणी पाणी पुरवठा करण्यात येत आहे. सद्यस्थिती संस्थानचा दैनंदिन पाणी वापर हा अंदाजे सरासरी ३५ ते ४० लाख लिटर्स इतका झाला आहे. गर्दीचे कालावधीत सदरचा पाणी वापर हा यापेक्षाही जास्त होत आहे. मागील दोन-तीन वर्षांपासुन पर्जन्यमान कमी होत असल्याने, संस्थानकडून पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे.

प्रस्ताव:- शिर्डीचे शासकीय विश्रामगृहाचे मागील बाजूस मेकॅनाईज्ड इन्फैन्ट्री रेजीमेन्ट केंद्र यांचे "साईगृह" (सैनिक आरामगृह) बांधण्यात आलेले आहे. याठिकाणी उच्च पदाधिकारी आजी व माजी सैनिकांना व त्यांचे कुटुंबीय यांचे शिर्डी येथे दर्शनास आल्यानंतर त्यांचे आरामाची व राहण्याची व्यवस्था त्यांचेमार्फत करणेत येत आहे.

कर्नल एल.पी.शर्मा, व्हाईस चेअरमन, मेकॅनाईज्ड इन्फैन्ट्री रेजीमेन्ट केंद्र यांचे दि.१०/०४/२०१९ रोजीचे व कमांडिंग ऑफिसर मेकॅनाईज्ड इन्फैन्ट्री रेजीमेन्ट केंद्र यांचे दि.२९/०५/२०१९ रोजीचे पत्र प्राप्त झालेले आहे. सदरहु दि.२९/०५/२०१९ रोजीचे पत्रात नमूद केल्यानुसार शिर्डी येथील "साईगृह"(सैनिक आरामगृह) या ठिकाणी दैनंदिन अंदाजे ५,०००-७,००० लिटर्स पाण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी नव्याने १५ रुम बांधण्यात आल्यामुळे दररोज १२ हजार ते १५ हजार लिटर पाण्याची आवश्यकता भासते. सध्या "साईगृह" (सैनिक आरामगृह) येथे पाण्याची सोय व्हावी यासाठी ०४ बोअरवेल घेणेत आलेले असून त्यापैकी ०३ बोअरवेल कोरडे पडलेले असून ०१ बोअरवेल उन्हाळा असलेने त्यातुन कमी प्रमाणात पाणी उपलब्ध होत आहे. याकरीता निमगांव-को-हाळे याठिकाणाहुन टॅन्करव्दारे पाणी उपलब्ध करुन घेणेत येत आहे. टॅन्करव्दारे उपलब्ध होणारे पाणी पिण्यायोग्य नसलेने याठिकाणी येणारे उच्च पदाधिकारी आजी व माजी सैनिकांना व त्यांचे कुटुंबीयांची तसेच साईभक्तांची पाण्याची मोठया प्रमाणावर गैरसोय होत आहे. याकरीता संस्थानकडुन "साईगृह" (सैनिक आरामगृह) याठिकाणी पाणी उपलब्ध करुन देणेबाबत कळविणेत आलेले आहे.

विभागाचा अभिप्राय:- याबाबत यापुर्वी मेकॅनाईज्ड इन्फैन्ट्री रेजीमेन्ट केंद्र यांचे "साईगृह" (सैनिक आरामगृह) यांनी त्यांचे दि.१९/०२/२०१९ रोजीचे पत्रान्वये अशाच पद्धतीची नळ कनेक्शन मिळणेबाबत विनंती केली होती. परंतु, त्यावर पाणी पुरवठा विभागाकडील दि.२३/०२/२०१९ रोजीचे मंजूर टिपणीनुसार पाणी टंचाईचा असल्याने जा.क्र.एसएसएसटी/पाणीपुरवठा/५८१२/२०१९, दि.०२/०३/२०१९ रोजीचे पत्रान्वये सध्या पाणी टंचाई असल्याने सध्याचे कार्यान्वित फिल्टर प्लॅन्टची क्षमता कमी पडत असल्याने पाणी देणेस असमर्थता दर्शविणेत आली होती. आता पुन्हा शिर्डी येथे मेकॅनाईज्ड इन्फैन्ट्री रेजीमेन्ट केंद्र यांचे "साईगृह" (सैनिक आरामगृह) यांनी पुन्हा पाण्याचे कनेक्शन मिळणेबाबत दि.१०/०४/२०१९ व दि.२९/०५/२०१९ रोजीचे पत्रान्वये विनंती केली आहे. श्रीसाईबाबा संस्थान संयुक्त पाणी पुरवठा योजना टप्पा क्र.१ चे कामास सुरुवात करणेत आलेली असुन आगामी कालावधीत संस्थानचे नविन फिल्टर प्लॅन्टची क्षमता वाढणार आहे.

साईगृह येथे येणारे व्यक्ती हे सैनिक असून, साईभक्त आहेत. हे श्रीसाईबाबांचे दर्शनासाठी येणा-या व्यक्तीच आहेत. त्यामुळे संस्थानमार्फत याठिकाणी पाणी टंचाई दुर झालेनंतर पाण्याचे कनेक्शन देता येईल, असे वाटते. त्याचप्रमाणे यापुर्वी देखील विविध संस्था व शासकीय इमारती यांना संस्थानमार्फत मीटरनुसार पाण्याची

सुविधा करुन देण्यात आली असून त्यांचेकडुन मंजूर दराप्रमाणे पाणीपट्टी बील देऊन त्याचा आकार स्विकारणेत येत आहे. त्याचप्रमाणे यांनाही दैनंदिन १" पाईपने किमान अर्धा ते पाऊन तास (पाणी उपलब्धतेनुसार) पाणी पुरवठा करणेस नवीन मिटर बसवुन अटी शर्तीसह करारनामा करुन नियमाप्रमाणे पाणी बील आकारणी करता येईल, असे नम्र मत आहे.

याबाबत दि.३१/०५/२०१९ रोजीचे टिपणीन्वये मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने "साईगृह" (सैनिक आरामगृह) यांना १" पाईपने पाणी कनेक्शन उपलब्ध करुन देण्यात आलेले असून यास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२९१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी "साईगृह" (सैनिक आरामगृह) यांना १" पाईपने मिटर बसवून व शासकीय दराप्रमाणे पाणीपट्टी आकारुन पाणी कनेक्शन उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच संस्थानकडे पाणी उपलब्ध असेल तरच पाणी पुरवठा केला जाईल या अटी-शर्तीसह करारनामा करुन घेण्यात यावा,असे ठरले.**

**(कार्यवाही- पाणी पुरवठा विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३५** **मालमत्ता विभागाकरीता कंत्राटी सल्लागार नियुक्ती बाबत.**

**प्रस्ताव** अधिनियमातील तरतूद – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ चे कलम १७(झ) सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज योग्य प्रकारे व्यवस्थापन,देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील.

प्रस्तावना- संस्थानकडील चल-अचल मालमत्तेसाठी स्वतंत्र मालमत्ता विभाग (Estate Department) निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव विधी विभागामार्फत मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादर करण्यात आलेला होता. त्यावर मा.त्रिसदस्य समितीचे दि.०६/११/२०१४ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्रं.९८६ नुसार व आस्थापना विभागाकडील दि.१९/११/२०१४ रोजीच्या आदेशान्वये संस्थान आस्थापनेवर मालमत्ता विभाग नव्याने कार्यान्वित करण्यात आलेला आहे.

मालमत्ता विभागामार्फत खालीलप्रमाणे कामकाज केले जाते.

१) संस्थानचे मिळकत रजिस्टर अद्ययावत ठेवणे.

२) संस्थानसाठी आरक्षित असलेल्या जमीनी खरेदी करणेकामी तसेच आरक्षणा व्यतिरिक्त खाजगी जमीनी खरेदी करणेकामी संस्थानकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करणे,जागेची पाहणी करणे व उचित कार्यवाही करणे.

३) देणगी स्वरुपात मिळकती स्विकारणेबाबतच्या प्रस्तावांची छाननी करणे,मिळकतीची पाहणी करणे व उचित कार्यवाही करणे.

४) खरेदी केलेल्या मिळकतींच्या व दान स्वरुपात प्राप्त झालेल्या मिळकतींच्या नोंदी महसुल दप्तरी अद्ययावत करुन घेणे.

५) खरेदी घेतलेल्या व दान स्विकारलेल्या मिळकतींची शासकीय मोजणी करुन हद्दी निशाण्या ठरवून घेणे.

६) संस्थान मालकीच्या कृषीक जमीनी आवश्यकतेनुसार अकृषीक करणेकामीचे प्रस्ताव तयार करणे व सक्षम अधिकारी यांचेकडेस सादर करुन उचित कार्यवाही करणे.

७) मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडील भूसंपादनाबाबतचे प्रकरणी समन्वय साधून उचित कार्यवाही करणे.

८) विविध न्यायालयात सुरु असलेल्या केसेसबाबत आवश्यक ती कार्यवाही करणे.

९) संस्थान मालकीच्या भाडेतत्वावर दिलेल्या अथवा द्यावयाच्या मिळकतींचे करारनामे करुन घेणे.

१०) संस्थानचे मालमत्तेबाबतचे शासकीय कर,नगरपंचायत कर व ग्रामपंचायत कर इ.भरणेबाबत कार्यवाही करणे.

११) संस्थानने भाडेपट्टयाने घेतलेल्या मिळकतींचे भाडे व स्थानिक कर भरणा करणे.

१२) संस्थानच्चा मिळकती भाडेकराराने देणेकामी प्रस्ताव सादर करणे,भाडेकराराने दिलेल्या मिळकतींच्या वापराची मुदत वाढवून देणे व भाडेकरारनामे करुन घेणे.

१३) मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे पालखी थांब्यासाठी जागांचा शोध घेणे,जागा उपलब्ध करणे,जागेची निश्चिती करणे व पुढील उचित कार्यवाही करणे.

१४) सर्व राज्यातील मुख्य शहरात संस्थानचे माहीती केंद्र उभारणेकामी जागा उपलब्ध करणे.

१५) वर्षातील उत्वसांचे नियोजनासाठी आवश्यकतेप्रमाणे जमीनी अधिग्रहीत करणेबाबतची कार्यवाही करणे.

१६) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडील जमीनी कायमस्वरुपी खरेदी करणेकामीचे प्रस्ताव व तद्नुषंगाने कार्यवाही करणे.

१७) संस्थानचे स्थावर मालमत्तेबाबत योग्य नियोजन करणे,देखभाल करणे,वेळोवेळी मिळकतींना भेटी देणे व त्याबाबत असलेल्या अडचणी दूर करणे,वरिष्ठांना अहवाल सादर करणे.

यापूर्वी संस्थानचे मिळकतींचे कामकाज संदर्भात व भुसंपादन संदर्भातील कामकाजासाठी संस्थानमध्ये दोन सेवानिवृत्त नायब तहसिलदार कंत्राटी पध्दतीने मानधन तत्वावर कार्यरत होते. तथापि श्रीरामपुर महसुल उपविभागाची विभागणी होवून शिर्डी महसुल विभाग नव्याने निर्माण झाल्याने श्रीरामपुर विभागातील संस्थानचा भुसंपादन विभाग शिर्डी विभागाकडे वर्ग करण्यात आला. त्यात सेवानिवृत्त नायब तहसिलदार श्री.वाव्हळ हे कार्यरत होते. श्रीरामपुर -शिर्डी दैनंदिन प्रवासामुळे व वयोमनामुळे श्री.वाव्हळ यांनी काम सोडून दिले. तसेच पूर्वी मालमत्ता विभाग व बांधकाम विभाग एकत्रित असलेने त्यात कंत्राटी सल्लागार म्हणून सेवानिवृत्त नायब तहसिलदार श्री.रणशुर हे कार्यरत होते. मात्र वयोमानानुसार व आजारपणामुळे श्री.रणशुर यांनी मे २०१४ पासून काम सोडून दिले.

तदनंतर नोव्हेंबर २०१४ मध्ये मालमत्ता विभाग नव्याने निर्माण झाल्याने विधी विभागाकडील मालमत्ता विभागाचे संबंधातील कामकाज व बांधकाम विभागाकडील मालमत्ता विभागाचे संबंधातील कामकाज मालमत्ता विभागाकडे वर्ग

करण्यात आले. मालमत्ता विभागाची कामाची विविधता व कामाची व्याप्ती विचारात घेवून सेवानिवृत्त नायब तहसिलदार श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे यांची कंत्राटदारामार्फत मानधन तत्वावर कंत्राटी सल्लागार म्हणून दि.१९/१०/२०१५ पासून नियुक्ती करण्यात आलेली आहे. तेंव्हापासून मालमत्ता विभागामार्फत खालीलप्रमाणे कामे करण्यात आलेली आहेत.

१) मौजे निमगाव-को-हाळे येथील संस्थान मालकीच्या अकृषिक बखळ जागेवरील सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या दोन वर्षाचे कालावधीसाठी ग्रामपंचायतीने आकारलेली कराची रक्कम प्रति वर्ष रु.१२,७८,०००/- प्रमाणे दोन वर्षांची रक्कम रु.२५,५६,०००/- इतकी ग्रामपंचायतीकडून माफ करुन घेतली असून उर्वरित सन २०१५-१६,२०१६-१७ व २०१७-१८ या तीन वर्षांसाठी ग्रामपंचायत कराची प्रतिवर्ष रक्कम रु.१२,७८,०००/- ऐवजी प्रतिवर्ष रक्कम रु.६,३९,०००/- इतकी किमान दराने आकारणी करणेकामी ग्रामपंचायतीस भाग पाडलेले आहे.

२) मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१७१/१२ मधील नियोजित बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम संस्थानचे निधीतून करणे व त्यापैकी काही क्षेत्राचा वापर संस्थानसाठी भाडेपट्टयाने करणेविषयी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचेशी करावयाचे करारनाम्याचे प्रकरणी व त्याचे मुद्रांक शुल्क मा.मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयाकडून निश्चित करुन घेणेकामीचे प्रकरणी कामकाज केलेले आहे.

३) मौजे घारी,ता.कोपरगाव येथील संस्थान मिळकतीच्या भूसंपादनाची नुकसान भरपाईची रक्कम रु.२,८४,७६५/- इतकी सन २००४ पासून शासनाकडे प्रलंबित आहे. ती संस्थानला मिळणेकामीचे प्रकरण करुन सदरची रक्कम मिळणेकामी दिवाणी न्यायालयात प्रकरण करणेत आलेले आहे.

४) मौजे निघोज येथील श्री.काशिनाथ गोविंद पाटील,रा.कोपरी यांनी त्यांचे मालकीच्या साई पालखी निवारा येथील शासकीय मुल्यांकन रक्कम रु.३२,२७,१३,५००/- इतक्या किंमतीच्या इमारत बी व डी दान केल्या संबंधातील कागदपत्र प्राप्त करुन तपासून मा.मुद्रांक जिल्हाधिकारी,अहमदनगर यांचेकडून मुल्यांकन निश्चित करुन घेवून नोंदणीकृत दानपत्र करुन घेणेबाबतची

कार्यवाही पूर्ण केली असून त्याप्रमाणे संस्थानच्या नावाने महसुल दप्तरी व ग्रामपंचायत दप्तरी नोंदी करुन घेतलेल्या आहेत. तसेच इमारत डी चे अपूर्ण असलेले काम पूर्ण करुन घेणेकामी पाठपुरावा करणेत येत आहे.

५) शिर्डी येथील द्वारावती भक्तनिवास चे सर्वे नं.१४८/१,१४८/२/१,१४८/२/२,१४८/२/३ चा अकृषिक सारा माफी अनुज्ञेय असताना कामगार तलाठी यांनी सन २०१६-१७ या वर्षासाठी सदर क्षेत्राचा अकृषिक सारा मागणी नोटीस दिलेली होती. सदर बाब कामगार तलाठी,शिर्डी यांचे निदर्शनास आणून देवून त्यासाठीची अकृषिक सारा मागणी नोटीस रद्द करुन घेतली.

६) मौजे पांढुर्ली,ता.सिन्नर येथील संस्थान मालकीची जमीन गट नं.१९ क्षेत्र ०.४९ आर या अकृषिक जमीनीचा आकार महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ११७(३) चे तरतुदीनुसार माफ होणेबाबतचे प्रकरण तयार करुन मा.उपविभागीय अधिकारी,निफाड भाग,निफाड यांचेकडेस सादर करण्यात आले आहे व पाठपुरावा करीत आहे.

७) संस्थानसाठी आरक्षित असलेल्या जमीनींपैकी काही जमीन खरेदी करणेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करुन खरेदी करणेकामीची कार्यवाही पूर्ण केलेली आहे.

८) खरेदी केलेल्या जमीनींची शासकीय मोजणी करुन घेवून महसुल दप्तरी रेकॉर्ड ऑफ राईटला संस्थानच्या नावाने नोंदी करुन घेतलेल्या आहेत.

९) मौजे निमगाव-को-हाळे येथील शेती महामंडळाचे जमीनीपैकी भुसंपादनाद्वारे संस्थानला प्राप्त झालेल्या स.नं.८७ व ८८ मधील क्षेत्रात प्रस्तावित लाडू इमारत व वाणिज्य प्रयोजनासाठी बांधकाम परवानगी मिळणेकामीचा प्रस्ताव मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडेस सादर करणेत आला असून परवानगीसाठी पाठपुरावा करणेत येत आहे.

१०) मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडील संस्थानसाठी प्रलंबित असलेली भूसंपादन प्रकरणे तातडीने निर्गत करणेकामी समन्वय साधून पाठपुरावा केलेला आहे. त्यात आरक्षण क्रं.३४ ची भुसंपादन कार्यवाही यापूर्वीच दि.२९/०४/२०१५ रोजी पूर्ण झालेली होती. मात्र भुसंपादित क्षेत्राचा ताबा संस्थानला मिळणेस ऊशिर होत होता. त्याकामी पाठपुरावा करुन भुसंपादन क्षेत्र ६९०३ चौमी.चा ताबा संस्थानला दि.०७/०३/२०१८ रोजी मिळविलेला आहे व त्याप्रमाणे महसुल दपत्री रेकॉर्ड ऑफ राईटला संस्थानचे नावाने नोंदी करुन घेतलेल्या आहेत.

११) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्यासाठी "जमीन खरेदी धोरण" निश्चित करणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे मा.वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तयार करुन पाठविलेला आहे.

१२) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडील क्षेत्र ५२ हेक्टर ३५ आर इतके संस्थानला कायमस्वरुपी खरेदी मिळणेकामीचा प्रस्ताव सादर करणेत येवून त्यात वरिष्ठ पातळीवर पाठपुरावा करणेचे कामकाज चालू आहे.

१३) मुंबई ते शिर्डी या मार्गावर संस्थानचे पालखी थांबे उभारणेकामी प्राप्त झालेल्या दोन अर्जदारांच्या प्रस्तावातील क्षेत्राची समक्ष पाहणी केली असून त्याप्रमाणे सदर क्षेत्राचे दानपत्र करुन घेणेकामीचे कामकाज चालू केलेले आहे.

१४) मौजे रुई,ता.राहाता येथे संस्थानचे वैद्यकीय संकुल प्रस्तावित आहे. त्यासाठी संस्थान मालकीच्या क्षेत्रालगत असलेल्या व जमीन खरेदीकामी श्री.भंडारी व श्री.भनसाळी यांचेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाप्रमाणे जमीन खरेदी करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे शासनाकडे जमीन खरेदी धोरण अंतर्गतचा प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

१५) श्रीं चे शताब्दी उत्सव कालावधीत आवश्यकतेनुसार खाजगी व शेती महामंडळाची जमीन वेळोवेळी अधिग्रहण करणेची कार्यवाही पूर्ण केलेली आहे.

१६) सध्यस्थितीत मा.उच्च न्यायालयात श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर यांनी संस्थानचे विरोधात दाखल केलेल्या दाव्याचे कामकाज चालू आहे. त्या संदर्भात शासनाकडेस मुद्देनिहाय अहवाल सादर करणेत आलेला आहे. तसेच साखरबाई हरीभाऊ शेळके यांची जमीन संस्थानला भुसंपादनाद्वारे खरेदी करणेचे प्रकरण देखील मा.उच्च न्यायालयात चालू आहे. या दोन्ही प्रकरणी उचित कार्यवाही करणेचे कामकाज चालू आहे.

१७) मालमत्ता व भुसंपादन संबंधात विविध कोर्टात उदा.दिवाणी न्यायालय,राहाता, कोपरगाव, दिवाणी न्यायालय, व.स्तर, कोपरगाव, सत्र न्यायालय, कोपरगाव, उच्च न्यायालय,औरंगाबाद व सर्वोच्च न्यायालय,दिल्ली इ.कोर्टात चालू असलेल्या सुमारे ३८ केसेसमध्ये नियमाप्रमाणे कार्यवाही करणेकामी मार्गदर्शन करीत आहे.

१८) संस्थानच्या ताब्यात असलेल्या मोफत सर्वे नं.१ पैकीचे क्षेत्रासंबंधात शासकीय स्तरावर प्रलंबित असलेल्या दंडात्मक कार्यवाहीचे प्रकरणी कामकाज चालू आहे.

१९) संस्थानसाठी आरक्षित असलेले आरक्षण क्रं.३९ हे मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचेकडील आदेशाप्रमाणे रद्द करणेची कार्यवाही करणेत आली असून शासनाकडे भुसंपादनापोटी जमा करणेत आलेली अनामत रक्कम परत मिळणेकामी मागणी प्रकरण केलेले आहे.

२०) मौजे शिर्डी येथील नगरपंचायत हद्दीतील सर्वे नं.५७/९५ क्षेत्र ०.०१ आर ही कै.महतछत्री यांचे मालकीची स्वकष्टार्जित मिळकत त्यांचे मृत्यूनंतर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना देण्याची

त्यांची इच्छा असल्याचे त्यांचे दि.०७/०९/२००५ रोजीच्या अर्जावरुन स्पष्टपणे दिसून आलेने सदरचा अर्ज हेच त्यांचे इच्छापत्र (मृत्युपत्र) संबोधून ते दिवाणी न्यायालयात दाखल करुन मे.कोर्टाकडून प्रोबेट करुन घेणेकामीचे प्रकरण तयार करुन संस्थान पॅनलवरील वकील ॲड.जे.के.गोंदकर यांना त्याप्रमाणे मे.कोर्टात उक्त मिळकतीस संस्थानचे नाव लावणेकामीचे आदेश प्राप्त करुन घेणेकामी सुचित केलेले आहे.

२१) मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयाप्रमाणे शिर्डी विकास योजना आरक्षण व प्रारुप विकास आराखडा (सुधारीत) मधील संस्थानसाठी प्रस्तावित असलेली आरक्षणे रद्द करणेकामी संबंधीत कार्यालयांकडे प्रस्ताव सादर केले आहेत.

२२) संस्थान मालकीच्या भाडेकराराने दिलेल्या मिळकतींचे करारनामे करणेत आलेले आहेत.

२३) संस्थान मालमत्तेची देखभाल करणेकामी वेळोवेळी मिळकतींना भेटी देणेत आलेल्या आहेत व अडचणींचे निराकरण करणेत आलेले आहे.

२४) कार्यालयाचे दैनंदिन कामकाजात कार्यालयीन टिपण्या,मा.व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर करावयाच्या टिपण्या व इतर पत्रव्यवहार नियमितपणे सादर करणेत आलेले आहे.

उपरोक्तप्रमाणेच्या कामांची व्याप्ती विचारात घेता त्यापैकी बरीचशी कामे नियमितपणे करावी लागतात. याशिवाय भविष्यात १) मुंबई ते शिर्डी,औरंगाबाद ते शिर्डी,पुणे ते शिर्डी,अहमदनगर ते शिर्डी, भंडारदरा ते शिर्डी या मार्गांवर संस्थानचे पालखी थांबे उभारणेचे प्रस्तावित आहे. त्यासाठी जागांचा शोध घेणे,जागा दानपत्र घेणे, जागा खरेदी घेणे याबाबतची प्रकरणांची छाननी करणे इ. २) सर्व राज्यांच्या महत्वाच्या ठिकाणी संस्थानचे माहिती केंद्र उभारणेचे प्रस्तावित आहे. त्यासाठी जागा निश्चिती करणे, जागा उपलब्ध करणे व तत्संबंधी कामकाज करणे. ३) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची जमीन कायमस्वरुपी खरेदी करणे. ४) मौजे रुई,ता.राहाता येथे संस्थानचे वैद्यकीय संकुल प्रस्तावित आहे. त्यासाठी संस्थान मालकीच्या क्षेत्रालगत असलेली जमीन खरेदी करणेकामी कागदपत्रांची छाणनी करणे, मोजणी करुन घेणे व त्यासंबंधीत कामकाज करणे.५) मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे संस्थानसाठीची यापूर्वीची आरक्षणे रद्द करणे व संस्थानच्या मिळकतींवर टाकलेली आरक्षणे रद्द करणेकामीची कार्यवाही करणे. ६) मालमत्ता व भुसंपादन संबंधात विविध कोर्टात उदा.दिवाणी न्यायालय,राहाता, कोपरगाव, दिवाणी न्यायालय,व.स्तर,कोपरगाव, सत्र न्यायालय, कोपरगाव, उच्च न्यायालय, औरंगाबाद व सर्वोच्च न्यायालय,दिल्ली इ.कोर्टात चालू असलेल्या ३८ केसेमध्ये उचित कार्यवाही करणे. ७) संस्थानचे ताब्यात असलेल्या मोफत सर्वे नं.१ पै. चे क्षेत्रासंबंधात शासकीय स्तरावर प्रलंबित असलेल्या दंडात्मक कार्यवाहीचे प्रकरणी कामकाज पाहणे ८) मोफत सर्वे नं.१ च्या क्षेत्राचा ताळमेळ घेणेचे प्रकरणी कार्यवाही करणे ९) यापूर्वीचे भुसंपादन प्रकरणात

शासनाकडे संस्थानने भरलेली अनामत रक्कम परत मिळणेकामीचे प्रस्ताव तयार करणे व पाठपुरावा करणे १०) मौजे येसगाव येथील पालखी थांब्याची जागा संस्थानचे नावावर करुन घेणेकामी कार्यवाही करणे. ११) संस्थान मालकीच्या जमीनींच्या पोटहिश्श्यांचे सामीलीकरण करणेचे प्रस्ताव तयार करणे, अशा प्रकारची महत्वाची कामे करावयाची आहेत. १२) अभिलेख कक्षात पाठवावयाचे कागदपत्रांची छाननी करुन रेकॉर्ड अद्ययावत करणे.१३) मिळकत रजिस्टर नव्याने करुन ते अद्ययावत करणे. इ.कामे करावयाची आहेत.

विभागाचा अभिप्राय- यापूर्वी मालमत्ता विभागाचे कोर्ट केसेसचे सर्व कामकाज विधी विभागामार्फत करणेत येत होते. ते सर्व कामकाज विधी विभागाकडून मालमत्ता विभागाकडे वर्ग करणेत आलेले आहे. त्यात दिवाणी न्यायालय,क.स्तर,व.स्तर, जिल्हा सत्र न्यायालय,उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालय इ.कोर्टांमध्ये सर्व मिळून मालमत्ता विभागाच्या सुमारे ३० ते

३५ केसेस चालू आहेत. त्याचे कामकाज पाहणेसाठी आणि उपरोक्त दर्शविलेल्या कामकाजाची व्याप्ती,विविधता व महत्व विचारात घेता मालमत्ता विभागासाठी आणखी एका सेवानिवृत्त नायब तहसिलदाराची आवश्यकता आहे.

संस्थानचे सामान्य प्रशासन विभागाकडील जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/४५७/२०१९ दि.३०/०५/२०१९ अन्वये श्री.सुरेश सुधाकर भालेराव, सेवानिवृत्त नायब तहसिलदार यांचा संस्थानमध्ये मानधन तत्वावर सेवेची संधी उपलब्ध करुन देणेबाबतचा दि.२०/०५/२०१९ रोजीचा अर्ज इकडेस प्राप्त झालेला आहे. त्यांच्या महसुल विभागातील कामाच्या अनुभवाचा संस्थानला उपरोक्त कामकाजासाठी उपयोग होईल.

प्रस्ताव- श्री.सुरेश सुधाकर भालेराव,सेवानिवृत्त नायब तहसिलदार यांची एकत्रित मानधन तत्वावर दरमहा रक्कम रु.२५,०००/- मात्र इतक्या रकमेवर कंत्राटदारामार्फत ११ महिन्यांचे कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने कंत्राटी सल्लागार म्हणून नियुक्ती करणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२९२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.सुरेश सुधाकर भालेराव,सेवानिवृत्त नायब तहसिलदार यांची एकत्रित मानधन तत्वावर दरमहा रक्कम रु.२५,०००/- मात्र इतक्या रकमेवर कंत्राटदारामार्फत ११ महिन्यांचे कालावधीसाठी मालमत्ता विभागाकडे कंत्राटी पध्दतीने कंत्राटी सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.३६ **श्री साईबाबा संस्थान शिर्डी (त्रिकोणातील) मंदिरालगत असलेल्या ४५ दुकानदारांना पर्यायी जागा देणेबाबतच्या झालेल्या बैठकीबाबत.**

**प्रस्ताव** अधिनियमातील तरतूद – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ट) मध्ये विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना - मा.कक्ष अधिकारी,महसुल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई यांनी त्यांचेकडील उपरोक्त पत्र जा.क्रं.बैठक-३३१९/ प्र.क्र.२२/ज-६ दि.११/०३/२०१९ अन्वये श्री साईबाबा संस्थान शिर्डी (त्रिकोणातील) मंदिरालगत असलेल्या ४५ दुकानदारांना पर्यायी जागा देणेबाबतच्या विषयासंदर्भात मा.मंत्री,(महसुल) यांच्या अध्यक्षतेखाली दि.२९ जानेवारी २०१९ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत झालेल्या कार्यवाहीचे इतिवृत्त माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव सोबत पाठविण्यात येत आहे,असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

सदर पत्रासोबत खालीलप्रमाणे बैठकीचे इतिवृत्त प्राप्त झालेले आहे.

बैठकीचे इतिवृत्त

अध्यक्ष,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्या निवेदनास अनुसरुन श्री साईबाबा संस्थान शिर्डी (त्रिकोणातील) मंदिरालगत असलेल्या ४५ दुकानदारांना पर्यायी जागा देणे या विषयाबाबत मा.मंत्री (महसुल) यांच्या अध्यक्षतेखाली सहयाद्री अतिथीगृह,मलबार हिल,मुंबई येथे दि.२९/०१/२०१९ रोजी सायंकाळी ०४.३० वा.बैठक संपन्न झाली.

२. सदर बैठकीस खालील मान्यवर तसेच अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्रं. | मान्यवर/अधिका-याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री.राहुल द्विवेदी | जिल्हाधिकारी,अहमदनगर |
| २ | श्री.सुरेश हावरे | अध्यक्ष,श्री साईबाबा संस्थान शिर्डी |
| ३ | डॉ.संतोष भोगले | सह सचिव (ज-६),महसुल व वन विभाग |
| ४ | श्री.रविंद्र ठाकरे | उपविभागीय अधिकारी,शिर्डी |
| ५ | श्री.धनंजय निकम | उपजिल्हाधिकारी,श्री साईबाबा संस्थान. |
| ६ | श्री.गजानन शेरेकर | दुकानदार |
| ७ | श्री.शिवाजी गोंदकर | दुकानदार |
| ८ | श्री.रविंद्र कोते | दुकानदार |
| ९ | श्री.राजेंद्र गोंदकर | दुकानदार |
| १० | श्रीमती अनुष्का दळवी | कक्ष अधिकारी (ज-६),महसुल व वन विभाग. |

३. सदर बैठकीत विषयांकित मागणीच्या अनुषंगाने झालेल्या चर्चेअंती खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

| अ.नं. | बैठकीचा मुद्दा | बैठकीत घेण्यात आलेला निर्णय | अंमलबजावणी करणारा विभाग/यंत्रणा | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | श्री साईबाबा संस्थान शिर्डी (त्रिकोणातील) मंदिरालगत असलेल्या ४५ दुकानदारांना पर्यायी जागा देणे. | शिर्डी येथील स.नं.१ मधील शासकीय जागा आरक्षित प्रयोजनाकरीताच विकसित करता येत असल्याने श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांना सदर जागेवरील आरक्षण विकसित | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी व जिल्हाधिकारी, अहमदनगर. | प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर नियमाप्रमाणे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | करण्यासाठी संबंधीत जागेची आवश्यकता असल्यास संस्थानाने त्याप्रमाणे ठराव करुन शासनाकडे जागा मागणीबाबत प्रस्ताव सादर करावा. | | |

उपरोक्त बैठकीचे इतिवृत्तात "शिर्डी येथील सर्वे नं.१ मधील शासकीय जागा आरक्षित प्रयोजनाकरीताच विकसित करता येत असल्याने श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांना सदर जागेवरील आरक्षण विकसित करण्यासाठी संबंधीत जागेची आवश्यकता असल्यास संस्थानने त्याप्रमाणे ठराव करुन शासनाकडे जागा मागणीबाबत प्रस्ताव सादर करावा," असेबाबत नमूद केलेले आहे.

मौजे शिर्डी येथील उपरोक्त मुफत सर्वे नं.१/२ क्षेत्र ०.३० आर हे महाराष्ट्र शासन,महसुल विभाग यांचे मालकीचे असून सदरचे क्षेत्रात यापूर्वी शिर्डी नगरपंचायतने आरक्षण क्रं.१३ ए बगीचा व १३ बी दुकान केंद्र असे दर्शविलेले आहे. तथापि सदर क्षेत्राचे पश्चिमेच्या लगत महाराष्ट्र राज्य महामार्ग असलेने सदर क्षेत्रात बगीचा व दुकान केंद्र अनुज्ञेय होत नसलेने नगरपंचायत,शिर्डी यांनी सन २०१७ चे प्रस्तावित विकास आराखडयात सदरच्या क्षेत्रावर आरक्षण क्रं.७ "बगीचा" हे दर्शविलेले असून भुसंपादन संस्था नगरपंचायत,शिर्डी ही दर्शविलेली आहे.

विभागाचा अभिप्राय– उपरोक्त मा.मंत्री महोदय (महसुल) यांच्या अध्यक्षतेखाली दि.२९/०१/२०१९ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्तातील निर्णयात नमूद केलेप्रमाणे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१ मधील शासकीय जागा आरक्षित प्रयोनाकरीताच विकसित करता येते. म्हणजेच मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१/२ क्षेत्र ०.३० आर या जागेवरील बगीचासाठी असलेले आरक्षण संस्थानमार्फत विकसित करता येईल व त्यासाठी संस्थानने ठराव करुन शासनाकडे जागा मागणीचा प्रस्ताव सादर करता येईल.

प्रस्ताव– मौजे शिर्डी,ता.राहाता येथील मुफत सर्वे नं.१/२ क्षेत्र ०.३० आर या क्षेत्रावर प्रस्तावित विकास आराखडयात दर्शविणेत आलेले आरक्षण क्रं.७ बगीचा हे संस्थानमार्फत विकसित करण्याचे व त्यासाठी शासनाकडे जागा मागणीबाबतचा प्रस्ताव सादर करणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२९३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे शिर्डी,ता.राहाता येथील मुफत सर्वे नं.१/२ क्षेत्र ०.३० आर या क्षेत्रावर प्रस्तावित विकास आराखडयात दर्शविणेत आलेले आरक्षण क्रं.७ बगीचा हे संस्थानमार्फत विकसित करणेकामी विधी व न्याय विभागाची मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करण्यात यावा, शासनाचे मान्यतेनंतर जिल्हाधिकारी यांचेकडे रितसर जागा मागणीचा प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३७** **मौजे शिर्डी, तालुका राहाता येथील मुफ्त सर्व्हे नं.१/२ क्षेत्र ०.३० आर या जागेवरील आरक्षणाबाबत.**

**प्रस्ताव** अधिनियमातील तरतूद – १) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ट) मध्ये विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील,अशी तरतूद आहे.

२) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम २८(१) चे परंतुकात मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जे ठराव शासनाच्या निदर्शनास आणणे आवश्यक आहे असे त्याला वाटत असेल असे समितीचे ठराव शासनाकडे पाठविता येतील,अशी तरतुत आहे.

प्रस्तावना - मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५/१०/२०१८ रोजीच्या सभेत शिर्डी येथील मोफत सर्वे नं.१ मधील १०१ दुकानदार व त्यांचे वारसदार प्रतिनिधी यांनी मा.अध्यक्ष महोदय यांना निवेदन दिले. सदर निवेदनात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी मोफत सर्वे नं.१ (त्रिकोण) ही जागा शासनाकडून घ्यावी व त्या जागेत मंजूर आराखडयानुसार शॉपिंग सेंटर व गार्डन करावे,शॉपिंग सेंटरचे बांधकाम खर्च सर्व दुकानदार करण्यास तयार आहेत. त्यामुळे मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेशाचे अंमलबजावणी होऊन संस्थानचे रक्कम रु.१६ कोटी मात्र वाचतील. तरी मानवतेच्या दृष्टिकोनातून सदर विषयावर कार्यवाही करावी,अशी विनंती केली आहे.

यावर चर्चा होवून आयत्या वेळचा विषय नं.२१ निर्णय क्रं.६३३ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

प्रथम मोफत सर्वे नं.१ (त्रिकोण) या जागेवरील आरक्षण शासनाने काढून द्यावे तसेच त्या ठिकाणी वाणिज्य वापर अनुज्ञेय करावा व वाणिज्य बांधकामाचे आराखडे मंजूर करुन घ्यावे. त्यानंतर सदर जागा संस्थानला नाममात्र दराने किंवा मोफत उपलब्ध करुन द्यावी. तसा प्रस्ताव शासनाला सादर करावा,असे ठरले.

तथापि उपरोक्त मुफत सर्व्हे नं.१/२ क्षेत्र ०.३० आर हे महाराष्ट्र शासन,महसुल विभाग यांचे मालकीचे असून सदरचे क्षेत्रात यापूर्वी आरक्षण क्रं.१३ ए बगीचा व १३ बी दुकान केंद्र असे दर्शविलेले आहे.तथापि सदर क्षेत्राचे पश्चिमेच्या लगत महाराष्ट्र राज्य महामार्ग असलेने सदर क्षेत्रात बगीचा व दुकान केंद्र एकत्रित अनुज्ञेय होत नसलेने नगरपंचायत,शिर्डी यांनी सन २०१७ चे प्रस्तावित विकास आराखडयात सदरच्या क्षेत्रावर आरक्षण क्रं.७ ''बगीचा'' हे दर्शविलेले असून भुसंपादन संस्था नगरपंचायत,शिर्डी ही दर्शविलेली आहे.सदरचे क्षेत्र हे संस्थानचे गेट नं.४ च्या दक्षिणेस अगदी समोर येत असलेने त्या ठिकाणी नगरपंचायतने प्रस्तावित केलेले आरक्षण ''बगीचा'' हे यथायोग्य आहे. याशिवाय साई मंदिराची सुरक्षा व गर्दीचे व्यवस्थापनाच्या दृष्टीकोनातून सदरचा निर्णय योग्य नसल्याने निरस्त करणे आवश्यक आहे,असे नम्र मत आहे, असेबाबतचा प्रस्ताव श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम २८(१) चे परंतुकात,मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जे ठराव शासनाच्या निदर्शनास आणणे आवश्यक आहे असे वाटत असेल असे समितीचे ठराव शासनाकडे पाठवता येतील,अशी तरतुद आहे. तदनुषंगाने उक्त निर्णय इकडील जा.नं.एसएसएसटी/ मालमत्ता/७२/२०१८ दि.०४/०४/२०१९ अन्वये शासनाचे मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई ४०००३२ यांचे निदर्शनास आणून देण्यात आलेला आहे.

सदर पत्राच्या अनुषंगाने मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांनी त्यांचेकडील जा.क्रं. सासंवि-१०१८/प्र.क्र १२२/का.१६ दि.१६/०५/२०१९ अन्वये ''व्यवस्थापन समितीचा निर्णय क्रं.६३३ अन्वये प्रथम मुफत सर्व्हे नं.१ (त्रिकोण) या जागेवरील आरक्षण शासनाने काढून घ्यावे तसेच त्या ठिकाणी वाणिज्य वापर अनुज्ञेय करावा व वाणिज्य बांधकामाचे आराखडे मंजूर करुन घ्यावे. त्यानंतर सदर जागा संस्थानला नाममात्र दराने किंवा मोफत उपलब्ध करुन द्यावी. तसा प्रस्ताव शासनाला सादर करावा असा निर्णय झालेला आहे. तथापि सदर निर्णय संस्थानचे दृष्टिने हितावह आहे किंवा कसे तसेच साई मंदिराची सुरक्षा व गर्दीचे व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून योग्य आहे किंवा कसे याबाबत समितीच्या आगामी बैठकीत पुर्नविचार करण्यात यावा व झालेल्या

निर्णयाबाबत शासनास कळविण्यात यावे.''असेबाबत मा.व्यवस्थापन समिती,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना उद्देशून पत्र सादर केलेले आहे.

विभागाचा अभिप्राय – मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग यांचेकडील मा.व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना उद्देशून लिहीलेले उपरोक्त पत्र जा.क्रं.सासंवि-१०१८/प्र.क्र.१२२/का.१६ दि.१६/०५/२०१९ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने उपरोक्त निर्णय क्रं.६३३ यावर पुनर्विचार करुन शासनास निर्णय कळविता येईल.

प्रस्ताव – मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५/१०/२०१८ रोजीचे सभेतील झालेला निर्णय क्रं.६३३ ''प्रथम मोफत सर्वे नं.१ (त्रिकोण) या जागेवरील आरक्षण शासनाने काढून द्यावे तसेच त्या ठिकाणी वाणिज्य वापर अनुज्ञेय करावा व वाणिज्य बांधकामाचे आराखडे मंजूर करुन घ्यावे. त्यानंतर सदर जागा संस्थानला नाममात्र दराने किंवा मोफत उपलब्ध करुन द्यावी. तसा प्रस्ताव शासनाला सादर करावा,'' या निर्णयावर पुनर्विचार होवून शासनास निर्णय कळविणेच्या निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२९४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५/१०/२०१८ रोजीचे सभेतील झालेला निर्णय क्रं.६३३ रद्द करण्यात येऊन या क्षेत्रावर प्रस्तावित विकास आराखडयात दर्शविणेत आलेले आरक्षण क्रं.७ बगीचा हे संस्थानमार्फत विकसित करणेकामी विधी व न्याय विभागाची मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करण्यात यावा, शासनाचे मान्यतेनंतर जिल्हाधिकारी यांचेकडे रितसर जागा मागणीचा प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे ठरले.** **(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.३८ **मा.उच्च न्यायालय खंडपीठ,औरंगाबाद यांचे कोर्टात मौजे शिर्डी येथील साखरबाई हरिभाऊ शेळके मयत वारस सौ.संजिवनी दशरथ महांबरे व इतर यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील जमिन सर्व्हे नं.१४८ पै.चे क्षेत्र भुसंपादन निवाडा क्र.एसएक्यु/एसआर/१०/२००० संबधातील कार्यवाही बंद करणेबाबत.**

**प्रस्ताव**

अधिनियमातील तरतूद – १) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ट) मध्ये विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील,अशी तरतूद आहे.

२) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(२)(च) यात विश्वस्तव्यवस्थेशी संबंधीत असे कोणतेही दावे,खटले व इतर कायदेशीर कार्यवाही,न्यायालयात किंवा न्यायाधिकरणापुढे किंवा इतर प्राधिकरणापुढे दाखल करील व त्यासंबंधात बचाव करील,अशी तरतुद आहे.

प्रस्तावना - मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.८२ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"मौजे शिर्डी येथील साखरबाई हरीभाऊ शेळके यांचे मालकीचे सर्वे नं.१४८ पै. क्षेत्र ४.७३.१९ हेक्टर (४७३१९ चौमी.) या क्षेत्राची संस्थानला उपयुक्तता आणि त्यासाठी द्यावी लागणारी अंदाजित किंमत रक्कम रु.९० कोटी हे संयुक्तिक दिसुन येत नाही. त्यामुळे प्रस्तुत क्षेत्राचे भुसंपादन करण्यात येवू नये व तसे प्रांताधिकारी,शिर्डी यांना कळविण्यात यावे," असे ठरले.

मौजे शिर्डी येथील साखरबाई हरीभाऊ शेळके यांचे मालकीचे सर्व्हे नं.१४८ पैकी क्षेत्र ४.७३.१९ हेक्टर (४७३१९ चौमी.) क्षेत्र भुसंपादन करण्याची कार्यवाही चालू होती. सदर प्रकरणी भुसंपादन कायदा १८९४ कलम ४ व ६ च्या अधिसुचनेला आव्हान देऊन साखरबाई हरीभाऊ शेळके यांनी मे.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्रं.३९०/२००२ दाखल केले होते. सदर रिट पिटीशनमध्ये सुनावणी होऊन दि.२५/०४/२०१४ रोजी अंतिम निकाल पारीत करण्यात आला. त्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांनी भुसंपादन निवाडा एलएक्यु/एसआर/१०/ २००० दि.१३/०८/२०१५ रोजी पारीत केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणी जमीन मालक साखरबाई हरीभाऊ शेळके यांचे वारस सौ.संजीवनी दशरथ महांबरे व इतर यांनी मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचे कोर्टात रिट पिटीशन नं.३९०/२००२,रिट पिटीशन नं.१२२८/ २०१५ व रिट पिटीशन नं.१९४३/२०१६ चे दाखल केलेले होते. मा.उच्च न्यायालयाने उक्त तीनही रिट पिटीशन अनुक्रमे दि.२५/०४/२०१४,दि.०९/०२/२०१५ व दि.०३/०३/२०१६ रोजीचे आदेशान्वये निकाली काढून डिसमिस केलेले आहेत.

प्रस्तुत निर्णयाचे नाराजीने अर्जदार यांनी मा.सर्वोच्च न्यायालय,दिल्ली यांचे कोर्टात एस.एल.ए.नं.२९८७५ /२०१५ व एस.एल.पी.नं.३५८४६/२०१६ चे दाखल केलेले होते. प्रस्तुतचे दोन्हीही एस.एल.पी. हे शिर्डी येथील सर्वे नं.१४८/१ मधील क्षेत्र ४.७३.१९ हेक्टर (४७३१९ चौमी) संस्थानकरीता भुसंपादनाची कार्यवाही चालू आहे. सदरची भूसंपादनाची कार्यवाही थांबविण्यात यावी याकरीता पीटीशनरने दाखल केले होते.

प्रस्तुत एस.एल.पी.मध्ये मे.सर्वोच्च न्यायालयाने केंद्र शासनाचे दि.२६ ऑक्टोबर २०१५ रोजीचे परिपत्रक विचारात घेऊन त्यांना एस.एल.पी.मागे घेण्याची मुभा दिली व याचिकाकर्त्यांना सदर परिपत्रकानुसार कार्यवाही करणेकरीता मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यास परवानगी दिली.

त्या अनुषंगाने साखरबाई हरीभाऊ शेळके यांचे वारस म्हणून श्रीमती संजीवनी दशरथ महांबरे व इतर यांनी मे.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद येथे रिट पिटीशन नं.१२२८/२०१५ मधील सिव्हील ॲप्लीकेशन नं.४२३९/ २०१८ चे दाखल केलेले आहे. परंतु सदर सिव्हील ॲप्लीकेशनमध्ये पिटीशनर यांनी साईबाबा संस्थान ट्रस्ट,शिर्डी यांना पक्षकार केलेले नाही. वास्तविक मे.सर्वोच्च न्यायालयामधील सिव्हील ॲप्लीकेशनमध्ये साईबाबा संस्थान ट्रस्ट पक्षकार असतांनाही मे.उच्च न्यायालयात साईबाबा संस्थान ट्रस्ट यांना पक्षकार म्हणून सामील न करणे म्हणजे संस्थानवर अन्याय करण्यासारखे आहे. साईबाबा संस्थान ट्रस्ट ही भुसंपादन संस्था असल्याने सदर प्रकरणाशी त्यांचा निकटचा संबंध आहे. त्यामुळे जरी पिटीशनर यांनी सदर सिव्हील ॲप्लीकेशनमध्ये संस्थानला पक्षकार म्हणून सामील करुन घेतले नसले तरी प्रस्तुत प्रकरणी मा.उच्च न्यायालय,मुंबई,खंडपीठ,औरंगाबाद यांचे कोर्टात दाखल असलेल्या रिट पिटीशन नं.१२२८/२०१५ मधील सिव्हील ॲप्लिकेशन नं.४२३९/२०१८ मध्ये संस्थानला प्रतिवादीपणात सामील करुन घेणेकामी मा.उच्च न्यायालय,खंडपीठ, औरंगाबाद यांचे कोर्टात हस्तक्षेप अर्ज (Intervention Application) सादर करणेकामी व संस्थानचे वतीने प्रस्तुत सिव्हील

ॲप्लिकेशनमध्ये कामकाज पाहणेकामी मा.उच्च न्यायालयातील संस्थान पॅनलवरील वकील ॲड.श्री.नितीन भवर पाटील यांना इकडील पत्र क्रं.एसएसएसटी /मालमत्ता/६४२/२०१९ दि.२८/०५/२०१९ अन्वये अलाहिदा कळविणेत आलेले आहे.

विभागाचा अभिप्राय- प्रस्तुत प्रकरणात संस्थानचे वतीने मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचे कोर्टात म्हणणे सादर करणे आवश्यक आहे. तदनुषंगाने "मौजे शिर्डी येथील साखरबाई हरीभाऊ शेळके यांचे मालकीचे सर्वे नं.१४८ पै. क्षेत्र ४.७३.१९ हेक्टर (४७३१९ चौमी.) या क्षेत्राची श्री साईबाबा संस्थानला उपयुक्तता

आणि त्यासाठी द्यावी लागणारी अंदाजित किंमत रक्कम रु.९० कोटी ही संयुक्तिक दिसून येत नाही. त्यामुळे प्रस्तुत क्षेत्राचे भुसंपादन करण्यात येवू नये व तसे प्रांताधिकारी,शिर्डी यांना कळविण्यात यावे,"असे ठरले.या मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्रं.८२ मध्ये खालीलप्रमाणे सुधारीत निर्णय करता येईल.

"मौजे शिर्डी येथील साखरबाई हरीभाऊ शेळके यांचे मालकीचे सर्वे नं.१४८ पै. क्षेत्र ४.७३.१९ हेक्टर (४७३१९ चौमी.) या क्षेत्राची संस्थानने मागणी करतेवेळेस सदरचे क्षेत्र संस्थानच्या क्षेत्रालगत सलग होते. मात्र तदनंतर सदर क्षेत्रातून नगरपंचायतीचा सुमारे १८ मी.रुंदीचा डी.पी.रोड तयार झालेला आहे. त्यामुळे सदर क्षेत्राची विभागणी होवून सलगता नष्ट झालेली आहे. परिणामी संस्थानने मागणी केलेल्या सदर क्षेत्राचे दोन भाग झालेले आहेत. त्यामुळे आता सदरचे क्षेत्र संस्थानला उपयुक्त व किफायतशीर ठरणार नाही. याशिवाय महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची शिर्डी व निमगाव-को-हाळे या लगतच्या गावातील जमीन क्षेत्र ५२ हेक्टर ३५ आर (सुमारे १३१ एकर) इतके क्षेत्र संस्थानला मिळणेकामी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,पुणे यांचेकडेस दि.०९/०५/२०१७ रोजी प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. सदर जमीन संस्थानला कमी किंमतीत मिळणार आहे. या सर्व बाबींचा विचार करता प्रस्तुत भुसंपादन प्रकरणातील क्षेत्र ४.७३.१९ हेक्टर (४७३१९ चौमी) इतके भुसंपादनाने घेणे संस्थानच्या दृष्टिने किफायतशीर व सोयीचे नाही. यास्तव प्रस्तुत क्षेत्राची भुसंपादन कार्यवाही वगळण्यात यावी/मागे घेण्यात यावी व तसा प्रस्ताव प्रांताधिकारी,शिर्डी यांचेकडे पाठविणेत यावा," असा सुधारीत निर्णय करता येईल.

प्रस्ताव– "मौजे शिर्डी येथील साखरबाई हरीभाऊ शेळके यांचे मालकीचे सर्वे नं.१४८ पै. क्षेत्र ४.७३.१९ हेक्टर (४७३१९ चौमी.) या क्षेत्राची संस्थानने मागणी करतेवेळेस सदरचे क्षेत्र संस्थानच्या क्षेत्रालगत सलग होते. मात्र तदनंतर सदर क्षेत्रातून नगरपंचायतीचा सुमारे १८ मी.रुंदीचा डी.पी.रोड तयार झालेला आहे. त्यामुळे सदर क्षेत्राची विभागणी होवून सलगता नष्ट झालेली आहे. परिणामी संस्थानने मागणी केलेल्या सदर क्षेत्राचे दोन भाग झालेले आहेत. त्यामुळे आता सदरचे क्षेत्र संस्थानला उपयुक्त व किफायतशीर ठरणार नाही. याशिवाय महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची शिर्डी व निमगाव-को-हाळे या लगतच्या गावातील जमीन क्षेत्र ५२ हेक्टर ३५ आर (सुमारे १३१ एकर) इतके क्षेत्र संस्थानला मिळणेकामी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,पुणे यांचेकडेस दि.०९/०५/२०१७ रोजी प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. सदर जमीन संस्थानला कमी किंमतीत मिळणार आहे. या सर्व बाबींचा विचार करता प्रस्तुत भुसंपादन प्रकरणातील क्षेत्र ४.७३.१९ हेक्टर (४७३१९ चौमी) इतके भुसंपादनाने घेणे संस्थानच्या दृष्टिने किफायतशीर व सोयीचे नाही. यास्तव प्रस्तुत क्षेत्राची भुसंपादन कार्यवाही वगळणेत यावी/मागे घेण्यात यावी व तसा प्रस्ताव प्रांताधिकारी,शिर्डी यांचेकडेस पाठविणेत यावा," याप्रमाणे निर्णय करणेकामीच्या निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२९५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे शिर्डी येथील साखरबाई हरीभाऊ शेळके यांचे मालकीचे सर्वे नं.१४८ पै. क्षेत्र ४.७३.१९ हेक्टर (४७३१९ चौमी.) या क्षेत्राची संस्थानने मागणी करतेवेळेस सदरचे क्षेत्र संस्थानच्या क्षेत्रालगत सलग होते. मात्र तदनंतर सदर क्षेत्रातून नगरपंचायतीचा सुमारे १८ मी.रुंदीचा डी.पी.रोड तयार झालेला आहे. त्यामुळे सदर क्षेत्राची विभागणी होवून सलगता नष्ट झालेली आहे. परिणामी संस्थानने मागणी केलेल्या सदर क्षेत्राचे दोन भाग झालेले आहेत. त्यामुळे आता सदरचे क्षेत्र संस्थानला उपयुक्त व किफायतशीर ठरणार नाही. याशिवाय महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची शिर्डी व निमगाव-को-हाळे या लगतच्या गावातील जमीन क्षेत्र ५२ हेक्टर ३५ आर (सुमारे १३१ एकर) इतके क्षेत्र संस्थानला मिळणेकामी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,पुणे यांचेकडेस दि.०९/०५/२०१७ रोजी प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. सदर जमीन संस्थानला कमी किंमतीत मिळणार आहे. या सर्व बाबींचा विचार करता प्रस्तुत भुसंपादन प्रकरणातील क्षेत्र ४.७३.१९ हेक्टर (४७३१९ चौमी) इतके भुसंपादनाने घेणे संस्थानच्या दृष्टिने किफायतशीर व सोयीचे नाही. यास्तव प्रस्तुत क्षेत्राची भुसंपादन कार्यवाही वगळणेत यावी/मागे घेण्यात यावी व तसा प्रस्ताव प्रांताधिकारी, शिर्डी यांचेकडेस पाठविणेत यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.३९ **सन २०१८-१९ चे शिक्षक संच मान्यतेनुसार प्राथमिक विभागासाठी आवश्यक सहाय्यक शिक्षक हे कंत्राटी/आऊटसोर्स पध्दतीने घेण्यास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव** उपरोक्त संदर्भीय क्र. १ शासन निर्णयानुसार बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार -२००९ च्या अनुषंगाने सर्व व्यवस्थापनाच्या ( स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय, खाजगी अनुदानीत, अंशतः

अनुदानित इ. सर्व ) नवीन शाळा सुरु करणे, वर्ग जोडणे त्यानुषंगाने शाळांमधील संरचनात्मक बदल करणे आणि संचमान्यतेचे सुधारित निकष विहित करणेबाबतच्या आदेशान्वये –

उच्च प्राथमिक विभागः-

२.२ उच्च प्राथमिक शाळा ( इयत्ता ५ वी ते ७ वी किंवा ६ वी ते ८ वी )

२.२.२ सध्या अस्तित्वात असलेल्या अन्य शाळांमध्ये तीनही वर्ग मिळून ३६ पेक्षा अधिक विद्यार्थी असल्यास एकूण ३ शिक्षक (१ विज्ञान / गणित, १ भाषा, १ समाजशास्त्र) शिक्षक अनुज्ञेय राहतील.

२.२.३ विद्यार्थी संख्या १०५ पेक्षा अधिक झाल्यास ३५ च्या पटीमध्ये १ अतिरिक्त शिक्षक अनुज्ञेय राहील. मात्र प्रत्येक शिक्षकासाठी एक वर्ग खोली असणे आवश्यक आहे. अन्यथा जादा शिक्षक पद मंजूर करु नये.

प्राथमिक विभागः-

२.१ प्राथमिक शाळा ( इयत्ता १ ली ४ थी किंवा इयत्ता १ ली ते ५ वी. )

२.१.१ शाळेमधील सर्व विद्यार्थी मिळून ६० पर्यंत २ शिक्षक, त्यानंतर वाढ होणा-या प्रत्येक ३० विद्यार्थ्यांमागे ०१ अतिरिक्त शिक्षक.

शासनाच्या उपरोक्त आदेशानुसार श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, शिर्डी शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये इयत्ता १ ली ते ७ वी प्राथमिक शाळा असून एकूण १७४८ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. प्राथमिक शाळा ही सकाळचे सत्रात सकाळी ०७.१५ ते दुपारी १२.१५ या वेळेत भरविण्यात येत आहे.

१ ) शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये इयत्ता ६ वी व ७ वी वर्ग तुकडीमध्ये नैसर्गिक वाढ होत असून सद्यस्थितीमध्ये १० वर्ग तुकडी कार्यरत असून एकूण ५३२ विद्यार्थी नव्याने प्रवेशित होत आहेत. मात्र आर. टी. ई. अधिनियमानुसार इयत्ता ६ वी व ७ वी प्रति तुकडी ३५ विद्यार्थी याप्रमाणे १५ वर्ग तुकडी तयार होत असून एकूण १७ सहा. शिक्षक अध्यापनासाठी असणे गरजेचे आहे.

२ ) तसेच शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये इयत्ता १ ली ते ५ वी वर्ग तुकडीमध्ये नैसर्गिक वाढ होत असून एकूण १२१६ विद्यार्थी नव्याने प्रवेशित होत आहेत. आर. टी. ई. अधिनियमानुसार इयत्ता १ ली ते ५ वी प्रति तुकडी ३० विद्यार्थी याप्रमाणे ४१ वर्ग तुकडी तयार होत असून ४१ सहा. शिक्षक अध्यापानासाठी असणे गरजेचे आहे.

श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, शिर्डी प्राथमिक विभागासाठी आवश्यक लागणारे सहा. शिक्षक संच मान्यता मिळणेकामी अहमदनगर जिल्हा परिषद यांचेकडे पाठपुरावा करण्यात आला होता. उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये अहमदनगर जिल्हा परिषद यांचेकडून प्राथमिक विभागासाठी विद्यार्थी संख्येनुसार खालीलप्रमाणे शिक्षक संच मान्यता मिळालेली आहे.

शैक्षणिक वर्ष २०१६ -१७, २०१७- १८ व २०१८-१९ प्राथमिक विभाग शिक्षक संच मान्यता मंजूर शिक्षक पदे

| अ.नं. | पदाचा तपशिल | शै.वर्ष २०१६-१७ मंजूर शिक्षकपदे | शै.वर्ष २०१७ - १८ मंजूर शिक्षक पदे | शै.वर्ष २०१८ - १९ मंजूर शिक्षक पदे | सध्या कार्यरत शिक्षक पदे कायम | सध्या कार्यरत शिक्षक पदे कंत्राटी | एकूण कार्यरत संख्या | इ. १ली ते ७ वी एकूण विद्यार्थी संख्या | विद्यार्थी संख्ये नुसार आवश्यक पदे | एकूण रिक्त पदे | उपलब्ध वर्गखोल्या नुसार आवश्यक शिक्षक संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **०१** | मुख्याध्यापक | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०१ | --- | ०१ | ०० | ०० |
| **०२** | उपमुख्याध्यापक | ०० | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | --- | ०१ | ०१ | ०० |
| **०३** | पर्यवेक्षक | ०० | ०२ | ०२ | ०० | ०० | ०० | --- | ०२ | ०२ | ०० |
| **०४** | पदवीधर ६ वी ते ७ वी | ०२ | ११ | १५ | १० | ०४ | १४ | ५३२ | १७ | ०३ | ३ |
| **०५** | अ पदवीधर १ ली ते ५ वी | १५ | ४४ | ४२ | १२ | ०९ | २१ | १२१६ | ४१ | २० | ४ |
| **०६** | संगणक शिक्षक | --- | -- | -- | ०१ | ०१ | ०२ | --- | ०० | ०० | |
| | **एकूण** | **१८** | **५९** | **६१** | **२४** | **१४** | **३८** | **१७४८** | **६२** | **२६** | **७** |

विभागाचा अभिप्रायः- उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये आर.टी. ई. अधिनियमानुसार अहमदनगर जिल्हा परिषद यांचेकडून एकूण शालेय विद्यार्थी संख्येनुसार प्राथमिक विभागासाठी आवश्यक लागणारे शिक्षकांची

शिक्षक संच मान्यता मिळालेली आहे. सदर संच मान्यतेनुसार एकुण ६१ स्थायी पदांना मान्यता देण्यात आलेली आहे. मात्र सद्यस्थितीत इंग्लिश मिडीयम स्कुल विभागाकडील प्राथमिक विभागाकडे २४ स्थायी व १४ कंत्राटी असे एकुण ३८ सहाय्यक शिक्षक कार्यरत आहेत, म्हणजेच संचमान्यतेनुसार २४ पदे रिक्त आहेत. मात्र इंग्लिश मिडीयम स्कुल विभागाकडील वर्ग खोल्यांची संख्या विचारात घेता सध्या किमान ०७ सहाय्यक शिक्षक कंत्राटी पद्धतीने अथवा आऊटसोर्स पद्धतीने मिळणे गरजेचे आहे.

इकडील कार्यालयाकडील दि.२८.०५.२०१९ रोजीचे टिपणीवर मा.मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी, "नेमणूक करता येत नाही. सेवा वर्ग करता येईल. Indentify करुन सादर करा." असे निर्देश दिले आहे. त्यानुसार कामगार विभागामार्फत प्राप्त संस्थानमधील कंत्राटी कर्मचारी यादीचे अवलोकन केले असता त्यांचेकडील शैक्षणिक पात्रतेनुसार एकूण ९ पैकी ४ कर्मचारी पात्र आहे. त्यापैकी प्राथमिक विभागासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक पात्रता फक्त एका कर्मचा-याकडे आहे.

आकृतीबंधात शिक्षक पदे मंजुरी नसल्याने वाढीव वर्ग तुकडींचे एकत्रीकरण करुन अध्यापनाचे काम करण्यात येत आहे. त्यामुळे सन २०१९-२० शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना अध्यापनासाठी उपलब्ध वर्ग खोल्यानुसार किमान ०७ सहाय्यक शिक्षक (०४-एच.एस.सी.डी.एड. इंग्रजी माध्यम, ०१ –बी.एस्सी.बी.एड., ०२-बी.ए.बी.एड. हिंदी, मराठी) नवीन शिक्षक भरती करणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच सन २०१८-१९ मध्ये प्राप्त संच मान्यतेनुसार श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल विभागाकडील आकृतीबंधामध्ये बदल करणेबाबतचा प्रस्ताव स्वंतत्र सादर करण्यात येत आहे.

विभागाची मागणीः- तरी प्रास्ताविकात नमुद वस्तुस्थिती व विभागाचा अभिप्राय यांचा विचार करता प्राथमिक विभागात वर्ग तुकडीमध्ये होत असलेली नैसर्गिक वाढ, उपलब्ध वर्ग खोल्यांची संख्या व मा.शिक्षणाधिकारी यांचेकडील मंजुर संच मान्यता या सर्व बाबींचे अवलोकन करता, इयत्ता १ ली ते ७ वी या वर्गासाठी शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये शैक्षणिक अर्हता - एस.एस.सी./ एचएस.सी. , डी.एड. (इंग्रजी माध्यम) असलेले एकूण ०४ तसेच बी.एस्सी बी.एड ०१ , बी.ए.बी.एड ०२(हिंदी,मराठी) असे एकूण ०७ शिक्षक कंत्राटी पद्धतीने अथवा आऊटसोर्स पद्धतीने घेणेस मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२९६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.शिक्षणाधिकारी यांचेकडील मंजूर संच मान्यतेनुसार प्राथमिक विभागासाठी शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये शैक्षणिक अर्हता-एस.एस.सी./ एचएस.सी., डी.एड. (इंग्रजी माध्यम) असलेले एकूण ०४ तसेच बी.एस्सी बी.एड ०१, बी.ए.बी.एड ०२ (हिंदी,मराठी) असे एकूण ०७ शिक्षक बाहय यंत्रणेमार्फत कंत्राटी पद्धतीने ११ महिने कालावधीसाठी घेण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४०** **सन २०१७-१८ चे शिक्षक संच मान्यतेनुसार माध्यमिक विभागासाठी आवश्यक सहाय्यक शिक्षक हे कंत्राटी/आऊटसोर्स पध्दतीने घेण्यास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव** उपरोक्त संदर्भीय क्र. १ शासन निर्णयानुसार बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार - २००९ च्या अनुषंगाने सर्व व्यवस्थापनाच्या ( स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय, खाजगी अनुदानीत, अंशतः अनुदानित इ. सर्व ) नवीन शाळा सुरु करणे, वर्ग जोडणे त्यानुषंगाने शाळांमधील संरचनात्मक बदल करणे आणि संचमान्यतेचे सुधारित निकष विहित करणेबाबतच्या आदेशान्वये –

२.३ माध्यमिक शाळा ( इयत्ता ९ वी ते १० वी)

**२.३.२** सध्या अस्तित्वात असलेल्या शाळांमध्ये इयत्ता ९ वी व १० वी चे दोनही वर्ग मिळून ४० पेक्षा अधिक विद्यार्थी असल्यास एकूण ३ शिक्षक ( १ भाषा, १ विज्ञान/ गणित, १ समाजशास्त्र) शिक्षक अनुज्ञेय राहतील.

**२.३.३** नववी किंवा दहावी कोणत्याही वर्गामध्ये ६० पेक्षा अधिक विद्यार्थी असल्यास एक शिक्षकांचे पद अनुज्ञेय होईल व चाळीशीच्या पटीने विद्यार्थी संख्येस १ शिक्षक अनुज्ञेय राहील.

**२.२** उच्च प्राथमिक शाळा ( इयत्ता ५ वी ते ७ वी किंवा ६ वी ते ८ वी )

२.२.२ सध्या अस्तित्वात असलेल्या अन्य शाळांमध्ये तीनही वर्ग मिळून ३६ पेक्षा अधिक विद्यार्थी असल्यास एकूण ३ शिक्षक (१ विज्ञान / गणित, १ भाषा, १ समाजशास्त्र) शिक्षक अनुज्ञेय राहतील.

**२.२.३** विद्यार्थी संख्या १०५ पेक्षा अधिक झाल्यास ३५ च्या पटीमध्ये १ अतिरिक्त शिक्षक अनुज्ञेय राहील. मात्र प्रत्येक शिक्षकासाठी एक वर्ग खोली असणे आवश्यक आहे. अन्यथा जादा शिक्षक पद मंजूर करु नये.

शासनाच्या उपरोक्त आदेशानुसार श्री साईबाबा इंगिलश मिडीयम स्कुल, शिर्डी इयत्ता ८ वी ते १० वी ची माध्यमिक शाळा असून एकूण ५३० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. माध्यमिक शाळा ही दुपारचे सत्रात दुपारी १२.३० ते ०५.३० या वेळेत भरविण्यात येत असून शासनाने विहीत केलेल्या विद्यार्थी संख्येनुसार वर्ग खोल्या उपलब्ध आहेत.

१ ) शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये इयत्ता ९ वी व १० वी वर्ग तुकडीमध्ये नैसर्गिक वाढ होत असून एकूण २९५ विद्यार्थी नव्याने प्रवेशित होत आहेत. आर. टी. ई. अधिनियमानुसार इयत्ता ९ वी व १० वी प्रति तुकडी ६० विद्यार्थी याप्रमाणे ७ वर्ग तुकडी तयार होत असून एकूण ०९ सहा. शिक्षक अध्यापानासाठी असणे गरजेचे आहे.

२ ) शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये इयत्ता ८ वी वर्ग तुकडीमध्ये नैसर्गिक वाढ होत असून एकूण २३५ विद्यार्थी नव्याने प्रवेशित होत आहेत. आर. टी. ई. अधिनियमानुसार इयत्ता ८ वी प्रति तुकडी ४० विद्यार्थी याप्रमाणे ५ वर्ग तुकडी तयार होत असून ०७ सहा. शिक्षक अध्यापानासाठी असणे गरजेचे आहे.

श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, शिर्डी माध्यमिक विभागासाठी आवश्यक लागणारे सहा. शिक्षक संच मान्यता मिळणेकामी अहमदनगर जिल्हा परिषद यांचेकडे पाठपुरावा करण्यात आला होता. उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये अहमदनगर जिल्हा परिषद यांचेकडून माध्यामिक विभागासाठी विद्यार्थी संख्येनुसार खालीलप्रमाणे शिक्षक संच मान्यता मिळालेली आहे.

शैक्षणिक वर्ष २०१६ -१७, २०१७- १८ व २०१८-१९ माध्यमिक विभाग मंजूर शिक्षक पदे

| अ.नं. | पदाचा तपशिल | शै.वर्ष २०१६-१७ असलेले मंजूर पदे | शै.वर्ष २०१७ -१८ मंजूर झालेली पदे | शै.वर्ष २०१८ -१९ मंजूर झालेली पदे | २००९ आकृती बंधात मंजूर असलेले पदे | सध्या कार्यरत असलेले पदे कंत्राटी | एकूण कार्यरत संख्या | इ. ८ वी ते १०वी एकूण विद्यार्थी संख्या | नियमानुसार एकूण आवश्यक पदे | एकूण रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | मुख्याध्यापक | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०१ | --- | ०१ | ०० |
| ०२ | पदवीधर इ.९ वी ते १०वी | ०३ | ०७ | ०८ | ०५ | ०१ | ०६ | २९५ | ०९ | ०३ |
| ०३ | पदवीधर इ.८ वी | ०१ | ०५ | ०४ | ०२ | ०२ | ०४ | २३५ | ०७ | ०३ |
| ०४ | संगणक शिक्षक | --- | -- | -- | ०१ | -- | ०१ | --- | ०१ | ०० |
| | एकूण | ०५ | १३ | १३ | ०९ | ०३ | १२ | ५३० | १८ | ०६ |

विभागाचा अभिप्रायः- उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये आर.टी. ई. अधिनियमानुसार अहमदनगर जिल्हा परिषद यांचेकडून सन २०१७-१८ अखेर शिक्षक संच मान्यता मिळालेली आहे. सन २०१८-१९ ची संच मान्यतेचे पत्र अद्याप इकडील शाळेकडे प्राप्त झालेले नाही. उपरोक्त तक्त्यात सन २०१८-१९ मध्ये नमूद केलेली मान्यताप्राप्त शिक्षक पदे ही ऑनलाईन माहिती ही सरल डाटा मधील असून शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठीची आवश्यक शिक्षक पदे सदर शासन निर्णयाचे आधारे निश्चित केलेली आहे. तरी एकूण शालेय विद्यार्थी संख्येनुसार माध्यमिक विभागासाठी नवीन शिक्षक पदे भरती करावी लागणार आहे. सदर नवीन शिक्षक मंजूर पदांचा संस्थान आकृतीबंधात समावेश करण्यात आलेला नाही.

आजमितीस शिक्षक पदे मंजुरी नसल्याने वाढीव वर्ग तुकडींचे एकत्रीकरण करुन अध्यापनाचे काम करण्यात आले आहे. सन २०१९-२० शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना अध्यापनासाठी शिक्षक उपलब्ध नसल्याने नवीन शिक्षक भरती करणे अत्यंत गरजेचे आहे .

इकडील कार्यालयाकडील दि.१५ ०५.२०१९ रोजीचे टिपणीवर मा.मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी, "कर्मचा-यांची सेवा तात्पुरती वर्ग करण्यास मान्यता दिलेली आहे.." असे निर्देश दिले आहे. त्यानुसार कामगार विभागामार्फत दि. १६/०३/२०१९ प्राप्त संस्थानमधील कंत्राटी कर्मचारी यादीचे अवलोकन केले असता त्यांचेकडील यादीमध्ये शैक्षणिक पात्रतेनुसार एकूण १० पैकी ०३ कर्मचारी पात्र आहे.

आकृतीबंधात शिक्षक पदे मंजुरी नसल्याने वाढीव वर्ग तुकडींचे एकत्रीकरण करुन अध्यापनाचे काम करण्यात येत आहे. त्यामुळे सन २०१९-२० शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना अध्यापनासाठी उपलब्ध वर्ग खोल्यानुसार किमान शैक्षणिक अर्हता - बी.ए.बी.एड. ( इंग्रजी माध्यम - इंग्रजी स्पे., इतिहास ) ०१ शिक्षक , बी.ए.बी.एड. - इंग्रजी स्पे., भुगोल ) ०१ शिक्षक, बी.ए.बी.एड. (हिंदी स्पे.) ०१ , बी.ए.बी.एड. ( मराठी ) ०१

शिक्षक, बी.एस्सी .बी.एड. ०१ शिक्षक, इयत्ता १२ वी ए. टी. डी. ( कला ) ०१ असे एकूण ०६ शिक्षक नेमावे लागत असून या यादीत केवळ ०३ शिक्षक उमेदवार पात्र आहेत.

सदर यादीमध्ये स्पे. इंग्रजी विषय असलेला ०२ शिक्षक तसेच बी.ए.बी.एड.- स्पे. हिंदी ०१ शिक्षक असे एकूण तीन शिक्षक उपलब्ध नसल्याने एकूण ०३ नवीन शिक्षक भरती करावी लागणार आहे. तसेच सन २०१८-१९ मध्ये प्राप्त संच मान्यतेनुसार श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल विभागाकडील आकृतीबंधामध्ये बदल करणेबाबतचा प्रस्ताव स्वंतत्र सादर करण्यात येत आहे.

विभागाची मागणीः-

माध्यमिक विभागः- तरी प्रास्ताविकात नमुद वस्तुस्थिती व विभागाचा अभिप्राय यांचा विचार करता माध्यमिक विभागात वर्ग तुकडीमध्ये होत असलेली नैसर्गिक वाढ, उपलब्ध वर्ग खोल्यांची संख्या व मा.शिक्षणाधिकारी यांचेकडील मंजुर संच मान्यता या सर्व बाबींचे अवलोकन करता कामगार विभागाकडून दि. १६/०३/२०१९ चे प्राप्त यादीतील परिशिष्ठ अ मधील अ. नं. ०२ व ०६ तसेच परिशिष्ठ ब मधील अ. नं. ०१ हे अमेदवार त्यांचे शैक्षणिक पात्रतेनुसार पात्र होत असून या ०३ उमेदवारांची त्रयस्थ तज्ञांच्या उपस्थितीत मुलाखती घेऊन पात्र कंत्राटी कर्मचा-यांची सेवा शाळेकडे अध्यापन करणेकामी तात्पुरत्या स्वरुपात वर्ग करणेस तसेच कामगार विभागाकडील परिशिष्ठ अ व ब यादीचे विरहीत स्पे. इंग्रजी विषय असलेले ०२ शिक्षक व बी.ए.बी.एड. स्पे. हिंदी ०१ शिक्षक असे एकूण ०३ शिक्षक कंत्राटी पद्धतीने अथवा आऊटसोर्स पद्धतीने घेणेस मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२९७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिक्षणाधिकारी यांचेकडील मंजूर संच मान्यतेनुसार संस्थानचे कामगार विभागाकडील शैक्षणिक पात्रतेनुसार पात्र उमेदवारांची मुलाखत घेऊन पात्र कंत्राटी कर्मचा-यांची सेवा श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलकडे अध्यापन करणेकामी तात्पुरत्या स्वरुपात वर्ग करणेस तसेच बी.ए.बी.एड. इंग्रजी स्पेशल विषय असलेले ०२ शिक्षक व बी.ए.बी.एड. हिंदी स्पेशल विषय असलेला ०१ शिक्षक असे एकूण ०३ शिक्षक बाहय यंत्रणेमार्फत कंत्राटी पद्धतीने ११ महिने कालावधीसाठी घेण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४१** **श्रीमती वेरोनिका काशिनाथ पंडीत,परिचारीका, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे विषयी घेण्यात आलेल्या ॲड अशोक पाटील, अहमदनगर व ॲड नितिन भवर,ॲडव्होकेट औरंगाबाद यांचे कायदेशीर अभिप्रायबाबत.**

**प्रस्ताव** श्रीमती पंडीत वेरोनिका काशिनाथ या दि. ०२/०५/२००६ पासून परिचारीका या पदावर संस्थान सेवेत होत्या. मा. व्यवस्थापन समितीचे दि. २६/०३/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २५१ नुसार दि. ०९/०६/२०११ रोजीच्या आदेशान्वये कु. पंडीत यांचे नांव दि. १३/०६/२०११ पासून संस्थानचे हजेरी पटावरुन कमी करण्यात आलेले आहे. सदर आदेशाविरुद्ध श्रीमती वेरोनिका काशिनाथ पंडीत, बडतर्फ परिचारीका, श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी विरुद्ध मा. कामगार न्यायालय अहमदनगर येथे रेफरन्स (आयडीए) नं. ६१/२०१४ दि. ०८/०४/२०१५ रोजी दाखल केलेली होती. त्यात दि. २६/०६/२०१८ रोजी न्यायनिवाडा केला आहे.

मा. कामगार न्यायालयाने दिलेल्या न्यायनिवाड्याविरुद्ध मा. उच्च न्यायालयात खंडपीठ औरंगाबाद येथे श्रीमती वेरोनिका काशिनाथ पंडीत यांचेविरुद्ध रीट पिटीशन क्र. ११४६३/२०१८ दाखल करण्यात आली होती. त्यात मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यानी दि. १६/१०/२०१८ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

12. When the Labour Court delivered the impugned judgment, the respondent was said to have undertaken fresh employment with another organization. No litigant is expected to starve during the period of unemployment. If an alternate employment is taken up, the law is settled that backwages can be deprived. If the respondent does not desire to join duties pursuant to the judgment and award of the Labour Court, it would be a different situation which can be dealt with by the petitioner / Management on its own merits. Refusing continuity of service merely because a terminated employee undertakes an alternate employment for keeping his or her mind, body and soul together, would not disentitle her from continuity in service.

13. In view of the above, I do not find that the impugned judgment and award could be termed as being perverse or erroneous. This petition, being devoid of merit is, therefore, dismissed.

श्रीमती वेरोनिका काशिनाथ पंडीत यांनी दि. १५/०६/२०१८ रोजी १. आरोग्य शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, २. एम.यु.एच.एस., नाशिक, ३. महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल, मुंबई, ४. शिवा ट्रस्ट, औरंगाबाद, ५. सेवा नर्सिंग कॉलेज, श्रीरामपुर, ६. साखर कामगार हॉस्पिटल ट्रस्ट, श्रीरामपुर यांचेविरुद्ध रीट पिटीशन क्र. ६३३२/२०१८ दाखल केली असुन रीट मेमोतील परिच्छेद क्र. ०९ मध्ये एका ठिकाणी Petitioner has completed her B.S.C. Nursing in the year 2007 and joined as a Tutor / Clinical Instructor from academic year 2007 with respondent No. 5. She was there till the year 2010 and thereafter petitioner joined the post Graduate course in the yar education year 2010 for M.S.C. Nursing. For ready reference hereto annexed and marked as ANNEXURE – B is the copy of experience certificate dated 30.07.2010 issued by respondent No. 5. असे नमुद केले आहे. श्रीमती पंडीत यांनी महाराष्ट्र शासनाविरुद्ध दाखल केलेल्या रीट पिटीशन मध्ये त्या सन २००७ पासुन सन २०१० पर्यंत ट्युटर / क्लिनीकल इंस्ट्रक्टर या पदावर सेवा नर्सिंग कॉलेज, श्रीरामपुर येथे कार्यरत होत्या, हे त्यांनी मान्य केलेले आहे. याचा अर्थ त्यांनी संस्थान रुग्णालयात नोकरीत असताना संस्थानची फसवणुक करुन दुस-या संस्थेत नोकरी केलेली आहे.

श्रीमती पंडीत यांना दि. १३/०६/२०११ रोजी वेतनबॅण्ड रु. ९३००-३४८००, मुळ वेतन रु. ९,७१०/-, ग्रेड पे रु. ४,२०० नुसार वेतन देण्यात येत होते. मा. कामगार न्यायालय अहमदनगर रेफरन्स (आयडीए) नं. ६१/२०१४ मधील दि. २६/०६/२०१८ रोजीचा न्यायनिवाडा व मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचा रीट पिटीशन क्र. ११४६३/२०१८ दि. १६/१०/२०१८ रोजीचे आदेशानुसार श्रीमती वेरोनिका काशिनाथ पंडीत यांना परिचारीका या पदावर दरम्यानच्या काळातील वेतनाशिवाय दि. १३/०६/२०११ पासून पुढे संस्थान सेवेत सलग सेवा धरुन त्यांना मिळत असलेल्या शेवटचे वेतनबॅण्ड रु. ९३००-३४८००, मुळ वेतन रु. ९,७१०/- + ग्रेड वेतन रु. ४,२००/- नुसार होणा-या वेतनावर पूर्ववत कामावर हजर करुन घेणेबाबत तसेच सन २००७ ते सन २०१० या कालावधीत संस्थानमध्ये नोकरी करत असताना, दुस-या संस्थेत नोकरी केल्याबाबत विचारात घेऊन निर्णय घेणेबाबत प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि. १३/१२/२०१८ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता. त्यावर विषय नं. ४०, निर्णय क्र. ७६७ अन्वये, "यावर सविस्तर चर्चा होऊन, मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचा रिट पिटीशन क्र. ११४६३/२०१८ दि. १६/१०/२०१८ रोजीचे आदेशानुसार श्रीमती वेरोनिका काशिनाथ पंडीत यांना परिचारीका या पदावर दरम्यानच्या काळातील वेतनाशिवाय दि. १३/०६/२०११ पासुन पेढे संस्थान सेवेत सलग सेवा धरुन त्यांना मिळत असलेले शेवटचे वेतनबॅण्ड रु. ९३००-३४८००, मुळ वेतन रु. ९,७१०/- + ग्रेड वेतन रु. ४,२००/- नुसार होणा-या वेतनावर पुर्ववत कामावर हजर करुन घेण्यात यावे", असे ठरले.

तसेच श्रीमती पंडीत यानी सन २००७ ते सन २०१० या कालावधीत संस्थानमध्ये नोकरी करत असताना दुस-या संस्थेत नोकरी केलेबद्दल त्यांचेविरुद्ध करावयाच्या कायदेशीर कारवाईबाबत संस्थानचे वकीलांचा सल्ला घेऊन सविस्तर प्रस्ताव मा. व्यवस्थापन सभेसमोर सादर करावा." असा निर्णय पारीत करण्यात आला आहे.

उपरोक्त निर्णयाप्रमाणे श्रीमती वेरोनिका पंडीत यांना दि. १०/०१/२०१९ पासुन कामावर हजर करुन घेणेत आलेले आहे. ॲड. नितीन भवर यांना दि. ०७/०१/२०१९ रोजीचे पत्रान्वये कायदेशीर सल्ला देणेबाबत कळविणेत आले होते. सदर पत्रास अनुसरुन, ॲड. नितीन भवर, सिनीयर ॲडव्होकेट, खंडपीठ औरंगाबाद यांनी दि. २३/०१/२०१९ चे प्रमाणे कायदेशीर सल्ला दिलेला आहे –

With reference to the subject cited above, I have to state that, I have gone through the Writ Petition No 11463/2018 filed by Shri Saibaba Sansthan Trust, Writ Petition No. 6332/2018 and Reference (IDA) No. 61/2014 filed by Smt. Veronika Pandit and the judgement and order dated 26.02.2018 passed by the Labour Court at Ahmednagar etc. carefully and on understanding the same, I giving my legal opinion as follows –

1. As you know that, Smt. Veronika Kashinath Pandit was working as staff nurse in the Hospital run by Shri Saibaba Sansthan Trsut for the period from 02.05.2006.

On 09.06.2011 the managing committee of Shri Saibaba Sansthan Trust adopted a Resolution No. 09.06.2011 for terminating the services of Smt. Veronika Kashinath Pandit and in pursuance of the said Resolution Smt. Veronika Kashinath Pandit was terminated w.e.f. 13.06.2011. The said termination order was challenged by Smt. Veronika Kashinath Pandit by filing Refernece (IDA) No. 61/2014 before the Labour Court at Ahmednagar. However, the Learned Presiding Officer, 2nd Labour Court at Ahmednagar pass his judgment and award on 26.06.2018 partly answering the reference (I.D.A.) No. 61/2014 in affirmative holding the termination of Smt. Veronika Kashinath Pandit is illegal, improper. The learned Presiding Officer, 2nd Labour Court at Ahmednagar also directed Shri Saibaba Sansthan Trust to reinstate Smt. Veronika Kashinath Pandit in services with continuity of services w.e.f. 13.06.2011, but without back wages. Thereafter, Shri Saibaba Sansthan Trust filed Writ Petition No. 11463/2018 in Hon'ble High Court, challenging the judgment and order dated 26.06.2018. During course of hearing on Writ Petition No. 11463/2018 it was came to the knowledge that, Smt. Veronika Kashinath Pandit filed writ Petition No. 6332/2018 before the Division Bench of the Hon'ble High Court specifically contending that she was working with Seva Nursing College, Shrirampur for the period from 01.08.2007 to 04.08.2010 and to that effect a Certificate of Experience is also issued to her by Seva Nursing College, Shrirampur on 30.07.2010. The said fact is observed by Hon'ble High Court in paragraph No. 10 of its judgment and order passed in Writ Petition No. 11463/2018. In view of this position, it is very much clear that from 02.05.2006 to 13.06.2011 Smt. Veronika Kashinath Pandit was working with Seva Nursing collegege, Shrirampur and she drawn salary for the said period from the said college. Hence, it means that Smt. Veronika Kashinath Pandit was simultaneously worked with two institutions viz. Shri Saibaba Sansthan Trust & Seva Nursing College, Shrirampur.

2. Therefore, as per my view and legal opinin stringent action should be taken against Smt. Veronika Kashinath Pandit by way of initiating Departmental Enquiry against her. Simultaneiously, Shri Saibaba Sansthan may also initiate Criminal Proceedings against Smt. Veronika Kashinath Pandit for cmommitting breach of trust and fraud. These two proceedins are permissible in law.

तसेच ॲड. अशोक पाटील, कामगार कायदे सल्लागार, अहमदनगर यांना दि. ०७/०१/२०१९ रोजीचे पत्रान्वये कायदेशीर सल्ला देणेबाबत कळविणेत आले होते. सदर पत्रास अनुसरुन, त्यांनी दि. ३०/०४/२०१९ चे पत्रान्वये खालीलप्रमाणे सल्ला दिलेला आहे –

I have perused your letter dt. 07/01/2019 and reply thereto. I would like to furnish my opinion as below :

1. It has been bought to my notice that Smt. Veronika Kashinath Pandit, Staff Nurse was working as a tutor / Clinical Instructor during a period from 2007 to 2010 at Seva Nursing College, Shrirampur. However this act of her double employment was intentionally suppressed by her which appears on the face of record.

2. It has also been brought to my notice that Smt. Veronica Pandit has filed Writ Petition No. 6332/2018 before Hon High Court bench Aurangabad and in the said writ petition also she has stated her grade of employment with Seva Nursing College, Shrirampur. Meaning thereby she was working else where though she was in employment of Saibaba Hospital during the period from 2007 to 2010.

3. This conduct of Smt. Veronica Pandit amounts to a serious misconduct in the eye of law and therefore in my opinion we should initiate a disciplinary action against

her. It is also advisable to follow the proper procedure of enquiry by giving her full and fare opportunity of hearing.

तरी उपरोक्त विषयावर निर्णय होणेस्तव विनंती.

**निर्णय क्र.२९८** **सदरचा विषय स्थगित ठेवण्यात आला.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४२** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील आवश्यक वैद्यकीय अधिकाऱ्यांचे रिक्त पदे जाहिरात प्रसिध्द करुन तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने भरणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद-** कलम १३ (४) नुसार समितीस संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यां व्यतिरिक्त) व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल.

परंतु ज्या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजार रुपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-याची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत केली जाणार नाही. आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. ३ "सदर पदांवर नव्याने नियुक्ती करताना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिद्धी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी" तसेच अट शर्त अ.नं. ८ मध्ये "समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पद्धतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही" असे नमुद आहे.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.-

१) मा. व्यवस्थापन समिती दि. २३/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र ३५७.

श्री साईबाबा संस्थान रूग्णालयातील वैद्यकीय अधिका-यांच्या रिक्त पदांचा प्र वैद्यकिय संचालक यांनी आढावा घेऊन, आवश्यक पदे जाहिरातीद्वारे ११ महिने कालावधीसाठी अथवा स्थायी स्वरूपात नेमणूक होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत आकृतीबंधातील संबंधीत पदांचे वेतनश्रेणीच्या (मुळ वेतन + ग्रेड पे + महागाई भत्ता + एनपीए) जवळपासचे मानधनावर कंत्राटी पध्दतीने घेणेस व त्यांना संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देणेस मान्यता देण्यात आली.

तसेच मा. डीन, बी.जे. मेडीकल कॉलेज, पुणे यांनी प्रस्तावीत केलेल्या सेवाप्रवेश नियमानुसार विहीत पध्दतीने जाहिरात प्रसिध्द करणेत यावी व विहीत मुदतीत अर्ज मागणविणेत येऊन, पात्र अर्जदारांच्या Walk-in-Interview घेण्यात याव्यात. यासाठी पुढीलप्रमाणे समिती गठीत करणेत आली. १) मा कार्यकारी अधिकारी २) उपकार्यकारी अधिकारी ३) जिल्हा शल्य चिकीत्सक किंवा त्यांचे प्रतिनिधी ४) वैद्यकीय संचालक ५) वैद्यकीय अधिक्षिका. या निवड समितीने Walk-in-Interview मध्ये पात्र ठरणा-या उमेदवारांची यादी जाहीर करावी. त्यानंतर या निवड यादीवर हरकती मागविणेत याव्यात व हरकती विचारात घेऊन नेमणूक आदेश देण्यात यावे. याचबरोबर श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयाकडील वैद्यकिय प्रशासनातील पदे (वैद्यकिय संचालक, वैद्यकिय अधिक्षक इ.) स्थायी स्वरूपात स्वतंत्र जाहिरातीद्वारे भरणेत यावीत, असे ठरले

२) मा. व्यवस्थापन समिती दि. २५/०७/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र ६०३.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान रूग्णालयातील रिक्त पदे तात्पुरत्या स्वरूपात भरती करणेकामी दि. २०/०६/२०१७ रोजी घेणेत आलेल्या मुलाखतीचे इतिवृत्ताचे अवलोकन करण्यात येऊन, त्याची नोंद घेण्यात आली व त्याप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देणेत आली. तसेच ज्या पदांवर उमेदवार उपलब्ध झालेले नाही अथवा ज्या पदावर नेमणूक आदेश देऊनही उमेदवार हजर झालेले नाहीत अथवा आकृतीबंधास अनुसरून, वैद्यकीय अधिका-यांच्या इतरही रिक्त जागा भरणेची आवश्यकता आहे, अशा पदांसाठी फेरजाहिरात देण्यात यावी. तसेच श्री साईनाथ रूग्णालयातील पदे प्राधान्याने भरावीत, असे ठरले.

प्रस्तावना- श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ह्दयरोग, मेंदूरोग, आर्थोपेडीक सर्जरी, जनरल सर्जरी, मेडीसीन, सोनोग्राफी, रेडीओलॉजी इ. विभाग सुरू आहेत. तसेच शासनाची महात्मा ज्योतीबा फुले ही स्कीमही सुरू असुन सदर स्कीमद्वारे ऑपरेशन करणेकरीता रूग्ण दुरहुन येत असतात. तसेच श्री साईनाथ रूग्णालयात मेडीसीन, जनरल सर्जरी, आर्थोपेडीक सर्जरी, स्कीन, सोनोग्राफी, ईएनटी, बालरोग विभाग इ. विभाग सुरू आहेत. श्री साईनाथ रूग्णालयात आलेल्या सर्व रूग्णांचे रूग्णालयात सुविधा उपलब्ध असलेल्या सर्व रोगांवर मोफत उपचार केले

जातात. नगर-मनमाड रोडवर संस्थान रूग्णालयासारखे मोठे अद्यावत दुसरे रूग्णालय नसल्याने तसेच साईबाबांचे विश्वासाने रूग्ण उपचारासाठी संस्थानचे दोन्ही रूग्णालयात दुरहुन येत असतात. दोन्ही रूग्णालयास २०० खाटांची मंजुरी होती. आता दोन्ही रूग्णालयास ३०० खाटांची परवानगी मिळालेली असुन त्यानुसार खाटा वाढविलेल्या आहेत.

यापुर्वी दि. ०१/०१/२०१९ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीस अनुसरून दि. ११/०१/२०१९ रोजी घेतलेल्या मुलाखतीतुन ३० उमेदवारांची निवड करणेत आली होती. त्यानुसार त्यांना नेमणूक आदेश देणेत आले आहेत त्यातील २० उमेदवार कामावर हजर झाले आहेत.

प्र वैद्यकीय संचालक व प्र वैद्यकीय अधिक्षीका यांचे सुचनेनुसार परिशिष्ट क्र १ मध्ये नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल ३८ व श्री साईनाथ रूग्णालय १२ अशी एकुण ५० रिक्त पदे भरणेची आवश्यकता आहे.

१. परिशिष्ट क्र १ मधील अ.नं ०२ (बालरोग तज्ञ) हे पद श्री साईबाबा हॉस्पिटलचे आकृतीबंधात मंजुर आहेत. मात्र संबंधीत विभाग फक्त श्री साईनाथ रूग्णालयात कार्यरत असल्याने सदर पदांवरील नेमणूक श्री साईनाथ रूग्णालयात करता येईल.

२. परिशिष्ट क्र १ मधील अ नं ०४ श्री साईबाबा हॉस्पिटलचे आकृतीबंधात कनिष्ठ भुलतज्ञ मंजूर ०९ पदांपैकी ०१ पद भरलेले असुन उर्वरित ०७ पदांपैकी ०४ पदे श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये व ०३ पदे श्री साईनाथ रूग्णालयात भरता येतील.

३. परिशिष्ट क्र १ मधील अ नं १४ श्री साईबाबा हॉस्पिटलचे आकृतीबंधात कनिष्ठ अतिदक्षता तज्ञ मंजूर ०६ पदांपैकी ०२ पदे भरलेली असुन ०१ पद श्री साईबाबा हॉस्पिटल व ०१ पद श्री साईनाथ रूग्णालयात भरता येईल.

४. परिशिष्ट क्र १ मधील अ.नं १४ (स्त्रीरोग तज्ञ) हे पद श्री साईबाबा हॉस्पिटलचे आकृतीबंधात मंजुर आहेत. मात्र संबंधीत विभाग फक्त श्री साईनाथ रूग्णालयात कार्यरत असल्याने सदर पदांवरील नेमणूक श्री साईनाथ रूग्णालयात करता येईल.

५. परिशिष्ट क्र १ मधील श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयातील अ.नं. १ मध्ये फिजिशियन ची एकुण ०६ पदे मंजुर असुन एकच पद भरलेले आहे. सदरचे पद भरणेकरीता वेळावेळी जाहीरात प्रसिध्द करणेत आलेली आहे. परंतु फिजिशियन चे पद रिक्तच आहे. तरी जाहीरात प्रसिध्द केलेली नसतांना फिजिशियन या पदासाठी अर्ज आल्यास एकत्रित मानधन व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देऊन नेमणूक देता येईल.

निवड समितीने निवड केलेल्या उमेदवारांना तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने नेमणूक देऊन आकृतीबंधातील संबंधीत पदांचे वेतनश्रेणीच्या जवळपासचे (मुळ वेतन+ग्रेड पे+महागाई भत्ता+एनपीए) मानधन व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता ज्या रूग्णालयात नेमणूक दिली जाईल त्याप्रमाणे देता येईल.

विभागाचा अभिप्राय- तरी, आवश्यक वैद्यकीय अधिका-यांची परिशिष्ट १ मध्ये नमुद केलेप्रमाणे रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरणेकामी विस्तृत जाहिरात संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करता येईल तसेच संक्षिप्त स्वरूपात जाहिरात (इंग्रजी व मराठी भाषेत) दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करता येईल.

जाहीरातीस अनुसरून आलेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेणेकामी १) मुख्य कार्यकारी अधिकारी २) उप मुख्य कार्यकारी अधिकारी ३) जिल्हा शल्य चिकीत्सक किंवा त्यांचे प्रतिनिधी ४) वैद्यकीय संचालक ५) वैद्यकीय अधिक्षिका यांची समिती गठीत करणेत यावी. गठीत केलेल्या समितीने निवड केलेल्या उमेदवारांची निवड यादी संस्थानचे संकेतस्थळावर जाहीर करून नेमणूक आदेश देता येईल. तसेच फिजिशियन या पदासाठी जाहीरातीव्यवतीरीक्त इतर वेळेस उमेदवाराने अर्ज केल्यास पात्र उमेदवारास एकत्रित मानधन व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देऊन थेट नेमणूक करणेस मान्यता असावी.

उपरोक्तप्रमाणे कार्यवाहीस करणेस तसेच जाहीरातीसाठी येणा-या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

मान्यतेस्तव सादर.

निर्णय क्र.२९९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील आवश्यक वैद्यकीय अधिकाऱ्यांचे रिक्त पदे भरेणकामी दैनिक वर्तमान पत्रामध्ये व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात यावी, तसेच उमेदवारांच्या मुलाखती घेणेकामी मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा शल्य चिकीत्सक किंवा त्यांचे प्रतिनिधी , वैद्यकीय संचालक व वैद्यकीय अधिक्षीका यांची समिती गठीत करण्यात येऊन, या समितीते निवड केलेल्या उमेदवारांची निवड यादी संस्थानचे संकेतस्थळावर जाहीर करुन नेमणूक आदेश देण्यात यावे,असे ठरले. तसेच फिजिशियन या पदासाठी जाहिराती व्यतिरीक्त इतर वेळेस उमेदवाराने अर्ज**

केल्यास पात्र उमेदवारास एकत्रित मानधन व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देऊन थेट नेमणूक करण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.४३ श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजना, HMIS संगणकीय प्रणाली करीता व इतर विभागाकरीता 10MBPS Internet Lease Line सुविध खरेदी करणेबाबत.

प्रस्ताव श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना, HMIS संगणकीय प्रणाली करीता व इतर विभागांकरीता 10 MBPS Internet Lease Line सुविधा खरेदी करणेबाबत.

| | | |
|---|---|---|
| 1. | कामाचेनाव | श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना, HMIS संगणकीय प्रणाली करीता व इतर विभागांकरीता 10 MBPS Internet Lease Line सुविधा खरेदी करणेबाबत. |
| 2. | प्रशासकीय मान्यता | दि. 20/11/2018 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. 708. |
| 3. | अंदाजीत रक्कम | रु. 6,72,100/- |
| 4. | प्रस्तावित कामाबाबत माहिती | श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना, HMIS संगणकीय प्रणालीकरीता व इतर विभागांकरीता10 MBPS Internet Lease Line सुविधा (3 वर्षकालावधीसाठी) खरेदीकरणे कामी,विविध पुरवठा धारकांकडून अंदाजीत दरपत्रके मागवून सदरहू प्रस्ताव दि. 20/11/2018 रोजीचेमा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये निर्णयास्तव सादर केला असता, निर्णय क्र. 708 अन्वये सदरहू कामीच्या अंदाजीत एकूण रक्कम रु. 6,72,100/-मात्रचे येणाऱ्या खर्चास व सदरहूकामी ई-निविदा प्रक्रीया राबविणेकामी मान्यता देण्यात आलेली आहे. |
| 5. | निविदा तपशिल | त्या नुसार सदरहूकामी महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळावर दि. 19/12/2018 ते दि. 03/01/2019 रोजी पर्यंत जाहिरात प्रसिद्ध करण्यात येऊन निविदाधारकांच्या शंका निरसन करणेकामी दि. 24/12/2018 रोजी प्री-बीड मिटींग स.11.00 वा. संस्थानचे साईनिवास अथितीगृह, शिर्डी. येथे ठेवण्यात आलेली होती.<br>सदर प्री-बीड मिटींगमध्ये उपस्थित असलेल्या विविध कंपन्यांनी ई-निविदे मधील नमुद अटी/शर्तीबाबत विचारलेल्या प्रश्नांचा खुलासा व ई-निविदेमध्ये केलेले बदल, दि. 29/12/2019 रोजी महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येऊन, निविदाधारकांना निविदा भरणेकामी पुरेसा कालावधी मिळणेकामी सदरहू ऑनलाईन निविदेस दि. 14/01/2019 पर्यत मुदतवाढ देण्यात आलेली होती. त्यानुसार,दि. 14/01/2019 रोजी पर्यंत 3 निविदा प्राप्त झालेल्या होत्या. तथापी, भारत संचार निगम लिमीटेड यांचा दि. 14/01/2019 रोजी प्राप्त झालेल्या ई-मेल नुसार सदरहू ऑनलाईन निविदेस दि. 19/01/2019 रोजीपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती.<br>त्यानुसार, सदरहूकामी प्राप्त झालेल्या 4 पुरवठाधारकांच्या ऑनलाईन तांत्रिक निविदा दि. 22/01/2019 रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेमध्ये उघडण्यात आल्या असता, तांत्रिक निविदेच्या पात्र/अपात्र तक्त्यानुसार सर्व पुरवठाधारक हे अपात्र झालेले होते.<br>त्यामुळे, दि. 04/02/2019 रोजीचे टिपणी अन्वये सदरहू ई-निविदा प्रक्रीया रद्द करणेस व पुनश्चः फेर ई-निविदा प्रक्रीया राबविणेस मान्यता घेण्यात येऊन दि.14/02/2019 ते<br>दि.21/02/2019 रोजीपर्यंत संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली होती. तद्नंतर, दि. 20/02/2019 रोजी भारत संचार निगम.लि. यांचा ई-मेल प्राप्त झालेला असून त्यावर मा. उपजिल्हाधिकारी यांनी निविदा भरणेकामी दि. 25/02/2019 रोजीपर्यंत मुदवाढ देणेबाबत निर्देश दिलेले असल्यामुळे, सदरहू ऑनलाईन ई-निविदेच्या कलावधीस दि. 25/02/2019 रोजीपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती.<br>सदरहू कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या 3 पुरवठाधारकांच्या ऑनलाईन तांत्रिक निविदा<br>दि.01/03/2019 रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेमध्ये उघडण्यात आल्या असता, तांत्रिक निविदेच्या पात्र/ अपात्र तक्त्यानुसार सर्व पुरवठाधारक हे पात्र झालेले असलेमुळे सदरचे सर्व पुरवठाधारकांच्या वाणिज्यिक निविदा दि. 07/03/2019 रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेसमोर उघडण्यात आलेल्या आहेत. |
| अ | निविदा कालावधी | फेर निविदा कालावधी -12 दिवस |
| ब | तांत्रिक निविदा उघडणेची दिनांक | दि. 01/03/2019 रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेसमोर समक्ष उघडण्यात आलेल्या आहेत. |
| क | निविदा प्रक्रीयेत भाग घेणाऱ्या ठेकेदारांची संख्या | 03 |
| ड | सर्व निविदाधारकांनी संकेतस्थळावर कागदपत्रे जमा केलेले आहेत काय ? | सर्व निविदाधारकांनी संकेतस्थळावर ऑनलाईन कागदपत्रे जमा केलेले आहेत. |
| इ | सर्व निविदाधारकांनी सुरक्षा अनामत रक्कम (EMD) जमा केलेली आहे काय ? | होय, ऑनलाईन जमा केलेली आहे. |
| ई | वाणिज्यिक निविदा उघडणेची दिनांक | दि. 07/03/2019 रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेसमोर समक्ष उघडण्यात आलेल्या आहेत. |

6. तांत्रिक दृष्टया पात्र ठेकेदारांच्या वाणिज्यिक दरांचा तपशिल -

| Sr. No. | Description of Work/ Item(s) | No. of Qty | Units | Reliance JioInfocomm Ltd. | | MAXTECH BROADBAND PRIVATE LIMITED | | Bhart Sanchar Nigam Ltd. | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Rate Without Tax | Rate With Tax | **Rate Without Tax** | **Rate With Tax** | Rate Without Tax | Rate With Tax |
| 1.0 | 10 MBPS (1:1) Internet lease line | | | | | | | | |
| 1.1 | Supply, Installation, Integration & Commissioning of 10 MBPS (1:1) Internet lease line with 16 Static IP's Version V4 for three Yeares. | 1.00 | Years | 360000.00 | 424800.00 | 300000.00 | 354000.00 | 420000.00 | 495600.00 |
| | **Total in Figures** | | | 360000.00 | 424800.00 | 300000.00 | 354000.00 | 420000.00 | 495600.00 |

7. निम्नत्तमनिविदाधारकाचातपशिल –

| Sr. No. | Description of Work/ Item(s) | No. of Qty | Units | MAXTECH BROADBAND PRIVATE LIMITED | |
|---|---|---|---|---|---|
| 1.0 | 10 MBPS (1:1) Internet lease line | | | Rate Without Tax | **Rate With Tax** |
| 1.1 | Supply, Installation, Integration & Commissioning of 10 MBPS (1:1) Internet lease line with 16 Static IP's Version V4 for three Yeares. | 1.00 | Years | 300000.00 | 354000.00 |
| **Total -** | | | | 354000.00 | |

| | | |
|---|---|---|
| 8. | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिडी. अधिनियम 2004 मधील तरतुदीनुसार निविदा स्विकारणेचे अधिकार | मा. व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी. |

उपरोक्त नमुद वाणिज्यिक निविदेच्या तक्तयातील गडद व अधोरेखीत केलेले M/s. MAXTECH Broadband Pvt. ltd. या पुरवठाधारकाने संस्थानला 3 वर्षकालावधीसाठी 10 MBPS Internet Lease Line सुविधा पुरविणेकामी एकुण रक्कम रु.3,54,000/-(सर्व करांसहीत) मात्र इतके दर नमुद कलेले असून, सदरचे पुरवठाधारक निम्नत्तम आहेत. त्यामुळे, M/s. MAXTECH Broadband Pvt. ltd. यापुरवठाधारकाशी चर्चा करून त्यांना कार्यादेश देता येईल, असे नम्र मत आहे.

तरी, श्री साईबाबा संस्थानचे दोन्ही हॉस्पिटलकरीता 3 वर्षकालावधीसाठी 10 MBPS Internet Lease Line सुविधापुरविणेकामी, वाणिज्यिक निविदेच्या तक्तयातील गडद व अधोरेखीत केलेले M/s. MAXTECH Broadband Pvt. ltd. या पुरवठाधारकाने एकुण रक्कम रु.3,54,000 /- (सर्वकरांसहीत) मात्र इतके दर नमुद कलेले असून, सदरचे पुरवठाधारक निम्नत्तम आहेत. त्यामुळे, M/s. MAXTECH Broadband Pvt. ltd. या पुरवठाधारकाशी चर्चाकरून त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेकामी, सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.३००** **प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक M/s. MAXTECH Broadband Pvt. ltd. हे आजचे व्यवस्थापन समितीसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. समितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी रक्कम रु.३,५०,०००/-मात्र दर देऊ केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजना, HMIS संगणकीय प्रणाली करीता व इतर विभागाकरीता 10MBPS Internet Lease Line सुविध खरेदी**

करणेकामी निम्नतम निविदाधारक M/s. MAXTECH Broadband Pvt. ltd. यांनी चर्चेअंती देऊ केलेले रक्कम रु.३,५०,०००/-मात्र अंतिम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

आयत्या वेळेचा

**विषय नं.४४** **विद्युत विभागाकरीता इलेक्ट्रीकल मटेरीयल खरेदी करणेकामी उघडण्यात आलेल्या निविदांमधील न्युनतम दर निविदाधारकांशी वाटाघाटी / चर्चा होऊन निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव** विद्युत विभागाकरीता इलेक्ट्रीकल मटेरीयल खरेदी करणेकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य / वस्तुचा तपशिल | विद्युत विभागाकरीता इलेक्ट्रीकल मटेरीयल खरेदी करणेबाबत. |
| ०२ | मागणी | - |
| ०३ | ई-निविदा प्रसिध्दी | दि.२६-०२-२०१९ ते दि.१२-०३-२०१९ |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसुचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते ? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट, वर्तमानपत्रात व ई-मेल व्दारे. |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले ? | दि.२५-०२-२०१९ रोजी ८२ ठेकेदारांना ई-मेलव्दारे. |
| ०६ | निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ | दि.२६-०२-२०१९, वेळ सकाळी १०.०० वाजेपासून<br>टेक्निकल बीड दि. ३०-०५-२०१९, कमर्शियल बीड दि. ०५-०६-२०१९ |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या. | ०४ |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या. | ०४ |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | नमुने मागविण्यात आले नाही. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का. | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम भरलेली आहे. |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का. | ई-निविदेत नमूद केले आहे. |
| १२ | निविदाकारांनी सादर केलेले दर- खालीलप्रमाणे. | |

**०१). मे.इर्मजन्सी इलेक्ट्रॉनिक सिक्युरिटी (इं) प्रा.लि.,मुंबई यांचे आयटेमनुसार खालीलप्रमाणे न्युनतम दर येतात.**

| Sl.No | Description of Work / Item(s) | No.of Q | Units | Asian Sales Corporatio | | m/s laxmi enterprises | | Emergency Electron Security India Pvt Lt | | Shri sai electricals | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Rate | Amount | Rate | Amount | **Rate** | **Amount** | Rate | Amount |
| 1.00 | RCCB-30 MA Size - 4 POLE 63 A / 415 VOLT / 3 PHASE, Company - SIEMENS / L & T / HAGGER | 25.00 | Nos. | 3162.00 | 79050.00 | 2899.00 | 72475.00 | **2290.97** | **57274.25** | 2400.00 | 60000.00 |
| 3.00 | RCCB 4 POLE Size - 4 POLE 63 A / 415 VOLT / 3 PHASE, SENSITIVITY- 30 MA Company - LEGRAND / SIEMENS / L & T | 50.00 | Nos. | 3162.00 | 158100.00 | 2899.00 | 144950.00 | **2290.97** | **114548.50** | 2400.00 | 120000.00 |
| 5.00 | C. F. L.LAMP,Size- 11WATT, Company - CROMPTON / PHILIPS / HPL, Type - 3U | 1000.00 | Nos. | 202.00 | 202000.00 | 119.00 | 119000.00 | **77.62** | **77620.00** | 90.00 | 90000.00 |

**०२). मे.श्री साई इलेक्ट्रीकल्स, अस्तगांव यांचे आयटेमनुसार खालीलप्रमाणे न्युनतम दर येतात.**

| Sl.No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | Asian Sales Corporation | | m/s laxmi enterprises | | Emergency Electronic Security India Pvt Ltd | | Shri sai electricals | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Rate | Amount | Rate | Amount | Rate | Amount | **Rate** | **Amount** |
| 2.00 | WALL FAN, Size- 450 MM, Company - CROMTON / | 30.00 | Nos. | 5872.00 | 176160.00 | 5499.00 | 164970.00 | 5236.00 | 157080.00 | **5164.00** | **154920.00** |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | HAVELLS / ALMONARD Type - INDUSTRIAL FAN | | | | | | | | | |
| 4.00 | 6A BELL PUSH SIZE-MODULAR WHITE Company - ANCHOR / ROMA / LEON | 150.00 | Nos. | 75.00 | 11250.00 | 79.00 | 11850.00 | 85.67 | 12850.50 | **45.00** | **6750.00** |
| 6.00 | C. F. L. (CAP ES-40) Size - 85 WATT, Company - PHILIPS / CROMPTON / HPL Type - ECOLUX | 200.00 | Nos. | 0.00 | 0.00 | 629.00 | 125800.00 | 659.00 | 131800.00 | **490.00** | **98000.00** |
| 7.00 | C. F. L. LAMP, Size - 35 WATT,Company -HPL / CROMPTON / PHILIPS, Type - 4U | 800.00 | Nos. | 260.00 | 208000.00 | 299.00 | 239200.00 | 247.52 | 198016.00 | **230.00** | **184000.00** |
| 8.00 | CEILING FAN, SIZE-1200 MM, Company - CROMPTON Type - HIGH SPEED | 150.00 | Nos. | 2010.00 | 301500.00 | 1749.00 | 262350.00 | 1676.78 | 251517.00 | **1591.00** | **238650.00** |
| 9.00 | WALL FAN, Size-450 MM, Company - ALMONARD / CROMTON / HAVELLS Type - INDUSTRIAL FAN | 25.00 | Nos. | 5872.00 | 146800.00 | 5499.00 | 137475.00 | 5236.00 | 130900.00 | **5164.00** | **129100.00** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३ | यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर | | | |
| | अ.क्र. | वर्ष | परिमाण | दर प्रती सेट रु. |
| | - | - | - | - |
| १४ | मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल- | | | |
| | अ.क्र. | तपशिल | वर्ष | खर्च परिमाण |
| | - | - | - | - |
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | - | | |
| १६ | मागील खरेदी दर | - | | |
| १७ | मागील पुरवठादार | - | | |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले आयटेम क्र.०१, ०३, व ०५ साठी मे.इर्मजन्सी इलेक्ट्रॉनिक सिक्युरिटी (इं) प्रा.लि.,मुंबई यांचे न्युनतम दर येतात, आयटेम क्र.०२, ०४, ०६, ०७, ०८ व ०९ साठी मे.श्री साई इलेक्ट्रीकल्स, अस्तगांव यांचे निम्नतम दर येतात. | | |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव | ०१). मे.इर्मजन्सी इलेक्ट्रॉनिक सिक्युरिटी (इं) प्रा.लि.,मुंबई<br>०२). मे.श्री साई इलेक्ट्रीकल्स्, अस्तगांव | | |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का. | होय. | | |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितींची नावे. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उप मुख्य कार्यकारीअधिकारी, मा.मुख्य लेखाधिकारी,आणि उपकार्यकारी अभियंता (विद्युत) | | |
| २२ | इस्टिमेट कॉस्ट | रु. ७,९५,३२५/- | | |
| २३ | घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशील अदांजे रु. ----- प्रति सेट मार्केट रेट रु. ---- | | | |
| २४ | मागील खरेदी | सध्याचे प्राप्त दर | फरक | % ने कमी / जास्त |
| | - | - | - | - |

२५). संक्षिप्त टिप :- विद्युत विभागाचे मागणीप्रमाणे विद्युत विभागाकरीता इलेक्ट्रीकल मटेरीयल खरेदी करणेकामी ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या.

सदर ई-निविदेमध्ये ०४ निविदाकारांनी भाग घेतला होता. त्यामध्ये चारही निविदाधारक पात्र झालेले आहे. याकामी तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या चार निविदाधारकांच्या कमर्शियल निविदा दि.०५-०६-२०१९ रोजी मा.खरेदी समितीचे सभेत उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडण्यात आल्या. यामध्ये उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले आयटेम क्र.०१, ०३, व ०५ साठी मे.इर्मजन्सी इलेक्ट्रॉनिक सिक्युरिटी (इं) प्रा.लि.,मुंबई यांचे न्युनतम दर येतात तसेच आयटेम क्र.०२, ०४, ०६, ०७, ०८ व ०९ साठी मे.श्री साई इलेक्ट्रीकल्स, अस्तगांव यांचे निम्नतम दर येत आहे. तरी न्युनतम दरधारक ०१). मे.इर्मजन्सी इलेक्ट्रॉनिक सिक्युरिटी (इं) प्रा.लि.,मुंबई व ०२). मे.श्री साई इलेक्ट्रीकल्स्, अस्तगांव यांचेशी ई-निविदेत दिलेल्या न्युनतम दराबाबत चर्चा/वाटाघाटी होऊन निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.३०१ **प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे.इर्मजन्सी इलेक्ट्रॉनिक सिक्युरिटी (इं) प्रा.लि.,मुंबई व मे.श्री साई इलेक्ट्रीकल्स्, अस्तगांव आजचे व्यवस्थापन समितीसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. समितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी मे.श्री साई इलेक्ट्रीकल्स्, अस्तगांव यांनी अ.नं.२,८ व ९ करीता दर कमी केले असुन मे.इर्मजन्सी इलेक्ट्रॉनिक सिक्युरिटी (इं) प्रा.लि.,मुंबई यांनी दर कमी करण्यास असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, विद्युत विभागाकरीता इलेक्ट्रीकल मटेरीयल खरेदी करणेकामी निम्नतम निविदाधारक मे.इर्मजन्सी इलेक्ट्रॉनिक सिक्युरिटी (इं) प्रा.लि.,मुंबई व मे.श्री साई इलेक्ट्रीकल्स्, अस्तगांव यांनी चर्चेअंती देऊ केलेले खालील प्रमाणे दर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यास मान्यता देण्यात आली.**

**०१). मे.इर्मजन्सी इलेक्ट्रॉनिक सिक्युरिटी (इं) प्रा.लि.,मुंबई**

| Sl.No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | Rate |
|---|---|---|---|---|
| 1.00 | RCCB-30 MA<br>Size - 4 POLE 63 A / 415 VOLT / 3 PHASE,<br>Company - SIEMENS / L & T / HAGGER | 25.00 | Nos. | 2290.97 |
| 3.00 | RCCB 4 POLE<br>Size - 4 POLE 63 A / 415 VOLT / 3 PHASE,<br>SENSITIVITY- 30 MA<br>Company - LEGRAND / SIEMENS / L & T | 50.00 | Nos. | 2290.97 |
| 5.00 | C. F. L.LAMP,Size-11WATT,<br>Company - CROMPTON / PHILIPS / HPL, Type - 3U | 1000.00 | Nos. | 77.62 |

**२). मे.श्री साई इलेक्ट्रीकल्स, अस्तगांव**

| Sl.No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | Rate |
|---|---|---|---|---|
| 2.00 | WALL FAN, Size- 450 MM,<br>Company - CROMTON / HAVELLS / ALMONARD, Type - INDUSTRIAL FAN | 30.00 | Nos. | 5160.00 |
| 4.00 | 6A BELL PUSH, SIZE-MODULAR WHITE<br>Company - ANCHOR / ROMA / LEON | 150.00 | Nos. | 45.00 |
| 6.00 | C. F. L. (CAP ES-40) , Size - 85 WATT<br>Company - PHILIPS / CROMPTON / HPL<br>Type - ECOLUX | 200.00 | Nos. | 490.00 |
| 7.00 | C. F. L. LAMP, Size – 35 WATT, Company -HPL / CROMPTON / PHILIPS, Type - 4U | 800.00 | Nos. | 230.00 |
| 8.00 | CEILING FAN, SIZE-1200 MM,<br>Company – CROMPTON,<br>Type - HIGH SPEED | 150.00 | Nos. | 1590.00 |
| 9.00 | WALL FAN, Size-450 MM, | 25.00 | Nos. | 5160.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | Company - ALMONARD / CROMTON / HAVELLS, Type - INDUSTRIAL FAN | | | |

(कार्यवाही-विद्युत विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.४५ **शासन निर्णय वाचन- खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत ऑगस्ट-२०१९ सत्रापासुन घ्यावयाचे प्रवेशासाठी राज्य शासनानी लागु केलेल्या ''व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्ती'' योजनेची माहिती घेऊन शुल्क स्विकारणे बाबत.**

प्रस्ताव **अधिनियमः-** सन २००४महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ (भाग.४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम १७ (२ ड) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील,तसेच,शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील," अशी तरतूद आहे.

प्रस्तावः-औ.प्र.संस्थेची स्थापना १९८४मध्ये झाली. ऑगस्ट २०१४सत्रापर्यत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र शासन मुंबई यांचे वेळोवळीच्या निर्देशानुसार संस्थास्तरावर गुणानुक्रमे प्रवेश प्रक्रिया पुर्ण केली जात आहे. ऑगस्ट २०१५ च्या सत्रापासुन राज्यातील सर्व शासकीय वअशासकीय औ.प्र.संस्थेचे प्रवेश शासनाकडुन मध्यवर्ती प्रवेश प्रक्रियेव्दारे Online पध्दतीने होत आहे.सध्या संस्थेत ११व्यावसायाच्या २२तुकडया कार्यरत आहेत.त्यापैकी १४तुकडयामध्ये ३०४जागांवर प्रवेश प्रक्रिया पुर्ण करून ऑगस्ट-२०१९पासून नवीन सत्राचे प्रशिक्षण सुरू करावे लागेल.प्रवेश दयावयाच्या चालु (ऑगष्ट २०१९)सत्र प्रवेशापासुन सदर एकूण जांगाची संस्था शासनाने २८०केली आहे.

व्यवसाय शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजना औदयोगिक प्रशिक्षण संस्थेला लागु करणे बाबत दि.२९/०५/२०१९ रोजी शासन निर्णय खालीलप्रमाणे झाला आहे.

शासन निर्णय–

१. शासकिय औदयोगिक प्रशिक्षणसंस्थांमधील पीपीपी योजनेतंर्गत उपलब्ध जागांवर तसेच खाजगी औदयोगिक प्रशिक्षण संस्थांमधुनशिल्पकारागिर प्रशिक्षण योजनेतंर्गत अभ्यासक्रमांसाठी केंद्रिय ऑनलाईन पध्दतीने प्रवेश घेणा-या सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासआणि खुल्या प्रवर्गातील आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातीलविदयार्थ्यांना सन २०१९-२०प्रवेश सत्रापासुन प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्तिचा लाभ देण्यासाठी व्यवसायप्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजनेस शासन या द्वारे मान्यता देत आहे.

२.सदर व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजना खालील प्रमाणे असेल.

१) औदयोगिक प्रशिक्षण संस्थेमधील अभ्यासक्रमांच्या शासकीय तसेच पीपीपी योजनेंतर्गत प्रवेशासाठी उपल्बध जागांसाठी व खाजगीऔदयोगिक प्रशिक्षण संस्थांमधील अभ्यासक्रमांसाठी प्रवेशघेतलेल्या विदयार्थ्यांकरीता उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक.१४/०५/२०१५रोजीच्या संदर्भांधीन शासन निर्णयान्वये प्रशिक्षण शुल्क निश्चित करण्यात आले आहे.त्यानुसार केंद्रीयऑन लाईन पध्दतीने पीपीपी योजनेंतर्गत प्रवेशासाठी उपलब्ध जागांसाठी व खाजगी औदयोगिक प्रशिक्षण संस्थामधील अभ्यासक्रमासाठी प्रवेशघेतलेल्या विदयार्थ्यांकरीता विहितकेलेल्या प्रशिक्षण शुल्कामधुन,शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्थेतील अभ्यासक्रमासाठी निश्चित केलेले प्रशिक्षण शुल्क वजा जाता,उर्वरीत प्रशिक्षण शुल्काच्या ८०% इतक्या रकमेची प्रतिपुर्ती सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास आणि खुला(आर्थिक दृष्टया दुर्बल घटक)प्रवर्गातील विदयार्थ्याना अनुज्ञेय राहील.

२) तथापी राजश्री छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक.०७/१०/२०१७रोजीच्याशासननिर्णयानुसार पालकांचे एकत्रित उत्पन्न रुपये २.५०लाख

अथवा त्यापेक्षा कमी किंवा त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारीत मर्यादेनुसार असल्यास, अशा सामाजित व शैक्षणिक दृष्टया मागास व खुला (आर्थिकदृष्टया दुर्बलघटक )प्रवर्गातील विदयार्थ्यांकरीताअ.क्र.२ (अ) नुसार अनुज्ञेय असलेल्या ८०% ऐवजी १००%इतक्या रकमेची प्रतिपुर्ती अनुज्ञेय राहील.

३) शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्थेतील पीपीपी योजनेंतर्गत गठीत करण्यात आलेली संस्था व्यवस्थापन समिती व खाजगी औदयोगिकप्रशिक्षण संस्थेच्या बॅक खात्यामध्ये विदयार्थ्यांच्या व्यवसाय प्रशिक्षण शुल्काच्या अनुज्ञेय प्रतिपुर्तीची रक्कम आपले सरकार महाडिबीटीपोर्टल किंवा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत विकसित करण्यात येणा-या स्किल व्हॅालेट या संकल्पनेच्या माध्यमातूनजमा करण्यात येईल.संबंधित संस्था व्यवस्थापन समिती/खाजगी औदयोगिक प्रशिक्षण संस्था शासनाने विहित केलेल्या प्रशिक्षण शुल्कामधून व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्तीची अनुज्ञेय रक्कम वजा जाता उर्वरीत प्रशिक्षण शुल्क संबंधित विदयार्थ्याकडून स्विकारु शकतील.

४) सामान्य प्रशासन विभाग (माहिती व तंत्रज्ञान ) या विभागाने गठीत केलेल्या उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेने व्यवसाय शिक्षण वप्रशिक्षण संचालनालयामार्फत स्किल व्हॅालेट ही संकल्पना विकसित करण्यात येईल.

३. प्रस्तुत योजनेंतर्गंत खालील अटी व शर्तीची पूर्तता करणारे विदयार्थी शुल्क प्रतिपूर्ती करीता पात्र राहतील.

१) शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्थेमधील पीपीपी योजनेंतर्गत प्रवेशासाठी उपलब्ध जागांसाठी वखाजगी औदयोगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये केंद्रीय ऑन लाईन प्रवेश प्रक्रियेव्दारे प्रवेश घेणे बंधन कारक राहील.खाजगी औदयोगिक प्रशिक्षण संस्थेतील संस्था व्यवस्थापन कोटयातील जागांवर प्रवेश घेणा-या विदयार्थ्यांना सदर योजना लागु राहणार नाही.

२) विमुक्त जाती व भटक्या जमाती,इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागाच्या दि .१६/१२/२०१७रोजीच्या शासन निर्णयान्वये उन्नत व प्रगट गट याकरीता नॉन क्रिमीलेअर साठी निश्चीत केलेल्या उत्पन्न मर्यादेनूसार विदयार्थ्यांच्या पालकांचे एकत्रीत उत्पन्न रुपये ८.००लाखाच्या मर्यादेत किंव उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि.०७/१०/२०१७रोजीच्या शासन निर्णयानुसार पालकांचेएकत्रीत उत्पन्न रुपये २.५०लाखाच्या मर्यादेत असने आवश्यक राहिल या पृष्टर्थ विहित प्राधिका-याने निर्गमित केलेले प्रमाणपत्र सादर करणे क्रम प्राप्त असेल.सदर प्रमाण पत्र पाच वर्षासाठी वैध राहील.सक्षम अधिका-याने दिलेले उत्पन्नाचे प्रमाण पत्र पालकांच्या प्रत्यक्ष उत्पनापेक्षा कमी आढळून आल्यास /बोगस आढळून आल्यास सदर प्रमाणपत्र निर्गमित करणारे अधिकारी,संबंधित विदयार्थी आणि पालका विरूध्द फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात येईल.

३) सक्षम प्राधिका-याकडून संबंधित विदयार्थ्यास कुटूंबाच्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र देताना त्या विदयार्थ्यांच्या पालकांचे (आई व वडील यांचेएकत्रित) वार्षिक उत्पन्न विचारात घ्यावे.विदयार्थ्यांचे आई-वडील (पालक) हयात नसल्यामुळे उत्पन्न प्रमाणत्र सादर करण्यास अडचण असल्यास उत्पन्न प्रमाणपत्राऐवजी संबंधित औदयोगिक प्रशिक्षण संस्थेने आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची तपासणी करून त्याप्रमाणे पात्रतेकरीता प्रमाणित करुन योजनेची अंमलबजावणी करणा-या सक्षम अधिका-यांस सर्व कागदपत्रांसह शिफारस करावी.अशा प्रकारे प्राप्त शिफारशींच्या आधारे प्रकरणनिहाय तपासणी करून योजनेची अंमलबजावणी करणा-या सक्षम अधिका-याने अशा अनाथविदयार्थ्यांना योजनेच्या पात्रतेसंदर्भात पुढील कार्यवाही करावी.

४) विदयार्थ्यांने यापूर्वी खाजगी व शासकीय औदयोगिक संस्थेमध्ये कोणत्याही अभ्यासक्रमांचा लाभ घेतलेला नसावा.

५) तसेच राज्य/केंद्र शासनाच्या विभागाने अथवा त्यांच्या अधिपत्याखालील स्थानिक प्राधिकरण, कंपन्या अथवा महामंडळे यांनी पुरस्कृतकेलेल्या कोणत्याही प्रशिक्षण कार्यक्रमाचा यापूर्वी लाभ घेतलेला नसावा.

६) विदयार्थी महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असणे आवश्यक आहे.

७) DGT,नवी दिल्ली अथवा MSCVT यांनी मान्यता दिलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमांच्या तुकडयांच्या प्रवेशित जागांवर प्रवेश घेणे बंधनकारक राहील.

८) सदर योजनेचा लाभ हा कुटूंबातील केवळ दोन अपत्यांपर्यंत मर्यादित राहील.

९) सदर योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी संबंधित शैक्षणिक वर्षात इच्छुक अर्जदार प्रशिक्षणार्थ्यांची प्रवेशित अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षण वर्गातीलउपस्थिती ही, DGT,नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या निकषानुसार

असणे आवश्यक राहील.सदर उपस्थिती आधार संलग्नीत बायोमेट्रीक उपस्थिती प्रणालीवर नोंदविणे आवश्यक राहील.

१०) अर्जदार विदयार्थ्यांस प्रत्येक सत्र परिक्षा अथवा वर्षाची परिक्षा देणे आवश्यक राहील.केवळ विशिष्ट परिस्थितीत विशेषत :आजारपणाच्या करणास्तव परिक्षा देणे शक्य झाले नसल्यास तसे विदयार्थी व संबंधित संस्थेचे शिफारस केल्यानंतर सहसंचालक,प्रादेशिक विभाग यांनी प्रमाणित करणे आवश्यक आहे.

११) संबंधित विदयार्थी स्वत:च्या चुकीच्या वर्तनामुळे समाधानकारक शैक्षणिक प्रगती करत नसल्याबाबत किंवा संबंधित प्राधिका-याच्यापूर्वपरवानगीशिवाय अनियमित असणे अथवा गैरहजर रहाणे इत्यादी स्वरूपाचे गैरवर्तन करत असल्यबाबत शैक्षणिक संस्थेच्या प्रमुख्यांने निदर्शनास आणले तर अशा विदयार्थ्यांकरीता संस्थेला शुल्क प्रतिपुर्ती अनूज्ञेय राहणार नाही.

१२) या योजनेंतर्गत पात्र विदयार्थ्यांने प्रशिक्षण मध्येच सोडले तर अशा विदयार्थ्यांकरीता संस्थेला अथवा संस्था व्यवस्थापन समितीस अदा करण्यात आलेली प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्ती राज्य शासनास योग्य वाटल्यास वसुल करण्यात येईल.

४. सदर योजनेमध्ये व त्याच्या अमंलबजावणीबाबत कोणतीही पूर्वसुचना न देता बदल अथवा सुधारणा करण्याचे अधिकार शासनासराहतील व असे बदल केल्यामुळे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्याबाबतचा दावा कोणत्याही विदयार्थ्यास व औदयोगिक प्रशिक्षणसंस्थेस अथवा विदयार्थ्यांच्या पालकांना शासनाच्या विरुध्द करता येणार नाही.

५. या प्रयोजनार्थ सर्व औदयोगिक प्रशिक्षण संस्थांना बायोमॅट्रिक उपस्थिती प्रणालीवर सर्व प्रशिक्षणर्थ्यांची उपस्थिती नोंदविणे आवश्यकराहील सदर बायोमॅट्रिक प्रणाली स्वखर्चाने सर्व औदयोगिक प्रशिक्षण संस्थांनी उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

६. कौशल्य विकास व उदयोजकता विभागाने शासकिय व खाजगी औदयोगिक प्रशिक्षण संस्थांमधील अभ्यासक्रमांच्या प्रशिक्षण शुल्कामध्ये, विमुक्त जाती व भटक्या जमाती,इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागाने उन्नत व प्रगत व्यक्ती / गट याकरीता नॉनक्रिमिलेअर साठी असलेल्या उत्पन्न मर्यादेमधील तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागाने राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजनेकरीता पालकांच्या उत्पन्नाची विहित केलेली मर्यादा यामध्ये भविष्यात केलेले बदल /सुधारणा व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजनेकरीता लागु राहतील.

७. संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण ,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,संचालनालय,म.रा.,मुंबई यांना व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजनेच्या अंमलबजावणीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणुन घोषित करण्यात येत आहे. उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेने स्किल व्हॉलेट ही संकल्पना विकसीत करण्याची जबाबदारी संचालक, ,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांची राहील.

८. सदर योजनेकरीता निधीची तरतुद व खर्च करण्यासाठी कौशल्य विकास व उदयोजकता विभागाच्या मागणी क्र.झेडए-२अंतर्गत २२३० कामगार व सेवा योजना या प्रधानलेखाशिर्षाखाली स्वतंत्र उप लेखाशिर्ष व संगणक सांकेतांक वित्त विभागाच्या व महालेखापालांच्या मान्यतेने उघडण्यात येईल.तसेच सदर योजनेकरीता आवश्यकतेनुसार निधीची मागणी करण्याची जबाबदारी संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांची राहील.

९. अनुसुचीत जाती,अनुसुचीत जमाती,विमुक्त जाती व भटक्या जमाती,इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातीलविदयार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजना लागु करण्याबाबतचे आदेश सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, आदीवासी विकास विभाग विमुक्त जाती व भटक्या जमाती,इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग यांचेमार्फत स्वतंत्रपण निर्गमित करण्यात येतील.

१०. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.१९६/१४७१,दि.१५/१०/२०१८व वित्त विभागाच्या अनौपचारीकसंदर्भ क्र.२९/व्यय-६दि.१२/०२/२०१९ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमीत करण्यात येत आहे.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेत अंक २०१९०५२९११२६२२९५०३असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

ऑनलाईन प्रवेशाबाबत दि.२४/०६/२०१५ च्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत विषय क्र.४निर्णय(क्र.१९१) पुढीलप्रमाणे पारीत झालाआहे.

"सदरच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन श्री साईबाबा औदयोगिक प्रशिक्षण संस्थ्ेमधील,संस्था स्तरावरील २०% जागा ऑगस्ट २०१५ च्या सत्रापासून मध्यवर्ती प्रवेश पक्रिये (CAP) व्दारे भरणेत याव्यात.तसेच प्रशिक्षणार्थ्याच्या प्रशिक्षण शुल्कामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात येऊ नये. परंतु शासनाच्या सुधारीत दराने प्रशिक्षण अनामत रक्कम रु.५००/- व ग्रंथालय अनामत रक्कम रु.१००/- आकारण्यात यावी असे ठरले. "

तसेच दि.१५/०६/२०१७ च्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील विषय नं.३४ निर्णय (क्र.४९१) पुढील प्रमाणे पारित झाला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन औदयोगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रशिक्षणार्थ्यांना देण्यात येणा-या प्रवेश प्रक्रियेचे अवलोकन करणेत येऊन,त्याची नोंद घेण्यात आली.तसेच ऑगस्ट -२०१७ चे प्रवेश सत्रात १०० टक्के जागा मध्यवर्ती प्रवेश पदधती (CAP) व्दारे भरण्यात याव्यात असे ठरले. "

वरिल संदर्भ क्र.२चे शासन निर्णयानुसार खाजगी औदयोगिक प्रशिक्षण संस्थेसाठी निश्चित केलेल्या प्रशिक्षण शुल्काचे कमाल मर्यादा दरामध्ये वाढ न करता तत्पुर्वीचे म्हणजे २००८पासुनचे दरानुसार प्रशिक्षण शुल्क आकारण्याचा तसेच संस्था स्तरावरील २०% जागाही शासनाकडून मध्यवर्ती प्रवेश प्रक्रियेने भरण्याचा निर्णय संदर्भ क्र.३चे व्यवस्थापन समिती सभेत झालेला आहे. तदनुसार ऑगष्ट २०१५चे सत्रापासुन शासनाकडून ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेव्दा संस्थेतील सर्व १००% जागांचे प्रवेश दिले जात आहेत.

संदर्भ क्र.२नुसार शासनाने निश्चित कलेले प्रशिक्षण शुल्क व आपण प्रत्यक्ष आकरत असलेले प्रशिक्षण शुल्क खालील तक्ता 'अ ' मध्ये दिलेले आहे.

तक्ता - 'अ'

| अ. नं | गट प्रकार | शासनानी ठरविलेले कमाल प्रशिक्षण शुल्क दर(प्रतिवर्षासाठी) | संस्थेत कार्यरत असलेले व्यवसाय | सध्या आकरले जात असलेले २००८ पासुनचे प्रशिक्षण शुल्क दर (प्रतिवर्षासाठी) | तुकडींची संख्या | सुधारीत प्रवेश क्षमता | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | प्रथम वर्ष | व्दितीय वर्ष |
| १ | मशिन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | ३०,०००/- | टर्नर | १२०००/- | २ | १६ | १६ |
| | | | टूल अँड डाय मेकर | | २ | २० | २० |
| | | | मशिनिष्ट ग्राईडर | | २ | १६ | १६ |
| | | | वेल्डर(गॅस व इलेकट्रीक) | ८४००/- | २ | ४० | - |
| | | | फिटर | | २ | २० | २० |
| २ | बिगर मशिन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | २५०००/- | मोटर मेकॅनिक | ८४००/- | २ | २० | २० |
| | | | इलेक्ट्रीशियन | | २ | २० | २० |
| | | | मेकॅनिक रेफ्रीजरेशन अँड एसी (RAC) | | २ | २४ | २४ |
| | | | इन्फॉर्मेशन अँड कम्युनिकेशन टेकनॉलॉजी सिस्टिम मेंटनन्स (ICTSM) | | २ | २४ | २४ |
| | | | ट्रॅक्टर मेकॅनिक | | २ | ४० | - |
| ३ | बिगर अभियांत्रिकी गट | २००००/- | कॉम्पुटर ऑपरेटर अँड प्रोग्रामींग असिस्टंट (COPA) | ८४००/- | २ | ४८ | - |

आता संदर्भ क्र.१चे शासन निर्णयानुसार खाजगी औदयोगिक संस्थेत प्रवेश घेणा-या प्रशिक्षणार्थ्यापैकी सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासआणि खुला (आर्थिक दृष्टया दुर्बल घटक ) प्रवर्गातील प्रशिक्षणार्थ्यांनसाठी "व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्ती " योजनेस शासनाकडून मान्यता देण्यात आलेली आहे.शासनानी २०१५ मध्ये निश्चित केलेल्या प्रशिक्षण शुल्काचे दरानुसार वाढ न करता २००८ पासुन आपल्या संस्थेत आकारले जाणारे दरानुसार **तक्ता-अ**मधे दर्शविल्यानुसार शुल्कामध्ये आपन सवलत दिलेली आहे.दि.२९/०५/२०१९ च्या शासन निर्णयानुसार सामाजिक व शैक्षणिक दृष्टयामागास आणि खुला (आर्थिक दृष्टया दुर्बल घटक)प्रवर्गातील विदयार्थ्यांना प्रकरणपरत्वे ८०% किंवा १००% प्रतिपुर्ती अनुज्ञेय आहे.प्रतिपुर्ती रक्कम ही आपल्या संस्थेत सध्या दिल्या जाणा-या प्रशिक्षण शुल्का पेक्षा अधिक असणार आहे.त्यामुळे अशा प्रशिक्षणार्थ्यांना **तक्ता-अ** मध्ये नमुद शासकीय औ.प्र.संस्थेच्या प्रवेशानुसारचे प्रशिक्षण शुल्क वार्षिक आकारावे.तसेच कोणत्याही सवलतीत बसण्याची कागदपत्रांची पुर्तता नसणा-या ऑनलाईन प्रवेश प्रणालीत निवड झालेल्या उमेदवारांना सध्या

आकारले (२००८ पासुनचे दरानुसार) जाणारे प्रशिक्षण शुल्क प्रति वर्षी आकारता येईल.त्यानूसार व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्ती शासन निर्णयानुसार व आपल्या सध्याच्या प्रशिक्षण शुल्क सवलतिचा विचार करून चालु ऑगष्ट २०१९सत्रापासुन प्रशिक्षण दर खालील तक्ता-ब नुसार आकारता येईल.

**तक्ता-ब**

| अ.नं | गट प्रकार | शासकीय औ.प्र.संस्थेतील आकारली जाणारी प्रशिक्षण शुल्क (वार्षिक ) | | अशासकीय औ.प्र.संस्थेसाठी शासनानी ठरविलेले कमाल प्रशिक्षण शुल्क दर (प्रतिवर्षासाठी) | संस्थेत कार्यरत असलेले व्यवसाय | सध्या आकरले जात असलेले प्रशिक्षण शुल्क दर (प्रतिवर्षासाठी) | शुल्क प्रतिपुर्तीसाठी पात्र विदयार्थ्यांना ऑगष्ट 2019 सत्र प्रवेशापासुन आकारावे लागणारे प्रशिक्षण शुल्क दर (प्रस्तावीत ) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सामान्य श्रेणी | राखिव श्रेणी | | | | खुली श्रेणी (आर्थिक दृष्टया दुर्बल घटक) | राखिव श्रेणी |
| १ | २ | | | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | मशिन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | १२०० | - | ३००००/- | टर्नर | १२०००/- | १२०० | - |
| | | | | | टूल अॅड डाय मेकर | | | |
| | | | | | मशिनिष्ट ग्राईडर | | | |
| | | | | | वेल्डर(गॅस व इलेकट्रीक) | ८४००/- | | |
| | | | | | फिटर | | | |
| २ | बिगर मशिन गट - अभियांत्रिकी व्यवसाय | १०००/- | - | २५०००/- | मोटर मेकॅनिक | ८४००/- | १००० | - |
| | | | | | इलेक्ट्रीशियन | | | |
| | | | | | मेकॅनिक रेफ्रीजरेशन अॅड एसी (RAC) | | | |
| | | | | | इन्फॉर्मेशन अॅड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी सिस्टिम मेंटनन्स (ICTSM) | | | |
| | | | | | ट्रॅक्टर मेकॅनिक | | | |
| ३ | बिगर अभियांत्रिकी गट | ८००/- | - | २००००/- | कॉम्पुटर ऑपरेटर अॅड प्रोग्रामींग असिस्टंट (COPA) | ८४००/- | ८०० | - |
| खुला प्रवर्ग किंवा शुल्क प्रतिपुर्ती साठीचे कागदपत्रांची /अटिंची पुर्तता न करणारे सर्व उमेदवार विदयार्थीयांना यांना वरील रकाना क्र.५ नुसार सध्याचे दराने प्रति वर्ष शुल्क आकारता येईल. | | | | | | | | |

प्रशिक्षणार्थ्यांसाठी बायोमिट्रीक उपस्थिती नोंद यंत्रणा बसविणे बाबत.

बायोमॅट्रीक उपस्थिती प्रणालीवर सर्व प्रशिक्षणार्थ्यांची उपस्थिती नोंदविणे अनिवार्य झाल्यामुळे बायोमॅट्रीक प्रणाली औ.प्र.संस्थेत बसवण्याची व्यवस्था संस्थानचे माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत करता येईल. २०१५ व २०१८ मधील व्यवस्थपनसमिती निर्णयास अनूसरून चालू वर्षाच्या संस्थान स्तरावरील २०%जागा मध्यवर्ती प्रवेशप्रक्रियेव्दारे (CAP) भरणेबाबत संचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण महाराष्ट्र शासन मुंबई यांना विनंती पत्र पाठवता येईल.

मागणी:- १.आपले औदयोगिक प्रशिक्षण संस्थेतऑगस्ट-२०१९सत्रापासुन घ्यावयाचे प्रवेशासाठी राज्य शासनानी लागु केलेल्या "व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्ती" योजने बाबतच्या शासन निर्णयास अनुसरून व संस्थेतील सध्याचे आकारले जाणारे प्रशिक्षण शुल्क या दोन्हींचा विचार करून ऑगष्ट २०१९ च्या प्रवेशा पासुन लागु करावयाचे प्रशिक्षण शुल्क दर या बाबतप्रशिक्षण शुल्काची प्रतिपुर्ती मिळण्यास पात्र असलेल्या प्रवेशपात्र असणा-या सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास आणि खुला

श्रेणीमधील फक्त आर्थिक दृष्टया दुर्बल घटक प्रवर्गातील विदयार्थ्यांना शासकीय औ.प्र.संस्थेत प्रवेशासाठी असलेले प्रशिक्षण शुल्क आकारावे.तसेच प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजनेच्या अर्हतेमध्ये न बसना-या किंवा त्याबाबत पात्रतेची पुर्तता न करणा-या प्रवेशपात्र विदयार्थ्यांना मागिल वर्षी पर्यत आकारल्या जाणा-या दराने प्रशिक्षण शुल्क प्रतिवर्षी आकारले जावे असे मत आहे. या बाबत उचीत निर्णय व्हावा. २.संस्था स्तरावरील २०% जागा २०१५ ते २०१९ च्या प्रवेशाप्रमाणे यापुढेही शासनाकडून मध्यवर्ती प्रवेश प्रक्रियेव्दारे भरता येतील.

३.व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजनेबाबतच्या शासन निर्णयातील सुचने नुसार आपल्या औ.प्र.संस्थेतील प्रशिक्षणार्थ्याच्या उपस्थिती साठी बायोमेट्रीक उपस्थिती नोंद यंत्रणा बसवावी लागेल.त्यास मान्यता असावी.

संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान :- प्रशासकीय मान्यतेनुसार कार्यवाही करता येईल.

